

महाराष्ट्राचे जिल्हे

जळगांव

(पूर्व खानदेश)

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

महाराष्ट्राचे जिल्हे

जळगांव

किंमत ५० नवे पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

अनुक्रमणिका

जळगांव जिल्हा केळयांसाठीं प्रसिद्ध ! त्यामुळें मुखपृष्ठावर केळयांचा घड चित्रित करण्यांत आला आहे.

जळगांव जिल्हा

ऐतिहासिक पार्श्वभूमि

दोन जिल्हे

या जिल्ह्याचें जळगांव हें नांव अगदीं अलीकडे म्हणजे २१ ऑक्टोबर १९६० पासून महाराष्ट्र राज्य सरकारनें बदललें असून तत्पूर्वीं पूर्व खानदेश या नांवानें हा जिल्हा ओळखला जात असे. पूर्व खानदेश हा स्वतंत्र जिल्हा पूर्वीं नव्हता. पण १९०६ सालीं राज्यशासन सुलभतेसाठीं हा स्वतंत्र जिल्हा, मूळचा खानदेश जिल्हा विभागून निर्माण करण्यांत आला. पूर्व व पश्चिम असे खानदेशचे दोन जिल्हे करण्यांत आले. तत्पूर्वीं खानदेश या नांवानेंच या दोन्हीं जिल्ह्यांचा एकत्रित भाग ओळखला जात असे. तेव्हा जळगांव व धुळें या दोन्हीं जिल्ह्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमि एकच आहे.

खानदेश-- नांवाची व्युत्पत्ति

खानदेश या नांवाच्या व्युत्पत्तीसंबंधीहि अनेक पर्याय आहेत. कोणी यादव राजा कान्हेर देव यांचे नांवावरून, कोणी सेऊणदेश या नांवावरून तर कोणी फरुकी खानांचा देश या नांवावरून खानदेश हें नांव पडल्याचें सांगतात. अकबराच्या काळीं हा "दानदेश" म्हणून संबोधला जात असल्याचेंहि सांगण्यांत येतें. तथापि खानदेश हें नांव निश्चित कोणत्या व्युत्पत्तीवर व कोणत्या काळांत रूढ झालें हें सांगतां येणार नाहीं.

खानदेच्या प्राचीन सीमा

रामायणाच्या किष्किंधा कांडांत ४१व्या श्लोकांत ऋषिक या प्रदेशाचा उलेख आहे. या ऋषिक प्रदेशांत सुग्रीवानें सीतेचा शोध करण्याचा आदेश दिल्याचा उल्लेख आहे. धुळें येथील राजवाडे संशोधक मंडळाचे क्युरेटर श्री. द. रा. भट यांनींहि, महाभारत, रामायण, दशकुमारचरित यांत ऋषिक नांवाच्या प्रदेशाचे उल्लेख आढळतात; या उल्लेखांनुसार ऋषिक देशाच्या पूर्वेस प्राचीन विदर्भ, उत्तरेस माळवा म्हणजे प्राचीन अनुप किंवा महिषक व दक्षिणेस मराठवाडा

म्हणजे प्राचीन अश्मक हे देश असल्याचें वर्णन असल्यानें ह्या भौगोलिक परिस्थितीशीं जुळणारा भूभाग खानदेशशिवाय दुसरा असूंच शकत नाहीं असें म्हटलें आहे. खानदेश या प्रदेशाच्या जुन्या सीमा पूर्वेस अशीरगड, पश्चिमेस नाशिक, दक्षिणेस पाटणें व मध्यभागीं ललिंग अशा होत्या. गेल्या दोन हजार वर्षांच्या कालखंडांत अनेक राजवंशांच्या राजवटींत नाशिक व खानदेश एकाच अधिपत्या खालीं असल्याचा ऐतिहासिक पुरावा असल्याचें श्री. द. रा. भट म्हणतात.

वसाहतकाल

हा जिल्हा महाराष्ट्राचा भाग असल्यानें महाराष्ट्राच्या वसाहत कालांत याहि जिल्ह्यांत वसाहत झाली असावी. खानदेशांतील इतिहासाभ्यासी श्री. द. ग. काळे हे म्हणतात "मराठीचें मूळ क्षेत्र जें वऱ्हाड त्याच्या निकटवर्ती खानदेश असल्यानें येथेंहि प्राचीन काळींच वस्ती झाली असली पाहिजे. दंडकारण्याच्या आरंभाचाच हा प्रांत असल्यानें दक्षिणेकडे वस्ती होण्याच्या पूर्वीं नर्मदा खोरें व्यापल्यानंतर तापी, गिरणा, पांझरा, गोदावरी, प्रवरा, या नद्यांच्या खोऱ्यांत वस्ती झाली असली पाहिजे".

श्री. द. ग. काळे यांच्या मतें नर्मदेच्या उत्तरेकडील सपाट व सुपीक प्रदेशांत लोकवस्तीची फार दाटी झाल्यावर खालीं दंडकारण्यांत वसाहत करण्याची आर्यांना आवश्यकता भासली व ख्रिस्त-शकपूर्व १,००० पासून शकपूर्व ३०० वर्षापर्यंतच्या काळांत ही वसाहत झाली असावी. दक्षिणेंत विदर्भांत त्यांची पहिली वसाहत झाली व नंतर ते खानदेशांत उतरले. विदर्भांत गौंडांचीं राज्यें होतीं तशीं खानदेशांत भिल्लांचीं राज्यें नसलीं तरी त्यांचें वर्चस्व असावें. आर्य व येथील आदिवासी यांच्यांत संघर्ष घडला असावा.

खानदेशचे राज्यकर्ते

ख्रिपूस्तर्वी ३०० वर्षांच्या सुमारास बौद्धधर्मीय राजसत्ता येथें असावी. त्यानंतर आंध्रभृत्यांनीं राज्य केलें. परंतु इ० स० च्या पहिल्या शतकाच्या मध्यांत महाक्षत्रप या उत्तर प्रदेशांतील राजानें आंध्रभृत्यांना घालवून दिलें. या घराण्याचें राज्य केवळ ४० वर्षेंच टिकलें. इ० स० १२४ ते १३५ या दरम्यान गौतमीपुत्र यानें क्षत्रप, साह राजांचा पराभव करून पुन्हा आंध्रभृत्यांची राजवट सुरूं केली. त्यानंतर इ० स० २५० पर्यंत हा प्रदेश शातवाहनांच्या आधिपत्याखालीं असावा असें वाटतें. शातवाहनानंतर पांचव्या शतकापर्यंतच्या (इ० स० ४१०) राज्यकर्त्यांविषयीं माहिती उपलब्ध नाहीं. नाशिकजवळच्या लेण्यांतील इ० स० ४१९ च्या एका शिलालेखावरून त्यावेळीं नाशिकवर वीरसेन अभिराची सत्ता होती, असें दृष्टोत्पत्तीस येतें. साहजिकच त्यावेळीं खानदेशलाहि अभिरांची सत्ता असावी. खानदेशची अहिराणी भाषा, अहिर शिंपी, अहिर सोनार इ. लोकसमाज यांचा विचार करतां खानदेश अभिरांचे केवळ सत्तेखालीं होता असें नसून तो अभीर लोकसमूहाचें वसतिस्थान असला पाहिजे असें दिसतें. अभीरांच्या राजवटीचा "गवळी राजा" या नांवानें निर्देश खानदेश नाशिक भागांत केला जातो. "पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांत चालुक्य घराण्यांतील पहिल्या पुलकेशीनें दक्षिणेंत वाटपी (बदामी) पर्यंतचा मुलुख पादाक्रांत केला होता. त्यांचेच नातलग सेंद्रक राजेहि येथें होऊन गेले. चालुक्यानंतर मान्यखेट (मालखेड-हैदराबाद) येथील राष्ट्रकूट राजांनीं दक्षिण, कोंकण, गुजरातचा कांहीं भाग व विंध्याद्रीपर्यंत मध्यभारताचा भाग आपल्या वर्चस्वाखालीं आणला. राष्ट्रकूटांचे कांहीं ताम्रपट खानदेशांत सांपडले आहेत. इ० स० ९७० च्या सुमारास चालुक्य घराण्यांतील तैलप राजानें राष्ट्रकूटांचें राज्य उलथून पाडलें. परंतु श्री. द. रा. भट यांच्या मतें त्यावेळीं खानदेशवर मात्र त्यांची सत्ता नव्हती तर त्यावेळीं सिन्नर येथील यादव वंशीय राजांच्या सेऊणदेश नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत खानदेश समाविष्ट होता. याच घराण्यांतील पांचवा

भिल्लम यानें इ० स० ११९१ मध्यें चालुक्यांचें राज्य हस्तगत करून देवगिरी ही यादव साम्राज्याची राजधानी केली. चालुक्यांचे कालांतहि खानदेश यादव सत्तेखालीं होता. इ० स० १०६९ मध्यें मौर्य घराण्यांतील गोविंदराज या राजानें सेऊणचंद्र (दुसरा) यांना वंदन केल्याचा उल्लेख चाळीसगांव जवळील वाघळी येथील शिलालेखांत आहे.

तेरावें शतक

तेराव्या शतकाच्या शेवटीं (इ० स० १२९५) जलालुद्दिन फिरोज खिलजी या दिल्लीच्या बादशाहाच्या अल्लाउद्दिन खिलजी या पुतण्यानें अचानक देवगिरीवर स्वारी करून यादवांच्याकडून खंडणी वसूल केली व परत जातांना त्यानें खानदेश लुटला. त्यानंतर इ० स० १३०६ मध्यें अल्लाउद्दिनानें आपला सेनापति मलिक काफूर यास रामदेवरावांकडे थकलेली खंडणी वसूल करण्यास पाठविलें. मलिक काफूरनें रामदेवराव यादवांना दिल्लीला नेलें व या प्रांतावर मुसलमान अधिकारी नेमले. यादवांनीं मुसलमानांचे मांडलिक म्हणून १३१२ पर्यंत खानदेशवर राज्य केलें. यानंतर खिलजींनीं यादवांचें राज्य पूर्णपणें खालसा केलें. त्यानंतर खिलजी घराणें जाऊन दिल्लीवर तघलख घराणें आलें व १३२३ मध्यें महंमद तघलकाच्या प्रबल सत्तेखालीं हा प्रांत आला तो १३४७ पर्यंत होता. पण त्यावर्षीं दक्षिणेंतील बंडखोर सरदारांनीं दक्षिणेंतील कांहीं भाग बळकाविला आणि त्यांचा प्रमुख अलाउद्दिन हसन गंगू यानें दक्षिणेंत स्वतंत्र बहामनी घराण्याची स्थापना केली. तथापि १३७० पर्यंत खानदेश तघलकांच्या आधिपत्याखालीं होता.

इ० स० १३७० ते १६०० ह्या सुमारें सव्वादोनशें वर्षाच्या काळांत खानदेशवर फरुकी राजांचें राज्य होतें. . .

शेवटचा फरुकी राजा बहादुरखान याचा मोगल बादशहा अकबर यानें पाडाव करून त्याला शरण आणलें व त्यानंतर खानदेशवर मोगल सत्ता सुरूं झाली. अकबरानें आपला मुलगा दानियल यास या भागाचा सुभेदार नेमलें व या भागाला दानदेश असें नांव दिलें. या काळांतील खानदेशच्या समृद्धीचीं वर्णनें "ऐने अकबरी"त फारच वाचनीय आहेत.

खानदेशची संपन्नता

सतराव्या शतकाच्या मध्यांत खानदेश संपन्नतेच्या शिखरावर होता. त्या काळांत इतके संपन्न भूभाग मोगल साम्राज्यांत फारच थोडे होते. परकीय प्रवाश्यांनींहि या भागाच्या समृद्धीचीं वर्णनें केलीं आहेत.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत खानदेशवर मराठयांची सत्ता होती. त्यानंतरच्या कालांत पेशवे, निजाम आणि मोगल यांच्यांतील संघर्षाचे परिणाम खानदेशला भोगावे लागले आणि त्यामुळें आज काहीं भाग मराठयांच्या ताब्यांत तर उद्यां काहीं भाग मोगलांच्या ताब्यांत अशी स्थिति इंग्रजांचा उदय होईपर्यंत राहिली.

इंग्रजानीं १९ फेब्रुवारी १८१८ रोजीं अष्टचाच्या रणांगणांवर पेशव्यांचा पराभव केला व तत्पूर्वींच ६ जानेवारी १८१८ रोजीं झालेल्या तहानें सातपुडचाचे दक्षिणेकडील होळकरांचे ताब्यांतील सर्व खानदेश इंग्रजांकडे गेला होता. खानदेशवर कॅ. ब्रिगज्ची नेमणूक होउन धुळें हें त्याचें मुख्य ठाणें झालें. भिल्ल, अरब, पेंढारी यांचा बंदोबस्त करून इंग्रजांनीं प्रजेला दिलासा दिला.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत खानदेश भागांत काजीरसिंग, भिमा, मावासिया नाईक, दौलतसिंग, काळू बाबा, भागोजी नाईक इ० भिल्ल नेत्यांनीं ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला. त्याच सुमारास ३ नोव्हेंबर १८५८ रोजीं तात्या टोपे यांनीं नर्मदा ओलांडून खानदेशकडे कूच केलें. बऱ्हाणपूरपासून ३० मैलांवर तात्या टोपे यांच्या फौजा आल्या. पण सर ह्यू रोझ यानें खानदेशच्या संरक्षणाची जय्यत तयारी केल्यानें तात्या टोपे उत्तरेकडे परतले. पारोळचाचे किल्लेदार झांशीच्या राणीचे नातलग १८५७ मध्यें इंग्रजांशीं राजनिष्ठ न ठरल्यावरून १८५९ मध्यें पारोळचाचा किल्ला व शहर इंग्रजांनीं ताब्यांत घेतलें.

सत्तावन साल

१८५९ नंतर इंग्रजांना विशेष विरोध राहिला नाहीं व जिल्ह्यांत शांतता नांदू लागली. १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी ठरल्यानंतर कांहीं काळ ब्रिटिश सत्तेविरुद्ध कोणी उठावणी केली नाहीं. पुढें शिक्षणप्रसारानें बुद्धिमानांना इंग्रजी सत्तेचें सत्य स्वरूप कळूं लागलें. लोकांत जागृति वाढूं लागली व पारतंत्र्याची चीड बळावूं लागली. स्वातंत्र्यसंपादनासाठीं देशांत हालचाली सुरूं झाल्या. या देशांतील अनेक थोर नेत्यांनीं जनताजागृतीचें कार्य केलें व १९४७ चे १५ ऑगस्ट रोजीं देश दास्यमुक्त होऊन स्वातंत्र्यसूर्य उगवला. स्वातंत्र्याच्या आंदोलनांत जो महान् पुरुषार्थ या देशांत घडला त्यासंबंधांत या जिल्ह्यांतील महत्त्वाच्या अशा दोन घटनांचा उल्लेख येथें केला पाहिजे.

स्वातंत्र्यसंपादनाचा पुरुषार्थ

जळगांव येथें अखिल भारतीय स्वदेशी प्रदर्शन १४ डिसेंबर १९३० ते २४ डिसेंबर १९३० पर्यंत भरलें होतें.

अशीच किंबहुना याहूनहि मोठी दुसरी घटना म्हणजे फैजपूर काँग्रेस ही होय. राष्ट्रीय काँग्रसचें अखिल भारतीय अधिवेशन शहरांत न भरतां खेडचांत भरावें असा निर्णय महात्माजींच्या प्रेरणेनें काँग्रेसनें घेतला व त्यानंतरचें पहिलें खेडचांतलें काँग्रेस अधिवेशन ह्या जिल्ह्यांतील फैजपूर येथें झालें. खेडचांत आणि परकीय राजवटींत काँग्रेस अधिवेशन भरविणें हें फार मोठें दिव्य होतें. फैजपूर फजितपूर करण्याचा विडा तत्कालीन ब्रिटिश राजवटीच्या हस्तकांनीं उचलला होता पण जनतेच्या अमाप उत्साहानें व प्रयत्नानें शेवटीं फैजपूरचें फत्तेपूर झालें. या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू व स्वागताध्यक्ष शंकरराव देव होते. स्थानिक व्यवस्थेची सर्व जबाबदारी महात्माजींचे सत्शिष्य पूज्य धनाजी नाना चौधरी यांच्यावर स्वागत मंडळाचे सरचिटणीस या नात्यानें सोंपविण्यांत आली होती. त्यांनीं ती जिल्ह्यांतल्या शेंकडों कार्यकर्त्यांच्या साहाय्यानें यशस्वीपणें पार पाडली.

फैजपूरचें फत्तेपूर

अशा तऱ्हेनें स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांत खानदेशनेंहि आपला वांटा उचलला व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या पुनर्रचनेच्या कार्यांतहि जळगांव जिल्हा धडाडीनें भाग घेत आहे.

भौगोलिक रचना

महाराष्ट्र राज्याचा नकाशा पाहतांच जळगांव जिल्ह्याचें भौगोलिक वैशिष्ठ्य आपल्या लक्षांत येतें. आजच्या महाराष्ट्रांत मराठवाडा, विदर्भ, व जुन्या मुंबई राज्यांतला पश्चिम महाराष्ट्र हे जे भाग एकत्रित झालेले आहेत त्यांपैकीं विदर्भ व मराठवाडचाच्या सीमा जळगांव जिल्ह्याला भिडल्या आहेत. या जिल्ह्याच्या पूर्वेस विदर्भांतील बुलढाणा जिल्हा व मध्यप्रदेश राज्याचा नेमाड जिल्हा आढळतो तर दक्षिणेस मराठवाडा विभागांतील औरंगाबाद जिल्हा जगप्रसिद्ध अजंठ्याच्या लेण्याजवळच या जिल्ह्याशीं हस्तांदोलन करतो. पश्चिमेस धुळें व नाशिक हे जिल्हे या जिल्ह्याला भेटतात तर या जिल्ह्याची उत्तर सीमा संपूर्णतया मध्यप्रदेश राज्यानें भूषविली आहे. या जिल्ह्याची उत्तर-दक्षिण जास्तींत जास्त लांबी ८१ मैल असून पूर्व-पश्चिम रुंदी ९६ मैल आहे. दख्खनच्या पठारावर सुमारें २०° ते २२° उत्तर अक्षांशामध्यें व ७४°-७५° आणि ७६°-२८° या पूर्व रेखांशामध्यें हा जिल्हा वसलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या उत्तर सीमेवरील जिल्ह्यांपैकीं हा एक जिल्हा आहे.

चतुःसीमा

१९६१ च्या जनगणनेनुसार या जिल्ह्यांत एकूण लोकसंख्या १७,६५,४६१ आढळली व त्यामध्यें पुरुष ९,०४,४२६ होते तर स्त्रिया ८,६१,०३५ होत्या. नागरी विभागांत एकूण लोकसंख्या ३,९१,४७५ होती तर ग्रामीण विभागांत ती १३,७३,९८६ होती. नागरी विभागांत फक्त नगरपालिकांच्या गांवांचाच समावेश असून ग्रामीण विभागांत नगरपालिकेव्यतिरिक्त इतर सर्व गांवें आहेत. १९५१ च्या शिरगणतींत नागरी विभागांत नगरपालिकेशिवाय इतरहि कांहीं मोठीं गांवें समाविष्ट केलीं होतीं. यांपैकीं साक्षर स्त्री-पुरुषांची संख्या ५,९७,३८२ होती. नागरी विभागांत पुरुषांची संख्या २,०४,१२० व स्त्रियांची १,८७,३५५ होती तर ग्रामीण विभागांत पुरुष ७,००,३०६ व स्त्रिया ६,७३,६८० होत्या. या जनगणनेंत पुरुष व स्त्रिया यांचें प्रमाण अनुक्रमें ५१ व ४९ टक्के पडलें. जिल्ह्याचें क्षेत्रफळ ४४६७.३ चौरस मैल आहे.

लोकसंख्या

भौगोलिकदृष्ट्या जिल्ह्याचे स्थूलमानानें तीन भाग चटकन् नजरेंत भरतात. उत्तरेकडील सातपुडा पर्वताच्या रांगांचा एक भाग, दक्षिणेकडील सातमाळा किंवा अजंठा पर्वताचा

खनिज संपत्तीच्या दृष्टीनें या जिल्ह्यांत आतांपर्यंत कांहीं महत्त्वाच्या खनिजांचा शोध लागला नाहीं. इमारतीच्या बांधकामाला उपयोगी पडणारे दगड, वाळू व चुनखडी या शिवाय या जिल्ह्यांत कांहीं मोलाचीं खनिज द्रव्यें आढळलीं नाहींत.

खनिज संपत्ति

या जिल्ह्यांतील जमिनींची वर्गवारी व त्यांची वैशिष्ठयें यांची माहिती कृषिविकास या प्रकरणांत दिली आहे. हवामान व पाऊस यांसंबंधीची माहिती खालीं देण्यांत येत आहे.

जमीन

जळगांव जिल्ह्यांत पावसाळचाखेरीज नेहमीं हवा एकंदरींत कोरडी व आरोग्यदायक असते. मात्र उन्हाळा फार कडक असतो. त्यांतल्या त्यांत दक्षिण भागांत उन्हाळा किंचित कमी तर उत्तरेकडे सातपुडचाच्या भागांत उन्हाळचाचा कडकपणा वाढत जातो.

हवामान व पाऊस

डिसेंबर ते फेब्रुवारी थंडी असते व त्यानंतर मार्च ते मे उन्हाळा असतो. जून ते सप्टेंबर पावसाळा व ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हा पावसाळचानंतरचा व थंडीपूर्वीचा काळ आहे. जळगांव जिल्ह्यांत हवामानाची नोंदणी फक्त जळगांव येथेंच होत असल्यानें जळगांव शहराचें हवामान हें सर्वसाधारणपणें जिल्ह्याचें प्रातिनिधिक हवामान समजण्यास हरकत नाहीं.

डिसेंबर हा सर्वांत जास्त थंडीचा महिना आहे. या महिन्यांत रोजचें किमान उष्णतामान ११.९ अंश सेंटिग्रेड (५३.४ अंश फॅ.) व कमाल उष्णतामान २९.८ सें. (८५.६ अंश फॅ.) असतें. केव्हां केव्हां थंडीची लाट जिल्हाभर पसरते. अशा वेळीं किंचित् धुकें पडण्याची शक्यता असते व किमान उष्णतामान पाणी गोठण्याच्या अंशापासून दोन अंशांपर्यंत उतरतें. मार्च महिना उजाडला कीं उष्णतामान हळूहळू वाढूं लागतें. आणि मे महिन्यांत तें शिगेला पोहोंचतें. मे महिन्याचें रोजचें सरासरी कमाल उष्णतामान ४२.५ अंश सें. (१०८.५ अंश फॅ.) असतें. जळगांव येथें सर्वांत अधिक उष्णतामान ४७.८ अंश सें. (११८अंश फॅ.) पर्यंत चढल्याची नोंद आहे. पावसाळचाला प्रारंभ होऊन जूनचा पहिला आठवडा उलटतांच उष्णतामान उतरूं लागतें. पावसाळचांत सर्वसाधारण हवा आल्हाददायक असते. पण पावसाळा संपतांच सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस उष्णतामान, पुन्हा चढूं लागतें. नोव्हेंबरमध्यें मात्र झपाटचानें उष्णतामान खालीं येऊं लागतें. पावसाळा सोडला तर एरवीं हवा एकंदरींत विशेषतः दुपारनंतर कोरडी असते. उन्हाळचांत तर हवा सर्वांत जास्त कोरडी असते. पावसाळचाखेरीज रात्री आकाशहि निरभ्र असतें. तुरळक मेघ दृष्टीस पडतात. पावसाळचांत मात्र आकाश अभ्राच्छादित असतें व केव्हां केव्हां तर ढगाळलेल्या हवेनें सर्वत्र अंधारून जातें. उन्हाळचांत सकाळीं नैर्ऋत्य व वायव्य दिशांकडून मंद वारे वाहतात. मध्यान्हानंतर ते जोरावतात व उत्तर किंवा ईशान्य दिशेनें वाहूं लागतात. पावसाळचांत वाऱ्याचा जोर वाढतो व ते मुख्यतः नैर्ऋत्य व पश्चिम दिशेकडून वाहतात. पावसाळचानंतर वार मंदावतात आणि सकाळची शांत हवा वारंवार अनुभवावयास येते. सकाळीं वाऱ्यांची दिशा मुख्यतः नैर्ऋत्य व वायव्य असते. पण दुपारनंतर उत्तर–पूर्व बाजूंनीं ते जोर करतात.

उष्णतामान

पावसाळचांत हवेचा दाब घटल्यामुळें किंवा पावसाळचाच्या शेवटीं वादळामुळें जिल्ह्यांत सोसाटचाचे वारे वाहतात व सर्वत्र पर्जन्यवृष्टि होते. वादळ व गडगडाट वर्षांतून केव्हांहि होऊं शकतो हें जरी खरें असलें तरी उन्हाळचांत आणि पावसाळचाच्या अखेरीस त्याचें प्रमाण जास्त असतें. धुळीचे लोट उन्हाळचांत केव्हां केव्हां उसळतात.

दुसरा भाग व दरम्यानचा सपाट प्रदेशाचा तिसरा भाग. रावेर, चोपडें व यावल या तालुक्यांचा उत्तरेकडील सातपुड्यालगतचा भाग विरळ वस्तीचा व दाट जंगलाचा आहे. सातपुड्याच्या रांगांचा भाग सुमारें २० मैल रुंद असून त्यानें संपूर्ण जिल्ह्याची उत्तर सीमा आंखली आहे. सातपुड्याच्या रांगा एका पाठोपाठ एक उंच होत जातात व नंतर पुन्हा उतरत जातात. मधली रांग सुमारें २००० फूट उंच असून सातपुड्यांतील सर्वांत उंच शिखरें ३००० ते ३५०० फूट उंचीचीं आहेत. पूर्वेस पूर्णेच्या खोऱ्यास लागून हात्तीचे डोंगर आहेत. ते वायव्येकडून आग्नेयेकडे गेलेले आहेत. जिल्ह्याचा दक्षिण व पश्चिमेचा भागहि डोंगराळ आहे. पण हे डोंगर सातपुड्याइतके उंचहि नाहींत व सलगहि नाहींत. हजार-बाराशें फूट उंचीच्या चांदोर, सातमाळा, अजंठा या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या डोंगरांच्या या रांगा नाशिक जिल्ह्याच्या वायव्येकडील भागांतून सह्याद्रीपासून फुटून निघतात व ५० मैल सुमारें पूर्वेकडे जाऊन मनमाडजवळ येऊन नंतर दख्खन व खानदेश यांच्या सीमेवर त्या उभ्या राहतात. याशिवाय एरंडोल तालुक्यांत शिरसोलीचे डोंगर व भुसावळ तालुक्यांत घोडसगांवचे डोंगर हेहि छोटे डोंगराळ भाग या जिल्ह्यांत आहेत. पण ते तुरळक आहेत. उत्तरेकडील व दक्षिणेकडील डोंगराळ भागांच्या मधला भाग सपाट आहे. या भागाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारें सहाशें-सातशें फूट आहे. हा भाग पूर्वेकडून पश्चिमेकडे उतरता होत गेला आहे.

भूरचना

या जिल्ह्यांतील सर्वांत मुख्य नदी म्हणजे तापी होय. ही नदी पूर्वेपासून पश्चिमेकडे या जिल्ह्यांत वाहात जाते. सुमारें ४५° मैल लांबीच्या या नदीच्या प्रवाहापैकीं सुमारें ७५ मैलांचा प्रवाह जळगांव जिल्ह्यांतच आहे. ती शेवटीं सुरतेपासून १२ मैलांवर खंबायतच्या आखातास मिळते. तापीचें पात्र फार खोल असल्यानें शेतीला पाण्याचा उपयोग करतां येत नाहीं. मात्र तापीचें खोरें सुपीक असून दोन्हीं तीरांवर कपाशी पिकविणारी काळी जमीन सलग व दूरवर पसरलेली आहे. तापीच्या खोऱ्यांत आंबरायाहि अनेक ठिकाणीं दिसतात. तिच्या कांठीं उन्हाळ्यांत टरबूज, कलिंगडें यांचे उत्पन्न खूप काढतात.

नद्या

तापीला अनेक उपनद्या मिळतात. उजव्या बाजूंनीं भोकर, सुकी, मोर, रानवती हडकी, मंकी, गुळी व अनेर या उपनद्या या जिल्ह्यांत मिळतात तर डाव्या बाजूनें पूर्णा, भोगावती, वग़ूर, गिरणा, बोरी व पांझरा या नद्या आपली खंडणी तापीला देतात. डाव्या बाजूनें मिळणाऱ्या नद्या या अधिक मोठ्या व महत्त्वाच्या आहेत. आग्नेयेकडून येणारी पूर्णा नदी या जिल्ह्यांत शिरल्यावर फ़क्त १६ मैल वाहून एदलाबाद महालांत चांगदेवजवळ तापीला मिळते. वाघूर नदी अजंठ्याजवळ डोंगरांत उगम पावून ४० मैल वाहून नंतर पूर्णेच्या संगमाच्या पश्चिमेस पुढें २० मैलांवर शेळगांवजवळ तापीला मिळते. गिरणा नदी नाशिक जिल्ह्यांत कळवणच्या पश्चिमेकडील डोंगरांत उगम पावून सप्तशृंगी व चांदोरच्या डोंगरांतल्या ओढ्यांचें पाणी आत्मसात करून १५० मैलांचा प्रवास करून नांदेडजवळ तापीला मिळते. नाशिक जिल्ह्यांत ती सरळ पूर्ववाहिनी असते व जळगांव जिल्ह्यांत ती इशान्येच्या दिशेनें वाहून जळगांवजवळ ती काटकोन करून उत्तर व वायव्येकडे वळते व जवळजवळ सात मैल तापीशीं समांतर वाहून नंतर तिला मिळते. गिरणेकांठची जमीन तांबूस व तापीच्या तुलनेनें कनिष्ट प्रतीची आहे. गिरणेच्या पाण्याच्या पाटांचा शेतीला उपयोग होतो. बोरी नदी नाशिक जिल्ह्यांत मालेगांवजवळ उगम पावून गिरणेच्या उत्तरेस १५ मैलांवर या जिल्ह्यांत प्रवेश करते. सुमारें २५ मैल ही पूर्ववाहिनी असते व नंतर एकदम ती उत्तराभिमुख होऊन आणखी २५ मैल वाहते. नंतर पुन्हां वायव्येकडे वळून गिरणेच्या खालीं २० मैलांवर बोहोरे गांवाजवळ तापीला मिळते. बोरीचें पाणी तिच्या वरच्या भागांतील खोऱ्यांत शेतीला उपयोगीं पडतें. याशिवाय कान, तितुर, अंजनी इ. अनेक नद्या या जिल्ह्यांत वाहतात.

जिल्ह्यांत पावसाची नोंद १३ ठिकाणीं ठेवली जाते. १९०१ ते १९५० या पन्नास वर्षांतील १३ केंद्रांत पडलेल्या वार्षिक पावसाची सरासरी काढली तर या जिल्ह्यांत पाऊस वर्षांत सरासरी ७४०.७ मिलिमिटर (२९.१६ इंच) पडतो असें अनुमान निघतें. या पावसापैकीं

पर्जन्य

८७ टक्के पाऊस जून ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या हंगामांतच पडतो. जुलै महि-न्यांत सर्वांत जास्त पाऊस पडतो. जिल्ह्याचा मध्यभाग म्हणजे जळगांव भुसावळ, जामनेर, पाचोरा या ठिकाणीं जरा जास्त पाऊस पडतो. जामनेरचें सरासरी पर्जन्यमान सर्वांत जास्त म्हणजे ८०२ मिलिमिटर (३१.५२ इंच) आहे. तर अमळनेरचें पर्जन्यमान सर्वांत कमी ६७५ मि. मि. (२६.५८ इंच) आहे १९०१ ते १९५० या पन्नास वर्षांत सर्वांत जास्त पाऊस १९३१ मध्यें पडला व तो सरासरीच्या १६१ टक्के होता. तर या काळांत सर्वांत कमी पाऊस १९१८ मध्यें पडला व तो सरासरीच्या ५२ टक्के होता. याच काळांत ११ वर्षें अशीं गेलीं कीं जेव्हां सरासरीच्या ८० टक्के पेक्षां पाऊस कमी पडला. लागोपाठ दोन वर्षें ८० टक्क्यांपेक्षां कमी पाऊस पडल्याचीं कांहीं ठिकाणेंहि जिल्ह्यांत आढळतात. जामनेर येथें १९२३ ते १९२५ अशीं सतत ३ वर्षें पाऊस कमी पडत होता तर एदलाबाद येथें १९२२ ते १९२६ अशीं सतत ५ वर्षें पाऊस कमी पडला. सर्वसाधारपणें वर्षांतून ४५ दिवस पाऊस (२.५ मि. मि. किंवा १० सेंटस्पेक्षां अधिक) पडल्याचें आढळतें. जामनेर येथें पाऊस पडलेल्या सरासरी दिवसांची संख्या ४८ भरते तर पारोळें, अमळनेर, चोपडें येथें पाऊस पडलेल्या दिवसांचीं संख्या ४२ भरते. या ५० वर्षांत २४ तासांत जास्तींत जास्त पाऊस कोठें पडला हें पाहावयाचें झाल्यास जामनेर येथें १ जुलै १९४१ रोजीं २९८.५ मि. मि. (११.७५ इंच) पाऊस पडल्याची नोंद आहे.

लोक जीवनाचीं वैशिष्ट्यें

जळगांव जिल्ह्याच्या लोकजीवनाचा मागोवा घेतांना या जिल्ह्याच्या लाकसंख्येसंबंधींच्या कांहीं ठळक गोष्टींचा विचार प्रथम केला पाहिजे. जनगणनेंत लोकजीवनाचें वास्तव प्रतिबिंब पडलेलें असतें. त्या दृष्टीनें १९६१ च्या जनगणनेंत या जिल्ह्याच्या लोकजीवनाची काय माहिती मिळाली हें आपण प्रथम पाहूं.

लोकसंख्या

१९६१ च्या जनगणनेनुसार या जिल्ह्यांत १७,६५००० लोकसंख्या आढळली. त्यापैकीं पुरुषांची संख्या ९,००००४ व स्त्रियांची ८,६७००० होती. हें प्रमाण जवळजवळ समतोल समजण्यास हरकत नाहीं.

उपजीविकेच्या साधनानुसार वर्गीकरण

उपजीविकेच्या साधनानुसार या लोकसंख्येचें वर्गीकरण केल्यावर शेतकरी वर्गाची लोकसंख्या १०,३६,६५३ आढळली. यामध्यें मुख्यतः स्वतःची जमीन कसणारे, स्वतःच्या मालकीची नसलेली जमीन कसणारे, शेतजमिनीवर मजुरी करणारे, शेती न कसतां जमिनीचे मालक म्हणून खंड स्वीकारणारे असे चार वर्ग आहेत. या चारहि वर्गांचे लोक व त्यांच्यावर अवलंबून असलेले त्यांचे कुटुंबीय यांची गणना या शेतकरी वर्गांत केली आहे. अर्थात् यांत स्वतःची जमीन कसणारेच अधिक आहेत. त्यांची लोकसंख्या ६,८२,९७४ होती; शेतमजुरांची लोकसंख्या ३,०९,७१४ होती. जमीन न कसणारे शेतमालक फक्त ११,७३८ होते. दुसऱ्यांची जमीन कसणाऱ्या कुळांची व त्यांच्यावर अवलंबून असणारांची संख्या ३२,२२७ होती. बिगर शेतकरी वर्गांत शेतीशिवाय इतर उत्पादक कामें करून चरितार्थ चालविणारे व त्यांच्यावर अवलंबून असलेले १,५२,६१९ होते. व्यापारावर उपजीविका करणारे व त्यांच्यावर अवलंबून असलेले ३३,९९८ आणि इतर नोकऱ्या व संकीर्ण उद्योग करणारे १,६७,८२० होते. बिगर शेतीवर जगणारे एकूण ४,३४,१९८ होते. याचाच अर्थ या जिल्ह्यांत ७० टक्के लोकांच्या जीवनाचें मुख्य साधन शेती व ३० टक्के लोकांचें साधन शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसाय आहेत असें दिसतें. शेतकऱ्यांमध्येंहि लेवा पाटीदार शेतकरी हे दक्षतेनें व कष्टानें शेती करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. थोड्या जमिनींतूनहि जास्तींत जास्त उत्पन्न काढण्याची ते शिकस्त करतात. त्यांची राहणीहि हिशोबी व काटकसरी असते व मिळालेल्या उत्पन्नांतून बचत करून ते आपल्या शेतीचा विकास करीत असतात. जिल्ह्याचे पूर्व व मध्य भागांत सुमारें १४० गांवांत यांची वस्ती आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागांतील शेती ही पश्चिम भागांतील शेतीपेक्षां सरस व चांगल्या प्रतीची आहे याचें हेंहि एक कारण आहे. पूर्व भागांत शेतकऱ्यांच्या

बरोबरीनें त्यांच्या बायकाहि शेतीवर राबतात. लेवा पाटीदार समाज शेतीप्रमाणेंच शिक्षणाबद्दलहि जागरुक आहे. या समाजांतील अनेक लोक उच्च शिक्षणासाठीं परदेशी जातात. सुशिक्षित असूनहि शेती करण्यांत ते कमीपणा मानीत नाहींत. उत्तम शेती, व्यवस्थित राहणी व शिक्षणाची तळमळ इ. गुणांमुळें हा समाज, जिल्ह्यांत प्रगतिशील व आघाडीवर असल्याचें दिसून येईल.

खेड्यांचा जिल्हा

भारतीय जीवनाच्या वैशिष्टयानुसार जळगांव हा सुद्धां खेड्यांचाच जिल्हा आहे. एक लाखावर वस्ती असलेलें एकहि शहर या जिल्ह्यांत नाहीं. ज्यांना आपण शहरें म्हणून संबोधतों त्यांपैकीं बहुतेकांचें स्वरूप शहरापेक्षां खेड्याशींच जास्त जुळतें. जिल्ह्यांत मोठें औद्योगिक केंद्र म्हणतां येईल असें एकहि शहर नाहीं. या जिल्ह्यांतल्या खेड्यांमध्यें अनेक ठिकाणीं गांवाभोंवतालचे जुने पडके तट वा गढ्या दिसतात. कांहीं ठिकाणीं जुन्या वेशी वा प्रवेशद्वारें आपल्या पूर्ववैभवाची साक्ष देतात. खेड्यांत मुख्य वस्ती मराठे व लेवा पाटीदार शेतकऱ्यांची आहे. महार, मांग, चांभार, इ. हरिजन गांवाबाहेर हरिजनवाड्यांत राहतात तर भिल्ल–धनगर बहुधा डोंगरांत वस्ती करतात. त्यांच्यापैकीं कांहीं आतां गांवांत येऊन स्थायिक झालेले आहेत. भिल्लांपैकीं तडवी हे मुसलमान धर्माचे आहेत व ते गांवांत सपाटीवर राहूं लागले आहेत.

संमिश्र नागरी जीवन

शहरांतून सरकारी वा इतर नोकरवर्ग, कारखान्यांतला मजूरवर्ग, व्यापारी व दुकानदार व त्यांचे नोकर यांचा भरणा असतो. शहरांतहि शेतकरी वर्गांतले पुष्कळ लोक राहतात. शहरें आतां संमिश्र स्वरूपाचीं बनत चाललीं असून धर्मजातीचे निर्बंध सामाजिक जीवनांतून हळूंहळूं मावळूं लागले आहेत. शिक्षणप्रसार, सामाजिक व आर्थिक बदल, रेल्वे व इतर वाहतुकीच्या साधनांच्या वाढत्या सोयी यांमुळें शहरांचें जीवन संमिश्र बनत चाललें असून जुने भेदाभेद व वर्णवैशिष्टयें कालाच्या वेगवान ओघांत वाहून जाऊं लागलीं आहेत.

जिल्ह्यांत धाब्याचीं व कौलारू अशीं दोन प्रकारचीं घरें आढळतात. एके काळीं तापीच्या उत्तरेस कौलारू घरें दिसत. पण त्यानंतर गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत तीं सर्वत्र दिसूं लागलीं. शहरामध्यें कौलारू घरेंच सर्वत्र दिसत. पण गेल्या तीस–चाळीस वर्षांत देशांत मोठमोठ्या शहरांत सिमेंट कॉंक्रीटचीं, वर गच्चीं असलेलीं घरें बांधण्याची प्रथा पडली व त्याप्रमाणें या जिल्ह्यांतल्या शहरांतहि ही सुधारणा होऊं लागली.

आहार

घरें पाहिल्यानंतर त्यांच्या आहाराच्या संवयी पाहणें युक्त होईल. खानदेशचें सर्वसामान्य माणसाचें अन्न म्हणजे ज्वारीची भाकरी हेंच होय. गव्हाची पोळी व भात यांचाहि वापर वाढूं लागला आहे. जेवणांत भाताचा समावेश हें सुधारणेचें लक्षण झालें आहे. स्थानिक भाज्या व केळीं यांचाहि वापर जेवणांत होत असतो. वरण भाकरी किंवा वरण पोळी हेंच खानदेशी माणसाचें मुख्य अन्न आहे. दूध–दुभतेंहि इकडे बरें असल्यानें दूध व तूप हे पौष्टिक पदार्थहि खानदेशी माणसाच्या जेवणांत असतात.

खानदेशचें एक वैशिष्टच म्हणजे वरणबट्टीचें जेवण हें होय. सभा, संमेलनें, शिबिरें, मेळावे अशा प्रसंगीं हौसेनें वरणबट्टीचा बेत करतात. बट्ट्या गव्हाच्या कणकेचे गोळे भाजूनच करतात. त्यावर भरपूर वरण घेतात.

जळगांव जिल्ह्यांत प्रामुख्यानें हिंदु धर्माचेच लोक असून ते सर्वसाधारणपणें पापभीरु व देवभोळे आहेत.

प्रत्येक गांवची एक ग्रामदेवता असतेच व त्या ग्रामदेवतेचा उत्सव तेथें केला जातो. प्रत्येक शेताचाहि रक्षणकर्ता एक देव मानला जातो व त्या देवालाहि वर्षाला बकरी–कोंबडें देण्याची कोठें कोठें प्रथा आहे. या जिल्ह्यांतले सर्वसाधारण लोक दोन धार्मिक विधि विशेष महत्त्वाचे मानतात. एक रोटपूजा आणि दुसरी चक्रपूजा अथवा राणूबाई काजूबाई पूजा. रोटपूजा अथवा काजूबाईची पूजा मूळ विदर्भांतली असून तिकडून ती इकडे आली असें म्हणतात.श्रावणांत नागपंचमीनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारीं ही पूजा करतात. त्या दिवशीं कुटुंबांतील सर्व जण कडक उपवास करतात. गव्हाच्या ढिगावर एक पाण्याचा तांब्या व त्यावर नारळ ठेवतात व तेथें देवीची चांदीची मूर्ति ठेवून पूजा करून सायंकाळीं दिवे लागल्यावर सर्व एकत्र बसून जेवण करतात. चक्रपूजा किंचित् वेगळी असते. अष्टकोनी तांदुळाच्या राशीवर रंबाईची मूर्ति ठेवतात. जवळच दिवा लावतात व नंतर देवीची व दिव्याची पूजा करून जेवण करतात. मात्र यत्किंचित्हि अन्न वाया घालवावयाचें नाहीं किंवा टाकून द्यावयाचें नाहीं असा दंडक असतो. भोजनोत्तर तांदुळाचा ढीग पिंडीच्या आकाराचा करून त्यांत शिवलिंग ठेवतात व नंतर नारळ फोडून त्याचें खोबरें प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात. रंबाई ही खानदेशची आवडती देवता आहे. तिचें लग्न व मौंजविधि हा सोहळा सात दिवस चालतो. सातव्या दिवशीं केळीच्या खुंटाच्या चौरंगावर गव्हाच्या कणकेची रंबाईची मूर्ति करून ठेवतात व तिची समारंभपूर्वक पूजा करतात.

रोटाचा सण

आदिवासी व भटके लोक यांच्या जिल्ह्यांतील प्रमुख जमाती म्हणजे भिल्ल, पावरे, तडवी, वणजारी, गोंड, कोटील, नहाळ इ. होत. पैकीं गोंड हे फक्त भुसावळ शहरांत राहतात. त्यांचे पूर्वज सुमारें शें–सव्वाशें वर्षांपूर्वी भुसावळला रेल्वेंत कामधंद्याच्या निमित्तानें आले. त्यांना नोकरीमुळें उदरनिर्वाहाचें साधन मिळालें, शहरी राहणी मिळाली व शिक्षण मिळालें. त्यामुळें त्यांची सुधारणा होऊन आज या समाजानें राहावयास स्वतःचीं चांगलीं घरें बांधून व्यापारधंदा, शिक्षण इ. बाबतींत आपली प्रगति करून घेतली आहे. भुसावळला या समाजाची संख्या हजार-बाराशें आहे.

जळगांव जिल्ह्यांतील आदिवासी

भिल्ल हे राजपुताना, माळवा, मध्यभारत, विंध्य पर्वत, गुजरात व खानदेश या भागांत पसरले आहेत. कांहीं भिल्ल आतां डोंगर सोडून सपाट प्रदेशांत स्थाईक झाले आहेत. ते आतां इतर कुणब्यां सारखे वागतात. जळगांव जिल्ह्यांतले भिल्ल हे मूळचे इथले नसून ते माळवा गुजरातमधून राजपूत–मुसलमानांच्या दडपणामुळें खानदेशांत उतरले असावेत. सातपुड्यांतील भिल्ल हा रंगानें काळा, सुदृढ बांध्याचा, चपळ व कणखर असून त्याच्या नाकपुड्या मोठ्या व गालाचीं हाडेंहि उंच असतात. त्यांच्या अवयवांत दणकटपणा असतो. ते ज्या भागांत राहतात त्या भागांतल्या बोली भाषा बोलतात. खानदेशी भिल्लांच्या भाषेंत हिंदुस्थानी, गुजराती व मराठी या भाषांचें मिश्रण आढळतें.

भिल्ल

डोंगरांत राहणाऱ्या भिल्लांत बरडा, डांगची, धानका, दोरपी, गाबीत, कोटील, मथवाडी, मावची नहाळ, पावरा, बारली, बसावा इ. प्रकार आहेत. त्यापैकीं जळगांव जिल्ह्यांत कोटीलांची वस्ती फार आहे. उत्तरेस सातपुड्यांत पावरा भिल्लांची वस्ती आहे. नहाळ फार क्वचित् आढळतात. भिल्लांच्या मिश्र जमाती पुढीलप्रमाणें आहेतः–

हे लोक सातपुड्याच्या दक्षिणेकडे वसलेले आहेत व त्यांना कोटील म्हणतात. हे गुलेलीनें म्हणजे तीर नसलेल्या कामट्यानें खारी, चिमण्या, पारवे, होले यांची पारध करतात. यांचीं कुळें धनिया, घरघिट्या, टाकरिया अशीं असून जाधव, मोरे, चव्हाण अशीं त्यांच्यांत आडनांवें आहेत.

पावरे हे दिसायला भिल्लापेक्षां कोंकणी कोळ्यासारखे दिसतात. हे स्वतःला भिल्ल असें मानावयास सुद्धां तयार नाहींत. ते स्वतःला राजपूत म्हणवितात. उदेपूरच्या राण्यानें आपल्या पावागडांतून यांना हांकलून लावलें असें ते म्हणतात.

ही जमातसुद्धां धवळी, वैजापूर, चिरमळा येथें खानदेश–मध्यभारताच्या हद्दीवर डोंगराळ भागांत राहते. ते स्वतःला "तिरोळे कुणबी" म्हणवून घेतात. परंतु ते भिल्लच आहेत.

निरडे

निरढी किंवा निरढे भिल्ल ही मुसलमान भिल्लांची एक दुसरी जमात आहे. त्यांची वस्ती सातमळा, अजिंठा डोंगराच्या पायथ्याशीं जामनेर व पाचोरें तालुक्यांत आहे. तडवी व निरढे यांचे आचारविचार सारखे असले तरी त्यांच्यांत बेटीव्यवहार नाहीं.

तडवी

हा मुसलमान भिल्लांचा एक वर्ग असून अशीरगडापासून चोपडच्यापर्यंत सातपुडच्यांत व पायथ्याशीं आढळून येतो. यांची वस्ती सुमारें २५–३० हजार असावी. भिल्लांच्या मुख्य शाखेपासून फूटून " तड " झालेले ते तडवी. यांनीं पुढें औरंगजेबाच्या कारकीर्दीत मुलसमानी धर्माची दीक्षा घेतली. मध्यभारतांत भिल्ल प्रमुखास तडवी म्हणतात. "तरवी" असा अरबी भाषेंत शब्द आहे. त्याचा अर्थ मार्गदर्शन–वाटाड्या असा आहे. तडवी लोकांस पठाण म्हणतात व मानानें खांसाहेब असें संबोधतात. यांच्या वस्तीस तडवीवाडा म्हणतात. तडवी व निरढे हे आदिवासी फक्त मुसलमान धर्माचे आहेत. इतर सर्व हिंदुधर्मीयच आहेत. नमाज पढणें, रोझा ठेवणें हीं व्रतें रमझान, बकरीइद, मोहरम हे सण, सुन्ता करणें, छिल्ला करणें, निका लावणें, चेहलम करणें इ. धार्मिक विधि वरील दोन्ही जमातींत मुसलमानां प्रमाणेंच होतात.

भिल्ल, पावरी, वारली, गावीत, तडवी इ. प्रमाणें वंजारी हीहि अस्थिर राहणारी जमात आहे. माळव्यांतून बैलांच्या पाठीवर गव्हाच्या गोण्या लादून आणावयाच्या व त्या विकावयाच्या हा यांचा धंदा. वणजाऱ्यांचा तांडा ठिकठिकाणीं आपले तंबू ठोकून पडलेला असे. आतां पुष्कळ वणजारी शेतीकडे वळले असून घरें बांधून स्थाईक झाले आहेत.

मुसलमान

आदिवासीप्रमाणें या जिल्ह्यांत मुसलमान ही एक महत्त्वाची जमात आहे. सय्यद, पठाण, मोगल व शेख या चार वर्गांत ते मोडतात. याशिवाय पुष्कळसे मुसलमान हे त्यांच्या धंद्यावरून ओळखले जातात. अत्तर, मन्यार, नालबंद, तांबोळी इ. मुसलमानांना त्यांच्या धंद्यावरून तीं नांवें पडलीं आहेत.

फरुकी खान व मोगल बादशहा यांच्या खानदेशवरील राजवटीच्या कांहीं खुणा कांहीं गांवाच्या नांवांच्या रूपानें येथें दिसत आहेत. एदलाबाद, नशिराबाद, रसलपूर, बहादरपूर इ. गांवांचीं नांवें या जिल्ह्यांत दिसतात. तीं तत्कालिन मुसलमान सरदारांच्या नांवांशीं संबद्ध असावींत.

सण व उत्सव

सण व उत्सव हें आपल्या भारतीय लोकजीवनाचें एक खास वैशिष्टच आहे. महाराष्ट्रांत साजरे केले जाणारे उत्सव या जिल्ह्यांतहि तितक्याच उत्साहानें व अगत्यानें साजरे केले जातात. गुढी-पाडव्यास खानदेशांतहि घरोघर गुढ्या उभारल्या जातात, रामनवमीचा सुंठवडा कोणी चुकवीत नाहीं. चैत्रांत घरोघर बायकांची हळदी-कुंकवाची व गौरीपूजनाची धामधूम चालू असते तर अक्षयतृतीयेस शेतीचें नवें वर्ष सुरूं होतें. हा तर शेतीप्रधान जिल्हा असल्यानें अक्षय्यतृतीयेस विशेष महत्त्व आहे. सालदारांचें साल या दिवसापासून

सुरूं होतें. वैशाखी एकादशीस अमळनेरच्या नदीतीरीं सखाराम महाराजांच्या यात्रेचा सोहळा पंढरपूरची आठवण करून देतो. वटपौर्णिमेच्या दिवशीं सुहासिनी वटपूजा करून सावित्रीची पतिनिष्ठा आठवतात तर श्रावणांत दर सोमवारीं शिवपिंडीवर बेल वाहिल्याशिवाय मन प्रसन्न होत नाहीं. श्रावणांत नागपंचमीच्या दिवशी शेतकरी शेतीच्या अवजारांना पूर्ण विश्रांति देतात. कारण न जाणों चुकून नांगराचा फाळ वा एखादें अवजार शेतांतल्या नागाला लागून तो दुखावला जायचा. श्रावणांतला रोटाचा सण तर या जिल्ह्याचें खास वैशिष्टच आहे.

रथ व वाहनें

आश्विन-कार्तिकांत या जिल्ह्यांत चोपडें, पारोळें, धरणगांव, जळगांव इ० ठिकाणीं रथ व वाहनांचे उत्सव फार जोरांत होतात. रथावर मूर्तींना विविध पोषाख चढवून त्या गांवाच्या निरनिराळ्या भागांतून मिरवल्या जातात. त्यांच्या दर्शनाला व ओवाळणीसाठीं झुंडीच्या झुंडी जमतात. अशा मिरवणुकींत बैलगाड्यांवर देखावे व सोंगे सजवतात.

भाषा

आहार, निवास, पोशाख, धार्मिक परंपरा, सणवार, खेळ-करमणूक, विविध जातीजमाती यांच्याप्रमाणेंच भाषा हें एक लोकजीवनाचें प्रमुख अंग आहे. खानदेशांत सर्वत्र मराठी भाषाच बोलली जाते. परंतु जिल्ह्याच्या पश्चिम भागांत विशेषतः ग्रामीण भागांत अहिराणी ही बोलीभाषा अद्यापिहि वापरांत आहे. अहिराणी भाषेंत मराठी नेमाडी, गुजराती व हिंदी या भाषांचें मिश्रण असून या भाषेंत अलीकडे वाङमयनिर्मितीहि होऊं लागली आहे. सोपानदेव चौधरी यांच्या मातुश्री बहिणाबाई चौधरी यांचीं गीतें या दृष्टीनें प्रसिद्ध आहेत. साध्या, सरळ, प्रेमळ व अत्यंत घरगुती भाषेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ही काव्यसंपदा सर्वत्र प्रशंसिली जात आहे.

कोणत्याहि भागाच्या लोकजीवनाची घडण भौगोलिक रचना, नैसर्गिक साधनसामुग्री ऐतिहासिक परंपरा इ० घटकांमुळें घडली जाते. नैसर्गिकदृष्टचा शेती हाच या जिल्ह्याचा जीवनाधार असल्यानें या जिल्ह्याच्या लोकजीवनावर शेतीव्यवसायाचा दाट ठसा उमटला असणें साहजिक आहे.

सा हि त्य सो नि यां च्या खा णी

एका आख्यायिकेप्रमाणें जळगांव जिल्ह्यांतील चाळीसगांव तालुक्यांतील "वालझिरी" व याजवळचे "रांजणगांव" हीं ठिकाणें आद्य महाकवि "वाल्मिकी" यांचीं निवासस्थानें होत. ही आख्यायिका जर खरी असली तर पहिल्या भारतीय कवीला जन्म दिल्याचा बहुमान या जिल्ह्याला मिळेल. तथापि, ही पौराणिककालीन आख्यायिका सोडली तरी महाराष्ट्र सारस्वताच्या प्रारंभकाळापासून जळगांव जिल्ह्यांतील वाग्वीरांनीं मराठी भाषा व साहित्याची सतत सेवा केली आहे. ज्ञानेश्वर-पूर्वकालीन मराठी शिलालेखांत चाळीसगांव तालुक्यांतील पाटण येथें सुविख्यात ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य यांचा नातू चांगदेव यानें आपल्या विद्यालयांत खोदविलेला २६ ओळींचा शिलालेख आहे. या शिलालेखाचा लेखनकाल शके ११२८ म्हणजे ज्ञानेश्वरीपूर्वी ८४ वर्षांचा असून त्यापूर्वी सुमारें तीनशें वर्षे तरी खानदेशांत मराठी ही साहित्यलेखनक्षम भाषा झाली असावी असें अनुमान इतिहासाचार्य राजवाडे यांनीं काढलें आहे. या जिल्ह्यांतील महायोगी चांगदेव यांना बोध करण्यासाठीं संत ज्ञानेश्वरांनीं "चांगदेव पासष्टी"हा पत्ररूप ग्रंथ लिहिला आणि या बोधामृतानें पावन झालेल्या चांगदेवांनीं "तत्त्वसार" हा आपला वेदांताचें विवरण करणारा ग्रंथ लिहून आपल्या प्रदीर्घ जीवनाची सांगता केली. ज्ञानेश्वरांच्या भगिनी मुक्ताबाई यांनीं आपल्या रसाळ अभंगवाणीनें एदलाबादच्या तापीतीरावरील परिसरांतील अनेकांच्या हृदयाच्या ताटचा उघडल्या. इ० स. १२ व्या व १३ व्या शतकांत महानुभाव पंथाच्या अनेक थोर महंतांनीं या प्रदेशांत धर्मप्रचार व लेखन केलें. "ऋद्धिपूरवर्णन" हा प्रासादिक ग्रंथ लिहिणारा व्यास, "अश्वमेधाख्यान" कार विप्रनारायण, "दीपरत्नाकर" कर्ता रत्नाकर स्वामी या खानदेशस्थ कवींनीं महानुभावी पंथाच्या मराठी वाङमयांत मोलाची भर घातली आहे. समकालीन खानदेशी कवि सत्यामल नाथ यांच्या अध्यात्मावरील एका ओवीबद्ध विस्तृत ग्रंथाचा कै. पांगारकरांसारख्या विद्वानांनींहि गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. संत कवयित्री मुक्ताबाईनीं सुरू केलेल्या भक्तिपर काव्याची या जिल्ह्यांतील परंपरा कै. तिवारींच्या अभंगमालेपर्यंत सातत्यानें सुरूं राहिली. त्यांत शेंदुर्णीचे प्रसिद्ध संत कडूजी बाबा भगत आणि फैजपूरचे खुशाल महाराज यांच्या भक्तिपर काव्यभांडाराचा विशेष उल्लेख केला पाहिजे. खुशाल महाराजांनीं मराठीखेरीज हिंदी आणि गुजराती या भाषांतहि काव्यरचना केली आहे. तोंडापूरचे श्री. भाऊराव तोंडापूरकर यांचा संतसंग्राम हा संतांचे समरप्रसंग वर्णन करणारा ओवीबद्ध ग्रंथ,

साहित्याची प्राचीन परंपरा

त्याचप्रमाणें शेंदुर्णीच्या भीमराव पारळकर यांचीं अनेक काव्यें वारकरी सांप्रदायांत मान्यता पावलेली आहेत. दुर्दैवानें या संतवाङमयाचा बराच भाग अजून प्रसिद्ध झालेला नाहीं.

आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांच्या फैजपूर आणि भडगांव येथील वास्तव्यानें या जिल्ह्याच्या आधुनिक मराठी साहित्यनिर्मितीचा शुभारंभ झाला. ज्या गिरणातीराचा केशवसुतांनीं

"मी सायंसमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीत उन्मन असा वेड्या परी गाउनी"

असा आपल्या काव्यांत उल्लेख केला आहे. त्या गिरणा व तापी तीरावरील वातावरण काव्यनिर्मितीला बरेंच पोषक असावें असें वाटतें. कवि विनायकांची काव्य रसरसलेली प्रतिभा "पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाल" असा निर्वाळा याच ठिकाणीं देऊं लागली. अहिल्या, तारा, संयोगिता, कृष्णाकुमारी आणि पन्ना या वीररमणींचा गौरव करणाऱ्या आणि "कोठचा शिवाजी राजा निजधर्माचा अभिमानी––यापुढें" अशी हळहळ व्यक्त करणाऱ्या कवि विनायक यांनीं महाराष्ट्राच्या शाहिरी बाण्याला उजाळा दिला. शेंदुर्णी–जळगांवचे दुर्गाप्रसाद आत्माराम तिवारी यांनीं विनायकांची परंपरा चालवून आपलीं "मराठ्यांचीं संग्रामगीतें" लिहिलीं आणि घरोघरीं आणि कीर्तनकारांच्या जिव्हाग्रीं महाराष्ट्राच्या इतिहासांतील स्फूर्तिदायक प्रसंग पुनरुज्जीवित केले. तिवारींची विविध तऱ्हेची काव्यसंपदा हा या जिल्ह्याचा एक अमोल ठेवा आहे.

सातपुड्याचें भव्योदात्त दर्शन ज्या प्रदेशांत नित्य घडतें, अजिंठ्याच्या लेण्यांतील अद्‌भुत् चित्रें ज्या प्रदेशांत अत्यंत हळुवार हातांनीं चितारलीं जातात त्याच महाराष्ट्रांत निसर्गप्रेमांत वर्डस्वर्थ-सारखा व रचनासौष्ठवांत टेनिसन्‌सारखा सर्वश्रेष्ठ निसर्गकवि निर्माण व्हावा यांत नवल तें काय ? या जिल्ह्याचे बालकवि ठोंबरे यांनीं निसर्गकाव्याचें महाराष्ट्र शारदेला एक बहुमोल लेणें चढविलें आहे. "आधुनिक कविपंचका" पैकीं केशवसुत, विनायक व बालकवि या तीन कवीरत्नांचा लाभ या जिल्ह्याला घडला हें जिल्ह्याला अभिमानास्पद आहे.

प्रथितयश कवींचा या जिल्ह्याशीं निकटचा संबंध यावा अशी जणूं काय नियतीच दिसते केशवसुतांप्रमाणेंच माधव ज्यूलियन हे नामवंत कवि या जिल्ह्यांत कांहीं काळ राहिले. त्यामुळें त्यांच्या "सुधारक", विरहतरंग" यासारख्या रसिकमान्य कलाकृतींवर या जिल्ह्याचा साहजिकच आपुलकी-कीचा हक्क प्रस्थापित झाला. रविकिरण मंडळानें सुरू केलेली काव्यगायनाची प्रथा यशवंत-गिरीशाइतकीच या जिल्ह्यांतील कवि सोपानदेव यांनीं लोकप्रिय केली. सोपानदेव चौधरी यांनीं स्वतः तर गोड काव्यें रचलींच पण याशिवाय आपल्या मातुश्री बहिणाबाई यांची कविता प्रसिद्ध करून एका अत्यंत थोर कवयित्रीच्या काव्याचा महाराष्ट्राला परिचय घडविला.

या जिल्ह्यांत कविताकामिनीचा एवढा अनिरुद्ध पदन्यास ज्यांच्यामुळें झाला, ज्यांनीं तिला तिच्या बालपणीं आपल्या अंगाखांद्यावर खेळविलें त्या "काव्यरत्नावली" कार नानासाहेब फडणीसांच्या साहित्यसेवेचें वर्णन करावें तेवढें थोडेंच. "काव्यरत्नावली" म्हणजेच आधुनिक मराठी काव्याचा उगम आणि विकास होय. "काव्यरत्नावली" कार फडणीसांच्याच प्रयत्नानें जळगांव येथें १९०७ मध्यें पहिलें मराठी कविसंमेलन भरलें. मराठी काव्याच्या इतिहासांत "काव्यरत्नावली" नें केलेली कामगिरी खचित गौरवानें उल्लेखिली जाईल.

काव्यरत्नावलीमुळें काव्यानुकूल झालेल्या खानदेशच्या वातावरणांत अनेक कवींच्या प्रतिभेचा विकास व्हावा हें साहजिकच आहे. "कमलपराग" कार केशवराव सोनाळकर, "विरागी" या टोपण

नांवानें लिहिणारे व "मधुसंभार", "अभिसार" हे काव्यसंग्रह सादर करणारे कवि हुपरीकर, "काद-म्बिनी" तून आपल्या प्रतिभेचा विद्युदुन्मेष घडविणारे बळवंतराव पळशीकर, "मकरन्द" कार श्री शं. ल. गर्गे, "पुष्पांजलि" वाहणारे न. शं. रहाळकर इत्यादि कवींचा निर्देश केला पाहिजे.

संशोधनात्मक वाङ्मय

दत्तात्रय बाळकृष्ण करकरे यांनीं "हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचा उत्कर्ष" या सर अल्फरड लायल यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर "अस्तनींतील निखारा" आणि मराठ्यांच्या इतिहासाचे चार खंड लिहिले आहेत. करकरे यांची इतिहासविषयक कामगिरी फार महत्त्वाची आहे. शंकर गोपाळ जोशी यांनीं अखिल भारतीय यजुःशास्त्रीय ब्राह्मणांचा इतिहास लिहिला आहे. जळगांवचे रामकृष्ण गणेश बर्वे यांनीं मुकुंद वामन बर्वे यांजबरोबर शिवाजी महाराज, शाहू महाराज, बाजीरावपेशवे, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर व अहिल्याबाई होळकर यांचे इंग्रजी चरित्रग्रंथ लिहिण्यांत सहकारी लेखक म्हणून भाग घेतला आहे. गोपाळरावे दाते यांनीं "डॉक्टर पाणी" हा जलचिकित्सेवर व "हजार व्याधींना बारा औषधें" हा बायोकेमिस्ट्रीवर ग्रंथ लिहिला आहे. शि. सा. शिर्के यांनीं व्यायाम पद्धतीवर व इतर विषयांवर लेखन केलें आहे. सागर विद्यालयांतील पुराणवस्तू खात्याचे प्रमुख प्रा. डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं अनेक ठिकाणीं उत्खनन करून त्यावर प्रकाश पाडणारे लेख प्रसिद्ध केले आहेत. एरंडोलचे डॉ. अ. द. पुसाळकर यांनीं इतिहास–संशोधनांत भरीव कामगिरी केली आहे. त्याबद्दल मुंबईच्या इंडियन एशियाटिक सोसायटीनें रौप्यपदक देऊन नुकताच त्यांचा मोठा सन्मान केला आहे. त्यांनीं भारतीय विद्याभवनातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या भारताच्या इतिहासाचें संपादन केलें आहे. असोद्याचे श्री. द. ग. काळे यांचा वार्धक्यांतहि इतिहासाचा अभ्यास तरुणांच्या उत्साहानें चालू आहे. त्यांनीं जुने कागदपत्र व इतर साहित्य अभ्यासून कांहीं लेखन केलें आहे. "स्टेट बोर्ड फॉर हिस्टॉरिकल रेकॉर्डस् अॅन्ड एन्शंट मॉन्युमेन्टस्, मुंबई" या संस्थेवर ते सभासद म्हणून काम करीत आहेत. प्र. दा. पंडित यांनीं टाइम्स ऑफ इंडियांत येणाऱ्या सुविचाराचें लालित्यपूर्ण संस्कृत भाषेंत रूपांतर केलें आहे.

श्रीराम अत्तरदे, दा. गो. बोरसे आणि भा. रं. कुळकर्णी यांनीं या जिल्ह्यांतील अहिराणी पोटभाषेचा सूक्ष्म अभ्यास केला आहे व त्यावर भरीव लेखन केलें आहे. बोरसे यांच्या अहिराणी विष-यींच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथानें मराठी भाषासंशोधनवाङ्मयांत बहुमोल भर पडली आहे. महाराष्ट्र वाङ्मयाचा विद्वन्मान्य इतिहास लिहिणारे डॉ. अ. ना. देशपांडे यांच्याहि वास्तव्याचा लाभ या जिल्ह्याला घडला आहे.

वृत्तपत्रसृष्टि

वृत्तपत्रसृष्टींतहि जळगांव जिल्हा मागें नाहीं. या जिल्ह्यांतील वृत्तपत्रजीवनाचा पायाहि श्री. नानासाहेब फडणीस यांनीं घातला. त्यांनीं स्थापन केलेली "प्रबोधचंद्रिका" आज ८१ व्या वर्षांत पदा-र्पण करून पुढें चालू आहे. इतकीं जुनीं वृत्तपत्रें महाराष्ट्रांत आज फारच तुर-ळक आहेत. इतक्या दीर्घ काळांत या साप्ताहिकानें खानदेशची बहुमोल सेवा केली आहे. नानासाहेबांच्या पश्चात् वासुदेवराव ऊर्फ दादासाहेब फडणीस यांनीं प्रबोधचंद्रिकेची धुरा यशस्वीपणें सांभाळली आहे. द. वा. जोशी यांनीं "प्रागतिक" साप्ताहिक पावशतक चालवून या जिल्ह्याची फार मोलाची सेवा केली आहे. सीताराम नाना चौधरी यांचा "आत्मोद्धार" आपल्या सडेतोड लेखनासाठीं अनेक वर्षे आवडीनें वाचला जात असे. वि. चा. नेहेते मास्तर यांचें "बातमीदार" साप्ताहिक आज २६ वर्षें चालत असून तें या जिल्ह्याचें एक प्रमुख जिल्हापत्र गणलें जातें. श्री. निळकंठराव पाटील यांचा "जनसेवक" गेलीं वीस वर्षें संपादकाच्या ओजस्वी

लेखणीचा प्रत्यय आणून देत आहे. श्री. देवकीनंदन नारायण यांनीं १५ ऑगस्ट १९४७ रोजीं "राष्ट्र-सेवक" जळगांवला सुरू करून गेलीं १४ वर्षें जिल्ह्यांत राष्ट्रीय व विधायक कार्याचा प्रचार चालू ठेवला आहे. कै. वि. रा. चौगुले यांनीं १७ वर्षांपूर्वी चालू केलेला "वार्ताविहार" त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी कमलाबाई मोठ्या हिमतीनें चालवीत आहेत. ब्रिजलाल पाटील यांचा "जनशक्ति" गेलीं पांच वर्षें जिल्ह्यांत वाचला जात असून १९६० सालांत जळगांव शहरांत श्री. नंदलाल दहाड व त्यांचे सहकारी यांचा "खानदेश समाचार," वृत्तपत्रशास्त्राचें शिक्षण घेऊन या क्षेत्रांत नव्यानें पडणारे श्री. भागवत चौधरी यांचा "जागृति" व नगरवासियांची सेवा केवळ नगरपालिकेद्वारेंच न करतां त्यांचें लोक-मतहि आपलेसें करण्यासाठीं झटणाऱ्या श्री. सुखदेवराव यादव यांचें "लोकमत" हीं तीन साप्ताहिकें निघालीं आहेत. याशिवाय जिल्ह्यांत पाचोरें येथें "विकास" हें साप्ताहिक सुखलाल रामनाथ गुप्ता हे विधायक कार्यकर्ते चांगल्या प्रकारें चालवीत आहेत. तसेंच अमृत हरि देशपांडे हे भुसावळहून "लोक-शाही" हें साप्ताहिक गेलीं ५ वर्षें प्रकाशित करीत आहेत. चाळीसगांवचे कामगारकार्यकर्ते श्री. के. डी. पाटील ४ वर्षें चाळीसगांवीं "संघटना" साप्ताहिक चालवून स्वतःच्या संघटना कार्यांत मजबुती आणीत आहेत. खासदार उत्तमराव पाटील यांचा धुळ्याहून प्रकाशित होणारा "सुदर्शन" गेल्या वर्षा-पासून अमळनेर येथूनहि प्रसिद्ध होत आहे. याशिवाय भुसावळ येथें नुकतेंच रेल्वे मजदूर युनियननें "आवाज" हें हिंदी साप्ताहिक सुरू केलें असून "अंगार" हें दुसरें हिंदी साप्ताहिकहि येथें प्रसिद्ध होत आहे. श्री. वाणी यांचा जळगांवहून निघणारा "प्रदीप" थंडावला आहे. चोपड्याचा "झुंझार"हि मधल्या विश्रांतीनंतर पुन्हा सुरू झाला आहे. "नागरिक" हें साप्ताहिकहि चोपड्याहून कांहीं थोडे दिवस निघालें पण लवकरच तें बंद पडलें. श्री. स. ना. भालेराव यांचा "जय महाराष्ट्र" व श्री. न. भि. जांगडा यांचा "आवाज" कांहीं काळ या जिल्ह्यांत चांगलाच गाजला पण पुढें हीं वृत्तपत्रें अल्पजीवि ठरलीं.

जिल्ह्यांत भरलेलीं महत्वाचीं संमेलनें

वाङमयसेवकांनीं गजबजलेल्या या जिल्ह्यांत साहित्यविषयक चळवळीहि सारख्या सुरू असतात. पहिलें मराठी कविसंमेलन १९०७ मध्यें जळगांव येथेंच कीर्तीकरांचें अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्याच-वेळीं बालकवींची महाराष्ट्राला ओळख झाली. १९२९ सालीं जळगांवला विदर्भ साहित्य संमेलन भरलें व त्याप्रसंगीं गुणवंत हणमंत देशपांडे यांच्या कविता फार गाजल्या. १९३६ सालीं जळगांवला माधवराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांत मराठी वाङमयविषयक संघटनेला सुव्यस्थित स्वरूप देण्यांत आलें. १९४१ मध्यें अमळनेरला संयुक्त खानदेश साहित्य संमेलन भरलें व तेथेंच १९५२ मध्यें महाराष्ट्र साहित्य संमेलन प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. जळगांवला भरलेलें नाट्यसंमेलनहि चांगलेंच यशस्वी झालें. महाराष्ट्र ग्रंथालय परिषदहि जळ-गांवला डिसेंबर १९५७ मध्यें भरली होती व १९५९ चे शेवटीं जळगांवला महाराष्ट्र मुद्रण परि-षदेचेंहि अधिवेशन भरलें होतें. ऑक्टोबर १९६० मध्यें जळगांवला मराठी तमाशा परिषद् भरून लोक-नाट्यविषयक अनेक प्रश्नांची चर्चा झाली.

साहित्यविषयक व तदनुषंगिक कार्य करणाऱ्या अनेक संस्था या जिल्ह्यांत आहेत. वल्लभदास वालजी वाचनालय हें जळगांवचें वाचनालय जिल्हा ग्रंथालय असून जिल्ह्यांतील इतर ग्रंथालयेंहि वाङ-मयाच्या प्रसाराचें कार्य करीत असतात. जळगांवचें व. वा. वाचनालय ग्रंथपालन वर्गहि भरवीत असतें. त्याचप्रमाणें व. वा. वाचनालय, जळगांव, नारायणदास बंकर वाचनालय, चाळीसगांव, शरद्व्याख्यान-माला मंडळ, भुसावळ, यांच्यातर्फे व्याख्यानमाला दरवर्षीं गुंफल्या जातात. श्रीमती गिरिजा बाई केळकर यांच्या "राजकुंवर" "पुरुषांचें बंड", आणि "हीच मुलीची आई" या तिन्ही नाट्यकृती

रंगभूमीवर चमकल्या आहेत. त्यांचें "आयेषा" हें नाटकहि प्रसिद्ध आहे. या जिल्ह्याची भूमि नाट्यानुकूल असल्यामुळेंच कीं काय श्री. साने गुरुजी यांना "तें आपलें घर" हें नाटक लिहावेसें वाटलें असावें. वा. दा. पंडित यांची "सुशिक्षित स्त्री" हि रंगमंचावर यशस्वीपणें तळपली आहे. वि. रा. चौगुले यांनीं अल्पवयांत "सैतानी संक्रांत", "सिंहासन", "लग्नाचा कायदा" हीं नाटकें व "शीलवंत" ही नाटिका प्रसिद्ध केली व त्यांचे नाट्यप्रयोगहि चांगलेच गाजले. अमळनेरचे मो. द. ब्रम्हे यांनीं साहित्यदृष्ट्या सरस व प्रयोगदृष्ट्या यशस्वी नाटकें लिहिण्याचा धडाका चालविला आहे. त्यांचीं "आश्रित," "आघात", आणि "आनंदाश्रम" इ० नाटकें रसिकप्रिय झालीं आहेत. तसेंच प्रभाकर बेंद्रे नाट्यछटाकार म्हणून पुढे येत आहेत.

ललितेतर साहित्य

ललितेतर साहित्यांतहि या जिल्ह्यांतील वाङ्मयसेवकांनीं महत्त्वाचा भाग घेतला आहे. प्रा. अदवंतांखेरीज प्रा. ल. के. कुळकर्णी, प्रा. म. वि. फाटक, प्रा. युसुफ-खान पठाण इ० व्यासंगी लेखक साहित्यसमीक्षा करीत असतात. नारायण दासो बनहट्टी यांनीं व्याकरण, भाषाशुद्धि वगैरे अनेक शास्त्रीय विषयांवर लेख लिहिले आहेत. त्यांचेच सुपुत्र प्रा. श्री. ना. बनहट्टी हे त्यांच्या नवभारत ग्रंथमालेंतील "भारतीयांची ज्ञानोपासना" सारख्या ग्रंथामुळें, त्याचप्रमाणें त्यांच्या नाट्यसंशोधना-त्मक वाङ्मयीन कार्यामुळें महाराष्ट्रांतील एक आदरणीय व विद्वान साहित्यिक म्हणून नामवंत झाले आहेत. त्यांचाहि या जिल्ह्याशीं आपुलकीची संबंध आहे.

महाराष्ट्रांतील एक नांवाजलेले उद्योगपति व तत्त्वज्ञानी श्रीमान् प्रतापशेट यांनीं अमळनेर येथें तत्त्वज्ञान मंदिर, प्रताप हायस्कूल, प्रताप कॉलेज या संस्था स्थापन करून विद्वान अन् व्यासंगी तत्त्वज्ञानी, अध्यापक, साहित्यिक इ० तेथें एकत्र येऊं शकतील अशी सोय केली आहे. स्वतः प्रताप-शेटजींनीं अनेक तत्त्वज्ञानविषयक लेख लिहिले आहेत. शिवाय सावळाराम मास्तर व प्रा. मलकानी यांनीं तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे. पूज्य साने गुरुजी, "लोकशिक्षण"कार जांभेकर, स्वामी कुवलयानंद, "नवभारत"कार बेडेकर, "तेजस्वी शिक्षण" कार हरिभाऊ मोहोनी, "गांव-गाडा"कार चिं. ना. अत्रे या विद्वान लेखकांनीं अमळनेर येथें "साहित्य सोनियाच्या खाणी" च निपज-विल्या. "गीतामृतशतपदी" वगैरे लोकप्रिय वेदांतीप्रकरणाचे कर्ते बाबा गर्दे, "आधिभौतिक सुधारणा आणि अध्यात्मिक धारणा" व "गीतारहस्यखंडन" लिहिणारे गोविंदसुत (परशुराम गोविंद चिंचाळकर) आणि चाणक्यसूत्रें प्रकाशित करणारे त्यांचे चिरंजीव द. प. चिंचाळकर हेहि अमळनेरचेच. बाळुकाका भागवत, म. गो. भालेराव, व नांदेडकर या अमळनेरवासीयांनीं केलेली साहित्यसेवा प्रसिद्ध आहे. साने गुरुजींच्या साक्षेपी लेखणीमुळेंच पूज्य विनोबाजींच्या "गीताप्रवचनां"चा बहुमोल लाभ आपणाला झाला.

जळगांवचे केशव महादेव सोनाळकर यांनीं "अमृततुषार अर्थात् आत्म्याचे बोल" या आपल्या ग्रंथांत स्वतःची तत्त्वज्ञानविषयक विचारसरणी मांडली आहे. प्रा. जनार्दन गणेश जोगळेकर यांनीं प्लेटोच्या "रिपब्लिक" या सुप्रसिद्ध ग्रंथाचा सुंदर अनुवाद प्रसिद्ध केला आहे. येथें समर्थ रामदासांचें वाङ्मय व ज्ञानेश्वरी यांवर व्याख्यान-प्रवचनें चालूं असतात. जळगांवचें मुळजी जेठा कॉलेज, अमळनेरचें प्रताप कॉलेज व जिल्ह्यांतील ठिकठिकाणचीं हायस्कूलें यांमध्यें वाङ्मयप्रेमी शिक्षक असून ते आपापल्या संस्थेंत साहित्यसेवेचें कार्य मुद्रित वा हस्तलिखित नियतकालिकें, व्याख्यानें, वक्तृत्वाच्या, निबंधाच्या वा नाट्याच्या स्पर्धा वगैरे मार्गांनीं करीत असतात. अमळनेर येथेंहि तेथील स्थानिक वाङ्मयीन संस्थांतर्फे विविध प्रकारचे कार्यक्रम नेहमीं होत असतात. पुणें विद्यापीठानें साहाय्य दिलेलीं बहिःशाल केंद्रें या जिल्ह्यांत अनेक प्रमुख ठिकाणीं असून तीं साहित्यसेवेचीं केंद्रस्थानें बनलीं आहेत.

जळगांव जिल्ह्यांत पक्षनिरपेक्ष दृष्टीनें चाललेलें साहित्यकार्य या जिल्ह्याला अभिमान वाटावा अशा विविध प्रकारचें आणि दर्जाचें आहे.

साहित्याप्रमाणेंच इतर ललित कलांची उपासनाहि या जिल्ह्यांत होत आहे. अभिजात संगीताचे रसिकतेबद्दल जळगांवची ख्याति आहे. तब्बल एक तप बालगंधर्वांचें वास्तव्य जळगांवांत घडले होतें व जळगांव येथील "खुलें नाटयमंदिरास" बालगंधर्वांचें नांव देऊन त्यांची स्मृति नगरपालिकेनें चिरंतन केली आहे.

शेती व पाणी पुरवठा



तापी नदी
चोपडें
वाघोरे
यावल
सावदा
रावेर
होळ
राजुरी
पातोंडे
असलनेर
बांभोरी
जळगांव
मणियारखेडें
भुसावळ
वेल्हाळे तलाव
एदलाबाद
पूर्णा नदी
हरताळे तलाव
म्हसवे तलाव
पारोळे
परंडोल
जामनेर
बोरी नदी
भडगांव
पाचोरे
जामदा
उंबरखेडे
नगरदेवळे
पिंपळगांव
गिरणा नदी
शिरसगांव
पिंप्री खुर्द
धुळें-औरंगाबाद
चाळिसगांव
तांबोळे
तपशील
नद्या
मध्यम बंधारा
छोटे बंधारे
नलिका विहिरी
तलाव
बीज उत्पादक केन्द्रें
शेती संशोधन केन्द्रें
ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्र
भूसंरक्षण उपविभाग
बीयाणांचीं गुदामें
शेती बागायत केन्द्रें
कापसाखालील क्षेत्र
भुईमूगाखालील क्षेत्र
केळयांखालील क्षेत्र
ज्वारीखालील क्षेत्र
डाळी खालील क्षेत्र
ऊंसाखालील क्षेत्र
धान्याखालील क्षेत्र
बाजरीखालील क्षेत्र
रेन्ज फॉरेस्ट ऑफीस व रोप उत्पादन केन्द्र

कृषि-विकास

जिल्ह्याचें शेतीप्रधान स्वरूप

जळगांव हा शेतकऱ्यांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याची लोक-संख्या १९५१ च्या जनगणनेंत १४,७१,३५१ होती व त्यापैकीं १०,३६,६५३ एवढ्या लोकसंख्येचें चरितार्थाचें मुख्य साधन शेती होतें. याशिवाय २,४३,०९९ एवढ्या लोकसंख्येचा शेती हा उपजीविकेचा दुय्यम व्यवसाय होता. यावरून हें स्पष्ट होतें कीं या जिल्ह्यांतील ७०.४६ टक्के लोक प्राधान्येंकरून व १६.७ टक्के लोक गौणत्वेंकरून शेतीवर अवलंबून आहेत. याचाच अर्थ जिल्ह्यांतील फक्त १३.४७ टक्के लोकांचें जीवन शेतीशीं कोणत्याहि प्रकारें संबद्ध नाहीं. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांपैकीं ६,८२,९७५ लोक स्वतःच्या मालकीची शेती करणारे व त्यांच्यावर अवलंबून असणारे आहेत. याचाच अर्थ ६६ टक्के शेतकरी स्वतःच्याच जमिनीवर राबतात. दुसऱ्याच्या जमिनीवर मजुरी करणारांची व त्यांच्या अवलंबितांची संख्या ३,०९,७१४ आहे. म्हणजे शेतकऱ्यांच्या ३० टक्के शेतमजूर आहेत. शेतकरी–कुळें व त्यांच्यावर अवलंबून असलेले लोक जिल्ह्यांत एकूण ३२,२२७ असून स्वतः शेती न कसणारे शेतमालक व त्यांच्यावर अवलंबून असलेले फक्त ११,७३८ आहेत. यावरून शेती करणारा व तीहि स्वतःच्या मालकीची असा वर्ग या जिल्ह्यांत फार मोठा आहे.

शेती हाच जीवनाधार

जळगांव जिल्ह्याची लोकसंख्या १८८१ मध्यें ८,१५,३९६ होती व ती १९५१ मध्यें ६,५५, ८५५ नी वाढली. यावरून ७० वर्षांत लोकसंख्येची वाढ फक्त ८०.४५ टक्केच झाली. ग्रामीण लोकसंख्या १८८१ मध्यें ५,५६,३५२ होती व १९५१ मध्यें ही १०,०३,९१६ झाली. यावरून लोकसंख्येची नागरी विभागांत स्थलांतराची प्रक्रिया मंद दिसून येते. ग्रामीण विभागांत राहणाऱ्या एकंदर लोकसंख्येशीं प्रमाण १९११ मध्यें ७८.८१ टक्के, १९२१ मध्यें ७७.०७ टक्के, १९३१ मध्यें ७५.७० टक्के, १९४१ मध्यें ७३.२८ टक्के व १९५१ मध्यें ६८.२३ टक्के आढळतें. यावरूनहि ग्रामीण विभागांतून नागरी विभागांत स्थलांतर किती मंद गतीनें होत आहे हें सिद्ध होतें. जळगांव, भुसावळ व अमळनेर या तीन शहरांतच १८८१ ते १९५१ या ७० वर्षांत लोकसंख्येची वाढ ५१६.५ टक्के झाली. चोपडें, पारोळें, एरंडोल, यावल, रावेर, भडगांव व जामनेर या तालुक्याचीं मुख्य ठिकाणें असलेल्या शहरांतहि ७० वर्षांत लोकसंख्येची वाढ दुपटीपेक्षां कमी झाली आहे. जळगांव, भुसावळ व अमळनेर या शहरांच्या लोकसंख्येच्या वाढीचीं कारणें या शहरांना शासन, दळणवळण, व्यापार इ० दृष्टीनें प्राप्त झालेलें महत्त्व हें होय. या जिल्ह्यांत खेड्यांतून शहराकडे लोकसंख्येचा ओघ द्रुतगतीनें

वाढत नाहीं, याचेंहि मुख्य कारण म्हणजे जिल्ह्याचें शेतीप्रधान स्वरूप होय. जळगांव, व भुसावळ या तालुक्याखेरीज इतर तालुक्यांतील ग्रामीण लोकसंख्येचें प्रमाण ६५.३१ टक्क्यापासून १०० टक्क्यापर्यंत आहे. फक्त जळगांव तालुक्यांत ग्रामीण लोकसंख्या ४४.१९ व भुसावळमध्यें ५१.९१ टक्के आहे. याचाच अर्थ या जिल्ह्याचा जीवनाधार शेती आहे.

जमीन

शेती हाच जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय आहे हें आतांच आपण पाहिलें. आतां शेतीचा मुख्य आधार जी जमीन ती या जिल्ह्यांत कशी आहे हें पाहूं.

जळगांव जिल्ह्याचे ११ तालुके व २ महाल यांमधील जमिनीचें गुणवैशिष्ट्यानुसार वर्गीकरण केल्यास या जिल्ह्याचे स्थूलमानानें तीन पट्टे पडतात.

जमीनीचे पट्टे

पहिला पट्टा तापी नदीच्या उत्तरेकडील भागाचा. उत्तरेस सातपुडा पर्वताच्या रांगा व दक्षिणेस तापी नदी यांमध्यें हा पट्टा येतो. या पट्ट्यांत रावेर, यावल व चोपडें हे तालुके येतात. सातपुड्याजवळील ३–४ मैलांचा भाग व नदीकांठचा सुमारें एक मैलाचा भाग सोडला तर हा पट्टा अत्यंत सुपीक गणला जातो. या पट्ट्यांतील शेतकऱ्यांच्या समृद्धीच्या अनेक आख्यायिका सांगण्यांत येतात. या पट्ट्याला दुसरें एक नैसर्गिक वरदान लाभलें आहे तें म्हणजे या भागांतील भूमींत मुबलक पाणी फार खोल न जातां आढळतें. शिलाँग येथील सेंट्रल सिस्मॉलॉजिकल ऑब्झर्वेटरीनें आपल्या २३–२–५६ च्या पत्रांत असें नमूद केलें आहे कीं, १४–३–१९३८ रोजीं २१°–३१° अक्षांश व ७५'–५०° रेखांशाजवळ ज्याचा केंद्रबिंदु आहे असा मोठा भूकंप झाल्यानें जळगांव जिल्ह्यांतील भूस्तरांतील पाणी व भूमीची स्थिति यांत बदल झाला असणें शक्य आहे. या भूकंपाचा धक्का रावेर, यावल व चोपडें या तालुक्यांत चांगलाच जाणवला. यानंतर रावेर व यावल तालुक्यांत पुष्कळ विहिरी निघाल्या व त्यांना पाणी लागलें. चोपडें तालुक्यांतील विहिरींचें पाणी क्षारयुक्त असल्यानें त्याचा जमिनीवर व पिकांवर दुष्परिणाम होऊं नये म्हणून शेतकऱ्यांनीं विहिरी खोदण्याचे प्रयत्न सोडून दिले आहेत. तथापि, अलीकडील अनुभवावरून असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, भूगर्भांतील अधिक खोल स्तरांतील पाणी बोअरिंगच्या साहाय्यानें उपलब्ध झाल्यास तें शेतीस उपयुक्त ठरतें. या भागांत जमीन काळी व कपाशीस योग्य अशी आहे. त्यामुळें शेतकऱ्यांना ही देणगीच आहे. अगदीं सातपुड्यालगतच्या १–२ मैलांत जमीन हलकी व मुरमाड आढळते.

जमिनीचा दुसरा पट्टा म्हणजे तापीच्या दक्षिणेकडील एदलाबाद, भुसावळ, जळगांव, एरंडोल व अमळनेर या तालुक्यांचा होय. तापी नदी ही या पट्ट्याची उत्तर सीमा होय. गिरणा नदी जळगांव व एरंडोल या तालुक्यांच्या मधून वाहते व त्यामुळें या पट्ट्याचे दोन भाग पडतात. भुसावळ, जळगांव व एदलाबाद हे तालुके पूर्व बाजूला येतात तर एरंडोल व अमळनेर हे पश्चिम बाजूला पडतात. भुसावळ व एदलाबाद तालुक्यांत काळ्या जमिनीचे पट्टे व हलक्या मुरबाड जमिनीचे पट्टे जागोजाग आढळतात. भुसावळ व एदलाबाद मध्यें डोंगरांच्या रांगाहि घुसल्या आहेत. त्याचप्रमाणें जळगांव तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग डोंगराळ आहे. जळगांव, भुसावळ, एदलाबाद या तालुक्यांची स्वाभाविक रचना सर्वसाधारण सारखी आहे. त्याचप्रमाणें एरंडोल व अमळनेर या तालुक्यांतहि पुष्कळसें साम्य आहे. या दोन्ही तालुक्यांचा तापीकांठचा भाग खोल काळ्या जमिनीचा आहे. एरंडोल तालुक्याचा दक्षिण भाग व मधला कांहीं भाग यांतील जमीन हलकी आहे.

तिसरा पट्टा जामनेर, पाचोरें, पारोळें, चाळीसगांव हे तालुके व भडगांव महालाचा आहे. हा सर्व जिल्ह्याचा दक्षिणभाग आहे. यापैकीं जामनेर, पाचोरें व चाळीसगांव तालुक्यांच्या दक्षिणेस सातमाळा डोंगरांच्या रांगा आहेत. जिल्ह्याच्या दक्षिण सीमेकडील जमीन किंचित् चढउताराची आहे. पण या पट्ट्यांतील बाकीचा बहुतेक भाग सपाट आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं या पट्ट्यांतल्या प्रत्येक तालुक्यांत उंचवटे आहेत पण ते फार मोठे नाहींत. या भागांतील टेकड्यांची उंची समुद्राच्या उंच उठणाऱ्या लाटेपेक्षां अधिक नाहीं. या सर्व तालुक्यांची भूरचना व नैसर्गिक स्थिति सर्वसाधारण सारखीच आहे. बव्हंशीं जमीन तांबूस पिंगट आहे. यावल–रावेर–चोपड्यासारखी चिकट, काळी, सुपीक जमीन या भागांत तुरळक प्रमाणांत खेडोंपाडीं विखुरलेली क्वचित कांहीं ठिकाणीं आढळते.

या पट्ट्यांत वाहणाऱ्या प्रमुख नद्या म्हणजे, गिरणा, तितुर, वाघुर, बोरी व कांग या होत. गिरणा नदी चाळीसगांव तालुक्यांतून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जाऊन पाचोरे तालुक्यांतून पुढें तापीस मिळण्यास जाते. पाचोरें तालुक्याची अर्धी पूर्व–उत्तर सीमा तितुरनें आंखली आहे. तर उत्तरेकडील सीमेचा अधिक भाग गिरणेनें वेढला आहे. बोरी नदी पारोळ्यांतून वाहते पण तिचा जास्त उपयोग प्रामुख्यानें अमळनेर तालुक्यास होतो. वाघुर व कांग या नद्या जामनेर तालुक्यांत अर्धवर्तुळाकार वाहतात व याच तालुक्यांत त्यांचा संगम होऊन पुढें वाघुर या नांवानें ती तापी नदीस मिळते. या नद्यांनीं तापीप्रमाणें सुपीक गाळाचा भाग त्या त्या तालुक्यांत निर्माण केला नाहीं.

जिल्ह्यांत नैसर्गिकरीत्या पडलेले हे तीन प्रकारचे जमिनीचे पट्टे आपण पाहिले. जमिनीच्या प्रकाराच्या दृष्टीनें पाहिल्यास या जिल्ह्यांत एकूण ५ प्रकारांची जमीन आढळते.

जमिनीचे प्रकार

मध्यम काळी – या जमिनीचा रंग पिंगट काळा, खोली ३ ते ६ फूट असून तिची धूप फार कमी होते. ही सपाट असते व तिला निचरा चांगला असतो. यांत नायट्रोजनचें प्रमाण ५ ते ८ टक्के, फॉस्फेरिक ॲसिडचें प्रमाण १५ ते २० टक्के, व पोटॅशचें प्रमाण १५ ते २० टक्के असतें. त्यांत वाळूचें प्रमाण ४५ ते ५० टक्के, गाळ १५ ते २० टक्के, चिकण माती २५ ते ३५ टक्के व चुना ५ टक्के असतो. अशी जमीन या जिल्ह्यांत फार आहे. यावल, रावेर, चोपड्यांतील पिकाखालील बरीचशी जमीन अशी आहे. पाचोऱ्याचा उत्तर भाग व जामनेरचा दक्षिण भाग यांतहि अशीच जमीन आहे. चाळीसगांव, एरंडोल, भुसावळ, जळगांव व भडगांव या तालुक्यांतहि बरीचशी जमीन अशीच आहे.

अशी खोल जमीन जेथें आहे, तेथें रब्बी ज्वारी, बाजरी व कपास हीं पिकें चांगली होतात. पोटॅश खताचा वापर कपाशीला पोषक होतो. नायट्रोजन व फॉस्फरसयुक्त खतें तिला चांगलीं मानवतात. केळ्यांच्या बागा अशा जमिनींत मुबलक उत्पन्न देतात. या जमिनींना विहिरींचा पाणीपुरवठा सर्वत्र आढळतो.

भारीकाळी – ही जमीन काळ्या करड्या रंगाची असते व ती ओलसर झाली म्हणजे कॉफीसारखा रंग तिला चढतो. ही जमीन फार चिकण मातीची असते. पाण्याच्या प्रवाहास या जमिनींत अडथळा होतो. तिची खोली ६ फुटांवर असते. अशी जमीन मध्यम काळीपेक्षां कमी आहे व ती फक्त खोल खोऱ्यांत व खोलगट भागांत आढळते. कांहीं ठिकाणीं अशा जमिनींत २०–३० फुटांपर्यंत खडक वा मुरुम लागत नाहींत. अशा जमिनीचे पट्टे जळगांव, भुसावळ, एदलाबाद, अमळनेर, एरंडोल या

तालुक्यांच्या उत्तर पट्ट्यांत आढळतात. कपास, गहूं व ज्वारीला ती चांगली आहे. मोठ्या प्रमाणावर खतें देऊन या भारी जमिनीचा मगदूर टिकवितां येतो व त्यामुळें उत्पादनांतहि भरीव वाढ होते. यांत वाळू ३० ते ४० टक्के, गाळ २५ ते ३५ टक्के, चिकण माती ३० ते ४५ टक्के व चुना ५ टक्के आढळतो. नायट्रोजनचें प्रमाण ६ ते ९ टक्के, फॉस्फेरिक ॲसिड १५ ते २५ टक्के व पोटॅश २० ते २५ टक्के आढळतें.

जंगल जमीन – ही जमीन रंगानें गर्द पिंगट व २ ते ६ फूट खोल असते. तिच्यांत पाण्याचा निचरा करण्याची शक्ति असते. अशी जमीन डोंगर उतारावर असते. सातपुडा भागांतील रावेर, यावल व चोपडयाच्या उत्तर टप्प्यांत ही जमीन आढळते. या जमिनीवर बांबू, खैर, साग, अंजन, मोहा अशा प्रकारचीं जंगलें असल्यानें जमिनीची धूप होत नाहीं. यांत वाळू ४० ते ५० टक्के, गाळ २० ते २५ टक्के, माती २५ ते ३० टक्के व चुना ५ते ८ टक्के आढळतो. त्यांत नायट्रोजन १ ते १५ टक्के, फॉस्फेरिक ॲसिड १५ ते २० टक्के व पोटॅश २० ते २५ टक्के आढळतें.

मळई किंवा मळवट जमीन – मळईची जमीन करडया रंगाची, ६ फूट खोल, सपाट व पाण्याचा निचरा करण्यास चांगली असते. अशा जमिनी मुख्यतः नद्यांच्या गाळानें नदीकांठींच बनलेल्या असतात. अमळनेर, एरंडोल, जळगांव, भुसावळ व एदलाबाद या तालुक्यांच्या दक्षिण टोकाला त्या आढळतात. त्या सुपीक असल्यानें कापूस, ज्वारी, केळीचीं भरपूर पिकें देतात. या जमिनींत वाळू २४ ते ३० टक्के, गाळ ३५ ते ४५ टक्के, चिकण माती २५ ते ३० टक्के व चुना १ ते ३ टक्के आढळतो. तसेंच त्यांत नायट्रोजनचें प्रमाण ८ ते ९ टक्के, फॉस्फेरिक ॲसिड२० ते २५ टक्के व पोटॅशहि २० ते २५ टक्के आढळतें.

मुरमाड किंवा बरड जमीन – मुरमाड किंवा बरड जातीच्या जमिनी ह्या खडकाळ, खूप धुपून गेलेल्या, पिवळट–तांबूस रंगाच्या व ५ इंचांपासून २ फुटांपर्यंत खोल अशा उतारावरच्या असतात. त्यांत वाळूचें प्रमाण ६५ ते ७५टक्के, गाळ १० ते १५ टक्के, चिकण माती १० ते १५ टक्के व चुना १ ते ५ टक्के आढळतो. नायट्रोजन फक्त ३ ते ५ टक्के, फॉस्फेरिक ५ ते १० टक्के व पोटॅश ५ ते १५ टक्के आढळतें. सातपुडयाच्या रांगांच्या उतारावर व दक्षिणेकडील टेकडयांच्या जवळपास चाळीसगांव, पाचोरें, जामनेर, एरंडोल, भुसावळ व भडगांव तालुक्यांत या जमिनीचे पट्टे आढळतात. समपातळीच्या ताली घालण्यानें व खतांचा भरपूर वापर केल्यास अशा जमिनींतील उत्पादन सुधारूं शकतें.

पिकांचे हंगाम

पिकांचे हंगाम हे पावसावर अवलंबून असतात. वनस्पतिजीवनावर जास्तींत जास्त नियंत्रण पावसाचेंच असतें. या दृष्टीनें १९३४–३५ ते १९५४–५५ या २१ वर्षांची, जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं पडलेल्या पावसाची सरासरी पाहणें इष्ट ठरेल. वर्षांतून एकूण किती दिवस पाऊस पडतो. एकूण किती पाऊस पडतो व या पावसाची विभागणी पावसाळ्यापूर्वी, पावसाळ्यामध्यें, पावसाळ्यानंतर व हिंवाळ्यांत कशी होते हें खालील तक्त्यावरून दिसून येईल. पावसाळ्यापूर्वी उन्हाळ्यांत एप्रिल–मे महिन्यांत एखादा दिवस पाऊस पडतो व त्यांचें प्रमाणहि ०.२ ते ०.८ इंच इतकें थोडें असतें. त्याचप्रमाणें पाऊस उलटल्यानंतर ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांतहि ३ ते ४ दिवसच व तोहि फक्त २ ते ३ इंच पाऊस पडतो. हिंवाळ्यांत पाऊस एखाद्या–

पीक हंगाम

दुसऱ्या दिवशींच पडतो व तोहि फक्त अर्धा पाऊण इंच इतकाच. पावसाचा सारा भर जून ते सप्टेंबर या चार महिन्यांतच असतो. वर्षभराच्या पावसापैकीं ८५ ते ९० टक्के पाऊस पावसाळ्यांत व अवघा १० ते १५ टक्के पाऊस पावसाळ्यापूर्वी, नंतर व हिंवाळ्यांत पडतो.

जिल्ह्यांत बेताचाच पाऊस पडतो व किमान व कमाल पावसाच्या प्रमाणांतहि अंतर फारसें नसते. पागोळें–अमळनेर येथें २७ इंच व जामनेर, यावल येथें ३३ इंच असें किमान–कमाल प्रमाण आहे. जळगांव जिल्ह्यांत सर्व पाऊस नैर्ऋत्य मान्सूनमुळें जून ते सप्टेंबर या काळांतच पडतो. सर्वसाधारण दरसाल ३० इंच पाऊस पडतो असें समजण्यास हरकत नाहीं. जिल्हाभर सर्वत्र साधारणपणें सारखाच पाऊस पडत असला तरी जिल्ह्याच्या मध्यभागांतील जळगांव, यावल व पाचोरें या तालुक्यांत पाऊस अधिक पडतो. त्या खालोखाल पूर्व भागांत व त्या खालोखाल पश्चिम भागांत पाऊस पडतो.

नैर्ऋत्य मान्सूनमुळें जून ते सप्टेंबरमध्यें या जिल्ह्यांत पाऊस पडत असल्यानें हा मुख्यतः खरीप पिकांचा जिल्हा आहे. १९५६–५७ मध्यें या जिल्ह्यांत १९,१७,९१७ एकर क्षेत्र खरीप पिकांखालीं होतें. खरीपाचीं मुख्य पिकें कापूस, खरीप ज्वारी, बाजरी, भुईमूग, मूग, साळ, वरी, साबा, तूर, कुळीथ, उडीद, तीळ, मिरची, वांगी, भेंडी, पालेभाज्या इ. होत. या पिकांची पेरणी पावसाळ्याच्या आरंभीं व कापणी पावसाळ्याच्या अखेरीस होते. जूनमध्यापासून जुलैमध्यापर्यंत पेरणीचा हंगाम असतो तर सप्टें-बरमध्यापासून नोव्हेंबरअखेरपर्यंत कापणीचा हंगाम असतो.

१९५६–५७मध्यें रब्बी पिकाखालील क्षेत्र १,७८,३८९ एकर होतें. मुख्य रब्बी पिकें म्हणजे गहूं, रब्बी ज्वारी (दादर), हरभरा, धणे, व भाज्या हीं होत. जमिनींत राहिलेला पावसाळ्यांतील ओलावा, दंव व ईशान्य मान्सूनचा पाऊस यांवर हीं पिकें तयार होतात. तथापि कांहीं ठिकाणीं पाणी पुरवठाहि करतात.

जळगांव जिल्ह्याचें एकूण भौगोलिक क्षेत्र २८,७६,२५४ एकर आहे. त्यापैकीं १९५६–५७ च्या अधिकृत माहितीप्रमाणें लागवडीखालील एकूण क्षेत्र १९,८५,९०३ एकर असून त्यांत १,२०,२१५ एकर जमिनींत दुबार पिकें होतात. याचाच अर्थ निरनिराळ्या पिकाखालील क्षेत्राच्या फक्त ९ टक्के क्षेत्र रब्बी पिकाखालीं होतें. त्याचप्रमाणें अन्नधान्याच्या पिकाखालीं ५६ टक्के व अन्नधान्येतर पिकाखालीं ४४ टक्के क्षेत्र होतें. अन्न-

पिकें

पिकामध्यें ज्वारी, बाजरी, गहूं, वरी, साळ हीं धान्यें, उडीद, मूग, मटकी, तूर कुळीथ, हरभरा या डाळी, केळी व भेंडी हीं फळें व भाजीपाला आणि ऊंस हीं पिकें येतात. अन्नधान्येतर पिकामध्यें कापूस, भुईमूग, तीळ, विड्याचीं पानें, धणे, मिरची, लसूण हीं पिकें मुख्यतः येतात. जळगांव जिल्ह्यांत अन्नधान्याच्या पिकाइतकींच अन्नधान्येतर पिकें महत्त्वाचीं आहेत. युद्धोत्तर काळांत अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रापेक्षां अन्नधान्येतर पिकाखालील क्षेत्र अधिक झालें होतें. मध्यंतरीं अधिक धान्य पिकवा या मोहिमेवर भर देण्यांत आल्यानें या प्रवृत्तीला आळा बसला होता. पण अलीकडे पुन्हा अन्नधान्येतर पिकांचें महत्त्व वाढूं लागलें आहे. कापूस व भुईमूग हीं सर्वांत मह-त्त्वाचीं पैशाचीं पिकें होत. भुईमुगाच्या क्षेत्रांत होणारी वाढ उल्लेखनीय आहे. जिल्ह्याच्या आर्थिक उत्क-र्षाचा संबंध कापूस व भुईमूग या पिकांच्या दरसालच्या उत्पन्नाशीं फार निकटचा आहे. विड्याच्या पानांचे मळेहि वाढूं लागले आहेत. त्याचप्रमाणें अलीकडे मसाल्याचे पदार्थ पिकविणाऱ्या महत्त्वाच्या जिल्ह्यांत जळगांवची गणना होऊं लागली आहे. कारण धणे व मिरची या पिकांना महत्त्व प्राप्त झालें आहे. अन्नधान्याच्या पिकांतहि बदल होत आहे. बाजरी हें एकेकाळीं या जिल्ह्याचें मुख्य अन्न होतें. आतां

ज्वारीनें बाजरीची जागा घेतली आहे. त्याचप्रमाणें डाळीचें क्षेत्रहि चांगलेंच वाढलें आहे. फळांत केळ्यांचें स्थान खूपच उंचावलें आहे. महाराष्ट्रांतच काय पण भारतांतहि खानदेशची केळीं प्रख्यात झालीं आहेत. त्याचप्रमाणें द्राक्षांच्या बागांतहि वाढ होत आहे. तद्वतच पाचोरें–भडगांव भागांत ऊंसाचे मळेहि वाढूं लागले आहेत.

जळगांव जिल्ह्यांत लागवडीखालीं व बिगर लागवडीखालीं असलेल्या जमिनींची १९५६–५७ सालची तालुकावार माहिती देणारा तक्ता, लागवडीखालील जमिनीपैकीं १९५६–५७ मध्यें निर-निराळ्या पिकांखालीं असलेल्या जमिनींची तालुकावार माहिती देणारा तक्ता, १९४५–४६ ते १९५४–५५ या दहा वर्षांतील जिल्ह्यांतील पिकांची माहिती देणारा तक्ता व याच दहा वर्षांतील कांहीं महत्वाच्या पिकांचें उत्पादन दाखविणारा तक्ता असे चार तक्ते खालीं दिले आहेत त्यावरून पिकांची संपूर्ण माहिती मिळू सकेल. (तक्ते २ ते ५)

अन्नधान्याचीं पिकें

धान्यें:—धान्याखालील क्षेत्र जळगांव जिल्ह्यांत १९५६–५७ मध्यें ६,२९,९२९ एकर होतें. एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ३५ टक्के हें क्षेत्र आहे. १९२१–२२ मध्यें धान्याखालील क्षेत्र ५२ टक्के होतें. धान्याखालील क्षेत्र कमी होण्याचें कारण लोकांची प्रवृत्ति पैशाच्या कपास–भुई-मुगासारख्या पिकांच्या लागवडीकडे झुकत आहे हेंच होय. चाळीसगांव तालुक्यांत सर्वांत जास्त क्षेत्र धान्याखालीं होतें. १९५६–५७ व १९५९–६० या सालांमध्यें धान्याचे पिकांखालीं जिल्ह्यांत किती क्षेत्र होतें हें पुढील तक्त्यावरून समजेल.

	१९५६–५७	१९५९–६०
ज्वारी	—३,९०,१९४ एकर (रब्बी व खरीप मिळून)	४,६०,४४१ एकर.
बाजरी	—२,९०,७०४ एकर	१,९१,६२१ एकर.
गहूं	— ७५,७९४ एकर	८७,२१८ एकर.
साळ	— १२,९७० एकर	१४,४७० एकर.

धान्य पिकांत ज्वारी, बाजरी, गहूं व भात हीं मुख्य होत.

ज्वारी

ज्वारी या जिल्ह्यांत विस्तृत प्रमाणांत होते. धान्यक्षेत्राच्या ५७ टक्के व एकूण क्षेत्राच्या १९ टक्के क्षेत्र ज्वारीखालीं १९५६–५७ मध्यें होतें. एकूण क्षेत्र ३,९०,१९४ एकर ज्वारीखालीं होतें. यांत खरीप व रब्बी असे दोन प्रकार आहेत. रब्बी ज्वारीला दादर म्हणतात. पण खरीप ज्वारी-चेंच पीक महत्त्वाचें आहे. हें पावसाच्या पाण्यावरच होतें. या जिल्ह्यांत ऐसुपुरी, सातपानी व गोडगरवा हे प्रकार लोकप्रिय आहेत. निळ्या हा प्रकारहि थोड्या ठिकाणीं करतात. तो चाऱ्यासाठीं उपयोगी पडतो. या सर्वांत शेतकी खात्यानें पुरस्कारिलेल्या ऐसपुरी याचें उत्पन्न चांगलें असल्यानें तोच प्रकार सर्वसामान्य सर्वत्र आढळतो. जिल्ह्यांत ज्वारीचें पीक जरी सर्वत्र आढळत असलें तरी अमळनेर, एरंडोल व जामनेर या तालुक्यांत तें विशेष आहे. रब्बी ज्वारी किंवा दादर पिकांसाठीं शेतकी खात्यानें "मालदांडी–३५–१–५" ही जात पुरस्कारिली आहे.

मे महिन्यांत २–३ वेळां जमीन वखरून जून–जुलैमध्यें ज्वारीचा पेरा करतात. उडदासारख्या डाळीहि ज्वारीबरोबर पेरण्याची प्रथा आहे. मिश्रपीक घेतल्यास एकरीं ६ ते ८ पौंड व नुसती ज्वारीच

घेतल्यास एकरीं १० पौंड बीं पेरतात. दोन ओळींतील अंतर नेहमीं १८ इंच आढळते. तथापि २४ इंचांपर्यंत अंतर वाढविलें तर पीक चांगलें येतें. दर पंधरा दिवसांनीं आंतर्मशागत करून जमीन मोकळी करण्यांत येते. ज्वारीला इतर पिकांच्या मानानें वरखतें कमी देतात. कांहीं चांगले शेतकरी शेणखत, नत्रयुक्त खतें व सुपर फॉस्फेट देतात. नोव्हेंबर–डिसेंबरमध्यें पीक तयार होतें. ज्वारीचीं ताटें जमिनी-लगत कोयत्यानें कापतात व ३–४ दिवस उन्हांत वाळवून नंतर कणसें कापून मळणी करतात.

ज्वारी हें ह्या जिल्ह्याचें मुख्य अन्न आहे. ज्वारीच्या पिठाच्या भाकरी करतात व गूळ, मीठ मिरची घालून इतर पदार्थहि करतात. ज्वारीच्या भाजून लाह्याहि करतात. ज्वारीचीं कोंवळीं कणसें काढून भाजून त्याचा हुरडा खाण्याची पद्धतहि आहे. ज्वारीच्या पिठांत उडदाचें पीठ मिसळून केलेल्या कळण्याच्या भाकरीहि आवडीनें खातात. ज्वारीची कडबी जनावरांना चारतात. ज्वारीचें एकरीं उत्पन्न सरासरी ८०० पौंड पडतें.

बाजरी

ज्वारीखालोखाल बाजरीचा क्रम लागतो. धान्यक्षेत्रापैकीं ३० टक्के व एकूण पिकाच्या क्षेत्रापैकीं १० टक्के क्षेत्र बाजरीखालीं आहे. बाजरीचें एकूण क्षेत्र १९५६–५७ मध्यें २,१०,७०४ एकर होतें. अलीकडे बाजरीचें क्षेत्र कमी करून ज्वारी करण्याकडे लोकांचा कल आहे. चाळीसगांव तालुक्यांत सर्वांत जास्त बाजरी होते. बाजरीला ज्वारी-इतकें जपावें लागत नाहीं. कोरडी हवा, हलक्या जमिनी, तुरळक पाव-साच्या सरी व भरपूर ऊन असलें म्हणजे पुरे होतें. हें पीक मुख्यतः हलक्या जमिनीवरच करतात कारण तीच या पिकाला मानवते. एप्रिल–मे मध्यें दोन-तीन वेळां जमीन वखरून व पहिल्या पावसानंतर एक पाळी देऊन जुलैमध्यें १२ ते १८ इंच अंतराच्या ओळी असतात. बाजरी एकरीं ६ ते ८ पौंड पेरतात. अकोला व २८–१५ हे बाजरीचे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं २८–१५ बाजरी लोकप्रिय आहे. कारण ती वरच्या दर्जाची व उत्पादनास चांगली असते. या पिकाची दोनदां आंतर्मशागत करून हातानें तण काढण्यांत येतें. ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें पीक तयार होतें. कापणी–मळणी ज्वारीसारखीच असते. कणसें कापलेलीं कडबी गुरांना घालतात. बाजरीचें उत्पन्न एकरीं सरासरी ५०० पौंड असतें. शेतकी खात्यानें बाजरीची " २८–१५ " ही सुधारलेली जात म्हणून दिली आहे.

गहूं

१९५६–५७ सालच्या पीक व हंगामाच्या अधिकृत माहितीप्रमाणें ७५,७९४ एकर क्षेत्र गव्हाचें होतें. हें एकूण धान्यक्षेत्राच्या ११ टक्के पडतें. यापैकीं ३० टक्के जिराईत क्षेत्र अमळनेर, रावेर या दोन तालुक्यांतच आहे. जरी सर्व जिल्ह्याभर गव्हाचें पीक होतें तरी खोल काळ्या जमिनींतील गव्हाचें उत्पादन उत्तम असतें. हें हिंवाळी पीक आहे व सप्टेंबर–ऑक्टोबरमध्यें गहूं पेरतात. पावसाळ्याच्या आरंभी ९ इंच खोल नांगरट करतात व नंतर अनेक वेळां वखरणी करून तणाची वाढ थांबविण्यांत येते व पावसाचें पाणी पूर्णपणें जमिनींत मुरूं द्यावें लागतें. जमिनींत मुरलेल्या ओलाव्यावरच हें पीक येत असल्यानें ही दक्षता घ्यावी लागते.

पाणी देऊनहि गहूं घेतला जातो. अशा बागायत गव्हाचें क्षेत्र १९५६–५७ मध्यें ३०६०३ एकर होतें. बागायत गव्हासाठीं सप्टेंबर–ऑक्टोबरमध्येंच नांगरट करतात. त्याचप्रमाणें कोरडवाहू गव्हापेक्षां बागायत गव्हांना खत जास्त द्यावें लागतें. शेणखत, सुपर फॉस्फेट व अमोनियम सल्फेट हीं खतें गव्हाला देतात. ऑक्टोबरमध्यें दोन रांगांत १५ ते १८ इंच अंतर ठेवून पेरणी करतात. कोरड-वाहू गव्हासाठीं (गुलाब) हें बी वापरतात. बागायत गव्हासाठीं फेनफाड किंवा एन्–३४५ बियाणें वापरतात. पाण्याच्या पाळ्या तीन चार देतात व दोन पाळ्यांत अंतर २० ते ३० दिवसांचें असतें. फेब्रुवारी–मार्चमध्यें गहूं कापण्यास तयार होतो. कापणीनंतर तो पूर्ण वाळेपर्यंत थांबून नंतर खळ्यावर

नेऊन बैलांच्या पायाखालीं मळणी करतात. कोरडवाहू गव्हाचें उत्पन्न एकरीं सुमारें ६०० पौंड व बागायत गव्हाचें उत्पन्न एकरीं सुमारें १२०० पौंड असतें. ओल्या गव्हाच्या ओंब्या भाजून खातात.

तांदुळ

तांदळाचें किंवा साळीचें पीक या जिल्ह्यांत फार कमी होतें. १९५६–५७ मध्यें १२,९७० एकर म्हणजे धान्यक्षेत्राच्या दोन टक्के क्षेत्रांत साळीचें पीक झालें. जून–जुलैमध्यें साळ पेरतात व एकरीं ३० ते ४० पौंड बी वापरतात. दोडकी, काळी कुसळ, कृष्णसाळ, बारामती, सुकवेल या भाताच्या जाती प्रचारांत आहेत. नोव्हेंबर–डिसेंबरमध्यें भात काढतात. साळीचें पीक एकरीं सरासरीं १००० पौंड येतें. जपानी पद्धतीच्या भातशेतीचा प्रचार शेतकी खातें करीत आहे आणि लोकांमध्यें ती हळूहळू पसरत आहे. या पद्धतीखालीं सुमारें १,००० एकर क्षेत्र होतें. साळीसाठीं जळगांव जिल्ह्यांत "जळगांव–५" ही जात शेतकी खात्यानें पुरस्कारिली आहे.

वरी, मका, रागी, कुळीथ, सावा, भादली इ० धान्यें फारशीं महत्त्वाचीं नाहींत.

डाळी

धान्यपिकांनंतर डाळीचीं पिकें महत्त्वाचीं आहेत. १९५६–५७ सालीं सर्व प्रकारच्या डाळीखालील एकूण क्षेत्र ४,०५,७०५ एकर होतें. एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १९ टक्के व अन्नपिकाखालील क्षेत्राच्या ३५ टक्के हें क्षेत्र पडतें. जळगांव हा महाराष्ट्र राज्यांतला महत्त्वाचा डाळी पिकविणारा जिल्हा आहे. उडीद, मूग, मटकी, तूर, हरभरा, चवळी याच मुख्य डाळी आहेत.

उडीद

उडीद हें जिल्ह्यांतलें सर्वांत महत्त्वाचें डाळीचें पीक आहे. या पिकाखालीं एकूण क्षेत्रापैकीं ५९ टक्के क्षेत्र होतें. २,३८,३२८ एकरांत उडीद केला जात होता. महाराष्ट्रांतील उडीद पिकविणारा हा महत्त्वाचा जिल्हा आहे. जामनेर, भुसावळ, जळगांव, एरंडोल व यावल या तालुक्यांत उडीदाची लागवड विशेष आढळते. या जिल्ह्यांतली काळी जमीन या पिकाला चांगली मानवते. म्हणून हें पीक येथें विस्तृत प्रमाणावर काढतात. या पिकाला जमीन चांगली तयार करावी लागते म्हणून शेत दोनदां नांगरून नंतर जून–जुलैमध्यें पेरा करतात. हें पीक ज्वारीबरोबर मिश्रपीक म्हणून बहुधा घेतात व त्याची पेरणी ज्वारीसारखीच करतात. एकरीं १०–१२ पौंड बियाणें लागतें व दोन ओळींतलें अंतर १८ इंच ठेवतात. सप्टेंबर–ऑक्टोबरमध्यें उडीद निघतो. नुसता उडीदच केला असला तर एकरीं ४००–५०० पौंड उत्पन्न पडतें पण मिश्रपीक असल्यास उत्पन्न कमी होतें. उडदाच्या हिरव्या शेंगा भाजीसाठीं सुद्धां वापरतात. उडीद पक्व झाल्यावर भरडून त्याची डाळ करतात. उडिदाच्या डाळीच्या पिठाचे पापड करण्याची पद्धत आहे. उडदाची काड ही गुरांच्या चाऱ्यासाठीं चांगलीं समजली जाते. शेतकी खात्यानें पुरस्कारिलेली शिंदखेडा १–१ ही जात लोकप्रिय होत आहे. कामाच्या बैलांना उडीद खुराक म्हणून दिला जातो.

मूग

१९५६–५७ च्या डाळीच्या क्षेत्रापैकीं मुगानें १४ टक्के म्हणजे ५७२७१ एकर क्षेत्र व्यापलें होतें. महाराष्ट्रांतला मूग उत्पादन करणारा हा एक महत्त्वाचा जिल्हा आहे. जिल्ह्यापैकीं अमळनेर, चोपडें, एरंडोल व जळगांव या चार तालुक्यांतच सुमारें अर्धें क्षेत्र आहे. कारण तेथील काळी जमीन व सुमारें ३० इंच पाऊस या पिकाला फार छान मानवतो. मूग हें खरीपाचें पीक आहे. एक–दोन वखरणी झाल्यावर जूनमध्यें एकरीं १० पौंड बी १८ इंचाच्या अंतरानें पेरतात. आठवड्यानंतर बी रुजून रोप वर येतें. सुमारें २० दिवसांनंतर आंतर्मशागतीच्या साधनानें एकदां कोळपणी करतात व हातानेंहि तण काढून टाकतात. हें पीक लवकरच जमिनीवर पसरतें व गवत दाबून टाकतें. सप्टेंबरमध्यें जेव्हां पीक तयार होतें तेव्हां उपटून खळ्यावर नेतात. तेथें काठ्यांनीं थोपटून अथवा बैलांच्या पायांखालीं रगडून मळणी करतात. नुसत्या मुगाचें पीक असेल तर एकरीं ४०० पौंड

उत्पन्न निघतें पण मिश्रपीक असल्यास उत्पन्न कमी येतें. मुगाच्या हिरव्या शेंगांची भाजीहि करतात. पक्व हिरवा मूग तसाच वा डाळी करून वापरतात. मूग भाजून दळून त्यांत लोणी घालून त्याचे लाडूहि बनवतात. मुगाचा काड गुरांना चारण्यास उपयोगी पडतो. कांहीं ठिकाणीं हिरवळीच्या खतांसाठींहि हें पीक घेतात. साबण अथवा साबणाचें पीठ म्हणूनहि मुगाचें पीठ वापरतात. शेतकी खात्यानें पुरस्कारिलेली 'चायना मूग' ही जात लोकप्रिय झाली आहे.

मटकी अथवा मठ

डाळीच्या क्षेत्रापैकीं ७ टक्के क्षेत्र १९५६–५७ मध्यें मठाखालीं होतें. २९५२० एकर मठ होता. एकटया चाळीसगांव तालुक्यांतच ½ क्षेत्र होतें. एदलाबाद, रावेर, यावल व जळगांव या तालुक्यांतहि मठ होतो. बाजरीमध्यें मिश्रपीक म्हणून मठ घेतात व बाजरीसारखीच त्याची पेरणी करतात. चांगल्या हंगामांत मठ चांगला पिकतो. मिश्रपीक म्हणून एकरीं २५० ते ३०० पौंड उत्पन्न मिळतें. मटकीची डाळ अनेकप्रकारें उपयोगांत आणली जाते. मटकीचें पीठहि इतर अनेक पिठांत मिसळून पदार्थ करतात. मटकी भाजून वा उकडूनहि खातात. मटकीचा काड गुरांना चाऱ्यासाठीं उपयोगी पडतो. मटकी भरडून गुरांना खाऊं घातली तर गुरें चांगलीं सुधारतात.

तूर

१९५६–५७ मध्यें तुरीचें क्षेत्र डाळींच्या सात टक्के म्हणजे २७५१६ एकर होतें. हें जिल्ह्यांत सर्वत्र होतें. हें मोठें चिवट पीक आहे व तें अवर्षणाला चांगलें तोंड देतें. कपास किंवा भुईमुगासारख्या मुख्य पिकांत हें मिश्रपीक खरीपांत घेतात. मध्यम ओलसर जमिनींत या पिकाचीं मुळें आंत खोल घुसतात व जमीन जर खत दिलेली व ताजी नांगरलेली असेल तर हें पीक भलतेंच वाढतें.जून–जुलैमध्यें मुख्य पिकाच्या कांहीं रांगांनंतर एक तुरीची रांग पेरतात. मुख्य पीक निघेपर्यंत हें पीक सावकाश वाढतें व मुख्य पीक निघाल्यावर याची वाढ झपाट्यानें होतें. जानेवारी–फेब्रुवारींत हें पीक तयार होतें. रोपें उपटून टाकण्यापूर्वींच तयार शेंगा काढून घ्याव्या लागतात. कारण शेंगा वाळल्या तर त्यांतून दाणे खालीं ओघळतात. तुरीच्या हिरव्या शेंगांतीलदाणें भाजीसाठींहि वापरतात. तयार तूर भरडून डाळ करून वापरतात. तुरीच्या डाळीचें वरण तर सर्वत्रच वापरतात. तुरीच्या वरचें टरफल गुरांचें आवडतें खाद्य आहे. तुरीचीं पानें व शेंगांची फोलपटेंहि गुरांना चारण्यास देतात. तुरकाडयाचा उपयोग खराटे करण्यास व घरांच्या भिंती व छपरें उभारण्यासाठींहि करतात.

कुळीथ

कुळींथाचें क्षेत्र एकूण डाळीच्या क्षेत्रापैकीं ५ टक्के होतें. जामनेर व चाळीसगांव या दोन तालुक्यांतच ६० टक्के क्षेत्र होतें. हें खरीपाचें पीक आहे. त्याला पाऊस बेताचा लागतो व तें डोंगराळ व चढउताराच्या जमिनीवर घेतात. हें स्वतंत्र पीक म्हणून क्वचित घेतात. मिश्रपीक म्हणूनच बहुधा घेतात. नोव्हेंबरमध्यें पीक तयार होतें. हिरव्या कुळीथामुळें गुरांना व शेळयांना चांगला चारा मिळतो. डाळ उकडून घोडयांना देतात. याचें पिठलें करून खातात. याचें उत्पन्न एकरीं सुमारें ३०० पौंड होतें.

हरबरा

१९५६–५७ मध्यें हरबरा १८५८६ एकर क्षेत्र म्हणजे डाळीच्या क्षेत्राच्या ४ टक्के होता. अमळनेर, एरंडोल व चोपडा या तालुक्यांत जास्त क्षेत्र होतें. हें रब्बी पीक आहे व तापी कांठच्या काळ्या जमिनींत तें चांगलें निघतें. हें दुबार पीक म्हणूनच बहुधा घेतात. सप्टेंबर–ऑक्टोबरमध्यें जमीन तयार करून ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें पेरणी करतात. दोन ओळींत एक फूट अंतर असतें. एकरीं ४०–५० पौंड बी टाकतात. पीक फुलावर येण्यापूर्वींच त्याचे शेंडे खुडण्याची प्रथा आहे व त्यामुळें घाटे चांगले भरतात. फेब्रुवारींत हें पीक काढतात. या

पिकाचें एकरीं सरासरी उत्पादन ५००–६०० पौंड होतें. हरभऱ्याचा पाला व हिरवा ढाळा भाजीसाठीं पेरतात. हिरवा ढाळा कच्चा उकडून वा भाजूनहि खातात. हरभऱ्याची डाळ करून त्या डाळीचें पीठ अनेक पदार्थांसाठीं सर्वत्र वापरतात. घोड्याचें तर हें नेहमींचेंच खाद्य आहे. याच्या पानापासून आंब काढतात.

चवळी

१९५६–५७मध्यें चवळीचें क्षेत्र १३२३७ एकर होतें. जळगांव हा चवळी पिकविणारा महाराष्ट्रांतला महत्त्वाचा जिल्हा आहे. डाळीच्या क्षेत्रापैकीं ३ टक्के क्षेत्र या पिकाखालीं होतें. चवळीचें स्वतंत्र पीक घेतात. पण सर्व साधारणपणें इतर पीकांच्या कडेला वा मिश्र-पीक म्हणून चवळी करतात. चवळीची वाढ व्हावयास ऊब लागते. हें खरीपाचें पीक निरनिराळया प्रकारच्या जमिनीवर होतें. पेरणीनंतर सहा आठवड्यांत हें पीक फुलतें आणि तीन महिन्यांत शेंगा चांगल्या तयार होतात. चवळीच्या हिरव्या शेंगा भाजीसाठींहि वापरतात. त्या तशाच खातात अथवा नानाप्रकारें शिजवितात. चवळीचीं हिरवीं देठें व पानें दुभत्या गुरांना चांगलीं मानवतात.

ऊंस

१९५६-५७ सालांत जळगांव जिल्ह्यांत साखालीं २४२५ एकर क्षेत्र होतें. त्यांत यावल तालुक्यांत ६६५ एकर, भडगांव महालांत ३५५ एकर व रावेर तालुक्यांत २९५ एकर क्षेत्र होतें. १९५९-६० मध्यें ऊंसाखालीं जवळजवळ चार हजार एकर क्षेत्र होतें. चाळीसगांव, भडगांव पाचोरें, जामनेर व यावल या तालुक्यांत ऊंसाचें क्षेत्र विशेष आहे.

ऊंस हा भारी काळ्या जमिनींत घेतात. हलक्या जमिनीलाहि चांगलें खत दिल्यास ऊंस चांगला होऊं शकतो. ऊंसाचें पीक त्याच जमिनींत लागोपाठ घेत नाहींत तर जमीनपालट करतात. ऊंस घेतल्यावर तेथें कोरडवाहू पिकें घेतात. पहिल्या नांगरटीनंतर ३० ते ५० गाड्या शेणखत दर एकरीं पसरून नंतर खत चांगलें मिसळण्यासाठीं नांगरटी एकदोनदां करतात. लागवडीपूर्वी मोठमोठीं ढेकळें फोडून जमीन एकसारखी मऊ करतात.

हें १२ महिन्यांचें पीक आहे. जानेवारींत उसाचें बेणें लावतात. नंतर तिसऱ्या दिवशीं पहिलें 'चिंबवणी' पाणी देतात व सातव्या दिवशीं दुसरें पाणी देतात. नंतर दर आठवड्यास पाण्याची पाळी द्यावी लागते. पाऊस असला तर पाणी देणें बंद करतात. पाऊस थांबल्यावर 'बेरावणी' म्हणजे हलकें पाणी देतात. पावसाच्या पाण्यांत गारवा फार असल्यानें मुळांना बाधा होऊं नये म्हणून उबारा देण्यासाठीं हें पाणी देतात. लावणीनंतर दोन महिन्यांनीं हलकी खांदणी व नंतर दर महिन्याला एकदां अशी तीन महिने निंदणी करतात. खांदणी करतांना एकरीं २५० ते ३०० पौंड नायट्रोजन, भुईमुगाची ढेप आणि अमोनियम सल्फेट यांचें सारखें मिश्रण करून देतात. ऊंस चांगला तयार झाला म्हणजे पीक पिवळें दिसतें. तें वाकवल्यावर कांड्यावर मोडतें, टिचकी वाजविल्यावर तयार उसाचा आवाज कठीण येतो. नंतर उसाच्या मळ्यांत गुऱ्हाळें सुरू होतात. रसाच्या काहिली उकळून गुळाच्या ढपा तयार करतात.

या जिल्ह्यांत उसाचें पीक लवकरच मोठ्या प्रमाणांत काढण्याची शक्यता आहे. गिरणा प्रकल्पाचें पाणी मिळूं लागल्यावर चाळीसगांव, भडगांव, पाचोरें, एरंडोल या भागांत उसाचें क्षेत्र झपाट्यानें वाढेल व भडगांव-एरंडोल भागांत एखादा सहकारी साखर कारखानाहि सुरू होऊं शकेल.

नागवेल किंवा विड्याचीं पानें :—पानमळ्याची लागवड ही फार खर्चाची असून त्याला चांगलें भांडवल लागतें. पानमळ्याची जोपासना फार काळजीपूर्वक करावी लागते. त्याला पाणीहि

भरपूर लागतें. या जिल्ह्यांत पानमळ्याचें क्षेत्र १९५६-५७ मध्यें २८३ एकर होतें. तें मुख्यत जळगांव तालुक्यांतच आहे. जळगांव तालुक्यांत १३३ एकर व जामनेर तालुक्यांत ९२ एकर क्षेत्रांतः पानमळे होते. जळगांव तालुक्यांत शिरसोलीचें पान प्रसिद्ध आहे. पानें पिकविणें ही एक कला आहे व ती रावेरच्या लोकांना चांगली साधली आहे. रावेरचें पान उत्तम असतें.

जळगांव हा महाराष्ट्र राज्यांतला तेलबिया पिकविणारा एक महत्त्वाचा जिल्हा आहे. अन्नधान्येतर पिकांत कपाशीखालोखाल तेलबियांचें पीक आहे. तेलबियांत भुईमूग हें सर्वांत महत्त्वाचें पीक आहे. तीळहि बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होतो. जवस, एरंडी, करडी, मोहरी हीं पिकें लहान प्रमाणावर होतात. जिल्ह्यांत पिकाखालील जमिनीचें क्षेत्र जरी बरींच वर्षें तेवढेंच कायम असलें तरी तेलबियाखालील क्षेत्र मात्र सारखें वाढत आहे. अलीकडे तर त्यांत खूपच वाढ झाली आहे. हीं पिकें पैसा देणारीं असल्यानें शेतकरी त्याकडे ओढला जात आहे. १९१८-१९ मध्यें एकूण क्षेत्राच्या अवघा दीड टक्का क्षेत्र तेलबियांखालीं होतें तर १९५६-५७ मध्यें तेलबियांखालील क्षेत्र ३,३७,६४४ म्हणजे एकूण पिकाच्या क्षेत्रापैकीं १६ टक्के होतें. त्यांत भुईमुगाखालील क्षेत्र ३,१८,११४ एकर व १७,३२३ एकर होतें. १९५८-५९ मध्यें भुईमुगाखालील क्षेत्रांत आणखी वाढ होऊन तें ३,४३,६४७ झालें. चाळीसगांव तालुक्यांत सर्वांत जास्त क्षेत्र भुईमुगाखालीं होतें. त्या खालोखाल एरंडोल, जामनेर, पारोळें, अमळनेर, पाचोरा असा क्रम लागतो.

गळिताचीं पिकें

भुईमुगाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढण्याचें कारण असें कीं शेतकऱ्याला चांगला पैसा मिळवून देणारें हें पीक आहे. भुईमुगाच्या तेलाचा वापर खाण्यासाठीं तर केलाच जातो पण याशिवाय साबण व इतर औषधोपयोगी वस्तू तयार करण्यासाठींहि भुईमुगाचें तेल वापरतात. वनस्पति तुपासाठींहि भुईमुगाची मागणी सतत होत असत व भुईमुगाच्या दाण्यांना परदेशांतूनहि मोठी मागणी असते. भुईमुगाचे बीवडावर ज्वारी व कपाशीचें पीक त्या शेतांत फारसें खत न देतांहि शेतकऱ्यांना चांगलें घेतां येतें. या जिल्ह्यांत सरासरीं एकरीं भुईमुगाचें उत्पन्न ९०० पौंड पडतें. भुईमुगाचा काड गुरांना खाण्यास उपयोगी पडतो व भुईमुगाची पेंड गुरांना देतां येते.

भुईमूग

भुईमुगासाठीं लागणारी जमीन ही निचरा होणारी व भुसभुशीत आणि ठिसूळ असावी लागते. जमीन खालीं भुसभूशीत असल्याशिवाय भुईमूगाचें पीक चांगलें रुजत नाहीं. किंचित् आम्ल व भरपूर चुना आणि इतर द्रव्यें धारण करणाऱ्या जमिनींत भुईमूग चांगला पिकतो. हवामानाचा विचार कल्यास भुईमुगास जमीन सोईची असली म्हणजे हवामान कमीजास्त असलें तरी चालतें. भुईमूग फुलावर येण्यासांठीं चांगलें ऊन लागतें. तो चांगला रुजावा व त्याची पुढची वाढ चांगली व्हावी म्हणून जमिनींत ओलावा व भुसभुशीतपणा लागतो. कांहींशी उष्ण अशी सतत टिकणारी हवा व सारख्या प्रमाणांत मिळणारें बेताचें पाणी यामुळें भुईमुगाच्या शेंगा चांगल्या पोळतात. भुईमूग काढण्याच्या वेळीं कोरडी हवा लागते. पावसाळ्याच्या अखेरीस कांहीं काळ पडणारी कोरडी हवा व कांहीं काळ पडणारी दमट हवा यांचा भुईमुगाच्या शेंगा भरण्यास चांगला उपयोग होतो. जास्त पाऊस झाला तर भुईमुगाच्या वेलीचीच वाढ होते व त्याचा शेंगांवर परिणाम होतो. भुईमुगाच्या पिकाच्या हंगामांत २० ते २३ इंच पाऊस जेथें पडतो तेथें पीक चांगलें येतें. अशा तऱ्हेची अनुकूल परिस्थिति येथेंआहे.

हलक्यापासून मध्यमपर्यंतच्या जमिनीच्या नांगरटीनंतर किंवा भारी जमिनीच्या वखरणीनंतर पावसाळ्याचें प्रारंभीं जून अखेर किंवा जुलैच्या सुरुवातीस भुईमूगाची पेरणी मोघ्यानें एकरीं ६० ते

८० पौंड या प्रमाणांत दाणें टाकून करतात. पीक फुलावर येईपर्यंत दोन तीन वेळां आंतर्मशागत करतात. शेवटच्या आंतर्मशागतीच्या वेळीं लहान पात्याच्या कोयत्यानें जरा खोल कोळपणीं करतात. उद्देश हा कीं आऱ्या चांगल्या खोल रुजाव्यात व शेंगांची वाढ चांगली व्हावी. ऑक्टोबर महिन्याच्या मध्यांत पीक तयार होतें. नंतर वल उपटून भुईमुगाची कांढणी करतात. हातांनीं तोडून शेंगा बाजूला काढतात. गांव रानी भुईमुगास सहा महिने लागतात व त्या मानानें स्पॅनिश पीनट (घुंगऱ्या) जात लवकर तयार होते. त्यामुळें तिची लागवड अधिक होत आहे. हीच जात जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर लावतात. धारवाड शेती संशोधन केंद्रावर तयार झालेली सुधारलेली स्पॅनिशची जात सध्यां प्रचारांत आहे. तिच्या लागवडीच्या पद्धतींत फारसा फरक नाहीं. सध्यां शेतकरी या पिकास शास्त्रीय पद्धतीनें वरखतें देऊं लागला आहे. त्यासाठीं एकरीं ११२ पौंड सिंगल सुपर फॉस्फेट व ५० पौंड अमोनियम सल्फेट दिलें जातें.

जिल्ह्यांतील भुईमुगाचें महत्त्व ओळखून शेती खात्यामार्फत १९४५ पासून जळगांव येथें या पिकाच्या संशोधनाचें कार्य सुरू झालें आहे. इंडियन सेंट्रल ऑईल सीड कमिटीकडून कांहीं अंशीं मिळणाऱ्या आर्थिक मदतीनुसार एप्रिल १९५७ पासून शेतकी खात्यामार्फत भुईमूग व तीळ या पिकांसंबंधी संशोधनकरणारी योजना हातीं घेण्यांत आली. उपटचा भुईमुगाची अधिक उत्पन्न देणारी, शेंगांत दाण्याचा उतारा व तेलाचें प्रमाण जास्त देणारी, कीटक व रोग यांचा प्रतिबंध करणारी जात शोधून काढणें हा या केंद्राचा उद्देश आहे. जळगांव जिल्ह्यांत सर्वसाधारणपणें प्रचारांत असलेली स्पॅनिश पीनट ही जात उत्पन्नाच्या दृष्टीनें कमी प्रतीची आहे. या केंद्रावर भुईमुगाच्या जातीचे निरनिराळे तुलनात्मक प्रयोग करण्यांत येऊन असें आढळून आलें कीं फैजपूर १-५ ही जात स्थानिक जातीपेक्षां अधिक चांगली आहे. पुढें ३ वर्षेंपर्यंत फैजपूर १-५ ही जात व स्थानिक जात (घुंगरी) यांचे तुलनात्मक प्रयोग जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे शेतावर करून फैजपूर १-५ ही जात स्थानिक जातीपेक्षां अधिक चांगली असल्याचें आढळून आल्यानें १९५९-६० सालापासून फैजपूर १-५ या जातीची निपज व वांटप योजना हातीं घेण्यांत आली. ही जात निवड पद्धतीचा अवलंब करून काढली आहे या जातीच्या बियांचा पुरवठा शेती खात्याचे बियाणें केंद्रावर पेरण्यासाठीं केला जात आहे. तेथून जिल्हाभर तिचा प्रसार होईल. फैजपूर १-५ या जातींतहि आणखी सुधारणा करण्याचें काम चालूं आहे. या दोन्ही जातींचा तुलनात्मक हिशेब खालीं दिला आहे.

तपशील.	स्पॅनिश (घुंगरी)	फैजपूर १-५.	घुंगरी पेक्षां फैजपूर १-५ ची शेंकडा वाढ
(१) एकरीं उत्पादन (वाळलेली शेंग)	८६० पौंड	११८० पौंड	३७ टक्के.
(२) शेंगांत दाण्याचा उतारा (टक्के)	७६.६९	७३	
(३) एकरीं शेंगदाण्याचें उत्पन्न (पौंड)	६५५ पौंड	८८९ पौंड	३५ टक्के.
(४) तेलाचें प्रमाण (टक्के)	५२.८५	ऽ५२.९५	
(५) एकरीं तेलाचें उत्पादन (पौंड)	३२२ पौंड	४३१ पौंड	३३ टक्के.
(६) पीक तयार होण्यासाठीं काळ	११० दिवस	११५ दिवस	
(७) शेंगांचा आकार	लहान	मध्यम. ऽ	
(८) शेंगदाण्याचा आकार व रंग	तांबूस लहान	तांबूस मोठा.	

या पिकावरचा महत्त्वाचा रोग म्हणजे मावा होय. मावा रोगाची छोटी, काळी व मऊ अंगाची कीड भुईमुगाच्या पानावर बसून वेलांचा रस शोषून घेते व त्यामुळें पिकाची ताकद कमी होते. हल्लीं या रोगाचा प्रादुर्भाव वाढूं लागला आहे. या रोगाचें नियंत्रण निकोटिन सल्फेट फवारून

करण्यांत येतें. पांच गॅलन पाणी, चार औंस साबण व ४० टक्के निकोटिन सल्फेट एक औंस या प्रमाणांत मिश्रण करून ५० ते ६० गॅलनाचे फवारे प्रत्येक एकरावर मारतात. पुन्हा कीड दिसल्यास ७ ते १० दिवसानीं पुन्हां औषध मारावें. एकरीं रु. १० पर्यंत हा औषध फवारण्याचा खर्च येतो. १० टक्के बी.एच्.सी. पावडर दर एकरीं १५ पौंड फवारुनहि उपयोग होतो. या पावडर मारण्याचा खर्च एकरीं ५-६ रु. येतो. टिक्का हा दुसरा रोग भुईमुगावर पडतो. पीक १-२ महिन्यांचें झालें असतांनाच हा रोग पडतो. पहिल्यानें तळांतलीं पानें या रोगानें पछाडलीं जातात. पानावर काळे ठिपके पडतात आणि त्याभोंवतीं एक पिवळें वर्तुळ पडतें. रोग जडल्यावर पानें गळूं लागतात व शेंगांच्या लागावर त्याचा परिणाम होतो. अधिक ओलावा व छाया यांमुळें हा रोग बळावतो. बोर्डो मिश्रण पेरणीनंतर ५-६ आठवड्याच्या अंतरानें एकदां व नंतर ३-४ आठवड्याच्या अंतरानें आणखी दोन वेळां पानांच्या दोन्हीं बाजूंनीं फवारून या रोगापासून पिकाचा बचाव करतां येतो. एकरीं ५० गॅलन मिश्रण फवारावें लागतें. तिन्ही खेपेला औषध फवारण्याचा खर्च एकरीं २०-२२ रुपये येतो. ३०० मेश गंधकाची भुकटी एकरीं १५ ते २० पौंड या प्रमाणांत तीन वेळां फवारूनहि काम भागतें. मात्र भुकटी सायंकाळीं किंवा पहाटें वाऱ्याच्या दिशेनें मारावी लागते व तो खर्चहि एकरीं रु. २२ पर्यंत येतो.

भुईमूग हें या देशांतलें मूळचें स्थानिक पीक नव्हे. ब्राझीलमधून तें सोळाव्या शतकांत भारतांत आलें. १९व्या शतकांत दक्षिण भारतांत गांवरानी ही जात सर्वत्र पसरली होती. तिला सहा महिने लागत व पावसाळ्यानंतर २-३ वेळां पाणी द्यावें लागतें. हें पीक बागायत असल्यानें रोगाची भीति फार असे. पुढें विसाव्या शतकांत स्पॅनिश पीनट, मोठा जपानी, छोटा जपानी, व्हर्जिनिया इ० जातीचे प्रयोग १९०८-१९०९ मध्यें धुळें फार्मवर करण्यांत आले व त्यांत स्पॅनिश पीनट ही जात निवडली जाऊन फारच लोकप्रिय झाली. गांवरानीपेक्षां या जातीचीं वैशिष्ट्यें अशीं कीं तिला पाणी द्यावें लागत नाहीं, ती लवकर तयार होते, त्यांत तेलाचें प्रमाण जास्त असतें, त्याच्या काढणीचा खर्च कमी येतो व त्याला रोगाचें भय कमी असतें. या स्पॅनिश पीनटपेक्षांहि अधिक फायद्याची फैजपूर १-५ ही जात जळगांवमधील तेलबिया संशोधन केंद्रावर शोधून काढून नुकतीच शेतकऱ्यांना देण्यांत येऊं लागली आहे. या जातीची व स्पॅनिश जातीची तुलनात्मक माहिती यापूर्वींच दिली आहे. हें पीक चांगलें कणखर असूनहि रोग वा कीड यामुळें या पिकाचें सुमारें १५ टक्के नुकसान होतें. शेतकरी वर्ग हळूं हळूं अधिक जागरूक होऊन रोगप्रतिबंधक उपाय योजूं लागल्यानें हानीचें प्रमाण घटूं लागलें आहे.

भुईमुगाखालोखाल जिल्ह्यांतलें महत्त्वाचें तेलबियांचें पीक म्हणजें तीळ हें होय. १९५६-५७ मध्यें तेलबियांखालील क्षेत्रापैकीं ५ टक्के जमीन तिळांखालीं होती. एकूण १७३२३ एकर जमिनींत तीळाचें पीक त्यावर्षीं होतें. तीळाचें उत्पादन सरासरी एकरीं ४०० पौंड होतें. तीळाखालील एकूण क्षेत्रापैकीं निम्मे क्षेत्र अमळनेर, चोपडें व एरंडोल या तालुक्यांत होतें. या ठिकाणीं हें एकच पीक म्हणून काढतात. इतर भागांत कापूस किंवा भुईमूगामध्यें मिसळून किंवा कडेनें तीळ पेरतात. हें पावसाचें पाण्यावर येणारें पीक असून त्याची पेरणी जून-जुलैमध्यें राख, वाळू किंवा खतांत कालवून एकरीं एक पौंड या प्रमाणात पेरतात. सुमारें साडे तीन ते साडे चार महिने हें पीक तयार होण्यास लागतात. पानें पिवळीं दिसूं लागलीं कीं पीक तयार झालें असें समजावें. नंतर मुळापासून २-३ इंचावर रोपें कापून त्याच्या जुड्या बांधून वाळवून जमिनीवर आपटून तिळाचे दाणे काढतात. तिळाचें तेल किंचित पिवळें दिसतें व त्याची चवहि बरी असते. हें तेल चांगलें टिकाऊ असतें. इतर कोणत्याहि तेलापेक्षां हें तेल जळण्यास वापरलें तर प्रकाश स्वच्छ पडतो. पण तें झपाट्यानें जळतें. तेल काढल्यानंतर उरलेली पेंड हें जनावरांचें पौष्टिक खाद्य आहे. मिठाईसाठीं किंवा तुपांत भेसळ करण्यासाठीं तिळाचें तेल वापरतात. कच्चें तेलहि खाण्यासाठीं वापरतात. त्याचप्रमाणें अंगाला

लावण्यासाठींहि तिळाचें तेल साधें वा वासाचें करून वापरतात. जळगांव येथील तेलबिया संशोधन केंद्रावर तिळाची लवकर पिकणारी, अधिक उत्पन्न देणारी, दाण्याचा आकार मोठा, रंग पांढरा, तेलाचें प्रमाण अधिक असणारी व रोगांना प्रतिबंध करणारी जात शोधून काढण्याचे प्रयत्न चालू आहेत.

इतर तेलबिया – इतर तेलबियांत मोहरी, करडी, जवस व एरंडी हीं पिकें आहेत. पण त्यांचें क्षेत्र या जिल्ह्यांत अत्यल्प आहे.

मसाल्याचीं पिकें

मसाल्याचीं पिकें हें या जिल्ह्यांतलें एक महत्त्वाचें उत्पादन असून १९५६-५७ मध्यें एकूण पिकाखालील क्षेत्राच्या २ टक्के जमीन मसाल्याचे पिकाखालीं होती. १९३८-३९ मध्यें हें प्रमाण फक्त १ टक्का होतें. यापैकीं विशेष महत्त्वाचीं म्हणजे धणे, मिरची व लसूण हीं होत. एकण मसाल्याचें पिकाखालील क्षेत्र १९५६-५७ मध्यें ३७,७४९ एकर होतें व त्यापैकीं धण्याखालीं २३,२७४, मिरचीखालीं १४,२१९ व लसूण २३५ एकर असें प्रमाण होतें.

धणा

एकूण मसाल्याचे पिकाखालील क्षेत्रापैकीं ६२ टक्के क्षेत्र धण्याचें असल्याचें १९५६-५७ मध्यें आढळलें. महाराष्ट्र राज्यांत धणे पिकविणारा हा फार महत्त्वाचा जिल्हा आहे. जुन्या मुंबई राज्यांत तर याचा पहिला क्रमांक होता. जळगांव जिल्ह्यांतील क्षेत्राचे ५० टक्के जळगांव तालुक्यांत क्षेत्र होतें. धणा साधारणपणें काळ्या जमिनींत घेतात. भाजीची कोथिंबीर म्हणून वर्षांतून केव्हांहि हें पीक काढतात. पण धण्यासाठीं घ्यावयाचें पीक सप्टेंबर मध्येंच पेरतात. धण्याचें शेत ज्वारीसारखेंच तयार करतात. एकरीं सहा पौंड बी टाकतात. तीन महिन्यांनीं रोपें उपटून त्यांचे ढीग रचून नंतर बैलाच्या पायाखालीं अथवा काठ्यांनीं बडवून, नंतर स्वच्छ करून धणे बाजारांत नेतात. धण्याचा उपयोग मसाल्यासाठीं होतोच शिवाय त्याचे औषधी उपयोगहि आहेत. कोथिंबीर ही तर भाजी-पाल्यासाठीं रोजच लागते.

मिरची

हें देखील या जिल्ह्यांतलें एक महत्त्वाचें पीक आहे. अमळनेर, पारोळें, भुसावळ, चाळीसगांव व एरंडोल या तालुक्यांत मिरचीचें क्षेत्र एकूण जिल्ह्याचे क्षेत्राचे निम्म्याहून अधिक आहे. विविध प्रकारच्या जमिनीवर व विविध प्रकारच्या हवामानांत हें पीक निघतें. तथापि काळी चिकण माती तिला विशेष मानवते. सामान्यतः खरीप पीक म्हणूनच मिरची करतात व मे महिन्यांत शेत तयार करून व खत देऊन ती पेरतात. प्रथम मिरचीचीं रोपें तयार करून नंतर दीड महिन्यानें तीं लावतात. नंतर दोन महिन्यांनीं फूल लागतें. सामान्यतः मिरचीच्या रोपांना वर्षांतून दोनदां मिरची लागते. पाणी देण्याची सोय असल्यास अधिक वेळांतहि मिरची तोडतां येते. मिरच्या तोडल्यावर वाळवून पोतीं भरून बाजारांत नेतात. मिरचीचा उपयोग रोजच्या स्वयंपाकांत चटणी, भाजी, आमटीसाठीं केला जातो.

लसूण

लसूण हा काळ्या जमिनींत थोड्या प्रमाणांत करतात. हें स्वतंत्र व बागायतीचें पीक आहे. पेरणीनंतर दोन तीनदां खुरपणी करावी लागते व १०-१२ दिवसाला पाणी जरुरीप्रमाणें द्यावें लागतें. पहिल्या हातकोळपणीनंतर थोड्या प्रमाणांत वरखतें द्यावीं लागतात. पानें पिवळीं पडलीं कीं पीक तयार झालें असें समजावें. काढणी-पूर्वीं पिकाला पाणी देऊन जमीन मऊ करावी लागते म्हणजे लसूण उपटण्यास सोपा जातो. नंतर साफ करून पातळ पसरून, वाळवून, प्रतवार लावून बाजारांत विक्रीस नेतात. लसणाचा उपयोग रोजच्या स्वयंपाकांत तर करतातच पण शिवाय औषध म्हणून ताप-खोकल्यासाठीं तो देतात. कानदुखीसाठींहि लसूण वापरतात.

तंतुपिकें—कापूस

तंतु पिकांत सर्वांत महत्त्वाचें पीक म्हणजे कपाशी हें असून जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेंत या या पिकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अंबाडी व सण हीं इतर तंतुपिकेंहि या जिल्ह्यांत होतात पण त्यांचें प्रमाण फार कमी आहे. १९५६-५७ मध्यें अंबाडीचें क्षेत्र २२१४ एकर व सणाचें क्षेत्र ९७५ एकर होतें. कपाशीचें क्षेत्र त्यावर्षी ५,८०,३२८ एकर होतें.

कपाशीचें तालुकावार क्षेत्र

तालुका	१९५६–५७	१९५९–६०
	एकर.	एकर.
अमळनेर	४२,१७९	३७,७७६
भडगांव	२८,७७६	१८,२२८
भुसावळ	५४,८१६	४९,४०९
चाळिसगांव	२७,६०६	१२,३७६
चोपडें	५५,७८६	५७,३६८
एदलाबाद	४३,२९०	३७,९६९
एरंडोल	४८,६६४	४८,४६४
जळगांव	३८,४१०	४०,६९१
पाचोरें	४८,०४९	४०,९३५
पारोळें	३३,६८१	१७,३०९
रावेरा	४३,७८९	४६,७५६
यावल	३३,८०९	३७,६०१
जामनेर	९२,४७३	८६,४६८
एकूण	५,८०,३२८	५,३१,३४०

जिल्ह्यांत कपाशीचें सरासरी एकूण क्षेत्र १९३१ ते १९४० या दहा वर्षांत ६,६२,४११ एकर होतें. नंतर अधिक धान्य पिकविण्याची मोहिम सुरूं झाल्यानें १९४५–४६ ते १९५०–५१ या दहा वर्षांत ही सरासरी १,७३,३५६ इतकी खालीं आली. नंतर पुन्हां नेहमीची परिस्थिति येतांच कपाशीचें क्षेत्र वाढूं लागून १९५५-५६ मध्यें तें ६,६२,१०० एकर इथपर्यंत पोहोंचलें. त्यानंतर पुन्हां थोडें कमी होऊन १९५६–५७ मध्यें तें ५,८०,३२८ इतकें एकर झालें. १९५८–५९ मध्यें हें क्षेत्र ५,६५,७६९ होतें व १९५९–६० मध्यें ५,३१,३४० क्षेत्र होतें.

जिल्ह्यांतील पावसाची विभागणी

(१९३४–३५ ते १९५४–५५ या ३१ वर्षांची सरासरी)

केन्द्र	पावसाळ्यापूर्वी		पावसाळ्यांत		पावसाळ्यानंतर		हिंवाळा		एकूण	
	१ एप्रिल ते ३१ मे		१ जून ते ३० सप्टेंबर		१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर		१ डिसेंबर ते ३१ मार्च			
	पावसाचे दिवस	पाऊस इंच	पावसाचे दिवस	पाऊस इंच	पावसाचे दिवस	पाऊस इंच	पावसाचे दिवस	पाऊस इंच	पावसाचे दिवस	पाऊस इंच
१. अमळनेर	०.६	०.३	३५.२	२४.३	३.८	२.३	१.१	०.४	४०.७	२७.३
२. पारोळा	०.४	०.२	३५.७	२३.९	३.२	२.२	१.२	०.६	४०.५	२६.९
३. चाळीसगांव	०.८	०.४	३६.५	२५.७	३.६	३.०	१.६	०.५	४२.५	२५.६
४. पाचोरा	१.०	०.५	४१.८	२७.८	३.५	३.०	१.२	०.६	४७.५	३१.९
५. भडगांव	१.२	०.८	३७.१	२४.५	३.६	२.६	१.८	०.५	४३.७	२८.४
६. चोपडा	०.४	०.६	४०.२	२५.०	२.८	२.०	०.९	०.४	४४.३	२८.०
७. एरंडोल	०.९	०.३	३७.०	२४.४	३.०	२.३	१.३	०.५	४२.२	२७.५
८. जामनेर	१.१	०.६	४३.१	२७.९	३.२	२.९	१.७	०.७	४९.१	३२.१
९. भुसावळ	०.७	०.३	४०.७	२८.०	३.७	२.६	१.२	०.५	४६.३	३१.४
१०. एदलाबाद	०.८	०.३	३९.७	२७.७	३.१	२.३	१.९	०.७	४५.५	३१.०
११. यावल	०.५	०.३	४१.४	२९.९	३.२	२.५	१.०	०.४	४६.१	३३.१
१२. रावेर	०.८	०.४	३९.२	२६.९	३.९	२.६	१.५	०.७	४५.४	३०.६

जेथें पाऊस साधारणपणें २० ते ३० इंच पडतो व पावसाची विभागणी जुलैंत जोराची वृष्टि, ऑगस्टमध्यें मध्यम पाऊस व मधून मधून ऊन व सप्टेंबरचे दुसरे पंधरवडचांत पुन्हां जोरदार पाऊस अशी असते, तेथें कपाशीचें पीक चांगलें येतें. कपाशीच्या पीकवाढीच्या काळांत उष्णतामानांतला चढउतार हा ६० ते १०० फॅ. असणें चांगलें. या जिल्ह्यांत जून-मध्यांत पाऊस सुरू होतो. आणि इतर जिल्ह्यांचे मानानें या जिल्ह्यांत पाऊस बराच खात्रीनें पडतो. सप्टेंबर अखेर पाऊस संपतो. ऑक्टोबरमध्यें क्वचितच पाऊस पडतो. पाऊसकाळ चार महिनेच टिकत असल्यानें चार–पांच महिन्यांत तयार होणारेंच पीक येथें काढलें जातें. विशेषतः डिसेंबरमध्यें जमिनींतील ओलावा उडून जाऊन ती कडक बनते. तिला नंतर भेगा पडतात. या भेगा खोल जाऊन उभ्या पिकांच्या मुळाला धोका देतात. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरमधील हवामान कपाशीच्या पिकाच्या रोपांच्या वाढीस पोषक असतें. हें उष्णतामानांतील अंतर ऑक्टोबरमध्यें वाढूं लागतें. त्यामुळें कपाशीचीं बोंडें उमलण्यास त्याची मदत होते. कपाशीची शेवटची वेंचणी डिसेंबरअखेर संपते.

पाऊस व हवामान

कपाशीचें पीक हें पावसाच्या पाण्यावरचेंच पीक आहे. देवीराज या नांवानें ओळखली जाणारी १७०–सी ओ–२ ही जात बागायत कपाशीची आहे. पण त्या मानानें तिची लागवड फार थोडी आहे. विरनार (१९७–३) याच जातीची कपाशीची कोरडवाहू जात सर्वत्र प्रचलित आहे. कापूस व ज्वारी किंवा कापूस–ज्वारी–भुईमूग अशा तऱ्हेनें दोन वर्षांची किंवा तीन वर्षांची पीकपालटाची पाळी चालूं असते.

कपाशीची जमीन तयार करण्यासाठीं भारी जमिनींत ४–५ वेळां वखरणी करतात व हलक्या जमिनींत एकदां हलकी नांगरट व तीनदां वखरणी करतात. एकरीं सात ते १० गाडचा शेणखत देतात. हल्लीं एकरीं २०० पौंड सिंगल सुपर फॉस्फेट पेरणीपूर्वी शेतकरी कपाशीस देऊं लागले आहेत. कांहीं शेतकरी अमोनियम सल्फेट पेरणीचे वेळीं एकदां व नंतर ५–६ आठवडचांनीं पुन्हां अशा दोन हप्त्यांनीं देतात. जूनच्या तिसऱ्या आठवडचांत पावसाळचाच्या प्रारंभाबरोबरच पेरणी करतात. सरकीला चिकण माती किंवा शेण लावून ती पेरतात. एकरीं १० पौंड या प्रमाणांत १८ इंचाचे अंतरानें तिफणीनें पेरतात. एक महिन्यानंतर एका रांगेंतील दोन रोपांतलें अंतर १२ इंच राखण्यासाठीं विरळणी करतात. मातीच्या कोळप्यानें पिकाच्या वाढीच्या काळांत ३–४ वेळां कोळपणी व २–३ वेळां जरुरीप्रमाणें निंदणी करतात. कापूस वेंचायला प्रारंभ ऑक्टोबरमध्यें होतो. सामान्यतः ३ वेळां वेंचणी होते. डिसेंबरअखेर चवथी वेंचणीहि होते. साधारणपणें एक एकर कपाशीच्या लागवडीचा खर्च बी, मजुरी, खत, शेतसारा, अवजारांचें भाडें, भांडवलाचें व्याज हें सर्व हिशेबांत धरलें तर जवळ जवळ रु.१४० पर्यंत येतो.

मशागतीची पद्धत

फार वर्षांपासून या जिल्ह्यांत येथील हवामान आणि पाऊस यांना अनुकूल अशी अरबोरियम वंशाच्या जातीच्या कपाशीची लागवड होत आहे. या जिल्ह्यांत कपाशीच्या वाढीला अनुकूल असा काळ फक्त ५–६ महिन्यांचा असल्यानें एवढचा थोडचा काळांत निसर्गदत्त पावसावर इतर कोणत्याहि वंशाची कपाशी या भागांत यशस्वी होत नाही.

कपाशीच्या जाती

या विभागाकरितां योग्य कपाशीची जात शोधून काढण्यासाठीं ब्रिटिश कॉटन ग्रोइंग असोसिएशन या संस्थेच्या विनंतीनुसार मुंबई राज्य शेतकी खात्यातर्फे १९०५ सालापासून धुळें केंद्रावर संशोधन सुरुं करण्यांत आलें. सुधारलेली जात शोधण्यासाठीं (१) नव्या जातीस हवामानाची परिस्थिति अंगवळणीं पाडणें. (२) निवड पद्धत, (३) संकर या तीन पद्धतींचा अवलंब करण्यांत आला. हें संशोधन-कार्य सुरूं होण्यापूर्वी येथें रोझेअम व व्हेरम या जातीचें मिश्रण असलेली जात प्रचारांत होती. त्यांत अरुंद व रुंद पानें, पांढरें व पिवळें फूल इ० मिश्रण होतें. या स्थानिक जातीपासून निवड पद्धतीनें "एन्.

आर्" ही शुद्ध जात निवडली व १९१२ सालीं ती शेतकऱ्यांना देण्यांत आली. पुढें बनि व कोमिला या दोन जातींचा संकर करण्यांत येऊन एन्. आर्. पेक्षां सरस अशी बनिला ही जात निर्माण करण्यांत आली. एन्. आर्. चा धागा ०.५०" होता तर बनिलाचा ०.७०" होता. ही जात १९३२ सालीं देण्यांत आली. परंतु ही जात उभळ रोगास बळी पडते असें दिसून आलें व त्यामुळें त्यापासून उत्पन्न समाधान-कारक येत नसे. १९३२ मध्यें धुळचाचें कापूस संशोधन केंद्र जळगांव येथें आणण्यांत आलें. व येथें व्हेरम जातींतून निवड करुन जरिला ही नवीन जात निर्माण केली. जरिला जातीला उभळ रोग फारच कमी होत असे व धाग्याची लांबीहि बनिलापेक्षां जास्त होती. या जातीचें बीं १९३७ सालीं शेतकऱ्यांना देण्यांत आलें. या जातीचा प्रसार खानदेश भागांत लवकर झाला. परंतु कांहीं वर्षांनंतर असें आढळून आलें कीं उत्तरा व हस्त नक्षत्राचा जोराचा पाऊस झाल्यास याचीं बोंडें गळूं लागतात. म्हणून एन्. आर्. व जरिला या जातीचा संकर करून "विरनार"ही जात शोधून काढली. ही जात जरिलापेक्षां १४ टक्के उत्पन्न जास्त देते व रुईचा उताराहि साडेतीन टक्के जास्त आहे. धाग्याची लांबी ०.८७" आहे. विरनार १९७–३ हीच जात १९४९ पासून सर्वत्र या जिल्ह्यांत लागवड केली जात आहे.

खानदेश कापूस–विभागांतील कपाशीच्या जातींची निर्मिति

अनुक्रम	जातीचें नांव	प्रसाराचें वर्ष	एकरी सरासरी उत्पन्न (पौंड)	धाग्याची लांबी इंच	रूचा उतारा	सूतनंबर
१.	स्थानिक		५००	०.५०	३५.०	६- ८
२.	एन्. आर्.	१९१४	५००	०.५०	४०.०	६- ८
३.	बनीला	१९२६	५००	०.७०	३८.५	१६-१८
४.	जरिला	१९३७	४५०	०.८४	३५.०	२५-३०
५.	विरनार	१९४९	५००	०.८७	३९.०	२५-३०

विरनारपेक्षां जास्त उत्पन्न देणारी सुधारलेली कपाशीची जात निर्माण करण्याचें कार्य सध्यां जळगांवचे संशोधन केंद्रावर सुरूं आहे. विरनारपेक्षां जास्त उत्पन्न देणारी, रुईचा उतारा जास्त असलेली, धाग्याची लांबी व सुताचा नंबरहि अधिक देणारी अशी जात शोधून काढणें हा या संशोधनाचा उद्देश आहे. महाराष्ट्र आणि इतर प्रांतांतील सुधारलेल्या देशी कपाशीच्या योग्य जातींमध्यें या भागांतील विरनारचा संकर करून नवीं नजात शोधून काढण्याचें कार्य सुरू आह. यासाठीं प्रामुख्यानें खालील विभागांतील जातींचा समावेश आहे.

विदर्भ: डोक्राससारख्या लांब धाग्याच्या जाती (रू. चा उतारा ३३ टक्के, धाग्याची लांबी ०.९६.")

कोइमतूर: (मद्रास) लांब धाग्याची जात (रूचा उतारा ३४ टक्के, धागा–०.९६.")

अमरेली: यथील लांब धाग्याची जात (रुचा उतारा ३५ टक्के, धागा ०.९५.")

मराठवाडा–या विभागांतील लांब व मजबूत धाग्याच्या गावरानी जाती (रूचा उतारा ५३ टक्के, धागा–१.००" लांब)

वरील निरनिराळ्या जातींचा संकर करून ज्या नवीन जाती निर्माण केल्या आहत त्या निर-निराळ्या पिढींत प्रयोगावस्थेंत आहेत. त्यापैकीं उपयुक्त व विशेष महत्त्वाच्या जातीचे सरकारी फार्म-वर प्रयोग केल्यावर शेतकऱ्यांच्या शेतांवर उत्पन्नांच्या दृष्टीनें प्रयोग चालूं आहेत.

लांब धाग्याची "देवीराज" किंवा "कंबोडिया" या नांवानें ओळखली जाणारी १७०–सीओ–२ या जातीची कपाशीहि जिल्ह्यांत जेथें पाणीपुरवठ्याची सोय आहे व मध्यम जमीन आहे अशा ठिकाणीं केली जाते. या कपाशीची आवड शेतकऱ्यांत अलीकडेच निर्माण होऊं लागली आहे. सध्यां जिल्ह्यांत या कपाशीचें क्षेत्र सुमारें सात हजार एकर आहे. हें क्षेत्रहि हळुंहळू वाढत आहे. मात्र यासाठीं हमखास पाणीपुरवठ्याची सोय असावी लागते. या कपाशीला भाव जास्त असतो व उत्पन्नहि सरासरी एकरीं २,००० पौंड (कच्ची कपास) निघतें.

बागायत कपाशी

जिल्ह्यांत दरसाल सुमारें १ लक्ष २० हजार गांठी किंवा १४,४०,००० मण कपाशी उत्पन्न होते. बरा–वाईट जसा हंगाम असेल तसा उत्पन्नांत फरक पडतो.

धुळें, जळगांव व नाशिक जिल्ह्यांतील कापूस पिकविणारे पांच तालुके यांचा खानदेश कापूस संरक्षित प्रदेश ठरविण्यांत आला असून या प्रदेशांत कपाशीविषयक कायद्याची अंमलबजावणी, कपाशीची प्रतवारी व ॲगमार्किग, बीजसंवर्धन, उत्पादन व वांटप व शुद्धता संरक्षण हीं कामें करण्यासाठीं या विभागाची जळगांव येथें एक कचेरी असून कॉटन सुपरिटेंडेंट हे त्या कचेरीचे मुख्याधिकारी असतात व त्यांचें हाताखालीं तालुकानिहाय मदतनीस असून त्यांचेमार्फत या योजनेचें काम चालतें.

कपाशीची शुद्धता

या जिल्ह्यांतील सुधारलेल्या जातीचे सर्व गुणधर्म कायम टिकावेत व तिची प्रतहि कायम राहून बाजारांतील प्रतिष्ठा वाढत राहावी म्हणून तिची शुद्धता राखणें व त्या कपाशींत दुसऱ्या कोणत्याहि कनिष्ठ जातीच्या कपाशीचें मिश्रण होऊं न देणें हें अत्यंत अगत्याचें काम शेतकी खात्याच्या विभागाकडून केलें जातें. शुद्ध बीजवाईचा पुरवठा शेतकऱ्यांना होत रहावा या उद्देशानें विरनार बीजसंवर्धन व वांटप योजना या जिल्ह्यांत अस्तित्वांत आहे. या योजनेप्रमाणें शंभर टक्के शुद्ध बीजवाईचा पुरवठा जळगांव कापूस संशोधन केंद्रावरून सरकारी बीजसंवर्धन केंद्रावर करण्यांत येतो व तेथें त्यांचें वर्धन (मल्टिप्लिकेशन) होऊन असें एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत वाढवा करीत करीत पांचव्या पिढीपर्यंत जिल्ह्यांतील सर्व साडे पांच लाख एकरावर पुरेल इतकें शुद्ध बियाणें उत्पादन होतें व तें सर्व शेतकऱ्यांना सहकारी संस्थांमार्फत पुरविलें जातें. या जातीची श्रेष्ठता लक्षांत घेऊन महाराष्ट्र सरकारनें ही जात या भागांत लागवडीकरितां अधिकृत जात ठरविली आहे. इतर हलक्या जातीच्या कपाशीस कायद्यानें बंदी घातली आहे. हें नियंत्रण अंमलांत आणण्यासाठीं शेतकी खात्यातर्फें या प्रदेशांत बाहेरून येणाऱ्या सर्व मार्गांवर कॉटन चेक नाकीं बसविलेलीं आहेत. या व्यवस्थेमुळें खानदेशी कापसाला बाजारांत प्रतवार वर्गीकरण (ग्रेडिंग) करून जास्त शुद्ध असलेल्या कपाशीच्या गांठीला ॲगमार्क लेबलें दिलीं जातात.

१४–१५ लाख मण म्हणजे सध्याच्या बाजारभावानें सुमारें ६ कोटि रु. किंमतीची कपास या जिल्ह्यांत पिकत असल्यानें कपाशीचा हंगाम व बाजारभाव यावर या जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांची सारी भिस्त असते. कापसाच्या नाजूक तंतूंत या जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे धागे गुंतलेले आहेत. कापसाला चांगला बाजारभाव मिळावा व शेतकऱ्यांची फसवणूक होऊं नये म्हणून कापूस खरेदी–विक्रीचें काम करणाऱ्या सहकारी संस्था या जिल्ह्यांत ठिकठिकाणीं पुढें येत आहेत. शेतकऱ्यांचा कापूस एकत्र करून त्याचे प्रतवार ढीग लावून त्यांचा जाहीर लिलांव पुकारून शेतकऱ्यांना जास्तींत जास्त भाव मिळवून देण्याचा प्रयत्न या संस्था करीत आहेत. यापुढची पायरी म्हणजे

सहकारी संस्थांची सांखळी हवी

कच्चा कापूस पक्का करून त्याच्या गांठीं बांधणें. यालाच जिनिंग व प्रेसिंग म्हणतात. हा एक प्रक्रियेचा भाग आहे. तेव्हां हें प्रक्रियेचें कामहि सहकारी संस्थांनीं हातीं घ्यावें व त्याद्वारें कच्च्या व पक्क्या मालाचे भावांतला फरक व त्यांतील फायदा शेतकऱ्यांचे पदरांत पडावा या दृष्टीनें सरकारकडून प्रोत्साहन दिलें जात आहे. यावल, जामनेर, चोपडें व अमळनेर या चार ठिकाणीं जिनिंग–प्रेसिंगचें काम करणाऱ्या सहकारी संस्था संघटित केल्या जात असून त्यांना सरकारकडून आर्थिक मदतहि दिली जात आहे. कापूस पिकविण्यासाठीं लागणारी मदत शेतकऱ्यांना वेळच्या वेळीं देणें, त्यांनीं पिकविलेला कापूस खरेदी करून एकत्र आणणें, त्या कापसाची सरकी काढून गांठी बांधणें व यापुढें जाऊन त्या कापसाचें सूत व सुताचें कापड तयार करणें अशा तऱ्हेनें उत्पादन, माल–विक्री, प्रक्रिया व निर्यात या सर्व क्षेत्रांत काम करणाऱ्या सहकारी संस्थांची एक सुव्यस्थित व संघटित सांखळी निर्माण झाल्याचें सुंदर दृश्य जळगांव जिल्ह्यांत दिसावें म्हणून सर्वांचे प्रयत्न चालूं आहेत.

फळफळावळ – केळीं

कापसानंतर या जिल्ह्याच्या भूमींतून वर येणारी संपत्ति म्हणजे केळीं होत. कापूस व केळीं म्हणजे या जिल्ह्याचें चांदीसोनें आहे. जळगांव जिल्ह्यांत १९५९–६० सालांत फळफळावळीखालीं एकूण २८५९७ एकर क्षेत्र होतें व त्यापैकीं केळ्यांखालील क्षेत्र २५०२५ एकर होतें. भारतांत सुमारें एक लाख एकर क्षेत्र केळीच्या पिकाखालीं आहे. त्यापैकीं एक चतुर्थांश क्षेत्र एकटच्या जळगांव जिल्ह्यांतच आढळतें. महाराष्ट्र राज्यांतच काय पण अखिल भारतांत कोणत्याहि एका जिल्ह्यांत केळ्यांचें एवढें उत्पादन होत नाहीं. या जिल्ह्यांतलीं केळीं मुंबई, कलकत्ता, दिल्ली व उत्तर भारतांत अनेक शहरीं रवाना होतात. केळ्याच्या एका घडांत सुमारें १०० ते १५० केळीं असतात व एकरीं सरासरी २० टन केळीं सर्वसाधारण मळ्यांत पिकतात.

भारतांतील केळ्यांचें आगर

१९५९-६० सालीं जिल्हयांतील तालुकावार केळ्यांचें क्षेत्र

तालुका	एकर	तालुका	एकर
अमळनेर	३९२	जळगांव	६२०
भडगांव	१२३६	जामनेर	१९३२
भुसावळ	७१७	पाचोरें	२१९३
चाळीसगांव	१२३७	पारोळें	५२५
चोपडें	१०४	रावेर	८४४१
एदलाबाद	४४४	यावल	५९३२
एरंडोल	१२५२		

यावरून असें दिसून येईल कीं, रावेर व यावल या दोन तालुक्यांतच जिल्ह्यांतील एकूण क्षेत्रापैकीं ५७ टक्के क्षेत्र आहे. त्याखालोखाल पाचोरें व जामनेर हे तालुके येतात. यावल, रावेर, जामनेर व पाचोरें हे चार तालुकेच मुख्यतः केळ्यांचे तालुके समजले जातात व चार तालुक्यांत जिल्ह्याचे एकूण क्षेत्राचे ७५ टक्के क्षेत्र असतें.

केळीची भुकटी तयार करून त्या भुकटीचे डबे भरून निर्यात करण्याचीहि एक योजना जळगांव यथील जिल्हा सहकारी मार्केटिंग सोसायटीनें हातीं घेतली आहे. केळींच्या पावडरीचा कारखाना उघडण्याचे

प्रयत्न सुरू असून त्यासाठीं यंत्रसामुग्री परदेशांतून आणविली जात आहे व भांडवलहि गोळा केलें जात आहे. हा कारखान्याचा प्रयोग यशस्वी झाल्यास केळींच्या पावडरीचे असे अनेक कारखाने या जिल्ह्यांत दिसूं लागतील. त्याचप्रमाणें मध्य आशियासारख्या कांहीं भागांत केळींना चांगली मागणी व भाव आहे. गुजरातेंत सुरतेसारख्या ठिकाणाहून मध्य आशियांत केळीं निर्यातहि होत आहेत. तेव्हां जळगांव जिल्ह्यांतील केळींहि मध्य आशियांत पाठविण्यासंबंधीं जरूर ती व्यवस्था करण्यासाठीं जिल्ह्यांत एक शिपिंग सोसायटीहि स्थापन केली जात आहे. या जिल्ह्यांत हंगामांत पाचोऱ्यापासून रावेर पर्यंत अनेक ठिकाणीं मध्य रेल्वेवर केळींच्या वॅगन्स भरून रवाना केल्या जातात. सावदें, निंभोरे, रावेर-हीं केळी-निर्यातीची महत्त्वाचीं केंद्रें आहेत. शेंदूर्णी हेंहि केळींचें मोठें केंद्र असून येथूनहि केळींची निर्यात मोठ्या प्रमाणावर होते. शेंदूर्णी येथील केळीं फार प्रसिद्ध झालीं आहेत.

केळींच्या पिकाचें संशोधन करण्यासाठीं या जिल्ह्यांत सावदे येथें केळीं संशोधन केंद्र सुरू झालें असून त्यासाठीं प्रारंभीची तयारी चालूं आहे.

इतर फळफळावळ

या जिल्ह्यांत १९५९–६० मध्यें इतर फळापैकीं मोसंबी ११०२ एकर, संत्री ७३१ एकर, पेरु ८६४ एकर, लिंबू ४०६ एकर व आंबे १६४ एकर याप्रमाणें क्षेत्र होतें. चांगलीं मोसंबी पिकविणाऱ्या महाराष्ट्र राज्यांतल्या कांहीं थोड्या जिल्ह्यापैकीं हा एक जिल्हा आहे. संत्र्याचें पीकहि बरें आहे. मोसंबीच्या बागा एरंडोल, चाळीसगांव, भडगांव, पाचोरें व जामनेर या तालुक्यांत व संत्रीं रावेर व जामनेरमध्यें विशेष दिसतात. पेरूच्या बागा चाळीसगांव व भडगांव मध्यें विशेष आढळतात. लिंबाच्या बागांचें जिल्ह्यांतलें निम्मे क्षेत्र एरंडोलमध्येंच आहे. एरंडोल तालुक्यांतील उत्राणचीं लिंबें फारच प्रसिद्ध आहेत. तेथें लिंबाचा रस काढून त्याच्या सायरपच्या बाटल्याहि भरतात व बाहेरगांवीं रवाना होतात. जळगांवनजीक असलेल्या मेहरुण या गांवाची प्रसिद्धि पेरूसाठीं तर आहेच पण मेहरुणचीं बोरें सर्व देश-भर नामांकित झालीं आहेत. जळगांवच्या बोरांची ख्याति तीं गोड असल्यानें व त्यांत कीड नसल्यानें सर्वत्र आहे. हंगामांत करंड्या भरभरून जळगांवहून बोरें सर्वत्र रवाना होतात. मेहरुणच्या बोरांवर तर सर्वांच्या उड्या पडतात. त्याचप्रमाणें पपयांचें पीकहि या जिल्ह्यांत सर्वत्र आढळतें. शेतांत बांधाच्या कडेनें पपयांचीं झाडें लावतात. जामनेर, पाचोरें, एरंडोल, रावेर व चोपडें या तालुक्यांत द्राक्षाच्या बागा थोड्या प्रमाणांत आहेत. सावदें येथेंहि श्री. विष्णु हरि पाटील यांनीं प्रेक्षणीय द्राक्षांचे मळे केले आहेत. त्यांना अखिल भारतीय द्राक्षांचे प्रदर्शनांत एकदां बक्षिसहि मिळालें होतें.

भाजीपाला

जळगांव जिल्ह्यांत १९५९–६० मध्यें भाजीपाल्याखालील क्षेत्र एकूण ६२३७ एकर होतें, एरंडोल, अमळनेर, पाचोरें, भुसावळ व यावल या पांच तालुक्यांतून जिल्ह्यांतील एकूण क्षेत्राचे ६० टक्के क्षेत्र आढळतें. कांदे १५५२ एकर, वांगी १२१५ एकर, भेंडी १००९ एकर, खरबूज ५५० एकर, टोमॅटो ४९२ एकर क्षेत्रांत केला गेला. याशिवाय रताळीं, मुळे, गाजर, गोवारी, कोबी, घोसाळी, दुध्या भोपळा, दोडका, पडवळ, काकडी, कार्ली, कलिंगडें इ. फळभाज्या व मेथी, पोकळा, चुका, तांदुळजा, पुदिना, चाकवत, अंबाडी इ० पालेभाज्याहि या जिल्ह्यांत होतात. जळगांव हें विपुल भाजीपाल्यासाठीं प्रसिद्ध असलेलें शहर आहे. ताज्या व तजेलदार भाज्या येथें मुबलक व त्या मानानें स्वस्त मिळतात. कांद्याचें पीक एरंडोल व अमळनेर तालुक्यांत विशेष निघतें तर भरिताच्या वांग्यांची जात येथें फार लोकप्रिय आहे. वांग्याचें भरीत हें या जिल्ह्याचें वैशिष्टच असून डिसेम्बरमध्यें

जागोजाग भरीतपाटर्चा होतात. रताळीं रावेर व यावलमध्यें विशेष होतात. टोमॅटो पाचोरें तालुक्यांत जास्त होतात. कोबी जळगांव तालुक्यांत प्रामुख्यानें आढळतात. भेंडी एरंडोल, पाचोरें, चोपडें, जामनेर या तालुक्यांत अधिक प्रमाणांत आढळून येते तर खरबूज अमळनेर व पाचोरें तालुक्यांत जास्त प्रमाणांत होतात. मेथीही यावल, चाळीसगांव व अमळनेर तालुक्यांत मुख्यत्वेंकरून होते. सारांश जिल्ह्यांत सर्व प्रकारचा भाजीपाला बहुतेक सर्वत्र तयार होतो.

शेतीचीं अवजारें

शेतकऱ्यांच्या उपयोगाचीं शेतीचीं साधनें म्हणजे लाकडी, वा लोखंडी नांगर, वखर, केणी, दुसे अथवा तिफण, कोळपी, कुदळ, फावडे, टिकाव, कुऱ्हाड, पहार, खुरपी, विळा, मोट, बैलगाडी इ० होत. शेतीसुधारणेबरोबर ट्रॅक्टर, इंजिन पंप, कीटकनाशक औषधें मारण्याचा डस्टर अथवा स्प्रेअर, जपानी कोळपें इ० नवीन अवजारेंहि प्रचारांत येऊं लागलीं आहेत.

बीजसंवर्धन केंद्रें.

जळगांव जिल्ह्यांतील जमीन, पाऊस, हवामान इ० स्थानिक परिस्थितींत योग्य अशा निरनिराळ्या पिकांच्या जातिवंत बियाणांचा पुरवठा शेतकऱ्यांना व्हावा म्हणून शेतकी खात्यातर्फे बीज–संवर्धन केंद्रें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १० तालुक्यांत सुरूं करण्यांत आलीं असून तेथें तयार होणारें बियाणें सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्याला दिलें जातें. अशीं बीजसंवर्धन केंद्रें जिल्ह्यांतील १० तालुक्यांत प्रत्येकीं एक याप्रमाणें सुरूं झालीं आहेत. तालुक्यांत हीं केंद्रें कोठें आहेत तें पुढें दिलें आहे. भुसावळ, पारोळें व पाचोरें या उरलेल्या तीन तालुक्यांत हीं केंद्रें १९६१–६२ मध्यें सुरू होतील.

१. जळगांव–जळगांव.
२. अमळनेर–पातोंडे.
३. चाळीसगांव–चाळीसगांव.
४. जामनेर–जामनेर.
५. यावल–यावल.
६. रावेर–रावेर.
७. एरंडोल–बांभोरी.
८. भडगांव–भडगांव.
९. चोपडें–चोपडें.
१०. एदलाबाद–एदलाबाद.

तत्पूर्वींसुद्धां शेती खात्यातर्फे सुधारलेल्या जातीचा बीं–पुरवठा करण्यांत आला.

खत पुरवठा

या जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांना खताचें महत्त्व फार पूर्वींपासून पटलें असून सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर ते करीत असतात. कोरडवाहू पिकांसाठीं एकरीं ५ गाड्या शेणखत व बागायत पिकासाठीं एकरीं दहा गाड्या शेणखत देण्याची येथें पद्धत आहे. त्यानंतर रासायनिक खतें पिकांच्या गरजेनुसार देतात. कंपोस्ट खत व शेणखत शेतकरी स्वतः तयार करतात व कांहीं विकत घेतात. भुईमूगाची पेंडहि या भागांतील शेतकरी पिकांना खत म्हणून घालतात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खताची मागणी खूपच वाढली असून पुरवठा त्याप्रमाणें होऊं शकत नसल्यानें जितकें जास्तींत जास्त रासायनिक खत मिळेल तेवढें मिळवून त्याचें न्याय्य वांटप जिल्ह्याच्या खत कमिटीच्या सल्ल्यानें केलें जातें. अशा तऱ्हेनें १९५८–५९ मध्यें या जिल्ह्यांत नायट्रोजनयुक्त खताचें ३१७३ टन, १९५९–६० मध्यें ६५४१ टन वांटप करण्यांत आलें. चालू सालीं १ डिसेंबरपर्यंत ७००० टन एवढें खत देण्यांत आलें असून आणखी सुमारें तीन हजार टन खत दिलें जाणार आहे.

शेतकी खात्यामार्फत खरीप व रब्बी मोहिमा चालविल्या जाऊन त्या मोहिमेचें परिश्रमपूर्वक व विस्तारपूर्वक क्षेत्राचे ठरविलेले इष्टांक पुरे करण्यासाठीं शेतकऱ्यांचेमध्यें विशेष प्रचार केला जातो. पुणेरी टोंकण पद्धत किंवा चौफुलीची पद्धत शेतकी खातें विशेष भर देऊन शेतकऱ्यांना पटवीत आहे. या पद्धतींत दोन ओळींत व दोन रोपांत समान अंतर असल्यानें दोन्ही बाजूंनीं आडवी–उभी आंतर्मशागत करतां येते; जमीन भुसभुशीत ठेवतां येते व हवा खेळती राहते. खतांचा योग्यप्रकारें विनियोग होतो व रोपाचें ठराविक क्षेत्रांतून उत्तम पोषण होतें, रोपें चांगलीं वाढून उत्पादन सरासरी २५ टक्के वाढतें. विस्तारपूर्वक पुणेरी पद्धतींत विरळ पेरणी एवढेंच अभिप्रेत असतें पण परिश्रमपूर्वक पद्धतीमध्यें टोंकणी, आंतर्मशागत व खतपुरवठा हें सर्व करावें लागतें. गेल्या दोन वर्षांतील या मोहिमेची फलश्रुति अशी :—

खरीप व रब्बी मोहिमा

खरीब व रब्बी मोहिमेचे इष्टांक व साध्य

पीक	**ठरविलेला इष्टांक (एकर)**		**साध्य–एकर**			
			१९५९–६०		१९६०–६१	
	परिश्रमपूर्वक	विस्तारपूर्वक	परिश्रमपूर्वक	विस्तारपूर्वक	परिपूर्वक	विस्तारपूर्वक
खरीप ज्वारी	१०,०००	४०,०००	४,२००	२५,०००	२१,०००	५२,०००
भुईमूग	५,०००	२०,०००	२,३००	१०,०००	१४,८००	३४,०००
कापूस	७,०००	४०,०००	२,४५०	१२,०००	२४,२००	६६,५००

यावरून चालू सालीं उद्दिष्टाचे दीडपट प्रत्यक्ष कार्यसिद्धि झाल्याचें दिसेल.

पिकांचे रोग व कीड यापासून संरक्षण करणें महत्त्वाचें आहे. सर्वसाधारण अंदाजाप्रमाणें असें अनुमान आहे कीं, पिकांचें किमान २५ टक्के नुकसान रोगराईमुळें होतें. पिकांचे रोग इतक्या निर निराळ्या प्रकारचे आहेत कीं, त्यांचा पूर्ण बंदोबस्त करण्यासाठीं प्रतिबंधक उपाय योजना हा एकमेव व रामबाण उपाय आहे. खानदेशचा शेतकरी प्रगतीशील खरा परंतु रोगराईबाबत घ्यावी तितकी दक्षता अद्याप घेतली गेली नाहीं. म्हणून जिल्ह्याच्या शेतकी विभागानें या बाबतींत भरीव कार्य करण्याचें योजिलें आहे. त्या दृष्टीनें चालू १९६०–६१ सालीं जनतेंत जागृति निर्माण करणें व या कार्याचें महत्त्व पटविणें यासाठीं निरनिराळ्या बैठका घेऊन प्रात्यक्षिकें भरविलीं. तसेंच जिल्ह्याचें प्रमुख पीक–कपाशी यावरील "दहिया" व "कवडी" या बाबत मोठ्या प्रमाणांवर कार्यक्रम हाताशीं घेऊन जनतेला तें पटवून दिलें. चालू सालीं हें कार्य २८००० एकर क्षेत्रावर केलें.

पीक-संरक्षण

फळांच्या बागा वाढाव्यात व त्यामुळें आम जनतेला भरपूर फळें खाण्यास मिळावींत म्हणून महाराष्ट्र सरकारनें फळबागा विकास योजना हातीं घेतली आहे. या योजनेमार्फत एकरीं ३०० रु. पर्यंत व जास्तींत जास्त रु. ३००० पर्यंत कर्ज दिलें जातें. या कर्जावर पहिलीं ६ वर्षें व्याज आकारलें जात नाहीं. १९६०–६१ सालीं या योजनेखालीं जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ५० हजार रु. चें कर्ज पुरविण्यांत आलें. या कर्जावर सहा वर्षांनंतर साडे चार टक्क्यांप्रमाणें व्याज आकारलें जातें. ही योजना केळांच्या बागांना लागू नाहीं.

फळबागविकास-योजना

चालू विहिरींचा पाणीपुरवठा वाढावा म्हणून त्या विहिरींना यांत्रिक सहाय्यानें बोअर्स करण जरुरीचें असतें. या कार्यासाठीं जिल्ह्यांत ६ यंत्रें कार्य करीत आहेत. कार्याचा व्याप लक्षांत घेतां ही साधनें अपुरीं आहेत. जास्त साधनें उपलब्ध व्हावींत म्हणून प्रयत्न चालू आहेत. तसेंच हें कार्य सहकारी संस्थांनीं करावें म्हणून हीं यंत्रें कार्यक्षम सहकारी संस्थांचें ताब्यांत देण्याची योजना आंखली असून त्याप्रमाणें हीं यंत्रें चालविण्यासाठीं सहकारी संस्थाचे ताब्यांत लवकरच दिलीं जातील.

बोरींग ब्ल।स्टिंग योजना

यांत्रिक सहाय्यानें विहिरींचे खडक फोडण्याचें कार्य ब्लास्टिंग मशिननें करतां येतें म्हणून या जिल्ह्यासाठीं अशीं दोन युनिटस् लवकरच येणार आहेत.

पीकस्पर्धेमुळें शेतकऱ्यांचेमध्यें अधिक उत्पादनाची स्पर्धा निर्माण होते. त्या दृष्टीनें खरीप ज्वारी, भुईमूग, कंबोडिया, रब्बी ज्वारी व गहूं यांच्या ग्रामपातळी, तालुकापातळी, जिल्हापातळी व राज्यपातळीवर स्पर्धा घेण्यांत येतात. १९६०–६१ सालची प्रगति विशेष महत्त्वाची आहे. जिल्ह्यांत एकूण १२०० स्पर्धकांनीं भाग घेतला व त्यामुळें ५५ स्पर्धकांना एकूण रु. २००० चीं बक्षिसें नुकतींच देण्यांत आलीं. अशा स्पर्धांमुळें असें दिसतें कीं, एकरीं ८० मणांपर्यंत खरीप ज्वारीचें उत्पादन निघू शकतें. या उलट जिल्ह्याची सरासरी फक्त १० मण आहे.

पीक-स्पर्धा

या जिल्ह्याचें आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे या जिल्ह्यांतील विरावलीचे श्री. व्यंकट आप्पा पाटील यांनीं १९५४ सालीं अखिल भारतीय खरीप ज्वारीचे स्पर्धेमध्यें भाग घेऊन एकरीं ८८मण २२शेर ज्वारी पिकवली त्यावद्दल भारत सरकारनें त्यांचा गौरव करून त्यांना "कृषिपंडित" ही उपाधी दिली आहे.

प्रदर्शनें ही एक शैक्षणिक बाब असते व तीं जर प्रशिक्षणात्मक पद्धतीनें आंखलीं तर तीं पाहाणाऱ्या शेतकऱ्यांना त्यापासून फार मोठा फायदा होतो. या जिल्ह्यांत दरसाल जिल्हा पातळीवर एक मोठें प्रदर्शन भरविलें जातें. १९६०–६१ सालीं जास्तींत जास्त किसानांना प्रदर्शनाचा लाभ मिळावा म्हणून तालुक्यातालुक्यांतून अशीं प्रदर्शनें घेण्याची कल्पना विकास गटांना देण्यांत आली व त्या दृष्टीनें तीन तालुक्यांतून अशीं प्रदर्शनें भरविलीं गेलीं. १९६०–६१ सालीं जिल्ह्याचें प्रदर्शन पाचोरें येथें जानेवारी महिन्यांत भरविण्यांत आलें. हें प्रदर्शन जिल्ह्यांतील १ लाख लोकांनीं पाहिलें व त्या ठिकाणीं निरनिराळ्या विभागांचे २०० स्टॉल्स आकर्षक व प्रशिक्षणात्मक पद्धतीनें विशेष प्रयत्न करून मांडण्यांत आले होते.

प्रदर्शनें

जिल्हा कृषक समाज

या जिल्ह्यांतून भारत कृषक समाजाचे एकूण आजपर्यंत ९३० आजीव सभासद आहेत. शिवाय सर्वसाधारण १५०० सभासद आहेत. त्यापैकीं अखिल भारतीय कृषक परिषदेवर ४५ सभासद हे या जिल्ह्यांतील असून शिवाय भारत कृषक समाजाचे गव्हर्निंग बॉडीवर २ सभासद आहेत व १ सभासद स्टॅंडिंग व निरनिराळ्या कमिटयांवर काम करीत आहेत. १०० पेक्षां जास्त सभासद केल्याबद्दल गतवर्षी (१९५९–६०) या जिल्हा कृषक समाजास रु. १००० चें बक्षिस मिळालें आहे.

सदस्यसंख्या

सर्व भारतांत जिल्हा पातळीवरील सदस्यांत ह्या जिल्ह्यांतून भारत कृषक समाजाचे आजीव व कौन्सिल सभासद सर्वांत जास्त आहेत. भारत कृषक समाजांत ह्या जिल्हा शाखेचें स्थान अद्वितीय व श्रेष्ठ गणलें गेलें आहे. भारतांत कोणत्याहि जिल्ह्यास ऑफिससाठीं स्वतःचे मालकीची इमारत आजपावेतों नाहीं पण अशी मालकीची इमारत या जिल्हा शाखेला आहे व पुढें त्याद्वारेंच विभागीय कृषक समाजाचें कार्य देखील सुरूं होणार आहे.

जिल्हा कृषक समाजाचे स्थान

कृषिपंडित :– जळगांव जिल्ह्यांतील यावल तालुक्यांतील विरावलीचे श्री. व्यंकटआप्पा पाटील हे या जिल्ह्यांतील एक कर्तबगार कृषिपंडित असून त्यांनीं खरीप ज्वारीचें उत्पादन एकरीं ८८ मण २२ शेर काढलें होतें व त्यासाठी त्यांना भारत सरकारतर्फे १९५४ मध्यें कृषिपंडित ही पदवी, रु. ५,००० रोख बक्षिस व कूपर इंजिनिअरिंगकडून ऑईल इंजिन बक्षिस मिळालें. भारत कृषक समाजाच्या जिल्हा शाखेचे ते एक प्रमुख आधारस्तंभ आहेत.

भूसंरक्षण

जिल्ह्यांत सध्यां बागायतीखालीं फक्त साडे चार टक्के क्षेत्र आहे. गिरणा धरण व इतर कांहीं छोटे बंधारे पूर्ण झाल्यावर जरी हें क्षेत्र पूर्ण वाढलें तरी तें १५ टक्क्याचें वर जाणार नाहीं. तेव्हां उरलेल्या ८५ टक्के जमिनीचें उत्पादन सामर्थ्य वाढविण्यासाठीं तिचा कस कायम टिकविणें, तिच्यांत ओलावा राखणें, तिची धूप थांबविणें यासाठीं तिला ताली घालणें हाच एक मार्ग आहे.

(१) जळगांव जिल्ह्यांत ताली बांधण्यासारखें एकूण ११,२१,०११ एकराचें क्षेत्र आहे.

(२) ताली बांधण्याचें काम या जिल्ह्यांत १९४९-५० सालापासून सुरूं करण्यांत आलें. परंतु या जिल्ह्यांत स्वतंत्र उपविभाग १९५५-५६ सालापासून सुरूं करण्यांत आला व आणखी दोन उपविभाग चाळीसगांव व अमळनेर येथें नोव्हेम्बरमध्यें सुरूं करण्यांत आले.

जून १९६० अखेर या जिल्ह्यांत एकंदर १,२३,३२८ एकर क्षेत्रांत ताली घालण्यांत आल्या.

(३) चालू सालीं मार्च १९६१ पर्यंत म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर साधारणतः ३२,७४० एकरांत अधिक ताली घातल्या जातील, म्हणजे जिल्ह्यांतील ताली घातलेलें क्षेत्र सुमारें १,५६,०६८ होईल व यापैकीं फक्त दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील १,१७,२९४ एकर क्षेत्र आहे.

जळगांव जिल्ह्यांतील एदलाबाद तालुक्यांत पुरेसे मजूर मिळत नसल्यामुळें बुलडोझरच्या साहाय्यानें आतांपर्यंत ५१८९ एकरांत ताली घालण्यांत आल्या. त्याचप्रमाणें १९५९-६० या वर्षांत रावेर तालुक्यांत वार्षिक ९०० रु० पेक्षां कमी उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांच्या २२७ एकर क्षेत्रांत मोफत बांधबंदिस्ती करण्यांत आली.

ताली घातल्यामुळें जमिनीची धूप थांबून सुपीकपणा साधारणतः वाढला आहे. त्याचप्रमाण ताली घातल्यामुळें खाचखळगे असलेलें पडीक क्षेत्र वहितीखालीं आणलें गेलें आहे. ताली घातल्यामुळें विहिरीचें पाणी वाढलें असून त्याचा अधिकपणें ओलितासाठीं उपयोग करण्यांत येऊं लागला.

ताली घातलेल्या क्षेत्रांत विहीर खोदण्यासाठीं सरकार तगाई देतें व त्यामुळें नवीन विहीरी खोदण्याचीं कामेंहि ताली घातलेल्या क्षेत्रांत जोरानें होत आहेत. १९५९-६० सालांत अशा ८८६ विहिरींना रु० ७ लक्ष तगाई पहिला हप्ता म्हणून देण्यांत आला व चालू १९६०-६१ मध्यें त्याच विहिरींना दुसरा हप्ता देण्यांत येऊन त्यासाठींहि रु ७ लक्ष खर्च करण्यांत आला. चालू १९६०-६१ मध्यें ही योजना चालू असून एकूण ११४४ विहिरींसाठीं १५ लक्ष रु० मंजूर करण्यांत आले आहेत.

तुकडेबंदी व तुकडेजोड कायदा मुंबई सरकारनें १९४७ सालीं मंजूर केला व त्याअन्वयें जळगांव जिल्ह्यांत प्राथमिक स्वरूपाचें काम इ० स.० १९४९ सालापासून सुरूं झालें.

शेतीच्या जमिनीची तुकडेबंदी व तुकडे जोड योजना

एकंदरींत कामाचा आढावा घेतां, जळगांव तालुक्यांत एकूण ६६ गांवच्या जमीन एकत्रीकरण योजना मंजूर झाल्या असून त्यापैकीं ६४ गांवचे प्रत्यक्ष ताबे दिले गेले आहेत. भुसावळ तालुक्यांत एकूण ३३ गांवच्या जमीन एकत्रीकरण योजना मंजूर झाल्या आहेत. त्यापैकीं ३२ गांवचे ताबे दिले गेले आहेत. एरंडोल तालुक्यांत ११ गांवचें प्रसिद्धीकरण झालें आहे व तसेंच भुसावळ तालुक्यांत ३७ गांवचें प्रसिद्धीकरण झालें आहे. तसेंच जळगांव भुसावळ, एदलबाद, चाळीसगांव, एरंडोल व अमळनेर यांतील अनुक्रमें १,१९,६,११,३८, ६ गांवांत काम सुरूं आहे.

जमीन एकत्रीकरणाचे हे फायदे या जिल्ह्यांतल्या जनतेला पटत असल्यानें त्यांचे या कामीं सहकार्य मिळत आहे.

वनवैभव

जंगल ही राष्ट्राची अमोल संपत्ति आहे. त्यापासून इमारतीचे व जळाऊ लाकूड, लाख, डिंक, टेंभरुण पानें वगैरेंचे उत्पन्न मिळतें. जंगलामुळें पावसाचें पाणी एकदम वाहून न जातां जमिनींतून झिरपत जातें व त्यामुळें नदीनाल्याचें पाणी कायम टिकतें व पुरांचीं संकटें टळतात.

जळगांव जिल्ह्यांतील एकूण राखीव जंगलांचें अदमासें क्षेत्र ७७१ चौरस मैल अथवा ४,९७,१२७ एकर आहे व जिल्ह्याचे क्षेत्रफळाचे तुलनेनें जंगलाचें प्रमाण अवघें शेंकडा १७ टक्के भरतें. हें प्रमाण फारच कमी आहे कारण राष्ट्रीय उद्दिष्टानुसार जंगलाचें प्रमाण कमींतकमी शें० ३३ टक्के असावयास हवें. जिल्ह्यांत सातपुडा जंगल दाट असून उत्पन्नाच्या दृष्टीनें महत्त्वाचें समजलें जातें. बाकी जळगांव, चाळीसगांव, पारोळा, जामनेर व एदलाबाद या भागांत तुरळक जंगल आढळतें. जिल्ह्यांतील जंगलापासून सरासरी खालीलप्रमाणें दर वर्षी मालाचें उत्पन्न निघतें.

(१) इमारती लांकूड :—१८७५५३ घनफूट.
(२) जळाऊ लांकूड :—७,२८४.७६ टन.

वरील मालापासून दर वर्षीं सरासरी ७,१८,३०१ रुपयांचें उत्पन्न मिळतें. या जिल्ह्यांत एकूण कायम स्वरूपाची ६० गवती कुरणें आहेत. या सर्व गवती कुरणांचें क्षेत्रफळ ३५,२७५ एकर भरतें. हीं सर्व कुरणें जळगांव, चाळीसगांव, पारोळा, जामनेर व एदलाबाद या भागांत असलेल्या जंगलांत आहेत. वरील कुरणांपासून जिल्ह्यास दरवर्षी सरासरी १,२९,१६० रुपयांचें उत्पन्न मिळतें. जंगलांतून निघणाऱ्या मालावर सुतारकाम, लांकूड कापण्याच्या गिरण्या वगैरे उद्योगधंदे चालतात.

जंगलांत वसलेलीं गांवें

जंगलांत जंगल खात्याच्या मालकीचीं एकूण २५ गांवें असून त्यांचें एकूण क्षेत्रफळ सुमारें ७११६ एकर आहे. ह्या गांवांत राहणाऱ्या लोकांस खातेदार अशी संज्ञा आहे. ह्या लोकांत मुख्यतः पावरे ,भिल्ल, तडवी व वंजारी याच लोकांचा भरणा आहे. हीं गांवें जंगलांत अगदीं मध्यांत वसलेलीं आहेत. विशेषतः जंगलाचे भागांतील तोड, रस्त दुरुस्ती व नवीन लागवड इ० साठीं बाहेरून मजूर मिळण्याची शक्यता नसतेच व ह्या कामासाठीं आवश्यक ते लोक मिळावेत ह्या दृष्टीनें जंगल खात्यानें ह्या गांवीं वसाहती केल्या आहेत. ह्या लोकांना त्यासाठीं प्रत्येकीं पांच ते दहा एकर

जमिनी दिल्या आहेत व त्या जमिनीचें भाडें ह्या लोकांपासून अगदीं थोडया प्रमाणांत वसूल केलें जातें. ह्या लोकांना जंगलकाम केल्याबद्दल खात्यानें ठरविलेल्या दराप्रमाणेंच मजुरी देण्यांत येते. मुलकी खात्याप्रमाणेंच ह्या लोकांना योग्य तऱ्हेनें बीबियाणें घेण्यासाठीं जिल्हाधिकारी यांचेकडून तगाई रक्कम मंजूर झाल्यावर त्यांना ती दरवर्षी देण्यांत येते.

वन्यपशु

जिल्ह्यांतील जंगलांत वाघ, अस्वल, हरीण, सांबर, कोल्हे, ससे, बगळे, मोर, लांडगे बिबळ्या वाघ, रानडुक्कर, नीलगाय वगैरे वन्यपशुपक्षी आढळतात. अर्थात् त्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊं लागली आहे. सातपुडयाचे अंतर्गत भागांत हें वन्यपशु दिसतात.

रस्ते

जंगलखात्याचे मालकीचे सर्व रस्ते सातपुडा जंगलांतच आहेत. त्यांचा उपयोग वाहतुकीसाठीं होतो. असे रस्ते एकूण १७ असून त्यांची एकूण लांबी १२६ मैल ४ फर्लांग आहे.

जंगलांतील वृक्षसंपदा

जंगलांत नानाविध प्रकारचे वृक्ष आढळतात. या जिल्ह्यांत आढळणाऱ्या वृक्षांच्या प्रमुख जाती अशा :–अंजन, आपटा, बाभूळ, बिया, धावडा, कढ, काकडा, कळंब, खैर, मोधळ, पळस, सादडा, साग, सलई, सावर, सिसम, टेम्ब्रु, तिवस, आवळ, बेहडा, बेल, बोंडारा, धामन, हळदु, हुंब, जांभूळ, मेडिसिंग, अंबर, फासी. याशिवाय बांबू किंवा टोंकर यांचीं बेटें असतात. तसेंज जंगलांत पवन्या, कुसली, रोषा, फुली व बोस हे गवताचे प्रकारहि आहेत.

जंगल खात्याचे या जिल्ह्यांत ९ डाक बंगले आहेत. यावल रेंजमध्यें हरिपुरा व लंगडा आंबा, रावेरा रेंजमध्यें वैजापूर, सत्रासेन, देवझिरी व अमरटी येथें हे डाकबंगले आहेत. जंगल खात्याचे अधिकारी व तसेच इतर खात्याचे अधिकारी येथें कामानिमित्त उतरतात. जंगलामध्यें निसर्गसौंदर्य पाहण्यास मिळतें. जिल्ह्यांत पाल हें गांव थंड हवेचें ठिकाण आहे. हें गांव जंगलाचे लगत व उंचावर वसलेलें आहे व गांवाजवळून नदी वाहते. म्हणूनच पाल या गावीं निसर्गसौंदर्य पहावयास मिळतें. पाल हें गांव रावेरपासून १४ मैलांवर आहे. त्याचप्रमाणें दुसरें रमणीय ठिकाण म्हणजे मनुवाईचें देऊळ. देवळाजवळच ७० फूटावरून पाण्याचा प्रवाह खालीं पडतो. हें ठिकाण मानदैवत म्हणून प्रसिद्ध आहे. येथें शाळेंतील मुलें सहलीसाठीं सुद्धां येतात. हें ठिकाण यावल तालुक्यांतील किनगांव या गांवापासून सुमारें ८ मैलांवर आहे.

जंगल खात्याचे जिल्हाप्रमुख यांचें कचेरीचें ठिकाण जळगांव येथें आहे व संबंधित जंगल कचेरीच्या शाखा, जळगांव, पारोळा, चाळीसगांव, एदलाबाद, जामनेर, चोपडा, यावल व रावेर या ठिकाणीं आहेत.

वनविभागाच्या वनविकासयोजना

वनविभागातर्फे सध्यां खालीं दर्शविल्याप्रमाणें योजना चालू आहेत.–

(१) **रोपउत्पादन केन्द्र**—सन १९५६-५७ व १९५७-५८ मध्यें दरेक रेन्जमध्यें एक या प्रमाणें आठ रोप उत्पादन केन्द्रें उघडण्यांत आलीं होतीं. दरवर्षी हीं

केन्द्रें चालूं ठेवण्यांत येत आहेत. वनमहोत्सव, जंगलाची वाढ करणें वगैरे योजनांना पुरेशीं रोपें पुरविण्याचे हेतूनें हीं केन्द्रें उघडण्यांत आलीं आहेत.

(२) **केतकीचें कुंपण**.—सन १९६०-६१ मध्यें एकंदर १० मैल लांबीच्या केतकीचीं कुंपणें लावण्याची योजना होती व त्याप्रमाणें हें काम पूर्ण झालेलें आहे. सन १९५६ ते १९६१ अखेर या योजनेमध्यें एकूण १०९ मैल लांबीचीं केतकीचीं कुंपणें लावण्याचें काम पूर्ण होईल. या योजनेचा उद्देश केतकीचा दोर वगैरे बनविण्याचे उद्योगधंद्यास उत्तेजन देणें हा आहे. त्याशिवाय केतकींत वणवा न लागूं देण्याचा गुणधर्म असल्यामुळें जंगलाचे सभोंवतीं असलेलें केतकीचें कुंपण जंगलाचें वणव्यापासून संरक्षण करतें.

(३) **साबर झाडाची लागवड**.—चोपडा, यावल व रावेर रेन्जमध्यें १९६०-६१ ह्यावर्षी १०३ एकरांत साबर झाडांची लागवड पूर्ण झाली आहे. सन १९५६ ते १९६१ अखेर या योजनेखालीं एकूण ८५३ एकर जमीन साबर झाडाच्या लागवडीखालीं येईल. साबरपासून आगकाड्या बनवितां येतात. त्याचप्रमाणें मऊ लांकूड म्हणून याची प्रसिद्धी आहे.

(४) **साग झाडाची लागवड**.—साग हें सर्वांत मौल्यवान झाड आहे. त्यापासून आपणांस किंमती लांकूड मिळतें. ज्या जंगलांत या जातीचें प्रमाण कमी आहे तेथें ह्या जातीची लागवड करण्यासाठीं ही योजना हातीं घेतली आहे व निश्चित केल्याप्रमाणें चालूं वर्षी १७५ एकरांत साग झाडांची लागवड केली आहे. सन १९५६ ते १९६१ अखेर एकूण या योजनेखालीं ६६२ एकरांत सागी झाडांची लागवड करण्यांत येईल.

(५) **जमिनीची धूप निवारण**.—जळगांवपासून ३ मैल अंतरावर मेहरुणचे जंगलांत हें केंद्र उघडण्यांत आलें आहे. त्याचें क्षेत्र फक्त ६० एकर आहे व त्यांत एकूण ८५४ खड्डे (१२' २' १' या मापाचे) व ३५८२५ फूट लांबीच्या वरळी केल्या आहेत. व त्यांत निरनिराळ्या जातीचीं रोपें म्हणजे सिसम, चिंच, निंब, बाभूळ, मोह, खैर, साबर, अंजन वगैरे लावलेले आहेत. ह्या केंद्राभोंवतीं तारेचें कुंपण घातलें आहे. त्यामुळें याचें संरक्षण होऊन जमिनीची धूप थांबली आहे. तसेंच गवताचें उत्पादन वाढलें आहे. त्यामुळें गुरांना चारा मिळण्यांत भर पडली आहे. हा भाग पूर्वी डोंगराळ, खडकाळ व उजाड होता, तो आतां रोपांची लागवड केल्यामुळें हिरवागार दिसत आहे.

(६) **झाडांची कृत्रिम उत्पत्ति**.—ही योजना पारोळा रेन्जमध्यें घेण्यांत आलेली आहे. चालू वर्षांत जवळजवळ४००एकरांत झाडांची उत्पत्ति केली आहे. मागील वर्षी सन १९५९-६० मध्यें लागवड केलेल्या २६५ एकरांत व सन १९५८-५९ चे २६० एकरांत लावलेल्या रोपांची जोपासना करण्यांत आली आहे. एकूण ९२५ एकरांचें क्षेत्र द्वितीय पंचवार्षिक योजनेंत या योजनेखालीं लागवडीखालीं आणण्यांत आलें आहे.

(७) **कुरणांची गवत उत्पादन शक्ति वाढविणें**.—ह्या योजनेखालीं जळगांव रेंजमधील द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकलग्न कुरण नं. ३६ व मोहाडी कुरण नं. २६ यांतील

६२६ एकरांत खड्डे व वरोळ्या तयार करून त्यांत रोपें लावलीं आहेत. व जमिनीची धूप थांबविली आहे. शिवाय एकल्गन, रायपूर व सावदा या कुरणांना तारेचें कुंपण केलें आहे. त्यामुळें चोरट्या चराईपासून भीति नाहींशी झाल्यामुळें या कुरणांचें उत्पादन वाढलें आहे.

वरील सर्व योजना जनतेचे फायदे करणाऱ्या आहेत. ह्या सर्व योजना लांब पल्ल्याच्या असल्यामुळें लोकांना त्यांचेंपासून होणारा फायदा आजच दिसूं शकणार नाहीं.

कुरणांच्या योजनेमुळें गवताचा पुरवठा बराच वाढेल. त्यामुळें गुरांचे जोपासनेंतहि प्रगती होईल. लांकूड हा तर मनुष्याचे जीवनांतील अत्यंत महत्वाचा असा उपयुक्त पदार्थ आहे.

पशुधन

जळगांव हा कृषिप्रधान जिल्हा असल्यानें येथें शेतीच्या उपयोगी जनावरांची संख्याहि मोठी आहे. आपल्या देशांत शेती आणि जनावरें यांचा अन्योन्यसंबंध निकट आहे. जनावराशिवाय शेती होऊंच शकत नाहीं. पाणी ओढणाऱ्या मोटांची कुरकुर थांबून त्यांच्या जागीं इंजिनाचे भक्‌भक् सुरू झालें व ऊंसाचे चरकाला जुंपलेल्या बैलांच्या घाण्याभोंवतीं फेऱ्या बंद होऊन तेथें यांत्रिक चरक ऊंस गाळूं लागले तरीहि शेतीच्या बाबतींत जनावरांचें महत्त्व अद्याप कमी झालें नाहीं. ट्रॅक्टरचे लोखंडी दांत जरी कोठें जमिनींत घुसून माती वर काढीत असलेले दिसले तरी लक्षावधि एकर जमिनीच्या पाठीवरून अजून नांगरांचाच फाळ फिरत आहे. नांगरासाठीं बैलजोडी, दुधदुभत्यासाठीं एखादी गाय वा म्हैस, शेळ्या, मेंढ्या व कोंबड्यांचें खुराडें हेंच अजूनहि मध्यवर्गीय शेतकऱ्यांचें वैभव आहे. ग्रामीण भागांत अद्यापीहि शेतकरी घराण्याचें वैभव त्याच्या दावणीला बांधलेल्या गुरांच्या संख्येवरूनच मोजलें जातें. मोट, नांगर, गाडी, खत इ० अनेक कारणांसाठीं जनावरें हीं बहुविध उपयोगी असल्यानेंहि आर्थिकदृष्ट्याहि शेतकऱ्याला जनावरांशिवाय जगतां येणार नाहीं.

जनावरांपासून मिळणारें उत्पादन

दुधाशिवाय जनावरांचेपासून अंडीं, लोकर, चामडीं व वासरें आणि रेडकूं यांची निर्मिती इ० उत्पादन होते. कोंबड्यांचीं अंडीं एकूण ३८,५५,७२० उत्पादन झालीं व त्यांची किंमत ३,८५,५७२ रु. झाली. त्याचप्रमाणें शेणखत एकूण ३,९४,३८१ गाड्या निघालें व त्याची किंमतहि ७,८८७६२ रु. झाली. लोंकरीचें उत्पादन ३६,८९२ पौंड झालें व त्याची किंमत रु. ५५,३३८ झाली. कातडीं व चामडी एकूण ८९,७३२ निघालीं व त्यांची किंमत रु. १०,४२,१५५ झाली. याशिवाय रु. ३,६०,५०० किंमतीची ७२१० गाईचीं वासरें व रु. ११,८९,८७५ किंमतीचीं १५८६५ म्हशीचीं रेडकीं यांचें उत्पादन झालें. जळगांव, भुसावळसारख्या शहरांत दुधाचा खप मोठा असल्यानें तेथें जवळपासचे गांवांतून दुधदुभत्याचा धंदा जोरांत चालतो. चाळीसगांव येथें पाश्चराइझेशनचें प्लॅन्ट चालूं असून तेथून मुंबईला रोज पाश्चराइझ्ड दूध रवाना होते.

शेळ्या-मेंढ्या

या जिल्ह्यांत स्थानिक व निमारी–पाटणवाडी जातीच्या मेंढ्या आढळतात. मॅरिनो जातीशीं संकर झालेल्या शेळ्या–मेंढ्याहि पुष्कळ आढळतात. शेळ्या मेंढ्यांवर धनगरांची भिस्त असते व बकरीचें दूध गरीब शेतकऱ्याला मोलाचें वाटतें. लोंकर, कातडी व मांस यासाठीं धनगर शेळ्यामेंढ्या पाळतात. शेळ्यामेंढ्याचे कळप हे कमी खर्चात पाळतां येतात. जिकडे चराऊ रानें असतील व पाऊस कमी असेल तिकडे त्यांचे कळप जातात.

मेंढ्यापालन केंद्र

चाळीसगांव तालुक्यांत चाळीसगांवनजीक भिलाखेड येथें युद्धोत्तर पुनर्रचनेच्या योजनेखालीं १९४६–४७ सालापासून मेंढ्यापालन केंद्र सुरू करण्यांत आलें असून या केंद्राचा मुख्य उद्देश चांगली उंची लोंकर देणाऱ्या श्रेष्ठ जातीच्या बकऱ्यांच्या जाती निपजप्रयोग करून शोधून काढणें व त्या ग्रामीण भागांत पुरवून त्यांची पैदास वाढविणें हा आहे. या केंद्राचें क्षेत्र २६४ एकर असून त्यापैकीं ६० एकर, केंद्रावरील कळपांना चराऊ रानासाठीं राखून ठेवलें आहे. १९४६ सालीं ५३ बकऱ्यांपासून सुरुवात करून ही संख्या सध्यां ५२० पर्यंत वाढली आहे. दरवर्षी २० ते २५ बकरे पैदाशीसाठीं या केंद्रामार्फत मेंढ्यांचे कळप बाळगणारांना पुरविले. पहिल्या १२ वर्षांत असे २२८ बकरे देण्यांत आले. शिवाय नाशिक व धुळें या जिल्ह्यांतील बकऱ्यांचीहि पैदास सुधारावी म्हणून या केंद्रामार्फत बकरे पुरविले जातात.

मेंढ्यांचे कळप पाळणाऱ्या धनगरांना त्यांच्या मेंढ्यांची सुधारणा करण्यासाठीं पाटणवाडी जातीचे नर सवलतीच्या दरानें पशुसंवर्धन खात्यामार्फत पुरविले जातात. त्याचप्रमाणें त्यांना उत्तेजन देण्यासाठीं रु. १०० मदत देऊन तेवढीच रक्कम त्यांच्याकडून घेऊन त्या दोनशें रुपयांत जेवढ्या मेंढ्या व एक नर पुरवितां येतील तेवढ्या पुरवितात. भिलाखेडचे केंद्रामार्फतच पाटणवाडी नर व माद्या शेतकऱ्यांना व धनगरांना पुरविल्या जातात.

कोंबडी पालन

शेती विकासामध्यें व शेतकऱ्यांना उपयुक्त असा जोड धंदा म्हणून कोंबडीपालनाचें महत्त्व फार आहे. कोंबडीपालनाचे बाबतींत पैदाशीसाठीं सुधारलेल्या जातीचीं अंडीं व कोंबडे पुरविणें, आर्थिक मदत व कर्ज देणें, कोंबडीपालन केंद्रें सुरू करणें, कोंबडीपालनाचें शिक्षण देणें कोंबड्यांची व्यवस्था, निगा, आरोग्य, पोषण या बाबतींत तांत्रिक सल्ला देणें व कोंबड्यांचीं प्रदर्शनें भरविणें इ० योजना राज्यसरकारतर्फे सुरू आहेत.

जिल्ह्यांतील ज्या शेतकऱ्यांना दुय्यम धंदा म्हणून कोंबड्या पाळण्याचा धंदा करावयाचा असतो त्यांना त्यांच्या गांवठी कोंबड्यांमध्यें एक व्हाइट लेगहॉर्न जातीचा नर ठेवण्यासाठीं तो सवलतीचे दरानें सरकारकडून पुरविला जातो. शिवाय दरवर्षी यावल, रावेर व चोपडें या आदिवासी विभागांत ३० व्हाइट लेगहॉर्न जातीचे नर पुरविले जातात. कोंबड्या-पालनाचा धंदा करणाऱ्या होतकरू इसमास धंद्याला उत्तेजन देण्यासाठीं ५० रु. पासून ३०० रु.पर्यंत मदत खुराड्यासाठीं किंवा पक्षी विकत घेण्यासाठीं दिली जाते.

जळगांव येथें नुकतेंच एक कुक्कुट प्रात्यक्षिक व विस्तार केंद्र भारत सरकारच्या कुक्कुटविकास योजनेनुसार सुरू झालें आहे. येथें दरवर्षी १५ विद्यार्थ्यांना शिक्षण दिलें जाईल व हा शिक्षणवर्ग दीड महिना चालेल. शिक्षणकाळांत दरमहा रु. ३० शिष्यवृत्ति व नंतर धंद्यासाठीं रु. ५०० तगाई दिली जाईल.

पशुवर्धन केंद्रें

जिल्ह्यांत सरकारी पशुसंवर्धन केंद्र नाहीं. फक्त दोन निमसरकारी निमार पशुसंवर्धन केंद्रें असून त्यांपैकीं एक जामनेर तालुक्यांत गंगापुरी गांवाजवळ असून दुसरें जळगांव तालुक्यांत पिंपळे गांवाजवळ आहे. गिलीगन पशुसंवर्धन केंद्र, पिंपळें व गंगापुरी पशुसंवर्धन केंद्र, जामनेर अशीं त्यांचीं नांवें आहेत. दोन्ही केंद्रें त्या त्या तालुक्याच्या तालुका सुधारणा मंडळातर्फे चालविलीं जातात व सरकारतर्फे गंगापुरी केंद्राला रु. ३००० व पिंपळे केंद्राला रु. ९००० वार्षिक मदत दिली जाते. पिंपळे केंद्रावर १९५१ पासून कृत्रिम गर्भधारणा केंद्रहि चालविलें जात असून उत्तमपैकीं निमार जातीच्या बैलाच व सुरती जातीच्या रेड्याचें रेत या ठिकाणीं काढलें जातें व तें

त्या केंद्राच्या कक्षेतील १७ खेड्यांतून विनामूल्य पुरविलें जातें. एक पशुचिकित्सक व सात पशुपाल या योजनेंत काम करतात.

जिल्ह्यांत ३ खिलार जातीचीं व २ निमार जातीचीं जनावरांचीं पैदास केंद्रें असून प्रत्येक केंद्राखालीं ५ गांवें येतात. प्रत्येक गांवाला १० गायी व २ वळू पुरविले जातात. एका गायीमागें व एका वळूमागें रु. २०० सरकारकडून मदत मिळते.

पैदास केंद्रें

जिल्ह्यांत सध्यां एकूण ६ गोशाळा आहेत. पण त्यापैकीं फक्त एकच गोशाळा सरकारी योजनेखालीं आहे. सरकारी गोशाळा विकास योजनेप्रमाणें एखाद्या निवडक गोशाळेस वा पांजरपोळ संस्थेस सरकार स्वखर्चानें १० गायी व एक वळू पैदास सुधारण्यासाठीं देते. त्या संस्थेसहि तेवढ्याच गायी व बैल स्वखर्चानें घ्यावे लागतात. व या जनावरांच्या सहाय्यानें पांच वर्षें पर्यंत पैदास वाढविण्याचें काम त्या संस्थेस करावें लागतें. त्यासाठीं दरसाल सरकार रु. २००० अनुदान देतें. चोपडें येथील श्री गोवर्धन संस्था अशाप्रकारें चालली असून तेथें गीर जातीच्या गाईपासून पैदास होते.

गोशाला

जळगांव जिल्ह्यांत उन्हाळा सोडला तर उरलेले आठ महिने जनावरांना भरपूर चारा व पाणी मिळत असल्यामुळें जनावरांची परिस्थिति व आरोग्य चांगलें असतें. तथापि हवामानपरत्वें माणसाप्रमाणें जनावरांनाहि रोग होतात. पावसाळ्यांत घटसर्प, शेऱ्या, सरा हे रोग होत असून उन्हाळ्यांत देवी, लाळखुरा हे रोग होतात. रोग संसर्गजन्य असल्यानें आजारी जनावरांच्या संसर्गानें ते पसरतात. जनावरांचा देवी, माता किंवा बुळकांडी या रोगापासून बचाव करण्यासाठीं सार्वजनिक लस टोंचण्याची मोहीम जळगांव जिल्ह्यांत पशुवैद्यक खात्यानें भारत सरकारच्या मदतीनें १९६० मध्यें हातीं घेऊन पुरी केली. या देवीनिर्मूलन योजनेच्या मोहिमेंत जिल्ह्यांत एकूण ४,२१,७३० जनावरांना रोगप्रतिबंधक लस टोंचून त्यांना पुढील १४ वर्षें पर्यंत या रोगापासून मुक्त केलें आहे.

पशुरोग व पशुवैद्यक केंद्रें.

जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्याचे व महत्त्वाचे ठिकाणीं एक गुरांचा दवाखाना असून त्यावर एक पशुवैद्य असतो. येथें गुरांच्या रोगांवर उपचार केले जातात. त्याचप्रमाणें जिल्ह्यांतील प्रथमावस्था विकास गटांत प्रत्येकीं २ याप्रमाणें पशुवैद्यक प्रथमोपचार केंद्रें आहेत. त्या प्रत्येक केंद्रावर एक स्टॉकमन असतो. अशीं केंद्रें भुसावळ तालुक्यांत कुऱ्हे, वरणगांव, व बोधवड, एदलाबाद महालांत कुऱ्हेकाकोडे व अंतुर्ली, जामनेर तालुक्यांत शेंदूर्णी व फत्तेपूर, चोपडें तालुक्यांत हातेड व अडावद, चाळीसगांव तालुक्यांत मेहुणबारे व तळेगांव, अमळनेर तालुक्यांत वावडे व पातोंडे व भडगांव महालांत पिंपरखेडें याप्रमाणें १४ ठिकाणीं आहेत.

या जिल्ह्यांत गांवठी जातीचे बैल, गायी, म्हशी, घोडे हीं जनावरें व खिलार व निमार जातीचे वळू व सुरती म्हशी निरनिराळ्या ठिकाणीं भरणाऱ्या बाजारांत विकलीं जातात. असे बाजार जिल्ह्यांत एकूण १० गांवीं भरतात. चाळीसगांव व जळगांव येथें दर शनिवारीं, सावदें येथें व चोपडें येथें दर रविवारीं, जामठी, वरणगांव व नेरी येथें दर मंगळवारीं, धरणगांव व वरखेडी येथें दर गुरुवारीं, रावेर येथें दर शुक्रवारीं याप्रमाणें बाजारचे दिवस ठरलेले आहेत.

जनांवरांचें बाजार

१९५६–५७ मध्यें या जिल्ह्यांत बागायतीच्या जमिनीचें क्षेत्र एकूण ८८,७०४ एकर होतें. त्यांपैकीं २२,००८ एकर क्षेत्र हें वर्षांतून दुबार बागायतीखालीं होतें. याचा अर्थ बागायत जमीन फक्त ६६,६९६ एकरच होती. एकूण पिकाखालील जमिनीच्या तुलनेनें बागायत क्षेत्राचें प्रमाण ३.७५ एवढेंच पडतें. वरींच वर्षें या जिल्ह्यांत जवळ–जवळ हेंच प्रमाण आहे. १९५९–६० सालांत एकूण बागायतीखालील जमिनीचें क्षेत्र ९२,२९३ एकर होतें. त्यापैकीं दुबार पिकाखालील क्षेत्र ८५६१ एकर होतें याचा अर्थ बागायतीच्या १,००,८५४ एकर क्षेत्रांतून पिकें निघालीं. १९५९–६० मध्यें एकूण पिकें निघालेलें क्षेत्र २१,४४,४५३ एकर होतें. याचा अर्थ बागायत पिकांचें क्षेत्र सुमारें ४.५० टक्के पडतें. यापैकीं धान्य पिकाखालील क्षेत्र ९०,८९३ एकर व बिगर धान्यपिकाखालील क्षेत्र ९९६१ एकर होतें. याचा अर्थ ९० टक्के बागायत जमीन धान्य पिकाखालीं व १० टक्के बिगर धान्यपिकाखालीं होती. यावल, रावेर, चाळीसगांव, अमळनेर, पाचोरें, एरंडोल, पारोळें, भडगांव व भुसावळ या तालुक्यांत प्रत्येकीं ७ हजारापासून १३ हजारापर्यंत क्षेत्र बागायतीचें होतें तर चोपडें, एदलाबाद, जळगांव व जामनेर या तालुक्यांतील बागायत क्षेत्र दीड हजार ते साडेतीन हजारापर्यंत आढळतें. ५५ टक्के साळ व ४० टक्के गहूं बागायतीखालीं होता.

पाणीपुरवठा व बागायत क्षेत्र

जिल्ह्यांत १९५९–६० सालांत शेतीच्या विहिरी एकूण ३६०५४ होत्या. त्यांपैकीं ३३१३७ दगडी बांधकामाच्या व फक्त २९१७ बिनदगडाच्या बांधलेल्या अशा होत्या. विहिर बागायतीचें क्षेत्र ८७३२६ एकर होतें याचा अर्थ जवळजवळ ९५ टक्के बागायत ही विहिरीच्या पाण्यावर झाली. १९५९–६० मध्यें एकूण ऑइल इंजिनांची संख्या ३१११ होती. ही संख्या झपाटयानें वाढत आहे. विकासगट, भूतारण बँका व महसूल खात्यामार्फत विहिरीइंजिनासाठीं मिळत असलेल्या तगाईमुळें नव्या विहिरी खोदल्या जात आहेत. विहिरींवर इंजिनपंप बसविले जात आहेत. विहिर-बागायत हें या जिल्ह्याचें एक खास वैशिष्ठ्य आहे.

विहिर बागायत

या जिल्ह्यांत हरताळे, म्हसवें व वेल्हाळे हे तीनच तलाव शेतीच्या उपयोगी आहेत. **हरताळें तलाव** हा एदलाबादपासून चार मैलांवर फार पूर्व काळांत बांधलेला आहे व तो महसूल खात्याचे देखरेखीखालीं आहे. १२०० फूट लांबीचा मातीचा भराव घालून हा तलाव बांधला आहे. या तलावाखालीं भिजूं शकणारी जमीन सुमारें ४१५ एकर असून १९५९-६० मध्यें त्यापैकीं फक्त ११५ एकर जमीनच भिजविली जात होती. खरीप हंगामासाठीं एकरीं रु. ६, रब्बी हंगामासाठीं रु.८ व उन्हाळी पिकांसाठीं रु.१२ अशी पाणीपट्टी आकारली जाते. पारोळ्या जवळ **म्हसवे** गांवांत १८८७ मध्यें रु. १,४०,९३० खर्च करून हा दुसरा तलाव बांधला. १४०४ फूट लांबीचा मातीचा भराव असूनजास्तींतजास्त उंची ४४ फूट आहे. त्याला दोन पाट काढले असून ते प्रत्येकीं साडेतीन मैल लांब आहेत.या तलावाखालीं भिजण्यालायक क्षेत्र ४०७५ एकर असून दरसाल सुमारें ५०० एकर क्षेत्राला शेतकरी पाणी घेतात. पाण्याचे दर वरीलप्रमाणेंच आहेत. तिसरा **वेल्हाळे तलाव** हा भुसावळ तालुक्यांत असून तो १९५३ ते १९५५ या काळांत ७,८५,७३६ रु. खर्च करून बांधण्यांत आला. याचा १००० फुटाचा मातीचा भराव असून जास्तींत जास्त उंची ५३.२५ फूट आहे. याच्या पाटाची लांबी ४ मैल ६ फर्लांग असून १४७० एकर क्षेत्र भिजण्यालायक आहे. तथापि १९५९–६० सालांत या तलावाखालीं भिजलेली जमीन ३०३ एकरच होती. या तलावाचे पाण्याचे दरहि वरीलप्रमाणेंच आहेत.

तलाव

जामदा बंधारा हेंच सध्यां या जिल्ह्यांतलें मध्यम पाणीपुरवठ्याचें एक काम आहे. १८६३ ते ८७ काळांत रु. १०,८८,६६१ खर्च करून हा बंधारा व पाट बांधले. जामदे ता. चाळीसगांव या गांवाजवळच गिरणा नदीच्या पात्रावर १२ फूट उंच व १५४० फूट लांब असा बंधारा बांधलेला आहे. या बंधाऱ्याच्या पाटांची पुनर्रचना १९५३ ते ५७ या काळांत ९,८६,३४० रु. खर्च करून करण्यांत आली. या बंधाऱ्याचा

जामदा कॅनॉल

डाव्या तटाचा पाट २७ मैल व उजव्या तटाचा पाट १९ मैल आहे. चाळीसगांव व भडगांव या तालुक्यांतील गांवांस याचा विशेष फायदा होतो. या कॅनॉलखालीं भिजूं शकणारें क्षेत्र २४००० एकर असलें तरी प्रत्यक्षांत १९५६-५७ मध्यें ६७२२ एकरांनाच पाणीं घेतलें गेलें. पाण्याचे दरहि वरीलप्रमाणेंच आहेत. एकदांच पाण्याची पाळी हवी असल्यास एकरीं रु. ३ व रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठीं तत्पूर्वी पाणी द्यावयाचे झाल्यास रु. ८ याप्रमाणें पाणीपट्टी आकारली जाते.

या जिल्ह्यांत इतर पाणीपुरवठ्याचीं साधनें म्हणजे छोटे बंधारे हेच होत. १९५१ सालापूर्वी या जिल्ह्यांत असे फक्त ३ च बंधारे होते. चाळीसगांव तालुक्यांत तितुर नदीवर पालोंडे येथें बंधारा असून त्याखालीं भिजूं शकणारें क्षेत्र १५० एकर व प्रत्यक्ष भिजणारें क्षेत्र १३० एकर होतें, तर अमळनेर तालुक्यांत बोरी नदीवरील फापोरे बंधाऱ्याखालीं भिजूं शकणारें क्षेत्र ३५० एकर असून तें सर्व भिजत असे. त्यानंतर पहिल्या दुसऱ्या योजनेंत पुढील बंधारे बांधून झाले.

छोटे बंधारे

पंचवार्षिक योजनेंत बांधलेले बंधारे

	बंधाऱ्याचे नांव, गांव व तालुका	भिजूं शकणारें क्षेत्र	भिजणारे क्षेत्र
१	पाचोरें तालुक्यांतील नगरदेवळे येथील तितुर नदीवरील बंधारा	३००० एकर	५८९ एकर
२	चाळीसगांव तालुक्यांतील तांबोळे जवळील तितुर नदीवरील बंधारा	६०० एकर	३०० एकर
३	चाळीसगांव तालुक्यांतील शिरसगांवाजवळील धामण नदीवरील बंधारा	५०० एकर	१०९ "
४	चाळीसगांव तालुक्यांतील उंबरखेडचाजवळील कोरडे नाल्यावरील बंधारा ...	२०० एकर	२५ "
५	चाळीसगांव तालुक्यांतील पिंपरी खुर्दजवळील बेली नाल्यावरील बंधारा	२०० एकर	१०० "
६	चाळीसगांव तालुक्यांतील धुळें–औरंगाबाद रस्त्यावरील ३२ मैल १ फर्लांगातील नाल्यावरचा बंधारा	१२ एकर	१२ "
७	यावल तालुक्यांतील वाघोदेजवळील भोनक नाल्यावरील बंधारा	७६० एकर	८५ एकर
८	जळगांव तालुक्यांतील मन्यारखेडे येथील हातेड नाल्यावरील बंधारा	२०० एकर	१९ एकर

याशिवाय पाचोरें तालुक्यांतील पिंपळगांव हरेश्वर येथील बहुला नदीवरील बंधारा, रावेर तालुक्यांतील होळ येथील नलिका विहिर व यावल तालुक्यांतील राजोरे येथील नलिका विहीर हीं कामें चालू असून या तिन्ही कामांचा एकूण खर्च २ लक्ष ४३ हजार असून तीं पूर्ण झाल्यावर एकूण सुमारें १५०० एकर क्षेत्र त्यांच्याखालीं भिजूं शकेल.

मुंबई कूळवहिवाट व शेतजमिनीच्या कायद्यानुसार जळगांव जिल्ह्यांत पुढील माहिती दृष्टोत्पत्तीस येते.

कूळकायद्याचे दृष्टीकोनांतून जळगांव जिल्हा

क्र.	तपशील	संख्या	त्यांचेकडे असलेली जमीन (एकर) मालक म्हणून	कूळ म्हणून
१	किफायतशीर क्षेत्रपरिमाणापेक्षां (१६ एकरापेक्षां) कमी जमीन धारण करणारे जमीन मालक	१६८३४३	८९०५६७	१२३७७८
२	किफायतशीर क्षेत्रपरिमाणाइतकें (१६ एकर) क्षेत्र धारण करणारे	७३	१०३१	१३७
३	किफायतशीर क्षेत्रपरिमाणापेक्षां जास्त पण कमाल मर्यादेपेक्षां (४८ एकर) कमी जमीन धारण करणारे.	३०९४२	६२२०१०	१२१७४३
४	कमाल मर्यादेइतकें (४८ एकर) क्षेत्र धारण करणारे	४	१९२	--
५	कमाल मर्यादेपेक्षां जास्त पण मर्यादेच्या दुपटीपेक्षां कमी जमीन धारण करणारे	२३६७	१२५६७०	१६८३९
६	कमाल मर्यादेच्या दुपटीपेक्षां जास्त व तिपटीपेक्षां कमी जमीन धारण करणारे.	१८१	१९२८५	१५२६
७	कमाल मर्यादेच्या तिपटीपेक्षां जास्त व चौपटीपेक्षां कमी जमीन धारण करणारे	३१	४४३०	५२४
८	कमाल मर्यादेच्या चौपटीपेक्षां जास्त व पांचपटीपेक्षां कमी जमीन धारण करणारे	१८	३५४२	१९०
९	कमाल मर्यादेच्या पांच पटीपेक्षां (२४० एकरांपेक्षां) जास्त जमीन धारण करणारे	२५	७९५६	३१३

कुळें

क्र.	कुळांचा प्रकार	कुळांची संख्या	कुळांच्याकडील जमीन (एकर) मालक म्हणून:—	कूळ म्हणून
१	कायमकुळें	१११	—	२६६ एकर
२	अधिकृत पोटकुळें	७	—	१६ "
३	इतर कुळें	२९०२०	२,०८,१९०	२६५०५२ "

याशिवाय जिल्ह्यांत अज्ञान, विधवा, सशस्त्र दलांतील सैनिक, शारीरिक दृष्टचा असमर्थ असलेले, मानसिकदृष्टचा असमर्थ असलेले असे एकूण १७१५७ लोक असून त्यांच्याकडे मालक म्हणून एकूण १,२८,३४७ एकर जमीन व कूळ म्हणून ८,८१६ एकर आहे. यांत अज्ञान व विधवा यांचीच संख्या जास्त आहे. अज्ञान ९२२३ व विधवा ७८४३ आहेत. इतर फक्त ९१ आहेत. नव्या कुळकायद्याचे ३४ व्या कलमाखालीं जिल्ह्याधिकाऱ्यांकडे विल्हेवाटीसाठीं आलेल्या जमिनीचीं फक्त १६४ प्रकरणें असून यांत जमीन मालकांची ५,७०६ एकर जमीन व कुळांची ४५० एकर जमीन आहे.

शैक्षणिक सुखसोयी



माल
रावेर
चोपडे
हातेड
चावडी
अडावद
साठोद
चिंचोली
हिंगोने
न्हावी
खिरोदे
चिनावल
भालोद
फैजपूर
आवळ
सावदे
खिर्डी
सांगवी
बाम्हणोदे
मस्कावद
पाडळसे
थोरगव्हाण
अंमळगांव
पातोंडे
नांदेड
भोकर
कानळदे
सांडळे
अमळनेर
साळवे
आसोदे
सादली
भुसावळ
एदलाबाद
साकरी
वरणगांव
जळगांव
धरणगांव
पाळधी
नशिराबाद
वराड
किन्ही
कुऱ्हे
बोदवड
एरंडोल
बहादरपूर
पारोळे
म्हसावद
नेरी
जामनेर
सामनेर
नाचनखेडा
पाळधी
पहूर
शेंदुर्णी
भडगांव
पाचोरा
वाकद
खेडगांव
कजगांव
नगरदेवळे
पिंपळगांव
ब्राह्मणशेवगे
उंबरखेडे
वाघळी
चाळिसगांव
शिरसगांव
तळेगांव
तपशील
जिल्हा वाचनालय
महाविद्यालयें
माध्यमिक शाळा
पॉलिटेक्नीक
प्राथमिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेज
इंडस्ट्रियल टेक्नीकल इन्स्टिट्यूट
तांत्रीक शिक्षण शाळा
तालुका वाचनालयें
आश्रमशाळा
जीवन क्रीडामंडळ

शिक्षण - विस्तार

जळगांव जिल्ह्यांतील एकूण १,४५३ गांवापैकीं १,३९५ गांवात प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करण्यांत आली असून अत्यंत अंतर्गत भागांतील विरळ वा अत्यंत कमी लोकवस्तीच्या फक्त ५८ गांवांनाच प्राथमिक शिक्षणाचा लाभ झालेला नाहीं. या शाळाविरहित गांवीं पुरेशी विद्यार्थी संख्याहि उपलब्ध नाहीं. तृतीय पंचवार्षिक योजनेंत यापैकीं कांहीं गांवांत शाळा सुरू होण्याची शक्यता आहे. या शाळारहित गांवांची लोकसंख्या एकूण सुमारें ४ हजारच आहे. म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या प्रमाणांत शाळा-विरहित लोकसंख्या फक्त .००३ एवढीच पडते. ५०० पेक्षां अधिक लोकसंख्येच्या गांवीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेखालीं शाळा निघाल्या आहेत. २५० ते ५०० लोकसंख्येच्या गांवीं स्वतंत्र व्हॉलंटरी शाळा, गटशाळा वा फिरत्या शाळांची सोय आहे.

प्राथमिक शिक्षण

जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था जिल्हा व कांहीं म्युनिसिपल शिक्षण मंडळांकडे सोंपविली आहे. जिल्ह्यांत सबंध जिल्ह्यासाठीं एक व जळगांव आणि अंमळनेर येथील म्युनिसिपल क्षेत्रासाठीं प्रत्येकीं एकेक अशीं तीन शिक्षणमंडळें प्राथमिक शिक्षणाचें काम करीत आहेत. प्राथमिक शिक्षण मंडळांत बारा ते सोळा सदस्य असतात. सदर सदस्यांची निवड जिल्हा लोकल बोर्डाच्या व म्युनिसि-पालिटीच्या सभासदांतर्फे होते. जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळांत व म्युनिसि-पल प्राथमिक शिक्षण मंडळांत दोन सरकारनियुक्त सभासद असतात. सरकारी शिक्षणविषयक धोरण अंमलांत आणण्याचें दृष्टीनें शासनाधिकाऱ्यांना या मंडळाची मदत, होते. प्राथमिक शिक्षण मंडळाचे शासनाधिकारी हे सरकारी अधिकारी असून ते जिल्हा शिक्षणाधिकारी यांना जबाबदार असतात व मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा क्रमांक ४८ याचें कक्षेंत राहून प्राथमिक शिक्षण मंडळाचे मदतीनें शिक्षणविषयक सरकारी धोरण अंमलांत आणतात.

प्राथमिक शिक्षण मंडळें

वरील तीनहि प्राथमिक शिक्षण मंडळाच्या देखरेखीखालीं जिल्ह्यांत एकंदर १,४०६ शाळा चालविल्या जातात. त्यापैकीं १,२४८ मुलांच्या व १५८ मुलींच्या शाळा आहेत. जिल्ह्यांतील एकूण १,४०६ शाळांपैकीं मराठी माध्यमाच्या –१,२६८, हिंदी–६ उर्दू–१२०, सिंधी–६, व गुजराती ७ अशा वेगवेगळ्या माध्यमाच्या शाळा आहेत. गेल्या शैक्षणिक वर्षांत (१९५९-६०) ह्या जिल्ह्यांतील सर्व प्राथमिक शाळांतून १,४५,७२७ मुलें व ८३,५६६ मुली असे एकूण २,२९,२८३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शाळेंत जाणाऱ्या मुलांचें प्रमाण एकूण लोकसंख्येच्या शेंकडा १५ असतें,

प्राथमिक शिक्षण संस्था

असें सर्वसाधारण मानलें जातें. त्या प्रमाणास अनुसरून जिल्ह्यांतील प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या मुलांचें शेंकडा प्रमाण १६.५ पडतें.

वर नमूद केलेल्या प्राथमिक शाळांतून एकंदर ५,४०१ प्राथमिक शिक्षक काम करीत असून त्यापैकीं ४,६०५ पुरुष शिक्षक व ७९६ स्त्री-शिक्षिका आहेत. शिक्षणाचा दर्जा प्रशिक्षित (ट्रेंड) शिक्षकांवर अवलंबून असतो. प्रशिक्षित शिक्षकांचें प्रमाण जितकें जास्त तितका शिक्षणाचा दर्जा अधिक उंच. या दृष्टीनें पाहिलें असतां या जिल्ह्यांत एकूण ५,४०१ शिक्षकांपैकीं ४,९०४ शिक्षक प्रशिक्षित असून फक्त ४९७ शिक्षक अन्-ट्रेंड आहेत. म्हणजे या जिल्ह्यांतील ट्रेन्ड शिक्षकांचें प्रमाण ९०.७ इतकें पडतें.

प्रशिक्षित शिक्षक

प्राथमिक शिक्षण मंडळाच्या शाळांचें जीवनशिक्षण शाळांमध्यें झपाट्यानें रूपांतर होत असून ती योजना हातीं घेतांना प्रथम १९३९ सालीं पारोळें तालुक्यांतून कांहीं भाग (११शाळा) व १९४६ सालीं खिरोदा ता० रावेराच्या आसपासचा भाग (७ शाळा) हें मर्यादित क्षेत्र निवडलें होतें व ह्या क्षेत्रांतील सर्व शाळांना मूलोद्योग शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली होती. आतां ह्या जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षण मंडळाच्या ४०६ जीवन शिक्षण शाळा असून त्यांपैकीं ३४४ शाळांमध्यें सूतकाम - विणकाम हा मूलोद्योग आहे. जीवन शिक्षण शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीं संख्या १,००,८८१ आहे.

जीवन-शिक्षण

जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या मालकीच्या शाळेच्या ५६७ इमारती असून शिवाय ६१० इमारती भाड्यानें घेतलेल्या आहेत व याशिवाय ९९४ इमारती ह्या जनतेनें विनामूल्य दिल्या आहेत. प्राथमिक शिक्षण मंडळाच्या मालकीच्या जास्तींतजास्त इमारती उभारण्यासाठीं गांवकऱ्यांना जमीन व प्रत्येक खोलीमागें येणाऱ्या खर्चाचा शें० ४० टक्के खर्च द्यावा लागतो. गांवठाणांतील जमीन जिल्हाधिकारी महाशयांचें मार्फतहि मिळवितां येते. ह्या योजनेचा लोकांना फायदा घेतां यावा यासाठीं जिल्हा शाळागृह बांधकाम समिती ही संस्था परिश्रमपूर्वक काम करीत असून १९५०-५१ सालापासून २५२ खोल्या बांधल्या गेल्या आहेत. शिवाय ५०३ खोल्यांचें काम स्वस्त किंमतीच्या योजनेखालीं निरनिराळ्या खेडेगांवीं तयार झालें आहे.

शाळागृहें

जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. का. स. पाटील ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं ह्या संस्थेनें शिक्षकांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं १९ फिरत्या ढालींची योजना आंखली आहे. प्राथमिक शालान्त परीक्षेंत जिल्ह्यांत सर्वप्रथम येणाऱ्या शाळेसाठीं एक फिरती ढाल ठेवण्यांत आली असून प्रत्येक तालुक्यांतून एक फिरती ढाल ठेवण्यांत आली आहे. शिवाय प्रत्येक प्रकारच्या उत्कृष्ट शाळांसाठीं एक याप्रमाणें ५ फिरत्या ढाली ठेवलेल्या आहेत. या फिरत्या ढाली ठेवण्यासाठीं जनतेचें सहकार्य मिळत असून ढाली विकत घेण्यासाठीं पैसाहि शिक्षणप्रेमी देत आहेत.

फिरत्या ढाली

मुलांची सर्वांगीण उन्नति होण्यासाठीं ह्या जिल्ह्यांतील शाळांतून बालवीर चळवळ हातीं घेण्यांत आली. हल्लीं जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या शाळांतून ६२ बालवीर पथकें (५७ मुलांचीं व ५ मुलींचीं) असून अधिकाधिक पथकें काढण्याबद्दल उत्तेजन दिलें जात आहे.

बालवीर पथकें

नाटचस्पर्धा

प्राथमिक शाळांत शिकत असलेल्या लहान बालकांच्या अभिजात कलेस लहानपणापासून उत्तेजन मिळावें व विद्यार्थ्यांचें अभिजात नाटचकौशल्य प्रकट होण्यास वाव मिळावा म्हणून सरकारनें १९५४ पासून प्राथमिक नाटचस्पर्धा घेण्याचा कार्यक्रम सुरू केला. दरवर्षी अधिकाधिक शाळा नाटचस्पर्धेमध्यें भाग घेत असतात. अभिनय कलेच्या अभ्यासक्रमासाठीं पुणें येथें ६ शिक्षक पाठविण्यांत आले होते.

शारीरिक शिक्षण

बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासहि योग्य प्रमाणांत होणें जरूर आहे. त्यादृष्टीनें शारीरिक शिक्षणाकडेहि योग्य लक्ष पुरविलें जातें. जिल्ह्यांतील एकूण शिक्षकांपैकीं ७६९ शिक्षक शारीरिक शिक्षण कोर्समध्यें शिक्षण घेतलेले आहेत. शिवाय दरवर्षी शारीरिक शिक्षण कोर्स काढण्यांत येत असतात व त्यांतून कांहीं शिक्षक ट्रेन्ड होत असतात. विद्यार्थ्यांमध्यें शारीरिक शिक्षणाची व खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून निरनिराळ्या उत्सव प्रसंगीं सामने ठेवले जातात.

सी. पी. एड्. कोर्स

चालू १९६०-६१ सालांत जूनपासून जळगांव येथें मराठा विद्याप्रसारक सहकारी समाजातर्फे, नूतन मराठा विद्यालयांत सर्टिफिकेट ऑफ फिजिकल एज्युकेशन हा ९ महिन्यांचा कोर्स सुरू करण्यांत आला असून तेथें दरवर्षी ४० शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या माध्यमिक शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचे तात्त्विक व प्रात्यक्षिक शिक्षण दिलें जात आहे.

शैक्षणिक खर्च

जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाचा खर्च बराच मोठा आहे. जिल्हा शिक्षण मंडळ आणि जळगांव व अंमळनेर येथील म्युनिसिपल शिक्षण मंडळ या तीनहि संस्थांचा वार्षिक खर्च ७५,६३,२८१ रु० आहे. जिल्हा शिक्षण मंडळाचा बहुतेक सर्व खर्च सरकार-मार्फत केला जातो. जळगांव, अमळनेर, येथील म्युनिसिपल शिक्षण मंडळाच्या खर्चांपैकीं अनुक्रमें १,६५,३०४ व १,२०,५४१ रु० इतका खर्च सरकारी तिजोरींतून दिला जातो. व बाकीचा खर्च म्युनिसिपल शिक्षण मंडळांना त्या त्या नगरपालिकां-कडून मिळतो.

प्रशिक्षणसंस्था

जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण शास्त्राचें प्रशिक्षण देण्याचे दृष्टीनें या जिल्ह्यांत ४ प्रशिक्षण संस्था (ट्रेनिंग कॉलेजेस) स्थापन झालेल्या आहेत. या चार संस्थांपैकीं एक संस्था निव्वळ स्त्रियांसाठीं जळगांव येथें असून तीन पुरुषांकरितां आहेत. त्यापैकीं दोन कॉलेजें जळगांव येथें असून त्यापैकीं एक सरकारी व एक खाजगी आहे. उरलेलें एक कॉलेज जनता शिक्षण मंडळातर्फे चालविलें जात असून तें फक्त पुरुषांकरितां आहे. ह्या कॉलेजां-मधून सूतकाम, विणकाम, बागकाम आणि शेतीकाम ह्या मूलोद्योगाबरोबरच शालेय विषयांचें शिक्षण दिलें जातें. ह्या चारहि कॉलेजांमधून प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या ४७३ इतकी आहे. वरील चार कॉलेजांपैकीं पुरुषांचें एक कॉलेज सरकारनें चालविलें असून बाकीचीं तीन खाजगी संस्थांनीं चालविलेलीं आहेत. या संस्थांचा वार्षिक खर्च १,२५,९४९ रुपये असून त्यापैकीं सरकारी मदतीचा वाटा रु० ९४,७०९ आहे.

जिल्ह्यांतील प्राथमिक शाळांमधून पांच वर्षे वयाच्या बालकांना प्रवेश दिला जातो. परंतु बालकांचें शिक्षण तीन वर्षांनंतरहि पूर्व प्राथमिक शाळेंतून सुरूं करतां येतें. हें शिक्षण शास्त्राचें तंत्र जिल्ह्यांतील शैक्षणिक कार्यकर्ते विसरले नाहींत. जिल्ह्यांतील लहान मोठ्या शहरांत निरनिराळ्या शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यामार्फत बालक मंदिरें चालविलीं जातात. या बालक मंदिरांतून तीन वर्षे वयावरील मुलांना माफक फी घेऊन मॉंटेसरी पद्धतीनें पूर्वप्राथमिक शिक्षण दिलें जातें. अशीं १५ बालक मंदिरें जिल्ह्यांत चालतात

पूर्व प्राथमिक शाळा (बालक मंदिरें)

जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतून विकास गटांची योजना सुरूं झाली आहे. या योजनेंतून खेड्यापाड्यांतील बालक मंदिरांना सरकारी मदत मिळण्याची व्यवस्था असल्यामुळें अनेक खेड्यांतून बालक मंदिरें निघूं लागलीं आहेत.

माध्यमिक शिक्षण

सन १९५९-६० ह्या वर्षी जिल्ह्यांतील निरनिराळ्या ५५ गांवांतून मुलांमुलींसाठीं ७२ दुय्यम शाळा चालू होत्या. त्यापैकीं चार शाळा निव्वळ मुलींकरितांच दुय्यम शिक्षण देण्याचें कार्य करीत आहेत. जिल्ह्यांतील या दुय्यम शिक्षण संस्थांतून एकंदर २२,७५६ मुलें व ४,१९० मुली शिक्षण घेत आहेत. दुय्यम शिक्षण शाळांमधून काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या ९६६ आहे. जिल्ह्यांतील दुय्यम शिक्षण शाळांची संख्या दरवर्षीं वाढतच असते. चालू शालेय वर्षांत १५ नवीन शाळा निघालेल्या आहेत. अशा जिल्ह्यांत १९६०-६१ सालीं एकूण ८७माध्यमिक शाळा आहेत. जि ल्ह्यांतील माध्यमिक शिक्षण संस्थांत जळगांव, अंमळनेर, चाळीसगांव, भालोद, भुसावळ व चोपडा इ० शहरांतील शाळा बऱ्याच जुन्या असून त्यांतील शिक्षणाचा दर्जा सुद्धां चांगला आहे.

शिक्षण संस्था

जिल्ह्यांतील सर्व माध्यमिक शाळांचा वार्षिक खर्च बराच मोठा म्हणजे रु० २६,४४,०३६ इतका असून त्यापैकीं १०,१३,१९२ रु० इतका माध्यमिक शाळांना दिल्या जाणाऱ्या सरकारी मदतीचा वांटा असतो.

आर्थिक दृष्ट्या ज्यांची परिस्थिति हलाखीची आहे व ज्यांना मुलांच्या शिक्षणासाठीं (फी साठीं) खर्च करण्याची ऐपत नाहीं, अशा पालकांच्या मुलांना माध्यमिक शाळेंत फीमाफी मिळावी या हेतूनें सरकारनें गेल्या वर्षापासून ठराव केला आहे. त्या ठरावाप्रमाणें १९५९-६० या वर्षांत सालीना ९०० रु० अगर त्यापेक्षां कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना फीमाफी देण्यांत आली आहे. सन १९५९-६० या शालेय वर्षांत जिल्ह्यांतील आर्थिक दृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांच्या फीमाफीसाठीं मदत म्हणून सरकारला ५,६५,६६७ रु० इतकी रक्कम द्यावी लागली आहे. चालू शालेय वर्षांत (१९६० ६१) फीमाफी बाबतची ही अट सालीना ९०० रुपयांवरून १,२०० रुपयांपर्यंत नेली आहे.

शिक्षणखर्च व मदत

खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीनें जळगांव येथें चालविलेलें मुळजी जेठा कॉलेज व खानदेश एज्युकेशन सोसायटीनें अमळनेर येथें चालविलेलें प्रताप कॉलेज अशीं दोन महाविद्यालयें या जिल्ह्यांत चालू असून आणखी दोन महाविद्यालयें जिल्ह्यांत फैजपूर व चाळीसगांव येथें १९६१ मध्यें चालूं झाली.

महाविद्यालयें

खानदेश विभागासाठीं जळगांव येथें १९५९ च्या डिसेंबरपासून "१८ महाराष्ट्र बटालियन एन्. सी. सी." ची कचेरी सुरू झाली असून तिच्या कार्यक्षेत्रांत या जिल्ह्यांतील जळगांव व अमळनेर येथील महाविद्यालयें व धुळें येथील महाविद्यालय यांचा समावेश होतो.

एन्.सी.सी. व ए.सी.सी.

जून १९६० या शैक्षणिक वर्षापासून ही संस्था जळगांव येथें सुरू झाली असून तेथें सध्यां "डिप्लोमा इन् सिव्हिल इंजिनियरिंग" हा कोर्स सुरू आहे व त्यांत सध्यां ६० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १९६१ जूनपासून डिप्लोमा इन् मेकॅनिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग हे राहिलेले दोन्हीहि कोर्स सुरू झाले आहेत.

पॉलिटेक्निक

पॉलिटेक्निकच्या स्वतंत्र इमारतीसाठीं ४० एकर जागा घेतली असून सुमारें १६ लाख रुपयांची इमारत सरकारी खर्चानें बांधली जाणार आहे.

औद्योगिक शिक्षण

जिल्ह्यांत अशी संस्था जळगांव येथील गव्हर्नमेंट टेक्निकल हायस्कूल मध्यें चालू असून त्यांत ड्राफ्टस्मन, इलेक्ट्रिशियन, टर्नर, फिटर, कार्पेन्टर्स व वेल्डर असे सहा कोर्स प्रत्येकी दीड वर्षाचे सुरू असून त्यांत ९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याहि संस्थेच्या यंत्रसामुग्री साठीं व स्वतंत्र इमारतीसाठीं सरकारनें १९ लक्ष ७४ हजार रु० तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मंजूर केले आहेत. या संस्थेच्या खर्चांत मध्य वर्ती सरकार ६० टक्के व राज्य सरकार ४० टक्के वांटा उचलणार आहे. येथें मोफत शिक्षण व वैद्यकीय मदत मिळते व वर्कशॉपमध्यें काम करतांना वर्कशॉपचा पोशाख दिला जातो. ⅓ विद्यार्थ्यांना दरमहा रु० २५ विद्यावेतन दिलें जातें. वसती-गृह तयार झाल्यावर सुमारें ५० टक्के विद्यार्थ्यांना तेथें प्रवेश मिळेल.

गव्हर्न्मेंट टेक्निकल हायस्कूल

जिल्ह्यांत अशा शाळा दोन असून एक जळगांव येथें व दुसरी भुसावळ येथें आहे. दोन्ही शाळांत ८ वी पासून ११ वी पर्यंतचें इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियरिंग, वर्कशॉप टेक्नॉलॉजी व टेक्निकल ड्रॉईंग हे विषय शिकविले जातात.

जळगांव येथील हायस्कूलमध्यें ८ ते ११ वी पर्यंतचे २९१ विद्यार्थी व भुसावळ येथील हायस्कूलमध्यें २९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. धंदेशिक्षण शाळेच्या विभागांत इतरां-साठीं ६ महिन्यांचा वायरमनचा कोर्स ,१ वर्षाचा इलेक्ट्रिशियन व २ वर्षाचा कार्पेन्टरीचा ए कोर्स सुरू असून सध्यां त्यांत एकूण ७१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याचप्रमाणें भुसावळ येथील हायस्कूलमध्यें वायरमन ॲप्रेन्टिस व इलेक्ट्रिशियन या कोर्सची सोय आहे. या कोर्समध्यें सध्यां ६१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

जिल्ह्यांत जळगांव येथें जी. एस्. हायस्कूल ही सरकारी संस्था कॉमर्स विषयाचें शिक्षण इयत्ता ८वी ते ११वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देत आहे. सदर शिक्षणाचा लाभ एकूण सुमारें ११ विद्यार्थ्यांना होत असून तेथें बुक-कीपिंग, अकौंटन्सी व टाईपरायटिंग इ० चें शिक्षण देण्यांत येतें.

शॉर्टहॅन्ड व टाईपरार्यटिंग क्लासेस

सरकारनें मान्यता दिलेल्या अशा ९ संस्था जिल्ह्यांत चालूं असून त्यांचा सुमारें ५०० मुलें-मुली फायदा घेतात. लहान प्रमाणावर चामडें कमविण्याचें तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळा भुसावळ व खिरोदा या ठिकाणीं अस्तित्वांत आहेत.

वाचनालय

जळगांव येथें वालजी वाचनालय हें जिल्हा वाचनालय असून जिल्ह्यांत ९ शहरांत नगरवाचनालयांची सोय आहे. सर्व तालुक्यांत तालका वाचनालयें आहेत, तीं खालीलप्रमाणें :—

	ठिकाण.		वाचनालयाचें नांव
१	यावल	. .	श्री. नारायण मार्तंड सार्वजनिक वाचनालय.
२	रावेरा	. .	राजे रघुनाथराव देशमुख वाचनालय.
३	भुसावळ	. .	सार्वजनिक वाचनालय.
४	अमळनेर	. .	व्हिक्टोरिया ज्युबिली लायब्ररी.
५	चोपडा	. .	नगर वाचन मंदिर.
६	एरंडोल	. .	नगर वाचनालय.
७	चाळीसगांव	. .	शेट नारायणबंकट वाचनालय.
८	जामनेर	. .	जैन ओसवाल भागिरथीबाई वाचनालय.
९	पारोळा	. .	म्युनिसिपल लायब्ररी.
१०	नगरदेवळे (पाचोरे तालुका)	.	श्री लक्ष्मीबाई पवार वाचनालय.
११	एदलाबाद	. .	एदलाबाद ग्रामपंचायत सार्वजनिक वाचनालय, एदलाबाद.

शिवाय जिल्ह्यांतील ४४१ गांवांतून ग्रामवाचनालयें आहेत. अशीं एकूण ४६१ लहान मोठीं वाचनालयें जिल्ह्यांत आहेत.

बहिःशाल व्याख्यान केंद्रें

जिल्ह्यांतील मोठ्या शहरांतून बहिःशाल व्याख्यानमालेचीं केंद्रें सुरू झाली असून या केंद्रांद्वारें नामवंत वक्त्यांचीं निरनिराळ्या विषयांवर भाषणें ठेवलीं जातात.

रोटरी क्लब्ज्

जिल्ह्यांत जळगांव, अमळनेर व भुसावळ या शहरीं रोटरी क्लब्ज असून त्यांची अनुक्रमें ३५,२१ व १९ अशी सभासदसंख्या आहे.

सांस्कृतिक केंद्रें

मध्य सरकारचे योजनेप्रमाणें धुळें येथील ग्रॅज्युएट बेसिक ट्रेनिंग सेंटर या पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखालीं पारोळे येथें एक सांस्कृतिक केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. तसेंच पिंपळगांव हरेश्वर येथें जिल्हा शिक्षण मंडळामार्फत एक सांस्कृतिक केंद्र असलेली शाळा चालू आहे. या दोन्हीं केंद्रांमर्फत खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा तरुणांचा सांस्कृतिक दृष्ट्या विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

संगीत शिक्षण जिल्ह्यांत जळगांव येथें एक संगीत क्लास चालविण्यांत येत असून त्यांत ८४ विद्यार्थी संगीताचें शिक्षण घेत आहेत.

समाजशिक्षणाचें कार्य शिक्षणखातें व विकास गट यांच्या मार्फत चालतें. समाजशिक्षणाच्या कार्यास चालना देण्यासाठीं जिल्हा विकास मंडळानें जास्तींजास्त प्रौढांना साक्षर करणाऱ्या तालुक्यास देण्यासाठीं फिरती ढाल ठेवली आहे. विकास गटांतील समाजशिक्षण संघटक व भाग शिक्षणाधिकारी या कामीं मार्गदर्शन करतात. १९५९-६० या शालेय वर्षात जिल्ह्यांत पुरुषांचे ४२३ व स्त्रियाचे १२० समाज शिक्षण वर्ग चालू होते व त्यांत २,६९९ पुरुष व ५६२ स्त्रिया शिक्षण घेत होत्या. त्यापैकीं ४८६ पुरुष व ४६ स्त्रिया दुसऱ्या कसोटीच्या परीक्षा देऊन साक्षर झाल्या. समाज शिक्षणाचे वर्गासाठीं पाटचा, पुस्तकें, कंदील वगैरे साहित्य महाराष्ट्र प्रदेश समाजशिक्षण कचेरी, पुणें मार्फत पुरविलें जातें. कार्यकर्त्यांना साक्षरतेच्या प्रमाणात सरकारी अनुदान दिलें जातें.

सभाज शिक्षण

१९६१ च्या जनगणनेंतील आंकडेहि आतां उपलब्ध झाले असून त्यावरून जिल्ह्यांतील साक्षरांची संख्या ५,९७,३८२ पर्यंत गेल्याचें दिसतें. त्यांत पुरुष ४४२,७६५ तर स्त्रिया १,५४,६१७ होत्या. एकूण जिल्ह्याचें साक्षरतेचें प्रमाण ३३.३ टक्के पडलें. पुरुषांमध्यें साक्षरता ४८.९६ टक्के आढळली तर स्त्रियांमध्यें ती १७.९६ टक्क्याच्या पुढें गेली नाहीं.. नागरी विभागांत साक्षर स्त्री-पुरुष १,८०,३११ होते तर ग्रामीण विभागांत साक्षर स्त्री-पुरुष ४,१७,०७१ होते. याचाच अर्थ शहरांत ४६ टक्के व खेडयांत २८½ टक्के लोक आतांपर्यंत साक्षर झाले आहेत. शहरांतल्या पुरुषांत साक्षरतेचें प्रमाण ६० टक्क्यापर्यंत वाढलेलें दिसतें तर खेडचांतल्या स्त्रियांमध्यें साक्षरतेची फक्त १४½ टक्क्यांचीच मजल गेली. यावरून गेल्या दशकांत जिल्ह्याच्या साक्षरतेचें प्रमाण ५.११ टक्क्यांनीं वाढलें. शहरी विभागांत ही वाढ १५ टक्के झाल्याचें दिसून येतें तर ग्रामीण विभागांत मात्र फक्त ४.५ एवढीच झालेली दिसते.

जिल्ह्यांतील साक्षरता

अमळनेर येथील इन्स्टिटचूट ऑफ फिलॉसॉफी किंवा तत्त्वज्ञान मंदिर ही संस्था सुविख्यात आहे. या संस्थेची स्थापना १९१६ मध्यें अमळनेरचे प्रख्यात दानशूर श्रीमान प्रतापशेठ यांनीं आपले स्नेही येवल्याचे श्री. वल्लभदास यांच्या मदतीनें केली. ही संशोधनात्मक अभ्यासाची संस्था आहे.

अमळनेर येथील तत्त्वज्ञान मंदिर

ज्या विद्यार्थ्यांनीं पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे अशा विद्यार्थ्यांना भारतीय विचार विशेषत: वेदान्तांतील अद्वैत विचाराचा परिचय घडविणें हें या संस्थेचें कार्य आहे. या संस्थेचे मराठी व हिंदी भाषेंतील तत्त्वज्ञानविषयक महत्त्वाचे ग्रंथ आहेत. त्याप्रमाणें तत्त्वज्ञानविषयक नियतकालिकेंहि परदेशांतून येतात. येथें अभ्यास करणारांना सर्वप्रकारें मदत व उत्तेजन दिलें जातें.

दरवर्षी जूनमध्यें संशोधनकार्यासाठीं चांगल्या अभ्यासू विद्यार्थ्यांची फेलो म्हणून निवड केली जाते. व त्याना फेलोशिप दिली जाते. १ जुलैपासून त्यांचा अभ्यास वर्षभर चालतो. विद्यार्थ्यांची अभ्यासूवृत्ति, अभ्यासाची प्रगति व स्वतंत्र विचार करण्याची आवड पाहून मुदतवाढ दिली जातें. या फेलोंना वसतिगृहांत मोफत राहवयास मिळतें व दरमहा रु० १०० शिष्यवृत्ति व महागाई २० रु० दिली जाते. अशा फेलोशिप्स दरवर्षी फक्त सहाच देतात.

या संस्थेला सरकारी वा कोणत्याहि इतर संस्थेकडून मदत दिली जात नाहीं. संस्थेसाठीं जमविलेला सुमारें ७ लाखांचा विश्वस्त निधी असून त्याच्या व्याजांतून संस्थेचा खर्च चालतो. संस्थेचे

संचालक प्रो. जी. आर. मलकानी हे आहेत. याशिवाय श्री. एम्. आर. ओक व श्री. आत्माराम शास्त्री जेरे हे प्राध्यापक आहेत.

माध्यमिक व उच्च शिक्षणाची आस्था या जिल्ह्यांत विशेष आढळते. जिल्ह्यांत सध्यां जळगांव व अमळनेर येथें दोन आर्टस् व सायन्स कॉलेजें आहेत. शिवाय येत्या जून १९६१ पासून चाळीसगांव व फैजपूर येथें आर्टस् व सायन्स कॉलेजें सुरू झालीं आहेत. उच्च शिक्षणासाठीं भारतांतच नव्हे तर परदेशांतहि जाऊन आलेल्या खानदेशवासियांची संख्या बरीच मोठी आहे व ते निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत आहेत. परदेशी जाणारांची संख्या दरसाल वाढत आहे. १९६०-६१ सालींच सुमारें २५ विद्यार्थी परदेशी गेले. त्याचप्रमाणें प्रतिकूल परिस्थितींतहि प्रसंगीं कांहीं काळ नोकरी वा इतर कामधंदा करून विद्यार्जन करण्याची तळमळ खानदेशी विद्यार्थ्यांत दिसून येते. या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण मिळावें म्हणून १९ व्या शतकाचे उत्तरार्धांत जळगांव येथें सरकारी हायस्कूल निघालें. त्यानंतर इतर तालुक्यांतहि विसाव्या शतकाच्या प्रारंभीं निरनिराळ्या शिक्षण-प्रसारक संस्था निघाल्या. अलीकडे शिक्षण संस्थांची संख्या झपाट्यानें वाढत असून त्या ज्ञानदानाचें कार्य आस्थापूर्वक व अव्याहत करीत आहेत.

शिक्षणाबद्दल आस्था

समाजकल्याण

महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण विभागाच्या समाजोन्नतीच्या कार्याची वाटचाल आतां फार झपाट्यानें चालू आहे. समाजवादी समाजरचनेचें कल्याणकारी राज्य आपल्याला निर्माण करावयाचें असल्यानें समाज कल्याण कार्याचा व्याप व वेग वाढणें आवश्यक आहे. केवळ मागासलेल्या वर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाचें कार्य पूर्वी मागासलेल्या वर्गांच्या विभागातर्फे होत असे. आतां तें कार्य अधिक व्यापक करण्यांत आलें असून समाज कल्याण विभागामार्फत केलें जात आहे.

क्रांतिकारक निर्णय

महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या घटकांत मागासलेल्या वर्गांच्या उन्नत्तीसाठीं ज्या योजना चालू आहेत त्या सर्वांचें एकसूत्रीकरण होत आहे. कांहीं जुन्या योजना नव्या स्वरूपांत कार्यान्वित होत आहेत व कांहीं नवीन योजना अंमलांत येत आहेत. त्यामुळें साहजिकच समाज कल्याण विभागाचें कार्यक्षेत्र व्यापक झालें आहे. या खात्याचें कार्य हरिजन, (शेड्यूल्ड कास्ट) गिरिजन, (शेड्यूल्ड ट्राइब्ज्), विमोचित जाती, भटक्या व निमभटक्या जमाती यांच्या सर्वांगीण उन्नतीचें जरी असलें तरी तें आतां त्यांच्यापुरतेंच मर्यादित नाहीं. सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या विकासा-बरोबरच नाट्य महोत्सव, तमाशा महोत्सव, कुस्तीगीर परिषदा आदि कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रेंहि समाज कल्याण खात्यानें आतां व्यापिलीं आहेत. त्याचप्रमाणें १ एप्रिल १९५९ पासून जातीवर आधारलेला मागासलेला जमातीचा वर्ग आतां नाहींसा झालेला आहे व त्याऐवजीं जातिधर्मनिरपेक्ष असा आर्थिक दृष्ट्या मागासलेला वर्ग अस्तित्वांत आला आहे. या वर्गासाठीं ठरलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु० ९०० पासून रु० १,२०० पर्यंत वाढविण्यांत आली आहे. या मर्यादेंत ज्यांचें उत्पन्न आहे अशांच्या पाल्यांना सर्वप्रकारचें शाळाकॉलेजचें शिक्षण त्यांची जातपात लक्षांत न घेतां मोफत देण्याचा क्रांतिकारक निर्णय आपल्या राज्यानें घेतला आहे. या निर्णयामुळें मागासलेल्या वर्गाची व्याख्याच बदलली आहे. आपल्या सामाजिक जीवनांतील जातिधर्माचें अतिरिक्त वर्चस्व नष्ट करून सारा समाज एकजिनसी व एकसंध करण्यास हा निर्णय पोषक होईल.

या दृष्टीनें समाज कल्याण कार्याचे आतां स्पष्ट दोन भाग पडतात. पहिला भाग मागासलेले वर्ग कल्याणकारी विभाग. या विभागांत मागासलेल्या वर्गांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इ. बाबतींत खास योजनांद्वारें सर्वांगीण उन्नति करून या वर्गांना समाजाच्या इतर सापेक्षतेनें पुढारलेल्या वर्गांबरोबर आणण्याचें कार्य व दुसरा भाग म्हणजे समाजसुधारणेचें कार्य. समाजसुधारणेच्या कार्यांतहि दोन उपविभाग पडतात. पहिल्या उपविभागांत शारीरिक व मानसिक पंगुत्व असलेलीं, अनाथ, बलहीन, निराधार, असाहाय्य, दुर्वर्तनी

कार्याचे दोन विभाग

अथवा कुमार्गाला लागलेलीं, परित्यक्त, मुलें, युवक व स्त्रिया तसेंच भिकारी, गुन्हेगार इत्यादींच्या सर्वांगीण उन्नतीचें व त्यांना चांगले नागरिक बनविण्याचें कार्य पडतें तर दुसऱ्या उपविभागांत नाटच, लोकनाटच, कुस्ती, कला, खेळ आदि सांस्कृतिक, लोकरंजनाचें व लोकशिक्षणाचें कार्य पडतें.

मागासलेले वर्ग कल्याणकार्य

मागासलेल्या वर्गाचें कल्याणकार्य जरी प्रामुख्यानें समाज कल्याण विभागामार्फत चालत असलें तरी बऱ्याच योजनांचें बाबतींत हा विभाग समन्वयानें काम करतो. शेती, शिक्षण, सहकार, विकास, महसूल व श्रम या विभागांच्या सहकार्यानें हें काम केलें जातें. शेतकी खात्यातर्फे शेतीसुधारणा, भूसंरक्षण, पशुसंवर्धन या बाबतींत मदत मिळते, तर शिक्षण विभाग विमोचित जाति व आदिवासियांसाठीं आश्रमशाळासारख्या संस्थाना मदत देतो. सहकार विभागातर्फे शेती, घरबांधणी, उद्योगधंदे, मजूर, दुग्धव्यवसाय व बहुविध कार्यकारी सहकारी संस्थांना मदत, देण्यांत येते. महसूल विभागातर्फे, जमीनवांटप, शेतीतगाई, घरबांधणीसाठीं तगाई व कर्ज अशा स्वरूपाची मदत, विकासगटातर्फे अनेक प्रकारें दिली जाणारी मदत व श्रमविभागातर्फे नोकऱ्यांच्या बाबतींत दिला जाणारा अग्रहक्क, अशाप्रकारें सरकारच्या अनेक खात्यांकडून मागासलेल्या वर्गांना आर्थिक साहाय्य दिलें जातें.

सर्व खात्यांचें सहकार्य

समाजकल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेलें महाराष्ट्र राज्य हरिजन कल्याण मंडळ सरकारला मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठीं तात्त्विक व व्यावहारिक सल्ला देतें व उपाय सुचवितें, तर महाराष्ट्र राज्य आदिवासी कल्याण मंडळ आदिवासीयांसाठीं व आदिवासी विभागांसाठीं केलेल्या घटनात्मक तरतुदीनुसार वैचारिक व तात्विक सल्ला राज्य सरकारला देतें. याहि मंडळाचे अध्यक्ष समाज कल्याण खात्याचे मंत्री असतात. जिल्हा पातळीवर जिल्हा विकास मंडळाची समाजकल्याण उपसमिती मागासलेल्या वर्गांच्या गाऱ्हाण्यांचा अडीअडचणींचा विचार करून, त्या संबंधित अधिकाऱ्यामार्फत सोडविण्यास मदत करते. त्याचप्रमाणें अस्पृश्यतानिवारण व मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीच्या योजना या बाबतींत प्रचारकार्याहि करते. महाराष्ट्र हरिजन सेवक संघ, डिप्रेस्ड क्लासेस लीग, श्री संत गाडगे महाराज मिशन या सारख्या स्वयंस्फूर्त संघटना सरकारमार्फत चालू असलेल्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीच्या व अस्पृश्यता निवारणाच्या प्रचारकार्यांत मोलाची मदत करतात. या संस्थांमार्फत जिल्ह्यांत प्रचारक असून त्यासाठीं सरकारकडून या संस्थांना अनुदान दिलें जातें.

मदत करणाऱ्या संस्था व मंडळें

भारताच्या १९११च्या जनगणनेप्रमाणें एकूण ३५,६६,९१,७६० या लोकसंख्येपैकीं हरिजनांची लोकसंख्या ५,१७,८६,६८८ व आदिवासींची लेकसंख्या १,९१,१६,४१८ होती. जातीवर आधारित इतर मागासलेल्या वर्गांना घटनेन्वयें भारतांत मान्यता नाहीं. जुन्या मुंबई राज्यांत एकूण ३,५९,५६, ३०५ लोकसंख्येंत ३०,०३,०२४ हरिजन, ३३,५९,३०५ आदीवासी व ४४,८९,५९४ इतर मागासलेल्या वर्गांचे अशी सुमारें ३० टक्के लोकसंख्या या वर्षांची आढळते. जळगांव जिल्ह्यांत एकूण १४,७१,३५१ लोकसंख्येंत हरिजन १,३७,९१६, आदिवासी ६४,४८६ व १,४५,९७१ इतर मागासलेल्या वर्गांचे अशी लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतींत आढळते. यावरून एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के प्रमाण या सर्व मागासलेल्या वर्गांचें पडतें. इतर मागासलेल्या वर्गांपैकीं विमोचित जातीचे लोक सुमारे २० हजार आहेत व भटके, निम भटके या वर्गांत मोडणारे सुमारें ४५ हजार आहेत.

हरिजनांच्या एकूण ३४ पोटजाती असून त्यांपैकीं जळगांव जिल्ह्यांत प्रामुख्यानें ७ आहेत. त्या महार, मांग, चांभार, भंगी, मांगगारुडी, ढोर, मोची या होत. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले हरिजन लोक धार्मिक परंपरागत रूढींच्या प्रामाण्यामुळें अस्पृश्यतेचें कलंकित व मानहानीचें जीवन जगत आहेत. त्यांच्यांतहि उच्चनीचता पाळली जाते व पोटजातींतहि उच्चनीच भेद आहेत. कांहीं हरिजनांना आपले पूर्वापार घरगुती धंदे आहेत व त्यांवर त्यांची कशीबशी उपजीविका चालते. बर्वे कमिटीच्या शिफारशीनुसार भंगी जमातीच्या उन्नतीकरितां महाराष्ट्रासाठीं एका खास अधिकाऱ्याची नेमणूक झाली असून नगर-पालिका व ग्रामपंचायती भंगीकामसुधारणेच्या व त्यांच्या करितां घरबांधणीच्या योजना अंमलांत आणीत आहेत. गिरिजन किंवा आदिवासी या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या अनुसूचित जाती जिल्ह्यांत एकूण २४ असून त्यांची यादी खालीलप्रमाणें :

हरिजन

अनुसूचित जातींची यादी.

(१) आगेर.
(२) बाकड किंवा बंट.
(३) भांबी, भांभी, असादारु, असोडी, चमाडिया, चामार, चांभार, चमगार, हरळय्या, हरोळी, खालपा, मचिगार, मोचिगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाठी मोची, गाणीगार, रोहिदास, रोहित किंवा समगार.
(४) भंगी, मेहतर, ओलगाणा, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बालमिकी, कोरार किंवा झाडमाळी.
(५) जलवादी किंवा चन्नय्या.
(६) चन्नदासर किंवा होलयदासर.
(७) ढोर किंवा कंकय्या.
(८) गरोडा किंवा गोरो.
(९) हळ्ळीर.
(१०) हलसार, हसलार, हुलसवाँर किंवा हलसवार.
(११) होलार किंवा वल्हार.
(१२) होलय किंवा होले.
(१३) लिंगाडेर.
(१४) महार, तराळ किंवा धेगुमेगु (महार जात जागल्या या समानार्थक शब्दानेंसुद्धां ओळखली जाते.
(१५) माह्यावंशी घेडवणकर किंवा मारुवणकर.
(१६) मांग, मातंग, किंवा मिणिमादीग.
(१७) मांग गारुडी.
(१८) मेघवाल किंवा मोंगवार.
(१९) मुक्री.
(२०) नादीया किंवा हादी.
(२१) पासी.
(२२) शेणवा, चेणवा, सोडमां किंवा राक्त.
(२३) तिरगार किंवा तिरबांदा.
(२४) तुरी.

या लोकांचे शेती, शिकार व जंगलकामें हे मुख्य उद्योगधंदे असून त्यांचें वास्तव्य डोंगरांत असल्यानें आधुनिक सुधारणेपासून ते दूर आहेत. ते सामाजिक व सांस्कृतिक दृष्टचा मागासलेले असले तरी त्यांची स्वतःची अशी एक वेगळीच संस्कृति आहे.

विमोचित जाती

विमोचित जाती वा माजी गुन्हेगार जमाती यांच्या या जिल्ह्यांत कंजारभाट, कामाठी, कैकाडी, राजपारधि, मांगगारुडी व रामोशी ह्या सहा जाती आहेत व एका जमातींत अनेक पोटजमातीहि आहेत. कष्ट न करतां जगण्याची या जमातींची वृत्ति बदलत असून त्यांच्या जीवनांत अनुकूल फरक पडत आहे. भटक्या व निमभटक्या जमातीहि एकूण ७३ असून त्यांपैकीं जोशी, गोंधळी, घिसाडी, जोगी, बेलदार इ० २० जमाती या जिल्ह्यांत आहेत. हे लोक वेगवेगळ्या प्रकारें भीक मागून आपलें जीवन जगतात. भीक मागणें हाच त्यांचा मुख्य धंदा असल्यानें पिकाच्या हंगामाप्रमाणें ते ठिकाणें बदलत असतात. या लोकांचें जीवन फार कष्टमय झालें आहे. त्यांच्या जीवनास स्थैर्य आणण्यासाठीं निरनिराळ्या योजना अंमलांत आणल्या जात आहेत. त्यांच्या कल्याणाच्या योजनांसाठीं एक नोमॅडिक ट्राइब्ज वेल्फेअर ऑफिसर मुंबई व पुणें विभागासाठीं पुणें येथें नेमण्यांत आला आहे.

इतर मागसलेले वर्ग

या वर्गांत मोडणाऱ्या १६० जातींपैकीं जळगांव जिल्ह्यांत २५ जाती आहेत. १९५९ एप्रिलपासून जातींवर आधारलेल्या मागासलेल्या जमातींचा वर्ग नाहींसा झाला असून रु. १२०० पर्यंत वार्षिक उत्पन्ना असलेल्यांना आतां आर्थिक दृष्टचा मागासलेले समजलें जातें व अशा सर्व जातिधर्माच्या लोकांना शिक्षण मोफत दिलें जातें. तसेंच अविकसित ग्रामीण विभागांत आर्थिक योजनांचाहि फायदा त्यांना दिला जातो. फक्त विमुक्त जाति व भटक्या आणि निमभटक्या जमाती यांच्यासाठीं विशेष अशा कांहीं आर्थिक योजना आहेत.

शैक्षणिक सवलती

मोफत शिक्षण

अन्न, आवरण व आसरा याप्रमाणें शिक्षण ही देखील माणसाची एक गरज आहे. केवळ परिस्थितीमुळें व शिक्षणाचें महत्त्व न समजल्यामुळें आतांपर्यंत मागासलेल्या वर्गांतील लोकांना शिक्षणाचा फायदा घेतां येत नव्हता. मागासलेल्यांचा मागासलेपणा घालविणें म्हणजेच त्यांना शिक्षण देऊन सज्ञान करणें होय. त्या दृष्टीनें प्राथमिक, दुय्यम, महाविद्यालयीन व धंदेशिक्षण हरिजन, आदिवासी व ज्यांचें वार्षिक उत्पन्न रु. १२०० पेक्षां जास्त नाहीं अशा सर्वांना मोफत शिक्षण दिलें जात आहे. या सवलतीचा फायदा १९६०–६१ सालांत १४,१५० आर्थिक दृष्टचा मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळाला असून त्यासाठीं सरकारचा नोव्हेंबर १९६० अखेर ६,०४,३८४ रु. खर्च झाला आहे व आणखी सुमारें ४ लाख रु. या वर्षांत खर्च होतील.

शिष्यवृत्त्या

उच्च, प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्यें ज्या मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या मिळत आहेत त्यांच्या शिष्यवृत्त्या त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत चालू ठेवल्या आहेत. याशिवाय फक्त आदिवासी विद्यार्थ्यांसाठीं त्यांची शालेय प्रगति व गरीबी पाहून प्राथमिक इयत्ता १ ली व दुसरीसाठीं वार्षिक रु. ३ व इयत्ता ३ री व ४ थी साठीं वार्षिक रु. ६ अशा शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्याचप्रमाणें हरिजन व आदिवासी या दोन्ही जमातींतील विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळा इ. ५ ते ७ वी पर्यंत वार्षिक प्रत्येकीं रु. ३० व दुय्यम शाळा ८ वी ते ११

वी पर्यंत वार्षिक प्रत्येकीं ६० रु. तसेंच तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या दुय्यम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकीं रु. ९०, धंदेशिक्षणाच्या शाळा, ट्रेनिंग कॉलेजें व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दरमहा रु. २५ याप्रमाणें शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

परिक्षा फी माफी

हरिजन, आदिवासी व पूर्वीच्या इतर मागासलेल्या वर्गाच्या (जातीवर आधारित) विद्यार्थ्यांना त्यांच्या माध्यमिक, शालान्त, महाविद्यालयीन, आदि परीक्षेसाठीं लागणारी फी देण्यासाठीं सरकारनें तरतूद केली आहे. या सवलतीनुसार नादारी शिष्यवृत्त्या व परीक्षा फीसाठीं १९६०–६१ मध्यें पुढीलप्रमाणें आर्थिक तरतूद केली आहे.

जमात	नादारी	शिष्यवृत्ति	परीक्षा फी
हरिजन	१,३७,०००	२७,०००	१४,४००
आदिवासी	३६,०००	८,७००	३,७३०
इतर मागासलेले (जातीवर आधारलेले)	१९,०००	१२,०००	६,८४९

विमुक्त जमातीच्या भटक्या व निमभटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना अधिक सवलती

प्राथमिक शाळेंत शिकणाऱ्या १ ते ४ इयत्तांतील भटक्या, निमभटक्या, विमुक्त जमातीच्या लोकांना मोफत पाटचा व पुस्तकें देण्यांत येतात व त्याचप्रमाणें प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्यें शिकत असलेल्या भटक्या व निमभटक्या जमातींच्या व विमुक्त जातींच्या विद्यार्थ्यांसाठीं पुस्तकें व स्टेशनरी खरेदी करण्यासाठीं कांहीं रोख रकमेच्या शिष्यवृत्त्या त्यांच्या शिक्षणांतील हुशारी लक्षांत घेऊन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून दिल्या जातात. प्राथमिक शाळेंत वरच्या वर्गांत ५ वी ते ७ वी पर्यंत शिकत असलेल्या विमुक्त जमातींच्या विद्यार्थ्यांना जून ते मार्च अखेर मासिक शिष्यवृत्त्या दरवर्षी इयत्ता ५ वी व ६ वीसाठीं रु. ३ व इयत्ता ७ वी साठीं रु. ४ याप्रमाणें देण्यांत येतात. प्राथमिक शाळेंत शिकत असलेल्या विमुक्त जमातींच्या गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शर्ट व चड्डी व मुलींकरितां परकर व पोलके मोफत देण्यांत येतें.

आर्थिक सवलती

आर्थिक सवलतींपैकीं कांहीं सवलती सर्व जिल्ह्यांकरितां लागू आहेत तर कांहीं विशिष्ट सवलती अविकसित ग्रामीण भागासाठींच केवळ लागू आहेत. या अविकसित ग्रामीण विभागांत जिल्ह्यांतील चोपडे, यावल व रावेर या तीन तालुक्यांचाच समावेश आहे. या अविकसित ग्रामीण विभागांतहि आदिवासी विभाग हा निराळा असून त्यांत खालील ३२ गांवांचा समावेश होतो.

तालुका चोपडा सत्रसेन, मराठा, मोरचिडा, कृष्णापूर, उर्माडि, वैजापूर, करजाना, मुळचा उतार, खाऱ्या पडाव, बोराजंटी, मेलापूर, मेलाने, बोरगळी, देवझिरी, देवारी, विष्णापूर, कुंड्यापानी.

तालुका सवाल गढ्या, हरिपुरा, जामन्या, उसमाळी, वागझिरा, मोहमंडळी.

तालुका रावेर अंधारमळी, गरबर्डी, लालमाती, मोहमंडळी, निमड्या, सहस्रलिंग, टिड्या, पिंपकुंड. जुनें मोहमंडळी.

सर्व जिल्ह्याकरितां मिळणाऱ्या सवलतींपैकीं हरिजन, आदिवासी व विमुक्त जातींकरितां कांहीं सवलती असून कांहीं इतर मागारलेले वर्ग (आर्थिक मागासलेले वर्ग–जातिधर्म विरहीत धरून) यासाठीं आहेत. या सवलतींची माहिती पुढें देण्यांत आली आहे.

शेती सुधारणा

हरिजन, आदिवासी गरीब शेतकऱ्यांना गाय, म्हैस विकत घेऊन देण्याकरितां ५० टक्के कर्ज व ५० टक्के मदत याप्रमाणें रु. ३०० पर्यंत देण्यांत येतात. कर्जफेड ५० समान मासिक हप्त्यानें करावयाची असते. त्याचप्रमाणें आदिवासी व विमुक्त जातीच्या गरीब शेतकऱ्यांना नांगरटीसाठीं बैलजोडी घेण्यासाठीं १०० टक्के मदत दिली जाते. तद्वतच विमुक्त जाती व आदिवासीयांना शेतीच्या अवजारांसाठीं १०० टक्के मदत दिली जाते. या सवलती जिल्हाभर लागू आहेत. आदिवासी व विमुक्त जमातीच्या शेतकऱ्यांना बियाणासाठींहि ५० टक्के मदत दिली जाते. अविकसित ग्रामीण विभागांत म्हणजे रावेर, यावल, चोपडे तालुक्यांत वरील तीन प्रकारच्या सवलती हरिजन, आदिवासी, विमुक्त जाती, इतर आर्थिकदृष्टचा मागासलेले या सर्वांनाच मिळतात. याशिवाय या विभागांत ऑईल पंपासाठीं ४० टक्के कर्ज व ६० टक्के मदत दिली जाते. भटक्या व निमभटक्या लोकांसाठीं, त्यांच्या जीवनांत स्थैर्य यावें म्हणून मोफत बकऱ्या व कोंबड्या, ¾ दरानें दुभतीं जनावरें व शेतीसाठीं बैल व जमीन दुरुस्तीसाठीं निम्मा खर्च इ० प्रकारें मदत दिली जाते. शेतीसुधारणेसाठीं चालू १९६०–६१ सालीं जिल्ह्यांत रु. २८,३०० ची तरतूद केली आहे.

छोटे उद्योगधंदे

सर्व जिल्ह्यांत हरिजन व आदिवासींना उद्योगधंद्यांना लागणारीं अवजारें खरेदी करण्यासाठीं भांडवलासाठीं ७५ टक्के कर्ज व २५टक्के मदत दिली जाते. विमुक्त जाती, भटके व निमभटके यांचेसाठीं स्वतंत्र ग्रँट असते. कर्जावर व्याज आकारलें जात नाहीं. रु. ५०० पर्यंत वैयक्तिक सहाय्य मिळतें. कर्जफेड मासिक ५० हप्त्यांनीं वसूल केली जाते. कुटीरोद्योगासाठीं चालू सालीं जिल्ह्यांसाठीं रु. २६,००० ची तरतूद केली आहे.

घर बांधणी

गरीब व गरजू हरिजन व आदिवासी यांना घर बांधण्यासाठीं वैयक्तिक मदत रु. १०० पर्यंत मालाच्या स्वरुपांत समाज कल्याण अधिकाऱ्यांचेकडून मिळते. अशा तऱ्हेनें चालू १९६०–६१ सालीं हरिजनांसाठीं रु. ४६०० व आदिवासींना रु. १४०० खर्च होत आहेत. त्याचप्रमाणें सरकारी जागा उपलब्ध नसेल अशा खेड्यामध्यें स्वतःचें घर बांधण्यासाठीं हरिजनांना खासगी मालकीची रु. १२०० पर्यंतची जागा समाज कल्याण खात्यामार्फत विकत घेऊन दिली जाते. अशा तऱ्हेनें १९६०– ६१ सालीं जागा घेऊन देण्यासाठीं ३२०० खर्च झाले. गतवर्षीं रु. ५,००० खर्च झाले होते.

पिण्याच्या पाण्याच्या विहिरी

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं सरकारमार्फत मदत दिली जाते. हरिजन वस्तींत किंवा जवळपास सार्वजनिक नवीन विहिर खोदून बांधकाम करण्यासाठीं प्रत्येक विहिरीसाठीं मदत रु. १,०००, आदिवासी विभागांत आदिवासीयांसाठीं नवीन विहिर खोदून बांधकाम करण्यासाठीं प्रत्येक विहिरीसाठीं रु. १,५०० व अविकसित ग्रामीण विभागांत रु. १,७५० याप्रमाणें मदत दिली जाते. मात्र यापेक्षां अधिक खर्च येईल तो संबंधितांना करावा लागतो. त्याचप्रमाणें हरिजन वस्तींत किंवा वस्तीलगतच्या जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं रु. ७५० पर्यंत मदत समाज कल्याण खात्याकडून मिळते. पण त्यासाठीं मंजूर झालेल्या रकमेच्या २५ टक्के खर्च संबंधितांनीं श्रमदानानें, मालाच्या रूपानें वा

दोन्ही स्वरुपांत करावयाचा असतो. गतवर्षी (१९५९–६०) विहिरदुरुस्तीसाठीं ३,७५० रु. व विहिर बांधणीसाठीं रु. २३,३७५ खर्च झाले.

वैद्यकीय मदत

आदिवासी विभागांतील स्वयंस्फूर्त संस्थांना औषधासाठीं दरवर्षी रु. १०० मदत समाज कल्याण अधिकाऱ्यांचेकडून दिली जाते.

कुक्कुट पालन

कुक्कुटपालनाचा व्यवसाय आदिवासींना सहज करतां येण्यासारखा आहे. तेव्हां या व्यवसायाचें शिक्षण घेण्यासाठीं सरकारमान्य शिक्षण केंद्रांत दाखल होऊन अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या चांगल्या होतकरू व साक्षर आदिवासी तरुणास दरमहा रु. ३० प्रमाणें शिष्यवृत्ति व शिक्षणानंतर रु. २०० पर्यंत धंद्यासाठीं मदत व कोंवडयांचीं घरें बांधण्यासाठीं रु. १०० मदत व शिक्षण केंद्रापर्यंत जाण्यायेण्याचें प्रवासभाडें दिलें जातें.

दळणवळणाची सोय

आदिवासी भागांत दळणवळणाच्या सोयीसाठीं रस्ते तयार करणें व जरुर त्या ठिकाणीं रस्त्यांवर पूल व मोऱ्या बांधणें याकरितां समाज कल्याण अधिकाऱ्यांचेकडून कांहीं मदत दिली जाते मात्र हीं कामें जिल्हा लोकल बोर्ड, विकासगट अधिकारी किंवा समाजकार्य करणाऱ्या संस्था यांनीं करावयाचीं असतात. या योजनेप्रमाणें गतवर्षी (१९५९–६०) ७,००० रु. खर्च झाले व यंदा (१९६०–६१) १०,६०० रु. खर्च होतील.

वसतिगृहें

जळगांव जिल्ह्यांत स्वयंस्फूर्त संस्थांद्वारें समाज कल्याण खात्याची मान्यता असलेलीं एकूण १९ वसतिगृहें आहेत. प्रत्येक वसतिगृहांत विद्यार्थ्यांच्या ठराविक संख्येस मान्यता दिली जाते. वसतिगृहांतील प्रत्येक विद्यार्थ्यामागें रु. २० व विद्यार्थिनीमागें रु. २५ अनुदान दिलें जातें. हरिजन, गिरीजन, विमोचित जाती, भटके व निमभटके व पूर्वीचे इतर मागासलेले वर्ग यांना या वसतिगृहांत प्रवेश दिला जातो. वार्षिक रु. १२०० पेक्षां कमी उत्पन्न असलेल्यांचे पाल्यांना वतिसगृहांत मान्य विद्यार्थीसंख्येंच्या १० टक्के प्रवेश दिला जातो व त्यांचेसाठींहि अनुदान दिलें जातें. हीं वसतिगृहें जळगांव येथें (१) आदिजनता वसतिगृह, (२) श्री. चोखामेळा बोर्डिंग, (३) बॅकवर्ड क्लास गर्ल्स हॉस्टेल अशीं तीन असून एक संमिश्र वसतिगृह प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन हें आहे. चाळीसगांव तालुक्यांत (१) दीनबंधु आंबेडकर आश्रम, चाळीसगांव, (२) दीनबंधु आंबेडकर कन्याश्रम, चाळीसगांव. (३) राष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह, चाळीसगांव, (४) गिरणा विद्याप्रसारक मंडळाचें वसतिगृह, मेहुणबारे व (५) सर ससून डेव्हिड सर्वोदय विद्यार्थी वसतिगृह, उंबरखेडें अशीं पांच वसतिगृहें आहेत. अमळनेर येथें (१) बॅकवर्ड क्लास छात्रालय व (२) शेतकरी बोर्डिंग हीं वसतिगृहें आहेत तर भुसावळ येथें (१) सर्वोदय छात्रालय, भुसावळ व (२) श्रीसंत गाडगे महाराज मिशन आश्रम, भुसावळ हीं दोन वसतिगृहें आहेत. याशिवाय सर्वोदय सहकारी आश्रम, यावल, विकास वसतिगृह, पिंपळगांव (हरेश्वर) तालुका पाचोरे, मिलिंद छात्रालय, एरंडोल, विद्याविकास मंदिर, सावदे, तालुका रावेर अशा चार ठिकाणीं चार वसतिगृहें असून खिरोदे येथें एक प्राथमिक मूलोद्योग अध्यापक विद्यालयाचें संमिश्र वसतिगृह व साधना सदन हें एक यंदाच मान्यता मिळालेलें वसतिगृह अशीं दोन वसतिगृहें आहेत. या वसतिगृहांना अनावर्तक अनुदान, इमारतीसाठीं सवलतीचें अनुदान व छात्रालयाच्या

योग्य शैक्षणिक पात्रता असलेल्या सुपरिंटेंडेन्टच्या सरकारमान्य वेतन श्रेणीनुसार पगारावर ५० टक्के अनुदान अशीं अनुदानें देण्यांत येतात. संमिश्र वसतिगृहांतील हरिजन व आदिवासी विद्यार्थ्यांचा जेवण–राहाण्याचा संपूर्ण खर्च सरकार देतें. वसतिगृहासाठीं १९५९–६० मध्यें रु. ७१,६२३ खर्च झाले.

बालवाड्या

हरिजन बालकांना बालवयांतच चांगले संस्कार घडावेत व प्रारंभापासूनच त्यांना योग्य वळण लागावें म्हणून बालवाड्या सुरू करण्यासाठीं सरकार मदत देतें. अशा तऱ्हेच्या दोन बालवाड्या या जिल्ह्यांत जळगांव व भुसावळ येथें चालू असून त्या प्रत्येक बालवाडींत ६ वर्षांवरील ४० हरिजन बालकें व त्यांच्या १० टक्के इतर जातीचीं बालकें घेतलीं जातात. या बालवाडींतील मुलांसाठीं दूध व खाऊकरितां दरमहा रु. ५०, इमारत भाड्यासाठीं दरमहा रु. २५, दाईचा पगार दरमहा रु. २५ व मॉंटेसरीट्रेंड शिक्षिकेच्या सरकारमान्य वेतनश्रेणीनुसार देण्यांत येणारा पगार अशा सर्व खर्चावर ९० टक्के अनुदान देण्यांत येतें. तसेंच बालवाडीच्या साहित्याकरितां अनावर्तक अनुदानहि दिलें जातें. भुसावळ येथील बालवाडी महाराष्ट्र हरिजन सेवक संघातर्फे व जळगांव येथील बालवाडी भारतीय दलित वर्ग संघातर्फे चालविली जाते. या दोन बालवाड्यांना १९५९–६० मध्यें रु. ३,००० मदत दिली.

संस्कार केंद्रें

स्त्रिया–पुरुष व मुलें यांना सर्वांना एकत्र येण्याची व सामाजिक भावना निर्माण होण्याची संधि मिळावी, सात्विक लोक-रंजनांतून लोकशिक्षण घडावें, मागासलेल्या वर्गांतहि नवें नेतृत्व निर्माण व्हावें यासाठीं संस्कार केंद्रें सुरू करण्यास सरकार प्रोत्साहन देतें. या संस्कार केंद्रांमध्यें करमणुकीचे कार्यक्रम चालतात. सवर्णियांचीं मुलें व स्त्रियाहि या संस्कार केंद्रांचे कार्यक्रमांत भाग घेऊं शकतात. अशीं संस्कार केंद्रें जिल्ह्यांत चार ठिकाणीं चालू आहेत. एरंडोल तालुक्यांतील पाळधी व रावेर तालुक्यांतील खिरोदे येथें मुख्यतः हरिजन व इतरांसाठीं आणि एरंडोल येथें मुख्यतः विमुक्त जमाती व इतरांसाठीं तर जळगांव येथें भटक्या व निमभटक्या जमातींसाठीं हीं केंद्रें चालविलीं जातात. या केंद्रांनांह समाज कल्याण खात्याकडून अनुदान दिलें जातें. या संस्कार केंद्रांमध्यें करमणुकीचे कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन कीर्तन, खेळ, वाचनालय, हळदीकुंकू, शिवणकाम इ. कार्यक्रम चालतात. भटक्या जमातींसाठीं एदलाबाद भागांत आणखी एक संस्कार केंद्र सुरू करण्यांत येत आहे.

अस्पृश्यता निवारण्याच्या योजना

(१) घरभाडें मदत : हरिजनांना राहण्यासाठीं सवर्णियानें स्वतःचें घर दिल्यास त्याला त्या हरिजनाकडून ठरलेलें भाडें दरमहा मिळतेंच शिवाय भाड्याचे ५० टक्के रक्कम सरकार घर-मालकास देतें. यामुळें सवर्णियांच्या वस्तींत हरिजनांना घरें मिळून त्यांची रहाणीहि सुधारते व सवर्णियांचे व त्यांचे निकटचे संबंध जडतात. (२) आंतरजातीय विवाहः– सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यामध्यें आंतरजातीय विवाह घडून आल्यास अस्पृश्यता निवारणाचे दृष्टीनें तें भरीव कार्यच होईल. तेव्हां अशा विवाहाचा सत्कार सरकारतर्फे करण्यांत येतो व हरिजन मुलगा व सवर्ण हिंदु मुलगी असल्यास त्या विवाहास रु. २०० व हरिजन मुलगी व सवर्ण हिंदु मुलगा असल्यास त्या विवाहास रु. ३०० सरकारतर्फे खर्च केले जातात. (३) बक्षिसें:– अस्पृश्यता निवारणाचें भरीव काम करणाऱ्या पहिल्या दोन क्रमांकांच्या गांवांना पहिलें बक्षिस रु. १,००० व दुसरें बक्षिस रु. ५०० याप्रमाणें बक्षिसें जिल्हा विकास मंडळामार्फत दिलीं जातात.

सेवकांच्या नेमणुका

(४) सामाजिक सुधारणेचें स्वयंस्फूर्तीनें काम करणाऱ्या संस्थांमार्फत प्रचारक किंवा सेवक नेमून अस्पृश्यता निवारणाचा व मागासलेल्या वर्गांच्या उन्नतीच्या योजनांचा प्रचार केला जातो. असे प्रचारक या जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यांत एक याप्रमाणें नेमण्यांत आलेले असून त्यांचा पगार व प्रवासखर्च मिळून दरमहा रु. १२५ वर

सरकारतर्फे ८० टक्के अनुदान दिलें जातें. (५) प्रचारः– याशिवाय दरवर्षी साजरा होणारा अस्पृश्यता निवारण सप्ताह, जिल्ह्यांत करण्यांत येणारे भजन, कीर्तन, नाटके व कलापथकाचे कार्यक्रम, हरिजनांचे व इतर मागासलेल्या वर्गांचे भरविण्यांत येणारे मेळावे व काढण्यांत येणाऱ्या सहली, दरवर्षी एका जत्रेंत रु. १०० खर्च करून करण्यांत येणारा विशेष प्रचार, समाज कल्याण उपसमितीकडे देण्यांत आलेल्या रकमेंतून करण्यांत येणारें कार्य इ० अनेक मार्गांनीं अस्पृश्यता निवारणाबद्दल लोकमत जागृत केलें जातें. सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं दौऱ्यावर असतांना खेडोपाडीं अस्पृश्यता निवारणाचाहि प्रचार करावा असा सरकारी आदेश आहे.

कायदेविषयक मदत

ज्यांचें वार्षिक उत्पन्न रु. १८०० पेक्षां जास्त नाहीं अशा हरिजन, अनुसूचित जाती व विमुक्त जातीच्या लोकांना दिवाणी व फौजदारी खटल्यामध्यें कॉग्निसेबल व नॉनकॉग्निसेबल अशा दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत समाज कल्याण अधिकारी यांचे मदतीनें वैयक्तिक मोफत कायदेविषयक सल्ला व नियमानुसार मदत मिळूं शकते. कोणत्या बाबतींत कोणत्या प्रकारची मोफत कायदेशीर मदत मिळते हें समाज कल्याण अधिकारी यांचेकडे चौकशी केल्यास कळेल.

मागासलेल्या वर्गांच्या सहकारी संस्था

(१) घरबांधणी सहकारी सोसायटीः–मागासलेल्या वर्गांतील लोकांच्या १९ घरबांधणी सहकारी सोसायटचांना सरकारी मान्यता देण्यांत आली आहे. त्यापैकीं ४ सहकारी सोसायटचांची घर-बांधणी –कामें सुरू आहेत.

(२) विविध कार्यकारी सहकारी सोसायटी :– मागासलेल्या वर्गियांच्या ४ विविध कार्यकारी सहकारी सोसायटचांना सरकारी मान्यता असून त्यांना लवकरच कर्ज देण्याची व्यवस्था होत आहे.

(३) शेतकी सहकारी सोसायटीः– मागासलेल्या वर्गियांच्या ४ शेतकी सहकारी सोसायटचांना सरकारी मान्यता असून त्यांना सरकारकडून लवकरच कर्ज देण्यांत येईल.

(४) औद्योगिक सहकारी सोसायटीः– मागासलेल्या वर्गियांच्या जंगल कामगार, मजूर, बांबूकाम, चर्मोद्योग वगैरे एकंदर ३० औद्योगिक सहकारी सोसायटचांना सरकारी मान्यता मिळाली असून १४ औद्योगिक सहकारी सोसायटचांना सरकारकडून भांडवलासाठीं कर्ज व मदत देण्यांत आलेली आहे.

समाज सुधारणा विभाग कार्य

समाज कल्याण खात्याच्या समाज सुधारणा विभागातर्फे निरनिराळ्या संस्था चालविल्या जातात आणि स्त्रिया, पुरुष व मुलें यांना सन्मार्गाला लावण्याचें व देशाचे सभ्य नागरिक बनविण्याचें कार्य केलें जातें. अशा प्रकारच्या तीन संस्था सध्यां जळगांव येथें आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सोशल ॲन्ड मॉरल हायजीन ॲन्ड सायन्स केअर सर्व्हिसेस या बाबीप्रमाणें जिल्हा आश्रय केंद्र, जळगांव या संस्थेची स्थापना ३० मार्च १९५८ रोजीं झाली.

जिल्हा आश्रय केंद्र; जळगांव

महाराष्ट्र राज्य समाज कल्याण खात्यातर्फे ही संस्था चालविण्यांत येत असून संस्थेच्या कामावर देखरेख ठेवण्याकरितां स्थानिक कार्यकर्ते व सरकारी अधिकारी यांची एक ॲड–हॉक कमिटी नेमली आहे.

नैसर्गिक व सामाजिक आपत्ति यासारख्या कारणांनीं घरादारांची हानि झालेल्या लोकांना किंवा तुरुंगांतून सुटलेल्या बंदिवानांना त्यांच्या मित्रमंडळींनीं व नातेवाईकांनीं जवळ न केल्यास त्यांना मानानें जगणें अशक्य होतें व अशा प्रसंगीं त्यांचे हातून अनिष्ट गोष्टी होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठीं अशा प्रकारच्या लोकांना संस्थेंत दाखल करून, त्यांना कांहीं दिवस विनामूल्य आसरा, अन्न व वस्त्र वगैरे देऊन योग्य मार्गदर्शन करणें हा या संस्थेचा उद्देश आहे.

ही संस्था फक्त पुरुषांकरितांच आहे. सरकारमान्य शाळांतून किंवा तुरुंगांतून सुटलेल्या लोकांना तसेंच निराश्रित, नोकरीविहीन व अन्यप्रकारें सामाजिक दृष्टचा बिकट परिस्थितींत सांपडलेल्या पुरुषांना या संस्थेंत प्रवेश मिळवितां येतो. या संस्थेंत दाखल होऊं इच्छिणाऱ्या लोकांनीं स्वतः-बद्दलची संपूर्ण माहिती दोन प्रतिष्ठित लोकांचे दाखले व पत्ता यासह सुपरिंटेंडेंट, डिस्ट्रिक्ट शेल्टर, जळगांव यांचेकडे द्यावयाची असते. या माहितीच्या अर्जाची छाननी एका खास कमिटीतर्फें करण्यांत येते.

संस्थेंत दाखल झाल्यावर जास्तींत जास्त १०–१२ आठवडे विनामूल्य आसरा, अन्न, वस्त्र मिळेल. संस्थेच्या मेडिकल ऑफिसरकडून जरूर ती वैद्यकीय मदतहि मिळते.

संस्थेंत दाखल झाल्यावर नोकरी मिळविण्याकरितां अगर स्वतःच्या धंद्यास सुरुवात करण्यासाठीं प्रत्येकास प्रयत्न करतां येतो. शक्य असेल त्याबाबत संस्थेकडून मार्गदर्शन किंवा मदत केली जाते. वरील मदत मिळाल्यामुळें सामान्य माणसास कांहीं दिवसांत स्वतःचे पायावर उभे राहणें शक्य होतें.

अपवादात्मक कारणामुळें एखाद्या व्यक्तीस ही मदत अपुरी आहे असें संस्थेच्या चालकांना वाटल्यास, अशा व्यक्तींना स्टेट होम (कल्याण धाम) कोल्हापूर या संस्थेंत त्यांच्या इच्छेनुसार पाठविलें जातें.

बालसुधार सदन

अनाथ, निराधार व कुमार्गाला लागलेल्या १६ वर्षांखालील दुर्वर्तनी मुलांसाठीं जळगांव येथें एक रिमान्ड होम किंवा बालसुधार सदन चालविलें जातें. सध्यां या बालसुधार सदनांत सुमारें ६० मुलें आहेत. त्यांच्या राहण्याची, जेवण्याची, कपडयालत्त्याची व शिक्षणाची सोय संस्थेमार्फतच केली जाते व त्यांना छोटेछोटे उद्योगधंदे शिकविले जातात. त्यांना चांगलें वळण लावून त्यांच्या वाईट संवयी दूर करण्याचेहि प्रयत्न केले जातात. डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲन्ड आफ्टर केअर असोसिएशन हें काम करतें. या संस्थेनें त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री. सुखटणकर यांच्या नेतृत्वाखालीं अनेक प्रकारें जिल्ह्यांत निधि गोळा करून जळगांव येथें रिमान्ड होमची इमारत सुमारें ६० हजार रु. खर्च करून बांधली आहे व त्यासाठीं सरकारनें रु. ११,००० मदत दिली. या संस्थेसाठीं सरकार प्रत्येक मुलामागें दररोजासाठीं एक रुपया याप्रमाणें मदत देतें व उरलेला खर्च संस्थेला मिळणाऱ्या देणग्यांमधून भागविला जातो. प्रामुख्यानें या देणग्या नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड व दानशूर व्यक्तींकडून दिल्या जातात. संस्थेमध्यें सध्यां सांस्कृतिक वर्ग, शिवणकामाचा वर्ग, हस्तव्यवसायवर्ग, हातमागाचा वर्ग, गायनवर्ग इ० वर्ग मुलांच्या कल्याणाकडे दृष्टीं ठेवून चालविले जातात. मुलांनीं केलेलें बगिचा-काम हें एक या ठिकाणचें आकर्षणच झालें आहे. मुलांसाठीं सर्वप्रकारचें क्रीडासाहित्यहि उपलब्ध आहे.

बॉम्बे प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स ॲक्ट

वरील कायदा जळगांव जिल्ह्यांत दि. ६–७–१९५९ पासून लागू करण्यांत आला. ह्या कायद्यान्वयें प्रथम गुन्हेगार, विशेषतः तरुण गुन्हेगार, ह्यांना शिक्षा करण्याऐवजीं कोर्ट त्यांना ताकीद देऊन अथवा चांगल्या वर्तणुकीचा बॉन्ड घेऊन सोडतें. मात्र ह्या कायद्याचा फायदा देण्यापूर्वीं कोर्ट त्याची घरची परिस्थिति, कोणत्या परिस्थितींत गुन्हा घडला, गुन्हेगाराची शारीरिक व मानसिक परिस्थिति इ० गोष्टींचा विचार करतें. अशा तऱ्हेनें गुन्हेगारांना एक वेळ सुधारण्याची संधि दिली जाते.

गुन्हेगाराच्या घरच्या व इतर परिस्थितीची माहिती चीफ ऑफिसर, (बॉम्बे प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स अॅक्ट) जळगांव हे कोर्टात सादर करतात. ता. १–१–१९६० पासून १५ डिसेंबर १९६० पर्यंत ६० केसेसबद्दल विचार करण्यांत येऊन २२ जणांना फायदा देण्यांत आला. इतर केसेस अद्याप निरनिराळ्या कोर्टांत चालू आहेत.

अनिष्ट संस्कार पुसून टाकणें हें जसें समाजसुधारणेचें काम आहे त्याचप्रमाणें इष्ट संस्कारांना व निरोगी वृत्तींना प्रोत्साहन देणें व त्यांचा विकास करणें हेंहि समाज कल्याणाचेंच कार्य आहे.

सांस्कृतिक कार्य

तेव्हां या दृष्टीनें समाज कल्याण खात्यामार्फत नाटच महोत्सव, तमाशा महोत्सव, कुस्तीगीर परिषदा, गरीब, असहाय्य अशा कलाकारांना आर्थिक सहाय्य देणें असे कार्यक्रम केले जातात. जळगांव येथें मराठी तमाशा परिषदेचें अधिवेशन ऑक्टोबर १९६० मध्यें भरलें होतें व त्या अधिवेशनास समाज कल्याण खात्यातर्फें मदत व सहकार्यहि देण्यांत आलें होतें. जळगांव येथें जिल्हा कुस्तीगीर परिषदेतर्फें १९६० चे ऑक्टोबर महिन्यांत १४ व १५ तारखांना विद्यार्थी विभाग व खुला विभाग यांचे प्रत्येकीं ८ गट पाडून कुस्त्यांचे सामने झाले व त्यांत ८० पहेलवांनांनीं भाग घेतला.

मध्यवर्ती समाज कल्याण मंडळ, राज्य समाज मंडळ व विकासगट यांच्या सहकार्यानें जिल्ह्यांत चार तालुक्यात समाज कल्याण प्रकल्प चालू आहेत. यावल, भुसावळ, भडगांव व अमळनेर येथें हे

मध्यवर्ति समाज कल्याण मंडळ

प्रकल्प चालू असून त्यांचेमार्फत स्त्रिया व मुलें यांच्या उन्नतीचें कार्य केलें जातें. प्रत्येक प्रकल्पासाठीं एक प्रकल्प अंमलबजावणी समिति असत व त्या समितीचें अध्यक्षपद समाजकार्य करणाऱ्या एका स्थानिक स्त्रीकार्यकर्तीकडे सोंपविलेले असते. या प्रकल्पांना विकासगटामार्फतहि मदत दिली जाते. प्रत्येक प्रकल्पामध्यें अनेक केंद्रें व उपकेंद्रें असतात. प्रत्येक केंद्रावर एक ग्रामसेविका व एक दाई नियुक्त केलेली असते. सर्व प्रकल्पांतील केंद्रावरील ग्रामसेविकांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठीं व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं एक मुख्य सेविका असते. प्रत्येक प्रकल्पासाठीं एक जीपहि दिलेली असते. या प्रकल्पासंबंधीं अधिक माहिती पुढें दिली आहे.

यावल तालुक्यांत ३८.६ चौ. मैल क्षेत्रांतील २२,७४८ लोकसंख्येची सेवा करण्यासाठीं हा प्रकल्प १४ नोव्हेंबर १९५६ रोजीं सुरुं झाला. या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष श्रीमती

यावल समाज कल्याण योजना

रमाबाई देशपांडे, एम्. एल्. ए. या असून हा जिल्ह्यांत सर्वप्रथम सुरू झालेला प्रकल्प आहे. या प्रकल्पाचीं केंद्रें हिंगाणें, अट्रावल, सांगवी बु., बामणोद व बोरखेडें बु. या गांवीं असून उपकेंद्रें हंबर्डी व बोरखेडे खु., राजोरें व सांगवी खु., चितोडे व सातोद, म्हैसवाडी व मारुळ या गांवीं आहेत. या केंद्रांमार्फत स्त्रियांसाठीं प्रौढ साक्षरता वर्ग, हस्तकौशल्याचे वर्ग, लहान बालकांसाठीं बालवाडया, बालकांना दूधवांटप, विनामूल्य वैद्यकीय सल्ला व औषधवांटप, ग्रामसफाई, स्त्रियांसाठीं हळदीकुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सण व उत्सव इ. प्रकारचे कार्यक्रम केले जातात.

दिनांक २८-२-१९५९ रोजीं सुरू झालेली भुसावळ समाज कल्याण योजना ही १०१ चौ०

भुसावळ समाज कल्याण योजना

मैलांतील ३५,८१७ लोकसंख्येची सेवा करते. या प्रकल्पाच्या अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष सौ. सुमतीबाई गोगटे या कार्यकर्त्या असून या प्रकल्पांत एकूण दहा केंद्रें फुगांव, टहाकळी, आचेगांव, बोदवड, एणआंव, जामठी, सुरवाडे, शिंदी, कन्होळे व सुनगांव येथें आहेत. कुन्हे हरदो व कुन्हें प्रगणें नशिराबाद येथें बालवाड्या आहेत. बालवाडींतील मुलांना मोफत दूधवांटप व प्रत्येक

बालवाडीस दरमहा रु० २५ मुलांना नास्ता देण्यासाठीं दिले जातात. स्त्रियांना शिवणकाम शिकविण्यासाठीं केंद्रावर शिवणकामाचे वर्ग चालविले जातात. तर कांहीं केंद्रावर स्त्रियांचे प्रौढ साक्षरता वर्ग सुरू आहेत. प्रकल्पामध्यें एकूण ५ दाई नेमल्या असून त्यांचा फायदा ग्रामीण स्त्रियांना प्रसूति, गरोदरपण, आजार अशावेळीं फार होतो. प्रत्येक केंद्राचीं ३ किंवा ४ उपकेंद्रें आहेत. या उपकेंद्रांवर दर आठवडयांतून किमान एकदां ग्रामसेविका, दाई व शिवणकाम शिक्षिका जातात. प्रत्येक केंद्रावर सण, उत्सव, राष्ट्रीय दिन व सप्ताह साजरे केले जातात व स्त्रियांसाठीं सांस्कृतिक कार्यक्रमहि आंखले जातात.

भडगांव समाज कल्याण योजना

ही योजना दिनांक १० जून रोजीं भडगांव महालांत सुरू झाली असून या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष सौ. मालतीबाई जकातदार या आहेत. या प्रकल्पांत भडगांव, वडजी पिंपळगांव, पिंपरखेड, कोळगांव व कजगांव या सहा ठिकाणीं केंद्रें उघडण्यांत आलीं असून प्रत्येक केंद्राखालीं कांहीं उपकेंद्रेंहि आहेत. या समाज कल्याण प्रकल्पामध्यें बालकांना नास्ता व दूध देणें, शिवणकला प्रशिक्षण केंद्र, हस्तकला शिक्षण, स्त्रियांचे प्रौढ साक्षरतावर्ग हीं कामें चालतात. वैद्यकीय मदतहि केंद्रांमार्फत दिली जाते. सण, उत्सव, राष्ट्रीय महत्वाचे दिन वगैरे साजरे करण्यांत येतात.

अमळनेर समाज कल्याण प्रकल्प

अमळनेर समाज कल्याण योजनेस दिनांक १ जुलै १९६० रोजीं प्रारंभ झाला. या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या अध्यक्ष कु० माणिक परब या आहेत. एकूण ४८ चौ० मैल क्षेत्रांतील ३३,६८३ लोकसंख्येची सेवा या प्रकल्पाद्वारें केली जाते. या प्रकल्पाचीं एकूण ९ केंद्रें मुडी, मांडळ, नांदेड, जानवे, दहिवद, जवखेडे, मारवड, वावडे व पातोंडे या गांवीं असून बालवाडी केंद्रें मुडी, मांडळ, नांदेड जानवें, दहिवडी व जवखेडे येथें आहेत. हस्तकला शिक्षण केंद्रें वावडे व पातोंडे येथें असून दाई केंद्रें मारवड, वावडे, अमळगांव व शिरुड येथें आहेत. या प्रकल्पामार्फत बालकल्याण, स्त्रियांचें आरोग्य व सांस्कृतिक विकास वगैरें कामें चालतात.

शबरी आश्रम

मध्यवर्ती समाज कल्याण मंडळ व राज्य कल्याण मंडळ यांच्या मदतीनें जळगांव जिल्ह्यांत यावल येथें शबरी आश्रम ही संस्था दिनांक १५ ऑगस्ट १९५९ पासून सुरुं झाली असून येथें सर्व जातींच्या २० ते ३५ या वयोमर्यादेतींल परित्यक्ता, निराधार विधवा अशा प्राथमिक ४थी पर्यंत शिक्षण झालेल्या स्त्रियांना प्रवेश दिला जातो. तेथें त्यांना २ वर्षे ठेवून घेऊन प्राथमिक शालान्त परीक्षेपर्यंतचें शिक्षण दिलें जातें व त्यानंतर कस्तुरबा ग्रामसेविका प्रशिक्षण केंद्रामध्यें पाठवून तेथें एक वर्ष ग्रामसेविका म्हणून त्यांची नेमणूक केली जाते. या सर्व स्त्रियांची भोजन, निवास, कपडे व शिक्षण वगैरे सर्व व्यवस्था आश्रमातर्फे केली जाते व त्यांना शालेय शिक्षणाशिवाय शिवणकला, भरतकाम, इ० चेंहि शिक्षण दिलें जातें. सुमारें २५ स्त्रिया येथें शिक्षण घेत असून या आश्रमाच्या व्यवस्थेसाठीं नेमलेल्या कमिटीच्या अध्यक्ष यावलच्या विधानसभा सदस्य श्रीमती रमाबाई देशपांडे या आहेत.

नव्या योजना

(१) **युवक मंडळ**—हें मंडळ जळगांव येथें नुकतेच सुरू करण्यांत आलें असून या योजनेचा उद्देश साधारणपणें १४ ते १८ या वयांतील मुलांना रोज कांहीं तास एकत्र आणून त्यांना खेळ,

करमणुकीचीं साधनें, वाचनालयें अशा सोयी पुरवून तीं वाममार्गाकडे वळणार नाहींत अशी प्रतिबंधक योजना करणें ही होय. या वयांत मुलें बिघडण्याचा संभव असतो व त्यासाठीं त्यांना रोज चांगले खेळ, चांगलें वाचन, चांगली करमणूक असे सुसंस्कार घडविले तर त्यांचे पाय अनिष्ट मार्गाकडे सहसा वळणार नाहींत.

(२) **सर्टिफाईड स्कूल** :—ही शाळा अमळनेर येथें नुकतीच सुरू झाली असून रिमान्ड होम मधून पाठविण्यांत येणाऱ्या १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना १८ वर्षांपर्यंत धंदेशिक्षण वगैरे देण्यासाठीं व त्यांना स्वतःचें जीवन स्वतःच्या पायावर जगण्यासाठीं जरूर ती तयारी करण्यासाठीं अशा सर्टिफाईड स्कूलची फार आवश्यकता असते.

वरील दोन्ही योजना राज्य समाज कल्याण विभागामार्फत सुरू करण्यांत आल्या असून आणखी एक तिसरी योजना सुरू करण्यांत येणार आहे. ही योजना म्हणजे मुलींचें बालसुधारसदन. हे सदन जळगांव शहरांत सुरुं करण्यांत येणार असून त्यासाठीं जागेची निवड झाली आहे

वैद्यकीय सुखसोयी

सर्व साधारणपणें जळगांव जिल्हा आरोग्यदृष्टच्या बरा आहे. जिल्ह्याचें आरोग्यमान एकंदरीतं ठीक आहे. जिल्ह्याचें हवामान तसें रोगट नाहीं. आरोग्यविघातक संवयी इतरत्र ज्या दिसतात त्याच येथेंहि आहेत. घरें स्वच्छ ठेवण्याकडे लोक लक्ष देतात पण घराभोंवतीचें आवार स्वच्छ ठेवण्याकडे सर्वांचें दुर्लक्ष असतें व त्यामुळें घाण सांठून, डांस वाढून आरोग्य बिघडतें. त्याचप्रमाणें खेडचांतून व शहरांतूनहि लहान मुलेंच काय पण मोठे स्त्री-पुरुषहि रस्त्याच्या कडेनें प्रार्तविधीस बसतात. खानदेशांत हें गलिच्छ दृश्य सर्वत्र दिसतें. ग्रामपंचायतींनीं संडास बांधून व त्यांचा उपयोग करण्याचें वळण गांवकऱ्यांना लावून ही घाणेरडी संवय बंद केली पाहिजे. नगरदेवळे येथील ग्रामपंचायतीनें हें काम केलें आहे व सोनखताचें मोठें उत्पन्नहि त्यांतून त्या पंचायतीस मिळत आहे. या ग्रामपंचायतीचें अनुकरण हळूहळू इतरत्रहि होत आहे.

आरोग्यमान

या जिल्ह्यांत सार्वत्रिकपणें आढळणारे रोग म्हणजे, कॉलरा, देवी, मलेरिया इ० होत. त्यापैकीं देवीची सांथ कांहीं विशिष्ट भागांतच पसरते असें नाहीं तर ती सर्वत्र आढळते. तथापि सार्वत्रिक देवी टोंचण्याच्या मोहिमा हातीं घेतल्यामुळें या सांथीला आतां बव्हंशीं आळा बसला आहे व आतां फक्त तुरळक केसेसच आढळतात.

कॉलऱ्याचा प्रादुर्भाव तापी, गिरणा नद्यांच्या पाण्याचा उपयोग जेथें पिण्यासाठीं केला जातो अशा दोन्हीं कांठच्या गांवांत प्रथम होतो. हीं गांवें रावेर, एदलाबाद, भुसावळ, जळगांव, चोपडें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें व चाळीसगांव या तालुक्यांत आहेत. अर्थात् सांथ उद्भवतांच जरुर ती उपाय योजना सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत केली जाते व त्यामुळें सांथ आटोक्यांत येते.

जळगांव जिल्ह्यांत सरकारी रुग्णालयें तीन आहेत. जळगांव येथील हॉस्पिटल, चोपडे येथील कॉटेज हॉस्पिटल व भुसावळ येथील रेल्वे हॉस्पिटल हीं होत. या तिन्हीं रुग्णालयांतून ''क्ष''किरण चिकित्सेची व्यवस्था आहे. याशिवाय जळगांव शहरांत नगरपालिकेचें साने गुरुजी रुग्णालय असून शिवाय पांच खाजगी रुग्णालयें आहेत. डॉ. देसाई यांचें हॉस्पिटल, डॉ. बेंडाळे यांचें नर्सिंग होम, डॉ. दावलक्त यांचें नर्सिंगहोम, डॉ. आठवले यांचें डोळचांचें हॉस्पिटल, डॉ. बाकरे यांचें डोळचांचें हॉस्पिटल, अशीं पांच रुग्णालयें आहेत. भुसावळ येथें डॉ. गरूड यांचें

रुग्णालयें

वैद्यकीय सुखसोयी



लासूर
वीरवाडें
धानोरे
अडावद
चोपडें
घोडगांव
कुरवेल
किनगांव
मारूळ
न्हावी
सिवरोदे
रावेर
फैजपूर
सावदे
निंभोरे
ऐनपूर
अंतुर्ली
यावल
पाडळसे
वाघोदे
नांदेड
भोकर
असळगांव
पातोंडें
चांदसर
कानळदे
चांगदेव
एदलाबाद
निमखेडे
वढोदे
काकोडे
सांडळे
शिरसाळें
साळवे
सोनवद
भादली
भुसावळ
वरणगांव
अमळनेर
धरणगांव
जळगांव
किन्ही
वराड
नशिराबाद
पिंपळगांव
ढोळवे
एरंडोल
बोदवड
बहादरपूर
पारोळे
म्हसावद
नेरी
कासोद
जामनेर
वेटावद
तामसाडी
शिरसमणी
उत्राण
नांद्रे
तळेगांव
कुऱ्हाड
शिरड
भडगांव
पाचोरा
वरखेडी
वाकडी
फत्तेपूर
शेंदुर्णी
लोहारें
खेडगांव
नगरदेवळे
मेहूणबारे
कजगांव
लेंडपूर
उंबरखेडे
बाघळी
म्हाळशेवगे
चाळीसगांव
तळेगांव
लोणजे
तपशील
कुष्ठरोग निवारण केन्द्र
सिव्हिल हॉस्पिटल
स्था. स्व. संस्थाचे ॲलोपेथिक दवाखानें
कॉटेज हॉस्पिटल
माता व बालसंगोपन केन्द्र
लोकल बोर्डाचे आयुर्वेद दवाखानें
एस.एस.पी. सेंटर्स
प्राथमिक आरोग्य केन्द्र
कुटुंब नियोजन केन्द्र
कुष्ठरोग तपासणी शिक्षण उपचार केन्द्र

एक स्त्री-रोगाचें हॉस्पिटल आहे, त्याचप्रमाणें अमळनेर येथें प्रताप हॉस्पिटल हें खाजगी रुग्णालय त्यासाठीं नेमलेल्या विश्वस्तांमार्फत चालविलें जातें. तसेंच डॉ. म्हसकर यांचेंहि एक खाजगी रुग्णालय आहे. या दोन्हीं रुग्णालयांत "क्ष" किरण चिकित्सेची व्यवस्था आहे. चाळीसगांव येथेंहि डॉ. पूर्णपात्रे यांचें व डॉ. व्ही. आर. कुळकर्णी यांचें खाजगी रुग्णालय आहे. अशा तऱ्हेनें जिल्ह्यांतील चार प्रमुख शहरीं रुग्णालयें आहेत. या सर्व रुग्णालयांतून ऑपरेशन्सची व्यवस्था आहे. जळगांव येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें ७० खाटांची सोय आहे व क्षय रोग्यांसाठीं १२ खाटांचा स्वतंत्र वॉर्ड आहे. याशिवाय या सिव्हिल हॉस्पिटलमध्यें "क्ष" किरण विभाग, प्रयोगशाळा, सूतिकागृह, मानसिक रोग्यांचा विभाग, पोलिस विभाग, स्त्री विभाग, पुरुष विभाग, बाल विभाग, कुटुंब नियोजन विभाग, रक्तदान पेढी इ० विभाग आहेत. रक्तदान पेढीचा विभाग नुकताच सुरू केला आहे. चोपडें येथील कॉटेज हॉस्पिटलमध्यें २० खाटांची व भुसावळ येथील रेल्वेच्या हॉस्पिटलमध्यें २६ खाटांची सोय आहे. चाळीसगांव येथें एक डोळ्यांचें हॉस्पिटल असून तें लॉईड रिलीफ असोसिएशनतर्फे चालविण्यांत येतें.

दवाखाने.

या जिल्ह्यांत सरकारी दवाखाने नाहींत. तथापि जळगांव, रावेर, सावदें, यावल, चोपडें, फैजपूर, अमळनेर, पाचोरें, चाळीसगांव, भुसावळ, पारोळे, एरंडोल व धरणगांव या १३ गांवीं नगरपालिकांचे दवाखाने आहेत. या सर्व दवाखान्यांतून रोग्यांना ठेवण्यासाठीं कांहीं खाटांची सोय करण्यांत आली आहे. चाळीसगांव, अमळनेर येथील दवाखान्यांत अँन्टिरॅबिक सेंटर्सहि आहेत.

याशिवाय जिल्हा लोकलबोर्डानें जामनेर, शेंदूर्णी व फत्तेपूर, एदलाबाद पेट्यांतील एदलाबाद, भुसावळ तालुक्यांतील बोदवड, व भडगांव पेट्यातील भडगांव या सहा गांवीं अॅलोपॅथिक दवाखाने चालविले आहेत. या सर्व दवाखान्यांत रोग्यांना ठेवण्याची सोय आहे. यापैकीं ५ दवाखान्यांत सरकारी मेडिकल ऑफिसर व एका दवाखान्यांत बोर्डाचे मेडिकल ऑफिसर आहेत. मेडिकल ऑफिसरशिवाय कंपौन्डर वगैरे इतर सर्व नोकरवर्ग बोर्डाचाच आहे व औषधेंहि बोर्डामार्फत पुरविण्यांत येतात. सरकारी मेडिकल ऑफिसरांचे पगारावर बोर्डाकडून सरकारला ग्रॅन्ट दिली जाते. या सर्व दवाखान्यांत वर्षाकांठीं सुमारें ७० हजार रोग्यांवर उपचार केले जातात.

त्याचप्रमाणें जिल्हा लोकल बोर्डाचे आयुर्वेदिक दवाखाने पुढील ३६ गांवीं आहेत.

तालुका रावेर	.	वाघादें, निंभोरे व खिरोदे.
तालुका यावल	.	मारुळ, पाडळसें व न्हावी.
तालुका चोपडे	.	धानोरे व कुरवेल.
तालुका अमळनेर	.	नांदेड, पातोंडे, मांडळ.
तालुका एरंडोल	.	उत्राण, सोनबद.
तालुका पारोळे	.	वहादरपूर, उंदीरखेडें व शिरसमणी.
तालुका चाळीसगांव	.	उंबरखेडें, मेहुणबारे, माळशेव्हगे, बहाळ.
तालुका पाचोरे	.	नगरदेवळें, वरखेडी व नांद्रे.
तालुका जामनेर	.	तळेगांव, तोंडापूर व नेरी.
तालुका भुसावळ	.	पिंपळगांव, वराडसिम व किन्ही.
तालुका जळगांव	.	नशिराबाद, म्हसावद व भादली.
पेटा एदलाबाद	.	कुऱ्हें, काकोडे व चांगदेव.
पेटा भडगांव	.	कजगांव व गुटे.

ज्या भागांत खाजगी अगर सरकारी वैद्यकीय मदत उपलब्ध नाहीं अशाच ठिकाणीं हे दवाखाने आहेत. या दवाखान्यावर बोर्डानें आयुर्वेदिक वैद्य व इतर नोकरवर्ग नेमला आहे. या वैद्यांना लसटोंचणीचेंहि शिक्षण दिलेलें असल्यानें सांथीच्या रोग्यांच्या वेळीं सामुदायिक लसटोंचणीच्या मोहिमेंत त्यांचा उपयोग होतो. या सर्व दवाखान्यांत दरसाल सुमारें ३,५०,००० रोग्यांवर उपचार केले जातात.

याशिवाय पुढील २५ गांवीं मदतीची वैद्यकीय व्यावसायिकांचीं केंद्रें (एस्. एम्. पी सेंटर्स) आहेत.

रावेर तालुका	.	ऐनपूर.
यावल तालुका	.	किनगांव.
चोपडा तालुका	.	लासूर, घाडगांव व विरवाडे.
एरंडोल तालुका	.	चांदसर, कासोदें व साळवें.
अमळनेर तालुका	.	शिरसाळे, अमळगांव.
पारोळे तालुका	.	तामसवाडी, शेळवे.
चाळीसगांव तालुका	.	वाघळी, लोणजे.
पाचोरे तालुका	.	लोहारे, कुरहाड
जामनेर तालुका	.	बेटावद.
एदलाबाद पेटा	.	निमखेडी बु., अंतुर्ली, वढोदे.
जळगांव तालुका	.	कानळदे, भोकर.
भडगांव पेटा	.	गिरड.
सर्वोदय विभाग	.	पाल, गौलखेडें.

यांपैकीं सर्वोदय विभागांतील दवाखाने सर्वोदय योजनेमार्फत व उरलेल्या २३ ठिकाणचीं केंद्रें जिल्हा लोकल बोर्डामार्फत चालविलीं जातात. या सर्व केंद्रांचा फायदा सुमारें ८० हजार रोग्यांना दरसाल होतो. या केंद्रांचा एक पंचमांश खर्च बोर्डाकडून होतो.

सूतिकागृहें

जळगांव जिल्ह्यांत सरकारी सूतिकागृहें, जळगांव येथील सिव्हिल हॉस्पिटल, अडावद, वरणगांव व एदलाबाद येथें आहेत. शिवाय नगरपालिकेतर्फे भुसावळ, जळगांव, चाळीसगांव, धरणगांव, यावल, अमळनेर, सावदें व फैजपूर येथें सूतिकागृहांची सोय केली आहे. ह्याखेरीज खाजगी सूतिकागृहें जळगांव शहरांत ५, भुसावळ शहरांत ३, चाळीसगांव शहरांत २ व अमळनेर शहरांत १ अशी आहेत.

याशिवाय जिल्ह्यांतील ग्रामीण व मागासलेल्या भागांतील स्त्रियांना प्रसूतिज्ञान अवगत व्हावें म्हणून माहिती देण्यासाठीं जिल्ह्यांत बोर्डानें १४ दाया नेमल्या असून प्रत्यक्ष प्रसूतीच्या वेळीं ग्रामीण स्त्रियांना त्यांचा फार उपयोग होतो.

प्राथमिक आरोग्य केंद्रें

विकासगटामध्यें प्राथमिक आरोग्यकेंद्रें सुमारें ६०,००० लोकसंख्येस १ याप्रमाणें सुरूं करण्यांत येत असून त्या प्रत्येक केंद्राचीं कांहीं उपकेंद्रें असतात. या प्रत्येक केंद्रासाठीं एक वैद्यकीय अधिकारी, एक जीप व त्याचे हाताखालीं मिडवाइफ, आरोग्यप्रचारिका इ० नोकरवर्ग असतो. याप्रमाणें एदलाबाद पेट्यांतील एदलाबाद, चोपडें तालुक्यांतील अडावद, भुसावळ तालुक्यांतील वरणगांव, जामनेर तालुक्यांतील वाकडी, चाळीसगांव तालुक्यांतील खेडगांव व तळेगांव या ठिकाणीं प्राथमिक आरोग्यकेंद्रें सुरूं झालीं असून यथावकाश प्रत्येक विकासगटांत तीं सुरूं होतील.

माता व बालसंगोपन केंद्रें माता व बालसंगोपन केंद्रें या जिल्ह्यांत भडगांव व बोदवड या दोन ठिकाणीं चालू असून त्यांचा फायदा त्या केंद्राभोंवतालच्या १०-११ हजार लोकसंख्येस होतो.

दवाखान्यांत उपचार केलेले रुग्ण

जळगांव जिल्ह्यांतील सर्व सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांचे दवाखाने व रुग्णालये यांमध्यें १९५८-५९ सालांत एकूण १३,३१८ रोग्यांना दाखल करून घेऊन (इन्डोअर पेशंट) त्यांच्यावर उपचार करण्यांत आले आणि २११२६२ रोग्यांना दवाखान्यांत दाखल करून न घेतां उपचार करण्यांत आले. (आउट डोअर पेशंट)

जिल्ह्यांतील जन्ममृत्यू

जळगांव जिल्ह्यांत १९५९ सालांत एकूण ६८,९६१ बालकांनीं जन्म घेतला व त्याच वर्षांत एकूण मृतांची संख्या ३४,०५७ झाली. त्यापैकीं बालमृत्युसंख्या ७,८७६ होती. याचाच अर्थ दर हजारीं बालमृत्यूचें प्रमाण १११.३ टक्के पडलें.

कुष्टरोग निवारण केंद्रें

कुष्टरोग्यांना मोफत औषधोपचार करून रोगाचें समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीनें सरकारनें सावदा येथें जानेवारी १९५८ मध्यें एक कुष्टनिवारण केंद्र स्थापन केलें आहे. त्याचा फायदा ४० गांवांना होतो. या हेतुनुसार केंद्र खालील कार्य करीत आहे.

(१) आरोग्य तपासणी (सर्व्हे) द्वारा कुष्टरोगी शोधून काढणें.
(२) सर्व कुष्टरोग्यांना मोफत औषधोपचार करणें.
(३) कुष्टरोग्यांच्या संपर्कात येणाऱ्या निरोगी लोकांची वारंवार तपासणी करणें.
(४) कुष्टरोगाविषयीं प्रचार करणें व लोकांना त्या विषयींचें सामान्यज्ञान देणें.
(५) रोगी व त्याच्या अवलंबितांसाठीं समाजकल्याणकार्य करणें.

वरील कार्य सुलभतेनें व जास्त परिणामकारक रीतीनें व्हावें म्हणून हें केंद्र फक्त ८०,००० लोकसंख्येच्या नियुक्त क्षेत्रांत काम करीत आहे. या नियुक्त क्षेत्रांत सावदा व फैजपूर भोंवतालचीं रावेर व यावल तालुक्यांतील एकूण ४० गांवें घेतलेलीं आहेत. त्यापैकीं आजपावेतों ३३ गांवांची व तसेंच नियुक्त क्षेत्रांतील सर्व शाळांची आरोग्यतपासणी करण्यांत आलेली आहे. आजपर्यंत या क्षेत्रांत ६३५ रोगी आढळून आलेले आहेत. तसेंच नियुक्त क्षेत्राच्या बाहेरचेहि ३१५ रोगी या केंद्राद्वारा संचालित अन्य उपचार केंद्रावरून मोफत औषधोपचार घेत आहेत.

रोग्यांच्या सोयीच्या दृष्टीनें केंद्राद्वारा सावदा, फैजपूर येथें साप्ताहिक आणि पाडळसा, हिंगोणा, यावल, खिरोदा, निंभोरा व रावेर येथें पाक्षिक उपचारकेंद्रें उघडलेलीं आहेत.

तसेंच जळगांव येथील सिव्हिल हॉस्पिटल, एरंडोल, चाळीसगांव येथील नगरपालिकांचे दवाखाने, शेंदुर्णी येथील जिल्हा लोकलबोर्डाचा दवाखाना व एदलाबाद आणि चोपडें तालुक्यांतील अडावद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रें अशा सहा ठिकाणीं सरकारनें तपासणी-शिक्षण-उपचार (एस्.

इ. टी.) केंद्रें उघडलीं असून त्यासाठीं प्रत्येक ठिकाणीं खास कुष्टरोग सहाय्यक नेमले आहेत. या प्रत्येक सहाय्यकाच्या कक्षेंत केंद्राभोंवतालची ५० हजार लोकसंख्येंचीं खेडीं येतात व त्यांत चार पाक्षिक उपकेंद्रें चालवितात.

याशिवाय भुसावळ येथील कुष्टसेवा मंडळ, जामनेर येथील गांधी स्मारक कुष्टनिवारण योजना, एरंडोल तालुका विधायक समिती इ० खाजगी संस्था स्वयंस्फूर्तीनें कुष्टनिवारणाचें कार्य करीत आहेत.

फिरता दवाखाना

जळगांव जिल्ह्यांत जंगल भागांत सातपुड्यालगत राहणाऱ्या मागासलेल्या लोकांना वैद्यकीय मदत मिळावी म्हणून मोटारीवरील एक फिरता दवाखाना यावल येथें ठेवला आहे व त्याचा फायदा डोंगराळ भागांतील लोकांना होतो.

क्षयरोग सॅनेटोरियम

जळगांव शहराच्या लगत पिंप्राळे येथें डॉ. बेंडाळे यांनीं एक क्षयरोग्यांसाठीं खाजगी सॅनेटोरियम चालविलें आहे.

परिचारिकांचें शिक्षण

जळगांव शहरांतील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें दाई व परिचारिका यांच्या प्रशिक्षणाची सोय असून सुमारें ४४ परिचारिका येथें शिक्षण घेतात. परिचारिकांच्या निवासाची अडचण येथें फार भासत असे म्हणून येथें परिचारिकांचें निवासस्थान बांधण्यांत येत आहे. जनरल नर्सिंग कोर्स व ऑक्झिलियरी नर्स मिडवाइफ कोर्स हे दोन अभ्यासक्रम येथें आहेत. याशिवाय भुसावळ येथील नगरपालिकेचा दवाखाना व अमळनेर येथील प्रताप चॅरिटेबल हॉस्पिटल येथें दाई ट्रेनिंग कोर्स आहे. याशिवाय दुसरी कोणतीहि वैद्यकीय शिक्षणाची सोय येथें नाहीं.

या जिल्ह्यांत आरोग्यधामें (हेल्थ सेंटर्स) अद्याप कोठें सुरू केलीं नाहींत.

वैद्यकीय व्यावसायिक

जळगांव जिल्ह्यांत वैद्यकीय व्यावसायिकांची एकूण संख्या सुमारें ५०० असून सुमारें ३००० लोकसंख्येस एक डॉक्टर हें प्रमाण पडतें.

मेडिकल असोसिएशन

जळगांव जिल्ह्यासाठीं रेडक्रॉस सोसायटीची एक शाखा आहे व इंडियन मेडिकल असोसिएशनची एक शाखा जळगांव येथें आहे. भुसावळ, चाळीसगांव, चोपडे, पाचोरें, यावल, अमळनेर येथेंहि मेडिकल असोसिएशन्स स्थापन झाल्या आहेत. महापूर, दुष्काळ, या सारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळीं व नेत्रदानयज्ञ, शस्त्रक्रियाशिबिर, कुटुंबनियोजन शिबिर अशा महत्त्वाच्या प्रसंगीं या असोसिएशन्स सर्वप्रकारें मदत करतात. जळगांव येथील इंडियन मेडिकल असोसिएशननें लहान मुलांना घटसर्प, धनुर्वात व डांग्या खोकला असे सांथीचे रोग होऊं नयेत म्हणून अल्प खर्चांत लस टोंचण्याची व्यवस्था केली आहे. ही संस्था स्वतःची इमारत बांधण्याच्या प्रयत्नांत आहे. याशिवाय जळगांव येथील नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. बाकरे हे नेत्ररोगासंबंधीचे अपसमज, हानिकारक गांवठी उपचार हे दूर करण्यासाठीं व जनतेला शास्त्र-

शुद्ध माहिती देण्यासाठीं आपल्या अंधत्व प्रतिबंधक संस्थेमार्फत अनेकप्रकारें प्रचार करतात. जळगांव येथील इं. मे. असोसिएशन त्यांची स्वत:ची इमारत होतांच बी. सी. जी. लस टोंचणी केंद्र, रक्तपेढी व क्षयरोग केंद्र हीं तीन केंद्रें सुरू करणार आहे.

जळगांव जिल्ह्यांत पूर्वी मलेरियाचा प्रसार असे. विशेषत: सातपुड्यालगतच्या खेड्यांत पावसाळ्यानंतर मलेरियाचा जोर वाढत असे. परंतु १९५३ पासून या जिल्ह्यांत राष्ट्रीय मलेरिया नियंत्रण योजनेचें काम सुरू झालें व १९५८ मध्यें या योजनेचें रूपांतर राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन कार्यक्रमामध्यें झालें. या योजनेनुसार दरसाल १५ मे ते १५ ऑक्टोबर या पांच महिन्यांत घरोघर दोन वेळां दर अडीच महिन्यांनंतर डी. डी. टी. फवारण्यांत येतें व त्यासाठीं सार्वत्रिक प्रमाणांत डी. डी. टी. फवारण्याची मोहिम सार्वजनिक आरोग्यखात्यामार्फत पथकें नेमून हातीं घेण्यांत येते. त्याचा परिणाम फार चांगला झाल्याचें दिसून येत आहे.

मलेरिया निर्मूलन

डी. डी. टी. फवारण्याचे कामानंतर २ ते १० वर्षांच्या मुलांची तपासणी करून त्यांचे स्प्लीन वाढलें आहे काय हें पाहण्यांत येतें. लहान अर्भकें व मुलें यांच्या रक्ताची तपासणी करून त्यांत मलेरियाचे जंतू किती आढळतात हेंहि पाहिलें जातें. त्याचप्रमाणें या जिल्ह्यांतील सरकारी, नगरपालिकेचे व जिल्हा लोकलबोर्डाचे दवाखान्यांतून मलेरियाचे किती रोगी येतात याचीहि माहिती गोळा केली जाते.

या सर्व माहितीवरून या जिल्ह्यांतील मलेरियाला चांगला आळा बसल्याचें दिसून येईल. १९५२ मध्यें या जिल्ह्यांत मलेरियाचे रोगी ३८८०८ होते तर १९५९ मध्यें ही संख्या ३६०१ इतकी कमी झाली आहे. मलेरियाचे रोगास बळी पडलेल्यांची संख्या १९५३ मध्यें ३४४९ होती तर १९५९ मध्यें ती संख्या फक्त २३५ होती. एकंदर रोग्यांच्या संख्येंत मलेरियाचे रोगी १९५२ मध्यें सुमारें १६ टक्के असत तें प्रमाण १९५९ मध्यें १.४ टक्के कमी झालें आहे. त्याचप्रमाणें १९५२ मध्यें स्प्लीन वाढल्याचें प्रमाण २४ टक्के आढळलें होतें तें प्रमाण १९५९ मध्यें ०.१८ टक्के इतकें अल्प झालें आहे. तद्वतच मुलांच्या रक्ततपासणींत १९५२ मध्यें १६ ते १८ टक्के प्रमाण मलेरिया जंतूचे दिसत असे तें प्रमाण आतां शून्यावर आलें आहे. यावरून मलेरिया निर्मूलन मोहिमेस भरघोस यश आल्याचें सिद्ध होईल. डी. डी. टी. फवारण्याचें हें काम फार तर आणखी एक वर्ष म्हणजे १९६१ सालीं चालू राहील व त्यानंतर तें बंद करण्यांत येईल.

आतां संशयित मलेरियाच्या रोग्यांचें प्रत्यक्ष तपासणीचें काम या जिल्ह्यांत सुरूं झालें आहे. याला ॲक्टिव्ह सर्व्हिलन्स प्रोग्रॅम म्हणतात. या कार्यक्रमानुसार दर पंधरवड्यांत घरोघर हिंडून तापानें आजारी असलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यांत येते. त्या रक्ततपासणींत मलेरियाचे जंतु आढळल्यास त्यावर मलेरियाप्रतिबंधक औषधें देण्यांत येतात. प्रत्येक सर्व्हिलन्स वर्करकडे सुमारें ११००० लोकसंख्या दिली आहे. तेवढ्या लोकसंख्येच्या क्षेत्रांत त्याला प्रत्येक घरीं दर पंधरवड्यास जावें लागतें. असे १३९ सर्व्हिलन्स वर्कर्स व ३५ सर्व्हेलन्स इन्स्पेक्टर्स या कामासाठीं नेमण्यांत आले आहेत. मलेरियाचा रोगी आढळल्यास सर्व्हेलन्स इन्स्पेक्टर तेथें जाऊन पांच दिवस मलेरियावरील औषधांची उपाय योजना करतो.

प्रत्यक्ष देखरेखीचा कार्यक्रम

मलेरिया व इतर कीटकांमुळें पसरणाऱ्या रोगांसाठीं नॅशनल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेनें ठेवलेली ढाल जळगांव येथील मलेरिया निर्मूलन केंद्रास १९५५–५६ मध्यें मिळाली होती.

जिल्ह्यांतील शहरी व ग्रामीण भागांत सर्वसामान्य आरोग्य सुस्थितींत राखणें, यात्रा, उत्सव, उरुस, मेळावे, प्रदर्शनें अशा लोकांचा मोठा जमाव एकत्र होणाऱ्या प्रसंगीं आरोग्याची व्यवस्था राखणें, सांथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास तात्काळ प्रतिबंधक उपाय योजणें, सर्वसाधारण काळांत देवीप्रतिबंधक लस टोंचणें, जन्ममृत्यूच्या नोंदी तपासणें, खानावळी, हॉटेलें, चित्रपटगृहें वगैरेंची स्वच्छतेच्या दृष्टीनें तपासणी करणें, ग्रामीण जनतेला आरोग्यविषयक संवयी लावणें, विहिरींच्या पाण्यांत जंतुनाशक औषध टाकून तें जंतुविरहित करणें इ० कामें सार्वजनिक आरोग्य खात्याचे नोकरवर्गातर्फे जिल्ह्यांत केलीं जातात. जिल्हा पातळीवर जिल्हा आरोग्याधिकारी हे या प्रतिबंधक उपाययोजनेचे प्रमुख असून त्यांचे हाताखालीं दोन साथीच्या रोगाचे आरोग्याधिकारी, ६ सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, ७ सॅनिटरी सब-इन्स्पेक्टर्स, २१ व्हॅक्सिनेटर्स व ९ स्वच्छता पथकें आहेत. त्याशिवाय विशेष निकडीच्या व सांथीच्या प्रसंगीं इतर जिल्ह्यांतूनहि नोकरवर्ग मागविला जातो. सॅनिटरी इन्स्पेक्टर्स जळगांव, अमळनेर, पाचोरें, एरंडोल, भुसावळ व यावल येथें असून सब इन्स्पेक्टर्स चाळीसगांव, जामनेर, एदलाबाद, फैजपूर, चोपडें पारोळें व अमळनेर येथें आहेत. स्वच्छता पथकांत एक मुकादम व ३ मजूर असतात. ग्रामीण भागांत स्वच्छता राखण्यासाठीं उपाययोजना करणें, घरें, पाणोठे यांची स्वच्छता राखणें, केरकचरा व मलमूत्र यांचा उपयोग खतें बनविण्याकडे करणें, कंपोस्ट खड्डे, शोषखड्डे इ० बाबतींत जनतेला प्रात्यक्षिकाद्वारें शिक्षण देणें इ० कार्यें या पथकामार्फत केलीं जातात. ठिकठिकाणच्या नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड, ग्रामपंचायती या स्थानिक संस्थांशीं सहकार्य करून या संस्थांचा आरोग्यविषयक नोकरवर्ग व साधन सामुग्री यांचा उपयोगहि आरोग्यरक्षणार्थ केला जातो व जिल्हा आरोग्याधिकारी त्यांनाहि सल्ला-मसलत देऊन मार्गदर्शन करतात. तद्वतच विकासगटांतील प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्याधिकारी व त्यांचे हाताखालील मिडवाईफ, नर्सेस, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, आरोग्य प्रचारिका इत्यादींच्या कामावरहि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची तांत्रिक देखरेख असते व त्यांनाहि मार्गदर्शन केलें जातें. प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व प्रकारची सिद्धता करण्याचें कामहि त्यांच्याच सूचनेनुसार होतें.

आरोग्यविषयक प्रतिबंधक योजना


जिल्ह्याच्या रक्तवाहिन्या–दळणवळणाचीं साधनें

कोणत्याहि प्रदेशाच्या आर्थिक विकासासाठीं वाहतूक व दळणवळणाच्या सुखसोयींची उपलब्धता ही अत्यावश्यक गणली जाते. या साधनांच्या अभावीं त्या भागाच्या आर्थिक विकासाच्या मार्गांत अडथळे उत्पन्न होतात व विकासाची गति कुंठते. खेडीं व शहरें यांमधील आज दिसणारें अंतर त्यांना परस्पर जोडणारीं दळणवळणाचीं साधनें उपलब्ध होतांच आपोआपच कमी होईल. शेतीमाल व दुधदुभतें त्यांची मागणी असणाऱ्या बाजाराच्या गांवीं सुलभतेनें व वेगानें नेण्यासाठीं दळणवळणाच्या सोयी वाढल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें कारखान्यांना लागणारा कच्चा माल आणण्यासाठीं व पक्का माल निर्यात करण्यासाठीं वाहतुकीची सोय अत्यावश्यक आहे. तेव्हां रेल्वे, रस्ते, जलमार्ग व वायुमार्ग इ० दळणवळणाचीं साधनें हीं देशाच्या प्रगतीचे राजमार्ग आहेत.

प्रगतीचे राजमार्ग

४४६७ चौ. मैल क्षेत्रफळ व १९६१ च्या जनगणनेप्रमाणें १७,६५,४६१ लोकसंख्या असलेला जळगांव जिल्हा हा महाराष्ट्रांतील एक विकसित जिल्हा गणला जातो. तथापि रस्त्यांच्या दृष्टीनें हा जिल्हा कांहींसा मागासलेलाच म्हणावा लागेल. कारण रस्त्यांवर जागोजागीं आडव्या येणाऱ्या नद्या व नाले यांवर पुरेसे पूल नसल्यानें वाहतुक पावसाळ्यांत खंडित होते. अर्थात् महाराष्ट्र राज्य सरकार या बाबतींत जागरूक झालें असून आतां रस्तेसुधारणा व पुलांचीं कामें झपाट्यानें हातीं घेण्यांत येत आहेत.

दळण वळण



तपशील
रेल्वे व स्टेशन
मोटार रस्ता
कच्ची सडक
शिरपुराहून
आडगांव
चोपडे
अडावद
धानोरे
किनगांव
हिंगोणे
फैजपूर
सावदे
निंभोरे
नागपुरास
अमळनेर
धरणगांव
जळगांव
भुसावळ
वरणगांव
एदलाबाद
पारोळे
एरंडोल
शिरसोली
पिंपळे
चिंचोली
बोदवड
जामनेर
पहूर
पिंपळगांव
पाचोरे
भडगांव
वाकडी
अजंठा
चाळीसगांव
भडगांव
देवळी
शिरपूर
रोहिणी
मुंबईकडून
सेन्ट्रल रेल्वे
औरंगाबाद

१६४८ मैलाचे रस्ते

या जिल्ह्यांत 'सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर' हा एकच राष्ट्रीय मार्ग (नॅशनल हायव नं. ६) असून त्याची या जिल्ह्यांतील लांबी ८८ मैल ४ फर्लांग आहे. याशिवाय राज्यमार्ग (स्टेट हायवे) चार असून त्यांची जिल्ह्यांतील एकूण लांबी २४४ मैल व १ फर्लांग आहे. प्रमुख जिल्हा मार्ग (मेजर डिस्ट्रिक्ट रोडस्) एकूण १० असून त्यांची एकूण लांबी १९१ मैल ३ फर्लांग आहे. याशिवाय इतर जिल्हा मार्ग (अदर डिस्ट्रिक्ट रोडस्) एकूण ४३ असून त्यांची एकत्रित लांबी ३६२ मैल ४ फर्लांग भरते. याखेरीज एकूण २७६ गांवरस्ते (व्हिलेज रोडस्) असून त्यांची लांबी ७६१ मैल ४ फर्लांग आहे. या सर्व रस्त्यांची लांबी एकंदर १६४८ मैल आहे. नागपूर योजनेप्रमाणे या जिल्ह्यांत एकूण २०४२ मैलांचे रस्ते हवेत. तेव्हां त्या तुलनेनें हे रस्ते सुमारें ८३ टक्के पडतात. म्हणजे नागपूर योजनेच्या हा जिल्हा १७ टक्के मागें आहे. या १६४८ मैलांपैकीं सिमेंट कांक्रीटचे रस्ते फक्त १६ मैल ४ फर्लांगाचे आहेत. अस्फाल्ट पृष्ठभागाचे रस्ते ६५ मैल २ फर्लांग असून ५४५ मैल ३ फर्लांग रस्ते हे पक्के खडीचे तर १०१० मैल ७ फर्लांग रस्ते हे मुरुम मातीचे आहेत. यावरून असलेल्या रस्त्यांपैकीं ६१ टक्के रस्ते हे मुरुममातीचे आहेत हें दिसून येईल. त्याचप्रमाणें रस्त्यावर जागोजागीं मोऱ्या, फरशा व पूल नसल्याचें आढळतें. शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर हा राज्यमार्ग आहे. या मार्गाच्या या जिल्ह्यांतल्या भागांत ९६ ठिकाणीं केवळ नैसर्गिक क्रॉसिंग असून तेथें पूल, फरशा, मोऱ्या बांधणें जरुर आहे. त्यापैकीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत दोन पूल बांधून झाले व पांच नद्या व सहा नाल्यांवरील पुलांचीं कामें चालू आहेत. हीच स्थिति मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्य-रस्त्याची आहे. याहि रस्त्यावर एकूण पांच नद्यांवरील पुलांचीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सुरू केलीं असून लहान नाल्यांवरील कामेंहि लवकरच सुरू होणार आहेत. म्हणूनच रस्त्यांच्या बाबतींत हा जिल्हा मागासलेलाच म्हणावा लागेल. मात्र दुसऱ्या योजनेच्या उत्तरार्धांत याकडे सरकारनें लक्ष घातलें असून त्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत व तिसऱ्या योजनेंत याचीं बहुतांशीं फळें दृश्यमान होतील.

या जिल्ह्यांतील रस्त्यासंबंधीची अधिक माहिती घेण्यापूर्वी रेल्वेमार्गाची माहिती आपण घेऊं व त्यानंतर रस्त्यासंबंधीची अधिक माहिती आपण पाहूं.

रेल्वेमार्ग

रेल्वेमार्गामुळें या जिल्ह्यात दळणवळणाची चांगली सोय झाली आहे. ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेच्या या जिल्ह्यांतल्या मार्गाचें काम १८५२ मध्यें सुरुं झालें व १८६१ ते १८६५ या काळांत हे मार्ग वाहतुकीस खुले करण्यांत आले. या जिल्ह्यांत भुसावळ, जळगांव, पाचोरें व चाळीसगांव हीं ४ जंक्शन्स आहेत. भुसावळपासून नागपूर–हावरा-कडे एक ब्रॉडगेज मार्ग जातो व दुसरा इटारसी–दिल्लीकडे जातो. जळगांव-हून भुसावळ–सुरत या तापी खोरें रेल्वे मार्गाचा फांटा फुटतो. पाचोऱ्यापासून पाचोरे–जामनेर ही नॅरोगेज लाइन निघते तर चाळीसगांवपासून चाळीसगांव–धुळें हा ब्रॉडगेज मार्ग निघतो. मुंबई, दिल्ली, नागपूर, कलकत्ता, अलाहाबाद या मोठ्या शहराशीं रेल्वेनें हा जिल्हा जोडला जातो. रेल्वेमुळें माल–उतारूंची वाहतूक फार सोयीची झाली आहे. या जिल्ह्याच्या रेल्वे–विकासाच्या संदर्भात इगतपुरी–भुसावळ या मार्गाचें नियोजित विद्युतीकरण ही फार महत्त्वाची घटना ठरेल.

रेल्वेंतील कर्मचारी

१९५१ च्या जनगणनेंत वाहतूक व दळणवळण या क्षेत्रांत या जिल्ह्यांतील १०,०६६ लोक गुंतलेले असल्याचें नमूद केलें आहे. त्यांपैकीं ७,९३५ रेल्वेंत, १३६४ रस्ता वाहतुकींत, ७४४ पोस्ट व तारखात्यांत व २५ जलवाहतुकींत होते. यावरून रेल्वे वाहतुकींत या जिल्ह्यांत एकूण वाहतूकधंद्यापैकीं ७९ टक्के लोक गुंतलेले आढळतील. या संख्येंत गेल्या १० वर्षांत बरीच वाढ झाली असून ती दीडपट झाली अस-

त्याची शक्यता आहे. भुसावळ हें मोठें जंक्शन असून तें मध्यरेल्वेचें विभागीय केंद्र असल्यानें आणि रेल्वेचें मोठें वर्कशॉप तेथें असल्यानें तेथें फार मोठा नोकरवर्ग आहे.

१८६१–६५ या काळापासून या जिल्ह्याला रेल्वेचें दळणवळण लाभलें ही जिल्ह्याच्या दृष्टीन भाग्याची व अभिमानाची गोष्ट आहे. त्या काळांत १४२ मैलांचें रेल्वेमार्ग या जिल्ह्यांत सुरू झाले. सध्यां या जिल्ह्यांत २३२ मैलाचे रेल्वेमार्ग असून त्यांपैकीं १८६ मैल मध्य-रेल्वेचे व ४६ मैल पश्चिम रेल्वेचे आहेत.

२३२ मैलांचे रेल्वेमार्ग

मध्य रेल्वेचें चार फाटे या जिल्ह्यांतून जातात. (१) भुसावळ–इटारसी, (२) भुसावळ–नागपूर, (३) चाळीसगांव–धुळें व (४) पाचोरें–जामनेर.

(१) मुंबई–भुसावळ–इटारसी–हा रेल्वेमार्ग मुंबईपासून १९३ मैलांवर जळगांव जिल्ह्यांत प्रवेश करतो व या जिल्ह्यांतून आरपार १११ मैल जाऊन मुंबईपासून ३०४ मैल असलेल्या वाघोद स्टेशनांतून तो जिल्ह्याबाहेर पडतो. हा मार्ग चाळीसगांव, भडगांव, पाचोरें, जळगांव, भुसावळ, यावल व रावेर या सात तालुक्यांतून जातो. भुसावळ जंक्शन सोडतांच तापी नदीवर ८५२ यार्ड लांबीच्या पुलावरुन हा मार्ग केळचांच्या बागा व आंबरायांमधून वाट काढीत मध्यप्रदेशांत जातो. या मार्गावर नेपानगर हें कागदाच्या कारखान्यासाठीं प्रसिद्ध असलेलें शहर मुंबईपासून ३२७ मैलांवर मध्य-प्र देशांत आहे.

मुंबई–भुसावळ इटारसी मार्ग

पश्चिम रेल्वे

पश्चिम रेल्वेचा ताप्ती व्हॅली मार्ग या नांवानें ओळखला जाणारा सुरत–भुसावळ हा फांटा या जिल्ह्यांतून जातो. १८९८ ते १९०० या काळांत हप्त्याहप्त्यानें हा मार्ग सुरू झाला. त्यापैकीं जळगांव-अमळनेर हा भाग १९०० मध्यें सुरूं झाला. तापी नदीशीं साधारणपणें समांतर असा हा मार्ग आहे. हा साडेपांच फुटांचा ब्रॉडगेजचा एकेरी मार्ग असून तो बव्हंशी सपाट प्रदेशांतून जातो. गिरणा व बोरी या नद्यांवर या मार्गावर मोठे पूल आहेत. या मार्गाची जळगांव जिल्ह्यांतील लांबी सुमारें ४६ मैल आहे. धुळें जिल्ह्यांतील बेटावद स्टेशनपासून जळगांव जिल्ह्यांतून धुळें जिल्ह्यांत हा मार्ग जातो. जळगांव ते भुसावळ हा मार्ग पश्चिम रेल्वे व मध्य रेल्वेचा एकच आहे. जळगांव स्टेशन हें पश्चिम रेल्वेचें नसून मध्य रेल्वेचें आहे.अमळनेर व धरणगांव हीं व्यापारीं शहरें या मार्गावरील मोठीं स्टेशनें आहेत.

सुरत–भुसावळ फांटा

रेल्वेमार्गाचा फायदा जळगांव जिल्ह्यास कसा होतो हें आपण पाहिलें व रेल्वेच्या दळणवळणाचे बाबतींत हा जिल्हा भाग्यवान असल्याचें दिसून आलें. एदलाबाद, पारोळे व चोपडे या फक्त तीन तालुक्यांतूनच प्रत्यक्ष रेल्वेमार्ग गेलेले नाहींत. तथापि चोपडें व पारोळें या तालुक्यांना पश्चिम रेल्वेवरील धरणगांव व अमळनेर हीं स्टेशनें नजिक आहेत. एदलाबादला भुसावळ–नागपूर मार्गावरील वरणगांव, बोदवड मलकापूर हीं स्टेशनें व भुसावळ–इटारसी मार्गावरील बऱ्हाणपूर हीं स्टेशनें नजीकच्या टप्प्यांत आहेत.

रस्ते

जळगांव जिल्ह्यांतील रस्त्यांचे त्यांच्या महत्त्वानुसार पांच प्रकार पडतात ते असे:– (१) राष्ट्र-मार्ग (नॅशनल हायवेज्), (२) राज्यमार्ग (स्टेट हाय वेज्), (३) मोठे जिल्हा मार्ग (मेजर डिस्ट्रिक्ट रोडस्), (४) इतर जिल्हामार्ग (अदर डिस्ट्रिक्ट रोडस्) व (५) गांवरस्ते (व्हिलेज रोडस्).

सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर हा एकच ६ क्रमांकाचा राष्ट्रमार्ग या जिल्ह्यांतून जातो. त्याची या जिल्ह्यांतील लांबी ८८ मैल ४ फर्लांग २०० फूट आहे. हा जळगांव जिल्ह्यांत १४८ मैल ६ फर्लांगावर सुरू होतो व पश्चिमेकडून पूर्वेकडे जिल्ह्याचे मध्यभागांतून जाऊन २३७ मैल २ फर्लांगावर बुलढाणें जिल्ह्यांत शिरतो. या जिल्ह्यांतल्या १५ गांवांतून तो जातो. त्यापैकीं पारोळें, एरंडोल, जळगांव, भुसावळ, वरणगांव व एदलाबाद हीं गांवें महत्त्वाचीं आहेत. याच तालुक्यांना या रस्त्याचा फायदा होतो. तो मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यरस्त्याला एदलाबाद येथें भेटतो. याशिवाय ६ मोठे जिल्हा मार्ग व एक इतर जिल्हा-मार्ग यांच्याशीं या रस्त्याचा संयोग होतो. बोरी, अंजनी, गिरणा, वाघूर व महमदपूर या नद्या ओलांडून हा मार्ग जातो. बोरी, अंजनी, गिरणा येथें या मार्गावर कॉझवे आहेत व वाघूर व महमदपूर येथें पूल आहेत. हा रस्ता मोटारींना बारमाही उपयोगी पडतो. फक्त मोठ्या पुराचे वेळीं वाहतूक कांहीं काळ स्थगित होते. गिरणा नदीवर या रस्त्यावर मोठा पूल बांधण्यांत येणार आहे. या रस्त्याचा मैल. क्र. १४८–६ पासून २११–५ पर्यंतचा भाग डांबरी पृष्ठभागाचा झाला आहे. पुढील रस्ता डांबरी करण्याचें काम चालू आहे व त्यासाठीं रु. ४ लक्ष खर्च येणार आहे.

राष्ट्र मार्ग क्रमांक

हा रस्ता जळगांव शहरांतून मैल क्रमांक १९०–४ ते १९४–४ जातो. तेव्हां गजबजलेल्या व दाट वस्तींतून जाणारा मार्ग गांवाबाहेरून काढण्याचें सरकारनें ठरविलें आहे. १९०–५ मैलापासून हें डायव्हर्शन सुरू होईल व १९४–४ मैलावर तें मूळ रस्त्याला मिळेल. एकूण डायव्हर्शन ५ मैलांचें राहील व त्यासाठीं सुमारें ११,०६,६५० रु. खर्च येईल. त्याचप्रमाणें हा रस्ता भुसावळ शहरांतून मैल क्र. २०९ ते २११–५ एवढ्या भागांतून जातो. तेव्हां येथेंहि बाहेरून रस्ता काढणें आवश्यक असल्यानें तशी योजना आंखली आहे. मैल क्रमांक २०७–६ पासून हें डायव्हर्शन निघेल व तें मूळ रस्त्यास मैल. क्र. २११–५ ला मिळेल. याचा अंदाजण्यांत आलेला खर्च रु. १३,३९,८५४ आहे.

चार राज्यमार्ग

हा राज्यमार्ग १९७–५ या मैल क्रमांकापासून या जिल्ह्यांत शिरतो व उत्तर–पूर्व दिशेनें ११० मैल ५ फर्लांग अंतरावर गेल्यावर एदलाबाद येथें तो सुरत–धुळें–नागपूर या राष्ट्रमार्गास त्याच्या २३० व्या मैलावर मिळतो व तेथून पुढें २ मैल हे दोन्ही मार्ग एकत्र होतात. मैल. क्र. १९७–५ ते ३१८–३ असें एकूण १२० मैलांचें अंतर या मार्गानें या जिल्ह्यांत व्यापलें आहे. चाळीसगांव, कजगांव, भडगांव, पाचोरें, शेंदूर्णी, पहूर, जामनेर, व एदलाबाद या सहा तालुक्यांना या मार्गाचा फायदा होतो.

मुबई-चाळीसगांव राज्यमार्ग

हा राज्यमार्ग जळगांव व जामनेर तालुक्यांतून जातो व जळगांव–मराठवाडा यांना तो सांधतो. जळगांव स्टेशनपासून १ मैल ३ फर्लांग सुरत–धुळें–नागपूर रस्त्यानें जाऊन त्या रस्त्याच्या १९४–३ मैलापासून तो दक्षिणेकडे वळतो व ३१ मैल १ फर्लांगावर तो औरंगाबाद जिल्ह्यांत शिरतो व तेथून तो अजंठा लेण्यापर्यंत जाऊन पोहोंचतो.

जळगांव–अजंठा राज्यमार्ग

रायसिंगपूर–तळोदें–शहादें–शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर राज्यमार्ग–चोपडें तालुक्यांतील गालंगी गांवांजवळ १७ मैल ४ फर्लांगावर अनेर नदीच्या कांठी हा रस्ता जळगांव जिल्ह्यांत शिरतो व सबंध जिल्ह्यांतून पूर्व दिशेनें जाऊन मध्यप्रदेशाच्या बऱ्हाणपूर तालुक्यांत खानापूरजवळ तो शिरतो. या रस्त्याची जिल्ह्यांतील लांबी ७१ मैल ४ फर्लांग असून चोपडें, यावल, रावेर या तालुक्यांतून तो जातो. या ३ तालुक्यांतील २६ गांवें या रस्त्याला लागतात.

हा रस्ता धुळें जिल्ह्यांतून १९ मैल ६ फर्लांगांत जळगांव जिल्ह्यांत प्रवेश करतो व नंतर आग्नेय बाजूनें जिल्ह्याच्या सीमेपर्यंत जाऊन औरंगाबाद जिल्ह्यांत शिरतो. या रस्त्याची या जिल्ह्यांतली लांबी २७ मैल ४ फर्लांग असून तो फक्त चाळीसगांव तालुक्यांतून मेहुणबारें, दासेगांव, भोकर, चाळीसगांव व बोद्रा या पांच गांवांतून जातो. चाळीसगांव येथें या रस्त्याला मुंबई–चाळीसगांव व नागपूर हा राज्यरस्ता भेटतो व मेहुणबाऱ्याला मेहुणबारे–जामदा हा मोठा जिल्हा मार्ग भेटतो. मेहुणबारें येथें गिरणा नदींतून हा रस्ता जातो. येथें २७ मैल २ फर्लांगांत ८१० फूट व २२ फट रुंदीचा मोठा रस्ता असलेला १४ लाखाचा पूल बांधण्याचें काम हातीं घेतलेलें आहे.

धुळें–औरंगाबाद राज्यमार्ग

प्रमुख जिल्हामार्ग (मेजर डिस्ट्रिक्ट रोड्स)

जळगांव जिल्ह्यांत असणाऱ्या प्रमुख जिल्हा मार्गांची संख्या एकूण १० असून त्यांची लांबी एकूण १९१ मैल ३ फर्लांग आहे. यापैकीं १८८ मैल लांबीचे ८ जिल्हामार्ग हे जिल्हा लोकल बोर्डाचे देखरेखीखालीं असून ३ मैल ३ फर्लांग लांबीचे फक्त २ मार्ग सार्वजनिक बांधकाम खात्याकडे आहेत. हे दोन मार्ग म्हणजे जळगांव शहरांतला कलेक्टर कचेरीचा २ मैलांचा रस्ता व दुसरा पाचोरा शहरांतला १ मैल ३ फर्लांगाचा रस्ता हे होत. उरलेले जिल्हा लोकलबोर्डाचे ताब्यांतील ८ प्रमुख जिल्हामार्ग पुढीलप्रमाणें. या ८ मार्गांच्या १८८ मैलापैकीं १५२ मैल ६ फर्लांग पक्के खडीचे, ३३ मैल २ फर्लांग मुरुमाचे व २ मैल मातीचे आहेत.

सावदा रेल्वे स्टेशन रस्ता

सावदा शहराशीं सावदा रेल्वे स्टेशनला जोडणारा हा २ मैल ६ फर्लांगाचा रस्ता बैलगाड्या व मालट्रकच्या वाहतुकीच्या दृष्टीनें फार गजबजलेला असतो. हा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्याचें काम सुरू झालें आहे.

जळगांव–शिरसोली–वावरंदे–बिल्दी–पाचोरा रस्ता

जळगांव व पाचोरें या दोन शहरांना जोडणारा हा मधला रस्ता २६ मैल २ फर्लांग आहे. या रस्त्याला १० गांवें आहेत.

चाळीसगांव–नांदगांव रस्ता

चाळीसगांव शहरापासून निघून चाळीसगांव तालुक्यांतून चार गांवांवरून जाऊन ११ मैल ४ फर्लांगावर हा रस्ता रोहिणी गांवापर्यंत पोहोंचतों

धुळें–अमळनेर रस्ता

हा रस्ता धुळ्यापासून निघून १७ मैल ४ फर्लांग धुळें जिल्ह्यांतून जाऊन नंतर जळगांव जिल्ह्यांतील अमळनेर तालुक्यांत शिरतो. या रस्त्याची लांबी २४ मैल ५ फर्लांग असून तो पक्का खडीचा व बारमाही रहदारीस उपयोगी आहे. धुळें व अमळनेर या दोन्ही व्यापारी शहरांना तो जोडत असल्यानें महत्त्वाचा आहे.

यावल–भुसावळ–जामनेर रस्ता

शिरपूर–रावेर या राजमार्गावरील यावल शहरापासून निघून सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर या राष्ट्रमार्गास छेदून हा रस्ता मुंबई–चाळीसगांव–नागपूर या दुसऱ्या राज्यमार्गावर जामनेर येथें मिळतो. दोन राज्यमार्गांना जोडणारा व एका राष्ट्रमार्गामधून जाणारा हा २७ मैल ४ फर्लांगांचा रस्ता यावल–भुसावळ व जामनेर तालुक्यांतून जातो. हा रस्ता पक्का खडीचा आहे. या रस्त्यावर अंजाळ्याजवळ एक पूल बांधण्याची योजना असून तापी नदीवर भुसावळजवळ मोठा पूल बांधण्याचें काम सध्यां जोरांत चालू आहे. हा पूल १९६० फूट लांब होणार असून त्यावर २२ फूटांचा रस्ता होईल.

६७ फूट ६ इंच रुंदीचे २९ गाळे त्यांत असतील. वर आर. सी. सी. डेक स्लॅप असेल. या पुलासाठीं सुमारें २१ लक्ष रुपये खर्च येईल.

चोपडें–धरणगांव–एरंडोल–म्हसावद–नेरी–जामनेर रस्ता

हा रस्ता शिरपूर–रावेर या राज्य मार्गावरील चोपडें या शहरापासून निघून धरणगांव व एरंडोल या महत्वाच्या शहारांवरून जाऊन जळगांव–पाचोरें या प्रमुख जिल्हा मार्गास छेदून जामनेर तालुक्यांत प्रवेश करतो व जळगांव–अजंठा या राज्य मार्गास नेरीजवळ छेदून मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गास तो जामनेर या गांवीं मिळतो. रस्त्याची एकूण लांबी ५७ मैल ५ फर्लांग असून तो चोपडें, एरंडोल, जळगांव व जामनेर या तालुक्यांतून जातो व शिरपूर–रावेर आणि मुंबई–चाळीसगांव –नागपूर हे दोन राज्यमार्ग सांधत असल्यानें या मार्गाचें महत्त्व आहे,

अमळनेर–पारोळें–चोरवड–भडगांव रस्ता

अमळनेर शहरापासून निघून सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर या राष्ट्रमार्गास पारोळ्याजवळ छेदून मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गास भडगांव जवळ मिळणारा हा रस्ता अमळनेर, पारोळें व भडगांव या तालुक्यांतून जातो. तो एकूण २८ मैल लांब असून तो पारोळ्यापर्यंत पक्क्या खडीचा व बारमाही वाहतुकीस योग्य आहे व पारोळ्यापासून पुढें चोरवड व त्यापुढें भडगांवपर्यंत कच्च्या मुरुमाचा आहे.

इदगांव–जळगांव रस्ता

हा रस्ता जळगांवपासून निघून इदगांवपर्यंत जातो. वाटेंत ममुराबाद हें गांव लागतें. हा रस्ता फक्त जळगांव तालुक्यांतूनच जातो व तो एकूण ९ मैल ६ फर्लांग आहे. हा रस्ता पक्का आहे व यावर एस्. टी. च्या गाड्या रोज ये-जा करतात.

दुय्यम जिल्हा मार्ग

अदर डिस्ट्रिक्ट रोडस् किंवा दुय्यम जिल्हा मार्ग या वर्गाखालीं समाविष्ट करण्यांत आलेल्य जिल्हामार्गांची संख्या या जिल्ह्यांत एकुण ४४ असून त्यांची लांबी एकूण ३६२ मैल ४ फर्लांग आहे. त्यापैकीं १२८ मैल ५ फर्लांगाचे रस्ते हे पक्के खडीचे, २१९ मैल ५ फर्लांगाचे मुरुमाचे व १४ मैल २ फर्लांग कच्चे मातीचे आहेत.

गांव रस्ते

जळगांव जिल्ह्यांतील एकूण गांवरस्त्यांची संख्या २७६ असून त्यांची एकूण लांबी ७६१ मैल ४ फर्लांग आहे. या पैकीं जिल्हा लोकल बोर्डाचे ताब्यांत ७४३ मैल २ फर्लांगाचे रस्ते आहेत. यापैकीं पक्के खडीचे रस्ते अवघे १३ मैल ६ फर्लांगाचे असून मुरुमाचे रस्ते ५३२ मैल ४ फर्लांग व मातीचे रस्ते १९७ मैल लांबीचे आहेत.

सर्वोदय क्षेत्रांतील रस्ते

याशिवाय रावेर तालुक्यांतील खिरोदे येथील सर्वोदय केंद्राच्या प्रेरणेनें, मार्गदर्शनानें व मदतीनेंहि त्या भागांत कांहीं रस्ते झाले आहेत. लोकांनीं बैलगाड्या व साहित्य देऊन व श्रमदान करून हे रस्ते बांधले आहेत. जुन्या गाडीवाटांची दुरुस्ती व नवीन रस्त्यांचें बांधकाम या बाबतींत सर्वोदय योजनेनें पुढाकार घेऊन (१) खिरोदें–सायखेडें–लोहारें, (२) खिरोदें–कळमोदे, (३) खिरोदें–रोझोदे, (४) सायखेडे–गौरखेडें–उतखेडें, (५) लोहारें–गौरखेडें–पाल, (६) गारबर्डी–बोरघाट इ० रस्ते केले.

जळगांव जिल्ह्यांतील रस्त्याच्या प्रश्नाकडे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत व विशेषतः या योजनेच्या दोन वर्षांत सरकारचें विशेष लक्ष वेधलें. दुसऱ्या योजनेंत रस्ते विकासाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे. दुसऱ्या योजनेच्या पहिल्या ४ वर्षांत रस्त्याचे कार्यक्रमावर एकूण रुपये ४९ लक्ष ३० हजार खर्च झाले व शेवटच्या वर्षांत रुपये ३९ लक्ष ८१ हजार खर्च होण्याची अपेक्षा आहे. असे एकूण रुपये ८९ लक्ष ११ हजार द्वितीय योजनेंत खर्च होण्याचा अंदाज आहे.

जळगांव जिल्ह्यांत १९४७ पूर्वी फक्त ३ च पूल होते. एदलाबाद जवळील मुंबई–चाळीसगांव –नागपूर रस्त्यावरील पूर्णा नदीवर १९३९ मध्यें रुपये ३ लक्ष ४८ हजार खर्च करून ७७९ फूट लांबीचा बांधलेला पूल व सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर या राष्ट्रमार्गावर १९१५ सालीं नशिराबाद-जवळ हातेड नाल्यावर व १९३५ मध्यें महमदपुरा नाल्यावर बांधलेले दोन छोटे पूल होते. १९५६ पर्यंत हीच स्थिति होती. पण १९५६ ते १९६० या ४ वर्षांत ५ नवे पूल झाले. त्यांत शिरपूर–रावेर रस्त्यावर अडावदजवळ ११० नं० च्या नाल्यावर छोटा पूल १९५८ मध्यें झाला व त्याच रस्त्यावर वाघोदाजवळ १५२ नं०च्या नाल्यावर अडीच लाखाचा पूल १९५९ मध्यें झाला. याशिवाय सुरत–धुळें–एदलाबाद–नागपूर या रस्त्यावर साकेगांव येथें वाघूर नदीवर १९५८ मध्यें रुपये ७,६०,२०० खर्च करून ५४ फूट उंचीचा पूल बांधण्यांत आला. त्याचप्रमाणें पारोळे–भडगांव रस्त्यावर गिरणा नदीवर भडगांवजवळ १९५८ मध्येंच ४० फूट उंच व ६२६ फूट लांबीचा मोठा पूल दहा लाखांवर रुपये खर्च करून बांधला. याशिवाय म्हसावद–चोपडे या रस्त्यावर सावखेडा येथें १९५८ मध्येंच तापी नदीवर सुमारें २५ लाख रुपये खर्च करून १२५ फूट उंचीचा १,३१३ फूट लांबीचा पूल बांधला. त्यानंतर सध्यां अनेक पुलांचीं कामें हातीं घेण्यांत आलीं असून तीं तृतीय पंचवार्षिक योजनेंतहि चालू राहतील. सध्यां अशीं पुढील १६ पुलांचीं कामें चालूं आहेत.

चालूं कामें

(१) भुसावळ–यावल रस्त्यावरील तापी नदीवरील मोठा पूल.
(२) जळगांव–अजिंठा रस्त्यावरील वाघूर नदीवरील ३१ मैल २ फर्लांगातील पूल.
(३) जळगांव–अजिंठा रस्त्यावरील झोंब्रे नाल्यावरील पूल.
(४) भुसावळ–यावल रस्त्यावरील इंजल नदीवरील पूल.
(५) शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील चोपडे तालुक्यांत गूळ नदीवरील पूल.
(६) शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील सावद्याजवळील सुकी नदीवरील पूल.
(७) शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील रावेर तालुक्यांतील भोकर नदीवरील पूल
(८) शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील रावेर तालुक्यांतील नागोली नाल्यावरील पूल
(९) शिरपूर–रावेर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील रावेर तालुक्यांतील कर्जेत नाल्यावरील पूल.
(१०) मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गावरील भडगांवजवळील तितुर नदी व गलारी नाला यावरील दोन पूल.
(११) मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गावरील जामनेरजवळील काग नदीवरील पूल.
(१२) मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गावरील शेंदुर्णीजवळील सोन नदीवरील पूल.
(१३) मुंबई–चाळीसगांव–नागपूर या राज्यमार्गावरील पहूर जवळील गोगाडी नाल्यावरील पूल.
(१४) धुळें–औरंगाबाद रस्त्यावरील गिरणानदीवर मेहुणबाऱ्या जवळील पूल.
(१५) धुळें–अमळनेर रस्त्यावरील अमळनेरजवळील बोरी नदीवरील पुलाची सुधारणा.
(१६) पाळधी–नाचणखेडे रस्त्यावरील वाघूर नदीवरील पूल.

यांपैकीं रावेर तालुक्यांतील कर्जेत व भोकरी नदीवरील पूल, अजंठा रस्त्यावरील झोंब्रे नाल्यावरील पूल व पाळधी–नारायणखेडे रस्त्यावरील वाघूर नदीवरील पूल हे चार पूल १९६१ मार्च पूर्वींच पूर्ण होऊन वाहतुकीस मोकळे झाले आहेत.

हीं सर्व कामें तृतीय पंचवार्षिक योजनेंत पुरीं होतील व याशिवाय अनेक नवीन गरजेचीं कामें हातीं घेतलीं जातील. द्वितीय योजनेंतील पूल-रस्त्यांचीं चालू कामें व तृतीय योजनेंतील हातीं घेण्यांत येणारीं पूल-रस्त्याचीं नवीन कामें यावर तिसऱ्या पंच-वार्षिक योजनेंत या जिल्ह्यांत सुमारें २ कोटी ६७ लाख रुपये खर्च होतील. त्यामुळें जिल्ह्याचें दळणवळणाचें स्वरूप पुष्कळच पालटेल. एकूण रस्तेदेखील ६९३ मैलाचे पक्के व १,०२६ मैलाचे कच्चे असे १,७२६ मैलाच्या लांबीचे तिसऱ्या योजनेच्या अखेरीं या जिल्ह्यांत दिसतील.

नावांची वाहतूक

या जिल्ह्यांत पावसाळ्यांत तापी व गिरणा या नद्यांवर नावांतून वाहतूक चालते. नद्यांना पूर येतात व रस्त्यांची वाहतूक विस्कळीत होते अशा वेळीं नद्या ओलांडून जाण्यासाठीं नावांचा उपयोग करावा लागतो. या नावा पावसाळी हंगामांत तीन महिने चालतात. माणसांची व मालाची वाहतूक यांतून होते. अशा नावा जिल्ह्यांत सुमारें ५० ठिकाणीं आहेत.

रहदारी बंगले

सरकारी नोकरांच्या फिरतीवरील मुक्कामासाठीं व त्याचप्रमणें प्रवाशांसाठीं जिल्ह्यांत ठिकठिकाणीं डाकबंगले सरकारनें ठेवले आहेत. असे बंगले एकूण ३५ असून त्यांपैकीं सार्वजनिक बांधकाम खात्याचे ताब्यांत १८, जंगल खात्याचे ताब्यांत ८, जिल्हाधिकारी महाशयांचे ताब्यांत २ व जिल्हा लोकल बोर्डाचे ताब्यांत ७ आहेत. यापैकीं जळगांव येथील उतारू बंगला व भुसावळ येथील डिस्ट्रिक्ट बंगला हे दोनच बंगले पूर्ण सुसज्ज असून इतर बंगले अंशतः सज्ज आहेत.

स्टेट ट्रान्स्पोर्ट

प्रवासी वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याच्या सरकारी धोरणानुसार १९५० मध्यें स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन स्थापन झालें व जळगांव जिल्ह्यांत १९५२ पासून एस्. टी. नें वाहतूक सुरू केली. जळगांव व धुळें या दोन जिल्ह्यांत एस्. टी. ची खानदेश डिव्हिजन असून त्यांची विभागीय कचेरी व वर्कशॉप धुळें येथें आहे. धुळें विभागाखालीं ११ ऑपरेटिंग युनिटस् असून त्यांपैकीं ६ जळगांव जिल्ह्यांत व ५ धुळें जिल्ह्यांत आहेत. या केंद्राचे ठिकाणीं वाहनांची रोजची, साप्ताहिक व मासिक देखभाल होते व निगा राखली जाते व किरकोळ दुरुस्तीहि केली जाते. धुळ्याचें वर्कशॉप हें कायमच्या इमारतींत असून तेथें अद्यावत यंत्रसामुग्री आहे. तेथें मोठीं दुरुस्तीचीं कामें व इंजिन ओव्हरऑलिंग केलें जातें.

३१ मार्च १९६० रोजीं एस. टी. चा सबंध विभागीय क्षेत्रांतला नोकरवर्ग १,३०८ होता. जळगांव जिल्ह्यांत जळगांव, यावल, अमळनेर, जामनेर, चाळीसगांव व चोपडे येथें डेपो असून बस स्टेशन जळगांव, यावल, चोपडे, चाळीसगांव, जामनेर, अमळनेर, पारोळें, फैजपूर, एदलाबाद, भुसावळ व हातेड या ठिकाणीं आहेत. कायम स्वरूपाचें बांधलेलें बस स्टेशन कोठेंहि नाहीं. याशिवाय

उतारूंना चढ-उतार करण्यासाठीं जेथें थांबावें लागतें अशा कांहीं ठिकाणीं पिक अप स्टॅन्डहि बांधलेले आहेत. असे स्टॅन्डस् कासोदे, नेरी, नशिराबाद, वरणगांव, पाडळसें, धरणगांव, पिंपळकोठें, गडखांब व आसोदें येथें असून बोदवड, इदगांव, जलोद, किनगांव येथेंहि हे स्टॅन्डस् उभारले जात आहेत

जळगांव जिल्ह्यांत एकूण १३८ एस्. टी. चे मार्ग आहेत. त्यापैकीं १२८ मार्ग हे केवळ जळगांव जिल्ह्यांतले असून १० मार्ग हे जळगांव जिल्ह्यालगतच्या औरंगाबाद, बुलढाणा, ब्ऱ्हाणपूर व नाशिक या जिल्ह्यांत सरहद्दीच्या भागांतील गांवापर्यंत जातात. या शिवाय जळगांव व धुळें या दोन्ही जिल्ह्यांत साधारण असे ९ मार्ग आहेत. त्यांची लांबी ३४० मैल आहे. या १३८ मार्गांचीं एकूण लांबी २,५५७ मैल आहे. यापैकीं जळगांव जिल्ह्यांतील रस्त्याच्या पृष्ठभागांची लांबी १,०६७ मैल आहे. दररोज सरासरी ९१ गाड्या या मार्गावर धांवतात. रोजचें एस्. टी. चे गाड्यांचे प्रवासाचे मैल सरासरी ९,६३४ होतात. त्याचप्रमाणें सरासरी रोज २६,९४० प्रवासी ह्या जिल्ह्यांत एस्. टी. ने प्रवास करतात.

एस्. टी. पार्सलच्या देवघेवीची सोय जळगांव, चाळीसगांव, अमळनेर, चोपडे, यावल, जामनेर, पारोळें, एरंडोल, भुसावळ, फैजपूर, पाचोरें, फत्तेपूर व एदलाबाद येथें आहे. प्रवाशांसाठीं प्रत्येक बस स्टेशनवर वेटिंग रूम आहे. हातेडशिवाय सर्व बस स्टेशनांवर रिफ्रेशमेन्ट रूमस्हि आहेत.

जळगांव येथें औद्योगिक कामगारांसाठीं घरें बांधण्याच्या योजनेनुसार १० बिऱ्हाडांचीं घरें कामगारांसाठीं बांधलीं आहेत. कामगारांच्या खेळांनाहि एस्. टी. उत्तेजन देते व वार्षिक खेळांचे सामने भरतात.

कामगार व त्यांच्या कुटुंबासाठीं दवाखाना, वाचनालय, ग्रंथालय इ० सोयी केल्या असून कामगारांचे व एस्. टी. च्या शासनाचे संबंधाचे बाबतींत लेबर ऑफिसर लक्ष घालतात. स्टेट ट्रान्स्पोर्ट कामगारांची एक युनियन असून ती इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉन्ग्रेसशीं संलग्न आहे.

जळगांव शहरांत व भुसावळ शहरांत एस्. टी. ची. सिटी बस सर्व्हिस आहे. जळगांवांत ती महाराणी लक्ष्मीचौकापासून मुळजी जेठा कॉलेजपर्यंत व भुसावळ शहरांत एस्. टी. स्टॅन्डपासून ऑर्डनन्स फॅक्टरीपर्यंत ये-जा करते.

आधुनिक काळांत पोस्ट, तार व टेलिफोन एक्स्चेंज हीं दळणवळणाचीं महत्त्वाचीं साधनें झालीं आहेत. टपाल ही तर जनतेची नित्याची गरज आहे. तांतडीच्या कामासाठीं तारा व टेलिफोनचा वापर करण्यांत येतो. जनतेच्या गरजेनुसार पोस्ट, तार व टेलिफोन यांचा विस्तार दिवसेंदिवस वाढविण्यांत येत आहे. जळगांव व धुळें या दोन जिल्ह्यांसाठीं एक पोस्टल डिव्हिजन असून त्या डिव्हिजनची मुख्य कचेरी जळगांव येथें आहे.

पोस्ट तार व टेलिफोन

जळगांव जिल्ह्यांत जळगांव शहरांत एक हेड पोस्ट ऑफिस असून एकूण ३६ सब पोस्ट ऑफिसें आहेत.

व्यापारी उलाढाल

जळगांव जिल्ह्यांत शेतीच्या खालोखाल लोकांचें निर्वाहाचें साधन व्यापार हें आहे. १९५१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यांतील ८०,३६१ लोकांचें चरितार्थाचें मुख्य साधन व्यापार हें होतें तर १३,२३१ लोकांचें चरितार्थाचें दुय्यम साधन व्यापार हें होतें. व्यापाराच्या मुख्य साधनावर उपजीविका करणाऱ्यांपैकीं १९८४९ किंवा २४.७ टक्के लोक हे स्वावलंबी होते.

व्यापाराश्रयी लोकसंख्या

व्यापारावर उपजीविका करणाऱ्या स्वाश्रयी लोकांची वर्गवारी

क्र.	व्यापाराचा प्रकार	लोक
१.	अन्नपदार्थांचा फुटकळ व्यापार	८,८४२
२.	ज्वलनोपयोगी वस्तूंचा (पेट्रोल धरून) फुटकळ व्यापार	१,२९८
३.	कापड व कातडी वस्तूंचा फुटकळ व्यापार	२,२७५
४.	अन्नपदार्थांचा ठोक व्यापार.	९६२
५.	इतर वस्तूंचा ठोक व्यापार.	५४५
६.	सावकारी, बँका व इतर आर्थिक व्यवहार.	१०२९
७.	विमा.	८५
८.	वरच्या वर्गवारींत समाविष्ट न झालेल्या इतर वस्तूंचा किरकोळ व्यापार	४,८०८
९.	मालमत्तेचे व्यवहार	५
	एकूण	१९,८४९

भुसावळ, जळगांव व चाळीसगांव हीं या जिल्ह्याच्या व्यापाराचीं मुख्य प्रवेशद्वारें आहेत. या जिल्ह्यांत आयात केला जाणारा मुख्य माल म्हणजे कापड, लोखंडी व पोलादी वस्तू, इमारतीचें सामान, किराणा माल, स्टेशनरी वस्तू, औषधें, प्रसाधनाचीं साधनें, यांत्रिक उपकरणें, तांदूळ, गहूं, कांच व चिनीमातीच्या वस्तू, स्टेशनरी वस्तू, धातूंचीं भांडीं इ० होत. या जिल्ह्यांतून निर्यात होणारा माल म्हणजे कापूस, भुईमूग, भुईमुगाचें तेल, केळीं, सरकी, भुईमुगाची पेंड, मूग, उडीद, चवळी, धणे, तूप, जवस, इ० होत.

आयात

निर्यात

गेल्या दहा वर्षांची सरासरी पाहिली तर या जिल्ह्यांत कापसाचें उत्पादन दरसाल १४,६५,७४३ मण होतें असें आढळेल. यापैकीं जळगांव, अमळनेर, व चाळीसगांव येथील कापड गिरण्यांत लागणारा थोडा कापूस वगळला तर सर्व कापूस बाहेर निर्यात होतो. जवळजवळ निम्मा कापूस मुंबईला जातो व बाकीचा कानपूर, मद्रास, अहमदाबाद, बऱ्हाणपूर, नागपूर, भडोच, सोलापूर व औरंगाबाद या ठिकाणीं जातो. सरासरी ४० हजार गांठी कापूस मुंबईला जातो त्याचप्रमाणें ४ हजार गांठीं कानपूरला ३ हजार ६ शें मद्रासला, २६०० गांठी बऱ्हाणपूर व अहमदाबादला, दोन हजार गांठी भडोच व नागपूरला, एक हजार गांठी सोलापूरला व ५०० गांठी औरंगाबादला रवाना होतात. कापूस निर्यात करणारीं मोठीं केंद्रें म्हणजे जळगांव, अमळनेर, चोपडे, भुसावळ, बोदवड, चाळीसगांव, पाचोरे व रावेर हीं होत. १९५९–६० सालांत विरनार कापसाचा दर ८०० ते ९६० रु. खंडी असा होता. एक खंडी ७८४ पौंडाची असते. बाहेरगांवीं जाणारा सर्व कापूस जीन केलेला व गांठी बांधलेला असतो. तो बहुधा रेल्वेनें व थोड्या प्रमाणांत मालमोटारीनें जातो. बाजारांत शेतकरी कापूस गाड्या भरून आणतात व नंतर तो कापूस ग्राहकांचे अडते, कापड गिरण्या वा देशी व परदेशी कंपन्यांचे प्रतिनिधी व दलाल खरेदी करतात. रेड लेबल व ब्लॅक लेबल असे त्याचे दोन प्रकार असतात. कांहीं कॉटन सेल सोसायट्या सभासदांचा कापूस एकत्र करून त्याची प्रतवारी लावून जाहीर लिलांव पुकारतात व विकतात.

कापूस

केळीं हें या जिल्ह्यांतलें दुसरें महत्त्वाचें व्यापारी पीक असून केळ्यांचे व्यवसायांत सुमारें ५० हजार लोक गुंतलेले आहेत. सरासरी दरसाल केळ्यांचा व्यापार पांच कोटी रुपयांचा असतो. जिल्ह्यांतली २५ हजार एकर जमीन केळ्यांखालीं असून एका एकरांत सुमारें २००० घड निघतात. दुसऱ्या महायुद्धानंतर केळ्यांची मागणी वाढल्यानें केळ्यांच्या बागांतहि मोठ्या प्रमाणांत वाढ झाली.

केळीं

या जिल्ह्यांतून जुलै तें नोव्हेंबर केळीं रेल्वे वॅगन्स भरभरून निर्यात होतात. सप्टेंबर व ऑक्टोबरमध्यें केळ्यांची निर्यात फार जोरांत असते.

जिल्ह्यांत एकूण १४ फळविक्री करणाऱ्या संस्था असून त्या $\frac{1}{3}$ केळीं विकतात. उरलेलीं $\frac{2}{3}$ केळीं खाजगी व्यापारी विकतात.

या जिल्ह्यांत भुईमुगाचें उत्पादनहि फार मोठें आहे. या भुईमुगाचें ऑईल मिल्समध्यें तेल काढण्यांत येतें व हें तेल मुख्यतः मुंबई व डालमियानगर या ठिकाणीं रवाना केलें जातें. या जिल्ह्यांत १९५८–५९ मध्यें २४ ऑईल मिल्स होत्या. शिवाय पाचोरें व अमळनेर येथें वनस्पतीचे कारखानेहि आहेत. भुईमुगाच्या विक्रीचा हंगाम ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर आणि मे या महिन्यांत जोराचा असतो. एक पल्ला किंवा ३ बं. मण भुईमुगापासून ३८ ते ४० शेर तेल व ५६ शेर पेंड निघते. भुईमुगाची पेंड पुष्कळशा प्रमाणांत जिल्ह्यांतच खतासाठीं खपते. उरलेली मुंबईला जाते.

भुईमुग

जिल्ह्यांत होणाऱ्या व्यापारांत गुरांच्या व्यापाराचेंहि प्रमाण मोठें आहे. सातपुडा पर्वतांत गाई, म्हशी व बैल पाळतात व त्यांची विक्री बाजारांत होते. शिवाय निमार प्रदेश, खरगोण, पिपळाणी, शिंगजी इ० ठिकाणाहूनहि गुरें आणून विकतात. खांडवा व माळवा इकडून म्हशी आणून विकतात व त्यांना ३५० ते ७०० पर्यंत किंमत येते. सावदें, वरणगांव, पाचोरें, बामणोद, जामठी येथें गुरांची विक्री बाजाराच्या दिवशीं मोठ्या प्रमाणांत होते. वंजारी लोक हे गुरांचा व्यापार करणारे प्रमुख लोक आहेत. हे लोक गुरें पाळतात व बाजारांत आणून विकतात. नेमाड, माळवा इकडूनहि ते गुरें आणतात.

गुरांचा व्यापार

इतर निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्यें सरकी मुंबई, नागपूर, धुळें व नाशिक या ठिकाणीं जाते. ज्वारी सुरत, अहमदाबाद व मुंबईला जाते. उडीद पंजाब, उ० प्रदेश, मध्य प्रदेश आणि मद्रासला जातो. मूगहि मद्रास, उ० प्रदेश व पंजाबला जातो. वनस्पती तेल नाशिक व अहमदनगरला जाते तर तूप मुंबई, नाशिक व सुरतेला रवाना होते. धोतरें, धुळें व अहमदनगर आणि बऱ्हाणपूरला जातात. संत्री मुंबईला रवाना होतात. तूर बनारस, मदुरा, हरदा, वाडीबंदर, पुणें व मुंबईला जाते.

इतर निर्यात

मुंबई, शेतमाल बाजार कायदा १९३९ प्रमाणे जिल्ह्यांतील प्रमुख बाजार पेठा नियंत्रित करण्यांत आल्या असून प्रत्येक बाजारपेठेसाठीं नेमलेल्या शेतमाल बाजार समितीच्या देखरेखीखालीं सर्व व्यवहार होतात. ही समिती "अ" व "ब" परवाने देते व परवानेदारांनाच व्यवहारांत भाग घेतां येतो. अ परवानेदार मार्केट यार्ड व मार्केट यार्डाबाहेरहि माल खरेदी करूं शकतो—व ब परवानेदार मार्केट यार्डाबाहेरच खरेदी करूं शकतो. यार्डावर फक्त तो विक्रीच करूं शकतो. प्रत्येक मार्केट कमिटीचें क्षेत्र ठरवून देण्यांत आलें आहे व त्या क्षेत्रांतील व्यवहार या कमिटीच्या नियमानें बांधलेले असतात. यार्डावरील मालविक्री लिलांव पद्धतीनेंच होते. मार्केट कमिटीनें परवाने दिलेले दलाल किंवा अडते ठरलेलें कमिशन घेऊन आपलें काम करतात. उत्पादकानें आणलेला माल ग्राहक व्यापाऱ्यांना अडते दाखवतात व मागणी सुरू होते. जास्तींत जास्त भाव देणाऱ्याला—जर तो भाव उत्पादकास मंजूर असेल तर——माल विकला जातो. नाहीं तर लिलांव स्थगित होतो. लिलांवानंतर कबुलायत केली जाते व त्याची एक प्रत व्यापाऱ्याकडे, एक उत्पादकाकडे व एक कमिटीकडे राहते. मालाचें वजन परवानेदार कांटेवाले करतात व मालाच्या किमतींतून अडत्यांचें कमिशन, कांटेवाल्यांचे व कमिटीचे आकाराचे पैसे वजा जातां उरलेली रक्कम शेतकऱ्याला दिली जाते.

बाजारपेठांतील व्यवहार पद्धती

अमळनेर व जळगांव या दोन जिल्ह्यांतील सर्वांत जुन्या बाजारपेठा आहेत. १९४२ सालापासून त्या शेतमाल बाजार कायदा १९३९ खालीं आणण्यांत आल्या. पहिल्यानें फक्त कापूस व भुईमूग या दोनच प्रकारच्या मालाचें नियंत्रण केलें गेलें. त्यानंतर चाळीसगांव, पाचोरे व चोपडे येथें अनुक्रमें १९४५, १९४६ व १९४८ सालीं बाजारपेठा कायद्याखालीं आणण्यांत आल्या. त्यानंतर बोदवडचें मार्केट १९५२ मध्यें व भुसावळचें १९५७ मध्यें नियंत्रित झालें. त्यानंतर जामनेर व रावेर येथील व्यापारपेठांचें नियंत्रण झालें. या शिवाय मेहुणबारे, कजगांव, धरणगांव, पारोळे व वरणगांव येथें सब मार्केट यार्डस आहेत. फक्त भडगांव, एरंडोल, एदलाबाद, पारोळें व यावल या तालुक्यांत स्वतंत्र मार्केट कमिटया अस्तित्वांत नाहींत. एरंडोल व पारोळे हे तालुके अनुक्रमें जळगांव व अमळनेर या मार्केट कमिटयांच्या कार्यक्षेत्रांत येतात. एदलाबाद पेटयास बोदवड मार्केट कमिटीच्या कार्यक्षेत्रांत समाविष्ट करण्याचा विचार चालू असून यावल येथें स्वतंत्र नियंत्रित बाजार पेठ करण्याची तयारी चालू आहे. भडगांव पेटा हा पाचोरे मार्केट कमिटीच्या कार्यक्षेत्रांत समाविष्ट आहे. वरील बाजारपेठांत एकूण १९ प्रकारचा माल नियंत्रित करण्यांत आला आहे.

बाजारपेठांचें नियंत्रण

नियंत्रित बाजारपेठांचीं वैशिष्ठयें

जळगांव—जळगांव मार्केट कमिटीच्या कार्यक्षेत्रांत जळगांव व एरंडोल हे तालुके असून धरणगांव येथें एक पोटमार्केट आहे. जळगांव हें जिल्ह्यांतलें सर्वांत मोठें कापसाचें मार्केट असून धण्याचा व्यापारहि सर्वांत मोठ्या प्रमाणावर चालतो.

भुसावळ—भुसावळ मार्केटच्या कक्षेंत भुसावळ मुलकी सर्कल व यावल तालुक्याचा कांहीं भाग आहे. ३ एकर ३ गुंठे जमीन मार्केट कमिटीच्या यार्डांत आहे. कमिटीनें स्वतःची इमारत व इतर सोयी केल्या असून वरच्या दर्जाचे कापसासाठी हें मार्केट प्रसिद्ध आहे.

चोपडें—या मार्केट कमिटीच्या कार्यक्षेत्रांत सबंध तालुका असून येथें कापूस व भुईमूग हाच माल विशेष प्रामुख्यानें विकला जातो.

पाचोरें—या मार्केटच्या कक्षेंत पाचोरे तालुका व भडगांव पेटा येत असून मार्केट यार्ड ११ एकरांचें आहे. मार्केट कमिटीनें जरुर त्या इमारती नुकत्याच बांधल्या आहेत. कापूस, व भुईमूग उडीद, गूळ हा व्यापार येथें विशेष चालतो.

अमळनेर—सबंध अमळनेर तालुका हें या मार्केट कमिटीचें कार्यक्षेत्र असून पारोळें येथें एक पोट मार्केट आहे. त्या मार्केट यार्डाच्या कक्षेंत पारोळें तालुका येतो. अमळनेर मार्केट कमिटीचें यार्ड १४ एकर २७ गुंठ्यांचें असून कमिटीनें स्वतःची इमारत बांधून इतरहि सुखसोयी केल्या आहेत. सर्व जिल्ह्यांत अमळनेरचे मार्केटमध्यें सर्वांत जास्त माल येतो. हें मार्केट सर्व जिल्ह्यांत जुनें आहे. येथें भुईमुगाची आवक फार मोठी आहे.

चाळीसगांव—या मार्केटच्या कक्षेंत सबंध चाळीसगांव तालुका येतो व मेहुणबारे येथें एक सब्–मार्केट आहे. मार्केट कमिटीनें गोडाऊन, विश्रांतिगह, कँटीन, पिण्याचें पाणी, वीज इ. सोयी केल्या आहेत. येथें कापूस व भुईमुगाबरोबरच अन्नधान्येंहि मोठ्या प्रमाणांत येतात.

बोदवड—बोदवड, वरणगांव व गोटेगांव हीं तीन मुलकी सर्कल्स या मार्केटच्या कार्यक्षेत्रांत यत असून येथें कापूस हाच मुख्य माल येतो.

रावेर—रावेर हें मार्केट यार्ड नवीन असून १९५९ मध्येंच येथें प्रत्यक्ष यार्डावर व्यवहार सुरूं झाले आहेत.


जामनेर—जामनेर येथें मार्केट कमिटी नुकतीच सुरूं झाली असून अजून रीतसर मार्केटचे व्यवहार सुरू होत आहेत.

सहकारी संस्थाद्वारें मालविक्री

मालविक्रीचें काम करणाऱ्या जिल्ह्यांत चाळीस संस्था असून त्यांपैकीं १५ संस्था कापूसविक्रीचें काम करतात तर १४ संस्था फळविक्री करणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणें इतर खरेदी-विक्रीचीं कामें करणाऱ्या ११ संस्था आहेत. सहकारी मालविक्री संस्थांद्वारें मालविक्री करण्याचें महत्त्व शेतकऱ्यांना पटत असून दिवसेंदिवस अधिकाधिक माल सहकारी संस्थांद्वारें विकला जात आहे.

कापूस, भुईमूग, केळीं हीं या जिल्ह्यांतलीं मुख्य पैशाचीं पिकें असून मूग, उडीद, धणे, मिरची, गूळ ज्वारी, बाजरी हीं त्या खालोखाल पैसा देणारीं पूरक पिकें आहेत. जळगांव, अमळनेर, चाळीसगांव, पाचोरे भुसावळ व बोदवड या कापूस, भुईमूग ठोक विक्रीच्या बाजारपेठा असून सावदे, निंभोरे, भुसावळ व शेंदूर्णी, या केळींविक्रीच्या पेठा आहेत. त्याचप्रमाणें जळगांव, अमळनेर आणि पाचोरे या पेठांत मूग, उडीद, धणे आणि अमळनेर, वरणगांव, बोदवड व मेहुणबारें येथें मिरचीचा उठाव मोठ्या प्रमाणांत होतो.

या जिल्हयांत शेतमालाचे व्यवहार कसे होतात हें खालील तक्त्यांत दाखविलें आहे.



आठवड्याचे बाजार

जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यांत केंद्रवर्ती गांवांत आठवड्याचे बाजार भरतात व या बाजारांत धान्यें, मसाल्याचे पदार्थ, भाजीपाला इ० नित्य घरगुती वापराच्या वस्तूंचा खप होतो. या बाजारांत जवळपासच्या खेड्यांतले लोक खरेदी–विक्रीसाठीं जमतात. असे बाजार जिल्ह्यांत १०० वर गांवांत भरतात.

खेड्यांतील दुकानदार

प्रत्येक खेड्यांत लोकांच्या रोजच्या गरजा भागवणारे कांहीं दुकानदार असतातच. त शहरांत माल खरेदी करून खेड्यांत विकतात. खेड्यांतला सर्व व्यापार तेच करतात. किराणा, कापड, हॉटेल व स्टेशनरी हीं दुकानें मुख्यतः असतात. अशीं दुकाने अंदाजें ५५०० असून, त्यापैकीं चाळीसगांव तालुक्यांत सर्वांत जास्त म्हणजे ७७२ आहेत. रावेर, एरंडोल, पाचोरे, जामनेर या तालुक्यांतहि प्रत्येकीं ६०० च्यावर आहेत. प्रत्येक गांवास सरासरी चार दुकानें पडतात. खेड्यांत बहुतेक व्यवहार रोखीचेच असतात. कांहीं थोडीं उधारीचीं खातीं असतात व हंगामाचे वेळीं खातेदार पैसे देऊन टाकतात. कांहीं खेड्यांतले दुकानदार सावकारीहि करतात. ते शहरांतून उधारीनें माल आणतात व नंतर पुन्हां खरेदीच्या वेळीं मागील बाकी देऊन टाकतात.

शहरांतील दुकानदार

जळगांव जिल्ह्यांत जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, पाचोरे व चोपडे या नगरपालिकांच्या हद्दींत गुमास्ता कायदा लागू आहे. या कायद्याची अंमलबजावणी नगरपालिका शॉप इन्स्पेक्टरकडून करते. या कामावर राज्य सरकारच्या श्रमविभागाची देखरेख असून सरकारी लेबर ऑफिसर अंमलबजावणी योग्य प्रकारें व्हावी यासाठीं नगरपालिकांना व दुकानदारांना मार्गदर्शन व सूचना करतात. या सहा नगरपालिकांच्या हद्दींत गुमास्ता कायद्याखालीं नोंदविण्यांत आलेलीं एकूण १०५५२ दुकानें असून ७५५९ दुकाननोकर आहेत. १९६० च्या जानेवारी ते जून या पहिल्या सहामाहींत वरील सहा शहरांतील एकूण ३१०० दुकानें तपासण्यांत येऊन ९२ खटल्यांत आरोपींवर गुन्हा शाबीत होऊन रु. ३३५५ दंडादाखल वसूल करण्यांत आले.

विक्रीकर, आयकर

विक्रीकर ही सध्यां राज्याच्या उत्पन्नाची महत्त्वाची बाब झाली आहे. हा अप्रत्यक्ष कर असून तो ग्राहकांकडून न घेतां विक्रेत्याकडून घेतला जातो. १ ऑक्टोबर १९४६ पासून प्रथम विक्रीकर सुरूं झाला व त्यांत वारंवार बदल व दुरुस्त्या होऊन मुंबई विक्रीकर कायदा १९५९ हा ६ जानेवारी १९६० पासून सुरू आहे. हा कर कांहीं वस्तूंवर एकमुखी असून कांहीं वस्तूंवर अनेक मुखी आहे. या कायद्यांत खरेदीकराचीहि तरतूद आहे. ज्यांची विक्री दरसाल रु. ३०,००० आहे व ज्या माल आयात करणाऱ्या व उत्पादन करणारांची विक्री दरसाल रु. १०,००० आहे, अशा व्यापाऱ्यांची नोंदणी या कायद्याखालीं होते. आर्थिक वर्षांत रु. २५०० पेक्षां जास्त विक्रीकरपात्र मालाची देवघेव करणारासच हा कर भरावा लागतो. $\frac{1}{4}$ टक्क्या-पासून ४५ टक्क्यापर्यंत निरनिराळ्या वस्तूंवर निरनिराळ्या दरानें विक्रीकर आकारला जातो. जे व्यापारी हे उत्पादन आणि अडतीचा व्यवहार करणारे अधिकृत दलाल आहेत त्यांना लायसेन्स, अधिकारपत्रें, संमतिपत्रकें, परवाने देण्याची या कायद्याखालीं तरतूद असून त्या आधारावर त्यांना डिक्लेरेशन देऊन कर न भरतां माल घेतां येतो. या कायद्याखालील नोंदणी झालेल्या व्यापाऱ्यांची माहिती पुढें दिली आहे.

१९५९–६० सालांत विक्रीकराचें उत्पन्न या जिल्ह्यांत पुढीलप्रमाणें होतें.

मुंबई विक्रीकर कायदा	रु. २२,८२,५४५–८९ न. पै.
मोटर स्पिरीटकर	रु. ५,५०५–६२ न. पै.
मादकपदार्थांचा कायदा	रु. ३,०८०–६५ न. पै.
मध्यवर्ती विक्रीकर कायदा	रु. १,०१,०८५–१४ न. पै.

आयकर

विक्रीकराप्रमाणें व्यापारांशीं निगडीत असा दुसरा कर म्हणजे आयकर किंवा इन्कमटॅक्स. जळगांव जिल्ह्याची इन्कमटॅक्स ऑफिसरांची कचेरी जळगांव येथें असून १९५९–६० सालांतील आकारणीनुसार या जिल्ह्यांत आयकर भरणारे ३४१४ लोक होते व त्यांच्या इन्कम टॅक्स आकारणीची एकूण रक्कम रु. १३ लक्ष १६ हजार झाली.

व्यापारी संघटना

कांहीं प्रमुख शहरांत व्यापाऱ्यांच्या संघटना असतात. प्रामुख्यानें औषध व्यापाऱ्यांची, कापड व्यापाऱ्यांची, किराणा दुकानदारांची, हॉटेलवाल्यांची, जिन फॅक्टरी वाल्यांची अशा संघटना आहेत. या संघटना आपापल्या धंद्यांतल्या अडचणी व प्रश्न यांचा विचार करतात. साप्ता-हिक सुट्यांचे दिवस ठरविणें वगैरे बाबतींतहि या संघटना सर्वांच्या सोयी-गैरसोयीचा विचार करून निर्णय घेतात.

यात्रा

ग्रामीण आर्थिक जीवनाचें यात्रा हें एक वैशिष्ठ्य आहे. या यात्रा संबंधित ठिकाणच्या देव-तांचे धार्मिक उत्सवाचे निमित्तानें भरविल्या जातात. यात्रा म्हटली कीं तिकडे व्यापारी आकर्षिले जातात व नाना प्रकारचीं दुकानें व करमणुकीचीं साधनें तेथें थाटलीं जातात. जळगांव जिल्ह्यांत लहान मोठ्या एकूण १६८ यात्रा भरतात. जिल्ह्यांतील कांहीं महत्त्वाच्या यात्रांची माहिती पुढील तक्त्यांत दिली आहे. जेथें मोठा जमाव जमतो अशा कांहीं निवडक यात्रांचीच ही माहिती आहे.

तालुका	यात्रेचें ठिकाण	यात्रेचें नांव	यात्रचा काळ
अमळनेर	अमळनेर	सखाराम महाराजांची यात्रा.	वै. शु. १ ते वै. शु. १५.
	पातोंडे	माहेजी देवी	पौष शु १५.
भडगांव	भडगांव	रामरथोत्सव	रामनवमी, चैत्र शु. ९.
एरंडोल	पद्मालय	गणपती	कार्तिक शु. १५.
जामनेर	जामनेर	रामनवमी	चैत्र शु. ९.
	शेंदूर्णी	यात्रा	कार्तिक शु. १५.
	शेंगोळे	उरुस	मार्गशीर्ष शु. १५.
पारोळे	पारोळे	बालाजीरथ व वहन	आश्विन शु. ११ व नवरात्र.
	उंदीरखेडे	नागेश्वर	महाशिवरात्र.
	तामसवाडी	भवानी देवी	चैत्र शु. १५.
	चोरवड	दत्तजयंती	मार्गशीर्ष शु. १५.
जळगांव	जळगांव	१. भवानी देवी	१. आश्विन शु. ९
		२. रथ	२. कार्तिक शु. ११.
,,	पिंप्राळे	रथ	आषाढ शु. ११.
भुसावळ	भुसावळ	१. देवी	१. गुढीपाडवा.
		२. चतुश्रृंगी	२. चैत्र शु. १५.
	बोदवड	देवी	चैत्र शु. १५
एदलाबाद	चांगदेव	चांगदेव	महाशिवरात्री.
,,	कोथळी	मुक्ताबाई	माघ व. ११.
चोपडे	चोपडे	१. रथ	आश्विन शु. ११.
		२ गोविंद महाराज	२.चैत्र व. ४.
	चहार्डी	कमलजादेवी	मार्गशीर्ष शु. १५.
	उनपदेव	उनपदेव	पौष महिन्यांत दर रविवारीं.
पाचोरे	पाचोरे	रथ	कार्तिक शु. १४.
	पिंपळगांव हरेश्वर	हरेश्वर	माघ महिन्यांत.
	नगरदेवळें	बालाजी	कार्तिक शु. १४.
	माहिजी	देवी	पौष शु. १५.
चाळीसगांव	चाळीसगांव	ऊरुस	ऑगस्टमध्यें.
	पाटणें	देवी	चैत्र शु. १५.
	सायगांव	दत्तजयंती	मार्गशीर्ष शु. १५.
रावेर	रावेर	दत्तजयंती	,, ,, ,,.
	सावदे	देवी	चैत्र शु. १५.
यावल	यावल	बालाजी रथ	चैत्र शु. १५.
	फैजपूर	खंडेराव	शिमगा.

उद्योगधंदे



चोपडें
अडावद
यावल
हिंगोणे
फैजपूर
पाडळसें
सावदें
रावेर
निंभोरे
एदलाबाद
कुऱ्हें
भुसावळ
वरणगांव
समुराबाद
जळगांव
पिंप्राळें
नसिराबाद
असळनेर
धरणगांव
एरंडोल
पारोळें
म्हसावद
नेरी
जामनेर
नाडगांव
बोदवड
जामठी
नांद्रें
वरखेडी
पाचोरें
शेंदुर्णी
फत्तेपूर
पिंपळगांव
कजगांव
उंबरखेडें
चाळीसगांव
तपशील
कापड गिरण्या
वनस्पती तुपाचा कारखाना
जिनिंग किंवा प्रेसिंग फॅक्टरीज
विद्युत्केन्द्रें
तेलगिरण्या
सिल्क मील
तलकागदाचा कारखाना
फटाक्याचा कारखाना
इंजिनिअरींगचे कारखाने
गुळाचे कारखाने

उद्योग-धंद्याचा व्याप

जळगांव जिल्हा औद्योगिक दृष्ट्या अद्याप पूर्णपणें विकसित झालला नाहीं. कच्चा कापूस स्वस्त मजुरी व दळणवणाच्या सोयी हीं साधनें उपलब्ध असल्यानें जरी कांहीं उद्योगधंदे या जिल्ह्यांत निर्माण झालेले अलीकडे दिसत असले तरी या जिल्ह्याचा खरा औद्योगिक विकास अद्याप व्हावयाचा आहे.

दोनशें कारखाने

विजेवर चालणारे व दहा कामगार काम करीत असलेले कारखाने किंवा विजेशिवाय चालणारे व २० कामगार काम करीत असलेले कारखाने यांची नोंदणी फॅक्टरी ॲक्टखालीं होत असते. असे सुमारें २०० कारखाने या जिल्ह्यांत आहेत. कापूस व भुईमूग हीं या जिल्ह्याचीं मुख्य पिकें असल्यानें या कच्च्या मालावर आधारलेले कारखानेच प्रामुख्यानें या जिल्ह्यांत दिसून आल्यास नवल नाहीं. याकारखान्यांची वर्गवार माहिती आपण आतां पाहूं.

कच्चा कापूस, स्वस्त मजुरी व रेल्वेचें दळणवळण या अनुकूल परिस्थितीमुळें या जिल्ह्यांत कांहीं कापड गिरण्या निघाल्या आहेत. या जिल्ह्यांत पहिली कापड गिरणी १८७३ मध्यें जळगांव येथें मेसर्स मुळजी जेठा आणि कंपनीनें खानदेश स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स कं. लि. या नांवानें सुरू केली. ती आज इन्द्रसिंग ॲन्ड सन्स प्रायव्हेट लि. हे चालवीत आहेत. या गिरणींत ५८२ लूम्स व २६३९६ स्पिंडल्स असून दररोजचें उत्पादन सुमारें २० गांठी आहेत. शर्टिंग, धोतरें, लाँगक्लॉथ, साड्या, ब्लँकेटस् हा माल येथें तयार होतो. येथें कामगारांची संख्या सुमारें ८५० असून दरमहा महागाई भत्त्यासह पगार रु. ८०,००० वांटला जातो.

कापड गिरण्या

अमळनेर येथें प्रताप स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स शेठ मोतीलाल माणकचंद यांनीं सुरू केली. जळगांव जिल्ह्यांतील ही दुसरी कापड गिरणी आहे. या गिरणींत सध्यां १०७७ लूम्स व ४९४४४ साधे व २०७२ दुहेरी असे एकूण ५१५१६ स्पिंडल्स आहेत. गिरणींत सध्यां सुमारें दोन हजार मजूर काम करतात. येथें कापडउत्पादन दररोज सुमारें ५०,००० वार होतें. या कंपनीनें कँटीन, दवाखाना व अधिकाऱ्यांना राहाण्यासाठीं घरें वगैरे चांगल्या सोयी केल्या आहेत.

चाळीसगांव येथील छगनलाल टेक्स्टाईल मिल्स प्रायव्हेट लि. ही गिरणी १९२५ मध्यें स्थापन झाली. मेसर्स बाबुलाल श्री वल्लभ आणि कं. नें ती सप्टेंबर १९५५ मध्यें खरेदी केली. या गिर-

णींत ६०४ लूम्स असून २२६३६ स्पिंडल्स आहेत. या गिरणींत सध्यां सुमारें ८०० मजूर काम कर-
तात.

या जिल्ह्यांतील कापड गिरण्यांमध्यें तयार होणारा माल जिल्ह्यांत खपून मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यांत रवाना होतो.

१९५९–६० सालांत एकूण कापडउत्पादन २,८७,६७,४१३ वार झालें व त्यावर सेंट्रल एक्साईजचें उत्पन्न रु. २५,१८,४९९ झालें.

सिल्क मिल

या जिल्ह्यांत बोदवड येथें एक आर्ट सिल्क फॅक्टरी होती पण ती १९५२ मध्यें बंद पडली. सध्यां हिंदुस्थान सिल्क मिल ही एकच कृत्रिम रेशमाची गिरणी जळगांव शहरानजिक पिंप्राळे येथें आहे. ती १९४९ मध्यें तीन भागीदारांनीं सुरू केली. या गिरणींत ९० लूम्स व ५०० स्पिंडल्स आहेत. या गिरणींत दरसाल सुमारें १० लाख वार रेशमी कापड तयार होतें व त्याची किंमत सुमारें १८ लाख रु. होते. या गिरणींत काम करणाऱ्या मजुरांची संख्या सुमारें १५० असून त्यांच्या दरमहाच्या पगाराची रक्कम महागाई भत्त्यासह रु. १७,००० होते. या गिरणींत दोन पाळ्यांनीं काम चालतें व विशिष्ट प्रक्रियेसाठीं कापड मुंबईला जावें लागतें. मुंबई व भारतांतल्या इतर ठिकाणीं हा माल रवाना होतो. या गिरणींत सुरु-
वातीपासून कधींहि संप वा टाळेबंदी झाली नाहीं हें उल्लेखनीय आहे. १९५९–६० सालांत या गिर-
णींत सिल्क उत्पादन एकूण ९,९६,२२७ वार झालें.

जिनिंग प्रेसिंगचे कारखाने

हा जिल्हा कपाशीचाच जिल्हा आहे. जिल्ह्यांत सुमारें साडे पांच लाख एकर क्षेत्र कपाशी-खालीं आहे व एकूण जिल्ह्याच्या लागवडीखालील जमिनीपैकीं एक चतुर्थांश जमीन कपाशीखालीं आहे. तेव्हां शेतांतून वेंचून गाड्या भरून आणलेली कपाशी त्यांतील सरकी काढून व गठ्ठे बांधून बाहेर रवाना करण्याचा धंदा या जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर चालत असणें साहजिकच आहे. जिल्हाभर सर्वत्र आज जिन व प्रेसचें जाळेंच पसरलेलें दिसतें. १८४० पर्यंत कापसाची सरकी हातानेंच काढली जात होती. पुढें १८४४ मध्यें धरणगांव व जळगांव येथें पहिल्यानें कापूस प्रयोगाचे सुपरिंटेंडेन्ट यांनीं सॉ जिन सुरू केलें. १८४८ मध्यें यावल, चोपडे, कासोदें, अडावद इ० खेड्यांतूनहि जिन सुरू झाले. पुढें कापूस भेसळ प्रतिबंधक कायद्यामुळें तर जिनची मागणी वाढतच गेली. ती मागणी जीन तयार करणाऱ्या कारखान्यांसहि पुरवितां येईना. १९१४ ते १९१८ च्या पहिल्या महायुद्धाच्या काळांत भाववाढीमुळें तर कापसाच्या धंद्याला वरदानच मिळालें. तथापि कोणत्याहि धंद्याला भरती ओहोटी असतेच. त्याप्रमाणें या धंद्यावरहि १९३० व १९४० नंत-रच्या दशकांत मंदीच्या लाटांना तोंड द्यावें लागलें. त्याचप्रमाणें कपाशीच्या पिकांनींहि पुढें मार खाल्या-वर तर या धंद्यावर अधिकच परिणाम झाला. सध्यां जिल्ह्यांत ७२ जिनिंग व ३६ प्रेसिंग फॅक्टऱ्या आहेत.

नऊ हजार मजूर

कापसाची सरकी काढणें व गांठीं बांधणें हें मुख्य काम येथें चालतें. अर्थात् हें काम काप-साच्या हंगामावर अवलंबून असतें. साधारणपणें ६० पासून १०० दिवसापर्यंत कारखाने चालतात. ऑक्टोबरमध्यापासून एप्रिलमध्यापर्यंत हा हंगाम असतो. कापूसआवक बंद झाली म्हणजे हे कारखानेहि मधून मधून बंद राहतात. असा हंगाम कमी जास्त असेल त्याप्रमाणें हे कारखानेहि कमीजास्त प्रमाणांत चालतात. हंगाम जोरांत असतो तेव्हां दोन पाळ्या चालतात. साधारणपणें हंगामांत नऊ हजार मजुरांना येथें काम मिळतें. या जीन व प्रेसमधून दरसाल बऱ्यावाईट पिकाप्रमाणें १ ते २ लाख गांठीं कापूस बाहेर

पडतो. या नोकरांना किमान वेतन कायदा लागू झाला असल्यानें त्यांचें वतन जवळजवळ दुप्पट झालें आहे. हा कापूस मुंबई, मध्यप्रदेशमध्यें जातो.

जळगांव व धुळें जिल्ह्यांतील जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीच्या मालकांची एक संघटना असून तिचे १२५ सभासद आहेत. त्यांची मुख्य कचेरी अमळनेर येथें आहे. पाचोरे व अमळनेर येथील जीन-प्रेसचे मालक यांनीं आपापसांतील घातक स्पर्धा बंद करण्यासाठीं जीन व प्रेसचे दर समझोत्यानें ठरवून निश्चित केले आहेत व आलेला सर्व कापूस एकत्र करून ते निरनिराळ्या कारखान्यांत काम विभागून देतात व जरूर पडल्यास १–२ कारखानेहि बंद ठेवतात. उत्पादनावरहि ते नियंत्रण ठेवतात. १९५८ मध्यें ३९२ पौंडांचा बोजा प्रेस करून देण्यासाठीं साडे अकरा रुपये व ३ मण रुई करण्यासाठीं ८ ते ९ रु. असे दर अमळनेर येथें होते तर पाचोरें येथें कापूस जीन करण्यासाठीं बोजाचा दर रु. ५ व प्रेस करण्यासाठीं रु. अडीच होता.

कापसाला चांगला भाव यावा म्हणून जिल्ह्यांत कांहीं कॉटन सेल सोसायट्या सभासदांचा माल एकत्र करून तो कच्च्या वा पक्या स्वरूपांत लिलांव जाहीर करून विकतात. अमळनेर, चोपडे, यावल, रावेर, पाचोरे, धरणगांव, जळगांव, नेरी इ० ठिकाणी ही प्रथा पडूं लागली आहे.

वनस्पतीचे कारखाने

या जिल्ह्यांत भुईमुगाचें क्षेत्र तीन लाख एकरांवर असल्यानें भुईमुगाच्या कच्च्या मालावर चालणारे वनस्पतीचे कारखाने येथें निघणें स्वाभाविकच आहे. त्यांतहि पाचोरे व अमळनेर तालुक्यांत भुईमूगउत्पादन मोठें असल्यानें हे कारखाने तेथेंच आहेत. पाचोरे येथें भारत वनस्पती प्रॉडक्टस् हा कारखाना १९३९ मध्यें स्थापन झाला व १९४१ पासून प्रत्यक्ष काम सुरू झालें. या कारखान्याची उत्पादनशक्ति रोज ५० टन आहे. ५ टन रोज उत्पादनशक्ति असलेलें साबण युनिटहि येथें आहे. शिवाय ४०० मण तेल उत्पादन करणारी ऑईल मिलहि त्याच आवारामध्यें आहे. हा कारखाना जून १९५७ मध्यें बंद पडला होता पण तो नंतर सप्टेंबर १९५९ मध्यें विकण्यांत येऊन नवीन व्यवस्थेखालीं १९५९ चे नोव्हेंबरमध्यें पुन्हां सुरू झाला. येथें सुमारें ४०० मजूर कामावर असतात.

वेस्टर्न इंडिया व्हेजिटेबल प्रॉडक्टस् लि. हा कारखाना अमळनेर येथें १९४६ पासून सुरू झाला असून येथें सुमारें २५० कामगार काम करतात. या कारखान्यांत दरमहा ९०० टन वनस्पती तूप व १५ टन साबण तयार होतो.

१९५९-६० मध्यें या जिल्ह्यांत एकूण १,९९,१०४ क्वार्टर्स २६ पौंड एवढें वनस्पतीचें उत्पादन झालें व त्यावर सेंट्रल एक्साईजला रु. १०,२१,०६३ एवढें कराचें उत्पन्न मिळालें. त्याचप्रमाणें करपात्र साबणाचें उत्पादन १७६८८ क्वार्टर्स ६८ पौंड झालें.

तेल गिरण्या

खाद्य तेलाचा उपयोग या जिल्ह्यांत फार जुना आह. ऑईल मिल्स निघण्यापूर्वी हि तेलांच्या घाण्यांवर दोन हजार माणसें येथें काम करीत होतीं. त्यावेळीं तीळ व जवसाचें गळीत चालत असे व १९ व्या शतकाचे उत्तरार्धांत भुईमुगाचे पीक इतके निघूं लागल्यावर शेंगदाण्याचें तेल गाळलें जाऊं लागलें. भुईमूगाचें पीक वाढूं लागतांच भरभर तेलगिरण्याहि निघूं लागल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत कापसाच्या लागवडीवर नियंत्रणें आल्यावर भुईमुगाच्या लागवडीला अधिकच जोर चढला. १९५० मध्यें ३७ तेल गिरण्या या जिल्ह्यांत होत्या. युद्धकालीन कपाशीवरील बंधनें दूर होतांच पुन्हां

भुईमुगाचें पीक घटलें व १९५३ मध्यें २४ गिरण्यांपर्यंत संख्या कमी झाली. त्यानंतर पुन्हां अलीकडे भुईमुग हें पीक शेतकऱ्यांना फायद्याचें वाटूं लागलें असून तें वाढूं लागलें आहे व सध्यां ३७ तेल-गिरण्या अस्तित्वांत आहेत. ७५ टनापर्यंतचे खाद्य तेलाचे उत्पादनावर एक्साईज कर न आकारण्याचें सरकारी धोरण ठरल्यामुळें रोटरी मशीनच्या छोट्या तेलगिरण्या सुरूं झाल्या. या गिरण्या जिल्हाभर पसरल्या आहेत. या तेल गिरण्यांत सुमारें १८०० मजूर काम करतात व या गिरण्या हंगामांत साधारणपणें १२० दिवस चालतात. त्यांना किमान वेतन कायदा लागूं असून १ एप्रिल १९५५ पासून त्यांचें किमान वेतन ठरवून देण्यांत आलें आहे. या गिरण्यांतून सुमारें २५ हजार टन भुई-मुगाचें तेल व ६०० टन सरकी, तीळ, एरंडी वगैरे तेलबियांचें तेल गाळलें जातें. एकूण सरकीपैकीं ८० टक्के सरकी गुरांना चारण्यांत येते व २० टक्के सरकी गाळली जाते. भुईमूग, सरकी, तीळ, एरंडी वगैरे कच्च्या मालाचा पुरवठा, मजुरांची उपलब्धता व रेल्वे वाहतुकीची सोय या कारणामुळें तेलगिरण्या येथें चालूं शकतात. भुईमुगाच्या पेंडीपासून तेलाचा अंश काढण्याचें काम 'सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लँट' (Solvent Extraction Plant) मध्यें होतें. असा एक प्लँट जळगांवांत एका खाजगी कारखानदारनें आणला असून आणखी एक–दोन असे प्लँटस् जिल्ह्यांत लौकरच सुरूं होतील.

१९५९–६० मध्यें जिल्ह्यांत अखाद्य तेलाचें उत्पादन एकूण १९६१९ टन पौंड झालें.

हातकागदाचे कारखाने

हातकागद निर्मितीसाठीं या जिल्ह्यांतलें एरंडोल हें ठिकाण तीनशें वर्षांपासून प्रसिद्ध आहे. "एरंडोली कागद" व्यापारी आपल्या जमाखर्चाच्या वह्यांसाठीं पूर्वीपासून वापरतात. कागदकाम करणाऱ्यांची संख्याहि येथें मोठी होती व कागदीपुरा या नांवानें त्यांची वस्ती ओळखली जाते. इथला कागद दोन अडीचशें वर्षे टिकतो अशी त्याची ख्याति आहे. सुमारें २०० लोक या धंद्यावर तेथें जगत होते. मुंबई आर्थिक व औद्योगिक पाहणी कमिटीच्या माहितीनुसार १९४० मध्यें १५ कारखान-दार तीन हजार गाद्या (एक गादी २४० कागद) दरसाल कागद उत्पादन करीत असत. त्यानंतर मधल्या पारतंत्र्याचे काळांत हा धंदा साफ बसून हे लोक बेकार झाले. त्यानंतर एरंडोलच्या श्री शंकरभाऊ काबरे, श्री. सितारामभाई बिर्ला व श्री. रामनारायण काबरा यांच्या प्रयत्नानें या जुन्या उद्योगाचें पुनरुज्जीवन झालें. १९३९–४० मध्यें मुंबई राज्य सरकारनेंहि या प्रयत्नास मदत केली व मुंबई राज्य ग्रामोद्योग समितीनें एक पल्पसेंटर उघडण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें हें केंद्र सुरूं झालें. हळू हळू या कामाचा व्याप वाढून आतां तेथें एक मोठा हातकागद कारखाना उभा राहिला आहे. हा कारखाना सध्यां एरंडोल तालुका ग्रामोद्योग उत्पादक सहकारी सोसायटी चालविते. येथें १९५० पासून हात-कागदाचें उत्पादन सुरु झालें. खादी व ग्रामोद्योग कमिशननें रु. ३०,००० कर्ज व रु. ३०,००० अनुदान मशिनरी व सामानासाठीं दिल्यावर कारखान्यासाठीं नवीन जागा खरेदी करण्यांत येऊन तेथें हा कार-खाना १५ ऑगस्ट १९५६ पासून सुरूं झाला. पुढें या ठिकाणीं सुंदर इमारत १९५८ मध्यें उभारण्यांत आली. इमारतीसाठींहि खादी ग्रामोद्योग कमिशननें रु. ३० हजार कर्ज व रु. ३० हजार अनुदान दिलें. जुन्या पद्धतींत योग्य त्या सुधारणा करून हायग्रेड हा उच्च दर्जाचा कागद येथें उत्पन्न करण्यास प्रारंभ होतांच त्या कागदाची मागणी वाढूं लागली. ४०–५० मजूर व ३०–४० हजाराचें काम पहिल्यानें येथें होत असे. आतां त्यांत वाढ होत जाऊन तेथें सुमारें २२५ मजूर काम करीत असून उत्पादनहि दरसाल जवळजवळ तीन लाखापर्यंत गेलें आहे. हें सर्व काम सहकारी तत्त्वावर चालतें हें विशेष आहे. येथें काम करणारा मजूर हा या सहकारी संस्थेचा सभासद असतो व त्यामुळें तो नफानुकसानींत भागीदार राहतो. कामगारांना घरदुरुस्ती, आजारांत औषधपाणी, मुलांचें शिक्षण वगैरेंसाठीं संस्था कर्जहि देतें. लग्नप्रसंगी ॲडव्हान्सहि दिला जातो. १९५८–५९ मध्यें हातकागद उत्पादन १,७५,००० रु. चें झालें

व नफा रु. २७,७०३ झाला. सर्व भारतांत हातकागदउत्पादनांत या संस्थेचा दर्जा पहिला लागला असून कागदउत्पादनाची गतीहि भारतांत पहिल्या क्रमाकांची ठरली आहे. एक कारागीर ८ तासांत हायग्रेड कागद ९०० पर्यंत काढतो व ब्लॉटिंगपेपरहि १२०० पर्यंत एक कामगार एका दिवसांत काढूं शकतो. एवढ्यासाठीं येथें एक कारागीर प्रशिक्षण केंद्रहि जानेवारी १९५९ पासून सुरूं झालें असून तेथें २० विद्यार्थ्यांचा एक वर्ग तीन महिने चालविला जातो.

याशिवाय एरंडोल येथें आणखी एक सोसायटी हातकागद निर्मितीचें काम करत. चाळीसगांव तालुक्यांत उंबरखेडें येथेंहि हातकागद निर्मितीचें एक लहान केंद्र श्री शिवाजी सोसायटीनें उघडलें असून तेथेंहि सुमारें ४० कामगार काम करतात. कुटीरोद्योग खात्यामार्फत हातकागद कामासाठीं सहकारी संस्थांना खेळत्या भांडवलासाठीं रु. १,७३,२२३, हत्यारांसाठीं रु. ५९८४० व शेड गुदामासाठीं रु. १४०००० याप्रमाणें आर्थिक सहाय्य देण्यांत आलें आहे.

विद्युत्केंद्रें

जळगांव जिल्ह्यांत वीज उत्पादन करणारीं विद्युत्निर्मितीकेंद्रें एकूण ९ ठिकाणीं आहत. त्यापैकीं धरणगांव व चोपडे येथील वीज केंद्रें महाराष्ट्र राज्य विद्युत्मंडळानें चालविलेलीं असून शिवाय भुसावळ येथें सेंट्रल रेल्वेचें एक स्वतंत्र एक हजार किलोवॅट शक्तीचें पॉवर हॉऊस आहे. जामठी येथें १५ ऑगस्ट १९५९ रोजींच ग्रामपंचायतीनें वीज-पुरवठा सुरूं केला व रावेर येथें नगरपालिकेनें वीजपुरवठा केंद्र २० नोव्हें-बर १९६० रोजींच उघडलें. अमळनेर, पाचोरें, चाळीसगांव, जळगांव व फैजपूर येथील वीजकेंद्रें हीं खाजगी मालकीचीं आहेत. यांपैकीं कांहीं वीजगृहें महाराष्ट्र राज्य विद्युत्-मंडळानें ताब्यांत घेण्याचे दृष्टीनें हालचाली सुरूं केल्या आहेत. खानदेश–मराठवाडा वीज योजनेनुसार भुसावळ येथें साठ मेगॅवॅट शक्तीचें वीजनिर्मिती केंद्र सुरूं करण्याची एक योजना असून त्यासाठीं भुसावळनजीक सुमारें ४०० एकर जमीनहि निवडण्यांत आली आहे. ही योजना पुरी झाल्यावर या जिल्ह्याचा विद्युत्पुरवठा-प्रश्न सुटूं शकेल.

कन्फेक्शनरीचा कारखाना

जळगांव येथें १९४८ पासून एक कन्फेक्शनरीचा कारखाना सुरू असून तेथें सुमारें २० काम-गार काम करतात. या कारखान्यांत बिस्किटें, लेमनड्रॉप्स्, टॉफी, चॉकलेटस् असा माल तयार करतात. १९५८ पर्यंत या कारखान्यांत एकूण ५५,०० रु. चें भांडवल घातलेलें होतें. १९५७ मध्यें या कारखान्यांत १,८०,००० रु. चा माल तयार झाला. हा माल जळगांव व धुळें ह्या जिल्ह्यांत व मध्यप्रदेशांत खपतो.

दारुकामाचा कारखाना

जळगांव येथें १९५० पासून शामा फायर वर्क्स हा एक दारुकामाचा कारखाना सुरूं झाला आहे. हा कारखाना फक्त हंगामांतच चालूं असतो. दिवाळीच्या सुमारास या कारखान्याचें उत्पादन शिगेला पोहोंचतें. या कारखान्यांत सुमारें १५० कामगार काम करतात. १९५३–५४ पर्यंत या कारखान्यांत २,५०,००० रु. चें भांडवल घातलें होतें. १९५३–५४ मध्यें सुमारें दीड लाखाचे स्फोटक पदार्थ व कागद या कार-खान्यानें वापरले व त्यावर्षी साडे तीन लाख रु. चा माल उत्पादन केला. हा माल मुंबई, पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश वगैरे देशांतल्या भागांत व देशाबाहेर आफ्रिका व मध्यपूर्वेतहि जातो.

या जिल्ह्यांत असे चार कारखाने आहत. त्यापैकीं २ भुसावळला, एक चाळीसगांवला व एक जळगांवला आहे. भुसावळ येथें भारत सरकारच्या संरक्षण विभागाची एक ऑर्डनन्स फॅक्टरी असून मध्य रेल्वेचें एक वर्कशॉप आहे व चाळीसगांव येथें तेथील कापड गिरणीचा दुय्यम व्यवसाय म्हणून हा एक कारखाना चालविला जातो. चाळीसगांवच्या कारखान्यांत कापड गिरण्या, जिनिंग व प्रेसिंग फॅक्टऱ्या व ऑईल मिल्सचे एक्स्पेलर यांना लागणारे कांहीं सुटे भाग केले जातात. भुसावळच्या रेल्वे वर्कशॉपमध्यें रेल्वेच्या स्टीम इंजिनांचीं दुरुस्ती होते. संरक्षक दलाची ऑर्डनन्स फॅक्टरीहि ड्रम्स तयार करते. तेथें सुमारें ४०० लोक काम करतात. जळगांव येथें स्टेट ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशनचें एक वर्कशॉप असून तें १९५२ मध्यें सुरू झालें. त्याचें कायम भांडवल रु. १,३०,२२९ आहे. तेथें दुसरी २५ माणसें काम करतात. तेथें एस्. टी. गाड्यांच्या दुरुस्तीचीं कामें होतात. याशिवाय जळगांव येथें आयर्न इंडस्ट्रीज हा लोखंडी सामानाचा कारखाना असून त्यांत १५ माणसें काम करतात.

इंजिनिअरींगचे कारखाने

गूळ तयार करण्याचे छोटे कारखाने जिल्ह्यांत एकूण ३२ आहेत. त्यांपैकीं २० यावल तालुक्यांत, ७ चोपडे तालुक्यांत, भुसावळ व जामनेर मध्यें प्रत्येकीं २ व अमळनेर मध्यें एक आहे. या कारखान्यांत ऊंस गाळून त्याचा गूळ तयार करतात. हे कारखाने हंगामांतच चालतात. त्यांचें उत्पादनहि थोडेंच असतें व खपहि जिल्ह्यांतच असतो. क्रशरसाठीं १० ते २० अश्वशक्तीचीं ऑईल इंजिनें या कारखान्यांत बसविलेलीं आहेत. या सर्व कारखान्यांत सुमारें ३५० मजूर काम करतात.

गुळाचे कारखाने

फौन्टन पेन्स व फौन्टनची शाई तयार करणारा एक कारखाना १९५४ मध्यें फॅक्टरी ॲक्टखालीं नोंदविण्यांत आला होता. त्यांत ६० कामगार काम करीत होते. त्यांत सुमारें एक लाख रु. चें भांडवल १९५४ पर्यंत गुंतविण्यांत आलें होतें. याशिवाय १९५८ मध्यें आणखी ५ शाईचे कारखाने शॉप आणि एस्टॅब्लिशमेन्ट ॲक्टखालीं नोंदविण्यांत आलेले होते व त्यांत ४८ इसम काम करीत होते.

शाईचे कारखाने

जळगांव शहरांत १९३० ते ३८ चे दरम्यान सुरू केलेले ३ छापखाने फॅक्टरी ॲक्टखालीं १९४८ मध्यें नोंदविण्यांत आलेले होते. त्यांत २६ लोक काम करीत होते. याशिवाय जिल्ह्यांत शॉप ॲक्टखालीं नोंदविलेले एकूण ३६ छापखाने १९५८ मध्यें होते व त्यांत १६३ कामगार काम करीत होते. खाजगी, संस्थांचीं व सरकारी छपाईची कामें हे छापखाने करतात. प्रिन्टिंग मशीन्स, ट्रेडल्स, कटिंग मशीन्स, स्टिचिंग व परफोरेटिंग मशीन, टाईप, शाई, कागद अशी सामुग्री येथें असते.

छापखाने

जळगांवजवळ पिंप्राळे येथें १९५० मध्यें शिवण्याच्या दोऱ्याचें रीळ भरण्याचा एक कारखाना सुरू झालेला आहे. तेथें २० लोक काम करतात. प्रत्येक रिळावर ५०० वार शिवण्याचा दोरा गुंडाळलेला असतो. १९५३–५४ मध्यें रु. ४,६५,००० ची १८,६०० ग्रोस रिळें येथें भरण्यांत आलीं. येथील उत्पादन मुंबई, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशमध्यें पाठविलें जातें.

शिवण कामाच्या दोऱ्याचे रीळ भरण्याचा कारखाना

जिल्ह्यांत ८ विड्यांचे कारखाने १९५८ जूनमध्यें नोंदविण्यांत आलेले होते. हे कारखाने जळगांव, एरंडोल, यावल व रावेर येथें होते. सर्व कारखाने विजेशिवाय चालतात. विड्या वळण्यासाठीं टेंभूर्णीचीं पानें व तंबाखू लागते. कामगारांना कामाचें मोजमाप करून मोबदला दिला जातो. टेंभूर्णीचीं पानें स्थानिक रीत्याच गोळा केलीं जातात व तंबाखू कोल्हापूर–निपाणीकडून मागविला जातो. सुमारें २५० लोकांना या धंद्यांत काम मिळतें.

विड्यांचे कारखाने

याशिवाय जळगांवजवळ मेहरुण येथें दगडाचे बारीक बारीक तुकडे करण्याचा एक कारखाना आहे व त्यांत २० माणसें कामाला आहेत. भुसावळ येथें नवशक्ति आयुर्वेदालय हा आयुर्वेदिक–औषधें तयार करण्याचा कारखाना असून तेथें सुमारें २५–३० लोक काम करतात.

कामगार संघटना

उद्योगधंद्याच्या वाढीबरोबरच कामगारांची संख्या वाढणें व त्यांच्या संघटना निर्माण होणें ओघानेंच येतें. या जिल्ह्यांत १९३८ पर्यंत कामगार संघटना निर्माण झालेली नव्हती. कामगारांचें अज्ञान, विश्वासार्ह नेतृत्वाचा अभाव व पुष्कळशा उद्योगधंद्यांचें हंगामी स्वरूप यामुळें या संघटना निर्माण झाल्या नाहींत. १९२६ च्या ट्रेड युनियन कायद्यानुसार पहिली संघटना कापड गिरणी कामगारांची १९३८ मध्यें निर्माण झाली: त्यानंतर १९४१ मध्यें दुसरी व १९४४ ते १९४७ मध्यें आणखी तीन संघटना याच क्षेत्रांत निर्माण झाल्या. त्यानंतर कामगारवर्गांत जशी जागृति वाढत चालली तशा त्यांच्या संघटना वाढूं लागल्या. आपले प्रश्न संघटनेनें सोडविण्याचे फायदेहि त्यांना समजूं लागले. संघटनेशिवाय आपले सर्वसामान्य हितसंबंध सुरक्षित राहणार नाहींत याची जाणीवहि त्यांना होऊं लागली. त्यामुळें इतर क्षेत्रांतहि त्यांच्या संघटना निर्माण झाल्या.

मुंबई औद्योगिक संबंध कायदा, १९४७, हा त्याच वर्षीं मुंबई सरकारनें लागूं केला. त्याच-प्रमाणें मध्यवर्ती सरकारचा औद्योगिक कलह कायदा, १९४७ हा त्याच वर्षीं लागू झाला. या कायद्या-मुळें औद्योगिक कलह समझोत्यानें व लवादामार्फत सोडविण्याची यंत्रणा निर्माण झाली आहे. मुंबई औद्योगिक संबंध कायद्याखालीं या जिल्ह्यांतल्या चार कापड गिरणी कामगार संघटना प्रातिनिधिक म्हणून नोंदविण्यांत आल्या आहेत. त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें––

(१) राष्ट्रीय गिरणी कामगार संघ, जळगांव.
(२) हिंदुस्थान सिल्क मिल कामगार युनियन, पिंप्राळे (कचेरी–जळगांव).
(३) राष्ट्रीय मिल मजदूर संघ, अमळनेर.
(४) चाळीसगांव गिरणी कामगार युनियन, चाळीसगांव.

या शिवाय पुढील महत्त्वाच्या ट्रेड युनियन्स आहेत.

(१) पूर्व खानदेश जिन प्रेस फॅक्टरी वर्कर्स युनियन, अमळनेर.
(२) पूर्व खानदेश व्हेजीटेबल वर्कर्स युनियन, अमळनेर.
(३) म्युनिसिपल वर्कर्स युनियन, जळगांव.
(४) म्युनिसिपल नोकर संघ, अमळनेर.
(५) म्युनिसिपल नोकर संघ, चाळीसगांव.
(६) नगरपालिका कामगार पंचायत, भुसावळ
(७) जनरल वर्कर्स युनियन, चाळीसगांव.
(८) यावल तालुका म्युनिसिपल कामगार युनियन, यावल.
(९) पूर्व खानदेश स्थानिक स्वराज्य नोकर संघ, पहूर.
(१०) जिन-प्रेस वर्कर्स युनियन, बोदवड.
(११) विडी वर्कर्स युनियन, एरंडोल.
(१२) राष्ट्रीय हातकागद कामगार संघ, एरंडोल.
(१३) पूर्व खानदेश लोकल बोर्ड स्टाफ युनियन, जळगांव.
(१४) पब्लिक वर्क्स डिपार्टमेन्ट कामगार युनियन, चाळीसगांव.

१९५५-५६ मध्यें या जिल्ह्यांत एकूण ४३ कामगार संघटना होत्या व त्यांची सभासद-संख्या १४,०७१ व उत्पन्न रुपये ४०,४१६ आणि खर्च रुपये ३३,०३५ होता. त्यांची एकूण मालमत्ता (ॲसेटस्) रुपये ६०,११६ होती व त्यांचीं देणीं (लायबेलीटीज्) एकूण रुपये ६२,१२६ होती. त्यापैकीं जनरल फंडाची रक्कम रुपये ५१,०५५ होती.

कामगार कल्याण केंद्रें

या जिल्ह्यांत कामगार कल्याण केंद्रें कामगारांची जास्त वस्ती अललेलीं जळगांव, चाळीसगांव, अमळनेर या शहरांतच आहेत. भुसावळ येथें रेल्वे कामगारांची मोठी संख्या आहे. पण त्यांच्यासाठीं अनेक सुखसोयी रेल्वेनें केल्या आहेत. कामगार कल्याण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या वरील ३ केंद्रांमध्यें करमणुकीचे कार्यक्रम, सामुदायिक समाज शिक्षणाचे कार्यक्रम, स्त्रिया व मुलांचे खास कार्यक्रम, वाचनालयें, खेळ वगैरे सोयी केल्या आहेत. प्रत्येक केंद्रासाठीं एक वेल्फेअर ऑर्गनायझार असून त्याच्या मदतीस एक अर्ध वेळ पुरुष व एक अर्ध वेळ स्त्री कार्यकर्ते असतात. या केंद्रांत फूटबॉल, व्हॉलीबॉल, हुतुतू, खोखो असे मर्दानी व कॅरम, बुद्धिबळ, पिंगपॉंग यांसारखे बंदिस्त जागेंतील खेळ चालतात. हार्मोनियम, तबला वगैरे संगीताचीं साधनेहि तेथें ठेवलीं जातात. वाचनाल-यांत अनेक वृत्तपत्रें, मासिकें, पुस्तकें असतात. केंद्रांतर्फे सहली, सामने, वक्तृत्वस्पर्धा इ० कार्यक्रम केले जातात. कलापथकाचे कार्यक्रम, बोलपटाचे कार्यक्रम, नाटचाचे वा संवादाचे कार्यक्रम असे सांस्कृ-तिक कार्यक्रमहि केले जातात. प्रथमोपचारासाठीं साधनें, गृहोपचाराचीं साधनें इ० आरोग्यविषयक सुखसोयीहि तेथें असतात. कामगारांचीं मुलें, स्त्रिया व ते स्वतः यांचा फावला वेळ सात्विक करमणुकी-साठीं जावा व त्यांच्यांत सामाजिक भावना निर्माण व्हावी या उद्देशानें हीं केंद्रें चालविलीं जातात. चांगल्या कार्यक्रमास कामगार वर्गीय मोठ्या संख्येनें जमतात.

जीवनमान निर्देशांक

कामगारांना मिळणारा महागाई भत्ता राहणीमानाच्या निर्देशांकाशीं निगडीत असतो तेव्हां रहाणीमानाचा निर्देशांक चालू १९६० सालांत दर महिन्यास किती होता हें पुढें दिलें आहे.

१९६०

महिना.	निर्देशांक.
जानेवारी	४८८
फेब्रुवारी	४८७
मार्च	४७९
एप्रिल	४८२
मे	४८६
जून	४९०
जुलै	५०३
ऑगस्ट	५०१
सप्टेंबर	५०१
ऑक्टोबर	५०५
नोव्हेंबर	४९९
डिसेंबर	४८७

उद्योगधंदे व कामगार कल्याण याच संबंधांत उद्योगविनिमय याचाहि विचार करणें इष्ट आहे. जळगांव येथें उद्योगविनिमय केंद्राची जिल्हा कचेरी असून जिल्ह्यांत सर्व प्रकारच्या उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यासाठीं या कचेरीतर्फे प्रयत्न करण्यांत येतो. उद्योग-विनिमय केंद्रांचें काम दुहेरी असतें. एक तर ज्या उमेदवारांना रोजगार हवा आहे त्यांना तो पुरविणें व दुसरें ज्या **उद्योगकांना** उमेदवारांची जरुरी आहे त्यांना उमेदवार पुरविणें. हें केंद्र येथें १९४६ पासून सुरू आहे.

उद्योग-विनिमय

या उद्योगविनिमय केंद्रांमध्यें जिल्ह्यांतील निरनिराळ्या खात्यांतील नोकऱ्यांसंबंधींची वर्गवार माहिती गोळा केली जाते. आतांपर्यंत फक्त सरकारी व निमसरकारी संस्थांच्या नोकरांचीच माहिती नोंदविली जात असे पण यापुढें खाजगी उद्योगधंद्यांतील नोकरांचीहि आंकडेवारी गोळा करण्यांत येणार आहे. याशिवाय तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या उद्योग विनिमय केंद्रांशीं "यूथ एम्प्लॉयमेन्ट सर्व्हिस" या नांवाचा एक विभाग संलग्न होण्याची शक्यता आहे. शाळा-कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या तरुणांनी केवळ नोकरीवर अवलंबून राहून किंवा कारकुनीच्या जागेसाठीं वाट पाहत बसून आपल्या उमेदवारीच्या कालाचा अपव्यय करूं नये म्हणून त्यांना व्यवसाय मार्गदर्शन या विभागातर्फे करण्यांत येईल. त्यामुळें उमेदवारांना कांहीं अपरिचित क्षेत्रांविषयीं व स्वतंत्र व्यवसायाबद्दल मार्गदर्शन मिळेल.

जळगांव जिल्ह्यांत निरनिराळ्या सरकारी व निमसरकारी व्यवसाय केंद्रांत गेल्या ३० जून १९६० पर्यंत किती लोक काम करीत होते याची माहिती पुढें दिली आहे.

क्रमांक.	खातीं.	नोकरींत असलेल्यांची संख्या
१	भारत सरकारचीं खातीं	१४,८३५
२	राज्यसरकारचीं खातीं	५,८२८
३	निमसरकारी खातीं	१४२
४	स्थानिक संस्था	११,०२८
	एकूण	३१,८३३

जिल्ह्यांत सर्वसाधारणपणें सिव्हिल व मेकॅनिकल इंजिनियर्स व ओव्हरसिअर्स, मेडिकल ऑफिसर्स, लेडी डॉक्टर्स, कंम्पौंडर्स, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, वायरमेन, सिंधी व उर्दू जाणणारे शिक्षक लोंकर विणकाम, लाखकाम, शिवणकाम, चर्मोद्योग, सुतारकाम या कला जाणणारे व शिकवूं शकणारे शिक्षक, लघुलिपी जाणणारे, मागासलेल्या वर्गांतील पदवीधर व टायपिस्ट इ० नोकऱ्यांच्या बाबतींत उमेदवारांची दुर्मिळता आढळते तर शिपाई, हमाल, पहारेकरी, अनुभवी व टायपिंग न जाणणारे एस.एस्.सी. झालेले, कारकुनाच्या जागेसाठीं धडपडणारे उमेदवार, एस् एस्. सी. व ड्रॉइंगची दुसरी परीक्षा झालेले ट्रेसर्सच्या जागेसाठीं अर्ज करणारे उमेदवार, २५ पेक्षां जास्त वयाचे पूर्वानुभव

नसलेले उमेदवार इ० उमेदवारांची विपुलता आढळून येते व पुरवठ्याच्या मानानें त्यांची मागणी कमी असते.

औद्योगिक वसाहती

जिल्ह्या जिल्ह्यांतून उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन महाराष्ट्राचा औद्योगिक विकास घडविण्याचें राज्य सरकारचें धोरण असल्यानें त्या दिशेनें आतां पाऊलें पडूं लागलीं आहेत. जळगांव येथें औद्योगिक वसाहत स्थापन करण्यास सरकारनें अग्रहक्क दिला आहे व त्या बाबतींत हालचाली सुरू आहेत. औद्योगिक वसाहतीसाठीं जागा, पाणी, वीज व रस्ते या सुखसोयी उपलब्ध करण्यास सरकार मदत करतें. या नियोजित वसाहतीसाठीं जागेची निवडहि झाली आहे. ही वसाहत तिसऱ्या योजनेंत निर्माण होईल व शहरांतील सर्व उद्योगधंदे तेथें जातील. ही वसाहत मोठी होईल. याशिवाय लहान स्वरूपाच्या आणखी ४-५ वसाहती भुसावळ, पाचोरें, चाळीसगांव, अमळनेर, चोपडे या ठिकाणीं संकल्पिल्या आहेत. जळगांवची वसाहत पूर्ण होतांच यांपैकीं कांहीं वसाहती निर्माण होतील. त्यामुळें जिल्ह्याच्या औद्योगिक विकासास चालना मिळेल. वीजपुरवठ्याची कमतरता ही एक अडचण औद्योगिक विकासाचे बाबतींत या जिल्ह्यांत आढळते. पण भुसावळ येथें ३० हजार किलोवॅट शक्तीचें विद्युत्केंद्र तृतीय पंचवार्षिक योजनेंत खानदेश-मराठवाडा वीज योजनेप्रमाणें अस्तित्वांत येण्याची शक्यता असल्यानें तीहि अडचण दूर होईल. सहकारी क्षेत्रांतील कांहीं कारखाने या जिल्ह्यांत तृतीय योजनेच्या काळांत सुरू होतील.

कुटीरोद्योग व ग्रामोद्योग

जळगांव जिल्ह्यांत हातमाग, सुतारकाम, चर्मोद्योग, तेलघाणे, बांबूकाम, कुंभारकाम, लोहारकाम हे महत्त्वाचे कुटीरोद्योग आहेत. याशिवाय कातडीं कमावणें, कागदकाम, विटा पाडणें, विडचा वळणें, लोंकरकाम, तांब्यापितळेचीं भांडीं तयार करणें, सोनारकाम हे त्यापेक्षां कमी महत्त्वाचे कुटीरोद्योग आहेत. या सर्व छोटचा छोटचा उद्योगांत १९५८ मध्यें सुमारें २५,००० लोक गुंतलेले होते. गेल्या २-३ वर्षांत यामध्यें आणखी वाढ झालेली आहे. जिल्ह्यांत कुटीरोद्योग, औद्योगिक सहकार, खादी व ग्रामोद्योग या विविध खात्यांतर्फे ग्रामोद्योगांना विविध प्रकारचें सहाय्य व उत्तेजन देण्यांत येत असल्यामुळें या उद्योगाचा विकास होत आहे. या सर्व धंद्यांत परंपरागत चालत येणारें कारागिरांचें कौशल्य व आधुनिक कालमानानुसार होणाऱ्या सुधारणा दृष्टोत्पत्तीस येत आहेत. या कारागिरांनीं आपल्या सहकारी संस्था प्रस्थापित केल्यामुळें खेडयांपाडयांतून विखुरलेला कारागीरवर्ग एकत्र येण्यास फारच मदत झाली. कारागिरांच्या सहकारी संस्थांचीं विक्री केंद्रें प्रमुख शहरीं दिसूं लागलीं आहेत.

विविध कुटीरोद्योगांतील किती कारागीर सहकारी कार्यक्षेत्रांत आले आहेत हें पाहणेंहि इष्ट ठरेल. हातमाग–४,५००, सुतारकाम–३५०, तेलघाणी–३००, हातकागद–२५०, चर्मोद्योग– व कातडीं कमावणें–२००, लोहारकाम–१५४, लोकरकाम-१२०, कासारकाम–४०, बांबू कामगार–३५, विडी कामगार–२५, ग्रामोद्योग–२८७, इतर–४१.

आतां यापैकीं विविध उद्योगधंद्यांची परिस्थिति आपण पाहूं.

हातमाग हा या जिल्ह्यांतला प्रमुख उद्योग आहे. जिल्ह्यांत आतांपर्यंत ६,८३५ हातमाग
नोंदविण्यांत आले आहेत. त्यांवर सुमारें २८,००० विणकर उपजीविका करीत आहेत. ४,५००
वणकर सहकारी संस्थांचे सभासद आहेत. नशिराबाद, पिंप्राळे, धरणगांव, एरंडोल, पारोळे,
कासोदें, चोपडे, यावल, फैजपूर, सावदें, भालोद, किनगांव, वरणगांव
हीं जिल्ह्यांतील प्रमुख हातमाग केंद्रें आहेत. बहुतेक हातमागांवर

हातमाग

साडचा, धोतरें, खण, शर्टिंग, कोटिंग हेंच कापड तयार होतें. सुमारें पांच-सहाशें माग जाडेंभरडें कापड, सतरंज्या, झोरे वगैरे तयार करतात. या धंद्यांत मुख्यतः साळी व कोष्टीच काम करतात. पण पाळधी, कासोदें, किनगांव अशा कांहीं ठिकाणीं मुसलमान कारागीर

ग्रामोद्योग व कुटिरोद्योग



हा धंदा करतात. एरंडोल, धरणगांव, नशिराबाद, फैजपूर, सावदें अशीं कांहीं ठिकाणें वरच्या दर्जाचें कापड निर्माण करण्यांतहि नांवाजलेलीं आहेत. एरंडोल व नशिराबाद आठ वार लांब व ४७ इंच रुंदीची "तीनचादी" साडी विणण्यासाठीं प्रसिद्ध आहेत. ही साडी ८-९ रु. स एक मिळते. सावदे येथें कृत्रिम रेशमाच्या कांठाच्या ८ वार ४८ इंच रुंदीच्या साड्या, ४०×४०, ६०×६०, ६०×४० ६०×८०, ८०×८० अशा जाड्यापासून तलम सुतापर्यंत विणल्या जातात. ८।। वार व ४८ इंची साड्या ४०×२६ व ४०×३२ अशा सुतांत विणल्या जातात. फैजपूर खण फार प्रसिद्ध आहेत. कासोदें, पाळधी व किनगांव येथें झोरे विणले जातात. कासोदें येथें हा धंदा गेलीं १५० वर्षें चालूं आहे.

निरनिराळ्या नंबरचें सूत व कृत्रिम रेशीम हाच या धंद्याला लागणारा प्रमुख कच्चा माल आहे. २० पासून ८० नंबरपर्यंतचें सूत धोतरें, खण व साड्यांना वापरतात तर २ ते १० नंबरचें सूत सतरंज्या, झोरे व जाडेंभरडें कापड यासाठीं वापरलें जातें. सूत व रेशीम मुंबईहून आणतात. विणकर बहुतेक फ्लायशटलचे मागच वापरतात. अलीकडे कांहीं विणकरांनीं स्वयंचलित माग बसविले आहेत. फ्लायशटलचे माग येथेंच तयार करतात. ९० टक्के उत्पादन साड्या, खण, धोतरें, शर्टिंग व कोटिंगचें असतें व १० टक्के सतरंज्या, झोरे यांचें असतें. ४ माणसांचें एक बिणकर कुटुंब आठवड्यांत ५ साड्या काढून रोज सुमारें दीड रुपया मजुरी मिळवितें. आठवड्यांत २ विणकर मिळून सर्वसाधारणपणें सहा झोरे काढतात. बाइंडींग, वार्पींग, साइझिंग हीं कामें स्त्रिया व मुलें करतात व मागावर पुरुष काम करतात. साड्या आठवडे बाजारांत व सहकारी संस्थांच्या विक्री केंद्रांत विकल्या जातात. जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळहि त्यांना बिक्रीच्या कामीं मदत करतें. झोरे आठवडे बाजारांत खपतात व मध्य प्रदेशांतहि निर्यात केले जातात.

जळगांव जिल्ह्यांत एकूण २५ बिणकर सहकारी संस्था असून त्या बव्हंशीं कार्यक्षम आहेत. सर्व जिल्हाभर विखुरलेल्या सहकारी संस्थांचे कार्यांत एकसूत्रीपणा आणण्याचें काम जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळ करतें.

हातमाग विकास योजनाः—हातमाग धंद्याच्या विकासार्थ सरकारी रीत्या कुटीरोद्योग व औद्योगिक सहकार खात्यामार्फत प्रयत्न चालूं आहेत. सदर खात्यामार्फत या धंद्याच्या विकासार्थ खालील निरनिराळ्या योजना राबविण्यांत येत आहेत.

१. भाग भांडवलास मदत :— सहकारी सोसायट्यांची सांपत्तिक परिस्थिती भक्कम होण्याकरितां व त्याचबरोबर त्यांचें भांडवल वाढावें म्हणून खात्यामार्फत १५ वर्षें लांब मुदतीचें कर्ज देण्यांत येतें. ६,३५० रु० वरील योजनेखालीं निरनिराळ्या विणकर संस्थांस देण्यांत आलेल आहेत.

२. खेळत्या भांडवलास मदत :— सहकारी संस्थेस आर्थिक टंचाई भासूं नये म्हणून खात्यामार्फत त्यांच्या खेळत्या भांडवलावर देखील कर्ज देण्यांत येत असतें. याप्रमाणें रु. २,८०,६२९ चें आर्थिक सहाय्य देण्यांत आलें आहे.

३. रंगणीगृहास मदत :— विणकर सहकारी संस्थांना आपल्या सुताच्या रंगणीकरितां इतरत्र जावें लागूं नये, त्यांनीं विणलेला कपडा हा स्वस्त पडावा, त्यावर वाहतूक वा इतर खर्चाचा बोजा पडूं नये, रंग पक्का यावा म्हणून खात्यातर्फे वरील योजना हाताळली गेली आहे. जिल्ह्यांतील विणकर

संस्थांना मध्यम व लहान प्रकारचीं रंगणीगृहें देण्यांत आलेलीं आहेत. यासाठीं रुपये ३४,९५६ ची मदत देण्यांत आलेली आहे.

४. हातमाग कापड विक्री व्यवस्था

(अ) हातमाग कापडाची विक्री करण्यासाठीं दिल्या जाणाऱ्या मदतींत एक रुपयास ५ नये पैसे या दरानें हातमागाच्या कापड विक्रीवर देण्यांत येणारें रिबेट ही एक महत्त्वाची सवलत आहे. मात्र तें हातमागाचें कापड सहकारी संस्थेनें निर्माण केलेलें असलें पाहिजें. जळगांव जिल्ह्यांत वरील योजनेखालीं विणकर सहकारी संस्थांना रु. १,४३,२२१ ची मदत देण्यांत आलेली आहे.

(ब) हातमाग कापडाच्या विक्रीमधील अडचणी दूर करण्यासाठीं खात्यातर्फे विणकर सहकारी संस्था व जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळास विक्री केंद्रें उघडण्यासाठीं मदत देण्यांत येते.

१. प्रत्येक विक्री केंद्रास प्रथमवर्षी येणाऱ्या आवर्तक खर्चास रु. २५०० ते रु. ६००० मदत देण्यांत येते.

२. दुसऱ्या वर्षी येणाऱ्या आवर्तक खर्चाच्या ७५ टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यांत येते. अशा प्रकारें ९९,०१३ रुपयांची मदत देण्यांत आलेली आहे.

५. हत्यारें व अवजारें :—हातमाग कापडाची उत्पादन—क्षमता वाढविण्यासाठीं आणि सुबक कापड निर्मितीसाठीं येणारा खर्च कमी करण्यासाठीं विणकर सहकारी संस्थांना हातमागांत सुधारणा करण्यासाठीं ह्या योजनेनुसार अनुदान देण्यांत येत असतें.

तसेंच फ्लाय शटल मागांना टेक अप—मोशन—अटॅचमेंट जोडण्यासाठीं प्रत्येकीं रु. ७० याप्रमाणें अनुदान देण्यांत येतें. ह्याशिवाय पोलादी फण्या व वॉनिश केलल्या वया अशा सुटचा भागांसाठीं प्रत्येक मागास रु. १० व २० अनुदान देण्यांत येतें. तसेंच डॉबीज्, डॉप बॉक्सेस, वायंडर स्ले ह्यासारखे अन्य सुटे भाग खरेदी करण्यासाठीं खात्यामार्फत विणकर सहकारी संस्थांना १९५९–६० मध्यें ४७,७०० रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यांत आलेलें आहे.

परंतु अद्याप ह्या धंद्यांतील ही प्रगति असमाधानकारक आहे. विणकरांचें उत्पन्न सरासरी रु. ४०–५० चे दरम्यान असतें. विणकरांची उत्पादनशक्ती वाढविण्याच्या दृष्टीनें जरी सर्वतोपरी प्रयत्न होत असले तरी गिरण्यांतील मालाची स्पर्धा, सुताचे व रंगाचे वाढते भाव, ग्राहकांची अपुरी क्रयशक्ति यामुळें मालाचा उठाव व्हावा तसा होत नाहीं.

६. हातमागाचे यंत्रमाग रूपांतर योजना

विणकरांच्या सहकारी संस्थांमार्फत यंत्रमाग सुरू करण्याबाबतची योजना भारत सरकारनें मंजूर केलेली आहे. सदर योजनेनुसार यंत्रमाग बसविणें विणकरांच्या संस्थांना शक्य व्हावें म्हणून कर्जे व अनुदान देण्यासंबंधीं या योजनेंत तरतूद करण्यांत आलेली आहे. सदर तत्त्वें पुढीलप्रमाणें आहेत:—

१. विणकर सहकारी संस्थेच्या एका सभासदास एकच यंत्रमाग देण्यांत येईल, व सदर सभासदांनीं आपले हातमाग बंद ठेवलेच पाहिजें असें नाहीं.

२. यंत्रमाग संस्थेंतील प्रत्येक विणकरास भाग भांडवलाच्या साडेसत्याऐंशीं टक्के एवढ्या रकमेचें कर्ज दिलें जाईल. सर्वसाधारणपणें शेअरची दर्शनी किंमत रु. १०० अशी असेल.

३. प्रत्येक यंत्रमाग व त्याचीं मोटर्स, स्टार्टर्स, स्विचेस इ० उपकरणें व पॅकींग आणि अन्य खर्च वगैरेसाठीं येणाऱ्या खर्चास १०० टक्केपर्यंत रकमेचें कर्ज.

४. प्राथमिक तयारीसाठीं आणि प्रक्रियेसाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रीकरितां आणि वर्कशॉपकरितां भांडवली खर्च देण्यांत येईल. त्यापैकीं ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यांत येईल.

५. कर्जावरील व्याज आणि तांत्रिक मार्गदर्शन या बाबतींत होणाऱ्या आवर्तक खर्चाची रक्कम सरळ अनुदान म्हणून देण्यांत येईल.

६. प्रत्येक मागासाठीं रु. १००० याप्रमाणें खेळत्या भांडवलासाठीं कर्ज देण्यांत येईल.

सदर योजनेनुसार खालीलप्रमाणें आर्थिक सहाय्य आतांपर्यंत देण्यांत आलेलें आहे:—

१.	भाग भांडवलासाठीं	रु. ९,९९२.
२.	खेळत्या भांडवलासाठीं	रु. १,६५,०७०.
३.	प्राथमिक प्रक्रियेसाठीं	रु. १,१७,३८५.
४.	मशिनरीसाठीं	रु. ४,६२,०००.

ह्या योजनेनुसार जळगांव जिल्ह्यांतील २५ विणकर संस्थांपैकीं १२ विणकर सहकारी संस्थांना प्रत्येकीं १५ याप्रमाणें एकूण १८० यंत्रमाग देण्यांत आलेले आहेत.

सध्यां एरंडोल, धरणगांव, पारोळे, चोपडा, सावदा, नशिराबाद, पिंप्राळा येथें यंत्रमाग चालू असून त्यांवर ३६० कारागीर सभासद काम करीत आहेत. त्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें रु. २,९७,००० आहे. त्यांना दरमहा रु. ८० ते ९० सरासरी उत्पन्न पडतें. याशिवाय जेथें वीज उपलब्ध नाहीं अशा ठिकाणीं ऑईल एंजिनच्या सहाय्यानें यंत्रमाग सुरू करण्याची योजना आंखण्यांत आली आहे.

या जिल्ह्यांत खादीचें काम करणाऱ्या सहा संस्था असून यांतील ४ संस्था खादी उत्पादनाचें, ३ अंबरचें, १ वस्त्रस्वावलंबनाचें व १ खादी विक्रीचें काम करीत आहेत. याशिवाय दहा वस्त्र स्वावलंबन केंद्रें पण मुंबई ग्रामोद्योग मंडळातर्फे चालू आहेत. खादी भांडारें व एजन्सी मिळून जिल्ह्यांत १५ खादी विक्रीकेंद्रें आहेत. जिल्ह्यांत ७ **खादी** विणकाम केंद्रें असून त्यांत ६२ माग व १५५ अंबर चरखे चालू आहेत. अंबर चरखा चालविण्याचें शिक्षण अंबर परिश्रमालयाद्वारें तीन केंद्रांमार्फत दिलें जातें. ऑक्टोबर १९५९ अखेरपर्यंत ४९१ इसमांना हें शिक्षण दिलें, त्यांतील ३४५ इसमांनीं चरखे नेले पण त्यांपैकीं १५५ चरखेच चालू राहिले. अंबर कातकरांना सुरुवातीपासून ऑक्टोबर १९५९ अखेरपर्यंत एकूण रु. ३६२२५ मजुरी देण्यांत आली. जिल्ह्यांत १२०० चे वर खादीधारी असून ६५४ वस्त्रस्वावलंबनासाठीं कमी अधिक कांतीत असतात. खादीच्या उद्योगांत १०० इसमांना पूर्ण वेळ व १७५ इसमांना

अर्धवेळ मजुरी मिळत आहे. नेहमींच्या चरख्यावर सूत कातणाऱ्याला रोजीं सर्वसाधारणपणें ४ ते ६ आणे मजुरी मिळते पण अंबर चरखा चालविणाऱ्यास ८ ते १२ आणे रोज मजुरी पडते. अंबर चरख्यावर सूत कातून पारोळें येथील एका स्त्रीनें मुलाचे मदतीनें एका महिन्यांत १३५ रु. मजुरी मिळविल्याचेंहि उदाहरण आहे. हातमाग विणकऱ्यास रोज सव्वा ते दीड रुपया मजुरी पडते. खादी सुताची किंमत दर पौंडी सव्वा तीन ते चार रुपये असते व एक चौरसवार खादीची निर्मिती किंमत सव्वा ते दोन रु. पडते. पुरुष, स्त्रिया व मुलें फावल्या वेळांत सूत कातूं शकतात. अंबरसुतापासून ऑक्टोबर १९५९ अखेर ८३२२१ चौरस वार रु. १,६१,५३० किंमतीची खादी उत्पादन झाली. मात्र त्यांपैकीं सुमारें ८० टक्के खादी विकली जाऊन २० टक्के खादी ऑक्टोबर १९५९ अखेर शिल्लक होती.

लोंकर विणकाम

लोंकर विणकामाचा धंदा हा ग्रामपातळीवरच चालत असल्यानें ग्रामीण अर्थव्यवस्थेंतील तो एक महत्त्वाचा भाग आहे. मेंढ्या पाळणें, त्यांची लोंकर काढणें, ती पिंजडणें व त्याचें सूत कातणें, वार्पींग, साइझिंग, विणकाम इ० कामें या धंद्यांत अंतर्भूत होतात. डोंगराळ भागांत व खेड्यांत राहणारे धनगर हा धंदा करतात. जिल्ह्यांत सुमारें २ लक्ष ६० हजार मेंढ्या असून त्यांपासून १,८३,००० पौंड लोंकर अंदाजें निघते. एरंडोल तालुक्यांतील आडगांव व कासोदें, चाळीसगांव तालुक्यांतील खेडी खुर्द, भडगांव पेट्यांतील गिरड हीं या जिल्ह्यांतील प्रमुख लोंकरकामाचीं केंद्रें आहेत. मुंबई आर्थिक व औद्योगिक पाहणी कमिटीच्या अहवालाप्रमाणें १९४० मध्यें २२५ लोक लोंकर पिंजणें, कातणें व विणणें या धंद्यांत होते. लोंकर जिल्ह्यांतहि तयार होते व मध्यप्रदेशांतूनहि आणली जाते. लोंकरीच्या विणकामाचे माग व इतर साहित्य अगदीं गांवठी पद्धतीचें असतें. लोंकरीचें मुख्य उत्पादन म्हणजे कांबळ्या. एक लोंकर विणकर दरमहा रु. ३० मजुरी मिळवितो. ४८" × ११०" या आकाराच्या ६ पौंड वजनाच्या कांबळीस सुमारें ११ रुपये पडतात. हा धंदा हंगामी आहे. पावसाळ्यांत लोंकर विण-
कर बेकार असतात व ते शेती करतात. कांबळ्या व्यापारी खरेदी करतात व गांवोगांवीं खपवितात. लोंकर विणकरांना भांडवलाचे अभावीं जेव्हां भाव कमी असतात तेव्हां लोंकर खरेदी करून ठेवतां येत नाहीं व व्यापारीहि त्यांना अडवितात व त्यामुळें त्यांना फायदा फारसा मिळत नाहीं. लोंकरीच्या मागाचें सर्व साहित्य जिल्ह्यांतच तयार होतें.

जिल्ह्यांत लोंकर विणकऱ्यांच्या चार संस्था आहेत. त्यांत ११७ सभासद असून त्यांचें भाग भांडवल रु. ३,२८३ आहे. त्यांचें वार्षिक उत्पादन सुमारें ३८००० रुपयांचें आहे. या संस्थांना खेळत्या भांडवलासाठीं कर्ज रु. ४,२४७, सुधारलेलीं हत्यारें व अवजारें यासाठीं रु. ८००, व्यवस्थाखर्चासाठीं अनुदान रु. ६०० याप्रमाणें सरकारकडून मदत देण्यांत आली आहे. सहकारी संस्था सभासदांना लोंकर पुरवितात व त्यांच्या पक्क्या मालाचे किंमतींतून लोंकरीची किंमत घेऊन त्यांना मजुरी देतात. सभा-
सदास मासिक सरासरी मजुरी रु. ५०–४५ न. पै. पडते.

चर्मोद्योग व कातडी कमावणें

या जिल्ह्यांत हातमागाचे खालोखाल चर्मोद्योग व कातडीं कमावण्याचे धंद्याला ग्रामीण उद्यो-
गांत स्थान आहे. जळगांव, चाळीसगांव, अमळनेर, भुसावळ, चोपडे, धरणगांव, फैजपूर, जामनेर, पारोळें, रावेर, सावदें, वरणगांव, यावल, खिरोदें, तळेगांव, लासूर, तामस-
वाडी हीं या जिल्ह्यांतील प्रमुख चर्मोद्योग केंद्रें आहेत. हीं सर्व गांवें तालु-
क्याचीं ठिकाणें वा मोठीं गांवें असून त्या ठिकाणीं आठवड्याचे बाजार भर-
तात. एके काळीं अमळनेरची कातडी मोटा व खोगिरें तयार करण्यासाठीं फार ख्याति होती. तेथें दरसाल १००० खोगिरें व ५०० मोटा तयार होत असत. पुढें शेतीच्या कामा-

साठीं लोखंडी मोटा व वाहतुकीसाठीं मोटारी सुरू झाल्यावर हा धंदा खालावला. १९५८ मध्यें २०० खोगिरें व १०० मोटांपर्यंत वार्षिक उत्पादन खालावलें होतें व आतां कदाचित् त्यापेक्षांहि कमी झालें असेल.

१९५१ चे शिरगणतींत जिल्ह्यांत छोटया एकूण २६५ चर्मोद्योगाचे व्यवसाय केंद्रांमध्यें ३९७ इसम गुंतलेले होते. खेड्यांपाड्यांत चर्मकार कारागीर पायतणें दुरुस्त करणें वा तयार करणें व मोटा दुरुस्त वा तयार करणें हीं कामें करतात व आपला माल स्थानिक बाजारांत वा व्यक्तिशः शेतकऱ्यांना विकतात. त्यांचीं खास दुकानें अशीं नसतात. १९३१ च्या शिरगतीनुसार चर्मोद्योगाचे व्यवसायांत गुंतलेल्यांची संख्या जिल्ह्यांत ४१४१ होती. हा धंदा सर्वसाधारणपणें परंपरागत चाललेला आहे. शहरामध्यें एखादा मोठा कारागीर रोजगारावर छोटे कारागीर नेमून धंदा करतो. छोटे कारागीर त्यांचें कसब व कार्यक्षमतेनुसार २ पासून ४ रुपयांपर्यंत रोजची मजुरी मिळवूं शकतात. या धंद्याला लागणारा कच्चा माल व हत्यारें बव्हंशीं स्थानिकच तयार होतात. मात्र चामडीं शिवण्याचीं यंत्रें व क्रोमचें चामडें मुंबईसारख्या ठिकाणाहून येतें. चपला, बूट, जोडे व मोटा यांचेंच प्रमुख उत्पादन होतें. सर्वसाधारण कामगार महिन्याकाठीं २५ बूट बनवूं शकतो. चांगला वाकबगार कामगार रोज एक जोडहि तयार करतो. एका जोडीची मूळ किंमत सर्वसाधारणपणें १० रु. पडते. या धंद्यांत कारागिराला साधारणपणें वर्षभर काम मिळतें. पावसाळ्यांत कांहीं चर्मकार शेतीहि करतात. साधारणपणें पावसाळ्यांत दुरुस्तीचीं कामें व हंगामासाठीं लागणारा माल तयार करून सांठविणें हीं कामें हे कारागीर करतात. ग्रामीण भागांत कारागीर गिऱ्हाईकांनाच थेट आपला माल विकतात. पण शहरांत दुकानदार माल विकून कारागिरांना मजुरी देतात. भांडवलाचे अभावीं कांहीं कारागिरांना व्यापारी आपल्या तावडींत घेतात. त्यांना कर्ज देऊन त्याची फेड मालाच्या रूपानें करून घेतात व त्यांत कारागिरांची पिळवणूक करतात.

या धंद्याचे विकासासाठीं सरकारनें लक्ष घातलें आहे. जिल्ह्यांत ११ शवच्छेदन केंद्रें मुंबई ग्रामोद्योग मंडळातर्फे दिलीं गेलीं असून या केंद्रांतून दरसाल सुमारें २५० ते ४०० मृतकातडीं, १५० मण हाडाची भुकटी, २५ ते ३० मण मांसाचें खत निर्माण केलें जातें.

या जिल्ह्यांत चर्मोद्योगाच्या ९ सहकारी सोसायटया आहेत. या संस्थांना मुंबई ग्रामोद्योग मंडळ व कुटीरोद्योग खातें यांचेमार्फत आर्थिक सहाय्य भरपूर देण्यांत येत असतें. या धंद्याचे विकासासाठीं (१) कातडीं कमाविण्याचे चांभार कुंडांचें बांधकाम, (२) सुधारलेलीं हत्यारें व अवजारें, (३) खेळतें भांडवल, (४) शेड व कातडीं कमाविण्याचे जागेचें बांधकाम, (५) विक्रीकेंद्र व मालविक्री इ० कारणासाठीं कर्ज व मदत मिळू शकते. या ९ संस्थांमध्यें सुमारें २०० सभासद असून भागभांडवल रु. ४,८५० व राखीव निधी रु. ३६८३ आहे. त्यांना खेळत्या भांडवलासाठीं रु. १०१५०, हत्यारें व अवजारांसाठीं रु. ४७००, विक्री केंद्रासाठीं रु. २००००, कुंडांचे बांधकामासाठीं रु. १५,०००, मालविक्रीसाठीं रु. ८०,००० याप्रमाणें आर्थिक सहाय्य देण्यांत आलें आहे. ज्या संस्था जिल्हा औद्योगिक मंडळांत सामील आहेत अशा संस्थांचा तयार होणारा माल खरेदीविक्रीकरितां जिल्हा औद्योगिक मंडळाला विक्री केंद्र उघडण्यास्तव रु. १५,००० कर्ज व रु. २,४०० ची मदत दिली गेली आहे. या धंद्यांतील कारागिरांना सुधारलेलीं हत्यारें व नवीन शास्त्रीय पद्धतीचें शिक्षण देण्यासाठीं चाळीसगांव येथें एक केंद्र उघडलें आहे. चर्मकार सहकारी संस्था सभासदांना कच्चा माल पुरवितात व त्यांचा पक्का माल घेऊन तो विकतात.

तेलघाण्या बहुतेक सर्व खेड्यांतून व शहरांतून आढळतात. १९४१ चे शिरगणतीनुसार जिल्ह्यांत या धंद्यांत १४३७ कारागीर गुंतलेले होते. १९५१ मध्यें तेल गाळणें व तें शुद्ध करण्याचीं छोटीं उद्योगकेंद्रें जिल्ह्यांत ५९ होतीं व त्यांमध्यें १५९ कामगार काम करीत होते. नशिराबाद, जळगांव, वरणगांव, एरंडोल, चोपडे, जामनेर, शेंदूर्णी, यावल, फैजपूर, न्हावी, साकळी, सावदें, रावेर, विरावली, चाळीसगांव, पारोळें इ० जिल्ह्यांतील प्रमुख तेल उत्पादन केंद्रें आहेत. हा धंदा तेली लोक आपल्या घरींच चालवितात. अद्यापीहि जुन्या पद्धतीचे बैलाचे घाणेच तेली वापरतात. सुधारलेल्या घाण्यांचा प्रचार हल्लीं होऊं लागला आहे. तेलगिरण्यांच्या प्रसारामुळें तेलघाण्यांचा धंदा खालावला आहे. १९३० चे सुमारास नशिराबाद मध्यें ५० व यावल आणि फैजपूर येथें प्रत्येकीं ९० तेलघाणें चालत असत. आज त्यांची संख्या खूप घटली आहे. ग्रामीण तेलघाण्यामध्यें मुख्यतः भुईमूग व कांहीं प्रमाणांत तीळ रगडला जातो. एक तेली महिन्याकाठीं सुमारें ३३ मण शेंगदाणे गाळतो. तो महिन्यांतून २३ दिवस काम करतो. साधारणपणें रोज ६० शेर शेंगदाण्यांतून २० शेर तेल व ४० शेर ढेप निघते. सरासरी ८–९ तास काम करून तेली २ ते २॥ रु. मजुरी मिळवतो. पावसाळ्यांत त्याला बहुधा काम नसतेंच. तेलाचा खपहि स्थानिकच असतो.

ग्रामीण तेल उद्योग

जिल्ह्यांत १५ तेल उत्पादक सहकारी संस्था, ६ ग्रामोद्योग उत्पादक सहकारी संस्था, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या १६, अन्य सहकारी सोसायट्या २, इतर रजिस्टर्ड संस्था ८ अशा ४७ संस्था या उद्योगांत काम करीत आहेत. त्यांचीं जिल्ह्यांत ५४ प्रमाणित तेल विक्री केंद्रें असून त्यांच्या-कडे १३५ सुधारलेल्या व १९० जुन्या अशा ३२५ तेलघाण्या १९५९ ऑक्टोबरपर्यंत नोंदविलेल्या आहेत. शिवाय न नोंदविलेल्या सुमारें १०० तेलघाण्या जिल्ह्यांत वैयक्तिक रीत्या चालू असतील. नोंद-विलेल्या तेल घाण्यांतून दरमहा सरासरी ३००० मण तेल उत्पादन होतें व प्रमाणित तेलविक्री केंद्रां-तून दरमहा सुमारें १५०० मणाचे वर तेल विक्री होत असतें. एरंडोल येथें एक सुधारलेली तेलघाणी निर्माण करण्याचें केंद्र सुरूं असून त्यांतून ऑक्टोबर १९५९ पर्यंत २३७ नवीन तेलघाण्या निर्माण करून विकण्यांत आल्या. या केंद्रांत घाणी बनविण्याचें सुतार–मिस्त्रीचें शिक्षण देण्याचीहि व्यवस्था केली आहे. एरंडोल व चोपडे येथें तेल गाळण्याचें शिक्षण देण्याची व्यवस्था आहे. चोपडे येथें खादी ग्रामोद्योग कमिशनचे योजनेप्रमाणें एक आदर्श तेलघाणी केंद्र समाधानकारकपणें चालू आहे. या व्यव-सायांत काम करणाऱ्या सर्व संस्थांचा "जिल्हा ग्रामीण तेल उत्पादक सहकारी संघ" हि १९५९ मध्यें स्थापन झाला आहे.

१५ सहकारी संस्थांमध्यें ३०० सभासद असून त्यांचें भागभांडवल रु. १००४० व राखीव निधि रु. ५५६० आहे. खेळत्या भांडवलासाठीं रु. ४१,६२५ कर्ज सरकारनें दिलें असून मुंबई ग्रामो-द्योग मंडळामार्फत विविध योजनेखालीं कर्ज रु. १,३१,६२५, मदत रु. १९,४४० व रिबेट रु. १४७२१ देण्यांत आले आहेत.

१९३१ च्या शिरगणतींत आपल्या चरितार्थाचें मुख्य साधन म्हणून लोहारकामाचा धंदा कर-णारे १५८९ इसम जिल्ह्यांत आढळले. १९५१ च्या शिरगणतीमध्यें जिल्ह्यांत लोहारकामाचीं १२९ व्यवसायकेंद्रें दृष्टोत्पत्तीस आलीं व त्यांत सुमारें ३०० लोकांना रोजगार मिळत होता. जळगांव, भुसावळ, एरंडोल, पारोळें, चाळीसगांव, अमळनेर, चोपडे व फैजपूर हीं जिल्ह्यांत लोहारकामाचीं केंद्रें समजलीं जातात. लोहार-कामाचा धंदा नागरी विभागांतला एक महत्त्वाचा दुय्यम धंदा गणला जातो व ग्रामीण लोकवस्तीचा लोहार हा एक अविभाज्य घटक आहे. लोहारकामाचे धंद्यांत बादल्या, पेट्या,

लोहार काम

तवे, कढया या घरगुती उपयोगाच्या वस्तू व नांगराचे फाळ, टिकाव, फावडें, घमेली अशा शेतकऱ्यांना लागणाऱ्या वस्तू तयार केल्या जातात. लोहारकामासाठीं लागणारा कच्चा माल म्हणजे १० ते ३० या दरम्यान विविध गेजचे लोखंडी पत्रे व लोखंडाचे १/१६" ते ६/१६" या जाडीचे गोल बार व १/१६" ते ५/८" या जाडीचे चपटे बार हा होय. याचे कारखाने असतात व कारखानदार रोजंदारीनें कारागिरांना नेमतात. कांहीं वेळां त्यांना मिळणारी मजुरी ही त्यांच्या कामाच्या प्रमाणावर ठेवलेली असते. एक कामगार रोज सरासरी १२ बादल्या तयार करून दोन ते तीन रुपयांपर्यंत मजुरी मिळवूं शकतो. या धंद्यांतल्या कारागिरांना सर्वसाधारणपणें वर्षभर काम मिळतें. एकादेवेळीं लोखंडाचा तुटवडा झाला तर काम बंद पडतें. तथापि कारागिरांवर सहसा बेकारीचा प्रसंग येत नाहीं, कारण कारखानदार त्यांना लागणारीं हत्यारें खरेदीं करून त्यांना दुरुस्तीचें वा इतर उत्पादनाचें काम दर ठरवून त्यांना पुरवितात.

अशा संस्थांतील कारागिरांनीं एकत्र येऊन आपल्या सहकारी संस्थाहि स्थापन केलेल्या आहेत. जिल्ह्यांत अशा ८ संस्था असून त्यांची सभासद संख्या १५४, भाग भांडवल रु. १५,५१०, राखीव निधी रु. १३,३०० आहे. त्यांना कुटीरोद्योग खात्यातर्फे भागभांडवलासाठीं २१०० रु., खेळतें भांडवलासाठीं ५६३३ रु., हत्यारें व अवजारांसाठीं रु. १२५० देण्यांत आले आहेत. त्यांचें एकूण वार्षिक उत्पादन सुमारें १,२०,००० आहे. या सहकारी संस्थांबाहेरील व्यक्तिगत कारागिरांचें उत्पादन साधारणपणें दोन लाख रुपयांपर्यंत होतें.

सुतारकाम

१९३१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्यांत आपल्या चरितार्थाचें मुख्य साधन म्हणून सुतारीचा धंदा करणारे ३८८५ लोक होते. चाळीसगांव, भुसावळ, जळगांव, अमळनेर, जामनेर, पारोळें, एरंडोल, धरणगांव, चोपडे, अडावद, एदलाबाद इ० प्रमुख शहरीं व खेड्यांतूनहि सुतार लोक उत्पादनाचें व शेतीच्या अवजारांच्या दुरुस्तींची कामें करतात. घरांचीं बांधकामें व दुरुस्त्या व फर्निचर यासाठीं सुतारांची फार जरुरी लागते. पारोळें, एरंडोल, धरणगांव व चोपडे येथील बैलगाड्यांची प्रसिद्धी मध्यप्रदेश व आंध्र प्रदेशांपर्यंत पोहोंचली आहे व तेथेंहि या गाड्यांची विक्री होत असते. गाड्यांना लागणारा कच्चा माल म्हणजे निरनिराळ्या प्रकारचें लांकूड, बांबू, खिळे, स्क्रुज्, रंग इ० होय. त्यापैकीं लांकूड, बांबू हे सातपुडा पर्वत, धुळें जिल्हा व मध्य प्रदेशांतून येतात तर इतर माल मुंबईहून येतो. सागाचें लांकूड हें फर्निचरसाठीं व खैर व बाभूळ हें लांकूड शेतीच्या हत्यारांसाठीं वापरलें जातें.

जिल्ह्यांत सुमारें २५०० गाड्या दरवर्षी तयार होतात. साधारणपणें एका गाडीला रु. ४०० पर्यंत खर्च येतो. एक सुतार आपल्या मदतनीसासह काम करून २५ दिवसांत एक गाडी तयार करूं शकतो. जेव्हां इमारतीचे कंत्राटदार वा कारखानदार हे सुतारांना कामावर घेतात तेव्हां त्यांना रोजंदारी देतात. त्यांना मिळणारी रोजगारी ही त्यांच्या कसबावर व कार्यक्षमतेवर अवलंबून असते. खेड्यांत कांहीं ठिकाणीं सुतारांना बलुत्यानें ठराविक मोबदल्यावर नेमलें जातें.

सुतार–लोहार कामाच्या जिल्ह्यांत एकूण ११ सहकारी संस्था असून त्यांत २८० सभासद आहेत. त्यांचें भागभांडवल रु. १३,२१० व राखीवनिधी ५२४८ आहे. त्यांना भागभांडवलासाठीं रु. १७००, खेळत्या भांडवलासाठीं रु. १०,५५१ व हत्यारें–अवजारें यासाठीं रु. ३३६० याप्रमाणें आर्थिक सहाय्य सरकारतर्फे देण्यांत आलें असून त्यांचें वार्षिक उत्पादन रु. ३५००० आहे.

कुंभारकामामध्यें या जिल्ह्यांत १९४० मध्यें मुंबई आर्थिक व औद्योगिक पाहणी कमिटीच्या अहवालानुसार २८५२ इसम गुंतलेले होते. अमळनेर, भुसावळ, चाळीसगांव, फैजपूर, सावदें, यावल, एदलाबाद, खिर्डी, खानापूर, जळगांव हीं या धंद्याचीं प्रमुख केंद्रें आहेत. १९५१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्यांत कुंभारकामाचीं छोटीं व्यवसायकेंद्रें एकूण ८९ होतीं व त्यांमध्यें २२३ इसम काम करीत होते. कुंभारकामाचें उत्पादन म्हणजे गाडगीं, मडकीं, माठ, खुजे, इ० मातीचीं भांडीं हें होय. उन्हाळचांत पाणी थंड होण्यासाठीं माठांची मागणी होते. स्थानिक यात्रांत व दिवाळीसारख्या सणांत कुंभारांचीं मातीचीं चित्रें व पणत्या चांगल्या खपतात.

कुंभारकाम

कुंभारांचा माल स्थानिक रीत्याच खपतो. कुंभाराचें सारें कुटुंबच त्याच्या कामांत मदत करतें व सर्व मिळून सरासरी २५ मातीचीं भांडीं रोज तयार करून सुमारें ५ रु. मजुरी मिळवितात. पावसाळचांत काम नसलें म्हणजे कुंभार शेती करतात. खेड्यांत बलुत्याची पद्धत जेथें रूढ आहे तेथें ठराविक बलुत्याचे मोबदल्यांत कुंभार आपलीं भांडीं शेतकऱ्यांना पुरवितात. कुंभाराचा कच्चा माल म्हणजे पिवळी, काळी माती, चिकण माती व सरपण हाच होय. मातीमध्यें घोड्याची लीद मिसळून मग त्याचीं भांडीं बनवितात. एक कुंभाराचें कुटुंब महिन्याकाठीं सुमारें ६० रु. मिळवतें.

कुंभारांच्या ५ सहकारी संस्था असून त्यांची सभासदसंख्या ९८, भागभांडवल रु. २६३०, राखीव निधी रु. २८३ आहे. त्यांना सरकारनें खेळत्या भांडवलासाठीं रु. २९३४, हत्यारें व अवजारांसाठीं रु. ३६५० आर्थिक सहाय्य केलें असून या संस्थांचें वार्षिक उत्पादन सुमारें रु. ७,००० आहे.

विटा पाडणें व कौलें तयार करणें या ग्रामोद्योगांत १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें २२२ इसम या जिल्ह्यांत गुंतलेले होते. हा उद्योग भुसावळ, चाळीसगांव, जळगांव, व फैजपूर येथें प्रामुख्यनें चालतो. कारण विटांसाठीं लागणारी विशिष्ट प्रकारची माती येथें मिळते. १९५१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्यांत विटांचे व कौलांचे १९ कारखाने आढळले व त्यांमध्यें १३४ लोक काम करीत होते. हा हंगामी उद्योग असून तो पावसाळचांत बंद पडतो व त्यावेळीं हे लोक शेतीभाती करतात. ठराविक माती, घोड्याची लीद, कोळशाचा चुरा व अर्धवट जळलेले कोळसे हें या धंद्याचें कच्चें साहित्य. अर्धवट जळलेले कोळसे हे रेल्वे स्टेशन्स व गिरण्या जेथें असतील तेथेंच मिळतात. विटांच्या भट्टया व लांकडी सांचे हीं यासाठीं लागणारीं हत्यारें. एक कारागीर एका मदतनीसासह रोजीं ८०० विटा पाडूं शकतो व त्यासाठीं त्याला २ गाड्या चिखल, अर्धी गाडी राख व कोळसा लागतो. साधारणपणें १०० चौ. फूट जागेवर उभारलेल्या विटांच्या भट्टींत ४००० विटा तयार होतात. हा धंदा कुंभार व त्याचीं बायकामुलें मिळून करतात व ते सहसा मजुरींनीं माणसें लावत नाहींत. त्यांना दिवसभर पुरण्याइतकें काम असतें. नदीकांठचे कोळीहि हल्लीं विटा पाडण्याचा धंदा करूं लागले आहेत.

विटा पाडणें

विटा पाडण्याप्रमाणेंच चुना भाजण्याचे कामहि कुंभारांचीं कुटुंबे करतात. चुनाभट्टयांचीं प्रमुख ठिकाणें म्हणजे भुसावळ, चाळीसगांव, चोपडे, फैजपूर, जळगांव हीं होत. मुंबई आर्थिक व औद्योगिक पाहणी-कमिटीच्या अहवालानुसार जिल्ह्यांत १९४० मध्यें २७०८ चुना भाजणारे लोक होते. या धंद्यासाठीं गाईचें शेण, चुनखडी व कोळसा एवढा कच्चा माल लागतो. काम करणाऱ्या तीन माणसांचें कुटुंब ३ दिवसांत २० पोतीं चुना भुकटी व २ पोतीं चुनखडी तयार करूं शकतें.

चुना भट्ट्या

बांबूकाम

बांबूकामाचीं या जिल्ह्यांतील ठिकाणें म्हणजे अमळनेर, चोपडे, फैजपूर, यावल आणि वरण-गांव हीं होत. त्यांमध्यें १९४१ सालीं २३२९ लोक गुंतलेले होते. हा मांग जमातीचा वंशपरंपरागत धंदा आहे. यासाठीं लागणारा बांबू सातपुड्यांत मिळतो. १०० बांबूंचें एक बंडल त्याच्या दर्जाप्रमाणें २० ते ४० रुपयांस १९५८ चे किंमतीनुसार मिळे. बांबूचा मुख्य माल म्हणजे सूप व टोपल्या हाच होय. एका बांबूच्या ६ टोपल्या निघतात व दिवसाकांठीं एक कारागीर १२ टोपल्या तयार करूं शकतो. बांबूकामाचा धंदा पावसाळ्यांत मंद असतो व त्यावेळीं तो कामगार शेतमजुरी करतो. बांबूचें उत्पादन हें आठवडे बाजारांत खपतें व कारागीर घरोघर हिंडूनहि खपवितात. बांबू कामगारांचीहि एक सहकारी सोसायटी स्थापन झाली आहे. फळबागांची वाढ झाल्यामुळें बोरें वगैरे फळांच्या निर्यातीसाठीं करंड्यांची जरुरी निर्माण झाली व त्यामुळें बांबू कामगारांना करंड्या तयार करण्याचा उद्योग सध्यां मिळाला आहे.

कासार काम

पूर्वीं जेव्हां बांगड्यांचा धंदा चांगला चालत असे तेव्हां बांगड्यांची कांच भट्टींतून स्थानिक रीत्याच निर्माण केली जात असे. पण हल्लीं बांगड्या उत्तर प्रदेशांतून आणतात. जिल्ह्यांत फक्त नशिराबाद येथेंच एक कांचभट्टी आहे. तेथें फुटक्या बांगड्या व इतर कांचेच्या वस्तू यांचेपासून बांगड्या क्वचित् तयार करतात. लग्नसराईंत बांगड्यांना फार मोठी मागणी असते व त्यावेळीं हा धंदा जोरांत चालतो. मात्र बांगड्यांचें उत्पादन सध्यां येथें पूर्णपणें बंद असून कासार उत्तर प्रदेश व पंजाब येथून आणलेल्या बांगड्या विकत असतात. हातानें तयार केलेल्या बांगड्यांचा धंदा, नशिराबाद, नेरी, पळासखेडे, पाळनेर, पाळधी या ठिकाणीं कांहीं दशकांपूर्वीं एक महत्त्वाचा उद्योग होता. पण आतां तो नामशेष झाला असून तो नशिराबादखेरीज कोठें दिसत नाहीं. नशिराबाद येथें सुमारें १५० कुटुंबें या धंद्यांत होतीं पण सध्यां या धंद्याची माहिती असलेले कांहीं लोक येथें आहेत एवढेंच.

तांब्या पितळेचीं भांडीं

तांब्या पितळेच्या भांड्यांचीं जिल्ह्यांतील मुख्य केंद्रें म्हणजे जळगांव व भुसावळ हीं होत. मुंबई आर्थिक व औद्योगिक कमिटीच्या पाहणींत १९३१ मध्यें जिल्ह्यांत या धंद्यांत ६६५ लोक असलेले आढळले. या धंद्यासाठीं पितळेचा व तांब्याचा पत्रा हा कच्चा माल लागतो व तो मुंबईहून आणतात. सर्वप्रकारचीं तांब्या पितळेचीं भांडीं–विशेषतः स्वयंपाकाची भांडीं व प्याले–हा माल तयार होतो. कारखानदाराकडे काम करणारा कारागीर चार पौंड वजनाच्या रोज पांच तपेल्या तयार करून रोजची ५ रु. मजुरी मिळवूं शकतो. या मालाचा खप खेड्यापाड्यापर्यंत होतो. विशेषतः लग्नाचे मोसमांत भांड्यांची विक्री झपाट्यानें होत असते.

जंगल कामगार सहकारी संस्था

यापूर्वीं जंगलांतील कामें जंगलकंत्राटदारच करीत असत. जंगलांच्या कूपांचे लिलांव होत व ते जंगल कॉंट्रॅक्टर घेऊन कामें करीत. त्यांत जंगलांत काम करणाऱ्या गरीब मजुरांची फार पिळवणूक होई म्हणून या कामगारांनींच संघटित होऊन हीं कामें करावींत या उद्देशानें १९४७ सालीं कै. श्री. बाळ गंगाधर खेर यांनीं कांहीं समाजसेवकांचे सहाय्यानें जंगल कामगार सहकारी संस्था स्थापन करून आदिवासी व वर्गीकृत जमातींतील लोकांची उन्नती करण्याची ही योजना आंखली. त्यांनीं लावलेलें हें रोप आतां बरेंच फोंफावूं लागलें आहे. औद्योगिक सहकारी खात्यामार्फत आदिवासी जमातींच्या उन्नतीकरितां भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांच्या योजनाद्वारें जंगल कामगारांच्या

सहकारी संस्था संघटित करून त्यांना उत्तेजन, मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य देत आहे. अशा संस्था सध्यां जिल्ह्यांत ८ असून त्यांची सभासद संख्या ५०५, भागभांडवल रु. १०,०२० व राखीव निधी रु. ९०९६ आहे.

त्यांना सरकारतर्फे भागभांडवलासाठीं रु. ६०००, व्यवस्था खर्चासाठीं रु. २४००, हत्यारें व अवजारें यासाठीं रु. १२०० व कल्याणकारी योजनांसाठीं रु. ३००० याप्रमाणें आर्थिक सहाय्य दिलें आहे. जिल्ह्यांत अडावद, चाळीसगांव, फत्तेपूर, चोपडे, खिरोदें, यावल इ० ठिकाणीं या संस्था आहेत. या संस्थांना खिरोदे सर्वोदय केंद्राचे संचालक श्री. भाऊसाहेब बोंडे हे मार्गदर्शन करतात.

मजूर सहकारी संस्था

मजूर सहकारी संस्था या जिल्ह्यांत जळगांव, चाळीसगांव, रावेर, पिंपळगांव हरेश्वर, भातखेडे, गाते या ठिकाणीं आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याचीं जीं रस्ते व इमारतींचीं कामें निघतात तीं कामें नेहमीं कंत्राटदारच टेंडर भरून घेतात व मजुरांना नेमून तीं पुरीं करतात. अर्थात् या कामांतला फायद्याचा बराचसा भाग कंत्राटदारांचे पदरांत पडतो व मजुरांचें त्यामुळें शोषण होतें. म्हणून काम करणाऱ्या मजुरांना एकत्र आणून त्यांच्यांत परस्पर सहकार्य निर्माण करून त्यांच्या सहकारी संस्था स्थापून त्या संस्थांनीं हीं कामें हातीं घेऊन पुरीं करावींत व सर्व फायदा प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांना व्हावा असा या संस्थांचा उद्देश आहे. अशा संस्था जिल्ह्यांत ९ असून त्यांत ८१२ सभासद आहेत व त्यांचें भाग भांडवल रु. ८,५०० व राखीव निधि रु. ७,७५४ आहे. या संस्थांना सरकारतर्फे भाग भांडवलासाठीं १७४० रु., व्यवस्थाखर्चासाठीं रु., १२००, गोडाऊनसाठीं रु. १२००० व खेळत्या भांडवलासाठीं रु. २७००० याप्रमाणें आर्थिक सहाय्य दिलें आहे. या संस्था वार्षिक सुमारे दोन लाखांचीं कामें करतात. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून रु. २०,००० चे आंतील कामें मजूर सहकारी संस्थांना अग्रहक्कानें दिलीं जातात. जळगांव येथील आदर्श मजुरांच्या सहकारी संस्थेनें नुकतीच स्वतःची इमारत बांधली आहे. श्री. राजाभाऊ मंत्री या संस्थांना सल्ला व मार्गदर्शन करून त्यांना पुढें आणण्यासाठीं प्रयत्न करीत असतात.

महिला सहकारी संस्था

जळगांव व यावल येथें महिलांच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या असून जळगांव येथील महिला मंडळानें एक हस्तकला वस्तूंचें व इतर सामानाचें उद्योगमंदिर चालविलें आहे. तसेंच एक शिवणकला केंद्रहि चालविलें आहे. या दोन संस्थांची सभासद संख्या ३२०, भागभांडवल रु. १२३५ व राखीवनिधी रु.११,३८१ आहे. त्यांना सरकारतर्फे भागभांडवलासाठीं रु. ६४००, खेळतें भांडवलासाठीं रु. १२९८६ व अवजारांसाठीं रु. ३७६५ व शेड व गोडाऊनसाठीं रु. ६०० याप्रमाणें आर्थिक सहाय्य देण्यांत आलें आहे.

सहकारी मुद्रणालय

सहकारी तत्त्वावर जळगांव येथें एक मुद्रणालय चालविण्यांत येत असून हें शहरांतलें एक कार्यक्षम व चांगलें मुद्रणालय समजलें जातें. या सहकारी मुद्रणालयाचें भांडवल १५,८०० रु. व राखीवनिधी रु. १४०२ आहे. या संस्थेस सरकारनें भागभांडवलासाठीं रु. १३,००० व हत्यारें व अवजारें यासाठीं रु. १४,४१३ एवढें आर्थिक सहाय्य दिलें असून, त्याचें वार्षिक उत्पादन सुमारें रु. ५४,००० असून दिलेली मजुरी रु. ११६१५ आहे.

ग्रामोद्योग सहकारी संस्था

मुंबई ग्रामोद्योग मंडळातर्फे नीरा, ताडगूळ, गूळ, खांडसरी, अखाद्य तेलसाबण, ग्रामीण आग पेटी, हातसडीचे तांदूळ, चर्मोद्योग, ग्रामीण तेल उद्योग, खादीचें उत्पादन, कुंभारकाम, इ० अनेक ग्रामोद्योगांचा विकास करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या असून या योजना कार्यवाहींत आणणाऱ्या कारागिरांनीं व इतर सर्वांनीं एकत्र येऊन आपल्या सहकारी संस्था स्थापन केलेल्या आहेत. अशा संस्था जिल्ह्यांत बहुतेक तालुक्याचे ठिकाणीं स्थापन झाल्या असून खेड्यांतूनहि त्यांची वाढ होत आहे. अशा १२ संस्था असून त्यांचे सभासद २८८, भागभांडवल रु. १६०६२, राखीवनिधी रु. .६८६७ आहे. त्यांना औद्योगिक खात्यामार्फत रु. ३०,००० आर्थिक सहाय्य दिलें आहे.

नीरा व ताडगुळ

या व्यवसायांत तीन संस्था काम करीत असून चौथी एक सहकारी संस्था नुकतीच रजिस्टर झाली आहे व हें काम हातीं घेणार आहे. पाळधी केंद्रास रु. ५०० किंमतीचें एक सेंट्रिफ्युगल मशीन नीरेपासून साखर तयार करण्यासाठीं देण्यांत आलें आहे.

जिल्ह्यांत नीरा उत्पादन केंद्रें ५ असून विक्री केंद्रें २२ आहेत.

गूळ खांडसरी :

ग्रामोद्योगाचे दृष्टीनें जळगांव जिल्ह्यांत हा व्यवसाय नव्यानेंच सुरू झाला असून सध्यां चार सहकारी संस्था, एक रजिस्टर संस्था व ३ व्यक्ती या योजनेंत काम करीत आहेत. १९५८–५९ सालचे हंगामांत या केंद्रामधून ७४ एकर क्षेत्रांतील ऊंस गाळण्यांत आला. व २४७२ मण गूळ व सुमारें ५ मण खांडसारी साखर प्रयोगादाखल करण्यांत आली. या व्यवसायांत साधारणतः ८५ इसमांना हंगामी काम मिळालें व सुमारें रु. ७३८५ मजुरीच्या रूपानें वांटण्यांत आले. या योजनेखालीं १९५९ नोव्हेंबरपर्यंत रु. २३,३८४ कर्ज व मदत रु. ८४०० देण्यांत आली.

अखाद्य तेल साबण :

अखाद्य तेलापासून साबण तयार करण्याचें काम तीन रजिस्टर्ड संस्थांनीं व एका सहकारी संस्थेनें हातीं घेतलें आहे. यांतील दोन साबण केंद्रें चालू असून त्यांनीं १९५८–५९ मध्यें २६९४ रु. किंमतीचें ३५९२ पौंड तेल, ९०७० रु. किंमतीचा १२००५ पौंड साबण व ५२० रु. किंमतीची ८३२४ पौंड पेंड निर्माण केली व २४२१ रु. किंमतीचा ३३७४ पौंड साबण विकला. या व्यवसायांत साधारणतः २१ इसमांना काम मिळालें व ३१६९ रु. मजुरीच्या रूपानें देण्यांत आले.

हातसडीचे तांदुळ :

या बाबतींतल्या योजना हातीं घेण्याचे प्रयत्न चालू आहेत पण ते अद्याप प्रयोगावस्थेंत आहेत.

समाज विकास व राष्ट्रीय विकास क्षेत्रांतील कुटीरोद्योगाचा कार्यक्रम :

या जिल्ह्यांतील सर्व तालुके विकास गटांत आलेले आहेत. विकास गटांतील कार्यक्रमांत शेतीचे खालोखाल कुटीरोद्योगास स्थान देण्यांत आलेलें आहे. प्रत्येक खेड्याला तेथील हस्तव्यवसायाच्या विकासास सहाय्य

करणें, नवीन व आधुनिक तंत्राचा अवलंब करणें, उत्पादनांत वाढ करण्याच्या हेतूनें लोकांना सहाय्य करण्यासाठीं नवीन उद्योगधंदे सुरुं करणें आणि बेकारांना कामधंदा पुरविणें हे समाज विकास व राष्ट्रीय विस्तार योजनेंतील मुख्य उद्देश होत. समाज विकास गटांतील कार्यक्रमांत प्रामुख्यानें कुटीरोद्योग खात्यानें तयार केलेल्या योजनांच्या धर्तीवर विविध धंद्यांचें शिक्षण देण्यासाठीं शिक्षण-केंद्रें स्थापन केलेलीं आहेत. शिवाय उत्पादन केंद्रें देखील उघडण्यांत आलेलीं आहेत तीं खालीलप्रमाणें :-

विकासगटाचे नांव	शिक्षण केंद्राचें नांव	ठिकाण
१. जामनेर	१. शिवणकाम शाळा	जामनेर
	२. सुतारी व लोहारी शाळा	"
२. चाळीसगांव	१. शिवणकाम शाळा	पातोंडा.
	२. " "महिलांसाठीं	"
	३. " "	कळमडू
	४. " "	खेडगांव
	५. " "	मेहुणबारे
	६. चर्मोद्योग शाळा	वाघळी.
	७. सुतारी व लोहारी शाळा	"
	८. कुंभारकाम शाळा	हिरापूर
	९. " "	बहाळ.
३. अमळनेर	१. शिवणकाम शाळा	पातोंडा.
	२. सुतारी व लोहारी शाळा	वावडा.
	३. चर्मोद्योग शाळा	दहिवद.
४. चोपडा	१. सुतारी व लोहारी शाळा	अडावद.
	२. शिवणकाम शाळा	चहार्डी.
५. एदलाबाद	१. शिवणकाम शाळा	कोथळी.
६. भडगांव	१. " महिलांसाठीं	भडगांव
	२. लोंकर विणकामशाळा	गिरड.
७. भुसावळ	१. वांबूकाम शाळा	भुसावळ.

कुटीरोद्योग खात्यामार्फत खालील योजनानुसार व्यक्तिगत कारागिरांना त्यांच्या विकासासाठीं मदत देण्यांत येते :-

१) (अ) सुशिक्षित बेकार, (ब) अधिकृत कारागीर व मागासलेल्या जमातींतील कारागीर यांना हत्यारें, अवजारें, खेळतें भांडवल यासाठीं कर्ज व अनुदान.

२) छोटया छोटया उद्योग धंद्यास सन १९३५ च्या नियमाप्रमाणें राज्यातर्फें मिळणारी मदत.

३) धंदेशिक्षण शाळेंत शिक्षण घेतलेल्या मागासलेल्या जमातींतील कारागिरास मिळणारी मदत.

वरील योजनेखालीं खालीलप्रमाणें आर्थिक मदत देण्यांत आली :-

१) अ-सुशिक्षित बेकार -१,८०० रु.

ब-मागासलेल्या जमातीचे कारागीर-२१,३७५ रु.

२) छोटया छोटया उद्योग धंद्यास दिलेली मदत –१९,३५० रु.

३) जन्मजात कारागीरास व भटक्या जमातींतील कारागीरास –रु. ५००

वरील योजनांची अंमलबजावणी १ डिसेंबर १९६० पासून औद्योगिक खात्यामार्फत होत आहे.

धंदे शिक्षणाच्या शाळा :

कारागिरांना सुधारलेल्या पद्धतीचे शिक्षण व अद्यावत हत्यारें व अवजारें यांचा उपयोग जलद उत्पादनासाठीं कसा करावा याबद्दलची माहिती होण्याकरितां खात्यामार्फत धंदे-शिक्षणाच्या शाळा खालील ठिकाणीं चालविण्यांत येत आहेत.

१) जळगांव–शिवणकाम शाळा, सुतारी व लोहारी काम शाळा.

२) चाळीसगांव–कातडी कमाविण्याचें शिक्षण देणारी शाळा.

या शाळांत पिढीजात कारागिरांना शिक्षण दिलें जाते. त्यांना साधारणतः २० ते २५ रु. विद्यावेतन दिलें जातें.

सहकाराची चळवळ

सहकाराचा गंगौघ

भारतांत सहकारी चळवळीचा प्रारंभ १९०४ सालीं होऊन आज ५६ वर्षे लोटलीं आहेत. जळगांव जिल्ह्यांतील सहकारी चळवळ ही त्यापेक्षां दोनच वर्षांनीं लहान आहे. १ मार्च १९०६ रोजीं बोदवड येथें स्थापन झालेली पहिली सहकारी सोसायटी ही या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची गंगोत्री आहे. त्यानंतर गेल्या ५४ वर्षांत गंगौघाप्रमाणें ही चळवळ या शेतकऱ्यांचें जीवन सुफलित व शुचिर्भूत करीत पुढें धांवत आहे. लहान लहान सहकारी संस्थांच्या रूपानें तिला मिळणारे जलौघ तिला पुष्ट करीत आहेत. प्रारंभींच्या काळांतले या चळवळीचें मर्यादित स्वरूप आतां पालटलें असून ती अधिकाधिक भरीव व सर्वस्पर्शी होत आहे. शेती, लहान उद्योगधंदे, प्रक्रिया करणारें क्षेत्र इ० कार्यास ही चळवळ पोषक होत असून आर्थिक लोकशाहीचें बीज या चळवळीनें रोवलें आहे. त्याला योग्य खतपाणी देऊन सहकारी संघराज्याचा प्रचंड, डौलदार व सर्वांना आपल्या घनदाट छायेंत निवारा देणारा विशाल वृक्ष आपणांला निर्माण करावयाचा आहे.

विविध शाखांनीं बहरलेला सहकारवृक्ष

भारतांत आपलें महाराष्ट्र राज्य व त्यांत जळगांव जिल्हा हा सहकारी चळवळींत अग्रेसर मानला जातो. या जिल्ह्याच्या कृषीप्रधान जीवनांत सहकाराचीं पाळे-मुळें खोल रुजलीं आहेत. हा खऱ्या अर्थानें शेतकऱ्यांचा व सहकाराचा जिल्हा आहे. या जिल्ह्यांत सहकारी चळवळीचें जाळें आर्थिक विकासाच्या सर्व क्षेत्रांत पसरलें आहे. सहकारी चळवळीचा विस्तार पाहिल्यास जिल्ह्यांतील शंभर टक्के खेडीं व ८४ टक्के शेतकरी सहकारी चळवळीनें व्यापिलीं आहेत. आज जिल्ह्यांत १२२९ विविध प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वांत आहेत. त्यांची सभासद संख्या १,९८,६९७ असून भाग-भांडवल रु. १,७७,५९३६८ आहे. रिझर्व फंड व इतर गंगा-जळी रु. १,४०,२०,७८७ असून खेळतें भांडवल १२ कोटी ५६ लाखांवर आहे.

आर्थिक कणा–जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

जळगांव जिल्ह्याच्या सहकारी चळवळीचा आर्थिक कणा म्हणजे या जिल्ह्याची मध्यवर्ती सहकारी बँक ही होय. ही बँक म्हणजे जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या जीवनाचा आधार आहे. ग्रामीण भागांत कर्जपुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र राज्यांतील जिल्हा सहकारी बँकांमध्यें या बँकेचें अग्रस्थान आहे. या बँकेचा लौकिक केवळ आपल्या राज्यांत नव्हे तर सबंध देशभर पसरलेला आहे. या बँकेच्या ४० शाखा व पे–ऑफिसेस जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यांत पसरलेलीं आहेत. मोठमोठ्या खेड्यापर्यंत या बँकेचें लोण पोहोंचल्यामुळें ग्रामीण

जनतेला काटकसरीची संवय लागून त्यांच्या ठेवी या बँकेंत जमा होत असतात व बँकेंत पैसे ठेवण्याची व गरजे-
प्रमाणें काढण्याची संवयहि शेतकऱ्यांना लागत आहे. जिल्ह्याचे कांहीं भागांत विशेषतः यावल तालुक्यांतील
तापीखोऱ्यांतील सुपीक गांवांत कर्जपुरवठ्यापेक्षां ग्रामीण ठेवी आकर्षिण्याचें महत्त्वाचें कार्य ही बँक करीत
आहे. ग्रामीण जनतेला कर्जपुरवठा करून ही बँक खऱ्या अर्थानें शेतकऱ्यांची बँक झाली आहे. ही बँक माफक
व्याजानें सहकारी सोसायट्यांना सभासदांना वांटण्यासाठीं कर्ज पुरविते. जिल्ह्यांतील बहुतांशीं सर्व सहकारी
संस्था या बँकेशीं संलग्न असून ११८२ सोसायट्या व ३१५५ व्यक्ती या बँकेचे सभासद आहेत. बँकेचें भाग
भांडवल रु. ३९ लक्ष २१ हजाराचें असून त्यापैकीं साडे सहा लाख भाग भांडवल मुंबई सरकारनें खरेदी केलेलें
आहे. रिझर्व्ह व इतर फंड रु. ३५ लाख ६२ हजार असून खेळतें भांडवल ४ कोटी ८८ लक्ष आहे. या बँकेच्या
१९५९–६० सालांतील व्यवहाराची माहिती पुढील तक्त्यांत दिली आहे.

पूर्व खानदेश मध्यवर्ती सहकारी बँक लि. चे व्यवहार :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें नेमलेल्या ग्रामीण पत पाहणी समितीनें आपल्या अहवालांत ग्रामीण पत-
पुरवठ्याबाबत केलेल्या क्रांतिकारक शिफारशी जुन्या मुंबई राज्यांतील सहकारी चळवळींतील कांहीं प्रगति-
शील जिल्ह्यांत प्रथम लागू करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें प्रयोगासाठीं निवडलेल्या कांहीं
निवडक जिल्ह्यांत जळगांवचा समावेश होऊन ही योजना २ ऑक्टोबर १९५५ पासून
पायलट योजना
या जिल्ह्यांत सुरू झाली. या योजनेचा मुख्य उद्देश शेती उत्पादनासाठीं लागणारें पुरेपूर
कर्ज सभासदांना पुरवून त्यांनीं शेतींतून जास्तींत जास्त उत्पन्न काढावें असा आहे. यानुसार पुरेपूर भांडवल
सहकारी चळवळीमार्फत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ह्या सहकारी बँकेवर पडली. जे
सभासद सहकारी मालविक्री सोसायटीमार्फत माल विकून तीन दिवसांत कर्जवसुली देतील त्यांना पुरेपूर कर्ज
देण्याची अभिनव योजना मार्गदर्शन (पायलट) योजनेनुसार या बँकेनें अंमलांत आणली आहे.

जळगांव जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचा विस्तार

३०–६–६० अखेर

(अ)	**भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्था.**	
१.	पूर्व खानदेश जिल्हा सहकारी बँक	१
२.	विविध कार्यकारी व सेवा संस्था धरून शेतकी पतपेढ्या	८०७
३.	लँड मॉर्ट्गेज बँक्स	२
४.	अर्बन बँक्स व सोसायट्या	१२
५.	पगारदार नोकरांच्या सोसायट्या	४१
(ब)	**सहकारी मालविक्रीच्या संस्था**	
६.	खरेदी-विक्री संघ	४१
७.	कॉटन सेल सोसायट्या	१५
८.	फ्रुटसेल सोसायट्या	१४
९.	पू. खा. जिल्हा सहकारी मार्केटिंग सोसायटी	१
१०.	जिनिंग व प्रेसिंग सोसायट्या	२
(क)	**शेतकऱ्यांच्या इतर सहकारी संस्था**	
११.	सहकारी शेती संस्था	२२
१२.	पाणी पुरवठा करणाऱ्या संस्था	७
१३.	पिक संरक्षण संस्था	७०
१४.	कॅटल ब्रीडिंग सोसायट्या	२

१५.	दूध उत्पादक सहकारी संस्था व युनियन	१६
१६.	को-ऑपरेटिव्ह बेटर लिव्हिंग सोसायटया	२
१७.	तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स व वोर्डस्	५
(ड)	**सहकारी उत्पादक संस्था**	
१८.	विणकर सोसायटया	२९
१९.	मजूरांच्या सोसायटया	१६
२०.	इतर उत्पादक सोसायटया व इंडस्ट्रियल असोसिएशन	६८
२१.	मोटर ट्रान्स्पोर्ट सोसायटया.	२
(इ)	**इतर सहकारी संस्था**	
२२.	हौसिंग सोसायटया	२९
२३.	मच्छीमार सोसायटया	२
२४.	ग्राहकांच्या सोसायटया	८
२५.	एज्युकेशन सोसायटया	१०
२६.	महिलांच्या सोसायटया	२
२७.	एंजिन्स प्रोटेक्शन सोसायटया	१४
(फ)	**फेडरल संस्था**	
२८.	तालुका सुपरवायझिंग युनियन्स	१५
२९.	डिस्ट्रिक्ट परचेस व सेल फेडरेशन	३
३०.	डिस्ट्रिक्ट को. ऑ. बोर्ड	१
		एकूण संख्या १२२९

पूर्व खानदेश मध्यवर्ती सहकारी बँक लि० चे व्यवहार

अ. नं.	तपशील	१९५९-६० अखेर
१.	संस्था (शाखा व मुख्य ऑफिस धरून)	४०
२.	मेंबरांची संख्या	
	(अ) व्यक्ति	३१५५
	(ब) संस्था	११८२
३.	स्वतःचें भांडवल	७५०३२५१
	(अ) भाग भांडवल	३९,२१,०००
	(ब) रिझर्व व इतर फंड	३५६२२५१
४.	उसनवारी भांडवल	३९५३७५४५
	(अ) व्यक्तींकडून ठेवी	२७४२९३०७
	(ब) इतरांकडून ठेवी (सोसायटयांकडून)	५६८९९५७
	(क) इतर उसनवारी	६४१८२८१
५.	खेळतें भांडवल	४,८७,७४,१५९
६.	स्वतःचें भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण टक्के	१५.३
७.	उसनवार भांडवलाचें „ „	८१
८.	गुंतलेलें भांडवल	१९४७२४१५
९.	चालू वर्षांत दिलेलें कर्ज	
	(अ) व्यक्ति	१५९५७९४८
	(ब) संस्था	४८४३९६७४

अ.नं.	तपशील	१९५९–६० अखेर
१०.	चालू वर्षांत वसूल झालेले कर्ज	
	(अ) व्यक्ति	१६२४७११३
	(ब) संस्था	४२६७८९१८
११.	चालूं वर्षाअखेर येणें असलेले कर्ज	
	(अ) व्यक्ति	१०७४०७०
	(ब) सोसायटचा	२६३६०४७०
१२.	थकबाकी	५७६८०१३
१३.	संशयित व बुडित कर्ज	१४१९५५
१४.	थकबाकीचें प्रमाण टक्के	२१
१५.	निव्वळ नफा	४५६५८७
१६.	व्यवस्था खर्च	६८१७८१
१७.	व्यवस्था खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण	टक्के १.४

विविध कार्यकारी सेवा संस्था धरून शेतकी पतपेढ्या

अ. नं.	तपशील	१९५९–६०
१.	संस्था	८०७
२.	मेंबरांची संख्या	१,०३०७५
३.	स्वतःचें भांडवल	१३१७२६२८
	(अ) भाग भांडवल	८६९३४०४
	(ब) रिझर्व्ह आणि इतर फंड	४४७९२२४
४.	स्वतःचे भांडवलाचे खेळत्या भांडवलाशीं प्रमाण	३३ ३/४ टक्के
५.	उसनवारी भांडवल	२४६४०३८९
	(अ) मेंबरांच्या ठेवी	५१६९११
	(ब) बिगर मेंबरांच्या ठेवी	५३२०५
	(क) सोसायटचांच्या कडील ठेवी	—
	(ड) बँकेचें कर्ज	२३३०८३५७
	(इ) इतर उसनवारी	७६१९१६
६.	उसनवार भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं असलेलें प्रमाण टक्के	६४
७.	खेळतें भांडवल	३,८९,२९,१३०
८.	चालू वर्षांत दिलेलें कर्ज	२५१७२४७७
९.	चालू वर्षांत वसूल झालेलें कर्ज	१८८३८०४३
१०.	चालू वर्ष अखेर येणें असलेलें कर्ज	३३४६७४१५
११.	थकबाकी	१११३१९३९
१२.	थकबाकीचे येणें असलेल्या कर्जाशी प्रमाण टक्के	३३.२
१३.	संशयित आणि बुडित कर्ज	४८७७९
	(ब) थिजलेलें कर्ज	१८७६८४३
१४.	इतर कामकाज—	
	(अ) मेंबरांनीं विकलेला माल	९३९७०२१
	(ब) मेंबरांकडून विकत घेतलेला माल	४५४४५८६
१५.	थिजलेल्या कर्जाचें येणें असलेल्या कर्जाशीं प्रमाण	५ २/३ टक्के
१६.	संशयित व बुडित कर्जाचें येणें असलेल्या कर्जाशीं प्रमाण	३/४ टक्के

बँकेनें १९५९-६० मध्यें एकूण ४७६ सोसायटचांना एकूण रु. ५६ लाख ७८ हजार कर्ज वांटलें.

जळगांव जिल्ह्यांत असलेंल्या निरनिराळया प्रकारच्या संस्थांची तपशीलवार माहिती दाखविणारा तक्ता

अ. नं.	संस्थांचे प्रकार	संख्या	सभासद संख्या	वसूल झालेलें भांडवल	रिझर्व्ह आणि इतर फंड	ठेवी व्यक्ति आणि संस्थांच्या मिळून	बाहेरील कर्ज व सरकारी कर्ज मिळून	खेळतें भांडवल
१	२	३	४	५	६	७	८	९
(अ)	कर्ज देणाऱ्या संस्था							
१	पूर्व खानदेश जिल्हा	१	४३३७	३९२१०००	३५६२२२१	३३११९२६४	६४१८२८१	४८७७४१५९
२	शेतकी पतपेढया (वि. का. व सेवासंस्था धरून)	८०७	१०३०७५	८६९३४०४	४४७९२२४	५७०११६	३४०७०२७३	३८९२९१३०
३	बिन शेतकी पतपेढया (अर्बन बँका, पगारदार नोकरांच्या सो. व इतर सोसायटया)	५३	२३७१९	१९१९०६५	१७३०५६४	१४८४९२७५	४२३३२६	१९४७४६६२
४	भूतारण बँका	२	८०४१	१८८८६३	६३०८३	१५६५५	३१०७६०२	३९३६२९५
	एकूण—	८६३	१३९१७२	१४७२२३३२	९८३५१२२	४८५५४३१०	४४०१९४८२	१११११४२४६
(ब)	कर्ज न देणाऱ्या संस्था							
१	शेतकी बिगर पत संस्था	१७९	४५१५५	२३५९१०६	२६६०८९२	५९३०९१	२२८७३६१	९३६६४८६
२	बिन शेतकी बिगर पत संस्था	१६८	१३१८६	६७७९३०	१५२४७७३	३७७००३	९२१७२८	५१९१२९१
	एकूण—	३४७	५८३४१	३०३७०३६	४१८५६६५	९७००९४	३२०९०८८	१४५५७७७७
१	(क) फेडरल संस्था	१९	११८४					
	एकूण—	१९	११८४					
	एकूण बेरीज—	१२२९	१९८६९७	१७७५९३६८	१४०२०७८७	४९५२४४०४	४७२२८५७०	१२५६७२०२३

त्याचप्रमाणें रावेर व जामनेर तालुक्यांतील केळीं उत्पादकांना एकरीं अंदाजें रु. १००० खर्च येतो व त्यासाठीं बँकेकडून पूर्वी एकरीं रु. ७५० कर्ज मिळत असे. जे सभासद आपला माल फळविक्री करणाऱ्या सहकारी संस्थेमार्फत विकतील त्यांना एकरीं रु. १००० कर्ज व ३ हप्त्यानें देण्याचें तत्व १९५८-५९ पासून बँकेनें लागू केलें आहे.

तद्वतच जमीन लागवडीकरितां लागणाऱ्या कर्जाखेरीज सभासदांनां एंजिन खरेदी, बैलजोडी खरेदी वगैरे कारणांसाठीं मध्यम मुदतीचें कर्ज लागतें. हें कर्जहि बँक देते. या कर्जास मागणी पूर्वी कमी होती ती आतां वाढू लागली आहे. १९५८-५९ मध्यें असें कर्ज फक्त दोन लाख ४२ हजार दिलेलें होतें पण १९५९-६० मध्यें रु. ७, ५२, ११० कर्ज दिलें गेलें.

विविध कार्यकारी व शेतकी पतपेढचा

जिल्ह्यांत याच दोन प्रकारच्या सहकारी संस्था सर्वत्र पसरल्या असून कर्जपुरवठा करणा-या क्षेत्रांत त्या काम करीत आल्यानें शेतक-यांच्या आर्थिक जीवनाचा त्या अविभाज्य घटक आहेत. अशा जिल्ह्यांत एकूण ८०७ संस्था असून त्यापैकीं १८० विविध कार्यकारी आहेत. या संस्थांनीं १४२० खेडीं व्यापिलीं असून त्यांची सभासद संख्या १, ०३, ०७५ आहे. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतक-यांपैकीं ८४ टक्के शेतकरी ग्रामीण-विभागांतील सर्व प्रकारांच्या सहकारी कार्यक्षेत्रांत समाविष्ट झाले. शेतमजूर, कारागीर, वगैरेसाठीं सेवा सहकारी संस्था उपलब्ध आहेत व त्यांचें स्वरूपहि सर्वसंग्राहक आहे. या ८०७ सोसायटयांचें भागभांडवल एकूण रु. ८६, ९३, ४०४ असून त्यापैकीं रु. १०, ५४, ७०० इतकें भांडवल सरकारनें या संस्थांना पुरविलें आहे. मार्गदर्शक योजनेखालीं प्राथमिक सोसायटचांना शेतक-यांना पुरेपूर कर्जपुरवठा करावयाचा असल्यानें त्यांच्या भागभांडवलाचा पाया विशाल करणें अगत्याचें होतें व तेंच काम सरकारी भागभांडवलामुळें झालें. तिसऱ्या योजनेच्या शेवटीं ७–८ कोटींपर्यंत म्हणजे संपूर्ण कर्जपुरवठा सहकारी संस्थेमार्फत होईल. १९५९–६० सालासाठीं अल्पमुदतीच्या कर्जाचा इष्टांक २ कोटी ५० लाखाचा ठरला होता तो पूर्ण झाला. मध्यम मुदतीच्या कर्जवांटपांत मात्र हा जिल्हा अनेक अडचणींमुळें इष्टांकाच्या फार मागें राहिला आहे.

जिल्ह्यांतील एकूण १८० विविध कार्यकारी सोसायटचांची सभासदसंख्या ४०९३९ असून भागभांडवल ४५,६२,०३४ रु. आहे. या संस्था पायलट योजनेनुसार शेतकऱ्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठीं विविध प्रकारची भरीव कामगिरी करून ग्रामीण जीवनांत एक प्रकारची क्रांती घडवीत आहेत. केवळ कर्जपुरवठा एवढेंच कार्य या संस्थांचें नसून त्या बरोबरच बी-बीजवाई, पेंड, खतें, तेलें यासारख्या शेतकऱ्यांच्या नित्योपयोगी मालाचा पुरवठा करण्याची जबाबदारीहि या संस्थांच्या शिरावर आहे.

विविध कार्यकारी संस्थांपैकीं कांहीं निवडक संस्थांनीं आपल्या भागांत अडतीचें काम करण्याची जबाबदारीहि अंगावर घेतली आहे. शेतकऱ्यांनीं पिकविलेलीं कपाशी व भुईमूग एकत्र करून तो माल विकून देण्याचें कार्य या संस्था करतात. ज्या ठिकाणीं खरेदी-विक्री संघ नाहींत अशा ठिकाणीं तें काम या सोसायटचा करतात. त्यामुळें या सोसायटचांद्वारें पायलट योजनेंतील अटींची अंमलबजावणी करण्यासहि मदत झाली आहे. (१) जामनेर, (२) धरणगांव, (३) साळवें, (४) मारवड, (५) उंबरखेडें, (६) पातोंडे, (७) अकुलखेडें, (८) वाघळी, (९) खेडगांव, (१०) तोंडापूर, (११) कळमसरे, (१२) विरावली, (१३) आडगांव व (१४) खिरोदे या १४ ठिकाणच्या सोसायटचांनीं या बाबतींत विशेष कार्य केलें. चोपडे तालुक्यांतील अकुलखेडें विविध कार्यकारी सहकारी सोसायटीनें दैनंदिन जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा करणारी एक अभिनव योजनाहि हातीं घेतली आहे. सभासदांसाठीं नित्य लागणाऱ्या वस्तूंची सोसा-

यटी घाऊक पद्धतीनें खरेदी करते व त्यांची सभासदांना विक्री करते. यामुळें ग्रामीण पतपाहणी कमिटीच्या एका महत्त्वाच्या शिफारशीची अंमलबजावणी होत आहे. चोपडे तालुक्यांत ही योजना यशस्वी होत आहे. धरणगांवच्या विविध कार्यकारी सोसायटीनें ऑईल मिल चालू करण्याची एक योजना हातीं घेतली आहे.

सेवा सहकारी संस्था

राष्ट्रीय विकास मंडळाच्या आदेशानुसार सर्व राज्यामध्यें सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. आतांपर्यंत खेड्यांत फक्त शेतकी पतसंस्था ही फक्त कर्जपुरवठा करू शकत होती. परंतु या कर्जामुळें स्वतःची जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना जरी थोडी फार मदत होऊं शकत असली तरी शेतमजूर, कारागीर इ० इतर ग्रामीण जनतेस त्यामुळें कांहीं मदत होऊं शकत नव्हती. त्यामुळें अर्थातच् जमीनधारक शेतकऱ्याशिवाय इतर ग्रामीण रहिवाशी सहकारी क्षेत्रापासून अलिप्त राहिले. ही उणीव भरून काढण्यासाठीं सेवा सहकारी संस्थांची स्थापना करण्यांत येत आहे. या सोसायटया सर्व प्रकारची म्हणजे उत्पादन, वांटप, कर्जपुरवठा आणि ग्रामीण समाजोपयोगी कार्य हातीं घेऊं शकतात. तेव्हां शेतकी पतपेढयांचें रूपांतर या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांमध्यें करण्याचें फार मोठें कार्य या जिल्ह्यांत झालें आहे. अशा रूपांतर झालेल्या ५९० व त्याशिवाय नवीन नोंदविलेल्या १९ अशा ६०९ सेवा सहकारी संस्था सध्यां जिल्ह्यांत काम करीत आहेत.

सहकारी भूतारण बँक

जळगांव जिल्ह्यांत जळगांव व पाचोरे येथें भूतारण बँका आहेत. जळगांव बँकेनें अमळनेर येथें एक शाखा उघडली आहे. पाचोऱ्याची भूतारण बँकेची शाखा १९२८ सालीं निघाली असून त्यावेळच्या मुंबई राज्यांतील पहिल्या दोन भूतारण बँकांपैकीं ती एक आहे. या बँका जुनी कर्जफेड, विहिरी खोदणें व दुरुस्त करणें, इंजिन खरेदी करणें, नवीन जमीन खरेदी करणें, ताली, बांध घालून जमीन सुधारणें वगैरे कारणांसाठीं दीर्घ मुदतीचें कर्ज जमिनीच्या तारणावर देतात. विहिर-इंजिनासाठीं तगाई कर्ज या बँकेमार्फत देण्याचें सरकारचें धोरण असल्यानें या बँकांचे कर्जव्यवहार वाढीला लागलेले आहेत.

या बँकांनीं गेल्या दोन वर्षांत केलेलें कर्जवांटप पुढीलप्रमाणें:–

तपशील	१९५८–५९		१९५९–६०	
	संख्या	कर्जवांटप	संख्या	कर्जवांटप
विहिरींसाठीं	२०३	२०,२१०० रु.	५६०	१०,५९,०५० रु.
एंजिन पंप	१०	२९,७०० रु.	१८८	५,५५,५५० रु.
कर्जफेड	६६	१,१५,८५० रु.	१२	१२,८५० रु.
जमीनखरेदी	२५	३४,७०० रु.	१८	२७,३२५ रु.
एकूण	३०४	३,८२,३५० रु.	७७८	१६,५४,७७५ रु.

नागरी बँका व सोसायटया

जळगांव जिल्ह्यांत ९ नागरी बँका, जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, चोपडे, एरंडोल, रावेर, पारोळे व धरणगांव येथें आहेत. शिवाय तीन शहरी पतपेढया आहेत. या सोसायटया नागरी विभागांतील विशेषतः व्यापारी वर्गाला कर्जपुरवठा करतात. ठेवी स्वीकारणें व हुंडया स्वीकारून त्या वटविणें वगैरे बँकांचे व्यवहार या बँका करतात. या अर्बन किंवा नागरी बँकांची सभासद संख्या १०९११ असून भागभांडवल रु. ८,३९,५४० व रिझर्व्ह फंड रु. ११,९०,६२० आहे. एकंदर ठेवी १,०५,९०,७८२ रु. च्या असून खेळतें भांडवल रु. १,३०,५०,६६० आहे.

याशिवाय जिल्ह्यांतील जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, चोपडे, पाचोरे, एरंडोल, धरणगांव या शहरांचे ठिकाणीं मुख्यत्वेंकरून स्टेट बँक, महाराष्ट्र बँक, पंजाब नॅशनल बँक, न्यू सिटिझन बँक, बँक ऑफ बरोडा इ० बँकांच्या शाखा असून या शेडयूल्ड बँकाचे व्यवहार तेथें चालतात.

सहकारी पाणी-पुरवठा योजना

या जिल्ह्यांत पाणीपुरवठ्याचें काम करणाऱ्या ११ सहकारी संस्था असून त्यांचीं सभासद संख्या २५८, भागभांडवल रु. ४७,९७५ व खेळतें भांडवल रु. ३,७४,४४५ आहे. या संस्थांना सरकारनें कर्जरूपानें रु. २,३३,२०९ व मदतीदाखल रु. १,३६,३६२ दिले आहेत. आतांपर्यंत सहा पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या असून आणखी दोन चालूं सालांत होतील. या संस्थांच्या कार्यक्षेत्रांत एकूण २२६३ एकर जमीन असून या सर्व योजनेसाठीं एकूण रु. ४,३७,१७२ खर्च येणार आहे. सध्यां ४२४ एकर जमीन प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याखालीं आणलेली आहे. या पाणीपुरवठ्याचे बाबतींत अनेक अडचणी उपस्थित होत असून हें कार्य समाधानकारक होत नाहीं असा अनुभव आहे. या बाबतींत सुधारणा करण्याचेहि प्रयत्न चालूं आहेत.

सहकारी शेती सोसायटचा

सहकारी शेती संस्था या चार प्रकारच्या असतात. बेटर फार्मिंग, जॉइंट फार्मिंग, टेनन्ट फार्मिंग व कलेटिव्ह फार्मिंग. यापैकीं बेटर फार्मिंग सोसायटचा जिल्ह्यांत ३ आहेत. या संस्था शेती कसण्याविरहीत इतर कामें करतात. त्या शेतकऱ्यांना बी-बियाणें, खतें वगैरे पुरवितात.

संयुक्त शेती संस्था, सामुदायिक शेती संस्था व खंडकरी शेतीसंस्था अशा संस्था जिल्ह्यांत १९ असून त्यांची सभासद संख्या ५६३ आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रांत ५४१७ एकर १२ गुंठे जमीन आहे. त्यांपैकीं ४०६३ एकर जमीन लागवडीखालीं आणलेली असून बहुतेक सोसायटचा सरकारी पड जमिनीवर स्थापन करण्यांत आल्या आहेत व त्या मागासलेल्या लोकांच्या आहेत. वरील संस्थांनीं रु. १,७२,९१३ किंमतीचे ८५२२ मण धान्यउत्पादन गतवर्षीं केलें. ज्या संस्था सरकारी जमिनीवर रजिस्टर झाल्या आहेत, त्यांनीं सरकारच्या आर्थिक सहाय्यानें पडीत जमीन लागवडीखालीं आणली आहे. जमीन सुधारणा, बी-बीयाणें, खतें, अवजारें, बैल वगैरेसाठीं तसेंच सेक्रेटरीच्या पगारासाठीं सरकार या संस्थांना मदत देतें. ज्या शेतमजुरांना मालकीची शेती नाहीं त्यांना सवलतीनें जमीन देऊन सहकारी शेतीस उद्युक्त करणें व लहान शेतमालकांना एकत्र आणून त्यांची न परवडणारी जमीन किफायतशीर करणें व अधिक उत्पादनासाठीं त्यांना प्रोत्साहन देणें हे यांचे उद्देश आहेत. संयुक्त शेतींत जमिनीचें एकत्रीकरण किंवा पुलिंग होत नाहीं व मालकीहि जात नाहीं.खंडकारी शेती संस्थेंत जरी जमीन एकत्र करण्यांत येत असली तरी प्रत्येक सभासद त्याला वाटून दिलेल्या जमिनीची मशागत करतो व उत्पन्नहि तोच घेतो. मात्र त्याला उत्पन्नांतील कांहीं भाग संस्थेस मार्गदर्शनाबाबत द्यावा लागतो. संयुक्त शेती संघाचे कार्यास विशेष चालना देण्यांत येत आहे. त्याचे दृश्य परिणामहि दिसूं लागले आहेत. वरील १९ सोसायटयांचें भाग भांडवल रु. ६८,३३९ असून सरकारनें त्यांत भाग भांडवल रु. ३४,९०० गुंतवून एकूण १,०३,२३९ केलें आहे. त्यांचा रिझर्व्ह फंड व इतर फंड रु. ४४४७६ असून खेळतें भांडवल रु. २,२२,८५५ आहे. या सोसायटयांच्या सभासदांना समान वागणूक, कार्यांत समान वांटा व श्रमाचा योग्य मोबदला मिळून वेतनानंतर पुन्हां कामाच्या प्रमाणांत बोनसहि मिळत असल्यानें सोसायटीचा पुरेपूर फायदा सभासदांना मिळतो.

सहकारी पीक संरक्षण सोसायटचा हें या जिल्ह्याचें एक खास वैशिष्टय आहे. " ठेंगे सोसायटी " या लोकप्रिय नांवानें त्या ओळखल्या जातात. जनावरांपासून व पशुतुल्य वृत्तीच्या चोरांपासून उभ्या पिकांचें

संरक्षण करणें हें या संस्थांचें कार्य. रखवालदार नेमून त्यांना काठ्या, बॅटऱ्या पुरवून संस्था त्यांना क्षेत्र वांटून देऊन पीकसंरक्षण करते. कांहीं सोसायटयांनीं रखवालदारांना रानटी जनावरांसाठीं भाले, बंदुकाहि दिल्या आहेत तर कांहीं सोसायटयांनीं रात्रीं अपरात्रीं रखवालदारांना रपेट करण्यासाठीं घोडे देखील खरेदी केले आहेत. हा सर्व खर्च सोसायटी सभासदांचेकडून त्यांच्या क्षेत्राप्रमाणें फी आकारून वसूल करते. अशा जिल्ह्यांत ७० सोसायटया असून त्यांच्या कार्यक्षेत्रांत २,६७,५५५ एकर जमीन येते. कांहीं ठिकाणीं ग्रामपंचायतीहि हें पीकसंरक्षणाचें काम करतात.

सहकारी पीक संरक्षण संस्था

इंजिनसंरक्षण संस्था हा एक या जिल्ह्याचा विशेष आहे. आपल्या राज्यांत अशा इंजिनसंरक्षण सोसायटया बहुधा प्रथमच या जिल्ह्यांत सुरू झाल्या असाव्यात. हा प्रश्न निर्माण होण्याचें कारण या जिल्ह्यांत यावल-रावेर तालुक्यांत केळयांच्या बागा पुष्कळ असून मळया-मळयांत पाणी पुरवठयाचीं इंजिनें ठेवलेलीं आढळतात. या इंजिनांची मोडतोड व सुटे भाग चोरीला जाणें असे प्रकार सुरू झाल्यावर सरकारनें या भागांसाठीं खास एक " टास्कफोर्स " ठेवला होता. या खास पोलिस दलाच्या पहाऱ्यामुळें या प्रकारांना आळा बसला व चोऱ्या बंद झाल्या. कालांतरानें हें पोलिसदल काढून घेण्याचें सरकारनें ठरविलें तेव्हां हें काम इंजिनसंरक्षक सोसायटयांनीं हातीं घ्यावें व पोलिसांनीं त्यांना मदत व मार्गदर्शन करावें असें ठरलें. त्याप्रमाणें ३०–६–६० अखेर या जिल्ह्यांत एकूण १४ केळी बागायतदार इंजिन संरक्षण सेल व सप्लाय सोसायटया रजिस्टर झाल्या आहेत. इंजिनाचे संरक्षणाबरोबरच इंजिनांना लागणारे सुटे भाग व हत्यारें पुरविण्याचें कामहि या संस्था करतात.

अशा संस्था या जिल्ह्यांत रावेर तालुक्यांत फक्त दोनच आहेत. अशा संस्थांना जनावरें चारण्यासाठीं कुरणांची आवश्यकता असते. सातपुड्याचे पायथ्याशींच अशीं कुरणें असल्यानें रावेर तालुक्यांत या दोनच संस्था झाल्या आहेत. चोपडे व यावल तालुक्यांत अशा संस्था निघण्याची शक्यता आहे. जनावरांची उत्तम पैदास करणें हा या संस्थांचा उद्देश असल्यानें उत्तम जातिवंत वळू ठेवून सुधारलेल्या जातीची पैदास त्या करीत आहेत. या दोन सोसायटयांकडे ११४७ जनावरें असून एकूण ११४८ एकर जमीन गुरांना चारण्यासाठीं त्यांना मिळणार आहे.

कॅटल-ब्रीडिंग (पशुपालन) सोसायटया

दूधपुरवठा करणाऱ्या सोसायटया जिल्ह्यांत पूर्वीं नव्हत्या पण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अशा संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याचें ठरल्यामुळें अशा सोसायटया मोठ्या प्रमाणांत नोंदविल्या जाऊं लागल्या आहेत. अशा सोसायटया सध्यां १५ असून शिवाय चाळीसगांव येथें एक मिल्क युनियन (दूधसंघ) स्थापन झाली आहे व या संघास पांच फीडर (पोषक) सोसायटया जोडल्या आहेत. या युनियनचें कामकाज लवकरच सुरू होईल. दुधाचें उत्पादन वाढविणें, सभासदांनीं बाळगलल्या दुभत्या जनावरांचें दूध गोळा करणें व नागरी भागांत चांगल्या दुधाचा पुरवठा करणें हें त्यांचें कार्य होय. शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून हा धंदा हातीं घेतां येत असल्यानें अशा संस्था त्यांना फारच फलदायक आहेत. या संस्थांचे सभासद ४१७ असून भाग भांडवल रु. २३,६४० आहे व सरकारकडून कर्ज रु. ४२०६५ इतकें मिळालें आहे. त्यांपैकीं रु. २५,६२५ चाळीसगांव मिल्क युनियन व तिच्या संलग्न पांच सोसायटयांना मिळालें आहे. इतर संस्थांना त्या त्या विकास गटांकडून तीन तालुक्यांतून रक्कम कर्जाऊ मिळाली आहे. सरकारी योजनेप्रमाणें चाळीसगांवमध्यें दूधपुरवठा संस्था व दूध संघाला अनुक्रमें रु. ६,००० व रु. ७,६७५ सरकारी मदत मिळाली आहे. त्याचप्रमाणें या संस्थांना मध्यवर्ती बँकेकडून जर दुभत्या म्हशी खरेदी करण्यासाठीं कर्जें दिलीं गेलीं तर दूधपुरवठा हा दुय्यम धंदा शेतकऱ्यांना मिळून दूधपुरवठ्याचा प्रश्नहि सुटेल.

डेअरी सोसायटया

ग्राहकांच्या सहकारी संस्था

अशा प्रकारच्या ८ संस्था आज अस्तित्वांत आहेत. त्यांपैकीं फक्त रेल्वे ग्राहकांच्या संस्थांनीं बरी प्रगती केली आहे. कारण तेथें ग्राहकांचा निश्चित वर्ग सोसायटीच्या कार्यक्षेत्रांत असतो.

सहकारी घर बांधणी योजना

अशा प्रकारच्या एकूण २९ संस्था जिल्ह्यांत असून त्यांपैकीं १९ संस्था मागासलेल्या जातीच्या लोकांनीं स्थापल्या आहेत. अशा संस्थांना खात्यामार्फत आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे व त्याप्रमाणें चार संस्थांना खात्यामार्फत व शिवाय दोन संस्थांना एदलाबाद विकासगटामार्फत मदत देण्यांत आली आहे. एदलाबाद विकासगटांतील दोन्हीं संस्थांनीं बांधकामें पूर्ण केलीं असून २७ घरें बांधलीं आहेत.

सहकारी शिक्षण संस्था

या जिल्ह्यांत एकूण १० शिक्षणसंस्था सहकारी तत्त्वावर चालविलेल्या असून शिक्षणप्रसाराचे क्षेत्रांत या संस्था मोलाची कामगिरी बजावीत आहेत.

सहकारी खरेदी विक्री संघ

शेतकऱ्यांचें जीवन समृद्ध करण्यासाठीं त्यांचें उत्पादन वाढलें पाहिजे ही जशी पहिली निकड आहे तशी दुसरी निकड त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळाला पाहिजे ही आहे. त्यासाठीं सहकारी खरेदी-विक्री संघाच्या क्षेत्रांतहि या जिल्ह्यांत वाखाणण्यासारखें कार्य होत आहे. मालविक्रीचें कार्य करणाऱ्या जिल्ह्यांत एकूण ४१ संस्था आहेत. यांपैकीं जिल्हा पातळीवरील जिल्हा सहकारी मार्केटिंग सोसायटी ही एक संस्था असून उरलेल्या ४० संस्थांमध्यें १४ फळविक्री करणाऱ्या, १५ कापूस विक्री करणाऱ्या, व ११ इतर खरेदी-विक्री करणाऱ्या आहेत. याशिवाय कांहीं विविध कार्यकारी संस्थासुद्धां मालविक्रीचें काम करीत आहेत. कांहीं मार्केटिंग सोसायटयांनीं नियंत्रित बाजारपेठांत अडत दुकानें उघडलीं असून शेतकऱ्यांच्या मालाची कमींत कमी कमिशनवर विक्री करण्याची व्यवस्था त्या करीत आहेत. कांहीं सेल सोसायटया माल एकत्र करून (पूलिंग) त्याची प्रतवारी लावून गटानें विकतात व सरासरी येणारी किंमत उत्पादकांना वांटतात. यामुळें मालाच्या भावांच्या चढउताराचा फायदा वा नुकसान एका उत्पादकाला न मिळतां ही तेजीमंदीची झळ सर्व उत्पादकांवर सारख्या प्रमाणांत विभागली जाऊन योग्य भाव मिळण्यास मदत होते. या मार्केटिंग सोसायटया केवळ क्रयविक्रयाचाच व्यवहार करीत नसून शेतकऱ्यांना बीं-बियाणें, खतें, तेलें इ० चा पुरवठाहि करतात. कांहीं फळविक्री संस्था शेतकऱ्यांची बी पेरण्यापासून मालविक्रीपर्यंतची सर्व व्यवस्था करतात. शेंदूर्णी फळविक्री सहकारी सोसायटी सभासदांचें केळींच्या लागवडीपासून विक्रीपर्यंतचें काम करतें. झाडांना खतें, त्यांची योग्य जोपासना, यासाठीं मदत व मार्गदर्शन वगैरे सर्व कामें ही सोसायटीच करते. या जिल्ह्यांत केळ्यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होतें हीं फळें नाशवंत असल्यानें त्यांची जलद विक्री करावी लागते. तेव्हां हें काम सोसायटयांमार्फत करणेंच हिताचें असतें. कांहीं कॉटन सेल सोसायटयाहि सभासदांच्या मालाचें पूलिंग करून जाहीर लिलांव पुकारून मालविक्री करतात व शेतकऱ्यांना जास्तींत जास्त भाव मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.

पूर्व खानदेश जिल्हा मार्केटिंग सोसायटीनें पक्क्या कपाशीचे लिलांव करण्याची पद्धत १९५८–५९ मध्यें सुरू केली होती. ज्या सोसायटया पक्क्या कपाशीच्या गांठी बांधतात अशा सोसायटयांकडून माल एकत्रित केला जाऊन त्याचा लिलांव करून शेतकऱ्याला भरपूर भाव देण्याचा प्रयत्न या संस्थेनें केला.

महाराष्ट्र सरकारनें या सोसायटीची बीजवाई सरकीच्या वांटपासाठीं केंद्रीय एजंट म्हणून नेमणूक केली आहे. त्याचप्रमाणें रवा, मैदा, सूजी वगैरे गव्हाचे पदार्थांचे वांटपासाठीं केंद्रीय एजंट म्हणूनहि याच संस्थेची नेमणूक केली आहे. याशिवाय ही संस्था खतें, सुधारलेलीं अवजारें, एंजिनला लागणारें तेल, कीटकनाशक औषधें, फर्निचर इ० मालाचाहि पुरवठा करते.

मालविक्री करणाऱ्या संस्थांपैकीं २५ संस्थांना शेअर भांडवल व १२ संस्थांना इतर मदत सरकारनें दिली आहे.

शेतकऱ्याची स्थिति सुधारण्यास त्याचें उत्पादन वाढविणें व मालविक्री योग्य दरांत करून देणें जसें आवश्यक आहे त्याचप्रमाणें कच्चा माल पक्का करुन विकण्यामध्यें जो मधला फायदा असतो तोहि शेतकऱ्यांचे पदरांत पडणें आवश्यक आहे. कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करणें म्हणजेच प्रक्रिया करणें हा या सांखळींतला महत्त्वाचा दुवा असून त्याकडे आतां सर्वांचें लक्ष वेधूं लागलें आहे व महाराष्ट्र राज्यांत सहकारी साखर कारखान्यांनीं प्रक्रियेचें एक नवें युग सुरू केलें असून शेतकऱ्यांच्या जीवनांत एक प्रकारची क्रांती केली आहे. या क्रांतीचें पडसाद इतर जिल्ह्यांत व अन्य क्षेत्रांतहि उठत आहेत. या जिल्ह्यांत कपाशीचें पीक फार मोठें आहे. ही कपास कच्चीच शेतकरी विकतो. ती जर पक्की करून म्हणजे जिनिंग व प्रेसिंग करून विकली तर त्याला अधिक फायदा मिळूं शकेल. कापसाची सरकी काढून गांठी बांधण्याचें काम जर सहकारी तत्त्वावर झालें तर मोबदल्यांत भर पडूं शकेल. त्या दृष्टीनें या जिल्ह्यांत द्वितीय पंचवार्षिक योजनेंत ३ जिनिंग व प्रेसिंग कारखानें सहकारी तत्त्वावर काढण्याचें योजलें होतें. अशा सहकारी कारखान्यांस सरकार ५० टक्के भांडवल व प्रथम कांहीं वर्षें व्यवस्थेच्या खर्चासाठीं मदत देते. याप्रमाणें या जिल्ह्यांत दोन जिनिंग प्रेसिंग सोसायट्या जामनेर व चोपडे येथें स्थापन झाल्या आहेत. त्याचप्रमाणें दोन शेतकरी सहकारी संस्थांनीं व दोन कॉटन सेल संस्थांनींहि जिनिंगचें काम हातीं घेतलें आहे. या चार संस्थांना सरकारकडून भांडवलहि मिळालें आहे. त्या दृष्टीनें हा प्रारंभ झाला आहे व या क्षेत्रांत प्रगति लवकर होईल असा विश्वास आहे.

प्रक्रिया करणाऱ्या सोसायट्या

केळ्यांच्या भुकटीचा कारखाना उभारण्याची योजना जिल्हा मार्केटिंग सोसायटीनें हातीं घेतलीं आहे व सरकारनेंहि या योजनेस उत्तेजन देऊन एक लाखाचे शेअर्स घेतले आहेत. यासाठीं जरूर ती सामुग्री परदेशांतून आणविण्यांत येत आहे. या जिल्ह्यांतील केळी परदेशीं पाठवून त्याची पावडर करून पाहिली आहे व ती चांगली होत असल्याचें आढळून आलें आहे. केळ्यांच्या रसाचें सायरप व भुकटीचें उत्कृष्ट अन्न होऊं शकतें. ही भुकटी दुधांत कालवून खाण्यास उपयोगी पडते. केळ्यांच्या पावडरीचे डबे परदेशीं निर्यात करून त्यापासून परकीय चलनहि मिळूं शकेल. ही योजना यशस्वी झाल्यास असे अनेक कारखाने या जिल्ह्यांत उभारले जाण्याची शक्यता आहे.

गुजराथेंतून केळीं जहाजानें मध्य आशियांत पाठविलीं जातात व तेथें त्यांना भाव मिळतो. हें पाहून केळीं निर्यात करण्याची एक योजनाहि या जिल्ह्यांत हातीं घेण्याची तयारी चालू आहे. या योजनेप्रमाणें एखादी केळीं निर्यात करणारी शिपिंग सोसायटी सुरूं करून त्या सोसायटीनें जहाजें खरेदी करुन केळ्यांची निर्यात करावी असा विचार आहे. जिल्हा मार्केटिंग सहकारी सोसायटीहि युरोपांत केळीं पाठविण्याच्या प्रयत्नांत आहे.

साखर कारखान्याचे बाबतींतहि या जिल्ह्यांत कार्यकर्त्यांचे प्रयत्न चालू आहेत. ऊंसाचें क्षेत्र या जिल्ह्यांत हळूंहळूं वाढत आहे. गतवर्षी ४ हजार एकरांपर्यंत हें क्षेत्र गेलें आहे. यांत पुढें फार मोठ्या प्रमाणा-

वर वाढ होण्याची शक्यता आहे. गिरणा योजनेचें पाणी १९६१ मध्येंच या जिल्ह्यांत थोडचा प्रमाणांत सुरूं होईल व त्यानंतर योजना पूर्ण झाल्यावर जवळजवळ १ लाख ४३ हजार एकराला हें पाणी मिळेल तेव्हां गिरणा धरणाचे पाटावर या जिल्ह्यांत ऊंसाचे मळे मोठ्या प्रमाणांत निघूं लागतील, व साखर कारखान्यास लागणारें क्षेत्र सलगपणें थोडक्या टापूंत उपलब्ध होईल. तेव्हां तृतीय पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धांत या जिल्ह्यांत साखर कारखान्यासाठीं योग्य संधि प्राप्त होईल.

गुदाम योजना

उत्पादन, मालविक्री, प्रक्रिया या संबंधांतच पुढें मालसांठवणीचा प्रश्न उपस्थित होतो. माल सांठ-विण्याची व्यवस्था नसेल तर माल तावडतोब विकावा लागतो व भाववाढीचा फायदा शेतकऱ्याला मिळत नाहीं. यासाठीं खेडोपाडीं सहकारी संस्थांचीं गुदामें उभारलीं गेलीं पाहिजेत. दुसऱ्या योजनेंत या जिल्ह्याला एकूण ८१ गुदामें मंजूर झालीं आहेत व त्यांपैकीं पहिल्या चार वर्षांत ६१ गुदामांसाठीं सरकारनें कर्ज रु. ५,६७,५०० व मदत रु. १,८९,२०० दिली आहे. यांपैकीं ३९ गुदामांचें बांधकाम पूर्ण झालें आहे व २२ गुदामांचें काम चालूं आहे. या गुदामांचे लहान, मध्यम व मोठे असे तीन प्रकार असतात. त्यांत अनुक्रमें ३०००, ६००० व ८००० पोतीं माल सांठूं शकतो. आतांपर्यंत पुऱ्या झालेल्या कार्यक्रमाप्रमाणें १,१५,००० पोती शेतीचा माल सांठविण्याची सोय झाली आहे. गोडाऊनच्या खर्चासाठों १/४ मदत व $\frac{3}{4}$ कर्ज सरकार-तर्फे मिळूं शकतें. लहान, मध्यम व मोठचा गुदामांसाठीं अनुक्रमें दहा हजार, वीस हजार व चाळीस हजार रु. खर्च होतो.

महाराष्ट्र राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशननेंहि या जिल्ह्यांत जळगांव,चाळीसगांव, अमळनेर व पाचोरें येथें आपल्या वखारी उघडल्या आहेत. या वखारींत माल ठेवल्यानें भाववाढीचा फायदा मिळतो, माल शास्त्रीय पद्धतीनें संरक्षित केला जातो व माल ठेवणारांना त्या मालाच्या तारणावर बँकेकडून आगाऊ कर्जहि मिळूं शकतें. या वखारींचा फायदा घेण्याची संवय शेतकऱ्यास हळूहळू लागत आहे. गळीत धान्यें, ज्वारी, गहूं, मख्यत्वेंकरून या वखारींत ठेवला जातो.

सहकारी संस्थांच्या स्पर्धेतील बक्षिसांचे मानकरी

मुंबई राज्य सहकारी युनियनच्या वतीनें प्रत्येक जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या वेगवेगळचा गटा-साठीं दरवर्षीं बक्षिस स्पर्धा ठेवली जाते. सन. १९५८-५९ सालीं जळगांव जिल्ह्यांतील मार्केटिंग व प्रोसेसिंग सोसायटचांसाठीं ठेवण्यांत आलेल्या बक्षिस स्पर्धेतील पहिलें बक्षिस चांदीची फिरती ढाल व रोख रु. ५००, शेंदुर्णी को–ऑपरेटिव्ह फ्रुटसेल सोसायटीस मिळालें. दुसरें बक्षिस रोख २०० चे निंभोरा स्टेशन फळ बागायतदार सहकारी विक्री करणाऱ्या सोया-यटीस मिळालें व तिसरें बक्षिस रोख रु. २०० चें वरणगांव ग्रुप को–ऑपरेटिव्ह कॉटन सेल सोसायटी लि., ला मिळालें.

तालुका डेव्हलपमेन्ट बोर्डस व असोसि-एशन्स

जिल्ह्यांत सध्यां एकूण ५ तालुका डेव्हलपमेन्ट बोर्डस् व असोसिएशन्स आहेत. या संस्थांचें मुख्य कार्य शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा प्रचार करणें व शेतकऱ्यांना सुधारलेलीं बी–बियाणें, खतें, अवजारें,जंतुनाशक औषधें वगैरे पुरविणें व धान्योत्पादन वाढीस मदत करणेंहीं होत. कांहीं संस्था सभासदांना शेतीच्या मालाची विक्री करून त्यांना जास्तींत जास्त भाव मिळवून देण्याचें कार्यहि करीत आहेत.

पाचोरे येथील शेतकरी सहकारी संघ या दृष्टीनें आदर्श असून ही संस्था शेतकऱ्यांचें हित फार मोठचा प्रमाणावर करीत आहे. संस्थेचा कारभार काटकसरी व दक्षतेचा असून १९५९–६० मध्यें या संस्थेनें रु. ५० हजारावर निव्वळ नफा मिळविला. जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांमध्यें सहकारी संस्थांद्वारें मालविक्रीचें प्रमाण

पाचोरे तालुक्यांत जवळजवळ ६० टक्के म्हणजे पहिल्या क्रमांकाचें असून त्याचें पुष्कळसें श्रेय पाचोरे शेतकरी सहकारी संघासच आहे. जळगांव, चाळीसगांव, अमळनेर येथील शेतकरी सहकारी संघहि याचप्रमाणें कार्य करीत आहे.

सुपरवायझिंग युनियन्स

प्राथमिक शेतकी पतपेढ्यांचे कामावर देखरेख करण्याकरितां या संस्था निर्माण झाल्या आहेत. अशा संस्थांची संख्या १५ असून ८६७ संस्था या युनियन्सना संलग्न आहेत. एकूण २५ सुपरवायझर्स देखरेखीचें काम करतात व सोसायट्यांना योग्य मार्गदर्शन करतात. युनियनच्या कार्यक्षेत्रांतील सेक्रेटरींवर नियंत्रण ठेवण्याकरितां एक युनियन ॲडहॉक कमिटी असते व त्यामुळें सर्व सेक्रेटरींचे कामांत एकसूत्रता येऊन शिस्त लागते. या युनियन्स सहकारी चळवळीच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहेत.

जिल्हा सहकारी सप्लाय व सेल फेडरेशन

जिल्ह्यांतील सर्व प्रकारच्या सेल सोसायट्या, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या यांमध्यें एकसूत्री-पणा आणण्याचें दृष्टीनें तपासणी, मार्गदर्शन व सुधारणा घडवून आणण्यासाठीं ही संस्था १२ वर्षां पूर्वी स्थापन झाली असून सध्यां या संस्थेंत २७ मार्केटिंग संस्था व ५ ग्रुप मल्टीपर्पज सोसायट्या सामील आहेत. या संस्थेनें एकूण ४३ सुपरवायझर्स नेमले आहेत.

सहकारी शिक्षण

सहकारी शिक्षणाचें कार्य जळगांव जिल्ह्यांत दोन संस्थांमार्फत चालतें. त्यांपैकीं एक को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग स्कूल ही संस्था जळगांव येथें असून ही संस्था दरवर्षी प्रत्येकीं सहा महिन्याचे दोन डिप्लोमा कोर्सेस चालविते. यापैकीं दोन महिने प्रात्यक्षिक शिक्षण दिलें जातें. सहकारी खात्यांतील व सहकारी संस्थांतील काम करणाऱ्या व तसेंच कांहीं खाजगी विद्यार्थ्यांना येथें शिक्षण दिलें जातें. प्रत्येक वर्गात १०० विद्यार्थी दाखल केले जातात. त्यांपैकीं ८० विद्यार्थी सहकारी खात्यांतील व संस्थांतील असतात व २० विद्यार्थी खाजगी असतात.

जिल्हा को–ऑपरेटिव्ह बोर्ड

जिल्ह्यांतील सहकारी चळवळीसंबंधीं शिक्षण व प्रचार करणें हा या बोर्डाचा प्रमुख हेतू आहे. हा उद्देश सफल करण्याकरितां पंचवार्षिक योजना व गोरवाला समितीच्या शिफारशीप्रमाणें सहकारी शिक्षणाचीं उद्दिष्टें पूर्ण करण्यासाठीं सहकारी संस्थांच्या सेक्रेटरींचे शिक्षणाचे वर्ग चालविणें पंच व सभासदांचे शिक्षणाचे वर्ग भरविणें, कार्यकर्त्यांच्या परिषदा भरविणें, सहकारा-वर वाङमय प्रसिद्ध करणें व सहकारी चळवळीची माहिती पसरविणें वगैरे कार्य हें बोर्ड करीत आहे.

सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांची परिषद

सहकारी खात्यातर्फे दरवर्षी सर्व सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांचीं एक परिषद एक दिवस भर-विण्यांत येतें व त्यावेळी गतवर्षी झालेल्या कार्याचा आढावा घेऊन पुढील वर्षाच्या कार्याचें नियोजन करण्यांत येतें. त्याचप्रमाणें सहकारी संस्थांच्या कार्यातील अडीअडचणींचाहि विचार केला जातो व या अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं उपायहि शोधले जातात.

सावकार नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी

सावकारी नियंत्रण कायद्यानुसार प्रत्येक सावकारास सावकारी धंद्यासाठीं परवाना घ्यावा लागतो. या कायद्यानें व्याजाचे दर निश्चित केले असून त्याप्रमाणें वेळोवेळीं सावकारास हिशेब सादर करावे लागतात. सावकाराच्या अनियंत्रित व्यवहारास या कायद्यानें आळा बसला आहे. शेतकऱ्यांना लागणारा कर्जपुरवठा हल्लीं मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्थां-मार्फत होत असल्यानें आतां सावकारांचें महत्त्वहि कमी होत आहे.

सावकारांच्या कर्जव्यवहाराची माहिती

		१९५८–५९
परवाने घेतलेल्या सावकारांची संख्या		३०६
व्यापाऱ्यांना दिलेलें कर्ज	रु.	२१,४४,७८३.
व्यापाऱ्यांशिवाय लोकांना दिलेलें कर्ज	रु.	४२,१०,५४७.
कर्ज घेणाऱ्या लोकांची संख्या		१७,८०८

सहकारीक्षेत्रांत संकलित कारखाने

जळगांव जिल्ह्यांत सहकारी तत्वावर एक सुताची गिरणी, एक शेतीच्या अवजारांचा कारखाना व एक सुपर फॉस्पेट व सल्फ्युरिक ॲसिडचा कारखाना, हे कारखाने काढण्याचे प्रयत्न चालू असून त्यासंबंधीं विचारविनिमय करून पुढें योजना आंखण्यासाठीं एक २२ कार्यकर्त्यांची समिति सहकारी कार्यकर्त्यांच्या वार्षिक परिषदेंत नोव्हेंबर १९६० महिन्यांत नेमली गेली व ती समिती त्या दृष्टीनें प्रयत्न करीत आहे. सुताच्या गिरणीसाठीं सुमारें एक कोटी रुपये, ४० हजार टन सुपर फॉस्फेट व १६ हजार टन सल्फ्युरिक ॲसिड उत्पादनशक्ती असलेल्या कारखान्यासाठीं सुमारें ६५ लाख रुपये व शेतीच्या अवजारांच्या कारखान्यासाठीं सुमारें ५ लाख रु. लागतील. यापैकीं कांहीं रक्कम शेअर भांडवलाच्या रूपानें उभारून राज्य सरकारचें कर्ज व मदत, फिनॅन्शियल कॉर्पोरेशनचें कर्ज इ. मार्गांनीं ही रक्कम जमविली. जाईल.

विकासाची वाटचाल

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशांत विकासाचें पर्व सुरू झालें असून खेड्यांतल्या ग्राम-पंचायतीपासून दिल्लीच्या नियोजनमंडळापर्यंत सर्व पातळीवर विकासाचे प्रश्न चर्चिले जात असलेले आढळतील व विकास-कामांच्या लहानमोठ्या योजनांची आंखणी व अंमलबजावणी चालू असलेली दिसेल.

सर्वांचीं सांगड लोकांना दैनंदिन भासणाऱ्या गरजा व अडचणी दूर व्हाव्यात व त्यांचें जीवन सुखाचा मागोवा घेत चालू लागावें या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. विकास कामांची निवड, आंखणी व प्रत्यक्ष अंमलबजावणी या सर्व बाबतींत जनतेच्या प्रत्यक्ष सहयोगावर भर देण्यांत येत असून लोकांचे विचार, त्यांच्या भावना, त्यांची साधनसामुग्री, त्यांची आर्थिक वा श्रमरूपानें मिळणारी मदत या सर्वांची सांगड घालून विकासाचें नवें मंदिर उभारलें जात आहे.

जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील व भागांतील जनतेचे प्रतिनिधि व सरकारी अधिकारी सभासद असलेलें, जिल्हा पातळीवर जिल्हा विकास मंडळ, जिल्हाधिकारी महाशयांचे अध्यक्षतेखालीं काम करणारी एक महत्त्वाची संस्था आहे. जिल्ह्याचे विकासाशीं संबद्ध अशा विविध प्रश्नांचा विचार हें

जिल्हा विकास मंडळ मंडळ करतें. पंचवार्षिक योजनेंत या जिल्ह्यांत कोणत्या सुधारणा वा सोयी व्हाव्यात यासंबंधीं हें मंडळ सरकारकडे शिफारशी करतें. मंडळांत अध्यक्ष, उपाध्यक्ष व मानद चिटणीस हे पदाधिकारी सोडून १९ सरकारी अधिकारी, १८ विधानसभा, विधान परिषद, लोकसभा व राज्य-सभेचे सदस्य व ५४ कार्यकर्ते आहेत. कार्यकर्त्यांमध्यें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष, तीन जिल्हा लोकलबोर्डाचे प्रतिनिधी, एक जिल्ह्यांतील मालविक्री सहकारी संस्थांचा प्रतिनिधी व एक जिल्ह्यांतील शेतीसहकारी संस्थांचा प्रतिनिधी हे संस्था–प्रतिनिधि या नात्यानें आहेत. असें एकूण ९४ सभासदांचें हें जिल्हा विकास मंडळ आहे. या मंडळाच्या साधारणपणें चार बैठका दरवर्षी भरतात.

उपसमित्या

या जिल्हा विकास मंडळाच्या एकूण १२ उपसमित्या असून यापैकीं पोलिस सल्लागार उपसमिति व राष्ट्रीय विस्तार योजना सल्लागार उपसमिति या दोन उपसमित्यांचे अध्यक्ष जिल्हाधिकारी हेच असून संबंधित खात्याचे सरकारी अधिकारी हे चिटणीस असतात.

या उपसमित्या अशा :–(१) जिल्हा दारुबंदी उपसमिती, (२) जिल्हा शेती व ग्रामविकास उपसमिती, (३) जिल्हा शेती संशोधन उपसमिती, (४) जिल्हा सहकारी व मालविक्री उपसमिती, (५) जिल्हा बांधकाम व छोटें पाटबंधारे उपसमिती, (६) जिल्हा समाज कल्याण उपसमिती, (७) जिल्हा श्रम सल्लागार

उपसमिती, (८) जिल्हा आरोग्य उपसमिती, (९) जिल्हा समाज शिक्षण उपसमिती, (१०) जिल्हा प्रसिद्धी उपसमिती, (११) जिल्हा पोलिस सल्लागार उपसमिती, (१२) जिल्हा राष्ट्रीय विस्तार योजना उपसमिती. जळगांव जिल्हा विकास मंडळानें या शिवाय जिल्हा औद्योगिक विकास उपसमिति नेमण्याचीहि सरकारकडे अनुमती मागितली आहे.

सुधारलेल्या शेतीच्या पद्धती व अवजारांचा प्रचार करणें, सुधारलेलीं बियाणें व खतें शेतकऱ्यांना वांटणें व लोखंड व सिमेंटचे वांटप हीं कामें हीं तालुका विकास मंडळें व संघ करतात. या तालुका मंडळाचे रूपांतर खरेदी-विक्री संघांत करावें असा सरकारी आदेश असून त्याप्रमाणें ११ तालुका विकास मंडळांपैकीं १९५९-६० मध्यें अमळनेर, रावेर, भडगांव, यावल या तालुक्यांच्या विकास मंडळांचे रुपांतर खरेदी-विक्री संघांत करण्यांत आलें आहे व उरलेल्या ७ संघांचेंहि करण्यांत येत आहे.

तालुका विकास मंडळें व संघ

लोखंड व सिमेंट वांटप

शेतीच्या कामांसाठीं लोखंड व सिमेंट वांटपाचें काम जिल्हा विकास मंडळाकडून होतें. त्याप्रमाणें १९५९-६० मध्यें ५८८ टन लोखंड व ९०० टन सिमेंट या जिल्ह्यांत वांटण्यांत आलें.

वन महोत्सव

जिल्हा विकास मंडळामार्फत वनमहोत्सव दरवर्षी साजरा करण्यांत येतो.

ग्रामसुधार सप्ताह

ग्रामसुधार सप्ताहांत १९५९ चे ऑक्टोबर महिन्यांत या जिल्ह्यांत ११३० कंपोस्ट खताचे व शेण-खताचे खड्डे खणण्यांत येऊन त्यापैकीं १०५४ खड्डे भरण्यांत आले. १९७० झाडें लावलीं व १० तळ्यांचा गाळ काढण्यांत आला. १९५ चराचे संडास खणण्यांत आले व १७५ बांध दुरुस्त व नवीन करण्यांत आले.

क्रीडा महोत्सव

जिल्हा पातळीवर क्रीडामहोत्सव जिल्हा विकास मंडळातर्फे साजरा करण्यांत येतो. १९५९ व १९६० या दोन वर्षी जिल्हा पातळीवरील सामन्यांत सुमारें १२०० खेळाडूंनीं सांघिक व वैयक्तिक खेळांत भाग घेतला होता. क्रीडा-महोत्सवांत भाग घेणाऱ्या संघांची व क्रीडापटूंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

स्थानिक विकास कामे

भारत सरकार व राज्य सरकार यांच्या आर्थिक सहाय्यानें दरवर्षी जिल्ह्यांत स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम आंखला जातो.

स्थानिक विकासाचा कार्यक्रम यशस्वीपणें पार पाडणारा जळगांव महाराष्ट्रांतला एक अग्रेसर जिल्हा आहे. अनेकवेळा इतर जिल्ह्यांना मंजूर केलेल्या रकमा तेथें खर्च होऊं शकल्या नाहींत परंतु या जिल्ह्यानें त्यास मंजूर झालेल्या रकमा खर्च करून दाखविल्या आहेत. स्थानिक विकासाचा कार्यक्रम १९५३-५४ मध्यें प्रथम सुरू झाला, तेव्हांपासून गेल्या ७ वर्षांत या जिल्ह्यांत कोणत्या प्रकारचीं कामें झालीं व त्यासाठीं सरकारद्वारा किती रक्कम खर्च झाली हें खालील तक्त्यांत दाखविलें आहे. कोणत्याहि एका कामावर सरकारतर्फे रु. १० हजारापेक्षां जास्त मदत दिली जात नाही. याचाच अर्थ हीं कामें लहान स्वरूपाचीं असतात. सुमारें २० हजाराच्या किंमतीच्या कामापर्यंतचींच कामें यांत घेतलीं जातात. २० हजारावर जर कांहीं खर्च गेल्यास तो सर्व स्थानिक लोकच देतात कारण सरकारी मदतीची मर्यादा १० हजारापर्यंतच असते.

स्थानिक विकास कामांत जिल्हा अग्रेसर

जिल्ह्यांत पूर्ण झालेलीं स्थानिक विकासकामें

वर्ष	पाणी पुरवठा	गटारें	संडास	रस्ते	धक्के	शाळा-गृहें	चावडया, वाचनालयें व ग्रामपंचायती	दवाखाने	धर्म शाळा	सरकारी खर्च.
१९५३–५४	१९	४३	१३	१५	५	–	६	–	१	१,५६,७०१
१९५४–५५	१८	४४	३	८	१२	१	३३	–	–	१,७६,८७५
१९५५–५६	१९	८४	२३	४	६	२	३	१	–	२,७४,५०७
१९५६–५७	२०	४१	११	३	९	६	८	–	–	१,२८,९३२
१९५७–५८	१३	४८	१४	१२	१३	१३	६	–	–	१,९४,३३१
१९५८–५९	१०	८८	१	२	१	२	२	–	–	२,८६,४७७
१९५९–६०	१५	३१	११	८	७	६	५	१	–	२,९७,९००
एकूण	११४	३७९	७६	५२	५३	३०	६३	२	१	१६,१५,७२३

अशा तऱ्हेनें गेल्या सात वर्षात या जिल्ह्यांत रु. १६ लाखांवर सरकारी मदती द्वारें सुमारें ३२ लाख रु. ची एकूण ६९० स्थानिक विकास कामें पुरीं झालीं.

स्थानिक विकासाच्या कार्यक्रमामध्यें जळगांव जिल्ह्याचें खास वैशिष्ठ्य म्हणून पाणी पुरवठ्याच्या कामांचा उल्लेख करतां येईल. पाण्याच्या टाक्या बांधून व त्यांत इंजिनपंपानें पाणी ओढून सोडावयाचें व पाण्याच्या टाक्यांना तोटचा बसवून तें पाणी ग्रामवासीयांना सुलभतेनें उपलब्ध करून द्यावयाचें अशा पाणी-पुरवठ्याच्या योजना या जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतात. स्थानिक विकासाचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या आरोग्य विभागामार्फत एदलाबाद, साळशिंगी व उंबरखेडें येथें अशा पाणी-पुरवठा योजना पुऱ्या करण्यांत आल्या. एदलाबाद येथें रु. ६१,५६७ खर्च करून पाणीपुरवठा योजना पुरी केली व एका टेकडीवर १६००० गॅलनची दगडी टाकी बांधून तेथून गांवांत नळ बसवून त्यांना पाणी पुरविण्यांत आलें. साळशिंगीं येथें १६००० गॅलनची उंच टाकी उभारून गांवांत नळांना पाणी पुरविण्यांत आलें. त्यासाठीं रु.५१,५२३ खर्च झाले. उंबरखेडे येथें दगडी खांबावर १६००० गॅलनची पाण्याची टाकी उंच उभारून त्यांत विहीरीचें पाणी सोडून तेथून तें गांवांत नळांना पुरविण्यांत आलें व यासाठीं रु. ५९,७३६ खर्च झाले. या सर्व योजना ग्रामपंचायती व सरकार यांनीं निम्मा खर्च वांटून घेऊन पुऱ्या केल्या. याशिवाय स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम सुरूं होण्यापूर्वीच जामठी, पाळधी व नशिराबाद येथें तेथील ग्रामपंचायतींनींच पाणी पुरवठा योजना पुऱ्या केल्या आहेत व नळांचीहि सोय केली आहे.

पाणी पुरवठ्याचीं कामे

१९४९ मध्यें रावेर तालुक्यांत खिरोदे येथें सुरूं झालेल्या सर्वोदय योजनेमुळें या पाणी पुरवठ्याच्या योजनांना खरी चालना मिळाली. सर्वोदय केंद्राच्या सहकार्यानें ग्रामपंचायतींनीं खिरोदे, पाल व रोझौदे येथें पाणीपुरवठा योजना पुऱ्या करून नळाच्या पाण्याची सोय केली. स्थानिक विकास योजना सुरूं होण्यापूर्वीच या योजना पुऱ्या झाल्या होत्या. खिरोद्याची पाणी-पुरवठा योजना पाहून रावेर व यावल तालुक्यांत गांवोंगांवीं अशा पाणी-पुरवठा योजना त्यानंतर हातीं घेण्यांत आल्या व स्थानिक विकास कार्यक्रमांच्या सहाय्यानें त्या पुऱ्या झाल्या. १९५३-५४ ते १९५९-६० या सात वर्षांत स्थानिक विकास कामांच्या कार्यक्रमामध्यें हातीं घेऊन पुऱ्या करण्यांत आलेल्या पाणी पुरवठ्यांच्या योजना, त्यासाठीं सरकारतर्फे देण्यांत आलेली मदत व लोकांची वर्गणी इ. तपशीलवार माहिती पुढें दिली आहे.

खिरोद्याचा आदर्श

स्थानिक विकास कार्यक्रमांत पुऱ्या झालेल्या पाणीपुरवठा योजना

क्रमांक	गांव	तालुका	लोकवर्गणी	सरकारी मदत	एकूण खर्च रु.
१.	ऐनपूर	रावेर	९,४६४	९,४६४	१८,९२८
२.	थोरगव्हाण	,,	८,९०६	८,९०६	१७,८१२
३.	म्हस्कावद	,,	६,५३०	६,५३०	१३,०६०
४.	मोरगांव	,,	५,४३५	५,४३५	१०,८७०
५.	दसनूर	,,	६,५६१	६,५६१	१३,१२२
६.	खिर्डी बु.	,,	६,४०८	६,४०८	१२,८१६
७.	खिर्डी खु.	,,	८,९६४	८,९६४	१७,९२८
८.	बलवाडी	,,	९,१६९	९,१६९	१८,३३८

क्रमांक	गांव	तालुका	लोकवर्गणी	सरकारी मदत	एकूण खर्च रु
९.	कुंभारखेडे	,,	७,७२६	७,७२६	१५,४५२
१०.	सावखेडे बु.	,,	७,८८६	७,८८६	१५,७७२
११.	आतवाडे	,,	७,७५०	७,७५०	१५,५००
१२.	विटवे	,,	८,५३५	८,५३५	१७,०७०
१३.	निंबोळ	,,	८,१००	८,१००	१६,२००
१४.	भालोद	यावल	९,११८	९,११८	१८,२३८
१५.	अटावल	,,	७,७६४	७,७६४	१५,५२८
१६.	कठोरे	,,	९,२६७	९,२६७	१८,५३४
१७.	आसोदे	,,	१०,०००	१०,०००	२०,०००
१८.	तुरखेडे	जळगांव	११,२९८	१०,०००	२१,२९८

याशिवाय पुढील पाणीपुरवठा योजनांचीं कामें १९६०-६१ मध्यें चालू आहेत.

१९६०–६१ मध्यें बांधकाम चालूं असलेल्या स्थानिक विकास कार्यक्रमांतील पाणीपुरवठा योजना

क्रमांक	योजना सुरूं असलेलें गांव	तालुका	योजनेचा संकलिपत खर्च
१.	चिनावल	रावेर	१९,९००
२.	थोरगव्हाण	,,	१९,९००
३.	वाघोदे बु.	,,	१९,९००
४.	कळमोडे	,,	१६,५८४
५.	आंदलवाडी	,,	९,८२५
६.	रेंभोठे	,,	९८२५
७.	हिंगोणे	यावल	१९,९००
८.	वडी	,,	२९,५२०
९.	न्हावी	,,	१९,९००
१०.	चिंचोली	,,	१५,०००
११.	सांगवी बु.	,,	२३,७७२
१२.	सातोद	,,	१६,५८४
१३.	नायगांव	,,	१४,८५५
१४.	सावखेडे सीम	,,	१४,८५५
१५.	मोहोराळे	,,	२१,९४४
१६.	तळवेल	भुसावळ	३७,६२७
१७.	धामणगांव	जळगांव	१७,७५५
१८.	बिदगांव	,,	२९,४०२

याशिवाय २५ ग्रामीण भागांतील पाणीपुरवठा योजनांना तांत्रिक व शासकीय मान्यता मिळाली असून त्यासाठीं जरुर ती आर्थिक तरतूद होतांच त्या हातीं घेतल्या जातील.

ग्रामीण पाणीपुरवठा

याशिवाय खेड्यांत जेथें पिण्याच्या पाण्यासाठीं विहिर मुळींच नाहीं तेथें सरकार स्वखर्चानें विहिर बांधून देते. पिण्याच्या पाण्याची गरज ही लोकांची पहिली गरज आहे. तेव्हां ती भागविणें हें आद्य-कर्तव्य आहे. जेथें विहिर आहे पण तें पाणी गांवाला पुरत नाहीं तेथें दुसरी विहिर खणण्यासाठीं सरकारी मदत ७५ टक्के असते. २५ टक्के वांटा गांवलोकांचा असतो. जळगांव जिल्ह्यांत १९५६-५७ ते १९५९-६० या चार वर्षांत अशा प्रकारें एकूण २५ विहिरी बांधण्यांत आल्या असून त्या सर्व सरकारी खर्चानेंच बांधलेल्या आहेत.

संकीर्ण योजना

पाणीपुरवठा योजना, स्थानिक विकासकामें याशिवाय संकीर्ण योजना हातीं घेण्यासाठींसुद्धां जिल्हा विकास मंडळाला दरवर्षी कांहीं रक्कम मंजूर केली जात असते. संकीर्ण योजने खालील कामें प्रथमावस्था विकासगटाबाहेरच घेतलीं पाहिजेत असें बंधन नसतें. १९५९-६० मध्यें संकीर्ण योजनेखालीं जिल्ह्यांत शाळागृहांच्या ७ खोल्यांचीं कामें सुरू करण्यांत आलीं आहेत.

ग्रामीण घरबांधणी योजना

तीन प्रकारच्या ग्रामीण घरबांधणी योजनांखालीं सरकारतर्फे सध्यां खेड्यांत घरें बांधण्यासाठीं मदत मिळते. ग्राम गृहप्रकल्प योजनेनुसार गटविकास अधिकाऱ्यांचेकडून घरबांधणीसाठीं रु. २००० पर्यंत कर्ज मिळू शकतें. मात्र घरांच्या एकूण खर्चाच्या ३/४ रकमेपुरतेंच कर्ज मिळतें उरलेला खर्च ज्याचा त्यास करावा लागतो. हें कर्ज २० वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाचें असतें. नवीन गांवठाणांत गांवाच्या मास्टर प्लॅनप्रमाणें घरें बांधण्यास जे तयार असतील अशाच गांवांना या योजनेचा फायदा मिळतो. १९५९-६० सालांत या योजनेनुसार रु. ६०,००० रक्कम जिल्ह्याला मिळाली होती व त्यापैकीं ५४ लोकांना प्रत्येकी रु. १०० प्रमाणें ५४ घरांसाठीं ५४ हजार कर्ज देण्यांत आलें. त्यापैकीं १२ घरें पुरीं झालीं असून इतर घरांचें काम चालू आहे. चालू १९६०-६१ सालांसाठींहि रु. ७५००० मंजूर झाले असून त्यापैकीं रावेर तालुक्यांत होळ येथें ३५ घरांसाठीं ३५ हजार रु. देण्यांत आले आहेत. शिवाय चाळीसगांव तालुक्यांत पाटणें येथें आणखीं १५ घरें व तळेगांव येथें ५० घरें बांधण्याचें योजिलें असून त्यासाठीं चाळीसगांव विकासगट अधिकाऱ्यांना रु. ४०,००० देण्यांत आले आहेत.

दुसऱ्या योजनेनुसार अनुसूचित जाती वा अनुसूचित जमाती (आदिवासी) यांना घरें बांधण्यासाठीं प्रत्येकीं रु. ७५० पर्यंत मोफत मदत मध्यवर्ती सरकारच्या योजनेनुसार मिळते. मात्र त्या घराची किंमत १००० ते १२५० रुपयांपर्यंत असली पाहिजे. उरलेला खर्च ज्याचा त्यास करावा लागतो. सरकारी जमीनहि उपलब्ध असल्यास मोफत दिली जाते. या योजनेनुसार १९५९-६० सालीं अनुसूचित जातीसाठीं जिल्ह्याला रु. ४५,००० मिळाले होते व एदलाबाद, चांगदेव, घोडसगांव, चिखली, निमखेडी, इच्छापूर, सावखेडे या एदलाबाद महालांतील गांवांना व रावेर तालुक्यांतील कळमोदे व रोझोदे या दोन गांवांना अशा एकूण ९ गांवांना ६५ घरांसाठीं रु. ४४,१६८ दिले व आदिवासीयांसाठीं जोगलखोरी व रावेर तालुक्यांतील गौलखेडे या दोन गांवांतील ४४ घरांना रु. २९२१६ देण्यांत आले. चालू १९६०-६१ सालीं अनुसूचित जातींच्या ३५ घरांसाठीं चिनावल, एदलाबाद, कुसुंबे (ता. चोपडे) व करजगांव (ता. चाळीसगांव) या गांवांना रु. २६,००० व आदिवासीयांच्या ६१ घरांसाठीं पाल, एदलाबाद, व कऱ्हाळे (ता. भुसावळ) या गांवांना रु. ४५,३९२ मंजूर करण्यांत आले आहेत.

तिसरी योजना ही ग्रामीण घरबांधणी योजना म्हणून फक्त विकासगटांतच लागू आहे. या योजनेखालीं २००० रु. किंमतीपर्यंतच्या घरांसाठीं ८९२ रु. कर्ज मिळू शकतें. इतर खर्च घरमालकानें करावयाचा. कर्ज १२ सारख्या वार्षिक हप्त्यानें फेडावयाचें असतें. शेड वगैरेसाठीं १०० रु. पर्यंत अधिक मदतहि मिळूं शकते.

अशा घरबांधणीच्या कामांसाठीं प्रथमावस्था विकासगटांत १ लाख रु. ची तरतूद केलेली असते. घरदुरुस्ती-साठीं सुद्धां हें कर्ज मिळूं शकतें. भुसावळ व चोपडे या विकासगटांत कांहीं थोडी रक्कम या योजनेखालीं खर्च झाली आहे.

विकासगट

जिल्हा विकास मंडळातर्फे सुरूं करण्यांत येणारीं स्थानिक-विकासकामें व इतर विविध प्रकारचीं ग्रामीण जनतेच्या कल्याणाचीं कामें आपण पाहिलीं. पंचवार्षिक योजनेचा प्रत्यक्ष लाभ प्रत्येक खेड्याला व्हावा या उद्देशानें समाज विकासाचा देशव्यापी कार्यक्रम आज सर्वत्र सुरू आहे. ग्रामीण भागांतील समाजाचें दारिद्य आणि अज्ञान दूर व्हावें, शिक्षणाचा प्रसार व्हावा, आरोग्य संवर्धन व संरक्षणाची सोय व्हावी, ग्रामीण कला व व्यवसायांत वाढ व्हावी, खेड्यांपाड्यांतून दळणवळणाची सोय व्हावी, सामूहिक व सहकारी जीवन जगण्याची वृत्ती त्यांच्यांत वाढावी म्हणून सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम एकत्रित खेड्यांचा गट घेऊन त्यांत सुरूं करण्यांत येतो.

या जिल्ह्यांत एदलाबाद महालांत समाज विकासगट प्रथम १ जून १९५५ पासून सुरूं झाला व त्याची मुदत १९५८ मध्यें मार्च अखेर संपून नंतर द्वितीयावस्था विकास गट म्हणून तो त्यानंतर चालूं आहे. त्यानंतर भुसावळ येथें समाज विकासगट २ ऑक्टोबर १९५७ मध्यें सुरूं झाला व तो ३० सप्टेंबर १९६० रोजीं पूर्ण होऊन १ ऑक्टोबर १९६० पासून द्वितीयावस्था गट म्हणून पुढें चालूं आहे. चाळीसगांव तालुका विकासगट १ मे १९५६ पासून प्रथमावस्थेंत असून एप्रिल १९६१ नंतर द्वितीयावस्था गट म्हणून चालूं आहे. त्याचप्रमाणें चोपडे, जामनेर, भडगांव, अमळनेर व पाचोरे येथें सध्यां प्रथमा-वस्था विकासगट चालूं असून मावल, पारोळे, एरंडोल, जळगांव व रावेर येथें पूर्वविस्तार गट चालूं आहेत. त्यांचें क्रमाक्रमानें प्रथमावस्था गटांत रूपांतर होईल. सध्यां सर्व जिल्हा विकासगटाखालीं आला आहे. सहा तालुक्यांतून प्रथमावस्था, २ तालुक्यांतून द्वितीयावस्था व ५ तालुक्यांतून पूर्ववि-स्तारगट चालूं आहेत. या जिल्ह्यांतील विकासगटाचें नांव, तो सुरूं झाल्याची तारीख, त्यांतील क्षेत्र, गांवांची संख्या, अवस्था, मुदत, खर्चाची तरतूद इ. माहिती पुढील तक्त्यांत दिली आहे. पूर्व विस्तार विकासगटास त्यांत असलेल्या गटसंख्येच्या प्रमाणांत दर गटास रु. २१,२०० याप्रमाणें दरसाल रक्कम मंजूर केलेली असते. पूर्वविस्तारगटाची मुदत ठरलेली नाहीं. आर्थिक तरतूद होतांच पूर्वविस्तारगटाचें रूपांतर प्रथमावस्था गटांत होतें.

जळगांव जिल्ह्यातील विकासगट

अनुक्रम	विकासगटाचें नांव	सुरू झाल्याची तारीख	मुदत वर्षें	विकास क्षेत्र चौ. मैल.	गटांतील खेडीं	आकार गट प्रमाणांत	चालू अवस्था	चालू अवस्थेची आर्थिक तरतूद
१.	एदलाबाद	१-४-१९५८	५	२४९.५	७९	१	द्वितीयावस्था	५ लाख रु.
२.	भुसावळ	२-१०-१९६०	५	३२८.५	१०४	१½	"	" "
३.	चाळीसगांव	१- ५-१९५६	५	४६०.४	१२५	१¾	प्रथमावस्था	२१ "
४.	चोपडे	१- ४-१९५७	५	२९३.५	११२	१¾	"	१५ "
५.	जामनेर	२-१०-१९५७	५	५२१.१	१४४	१¾	"	२१ "
६.	भडगांव	१- ४-१९५८	५	१९६.५	६०	१	"	१२ "
७.	अमळनेर	२-१०-१९५९	५	३२४.५	१५७	१½	"	१८ "
८.	पाचोरे	१- ४-१९६०	५	३०८.७	११९	१½	"	१८ लाख रु.
९.	यावल	१- ४-१९५९	ठरलेली नाहीं	३६८.५	८४	१½	पूर्व विस्तार	३१,८००
१०.	पारोळे	१- ४-१९५९	"	२०१.४	१०८	१	"	२१,२०० दरवर्षी
११.	एरंडोल	२-१०-१९५९	"	३६८.५	१५३	२	"	४२,४०० "
१२.	जळगांव	२-१०-१९५९	"	३१९.६	८७	१½	"	३१,८०० "
१३.	रावेर	१- ४-१९६०	"	३६१.३	११५	२	"	२१,२०० "

पूर्व विस्तारगटाचें रूपांतर ज्यावेळीं प्रथमावस्था विकासगटांत होतें त्या वेळेपासून गटाच्या खऱ्या कार्यास सुरुवात होतें व त्यामुळें त्याच्या वाढत्या खर्चाचीहि तरतूद होते. जिल्ह्यांतील अशा प्रथमावस्था व द्वितीयावस्था विकासगटांत त्यांच्या स्थापनेपासून ३१-१२-१९६० अखेर झालेल्या खर्चाची माहिती खालीलप्रमाणें आहे :–

प्रथमावस्था विकासगट

क्र.	गट	खर्च (डिसेंबर १९६० अखेर)
१.	भुसावळ	रु. १६,५५,९२३
२.	चोपडा	रु. ८,१८,५५३
३.	पाचोरा	रु. १,३८,०८३
४.	एदलाबाद	रु. १५,५५,१५९
५.	अमळनेर	रु. ५,५०,६४६
६.	चाळीसगांव	रु. १३,९८,२१७
७.	भडगांव	रु. ४,९९,२९२
८.	जामनेर	रु. १०,४४,६७३

भारत सेवक समाज

जिल्हा विकास मंडळ, विकासगट व विकासगट समित्या, सर्वोदय केंद्र, यांचे द्वारें जसें विविध प्रकारचें विकासकार्य जिल्ह्यांत चालतें त्याचप्रमाणें भारत सेवक समाज ही अखिल भारतीय बिनसरकारी पक्षभेदातीत अशी संघटनाहि विकास कार्यांत पुढाकार घेऊन सक्रिय मदत करीत आहे. विकास-कामांत लोकांचा सहयोग ही फार महत्त्वाची बाब आहे व तेंच काम मुख्यत: भारत सेवक समाजाचें आहे. भारत सेवक समाजाच्या कार्याला ठराविक चाकोरी किंवा मर्यादा नाहींत. लोकहिताचें कोणतेंहि काम हा समाज हातीं घेऊं शकतो. कायदे वा नियम यांच्या बंधनांत ठराविक मार्गानें वाट चोखळणारी ही संघटना नव्हे. लोकहितासाठीं लोकांच्या प्रयत्नानें सेवाभावी दृष्टीनें कार्य करणारी ही लोकांची संघटना आहे. जनहित हें जितकें व्यापक अन् विविधांगी आहे तसेंच या संस्थेच्या कार्याच्या सीमाहि विस्तृत व व्यापक आहेत.

जळगांव येथें भारत सेवक समाजाच्या तीन प्रकारच्या कचेऱ्या आहेत. भारत सेवक समाजाचे महाराष्ट्र प्रदेशाचे संयोजक श्री देवकीनंदन नारायण हे आहेत व त्यामुळें महाराष्ट्र प्रदेश संयोजकाची कचेरीहि येथेंच आहे. जळगांव, धुळें व नाशिक या तीन जिल्ह्यांकरितां असलेल्या विभाग शिबीर समितीचें (रिजनल कॅम्प कमिटी) कार्यालयहि येथेंच आहे व भारत सेवक समाजाच्या जिल्हा संयोजकांच्या जिल्हा शाखेचें कार्यालयहि येथेंच आहे.

शिबिरें

भारत सरकारनें पंचवार्षिक योजनाद्वारा ज्या अनेक लोककल्याणकारी योजना हातीं घेतल्या आहेत त्या कार्यान्वित करण्याकरितां लोकांना तयार करण्याची व त्यांचें सक्रिय सहकार्य मिळविण्याची फार आवश्यकता असते. यासाठीं ग्रामीण जनतेचीं व विद्यार्थ्यांचीं विविध प्रकारचीं शिबिरें भारत सेवक समाजातर्फे भरविलीं जातात. या शिबिरांचें संयोजन व संघटण विभाग शिबिर समितीतर्फे केलें जातें.

अशीं शिबिरें गतवर्षी १९५९-६० मध्यें तीन जिल्ह्यांत एकूण २० घेण्यांत आलीं.

विकासगटांसाठीं नेमलेल्या विकासगट समितीच्या बिनसरकारी सदस्यांना शिक्षण देण्यासाठीं औरंगाबाद विभागासाठीं एक प्रशिक्षण केंद्र पाचोरें येथें १९६० सालांत फेब्रुवारी पासून भारत सेवक समाजाच्या जिल्हा शाखेनें कांहीं दिवस चालविलें होतें. ५० सदस्यांसाठीं दहा दिवसाचा शिक्षणक्रम होता. परंतु पुरेसे सदस्य वेळोवेळीं न मिळाल्यानें तें पुढें बंद करण्यांत आलें. केंद्र चालू असेतों येथें ५२ सदस्यांना शिक्षण दिलें गेलें.

विकासगट समिती सदस्यांचें प्रशिक्षण केंद्र

भारत सेवक समाजाच्या सर्व योजनांचा फायदा संकलित रीत्या एका तालुक्याला मिळावा या दृष्टीने लोककार्य क्षेत्राची योजना आंखण्यांत आली असून या केंद्राचे संचालक शेंदूर्णीचे वयोवृद्ध कार्यकर्ते डॉ. काकासाहेब साने हे आहेत. त्यांचे दोन मदतनीस आहेत. जामनेर लोककार्य क्षेत्रानें तालुक्याची पाहणी करून लोकांच्या गरजांचा अभ्यास केला व त्या गरजा भागविण्यासाठीं हें लोककार्यक्षेत्र जिल्हा विकास मंडळाच्या विविध विभागांची मदत घेऊन कार्य करीत असतें. या क्षेत्रातर्फे शेतकऱ्यांना नवीन शेतीच्या पद्धती, खतें, बियाणें, कीटकनाशक उपाय इ. संबंधी वेळोवेळीं पत्रकें प्रसृत करून उपयुक्त मार्गदर्शन केलें जातें. शेतकी खात्याच्या खरीप ज्वारी मोहिमेंतहि या कार्यक्षेत्रानें भरीव मदत केली.

लोककार्यक्षेत्र

हा एक नवीन उपक्रम १९५९-६० सालीं भारतसेवक समाजानें जळगांव येथें सुरूं केला. जळगांव येथें शिकणाऱ्या बाहेरगांवच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीं एक वसतिगृह समाजानें चालविलें असून त्याचा फायदा ३५ विद्यार्थी घेत आहेत. विद्यार्थ्यांची घरगुती वातावरणांत रहाण्याची सोय व्हावी, त्यांनीं नियमित अभ्यास करावा, त्यांना चांगलें वळण लागावें व ते समाजाचे उत्तम घटक म्हणून बाहेर पडावेत हा या वसतिगृहाचा उद्देश आहे. येथील मुळजी जेठा कॉलेजचे उपप्राचार्य श्री. सी. आर. पोतनीस यांची या वसतिगृहावर देखरेख आहे व मुलांचा अभ्यास सुधारण्याच्या दृष्टीनें इतर प्राध्यापकहि वारंवार वसतिगृहास भेट देत असतात.

युवक वसतिगृह

"केअर" या अमेरिकन संस्थेनें भारत सेवक समाजास अधिकृत मोफत दूधवांटप करणारी संस्था म्हणून मान्यता दिली आहे. जळगांव जिल्हा शाखेनें जिल्ह्यांत २५ दूधवांटप केंद्रें चालू केलीं असून त्यांचें काम व्यवस्थित चालू आहे. अमेरिकन प्रतिनिधींनीहि या केंद्राला भेटी देऊन समाधान व्यक्त केलें आहे.

दूधवांटप केंद्र

भारत सेवक समाजाचे उद्देश व कार्य यांची जनतेला जाणीव करून देणें व आपले हक्क व त्याचबरोबर कर्तव्यें कोणतीं हेंहि जनतेच्या मनाला पटवून देणें या उद्देशानें जनजागृतीसाठीं भारत सेवक समाजातर्फे उपराष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे हस्तें व्याख्यानमाला दोन वर्षापासून सुरूं करण्यांत आली आहे. ख्यातनाम अभ्यासू व्यक्तींचे विचार ऐकावयास मिळण्याचे दृष्टीनें ही व्याख्यानमाला चालविली आहे.

व्याख्यानमाला

अन्नोत्पादनांत वाढ व्हावी म्हणून खरीप मोहिमेचा प्रचार खेडोपाडीं करण्यासाठीं प्रचार सभा व प्रात्यक्षिकें यांची आघाडी उघडलेली आहे. या कामीं शेती खातें व विकासगटांतील यंत्रणा यांना भारत सेवक समाज सहकार्य देत आहे. त्याचप्रमाणें संतति प्रतिबंधक शस्त्रक्रिया शिबिरें व कुटुंबनियोजन या कामींहि भारत सेवक समाज आस्थापूर्वक मदत करीत आहे. गतवर्षी असें एक शस्त्रक्रिया शिबिर जळगांव येथें घेण्यांत आलें व तालुक्यांतूनहि त्याप्रमाणें प्रचार चालू आहे.

कुटुंबनियोजन व खरीप मोहिम

अंध जनतेला आपल्या अंधत्वाचें वैगुण्य वाटूं नये व त्यांच्या जीवनांतहि आशावाद निर्माण व्हावा यासाठीं जळगांव येथें एक अंधशाळा सुरूं करण्याचें भारत सेवक समाजानें योजलें असून त्यासाठीं निधि गोळा केला जात आहे. पुरेसा निधी जमतांच हेंहि कार्य सुरूं होईल.

सर्वोदय योजना

जळगांव जिल्ह्यांत खिरोदे येथें सर्वोदय केंद्र २ एप्रिल १९४९ रोजीं सुरू करण्यांत आलें. केन्द्र कक्षेंत सातपुडा पर्वताचे पायथ्या लगतच्या व फॉरेस्ट रेंजमधील एकूण ३२ गांवांचा समावेश असून त्याची लोकसंख्या २८२६२ आहे. लोकांचा धंदा शेती व शेतमजुरी असून आदिवासी व भटक्या जमातींत तडवी, वापरा, वंजारी व इतर जातींचा भरणा असून संपूर्ण भाग मागासलेल्या परिस्थितींत होता. रस्ते नव्हते, शाळा नव्हत्या, दवाखान्याची सोय नव्हती व लोकांचा सांस्कृतिक दर्जा अतिशय खालीं आलेला होता. शेतकऱ्यांत जागृति नव्हती व शेतमजुरीचा अभाव होता. लोक बेकार व दुर्व्यसनी होते. कोणत्याहि प्रकारचे उद्योगधंदे नव्हते. शेतजमीन पडीत होती व वहिती जमिनींत थोडेंफार उत्पन्न घेत असत. अशा सर्व परिस्थितीचें अवलोकन करून कै. पू. दादासाहेब धनाजी नाना चौधरी यांनीं केन्द्राचें काम हातीं घेतलें. केंद्र सुरू झाल्यापासून झालेल्या सर्वांगीण प्रगतीची वाटचाल खालीं देण्यांत येत आहे :—

पूर्वीची परिस्थिति

केंद्रांतील समाजकार्यकर्त्यांनीं प्रत्येक खेडयास भेट देऊन पाहणी केली आणि लोकांचें मतपरिवर्तन घडवून त्यांना विकास कार्य करण्याबाबतचा सल्ला दिला. अशा प्रयत्नांत पहिलीं तीन वर्षें झपाटयानें निघून गेलीं. चौथ्या वर्षापासून कार्याचीं मुळें रूजूं लागलीं व त्यानंतर एक एक काम मूर्त स्वरूपांत दिसूं लागलें. खिरोदा, गौरखेडा, रसलपूर या ठिकाणी सूत कताई केंद्रें चालू केलेलीं आहेत.

सूत कताई केंद्रें

सुधारलेल्या पद्धतीच्या तेल घाण्यांचीं प्रात्यक्षिकें दाखवून त्यासाठीं खिरोदा ग्रुप सहकारी तेल उत्पादक सोसायटी स्थापन केली. आज खिरोदा, रोझोदा, कुंभारखेडा, पाल, मोरव्हाळ व लालमाति इ. गांवांना सुधारलेल्या पद्धतीचे तेल घाणे आहेत. लहान लहान ग्रामोद्योग, सुतारी वर्ग, दोर तयार करणें, चर्मकारी, अंबर, आगपेटी व सोपरी यावर भर देण्यांत आला.

तेलघाणी

डोंगर विभागांत पाल, लालमाति, सहस्त्रलिंग, आमोडा, ताडजिनसी, गौरखेडा, मोरव्हाळ, जानोरी, गारबर्डी निंमडया, महुमांडळी या ठिकाणीं शिक्षणाची अजिबात सोय नव्हती ती आज पूर्ण झालेली आहे. पाल येथील शाळेचें रूपांतर आश्रम शाळेंत झालें आहे. तसेंच खिरोदा, रसलपूर, पाल या गांवांना बालवाडया आहेत. खिरोदा व सावखेडा येथील जीवन शिक्षण शाळा केंद्राचे मार्गदर्शनाखालीं चालतात. इतर गांवीं सुरू केलेल्या शाळा जिल्हा शिक्षण मंडळाकडे देण्यांत आल्या आहेत.

शिक्षण

आदिवासी भागांत पाल व गौरखेडा येथें प्रत्येकीं एक दवाखाना चालू केलेला आहे. त्या दवा-
खान्याचा फायदा सर्व आदिवासी लोक घेतात. दोन्ही दवाखान्यांचा खर्च केंद्राचे अर्थव्यव-
स्थेंतून केला जातो. केंद्राचे कक्षेंत फक्त खिरोदे गांवीं लोकल बोर्डाचा दवाखाना चालू आहे. **आरोग्य**

हें कार्य अतिशय भरीव स्वरूपाचें व वैशिष्टयपूर्ण आहे. केंद्रांतील गांवहाळांचे विहिरींना फार खोल
पाणी असल्यामुळें पाण्याचा फार त्रास होत असे म्हणून विहिरींवर एंजिनें बसवून व **ग्रामीण पाणीपुरवठा**
उंच टाक्या बांधून पाणी पुरवठ्याची सोय करण्यांत आली. एकूण केलेल्या खर्चांत
लोकांची श्रमिक व आर्थिक वांटणी ५० टक्के व सरकारी मदत ५० टक्के असते.

अशा योजना, खिरोदा, रोझोदा, कुंभारखेडे, सावखेडा, पाल, कळमोदा या गांवांना पूर्ण केल्या असून
चालू वर्षी कुसुंबे व उतखेडे या गांवांना ही योजना घेण्याचा प्रयत्न चालू आहे. गांवहाळावर सामुदायिकरीत्या
स्नानाची व धुण्याची व्यवस्था म्हणून स्नानगृहें—मुंजालवाडी येथें सहा खोल्या व सहस्त्रलिंग येथें दोन खोल्या
बांधल्या आहेत.

दळण वळण

पहिल्या चार वर्षांत ३१ मैल लांबीचे रस्ते तयार करून दुरुस्त करण्यांत आले. डोंगरी विभागांतील
चिंचाटी, गारवर्डी, पाल, मोरव्हाळ, आमोडा बु. व खुर्द हे रस्ते तयार करण्यांत आले.

सहकार

ग्रामोद्योग प्रगतीचे दृष्टीनें सहकारी चळवळीला प्राधान्य देऊन सहकारी सोसायटचा स्थापन करण्यांत
आल्या. त्या खालीलप्रमाणें :—

१. कुसुंबे ग्रुप जंगल कामगार सहकारी सोसायटी लि. खिरोदा.
२. खिरोदे ग्रुप चर्मकार सहकारी सोसायटी लि. खिरोदा.
३. खिरोदे ग्रुप तेल उत्पादक सहकारी सोसायटी लि. खिरोदा.
४. लालमाति सहकारी हाऊसिंग सोसायटी लि.
५. सहस्त्रलिंग को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.

सर्वोदय क्षेत्रांत ग्रामपंचायती एकूण १३ असून सेवा सहकारी सोसायटचा ११ आहेत. सहकारी
संस्थांची सभासद संख्या ७३५ आहे. विविध कार्यकारी सहकारी सोसायटचा खिरोदा व पाल येथें असून
त्यांची सभासद संख्या १२५ आहे व खेळतें भांडवल रु. ११२७९ आहे. तसेंच टेनंट फार्मिंग सहकारी सोसा-
यटचा लालमाति, सहस्त्रलिंग व ताडजिनसी या गांवांना असून त्यांची सभासदसंख्या ५२ आहे. खेळतें
भांडवल २९८५७ आहे. चालू वर्षी मोरव्हाळ येथें सहकारी शेतीचा प्रयोग नवीन सुरू केला असून कलेक्टिव्ह
को-ऑपरेटिव्ह फार्मिंग सोसायटी स्थापन केली आहे. त्यांत तडवी जमातीचे सभासद १० असून ८० एकर
जमीन अवघ्या दोन महिन्यांत वहिती करण्यांत आली. चालू वर्षी (१९६०-६१) फक्त ४० एकर जमिनींत
पीक घेण्यांत आलें.

सर्वोदय सुरूं होण्यापूर्वी ३२०० एकर जमीन पडित होती. केंद्राकडून २६ लोखंडी नांगर ही पडीत जमीन नांगरण्यासाठीं पुरविण्यांत आले. आज केंद्राचे कक्षेंतील खेड्यांना एकूण १५३ लोखंडी नांगर आहेत.

शेती सुधारणा

डोंगरी भागांतील जमीन चढउताराची असून तिला बांध बंदिस्ती करणें, त्यांत कोरडवाहू पद्धतीनें पिकें घेण्याबद्दल शास्त्रीय माहितीचे बंडिंग वर्ग व शिबिरें केंद्राचे खर्चानें घेण्यांत आलेलीं आहेत. लालमाति येथें सरकारी खर्चानें २५० एकर जमिनीस संपूर्ण बंडिंग केलेलें असून त्यांस रु. ११,००० खर्च आलेला आहे. वरील प्रचार व प्रात्यक्षिक कामामुळें डोंगरी भागांतील शेतकऱ्यांचें उत्पादन वाढलेलें आहे.

केंद्रांत एकूण गुरांची संख्या ११३२३ असून त्यांचेपासून निव्वळ शेणखत २१९०० टन व कचरा कपोस्ट २०९०० टन व मूत्रखत २१५६५ टन असें साधारण ७२३६५ टन खत तयार होतें. त्यापैकीं शास्त्रोक्त

खतें

पद्धतीनें खत निर्मितीचे दरवर्षी १०० ते २०० खड्डे पूर्ण केले जातात. आजतागाय केन्द्रांत एकूण १५५० शेणखड्डे तयार केले आहेत. पूर्वी पुष्कळसें खत बाहेरगांवांतत विक्री होत असे. परंतु खताचें महत्त्व पटून आता क्वचित तें बाहेर जातें. बाकी सर्व शेतींत वापरले जातें. याशिवाय सल्फेट ६० टन, सुपर फॉस्पेट ४० टन व मिश्रखतें ८० टन शेतकरी वापरतात. ह्या व्यतिरिक्त शेळया, मेंढ्या बसविणें, सोनखत व मूत्रखत तयार करणें चालू आहे. खिरोदा येथील जनता शिक्षण मंडळ, जीवन शिक्षण मंदिर, पाल येथील आश्रमशाळा, सावखेडा व गौरखेडा येथील जीवन शिक्षण मंदिर इ. ठिकाणीं सोनखत व मूत्रखत तयार करण्याचें काम चालू आहे.

चालू वर्षी (१९६०-६१) खिरोदा ग्रामपंचायतीनें शेण व मैला खतापासून गॅस तयार करून त्याचा उपयोग दिवाबत्ती व स्वयंपाक वगैरे कामाकडे केलेला असून खताची वाढ केलेली आहे. तसेंच खिरोदा येथील भाऊसाहेब बोंडे व लोहारा येथील अब्बासखां समाजखां तडवी यांनीं वैयक्तिक गोबर गॅस प्लॅन्ट तयार केलेले आहेत.

केन्द्रांत ऐरापुरी ज्वारी, चायनामूग, विरनार कपाशी, स्मॉल जपान भुईमूग, केनफाड गहूं हीं सुधारलेलीं पिकें घेतलीं जातात, एकूण केन्द्रांत निव्वळ पिकांवरील क्षेत्र ३१७२४ एकर आहे. केळी, कपाशी

बीं-बियाणें

व भुईमूग या पैशाचे पिकाखालील क्षेत्र १८३०६ एकर, निव्वळ धान्यासाठीं ६६५२ एकर, कडधान्यासाठीं ६७६६ एकर क्षेत्र घेतलें जातें. शेतकऱ्यांत सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याबाबतचे प्रात्यक्षिक प्रयोग घेतले जातात व त्यामुळें सघन पद्धत व विस्तृत पद्धत या खालीं ज्वारी, कपाशी, भुईमूग, गहूं हीं पिकें घेतलीं जातात.

उत्पन्न चढाओढीचे दृष्टीनें केन्द्रामार्फत आदिवासी पीक स्पर्धा घेतली जाते व दरवर्षी ज्वारी, बाजरी, तीळ या तीन पिकांची चढाओढ असते व त्यांना एकूण रु. २०० चीं बक्षिसें वांटलीं जातात. या व्यतिरिक्त

पीकस्पर्धा

सर्वोदय भागांतील शेतकऱ्यांनीं तालुका स्पर्धा, जिल्हा स्पर्धा, राज्यस्पर्धा अशा पीक चढाओढींत सुद्धां भाग घेतलेला आहे. चालू वर्षी (१९६०-६१) राज्य स्पर्धेत पाल येथील शेतकऱ्यानें भाग घेतला आहे.

आदिवासी विभागांतील टेनंट फार्मिंग सोसायट्या कार्यक्षम असून लालमाति, सहस्त्रलिंग, ताडजिनसी या ठिकाणीं सोसायटीचे सदस्यांना हप्त्यानें कर्जपुरवठा होऊन सुधारलेलीं बीं-बियाणें व वेळचे वेळीं मशागत खर्च दिला जातो. त्याचबरोबर तांत्रिक सल्लाहि दिला जातो. त्यामुळें दरसाल त्यांचें उत्पन्न वाढत आहे.

शेती व पाणी पुरवठा

केंद्रांत एकूण ५५७ विहिरी असून त्यापैकीं ४५० विहिरी प्रत्यक्ष चालू आहेत. बाकी विहिरींना पाणी पुरेसें नसल्यामुळें पडून आहेत. खिरोदा, रोझोदा, कळमोदा, कोचूर एवढ्या भागांत विहिरींची संख्या जास्त असून बागायती क्षेत्र जास्त आहे. पाणीपुरवठ्यामुळें दुबार पिकें ४२५ एकर जमिनींत घेतलीं जातात. आदिवासी भागांत लालमाति, सहस्त्रलिंग, पाल, मोरव्हाळ, गारबर्डी या गांवांना सरकारी मदतीनें १२ विहिरी केल्या आहेत व त्यांवर हल्लीं बागायत चालू आहे. मोरव्हाळ येथील एका तडवी शेतकऱ्यास एक एंजिन सेट दिलेला असून त्याखालीं बागायत घेतली जाते. आदिवासी शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्याकरितां एक ट्रॉलीवरील एंजिन केंद्रानें ठेवलेलें आहे. त्याचा वापर हल्लीं चालू आहे.

खिरोदा येथें केंद्रातर्फे एक नर्सरी केलेली असून त्यांत दरवर्षी दोन हजार आंब्यांचीं रोपें तयार केलीं जातात व तीं लावलीं जातात. केंद्रातर्फे कोणत्याहि एका ठिकाणीं प्रदर्शन दरवर्षी भरविलें जातें. त्यांत क्षेत्रांतील उत्तमांत उत्तम धान्याचे नमुने, जातिवंत गुरें ठेवलीं जातात व त्यांना योग्य तीं बक्षिसें दिलीं जातात. अनेक तऱ्हेचीं शेतीयुक्त प्रात्यक्षिकें भरवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलें जातें.

पिक संरक्षण

केन्द्रातर्फे पहिल्या सहा वर्षांत शेतकऱ्यांना मोफत गंधक, झिंक फॉस्फेट ५० टक्के सबसिडीनें व बी. एच्. सी. मोफत दिलें जात असे. अलीकडे तीन वर्षापासून सदरचीं औषधें ५० टक्के सबसिडीनें दिलीं जात आहत. पीक संरक्षणार्थ औषधी फवारण्याचे पंप मोफत दिले जातात. केंद्राचे सुरुवातीचे दोन वर्षांत डोंगरी विभागांत रानटी पशूंपासून पिकांची नासाडी फार होत असे म्हणून पीक संरक्षणासाठीं केन्द्राचे वतीनें पाल, ताड जिनसी, मोरव्हाळ, लालमाति, सहस्त्रलिंग व आमोडा या गांवांना बंदूका मिळवून दिल्या जात त्यामुळें रानटी जनावरांचा नाश झाला असून आदिवासीभागांत न घेतली जाणारीं भुईमूगासारखीं पिकें घेतलीं जातात.

जातिवंत गुरांची पैदास

डोंगरी भागांत गारबर्डी हें ठिकाण निवडण्यांत येऊन त्या ठिकाणीं 'कॅटल ब्रीडिंग व ग्रेझिंग सहकारी सोसायटी स्थापन करण्यांत आली. या भागांत निमार जातीचे गुरांची पैदास सुधारण्याचे दृष्टीनें जातिवंत वळू पुरविण्यांत आले. सरकारी पशुसंवर्धन खात्यामार्फत उतखेडा, भातखेडा, कुसुंबा ह्या गांवांना पहिल्या पांच वर्षांत पूरक पशुपालन केंद्र उघडण्यांत येऊन प्रत्येक गांवास १० निमार गाई व १ वळू याप्रमाणें गुरें देण्यांत आलीं. यामुळें निमार जातीचे पैदासीचें प्रमाण वाढून शेतकरी वैयक्तिकरीत्या निमार वळू खरेदी करूं लागले. केन्द्राकडून कांहीं वळू निम्मे सबसिडीनें दिले जातात. आज केंद्रांतील खिरोदा, सावखेडा, कुंभारखेडा, लोहारा, पाल, कुसुंबा या गांवांत निमार जातीचे वळू अस्तित्वांत असून निमार गाई सावखेडा येथें ५०, खिरोदा येथें २५, लोहारा येथें १५०, पाल येथें ६०, कुसुंबा व उतखेडा येथें ७५ पावेतों आहेत. त्यामुळें एकूण निमार गाईंची संख्या वाढली आहे.

कुक्कुट पालन

आदिवासी भागांत दुय्यम धंदा म्हणून कोंबडीपालन धंद्यास प्राधान्य देण्यांत आलें. सरकारी पशुसंवर्धन खात्यामार्फत लालमाति, सहस्त्रलिंग, पाल, गारबर्डी, आमोडे वगैरे गांवांना व्हाईट लेगहॉर्न जातीचे नर मोफत पुरविले जातात व अंडीं पुरविलीं जातात. आज या गांवांना या जातीच्या कोंबड्यांची संपूर्ण वाढ झालेली आहे. तडवी जातीपैकीं दोन मुलांना कोंबडे पाळण्याचें शिक्षण दिलेलें असून ते स्वतः कोंबडीपालन करतात.

या व्यतिरिक्त प्रत्येक गांवांत समाज शिक्षण, दारूबंदी इ. सांस्कृतिक कार्यक्रम कार्यकर्त्यांचे सहकार्यानें शाळेंतील विद्यार्थ्यांतर्फे होत आहेत व भजनीमंडळामार्फत जागृति निर्माण करण्यांत येते व तसेंच महिला कार्यकर्त्यांमार्फत कांहीं गांवांना महिला सभा घेण्यांत येऊन मार्गदर्शन केलें जातें.

सर्वोदय भागांत केंद्रानें आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून या भागाच्या विकासाच्या दृष्टीनें प्रत्यक्ष गोष्टीकडे प्रथमपासून लक्ष दिलें; जनतेंत जागृती निर्माण केली व विकासकामांसाठीं सहकार्य देण्यास लोकांना प्रवृत्त केलें. कांहीं कामें लोकांच्या वतीनें पूर्ण केलीं. निरनिराळ्या योजनांखालीं निरनिराळ्या खात्यांकडून जीं जीं कामें घेणें शक्य होतें तीं प्रयत्न करून मिळविण्यांत आलीं व लोकांकडून तीं पूर्ण करून घेण्यांत सर्वोदय कार्यकर्त्यांनीं हार्दिक परिश्रम घेतलेले आहेत. त्याचा साधारण गोषवारा खालील प्रमाणें आहे.

सर्वोदय क्षेत्रांतील विकासकामाचा एकूण खर्च, सरकारी मदत व लोकवर्गणी

क्र.	योजनेचा प्रकार	एकूण खर्च	सरकारी मदत	सर्वोदयाची मदत	श्रमदान व धनदान.
१.	शेतीकरितां विहिरी	२२,०००	१६,५००	—	५,५००
२.	बंडिंग शिबिरें	१,५००	—	७५०	७५०
३.	रोपांचा पुरवठा	६००	—	३००	३००
४.	खत पुरवठा	२,११८	—	१,५८९	५२९
१.	विहिरींची दुरुस्ती	५,०००	—	२,५००	२,५००
२.	रस्ते–६२ मैल.	६२,०००	—	३१,०००	३१,०००
३.	गांवहाळावर एंजिन बसवून टाकी बांधून पाणीपुरवठा–५ गांवें	७४,१४०	१४,८२०	१८,०००	४१,३२०
४.	गोपुरी संडास व चराचे संडास	६,८२०	२,४०४	१,०००	३,४१६
५.	गटारें	४५,८६४	१८,३००	—	२७,५६४
६.	घरें बांधण्याची योजना	५२,५००	२६,२५०	—	२६,२५०
७.	हौसिंग सोसायटीच्या घरांची योजना	२१,०००	१५,७५०	—	५,२५०
८.	शाळा (स्थानिक विकास कामें)	५,६६१	१,४५२	—	४,२०९
९.	शाळा (खाजगी)	८,०००	—	—	८,०००

याशिवाय अनेक कामें गांवकऱ्यांकरवीं केंद्र चालकांनीं करून घेतलेलीं आहेत.

गिरणा प्रकल्प

जळगांव जिल्ह्यांतील निमदुष्काळी परिस्थिती असलेल्या कांहीं भागांत वरदान ठरणारी गिरणा धरण योजना द्वितीय पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत आली असून या योजनेसाठीं ८ कोटी ६८ लक्ष खर्च होतील व ती पुरीं होतांच जळगांव जिल्ह्यांतील १,४३,७८० एकर जमीनीचें नंदनवन होईल.

या योजनेचा फायदा जरी या जिल्ह्याला होणार असला तरी प्रत्यक्ष धरण मात्र नाशिक जिल्ह्यांत मालेगांव तालुक्यांत पांझण या गांवाजवळ बांधलें जाणार आहे. हें ठिकाण चाळीसगांव व मालेगांवपासून २५ मैलांवरील पांझण गांवापासून पाउण मैल गिरणा व पांझण नद्यांच्या संगमाखालीं आहे. धरणाची लांबी ३३०० फूट राहील व त्यापैकीं मातीचा भाग १९०० फूट व दगडी बांधकाम १४०० फूट असेल. धरणाची उंची नदीच्या पात्रावर १३३ फूट राहील. धरणाच्या पाणलोटाचें क्षेत्र १८२६ चौरस मैल आहे. मालेगांव तालुक्यांतील ६ खेडीं व १३७५६ एकर जमीन धरणाच्या तलावाखालीं बुडेल. केवळ धरणाचा खर्च ५ कोटी ४२ लक्ष रुपये होईल. धरणामध्यें २४ हजार दशलक्ष घनफूट पाणी सांठेल.

धरणानें सांठविलेलें पाणी गिरणा नदींत सोडून तें जामदा बंधारा व दहीगांव बंधारा या बंधाऱ्यांनीं अडविलें जाऊन जामदा बंधाऱ्याच्या डाव्या व उजव्या बाजूंच्या पाटांनीं व दहिगांव बंधाऱ्याच्या खालच्या गिरणा कालव्यांनीं शेतांना पुरविलें जाईल. यासाठीं जामदा बंधाऱ्याची उंची ४ फुटांनीं वाढविण्यांत येणार असून सध्यांचा डाव्या तटाचा २७ मैलाचा पाट ८ मैल अधिक लांब वाढवून त्याची पुनर्रचना करण्यांत येईल. जामदा उजव्या तटाच्या पाटाची यापूर्वीच पुनर्रचना करण्यांत आली आहे. या कामांसाठीं ६८ लक्ष रु. खर्च व्हावयाचे आहेत.

जामदा बंधाऱ्याखालीं ३८ मैलांवर पाचोरे तालुक्यांतील दहिगांव येथें आणखी एक बंधारा बांधण्यांत येणार असून, त्याखाली हणमंतखेडे, भटखेडें, पिंपरी, वाघळूद, धोकलखेडे व वारसद हीं ६ गांवें व १८०० एकर जमीन बुडणार आहे. या बंधाऱ्यापासून खालच्या गिरणा डाव्या तटाचा ३४ मैल लांबीचा पाट काढण्यांत येणार आहे. या पाटाचा उपयोग एरंडोल व अंमळनेर तालुक्यांतील जमिनींना होईल. दहिगांव बंधारा व पाट यांचा एकूण खर्च ६८ लक्ष रुपये अंदाजण्यांत आला आहे.

हें काम नांदगांव, धुळें व जळगांव येथें ३ डिव्हिजनामार्फत चालू असून पांझण धरण नांदगांव डिव्हिजन, जामदा बंधारा व पाट धुळे येथील गिरणा कॅनॉल डिव्हिजन नं. १ व दहिगांव बंधारा व पाट जळगांव येथील गिरणा कॅनॉल डिव्हिजन नं. २ अशी कामाची विभागणी केली आहे.

या प्रकल्पामुळें होणाऱ्या पाणी पुरवठ्याचा तपशील खालील प्रमाणें.

अनु. नं.	कॅनॉलचें नांव	कॅनॉलखालीं भिजूं शकणारें एकूण क्षेत्र (एकर)	पाणी पुरवठ्यालायक क्षेत्र (एकर)
१.	(अ) **जामदा**:–उजव्या बाजूचा पाट	१८,१००	९०५०
	(ब) ,, डाव्या बाजूचा सुधारलेला व वाढविलेला पाट	१,०२,४५७	४६,१०६
	एकूण	१,२०,५५७	५५,१५६
२.	**दहिगांव**:–डाव्या बाजूचा पाट		
	पहिला विभाग	७६,४४८	३८,२२४
	दुसरा विभाग	६७,३००	५०,४००
	एकूण	१,४३,७४८	८८,६२४
	गिरणा प्रकल्पाखालीं भिजणारें एकूण क्षेत्र	२,६४,३०५	१,४३,७८०

जामदा कॅनॉलच्या दोन्ही पाटांखालीं भिजणाऱ्या ५५,१५६ एकरांची तालुकावार विभागणी अशी :––चाळीसगांव तालुका :–२३८३, भडगांव पेटा:–२६,१०१, पारोळें तालुका :–७१२६ व एरंडोल तालुका :–१९,५४६

त्याचप्रमाणें दहिगांव बंधाऱ्याचे पाटाखालीं भिजणाऱ्या ८८,६२४ एकर क्षेत्राची तालुकावार विभागणी अशी :—

तालुका	बारमाही भिजणारें क्षेत्र	हंगामी भिजणारें क्षेत्र	एकूण
एरंडोल तालुका	३५,४३४	३२,९००	६८,३३४
अमळनेर तालुका	२,७९०	१७,५००	२०,२९०
एकूण	३८,२२४	५०,४००	८८,६२४

एकूण गिरणा प्रकल्पाचा लाभ होऊं शकणारी जळगांव जिल्ह्यांतील जमिनीची तालुकावार विभागणी अशी :—

एरंडोल तालुका :—८७,८८० एकर, भडगांव पेटा :—२६,१०१ एकर, अमळनेर तालुका :—२०,२९० एकर, पारोळें तालुका :—७१२६ एकर व चाळीसगांव तालुका २३८३ एकर. एकूण :—१,४३,७८० एकर.

गिरणा प्रकल्पाच्या कामाची गति वाढविण्यासाठीं, या कामासाठीं सध्यां अस्तित्वांत असलेल्या ३ डिव्हिजन्सशिवाय चौथी गिरणा डिस्ट्रिब्युशन डिव्हिजन जळगांव येथें १ नोव्हेंबर १९६० पासून सुरूं झाली असून गिरणा योजनेमुळें १९६२ मध्यें मिळावयाचें पाणी जून १९६१ पर्यंतच जिल्ह्यांतील सुमारें २२ हजार एकरांना पुरविण्याची कोशीस करण्यांत येत आहे.

अप्पर तापी योजना

ही महत्वाची योजना तृतीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यासाठीं शिफारस करण्यांत आली असून या योजनेनुसार मध्य प्रदेशांत तापीवर नवथा येथें एक मोठें धरण बांधलें जाणार आहे व जळगांव जिल्ह्यांत हातनूर येथें एक पिक अप विअर बांधण्याचें योजलें आहे. या कामाची प्राथमिक मोजणी, मापणी, नदीच्या पात्रांत तसेंच आजूबाजूला खडक तपासणें इ. प्राथमिक स्वरूपाची चांचणी चालूं आहे व प्रत्यक्ष कामास दुसऱ्या योजनेच्या अखेरीच प्रारंभ करण्यांत यावयाचा आहे.

या कामासाठीं जळगांव येथें नोव्हेंबर १९५९ मध्यें वॉटर रिसोर्सस डिव्हिजन या नांवाचा पाटबंधारे व वीज खात्याचा एक स्वतंत्र विभाग उघडण्यांत आला असून त्याच्यासाठीं एक एक्झिक्युटिव्ह इंजिनियर व त्यांचे हाताखालीं ६ उप विभाग आहेत. त्यापैकी २ उपविभाग जळगांव येथें, १ चाळीसगांव येथें, १ सावदा व २ नाशिक येथें आहेत. या विभागीय कचेरीकडे गिरणा योजना (दुसरी अवस्था) यासाठींहि मोजणी, मापणी व तांत्रिक पाहणी करण्याचें काम आहे व तेंहि सुरूं झालें आहे. गिरणा योजनच्या दुस-या अवस्थेंत चाळीसगांव तालुक्यांतील कांहीं भागास पाणीपुरवठा होईल.

अप्पर तापी योजनेनुसार तापी खोऱ्यांत मिळूं शकणा-या पाण्याचा उपयोग पूर्णपणें करण्यासाठीं सरकारनें एक मास्टर प्लॅन तयार केला आहे. त्याचे पुढीलप्रमाणें पांच विभाग केले आहेत.

		भिजणारी	जमीन
(१) तापी नदीचा वरचा विभाग			
अ) मध्य प्रदेश			
ब) महाराष्ट्र राज्य	...	१,८८,८००	एकर
(२) पूर्ण विभाग (महाराष्ट्र राज्य)	...	१,३४,६६०	एकर
(३) खानदेश (,, ,,)	...	१,७३,५१०	एकर
(४) निमटंचाई विभाग (,, ,,)	...	८,७०,८४०	एकर
(५) सुरत विभाग (गुजराथ विभाग)	...	१,१४,१५०	एकर
	...	५,६२,०००	एकर
	एकूण	२०,४३,९६०	एकर

या योजनेचें पाहणीचें काम फक्त सध्यां चालूं असून निर्णय नंतर घेण्यांत येणार आहे.

स्थानिक स्वराज्य व इतर संकीर्ण

जिल्हा ग्रामपंचायत मंडळ

खेड्यांतील सहकारी संस्था, शाळा व ग्रामपंचायत या संस्था म्हणजे, लक्ष्मी, सरस्वती व ग्रामदेवता यांचीं मंदिरेंच आहेत. प्रजातंत्रात्मक विकेंद्रीकरणाच्या ध्येयाच्या दिशेनें आपली मार्गक्रमणा चालू असल्यानें खेड्यांतील ग्रामपंचायतींना फार महत्त्व प्राप्त झालें आहे. भारताच्या लोकशाहीचा पाया ग्रामपंचायतींवर आधारलेला आहे. भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळापासून तो थेट गांवोगांवच्या ग्रामपंचायतीपर्यंत सत्तेचें विकेंद्रीकरण होत आहे. सत्तेबरोबरच जबाबदाऱ्या व सेवेचेंहि विकेंद्रीकरण क्रमप्राप्तच आहे. ग्रामपंचायतीचें हें महत्त्व ओळखूनच २ ऑक्टोबर १९५९ रोजीं प्रत्येक जिल्ह्यांत ग्रामपंचायत मंडळाची स्थापना करण्यांत आली. या जिल्ह्याच्या जिल्हा ग्रामपंचायत मंडळाची कचेरी जळगांव येथें असून ग्रामपंचायतींच्या कारभारांत कांहीं दोष आढळल्यास तें दूर करण्यासाठीं मार्गदर्शन व जरूर तर शासनहि हें मंडळ करूं शकतें.

ग्रामपंचायतींचा विस्तार

जळगांव जिल्ह्यांत आतांपर्यंत ६९४ ग्रामपंचायती स्थापन झाल्या असून त्यांच्या कार्यक्षेत्राखालीं १२५२ गांवें आलीं आहेत. जिल्ह्यांत एकूण १४५३ शहरें व खेडीं आहेत. त्यापैकीं १४ गांवांना १३ नगरपालिका आहेत. उरलेल्या १४३९ खेड्यांपैकीं १२५२ खेडीं ग्रामपंचायतींखाली आहेत.

ग्रामपंचायतींना मदत

प्रत्येक ग्रामपंचायतीस प्रतिवर्षी शेतसाऱ्याचे ३/१० (३० टक्के) इतकी रक्कम राज्य सरकार अनुदान म्हणून देतें. मात्र १-६-५९ नंतर स्थापन झालेल्या नवीन पंचायतींना शें. २५ टक्के अनुदान दिलें जातें ही रक्कम दोन हप्त्यांनीं दिली जाते. याशिवाय ग्रामपंचायतींना घरपट्टी, दिवाबत्ती, स्वच्छता, बाजार, यात्रा, मनोरंजन गृहें, चुंगीकर, दुकानें, हॉटेलें व गिरण्या, पीक संरक्षण, लग्नासारखे समारंभ अशा बाबींपासूनहि करांचें उत्पन्न मिळतें.

ग्रामपंचायतींचीं कामें

ग्रामपंचायतींच्या कामांची कक्षा केवळ रस्ते सफाई व दिवाबत्ती एवढ्या पुरतीच आतां मर्यादित नसून गांवचें आरोग्य, दळणवळण, पाणीपुरवठा, प्रकाश, सांस्कृतिक विकास, न्यायदान, शेती व ग्रामोद्योग, गांवच्या सर्व प्रकारच्या सुखसोयीं इ.विविध प्रकारचीं कामें ग्रामपंचायती आतां हातीं घेऊं शकतात. विकासगटामार्फत वा स्थानिक विकासाच्या कार्यक्रमाखालीं गांवांत करावयाचीं कामें ग्रामपंचायतींवरच प्रामुख्यानें सोंपविलीं जातात.

जिल्ह्यांत दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पहिल्या दोन क्रमांकांच्या ग्रामपंचायतींना उत्तेजनादाखल

बक्षिसें

अनुक्रमें रु. २००० व रु. १००० अशीं बक्षिसें दिलीं जातात. विभागीय पातळीवरहि ग्रामपंचायतींची स्पर्धा घेण्यांत येऊन पहिल्या दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना रु. ५००० व २५०० अशीं अनुक्रमें बक्षिसें दिलीं जातात.

जळगांव जिल्ह्यांत पाण्याच्या टाक्या बांधून इंजिनानें पाणी खेंचून त्यांत भरून सार्वजनिक नळाद्वारें तें गांवकऱ्यांना पुरविण्याच्या योजना यावल व रावेर तालुक्यांत अनेक ग्रामपंचायतींनीं सरकारी मदत मिळवून पुऱ्या केल्या आहेत. जळगांव, एरंडोल व भुसावळ तालुक्यांतहि कांहीं ठिकाणीं या योजना पुऱ्या झाल्या आहेत, हें या जिल्ह्याचें एक वैशिष्ठ्य आहे. शिवाय कंपोस्टखत, शेणखत व मैलाखतहि कांहीं ग्राम-पंचायती तयार करून विकतात. त्यामुळें गांवचें आरोग्य तर राखलें जातेंच पण ती एक उत्पन्नाचीहि बाब होते. नगरदेवळें येथील ग्रामपंचायतीची ही खतयोजना फार प्रसिद्ध आहे. भुसावळ तालुक्यांतील जामठी येथील ग्रामपंचायतीनें गांवांत वीजपुरवठा करून राज्यांत अभिनव अशी कामगिरी केली आहे. पाडळसें ग्रामपंचायतीची जंगलवाढीची योजनाहि प्रशंसनीय आहे.

जळगांव जिल्ह्यांतील ग्रामपंचायती (नोव्हेंबर १९६० अखेर)

क्र.	तालुक्याचें नांव	तालुक्यांतील नगरपालिका नसलेलीं गांवें गांवें	ग्रामपंचायतींची संख्या	ग्रामपंचायती–खालीं आलेलीं गांवें
१.	अमळनेर	१५७	७५	१४१
२.	भडगांव	६०	३१	५५
३.	भुसावळ	१०२	५२	९२
४.	चाळीसगांव	१२४	६८	९९
५.	चोपडे	११२	४२	६८
६.	एदलाबाद	७९	३८	७४
७.	एरंडोल	१५१	६१	१२४
८.	जळगांव	८७	५०	७५
९.	जामनेर	१४४	६६	१३२
१०.	पाचोरे	११८	६३	१०४
११.	पारोळें	१०७	४८	१०५
१२.	रावेर	११३	५७	१००
१३.	यावल	८५	४३	८३
	एकूण	१४३९	६९४	१२५२

जळगांव जिल्ह्यांत एकूण १३ नगरपालिका असून त्या पुढील गांवांतून नगर-सुधारणेचें कार्य करीत आहेत. जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, पाचोरे, चोपडे, एरंडोल, धरणगांव, रावेर, सावदें,

नगरपालिका

यावल, फैजपूर व पारोळें. जामनेर हें तालुक्याचें ठिकाण व एदलाबाद व भडगांव हीं महालाचीं ठिकाणें असून त्या ठिकाणीं ग्रामपंचायती आहेत. एरंडोल, रावेर व यावल या तालुक्यांतून तालुका ठिकाणें व शिवाय आणखी प्रत्येकीं एका शहरीं अनुक्रमें धरणगांव, सावदें व फैजपूर येथें नगरपालिका आहेत. या १३ नगरपालिकांपैकीं जळगांव, भुसावळ, अमळनेर

व चाळीसगांव येथील नगरपालिका या बरो म्युनिसिपालिटच्या असून इतर नऊ गांवांच्या नगरपालिका या जिल्हा नगरपालिका कायद्याखालील आहेत.

वरील १३ शहरांपैकीं फक्त जळगांव व भुसावळ येथेंच नळाचे पाण्याची सोय आहे. इतर सर्वत्र विहिरीचेंच पाणी वापरलें जातें. भुसावळ नगरपालिकेनें २८ लक्ष रु. खर्चाची पाणीपुरवठा योजना नुकतीच पुरी केली आहे. पाणी शुद्ध करण्याची अद्यावत् योजनाहि येथें केली आहे. त्याचप्रमाणें धरणगांव नगरपालिकेनेंहि २२ लाख रु. च्या पाणीपुरवठा योजनेचें काम सुरूं केलें असून सार्वजनिक बांधकाम खात्याचे आरोग्य विभागातर्फे बांधकाम चालू आहे. जळगांव शहरासाठीं गिरणा पंपिंग स्टेशन मध्यें १८० अश्वशक्तीच्या ऑईल इंजिनांनीं पाणी उचलून तें पांच लाख गॅलनच्या रिझरव्हॉयरमध्यें सांठवून शहरास पुरविलें जातें. तथापि हा पाणीपुरवठा शहराच्या वाढत्या गरजेस पुरा पडत नसल्यानें तो वाढविण्याची योजना आहे. पाणीपुरवठा योजनांसाठीं ग्रामपंचायती व जिल्हा नगरपालिकांना सरकार निम्मी मदत देतें व बरो नगरपालिकांना $\frac{1}{3}$ मदत दिली जाते. पाचोरे नगरपालिकाहि पाणीपुरवठा योजना हातीं घेण्याचा विचार करीत आहे.

यावल हें एक शहर सोडलें तर इतर सर्व नगरपालिकांच्या शहरीं वीजपुरवठ्याची सोय आहे. सरकारी व खाजगी कंपन्यांनीं हीं वीजकेंद्रें चालविलीं आहेत. फक्त रावेर शहरांत तेथील नगरपालिकेनें स्वतः वीजपुरवठा योजना ३ लाख रु. खर्चून नुकतीच सुरूं केली आहे.

सर्व शहरांतून उघडीं बांधलेलीं गटारें आहेत. जळगांव शहराची ३४ लाखाची ड्रेनेज योजना सार्वजनिक बांधकाम खात्याचे आरोग्य विभागानें तयार केली असून तींत कांहीं सुधारणा करण्यांत येत असून १९६१ मध्यें दोन हप्त्यांनीं या योजनेचें काम सुरूं होईल. भुसावळ, पाचोरे व चाळीसगांव येथील ड्रेनेज योजनाहि तयार केल्या जात आहेत.

नगरपालिकांच्या हद्दींत पक्के खडीचे रस्ते असून प्रमुख रस्ते डांबरी व कांहीं सिमेंटचे करण्यास पुष्कळ नगरपालिकांनीं सुरुवात केली आहे. जळगांवसारख्या नगरपालिकेनें प्रमुख रस्ते रुंद सिमेंटचे केलेले आहेत. रस्ते दुरुस्ती व रस्ते सुधारणा या कार्यक्रमाकडे नगरपालिका लक्ष देत आहेत.

शहर सौंदर्याचे दृष्टीनें जळगांव, भुसावळ, अमळनेर, चोपडे, एरंडोल इ. नगरपालिकांनीं उद्यानें तयार केलीं असून जळगांव नगरपालिकेनें शहरांत प्रमुख ठिकाणीं पुतळेहि उभारले आहेत. मार्केटस् व दुकानें बांधून नागरिकांची सोय करण्याचें व उत्पन्नाचीहि तरतूद करण्याचें काम जळगांव नगरपालिकेनें केलें असून इतर नगरपालिकाहि याचें अनुकरण करीत आहेत. भुसावळ, सावदे या नगरपालिका माध्यमिक शाळाहि चालवीत आहेत. सर्व नगरपालिकांनीं आरोग्याच्या सोयीसाठीं दवाखाने चालविले आहेत. व्यायामशाळा, वाचनालयें, कलात्मक व सांस्कृतिक संघटना, शिक्षणसंस्था, बहिःशाल केन्द्रें इ. अनेक सामाजिक संस्थांना नगरपालिका आर्थिक मदत करीत असतात. यावल नगरपालिकेनें भंग्यांसाठीं घरें बांधण्याचें काम सुरूं केलें असून बर्वे कमिटीच्या शिफारशीप्रमाणें भंग्यांचे कामांत सुधारणा करण्याचें काम इतर नगर पालिका करीत आहेत. जळगांवच्या नगरपालिकेनें खुलें नाट्यगृह बांधून एक चांगला आदर्श इतर नगरपालिकांपुढें ठेवला आहे. खेळांसाठीं एक स्टेडियम जळगांव येथें बांधण्याची योजनाहि विचारांत आहे.

याच पुस्तकांतील प्रेक्षणीय, ऐतिहासिक व महत्त्वाचीं स्थळें या प्रकरणांत सर्व नगरपालिकांच्या शहरांची माहिती असून नगरपालिकांनीं केलेल्या नगरविकासाच्या कामाची कल्पनाहि त्यावरून येईल.

नागरी जीवनांत अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठीं या जिल्ह्यांतील नगरपालिका आपापल्या परीनें प्रयत्न करीत आहेत.

जिल्हा लोकल बोर्ड

जळगांव जिल्ह्याचें लोकलबोर्ड १९२३ च्या लोकलबोर्ड कायद्यानुसार स्थापन झालेलें असून बोर्डावर एकूण ५८ सभासद आहेत. यांत स्त्रियांसाठीं २ जागा, हरिजनांसाठीं ७ जागा, आदिवासींसाठीं ३ जागा, याप्रमाणें एकूण १२ जागा राखीव असून ४६ सर्वसामान्य सभासद आहेत. जिल्हा लोकल बोर्डाचें कार्यालय जळगांव येथेंच असून कार्यालयाची मोठी इमारत बोर्डानें बांधली आहे. बोर्डाचे एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतात. त्याचप्रमाणें दळण-वळण, पाणीपुरवठा, आरोग्य, इ. कामांसाठीं निरनिराळ्या उपसमित्या सभासदांतून नेमलेल्या असतात.

जळगांव जिल्ह्याचे लोकल बोर्डाचें वार्षिक उत्पन्न सुमारें १४-१५ लाखांचें आहे. शें. ५ टक्के शेतसारा, लोकल फंड, इरिगेशन सेस, धंदेकर, इमारत व जागाभाडें, गुरांचें व माणसांचे दवाखान्यांचें उत्पन्न व त्यासाठीं मिळणारी सरकारी ग्रॅन्ट, सिव्हिल वर्क्स कामांसाठीं मिळणारी सरकारी ग्रॅन्ट व शिवाय त्याच कामांसाठीं मिळणारी स्पेशल ग्रॅन्ट, मोटर व्हिईकल ॲक्टखालील ग्रॅन्ट इ. उत्पन्नाच्या बाबी आहेत. एकूण खर्चहि सुमारें १६ लक्ष रुपये असून तो नोकरवर्ग, दवाखाने व आरोग्यव्यवस्था, पाणीपुरवठा व दळणवळण यासाठीं होतो. दळणवळणासाठींच सुमारें ७ लक्ष रु. खर्च होतो.

लोकलबोर्डाचे ताब्यांत १८८ मैल लांबीचे प्रमुख जिल्हामार्ग, ३६२ मैल लांबीचे दुय्यम जिल्हा मार्ग व ७४३ मैल लांबीचे जिल्ह्यांतील गांवरस्ते असे एकूण १२९३ मैलाचे रस्ते आहेत. जिल्ह्यांत खेडोपाडीं पिण्याच्या पाण्याच्या एकूण १२५० विहिरी बोर्डाचे ताब्यांत आहेत. जिल्ह्यांत ७ ठिकाणीं रहदारी बंगले बोर्डानें ठेवले आहेत. प्रत्येक तालुक्याचे व महालाचे गांवीं गुरांचे दवाखाने असून बोदवड येथें एक पशु-वैद्यक उपकेंद्र आहे. ६ गांवीं ॲलोपॅथिक व ३६ गांवीं आयुर्वेदिक दवाखाने असून २३ गांवीं एस्. एम्. पी. सेंटर्स आहत. ॲलोपॅथिक दवाखान्यांवर मेडिकल ऑफिसर सरकारी असतो व इतर नोकरवर्ग व औषध पुरवठा बोर्डाचा असतो. आयुर्वेदिक दवाखान्यावरील नोकरवर्ग बोर्डाचाच असतो. गुरांचे दवाखान्यावरील पशुवैद्य हे सरकारी व इतर नोकरवर्ग बोर्डाचाच असतो. एस्. एम्. पी. सेंटर्सचा ½ खर्च बोर्डाकडून होतो व इतर सरकारी मदतींत होतो. ग्रामीण भागांतील जनतेला प्रसूतिज्ञान देण्यासाठीं १४ दायाहि बोर्डानें नेमलेल्या आहेत. गुरांचे दवाखान्यांत ५० हजार गुरांवर, आयुर्वेदिक दवाखान्यांत ३,५०,००० रोग्यांवर व ॲलोपॅथिक दवाखान्यांत ७०,००० रोग्यांवर दरसाल उपचार केले जातात.

ग्रामीण भागांतील रस्ते व जोडरस्ते यांची निगा राखणें व ते तयार करणें, ग्रामीण भागांत पाणी-पुरवठ्याची व औषधोपचाराची व्यवस्था करणें, सांथीचे प्रसंगीं प्रतिबंधक उपाय योजण्यास मदत करणें हीं कामें बोर्डामार्फत केलीं जातात. शिवाय स्थानिक विकास कामांपैकीं कांहीं कामें जिल्हा लोकलबोर्डाचे देखरेखीखालीं जिल्हा विकास मंडळाच्या शिफारशीनें पूर्ण केलीं जातात.

सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ

जिल्ह्यांतील माजी वा मृत सैनिकांचें पुनर्वसन, त्यांच्या मुलाबाळांचें शिक्षण, आरोग्य व कुटुंबियांचे हितसंबंध याकडे लक्ष देण्यासाठीं जिल्हा सैनिक, नाविक व वैमानिक मंडळ जिल्हाधिकारी महाशयांचें अध्यक्षतेखालीं कार्य करीत असून त्यांची कचेरी जिल्हाधिकारी कचेरीचे आवारांतच आहे. या मंडळाची कचेरी येथें १९४३ मध्यें दुसऱ्या महायुद्धांत सुरू झाली.

या जिल्ह्यांत सुमारें ५७८४ माजी सैनिक आहेत. त्यापैकीं १६९ मिलिटरी पेन्शनर्स असून त्यांत १८ कुटुंब पेन्शनर्स आहेत. जिल्ह्यांतील ५७ माजी सैनिकांना ३५,००० रु. चें बिनव्याजी कर्ज पुनर्वसनासाठीं देण्यांत आलें. १९४७ ते १९५२ या काळांत ११६० माजी सैनिकांना सरकारच्या विविध खात्यांत घेण्यांत आले. त्यानंतर उद्योग विनिमय केंद्राकडे हें काम गेलें असून त्यांचेकडेहि योग्य प्रकरणीं शिफारस केली जाते. विकासगटामध्यें ४ व पीकसंरक्षण सोसायटींत ३२ लोकांना काम देण्यांत आलें आहे. ५६ एकर २ गुंठे जमीन लागवडीसाठीं माजी सैनिकांना देण्यांत आली आहे.

एदलाबाद, यावल व रावेर येथें विश्रामगृहें बांधलेलीं असून त्यापैकीं कांहीं भाग मुक्त सैनिकांसाठीं राखून ठेवलेला आहे. असोदे, नांदेड, थोरगव्हाण, भालोद, आडगांव, पातोंड व जळगांव येथील सैनिकांच्या मुलांचें वसतिगृह अशा ७ ठिकाणीं औषधांच्या पेटया ठेवल्या असून १९५९-६० मध्यें या वैद्यकीय सोयीचा फायदा १३७९ मुक्त सैनिकांनीं घेतला.

सैनिकांच्या मुलांचे वसतिगृहासाठीं जळगांव येथें सुंदर इमारत बांधण्यांत आलेली असून त्यांत २२ मुलें सध्यां शिकत आहेत.

याशिवाय विविध निधींतून विविध प्रकारची मदत मुक्त व माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना केली जाते.

दरवर्षी लोकसहाय्यक सेनेचें एक शिबीर घेण्यांत येतें व त्यांत ५०० तरुणांना एक महिनाभर लष्करी शिक्षण दिलें जातें.

आयुर्विमा कॉर्पोरेशन

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेचें जळगांवला एक ब्रँच ऑफिस असून एकूण २१ फील्ड ऑफिसर्स जळगांव जिल्ह्यांत ३१ जुलै १९६० रोजीं होते. जळगांव जिल्ह्यांत आयुर्विम्याचें काम करणारे एजंटसुहि ४५६ आहेत (३१-७-६० रोजीं). १ सप्टेंबर १९५६ पासून ३१ जुलै १९६० पर्यंत जळगांव शाखेतर्फे एकूण १६०९३ विमा पॉलिसी देण्यांत आल्या. या पॉलिसींची एकूण रक्कम सुमारें ४,१५,२८,०५० रु. आहे. १९५९ सालांत विमा प्रिमियमचे एकूण रु. १२,५९,५४९ जमले. १९६० सालांत जळगांव शाखेचें विम्याचें काम सुमारें २ कोटी रु. पर्यंत झालें आहे.

जिल्हा अल्पबचत सल्लागार समिति

राष्ट्र उभारणीच्या कामीं प्रत्येकाचा हात लागावा आणि राष्ट्र विकासानें अधिक संपन्न जीवन जगतां यावें या दृष्टीनें ग्रामीण पातळीपर्यंत अल्पबचतीचें कार्य नेऊन पोहोंचविण्यासाठीं जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील व्यक्ति, कार्यकर्ते व सरकारी अधिकारी यांच्या जिल्हाधिकाऱ्यांचे अध्यक्षतेखालीं एक अल्पबचत सल्लागार समिती कार्य करीत असते व समितीची कचेरीहि जिल्हाधिकारी कचेरीच्या अल्पबचत शाखेंतच असते.

१९५९-६० सालांत जिल्ह्यांत एकूण १५८ बचतगट झाले होते व त्यांचे १५१५ सभासद होते. त्यांनीं एकूण रु. १४,३७५ ची बचत केली.

जळगांव जिल्ह्याचा अल्पबचतीचा इष्टांक ३० लाखाचा आहे. १९५९-६० मध्यें जिल्ह्यांत १७५ बचतग्रामें झालीं होतीं व या गांवांतील एकूण १९६१२ कुटुंबांनीं रु. ३,२९,५७२ बचत केली. एकटया पारोळे तालुक्यांत ६१ बचतग्रामें झालीं होतीं व या तालुक्याचा इष्टांक अवघा सत्तर हजाराचा असतांना या तालुक्यानें रु. १,९०,९४१-६५ न. पै. बचत करून गतवर्षी जिल्ह्यांत पहिला क्रमांक मिळवून खास ढाल मिळविली.

१९६०-६१ सालाचा ३० लाख रुपयांचा इष्टांक जिल्ह्यानें मुदतीपूर्वी दिनांक २० जानेवारी १९६१ रोजीं पूर्ण करून त्यानंतर वाढविलेला ३९ लाख रुपयांचा इष्टांकहि जिल्ह्यानें २० फेब्रुवारी १९६१ रोजीं पूर्ण केला असून जिल्ह्यांत अल्पबचत योजनेस दिवसेंदिवस भरघोंस यश येत आहे.

जिल्हा प्रसिद्धी कचेरी

ग्रामीण विभागांतील जनतेला राज्य व राष्ट्र उभारणीच्या प्रगतीपर कार्याची चलच्चित्रपटाद्वारें माहिती देऊन विकास कार्यातील त्यांची सुप्तशक्ति जागृत करण्याचें काम प्रसिद्धी विभागातर्फे करण्यांत येतें.त्याचप्रमाणें चालू घडामोडींची माहिती, विविध खात्यांसंबंधींची माहिती व कार्याची प्रगति,हस्तपत्रिका व पोस्टर्स आदींच्या सहाय्यानें ग्रामीण विभागापर्यंत पोंहचविली जाते. या कचेरीस एक मोटार असून त्यांत चित्रपटाचें सर्व साहित्य असतें. संपूर्ण जिल्ह्यांत चित्रपटप्रकाशनानें ग्रामीण जनतेचें मनोरंजन व लोकशिक्षण याद्वारें केलें जात असून ही प्रसिद्धी कचेरी जळगांव येथें बळिराम पेठेंत आहे.

जिल्हा माहिती केंद्र

जिल्ह्यांतील विविध विभागानें केलेल्या कार्याच्या प्रगतीचा वृत्तान्त नकाशे, छात्राचित्रें व मॉडेल्स संकलित करून त्याद्वारें संपूर्ण जिल्ह्याचें सम्यक् दर्शन घडावें हा या केंद्राचा हेतू आहे. केंद्रांत सरकारी माहिती-युक्त प्रकाशनें मोफत वाचनासाठीं ठेवण्यांत येतील. तसेंच प्रमुख दैनिकें, जिल्ह्यांतील साप्ताहिकें व मासिकेंहि ठेवण्यांत येतील. हें केंद्र म्हणजे प्रसिद्धी कचेरीची एक उपशाखा असून तें लवकरच जळगांव येथें सुरू केलें जाणार आहे.

ग्रामीण रेडिओ योजना

ग्रामीण जनतेचा बाहेरच्या जगाशीं व दैनंदिन घडामोडीशीं संबंध जोडण्याचें महत्त्वाचें कार्य या योजनेद्वारा होत असतें. जिल्ह्यांत असे रेडियो सेट्स एकूण १६० गांवीं बसविले आहेत. दैनंदिन घडामोडींच्या वृत्ताबरोबरच शेतीच्या आधुनिक पद्धतीची माहिती, ग्रामीण आरोग्य व अनेक ग्रामीण प्रश्नांची चर्चा करणारे कार्यक्रम सामुदायिक श्रवण केंद्रासाठीं आकाशवाणीच्या विविध केंद्रांतून प्रसारित करण्यांत येत असल्यामुळें जिल्ह्यांत अशा रेडिओंची मागणी सतत वाढत आहे.

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नगरपालिका अथवा या सारख्या जबाबदार संस्थांना रेडिओ सेटस् मिळूं शकतात. सुरुवातीला रेडियो बसविण्याची वर्गणी रु. १७५ व त्याचा वर्षभराचा दुरुस्ती व बॅटरीचा खर्च ६० रु. भरावा लागतो व तदनंतर दरवर्षी ६० रु. वर्गणी भरावी लागते. या जिल्ह्यांतील रेडियो बसविण्यासाठीं व त्यांची कार्यक्षमता पहाण्यासाठीं एका स्वतंत्र टेक्नीशियन्‌ची नेमणूक करण्यांत आली असून त्यांची कचेरी जळगांव येथें आहे. त्यांचेकडे स्वतंत्र जीप दिलेली असून नवीन रेडियो बसविण्याचें अगर बसविलेल्या रेडिओंच्या दुरुस्तीचें काम ते पहात असतात.

जिल्ह्यांतील सिनेमागृहे

जिल्ह्यांत जळगांव भुसावळ, यावल, रावेर, एदलाबाद, भडगांव, जामनेर, पाचोरे, पारोळे, चाळीसगांव, चोपडे, एरंडोल, अमळनेर या तालुक्यांत एकूण २८ कायमचीं चित्रपटगृहें असून भुसावळ,यावल, एदलाबाद, जामनेर व पाचोरे येथें एकूण सात फिरतीं चित्रपट गृहें आहेत.

पोलीस–शांतता व सुव्यवस्थेचें पाईक

खलांचें निग्रहन व सज्जनांचें संरक्षण हें पोलिस खात्याचें ब्रीदवाक्य आहे. दुष्टांना व समाजकंटकांना पोलिसांची दहशत वाटली पाहिजे तर कायद्याचें तंतोतंत पालन करणाऱ्या सद्वर्तनी नागरिकांना पोलिसांचा आधार वाटला पाहिजे. कल्याणकारी राज्यांत पोलिसांचें कार्य दहशत निर्माण करण्याचेंच केवळ नाहीं तर सेवेचें आहे. लोकशाही समाजवादी व कल्याणकारी राजवटींत पोलिस हे जनतेचे मित्र मानले जातात.

जिल्ह्यांत सुमारें १३६० खेड्यांत स्थापन झालेल्या ग्रामरक्षक दलांतील सुमारें ३२,३०० सभासद स्वेच्छेनें व उत्साहानें ग्रामरक्षणाचें कार्य करीत आहेत. पुराचे संकटकाळींहि पोलिसांनीं पूरग्रस्त भागांत रखवाली करून जनतेच्या जिवित वित्ताचें संरक्षण केलें व पूरग्रस्तसहाय्यक निधीसाठीं भुसावळ येथें हॉकीचा सामना खेळून त्या तिकीटविक्रीतून रु. ३७०४ मदत दिली.

पोलिसांसाठीं भुसावळ, धरणगांव व अमळनेर येथें अलीकडेच घरें बांधण्यांत आलीं असून जळगांव येथेंहि औद्योगिक कामगारांसाठीं बांधलेलीं घरें पोलिस खात्यानें घेऊन पोलिस लाइन्सची वाढ केली आहे. पोलिस सब इन्स्पेक्टर्स व पोलिस यांच्यासाठीं आणखीं घरें बांधण्याची योजना आहे. पोलिसांनीं श्रमदानानें भुसावळ येथें सुभाष पोलिस चौकी बांधली व जळगांवला पोलिस हेड क्वार्टर्सला तारांचें कुंपण केलें.

१९६० मध्यें जळगांव येथें शहर पोलिस स्टेशनमध्यें मोबाईल वायरलेस पेट्रोलिंग पथक सुरूं करण्यांत आलें आहे व त्यासाठीं वायरलेसच्या साधनांनीं सुसज्ज अशा दोन जीप्स शहरांत संचार करून गुन्ह्याची खबर मिळतांच त्या ठिकाणीं तात्काळ उपस्थित होतात.

जळगांव येथील पोलिस कल्याण केंद्र हें एक नमुनेदार केंद्र आहे. पोलिसांनीं अनेक कार्यक्रमांद्वारें जमविलेल्या कल्याण निधींतून या कल्याणकेंद्राचें कार्य चालतें. कल्याण केंद्रासाठीं बांधलेली इमारत व तेथील खेळ, वाचन व मनरंजनाच्या सोयी पाहण्यासारख्या आहेत. या कल्याण केंद्रातर्फे पोलिस व त्यांच्या कुटुंबियांना शिक्षण, आरोग्य, करमणूक, वाचन, हस्तव्यवसाय इ. विविध सुखसोयी उपलब्ध करण्यांत आल्या असून पोलिसांना आपलीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं योग्य तें वातावरण निर्माण व्हावें व त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनाचा विकास व्हावा म्हणून कल्याण केंद्रातर्फे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

टास्क फोर्स

जळगांव जिल्ह्यांत यावल व रावेर तालुक्यांत केळ्यांच्या बागांतील इंजिनाचे सुटे भाग चोरण्याचे गुन्हे फार प्रमाणांत घडत असत व त्यामुळें केळ्यांच्या बागांना पाणी देण्याचे कामांत खंड पडून नुकसान होत असे. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठीं २३-२-५९ पासून ३० जून ६० पर्यंत एक टास्क फोर्स या भागांत खास ठेवण्यांत आला होता.

जिल्ह्यांत दारूबंदीसाठींहि एक टास्क-फोर्सचा बिभाग असून त्यासाठीं एक पोलिस सब-इन्स्पेक्टर व कांहीं पोलिस आहेत व दारूबंदीचे गुन्हे शोधण्याचें काम हें खास पोलिसदल करीत आहे.

होमगार्ड्स्

होमगार्ड संघटना जिल्ह्यांत १९४७ पासून सुरूं झाली असून प्रत्येक तालुक्यांत या संघटनेचे ऑफिसर कमान्डिग व पथकें आहेत. जिल्ह्यांत एकूण ३४ ऑफिसर्स व ४८० होमगार्डस् आहेत. जिल्हा कमान्डन्ट श्री पी. के. सोनाळकर यांचे मदतीस ९ स्टाफ ऑफिसर्स आहेत. ज्या ज्या वेळीं पोलिसांना अधिक फोर्सची जरुरी भासेल तेव्हां तेव्हां या संघटनेची मदत घेतां येते. पूर, दुष्काळ, रहदारी नियंत्रण, दारूबंदी, निवडणुका इ. अनेक प्रसंगीं बंदोबस्तासाठीं होमगार्ड संघटना उपयोगी पडलेली आहे.

दारुबंदी प्रचार

जळगांव येथें जिल्हा दारूबंदी व अबकारी इन्स्पेक्टर यांची कचेरी असून जिल्ह्यांत दारूबंदीसाठीं लोकमत वळविण्यासाठीं प्रचाराचे कार्यक्रम ते करीत असतात. जिल्हा विकास मंडळाची एक दारूबंदी उपसमिति असून प्रत्येक विकास गटासाठींहि एकेक दारूबंदी उपसमिति आहे. त्याचप्रमाणें अनेक ग्रामपंचायतींनींहि दारूबंदी उपसमित्या नेमल्या आहेत. या सर्व उपसमित्यांचें कार्य मनपरिवर्तनाच्या मार्गानें व्यसनाधीनांना व्यसनमुक्त

करणें हेंच आहे. दारूबंदी खात्याकडून यासाठीं दरमहा नगरदेवळे येथील राष्ट्रीय कलापथकाचे १५ कार्यक्रम केले जातात व शिवाय प्रसिद्धी खात्यामार्फत होणाऱ्या बोलपटांचे कार्यक्रमांतहि दारूबंदीचा प्रचार केला जातो. दारूबंदी खात्यानें मदत देऊन फैजपूर, यावल, नगरदेवळें, हिरापूर, माळशेवगे, लोहारे व आमडदें येथें सात संस्कार केंद्रें स्थापन केलीं आहेत व तेथें भजनकीर्तन व इतर कार्यक्रम होत असतात.

दारुबंदीच्या उत्कृष्ट कार्याबद्दलची बक्षिसें

जळगांव जिल्ह्यांत दारूबंदीचें उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गांवांना नशाबंदी मंडळातर्फे दरसाल रु. २५० चीं बक्षिसें गेलीं दोन वर्षें देण्यांत येत आहेत. त्याप्रमाणें १९५८-५९ चे कार्याबद्दल पाचोरें तालुक्यांतील कुरंगी या गांवास रु. २५० चें बक्षिस देण्यांत आलें व १९५९-६० चे कार्याबद्दल एरंडोल तालुक्यांतील आडगांव, पाचोरें तालुक्यातील सावनेर व अमळनेर तालुक्यांतील जैतपीर या तीन गांवांना अनुक्रमें रु. १२५, रु. ७५, रु. ५० अशीं बक्षिसें पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकानुसार देण्यांत आलीं.

न्यायदान

जिल्ह्याचें मुख्य जिल्हा न्यायालय जळगांव येथें असून शिवाय जळगांव येथें सिनिअर जज्ज, सिनिअर डिव्हिजन व ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट अशी दोन न्यायालयें आहेत. या शिवाय भुसावळ, चोपडे, एरंडोल, यावल, चाळीसगांव या पांच गांवीं ज्युनिअर डिव्हिजन सिव्हिल जज्जांचीं न्यायालयें आहेत. भुसावळ येथें ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटचीं शिवाय दोन न्यायालयें व स्पेशल ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट पहिला वर्ग, रेल्वे यांचें एक स्वतंत्र न्यायालय आहे. त्याचप्रमाणें अमळनेर, एरंडोल, पाचोरें, व चाळीसगांव येथें ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट पहिला वर्ग यांचीं न्यायालयें आहेत.

ऐतिहासिक, प्रेक्षणीय व महत्त्वाचीं स्थळें

या जिल्ह्याचें मुख्य ठाणें जळगांव येथें रेल्वे स्टेशनवर आपण उतरलांत तर चटकन् आपलें लक्ष अजंठ्यासाठीं येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांच्या धांवपळीकडे वेधेल. अजंठ्याचीं जगप्रसिद्ध लेणीं पाहण्यासाठीं दूरदूरचे प्रवासी जळगांवला येत असतात. जळगांव हें अजंठ्याचें प्रवेशद्वार आहे असें म्हणतां येईल. प्रवाशांना मदत व मार्गदर्शन करण्यासाठीं रेल्वे स्टेशनवर भारत **अजंठ्याचें प्रवेशद्वार** सरकारचें "टुरिस्ट ऑफीस" आहे व जळगांवहून अजंठ्यास जाण्यासाठीं एस्. टी. बसची सोय आहे. जळगांव ते अजंठा लेणीं हें अंतर फक्त ३८ मैल आहे. पण अजंठ्याचीं लेणीं मात्र जळगांव जिल्ह्यांत येत नाहींत. जिल्ह्याच्या सरहद्दीपासून तीं ७ मैल दूर आहेत.

अजंठ्याच्या आकर्षणानें जळगांव जिल्ह्यांत येणारांना या जिल्ह्यांत कांहीं पाहण्यासारखें आहे काय असें साहजिकच वाटेल. अजंठ्या सारखें जगप्रसिद्ध शिल्प या जिल्ह्यांत नाहीं हें खरें आहे. किंबहुना भारतांतील प्रेक्षणीय स्थळांच्या यादींतहि जळगांवचा कोठें नामनिर्देश होईल असेंहि वाटत नाहीं. महाराष्ट्र राज्यांतील ऐतिहासिक, धार्मिक, औद्योगिक वा निसर्गरम्य अशा प्रथम श्रेणीच्या ठिकाणांच्या यादींतहि जळगांवचा अंतर्भाव क्वचित होईल.

तथापि महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि जिल्ह्यांत आपण गेलों तरी तेथें कांहीं तरी पाहण्यासारखें आढळतेंच. कोठें इतिहासाचे पदन्यास उमटलेले असतात तर कोठें साधुसंतांची पवित्र वाणी घुमलेली असते, कोठें उद्योगधंद्याच्या विकासानें वातावरण गजबजून गेलेलें असतें तर कोठें निसर्गानें आपलें मोहक रूप उघडें केलेलें असतें. त्याप्रमाणें या जिल्ह्याचे परिसरांतहि ऐतिहासिक वा प्रेक्षणीय स्थळांची वाण नाहीं. जवळ जवळ सर्वच तालुक्यांत अशीं स्थळें आपल्या दृष्टीस पडतील. त्यांची तालुकावार माहिती अशी :–

अमळनेर तालुका

भुसावळ-सुरत या पश्चिम रेल्वेच्या फांट्यावर बोरी नदीच्या तीरावर अमळनेर हें शहर असून तें धुळ्यापासून २१ मैल पूर्वेस आहे. या शहरांत प्रमुख तीन रस्ते असून त्यावर दुतर्फा दुमजली, तिमजली सुंदर लांकडी इमारती दिसतात. रेल्वे स्टेशन, व्यापारी केंद्र, औद्योगिक केंद्र, कॉलेज, तालुक्याचें ठिकाण, तीर्थक्षेत्र इ. अनेक कारणांनीं अमळनेरचें महत्त्व आहे. अमळनेर **अमळनेर–खानदेशचें पंढरपूर** शहराची लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीनुसार ४४६४६ होती व १९६१ मध्यें ती ४६,९५७ आढळली.

गांवापासून सुमारें १ मैलावर "खार्टेश्वर" हें महादेवाचें मंदिर आहे. त्याचेपासून गांवाकडे थोड्या अंतरावर एक सतीचा खांब आहे. बोरी नदीच्या पलीकडे व नदीवर असलेल्या रेल्वे पुलाजवळ "वरुणेश्वर" हें महादेवाचें मंदिर आहे. त्याचेशेजारींच एक तलाव आहे. याच ठिकाणीं चंद्राला क्षय झाला असतां त्यानें अनुष्ठान मांडलें होतें अशी दंतकथा आहे. त्याचेपासून सुमारें दीड मैलावर एक टेकडी असून ती अंबऋषीची टेकडी म्हणतात. तेथें एक देवालय असून पायथ्यावर एक भुयार आहे. या भुयारांतून पार होतां येतें. टेकडीवरील विशेष म्हणजे तीवरील दगडाखालीं बहुतेक वेळां विंचू सांपडतो. आषाढी एकादशीचें दुसरें दिवशीं तेथें यात्रा भरते त्यावेळीं शहरांतील लोक फार मोठ्या संख्येनें हजर असतात. श्रीमान् प्रतापशेटजींनीं येथें एक भव्य रामाचें मंदिर बांधलें असून त्यावरील कलाकुसर पाहण्यासारखी आहे. त्याभोंवतालचा परिसरहि अत्यंत सुशोभित आहे. तसेंच येथील जैनांचें मंदिरहि पाहण्यासारखें आहे. पण सखाराम महाराजांच्या वाडीमुळेंच या शहरास तीर्थक्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालें आहे. सुमारें १७५ वर्षांपूर्वी सखारामबुवा हे ब्राह्मण साधु येथें होऊन गेले व त्यांच्या स्मरणार्थ नदीच्या पात्रांत एक सुंदर समाधि बांधली आहे. त्यांच्या नंतर झालेल्या दोन महाराजांच्याहि दोन समाध्या आहेत. नदीच्या पात्राचा देखावा पंढरपूरसारखा दिसतो. येथें वैशाख शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत मोठी यात्रा भरते. यात्रेस सुमारें ८०,००० लोक जमतात व व्यापारी व दुकानदारहि लांबून येतात. अमळनेर शहराचें आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे तेथें तत्त्वज्ञान मंदिर ही भारतांतील सुविख्यात अशी संस्था आहे. ती तत्त्वज्ञानविषयक एक त्रैमासिक चालविते. अमळनेरचें दुसरें महत्त्व म्हणजे ह्या शहरांत पू. साने गुरुजी यांचें दीर्घकाल वास्तव्य घडलें व येथील प्रताप हायस्कूलमध्यें ते शिक्षक होते. श्री. माधव त्र्यंबक पटवर्धन किंवा कवि माधव ज्युलियन हेहि या शहरांत बरींच वर्षें शिक्षक होते व त्यांनीं "विरहतरंग" सारखी काव्यसंपदा येथेंच निर्माण केली. अमळनेर येथें मराठी साहित्य संमेलनहि भरलें होतें. औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रांत प्रतापशेटजी, धार्मिक क्षेत्रांत सखाराम महाराज, व राजकीय अन् साहित्यिक क्षेत्रांत पू. साने गुरुजी या त्रिमूर्तींनीं अमळनेरचें महत्त्व वाढविलेलें आहे.

१८१८ मध्यें ब्रिटिशांनीं खानदेश घेतला तेव्हां अमळनेरचा किल्ला माधवराव राजा बहादूर यांच्या ताब्यांत पेशव्यांचे बतीनें नाममात्र होता. तेथें खरी सत्ता अरब शिपायांची होती. किल्ला सोडून जातांना किल्ल्यांतल्या शिपायांना त्यानें किल्ला कोणालाहि–खुद्द पेशव्यांनाहि–शरण जाऊं देऊ नका अशी सक्त ताकीद दिली होती. या हुकुमाचें सैनिकांनीं तंतोतंत पालन केलें व किल्लेदाराचें व पेशव्यांचें जेव्हां पुढें सख्य झालें तेव्हां त्या किल्लेदारालाहि सैनिकांनीं येऊं दिलें नाहीं. नंतर त्याची ओळख पटली व त्याला त्यांनीं आंत घेतलें. परंतु पुढें जेव्हां तो किल्ला ब्रिटिशांच्या स्वाधीन करण्याचें त्यानें ठरविलें तेव्हां त्याच्या फलटणीनें त्याला तसें करूं दिलें नाहीं. त्यांची समजूत काढण्याचे सर्व प्रयत्न फसल्यावर त्यांना बंडखोर म्हणून जाहीर करण्यांत आले व ब्रिटिशांची फौज मालेगांवहून चाल करून आली. तरीहि सैनिकांनीं शरण येण्याचें प्रथम नाकारलें पण नंतर सुटकेचे सर्व मार्ग बंद झालेलें पाहून कांहीं काळानें त्यांनी आपलीं शस्त्रें किल्ल्याबाहेर ठेवलीं व नदीच्या पात्रांतून पुढें जात असतांना त्यांना कैद करण्यांत आलें.

गांधली–श्रावकवाण्यांचें पहिलें वस्तीस्थान

अमळनेर शहराच्या ईशान्येस सहा मैलांवर असलेलें गांधली हें गांव गुजराथ श्रावक वाण्यांनीं खानदेशांत वस्ती केलेलें पहिलें ठिकाण आहे. १८०४ पर्यंत येथें १५० वाण्यांचीं घरें होतीं व गांवहि भरभराटीस आलेलें होतें पण नंतर गडजी भोंसला या पेंढाऱ्यांच्या पुढाऱ्यानें गांव लुटल्यानें लोकांची वाताहत झाली.

भुसावळ तालुका

भुसावळ हें जळगांवच्या खालोखाल मोठें असें जिल्ह्यांतलें शहर आहे. तें तालुक्याचें मुख्य ठिकाण तर आहेच पण शिवाय मध्य रेल्वेच्या इगतपुरी-भुसावळ या विभागाचें मुख्य ठाणें असल्यानें तें रेल्वेचें प्रमुख केंद्र बनलें आहे. हें तापी नदीपासून फक्त एका मैलावर आहे. या शहराची लोकसंख्या १९६१ चे शिरगणतीमध्यें ७३२९२ पर्यंत गेली आहे.

भुसावळ :–खान देशांतील महत्त्वाचें रेल्वे केंद्र

भुसावळ येथें वरो म्युनिसिपालिटी असून ती १८८२-८३ सालांत स्थापन झालेली आहे. नगरपालिकेचीं ४ उद्यानें आहेत व एक अद्यावत भाजीपाल्याचें मार्केट बांधण्याची योजना आहे. नगरपालिकेचा एक आयुर्वेदिक दवाखाना नगरपालिकेच्या कंपाउन्डमध्येंच आहे. एक ॲलोपॅथिक दवाखाना भुसावळ-यावल रस्त्यावर असून तेथें २८ खाटांची सोय व सूतिकागृहाचाहि भाग आहे. या दवाखान्याचें रूपांतर कॉटेज हॉस्पिटलमध्यें करण्याचा नगरपालिकेचा विचार आहे.

चित्रपटसृष्टीच्या दृष्टीनें भुसावळचें महत्त्व म्हणजे येथें अनेक चित्रपट वितरण संस्थांच्या कचेऱ्या आहेत. मुंबई-नागपूर या टापूंत भुसावळ हें मध्यवर्ती पडत असल्यामुळें चित्रपट वितरकांनीं आपल्या कचेऱ्या येथें ठेवल्या आहेत.

या शहरांत ३ ऑईल मिल्स, ६ जिनिंग फॅक्टरीज् आहेत. नवशक्ति आयुर्वेदालय हा कारखानाहि आहे.

बोदवड–जुनें व्यापारी केंद्र

हें भुसावळ तालुक्यांतील फार जुनें व प्रसिद्ध असें व्यापारी केंद्र आहे. येथें कापूस व तेलबियांची मोठी बाजारपेठ आहे.

येथें मार्केट कमिटी, ग्रामपंचायत, बँक, पोस्ट, तार कचेरी, टेलिफोन व सहकारी संस्था असून एक हायस्कूलहि आहे. येथील बोदवड को-ऑप-क्रेडिट सोसायटी ही १ मार्च १९०६ मध्यें स्थापन झाली असून तीच या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची गंगोत्री आहे. भारतांत सहकारी चळवळ ५६ वर्षांपूर्वी सुरूं झाली व जळगांव जिल्ह्यांत तिचा उगम जवळजवळ तितकाच जुना म्हणजे ५४ वर्षांपूर्वींचा आहे. येथें महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय आहे. येथें जिल्हा लोकलबोर्डाचा दवाखाना व सूतिकागृहहि आहे.

वरणगांव–जुनें तालुक्याचें ठिकाण

वरणगांव हें ८१५२ लोकसंख्येचें गांव. हें भुसावळ-नागपूर या रेल्वे मार्गावरील भुसावळपासून ८ मैलांवर पहिलेंच स्टेशन आहे. हें शहर पूर्वी फार महत्त्वाचें होतें. कारण येथें तालुक्याचें मुख्य ठाणें होतें व सब-जज्ज कोर्टहि होतें. येथें नगरपालिकाहि होती. सुरत-धुळें-एदलाबाद-नागपूर हा राष्ट्रीय राजमार्ग वरणगांवहून जातो.

येथील राममंदिर हें फार सुप्रसिद्ध धार्मिक ठिकाण आहे. शहराच्या दक्षिणेस नदीच्या पलीकडील बाजूस असून तें पेशव्यांचे एक मामलेदार श्री. लक्ष्मण कासळी यांनीं बांधलें असें म्हणतात. हें गांव पूर्वी शिंद्यांचे ताब्यांत होतें पण ब्रिटिशांनीं तें १८६१ मध्यें शिंद्यांकडून घेतलें.

चाळीसगांव तालुका

चाळीसगांव
श्री.हरिभाऊ पाटस-करांचें गांव

चाळीसगांव हें शहर १९६१ चे शिरगणतीप्रमाणें ३४,२६७ लोकवस्तीचें असून तें मध्य रेल्वेवरील रेल्वे स्टेशन आहे. येथूनच मध्य रेल्वेचा धुळ्याकडे जाणारा फांटा फुटतो. येथें पूर्वी एक जुना किल्ला होता पण तो आतां नामशेष झाला आहे. जुन्या शहराच्या भिंतीच्या फारच पुसट खुणा हल्लीं दिसतात. रेल्वे लाइनमुळें हें शहर आतां चांगलेंच वाढलें आहे.

राजदेहारे–बळकट किल्ला

राजदेहारे किल्ला चाळीसगांवपासून १४ मैलांवर नैऋत्येस असून तो निसर्गतःच बळकट आहे. हा एक मूळचाच उंच डोंगराचा भाग असून त्यावर फारसें कांहीं बांधकाम नाहीं. या किल्ल्यावर जाण्याचा मार्ग एक छोटी पायवाट दगडांत कापून तयार केला असून तिच्या संरक्षणार्थ मधून मधून दरवाजे आहेत. हे दरवाजे आज ढांसळलेल्या स्थितींत आहेत. राजदेहाऱ्याचें प्रवेशस्थान दौलताबाद सारखेंच दिसतें. फक्त तें वरून उघडें आहे. १८१८ मध्यें मराठे व इंग्रजांच्या लढाईंत दरवाज्यांवर व मार्गालगतच्या कडांच्या बाजूला दगडांच्या राशी रचून ठेवण्यांत आल्या होत्या व त्यामुळेंच पुष्कळसा प्रतिकार करतां आला. या किल्ल्यांत भरपूर पाण्याची सोय आहे. जरी हा किल्ला बळकट होता व वर्षभराची शिधासामुग्री होती तरी ब्रिटिशांनीं तो जिंकला. किल्ल्यांतल्या संरक्षक सैन्यानें शरण येण्याचें नाकारतांच तोफा-बंदुकांचा मारा सुरूं करण्यांत आला; तेव्हां त्या माऱ्यापुढें नमून कांहीं अटींवर शरण येण्याची त्यांनीं तयारी दाखविली परंतु त्या अटी अमान्य करून फक्त खाजगी चीजवस्तु व जीव घेऊन मन मानेल तिकडे पळून जाण्याची मुभा देण्याचें आक्रमकांनीं कबूल केलें व विचारासाठीं २ तासांचा अवधि दिला. आंतले सैनिक अंतर्भागांत पोहोंचण्यापूर्वीच सर्व किल्ला अग्निज्वाळांनीं भडकला व सारखे स्फोट झाले. त्यामुळें आंतल्या सैनिकांची भीतीनें गाळण उडाली व एकच गोंधळ माजला. ते बाहेर पडण्याची धडपड करूं लागले पण वाटेंतल्या अडथळ्यांनीं व तीव्र उष्णतेनें तेंहि शक्य झालें नाहीं. आंतल्या सैनिकांना पकडण्यासाठीं बाहेरून आलेली तुकडी देखील वाटेवरील प्रचंड उष्णतेमुळें आंत प्रवेश करूं शकली नाहीं. रात्रींच्या अंधारांत आंतले बहुतेक जण पळाले. ४० लोकांना पकडून कैद केले व सात जण जिवंत किल्ल्यामध्यें सांपडले. आगीचें कारण सांपडलें नाहीं.

वाघळी–जुनें मानभाव मंदिर

चाळीसगांव तालुक्यांत चाळीसगांवपासून पूर्वेस ९ मैलांवर वाघळी गांव आहे. तेथील लोकसंख्या १९५१ च्या जनगणनेप्रमाणें ४७४३ होती. येथें तीन जुनीं मंदिरें आहेत. एक देऊळ मधाई देवीचें, त्याच्या बाजूला दुसरें एक छोटें देऊळ व तिसरें मानभावांचें देऊळ आहे. मधाईचें जुनें मंदिर नदीकांठी हेमाडपंती पद्धतीचें आहे. तें १७ फूट उंच, ५५ फूट लांब व २४ फूट रुंद आहे. त्याच्या सभोंवताल भिंत आहे. दरवाज्यावर २४ खांबावर थोडें शिल्प-काम आहे. आंत भवानीची प्रतिकृति आहे. उजव्या बाजूचे ९॥ फूट उंच व ११ फूटाचा चौरस असलेल्या मंदिरांतहि एक मूर्ति आहे. मानभाव मंदिर हेमाडपंती पद्धतीचें असून तें १३ फूट उंच, ३३ फूट लांब व २२ फूट रुंद आहे. त्याचे दरवाज्यावर व खांबांवर कोरीवकाम आहे. त्यांत पूर्वीं शिवलिंग असावें. आतांहि तेथें नंदी आहे. तेथील मोठमोठ्या दगडांवर संस्कृत अक्षरें आहेत ती वाचतां येत नाहींत. देवळाजवळ विहीर आहे. हें देऊळ निःसंशय फार जुनें आहे व गेल्या १० पिढ्या मानभावांच्या ताब्यांत आहे. येथें एक माध्यमिक विद्यालय आहे.

चाळीसगांवपासून नैऋत्येस सुमारें १० मैलांवर जळगांव जिल्ह्यांतील कदाचित् सर्वांत प्राचीन असें वसतिस्थान पाटण हें आहे. धुळें-चाळीसगांव या रेल्वेमार्गावरील जामदें स्टेशनपासून

पाटण
प्राचीन वसतिस्थान

हें ६ मैल आहे. चाळीसगांवपासून पाटणपर्यंत जाणारा मोटार रस्ताहि आहे. हें ऐतिहासिक स्थान आहे व कै. वि. का. राजवाडे यांनीं येथील शिलालेखाविषयीं लिहिलेल्या एका लेखावरून इतिहास व भाषा संशोधकांना या स्थानाचें महत्व वाटतें. शालिवाहनाच्या अकराव्या व बाराव्या शतकांत निकुंभ नामक राजाची ही राजधानी होती असें कै. राजवाडे यांनीं त्या लेखांत म्हटलें आहे.

या पुरातन नगरीचे अवशेषांपैकीं एक मुख्य अवशेष म्हणजे एका दरीच्या मागील महादेवाचें देऊळ हें होय. याचा आज फक्त सभामंडपच दिसतो. हा सभामंडप हेमाडपंती पद्धतीचा असून त्यांत नंदी व शिवलिंग, गणपती, लक्ष्मीनारायण व पार्वती यांच्या मूर्ति साधारण बऱ्या स्थितींत आहेत. ह्या देवा-लयांत दगडी हत्तीवर आधारलेले स्तंभ आढळतात व हें पाहून वेरूळच्या कैलास लेण्याची आठवण होते. ही सर्व इमारत ३६ फूट रुंद, ७५ फूट लांब व १८ फूट उंच आहे. दरवाजे व खांब यांवरील शिल्प पाहण्या-सारखें आहे. सभामंडपांतील एका दगडावर संस्कृत-बालबोध मिश्रित एक शिलालेख आहे. त्यावरील १०९५ शक (११७३ इ. स.) एवढें वाचतां आलें आहे. कै. राजवाडे यांच्या मतें ११२८ मध्यें पाटणला हेमाडीदेव नांवाचा राजा राज्य करीत होता, त्यानें मठाच्या योगक्षेमाकरितां जें उत्पन्न दिलें, त्याचा निर्देश प्रस्तुत शिलालेखांत आहे. हा शिलालेख २॥ फूट रुंद व १॥ फूट उंच असून त्यांत २६ ओळी आहेत. शेवटच्या ओळींतील फक्त १२ च अक्षरें असून कांहीं लिहावयाचें राहिलें आहे. राजवाड्यांच्या मतें या २६ ओळींतील २१ ओळी व २२ व्या ओळींतील पहिलीं ५ अक्षरें संस्कृत व पुढील मजकूर मराठींत आहे. प्रसिद्ध ज्योतिषि भास्कराचार्य याचा नातू चांगदेव यानें आपल्या आजाचे ग्रंथांच्या अध्ययनासाठीं एक मठ येथें बांधला असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

गांवांतील दुसरें देवालय ३९ फूट लांब, १८ फूट रुंद व १२ फूट उंच आहे. तें साध्या हेमाडपंती पद्धतीचें आहे. त्यावर कोठेंहि कांहींहि लेख नाहीं. बाहेरच्या दरवाज्यावर एका छोट्या ध्यानमग्न नग्न मूर्तिशिवाय तेथें कसली मूर्ति नाहीं.

गांवांतील तिसरें मंदिर अगदीं छोटें व उध्वस्त स्थितींत आहे. तें ३१ फूट लांब, २७ फूट रुंद व १०॥ फूट उंच असावें. दरवाज्यावरील मूर्तिशिवाय देऊळ अगदीं साधें आहे. त्यांतहि कसलाहि लेख नाहीं.

गांवापासून अर्ध्या मैलावर टेकडीच्या बाजूला ओहोळाच्या पूर्व कांठावर एक देवीचें देऊळ आहे. या देवळापासून ओढ्याकडे येणाऱ्या २५ पायऱ्या असून त्याच्या दोन्ही बाजूंस दोन दीपमाळा आहेत. दोन मोठ्या खोल्यांत शिवलिंग आणि उरलेल्या खोल्यांत देवी व नंदी आहे. तिसऱ्या खोलींतील देवीची पूजा चालू आहे. चौथ्या खोलींत विष्णूची मूर्ति आहे. सभामंडपांत शेषशायी, देवी व लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमा आहेत. देवळाची रचना हेमाडपंती आहे. देवळाच्या बाहेरील कोपऱ्यांत एका दगडावर संस्कृत अक्षरें कोरलेलीं असून सभामंडपांतील समाधी कान्हेरा स्वामी यांची असून त्यांनीं उपासना करून देवीला येथें आणलें असें म्हणतात. येथें दरसाल छोटी यात्रा भरते.

आग्नेयेस अर्ध्या मैलावर टेकडीवर शृंगार चौरी नांवाचें एक लेणें असून तें काळ्या दगडांत कोरलेलें आहे. तें ८॥ फूट उंच ७॥ फूट रुंद व २५॥ फूट पुढच्या बाजूला लांब असून त्यांत शिल्पकलेनें सजविलेले ५ खांब आहेत. लेण्याचे बाहेर खडकांत एक पाण्याचें कुंड आहे.

शृंगार चौरीजवळ सीता न्हाणी नांवाचें दुसरें लेणें आहे. त्याचे दोन भाग आहेत. बाहेरचा भाग २१ फुट लांब, ७।। फुट रुंद व ८ फूट उंच आहे. तर आंतला २०×१५×८ फूट आहे. प्रत्येक भागावरील छप्पर दोन साध्या खांबावर आधारलेले आहे.

नागार्जुन नांवाचें तिसरें लेणें सीता न्हाणी व देवीचें देऊळ या मार्गावर असून त्यांत २४×१३।। फूटाचा आंतला भाग व २१×६ फूटाची पडवी आहे. पडवीला २ खांब असून आंत दोन खांब आहेत व चारहि खांबांवर शिल्पकाम आहे. आंत ३ बसलेल्या मूर्ति असून मधली मूर्ति ध्यानस्थ आहे. त्यांच्या उजव्या बाजूला एक खोली, पडवीच्या उजव्या टोंकास दुसरी खोली व डाव्या बाजूस पाण्याचें कुंड आहे. या लेण्यावर कोठेंहि कांहीं लिखाण खोदलेलें नाहीं.

चाळीसगांव तालुक्यांत चाळीसगांवपासून ११ मैलांवर चाळीसगांव-मालेगांव रस्त्यापासून दोन मैल आंत असलेलें उंबरखेडें हें सुमारें ५०० घरांचें व २९७७ लोकसंख्येचें गांव चाळीसगांव तालुक्यांतच नव्हे तर सर्व जिल्ह्यांत एक आदर्श गांव गणलें जातें. या गांवी श्री. रामराव दगडू पाटील हे विधायक कार्य करणारे व गांवच्या सुधारणेचा ध्यास घेतलेले एक आदर्श कार्यकर्ते असल्यामुळें हें गांव विकासकार्यांत अग्रेसर ठरलें आहे.

उंबरखेडे एक आदर्श खेडें

१९४२ सालीं येथें ग्रामपंचायत स्थापन झाली व आतांपर्यंत निवडणूक न होतां येथें ग्रामपंचायत एकदिलानें काम करीत आहे. गांव पूर्वीपासूनच चौकाचौकांनीं वसलेलें असून चांगल्या रस्त्यांमुळें, नळाच्या पाण्यामुळें व २०० फूट पक्कीं व ६००० फूट कच्चीं गटारें व स्त्रियांसाठीं चराचे संडास केल्यामुळें गांवाचें रूप पालटलें आहे. रस्ते, गटारें, संडास, पाणी-पुरवठा, दिवाबत्ती, एस्. टी. ची. नियमित ये-जा, या सुधारणांमुळें उंबरखेडें हें गांव आकर्षक झालें आहे. पंचायत व शेतकरी कंपोस्ट खताची योजना दक्षतेनें अंमलांत आणतात.

१९४९ सालीं सबंध मुंबई राज्यांत "आदर्श खेडें" म्हणून उंबरखेड्याची निवड झाली व गांवाला फिरती ढाल मिळाली. धान्योत्पादन वाढ मोहिमेंत १९५२ सालीं रु. १००० चें बक्षिस मिळालें. अस्पृश्यता निवारणाचें कार्य केल्याबद्दलहि रु. १००० चें बक्षिस या गांवाला मिळालें व वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन या बाबतींत केलेल्या कार्याबद्दल रु. २००, पुन्हां रु. २०० व रु. ५०० अशीं तीन वेळां या गांवानें बक्षिसें पटकाविलीं.

ग्रामपंचायतीची रु. ५००० ची इमारत ग्रामस्थांनीं स्वखर्चानें बांधून दिलेली आहे. श्री शिवाजी विविध कार्यकारी सोसायटी गांवच्या आर्थिक विकासाला हातभार लावत आहे. शेतकऱ्यांना कर्ज,बी-बीयाणें, खतें, अवजारें, किराणा, औषधें, कापड इ. वस्तू पुरविण्याचें व शेतकऱ्यांचा कच्चा माल एकत्र करण्याचें कार्य ही संस्था करते. धान्य पतपेढीहि ही सोसायटी चालविते .सोसायटीनें एस्. टी. सुरू होण्यापूर्वी उंबरखेड्यालगत मोटर सर्व्हिसेस चालविल्या होत्या.

शेती बागायत करण्यासाठीं लिफ्ट इरिगेशन सोसायटी असून तिच्या सहाय्यानें १५० एकर बागायत केलीं जाते. ग्रामोद्योगाचे क्षेत्रांतहि सहकारी योजनेद्वारा येथें तेलघाणी, साबण, हातकागद उत्पादन इ. कामें चालूं आहेत. शिवाय गांवांत एक सेवा सहकारी सोसायटीहि आहे.

प्राथमिक शाळेसाठीं १० खोल्यांची नवीन इमारत झाली व सध्यां ५३४ विद्यार्थी व १३ शिक्षक या शाळेंत आहेत. सर्वोदय शिक्षण प्रसारक समाज ही संस्था गांवांत स्थापन होऊन १ एप्रिल १९५१ पासून

एक वसतिगृह व ४-४-१९५२ पासून माध्यमिक विद्यालय या संस्थेनें सुरू केलें. वसतिगृहांत १४० विद्यार्थी व माध्यमिक विद्यालयांत ११ वी पर्यंतचे ३४० विद्यार्थी आहेत. जून १९६० पासून विद्यालयांत शेतकी विभाग सुरू झाला व त्यासाठीं सरकारकडून रु. ३२,००० ग्रॅन्ट मिळाली आहे. त्यांतून २७ हजाराची इमारत पुरी झाली असून शैक्षणिक साहित्य रु. १०,००० व जनावरांसाठीं रु. ३००० याप्रमाणें एकूण ४०,००० रु. खर्चाची ही योजना आहे व त्यासाठीं संस्था रु. ८,००० खर्च करीत आहे. विद्यालयासाठीं सरकारकडून रु. १५,००० कर्ज मिळवून २६ हजाराची इमारत लोकांकडून मदत व देणग्या मिळवून संस्थेनें बांधली असून नुकतेंच या इमारतीचे उद्‌घाटन शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांचें हस्तें २६ डिसेंबर १९६० रोजीं झालें. या शाळेंतील विद्यार्थी चि. भगवान दगा महाजन हा शालान्त परीक्षा मंडळाच्या १९६० च्या मार्च महिन्यांत झालेल्या परीक्षेंत जनरल सायन्स या विषयांत सर्वप्रथम आला व रु. १२५ चें पारितोषक त्यास मिळालें.

याशिवाय सर्वोदय युवक मंडळ व महिला मंडळ या दोन संस्था युवकांचें व महिलांचें कार्य संघटीतपणें गांवांत करीत आहेत. सर्वोदय युवक मंडळानें पुढाकार घेऊन गेल्या १० डिसेंबर १९६० रोजीं उंबरखेडें येथें पुरुषांवरील संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया शिबीर भरवून ७५ पुरुषांवर शस्त्रक्रिया करण्यास मदत केली.

उंबरखेडें येथें केव्हांहि गेलें तरी कांहींतरी नवीन विकासकार्य, नवीन बांधकाम चालू असलेलें दिसतें. आजच्या स्वातंत्र्ययुगांत स्वप्रयत्नानें स्वतःची उन्नति साधणारें हें गांव खरोखरीच आदर्श आहे.

चोपडें हें शहर चोपडें तालुक्याचें मुख्य ठिकाण असून येथील लोकसंख्या १९६१ चे शिरगणतीप्रमाणें २६४४९ आहे. धरणगांव रेल्वे-स्टेशनपासून तें १९ मैल उत्तरेकडे आहे. तें धुळयाचे ईशान्येस ५१ मैल येतें.

चोपडें–कापसाची व्यापारपेठ

चोपडा ही एक जिल्ह्यांतील चांगली व्यापारपेठ आहे. कपाशीचा फारच मोठा व्यापार येथें चालतो. येथें ऑईल मिलहि आहे. शिवाय ५ जिनिंग व ४ प्रेसिंग फॅक्टरीज् आहेत. लाकडाच्या वखारी व ५ लांकूड कापण्याच्या गिरण्या येथें आहेत. ३ प्रिंटिंग प्रेस, पॉवर-हाऊस, पॉवर लुम्स व ६४८ दुकानें आहेत.

ज्ञानप्रसारक मंडळ ही एक सांस्कृतिक संस्था असून तिच्यामार्फत बहिःशाल केंद्र चालविण्यांत येतें. येथें ॲग्रिकल्चरल प्रोडयुस मार्केट कमिटी असून हंगामांत येथें शेतमाल फार मोठ्या प्रमाणांत येतो. येथें शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघहि आहे. स्थानिक बाजार दर रविवारीं भरतो. हरेश्वर नांवाचें जुनें शिवालय अर्ध्या मैलावर आहे. तेथें श्रावणांत दर सोमवारीं यात्रा भरते. नवरात्रांत बालाजीचीं वहनें व मिरवणुका निघतात व एकादशीस रथ निघतो. रथाची यात्रा एक दिवस मोठी भरते. रत्नावती नदीमध्यें श्रीकृष्ण महाराजांची जुनी समाधि आहे.

चोपडयांतला पडीक किल्ला या शहराच्या हिंदु राजवटींतील प्रारंभीच्या काळांतल्या महत्त्वाची साक्ष देत आहे. १६०० मध्यें हा किल्ला मोठा गजबजलेला होता व येथें फार मोठी वस्ती होती. त्यांत रामेश्वराचें देवालयहि होतें व त्यासाठीं फार दुरून हिंदु येत असत. शिवाजीनें हें शहर लुटलें तेव्हांहि मोठी व्यापारपेठ म्हणून याची ख्याति होती. त्यावेळीं मुसलमान मुस्तफाबाद चोपडें असें या शहरास म्हणत. रामेश्वराच्या प्रसिद्ध देवालयाचा उल्लेख १७५० मध्येंहि सांपडतो. १८२० मध्यें शिंद्यांनीं जेव्हां या शहराचा ताबा सोडला तेव्हां हें शहर भरपूर जंगल असलेल्या या उपविभागाचें मुख्य ठाणें होतें. १८३७ मध्यें पुन्हां शिंद्यांना हें मिळालें व १८४४ मध्यें तें परत ब्रिटिशांनीं घेतलें.

जुन्या घरांचे अवशेष या शहराच्या प्राचीन वैभवाची साक्ष देतात. नवसारीगंज मधील सुंदर कोरीव कामानें सुशोभित केलेला एक दिवाणखाना हा असाच नमुना आहे. किल्ला शहराच्या मध्यभागीं मुख्य रस्त्यालगतच आहे.

किल्ल्याबाहेर कित्येक मशिदी आहेत. त्यांतली मुख्य म्हणजे जुम्मा मशिद. ती मिरान मुहम्मद खान यानें १५२० ते १५३५ मध्यें बांधली. तो फरुकी राजांतला ८ वा होता. दादा मिया या स्थानिक मुसलमान साधुनें बांधलेली म्हणून सांगण्यांत येत असलेली काळी मशिद ४२ ×४० फूट आकाराची आहे. सिलानीसाहेब या धार्मिक भक्तानें बांधलेली म्हणून समजण्यांत येत असलेली तिसरी मशिद ४० ×३० फूट आकाराची आहे. हा भक्त २८० वर्षांपूर्वी होऊन गेला. चौथी ३७ फूट चौरस असलेली शेखपुरा मशिद मिरान शेख महम्मद बलाजा अवलिया या सत्पुरुषानें बांधली म्हणतात. त्याचप्रमाणें ६५ फूट लांब व ४५ फूट रुंदीची सात कोठाडिया विहिर जाव्हा राणा दुलीने बांधली व दुसरी सात माडाच्या बागेंतील विहिर जान अलीखान यानें बांधली असें म्हणतात.

चोपडें तालुक्यांतील लासूर हें एक असेंच जुनें इतिहासप्रसिद्ध ठिकाण आहे. लासूरची लोकसंख्या १९५१ चे शिरगणतीप्रमाणें ३,७५६ होती व तें चोपडयापासून वायव्येस ८ मैल आहे.

लासूर–ऐतिहासिक किल्ला

हें शहर पूर्वी फार महत्वाचें होतें व येथील ठोके घराणे फार प्रसिद्ध होतें. येथें पूर्वी दहशत बसविणारा किल्ला होता. त्याचे अवशेष आतां फक्त दिसतात. ठोक्यांच्या वाडयापुढें मोठें तळें आहे. जुन्या गांवालगत वाडयाच्या भिंतीबाहेर पायऱ्यांची चांगली विहिर आहे. त्या विहिरीजवळ एका मशिदीचे अवशेष आहेत. सध्यां या गांवांत मातीच्या झोपडया व कशींतरी बांधलेली घरें दिसतात. ब्रिटीशांनीं हा किल्ला पाडला व ठोक्यांचा वाडा कांहीं वर्षांपूर्वी जाळला.

लासूरच्या उत्तरेस डोंगरांत ४५ फूट लांब व ३८ फूट रुंद असें नटेश्वराचें देवालय आहे. या देवालयांतील आंतल्या एका भिंतीवर बालबोध भाषेंतील दिसणारें असें कांहीं लिखाण आहे.

लासूरप्रमाणेंच चोपडयाच्या वायव्येस ७ मैलांवर असलेल्या चौगांव येथेंहि एक पडीक किल्ला गांवापासून दीड मैल उत्तरेस आहे. एखाद्या गवळी राज्याचा तो अवशेष असावा. उंचवटयाच्या जमिनीवर

चौगांव गवळी राज्याचा अवशेष

५०० फूट चौरस असा हा किल्ला दोन लक्ष रु. खर्चून बांधला म्हणतात. किल्ल्याकडे टेकडीवर जातांना पायऱ्या चढून जावें लागतें. त्या टेकडीवर कांहीं पाण्याचीं कुंडें आहेत. त्यांतील कांहींच्या दगडावर कोरीव काम आहे. किल्ल्यांत एका साधूची समाधी व ४ जलाशय आहेत.

जळगांव जिल्ह्यांतील चोपडे या तालुक्याचे ठिकाणापासून १२ मैल पूर्वेस शिरपूर-रावेर या मार्गावर अडावद हें ६७४३ लोकसंख्येचें एक जुनें शहर आहे. पूर्वी हें ठिकाण महत्त्वाचें होतें व तें एका उपविभा-

उष्णोदकाचे झरे

गाचें मुख्य ठाणेंहि होतें. येथें लाल बाग नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका पडीक परिसरांत एक १२ फूट रुंद व ३० फूट लांब अशी दगड चुन्याची बांधलेली पहाण्यासारखी विहीर आहे. अर्थात ही विहीर आज चांगल्या स्थितींत नाहीं. या शहराच्या उत्तरेस १२ × ३० लांबी रुंदीची १६७८ मध्यें बांधलेली एक जुनी मशिदहि आहे. या अडावद पासून वायव्येस तीन मैल गेल्यावर आपणांस उनपदेवचे ऊन पाण्याचे सर्वश्रुत झरे आढळतात.

सातपुड्याच्या पहिल्या रांगेपासून एका मैलावर असलेलें हे उनपदेव या उष्णोदकाच्या झऱ्यामुळें जिल्ह्यांतील प्रमुख प्रेक्षणीय स्थळ झालें आहे. येथें २०० वर्षांपूर्वी बांधलेलें एक मुरलीधराचें दऊळ अद्यापीहि सुस्थितींत आहे. येथें हा ऊन पाण्याचा प्रवाह एका हिंदु मंदिराच्या खालील बाहेरून भरीव दगडी दिसणाऱ्या भागांतून एका गोमुखांतून बाहेर पडतो व तें पाणी २५ ×२५ चौ. फूटाच्या तांबड्या विटांच्या भिंतीनीं चोहोंबाजूंनीं वेढले ल्या जलाशयांत सांठविलें जातें. तेथें या जलाशयाजवळच एक रेस्ट हाऊस व महादेव आणि कृष्ण बलरामाचीं दोन देवालयें आहेत. हें पाणी बाहेरच्या बाजूस १८७६ मध्यें स्थानिक निधींतून बांधलेल्या गुरांच्या कुंडांत सांठविलें आहे. पद्मालयाचे गोविंद महाराज यांनीं उनपदेवच्या भोंवतालच्या भिंतीची दुरुस्ती १९३२-३३ मध्यें केली. १९४३ मध्यें येथें एक धर्मशाळाहि बांधण्यांत आली आहे. येथें पौष महिन्यांत दरसाल यात्रा भरते. या पाण्याचे उष्णतामान १४० अंश असून त्याला कसलींहि चव नाही. त्याला एक प्रकारचा वास येतो. पण तो गंधकाच्या वासापेक्षां वेगळा आहे. या पाण्यानें त्वचा बऱ्या होतात असें म्हणतात. या झऱ्याजवळील जमीन काळी व कडक असून दगडहि काळे आहेत. जलाशयाभोंवती जमिनीवर फरशी केली असल्यानें पाण्याचा उगम शोधणें कठीण आहे. येथें पूर्वी शरभृंग ऋषींचा आश्रम होता व ऋषींना पाण्याची सोय हवी होती म्हणून प्रभु रामचंद्रानें याच जागीं बाण मारून पाण्याचा झरा निर्माण केला अशी एक आख्यायिका सांगतात.

उनपदेव रामबाण निर्मित झरा

उनपदेवपासून ४ मैल पश्चिमेस सातपुड्याच्या पुढें डोकावणाऱ्या दोन छोट्या रांगेंतल्या निमुळत्या पट्टींत सुनपदेव हे ऊन पाण्याचे दुसरे झरे आहेत. अर्थात या दोन्ही उष्णोदकाच्या झऱ्यांचा उगम एकच असावा. सुनपदेवचे झरे एका वा दोन ठिकाणाहून जमिनीच्या तळांतून बाहेर पडलेले आहेत. या झऱ्याचे कांठचा तट मोठ्या व मजबूत विटांनीं बांधला आहे. हें पाणी साधारण गरम आहे. प्रातःकालीं उष्णतामान ८५ अंश फॅ. असतें व दुपारीं ९१ पर्यंत चढतें. औषधीय गुण त्यांत नसावेत असें वाटतें. तथापि त्वचारोग या पाण्यानें बरें होतात असें म्हणतात. वर्डी गांवापासून दोन मैलांवर एका झाडींत सुनपदेवजवळच एका मोठ्या बंधाऱ्याचे अवशेष दिसतात. हा बंधारा भक्कम व भरपूर रुंद असावा व त्या बंधाऱ्यानें अडविलेल्या ऊन पाण्याच्या सांठ्याचाच हा राम तलाव बनला असावा. सुनपदेवलाच राम तलाव असें म्हणतात. वर्डी गांवच्या मालकाकडे कामाला असलेल्या एका मुसलमानानें या तलावाच्या विटा विहिरीच्या बांधकामासाठीं वापरल्यानें या झऱ्याची देवता रुष्ट झाली व तिच्या शापानें गांवकऱ्यांना नारूचा रोग होऊन त्यांना गांव सोडून जावें लागलें. कालांतरानें पुन्हां गांवांत वस्ती झाल्यावर या विटा गांवची चावडी बांधण्यासाठीं वापरल्या गेल्या. परंतु चावडीचें काम पूर्ण होतांच गांवांत ताप व हगवण हे रोग पसरले व पुन्हां गांव ओसाड पडलें व तेव्हां-पासून तेथें वस्ती झाली नाहीं अशी आख्यायिका आहे. हल्लीचें गांव जुन्या वर्डी गांवच्या हद्दीबाहेर आहे. जुन्या वर्डी गांवांत झऱ्याची ती अवमानित देवता अद्यापिहि आपल्या अवशेषांचें क्रोधानें संरक्षण करीत आहे असें लोक बोलतात.

सुनपदेव–राम तलाव

हें चोपड्यापासून उत्तरेस सुमारें ८ मैलांवर असून तेथेंहि एक ऊन पाण्याचा झरा आहे. या झऱ्याचें पाणी पूर्वी एका गोमुखांतून एका छोट्या कुंडांत सांडत होतें. हल्लीं कुंड रिकामें आहे. पाणी जवळच एका खडकाच्या फटींतून ठिपकत आहे. या झऱ्याचें महत्त्व आतां कमी झालें आहे. पाणी रंगहीन असून त्याला मातीची चव येते. उष्णतामान सूर्योदयाचे वेळीं १०० अंश असतें व तें १०३ अंशापर्यंत चढतें. या पाण्यांत कांहीं वैद्यकीय गुणधर्म आढळले नाहींत.

नाझरदेव

एदलाबाद हें पेट्याचें मुख्य ठिकाण आहे. येथील लोकसंख्या १९५१ चे जनगणनेप्रमाणें ४,३६३ होती. हें गांव भुसावळ-नागपूर रेल्वे मार्गावरील वरणगांव रेल्व स्टेशनपासून ११ मैलांवर आहे. इ. स. १६०० मध्यें मुसलमानांनीं हें जिंकलें. हें एक चांगलें शहर होतें. त्यावेळीं येथें एक पाण्यानें पूर्ण भरलेला असा तलाव होता. त्या तलावाच्या कांठीं फार चांगली शेती होती. राजा जेसिरात यानें आपल्या कृतकर्माचें येथेंच प्रायश्चित्त घेतलें व म्हणून या स्थानाला हिंदूंच्या दृष्टींनीं फार महत्त्व होतें.

एदलाबाद–महालाचें मुख्य ठिकाण व जुनें प्रसिद्ध गांव

गांवाच्या जरा खालीं वाहणाऱ्या ओढ्यावर बांधलेला मजबूत दगडी बंधारा पाणी सांठविण्यास उपयोगी पडतो. त्याला लांकडी दरवाजे आहेत. हा बंधारा लोकल फंडांतून बांधलेला आहे.

या गांवास लागूनच कोथळी हें गांव आहे व तेथें मुक्ताबाईचें देऊळ आहे. तेथें माघ वद्य एकादशीस मोठी यात्रा भरते.

एदलाबादच्या वायव्येस सुमारें चार मैलांवर चांगदेव हें २१४७ लोकसंख्येचें गांव तापी व पूर्णा यांच्या संगमावर आहे. येथें चांगदेवाचें हेमाडपंती पद्धतीचें फार चांगलें देऊळ आहे. तें सुस्थितींत असून त्याची उंची १२० फूट आहे. चुना किंवा सिमेंट न वापरतां प्रचंड काळे संगमरवरी दगड एकावर एक बसवून हें मंदिर उभारलें आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस बालबोध लिपींत कांहीं लिखाण आहे. पण तें झिजून गेलेलें असल्यानें वाचतां येत नाहीं. देवळाच्या भिंतीवर पुष्कळ देवादिकांचीं चित्रें आहेत. तसेंच सुमारें १६० वर्षांपूर्वीं अहिल्याबाई होळकरांनीं बांधलेलें ६० फूट लांब व ३० फूट रुंदीचें महादेवाचें दगडी देऊळ संगमावर आहे व तें फार पवित्र मानतात. या मंदिराचा वरचा भाग १८३७ च्या महापुरांत खालीं ढांसळला होता.

चांगदेव–तापी-पूर्णा संगमस्थान

संगमाला तीर्थस्थान मानण्यांत येतें. महादेवाची अशी आख्यायिका आहे कीं एका अंधभक्ताजवळ महादेवाची मूर्ति होती व तिची तो रोज पूजा करीत असे. ही मूर्ति या ठिकाणी हरवली व त्यामुळें फार खिन्न होऊन त्या भक्तानें वाळूची तशीच मूर्ति तयार करून तिची नेहमींप्रमाणें मनोभावें पूजा केली. परंतु ईश्वरी चमत्कारानें ती वाळूची मूर्ति दगडाची झाली व ती येथें आहे. या देवळाजवळच एक झरा आहे व त्याला हिंदु गंगा मानतात असें अबुल फजलनें 'ऐने अकबरीं'त लिहिलें आहे. एक भक्त त्याला मिळालेल्या ईश्वरी सामर्थ्यानें रोज गंगेवर जाऊन स्नान करून येत असे. एके रात्रीं गंगा नदी त्याच्या स्वप्नांत आली व त्याला म्हणाली की एवढे श्रम घेण्याची जरूरी नाहीं; मी येथें तुझ्याच जवळ उत्पन्न होईन. त्याचप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तेथें एक झरा उत्पन्न झाला, अशी एक दंतकथा आहे असें सांगतात.

चांगदेव येथें महाशिवरात्रीला दरसाल मोठी यात्रा भरते व ती जिल्ह्यांतील एक महत्त्वाची यात्रा गणली जाते.

एदलाबादच्या १२ मैल पूर्वेस व भुसावळ-नागपूर या रेल्वे मार्गावरील मलकापूर स्टेशनपासून १३ मैलांवर चार ठाणें येथें महादेवाचें सुस्थितीतील हेमाडपंती देऊळ आहे. तें ३४ फूट लांब व २८ फूट रुंद असून त्याला २४ खांब आहेत व भिंतीवर मोर व पोपट यांच्या आकृती आहेत. हें देवालय सुमारें ७७५ वर्षांपूर्वीचें आहे असें मानलें जातें. येथेंच एक मुसलमानाचा दर्गा आहे व तो ५७५ वर्षांपूर्वीचा आहे असें मानतात. तो सध्यां पडलेला आहे. या गांवांत पूर्वीं ७०० विहिरी होत्या व गांव फार भरभराटीचें होतें असें म्हणतात.

चार ठाणें जुनें-महादेवाचें देवालय

एदलाबाद महालांत एदलाबादपासून ४ मैलांवर व भुसावळ-नागपूर रेल्वे मार्गावरील वरणगांव रेल्वेस्टेशनपासून ८ मैलांवर हरताळे हें १४८८ लोकसंख्येचें गांव आहे. हें गांव येथील तलावासाठीं प्रसिद्ध आहे. हा तलाव फार जुना आहे व १८७० मध्यें पडलेल्या दुष्काळांत त्याचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. या तलावाचें पाणी शेतीसाठीं उपयोगांत आणलें जातें. सुमारें १५० एकर क्षेत्रास या तलावापासून पाणीपुरवठा होतो.

हरताळे-सुंदर तलाव

एरंडोल हें शहर धरणगांव या भुसावळ-सुरत पश्चिम रेल्वेच्या मार्गापासून ८ मैल, मध्य रेल्वे-वरील म्हसावद स्टेशनपासून ८ मैल व जळगांव या जिल्ह्याच्या ठिकाणापासून १९ मैल आहे. हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे व शहरालगतच अंजनी नदी वाहते. या शहराची लोकसंख्या १९६१ मध्यें १६,६०८ होती.

एरंडोल हातमाग व हातकागद केंद्र

हें गांव निःसंशय जुनें असून गांवांतून सहज फेरी मारली तरी त्याचें जुनें स्वरूप लक्षांत येईल. कापूस व धान्य याचा मोठा व्यापार येथें चालतो. त्याचप्रमाणें हातमाग विणकरांचेंहि हें एक केंद्र आहे. येथें मागावर साडया व इतर कापड तयार होतें. येथें हातमाग विणकर संस्था व विक्री केंद्रहि आहे. परंतु एरं-डोलची खरी ख्याति हातकागदासाठीं आहे. एरंडोली कागद व्यापारी वह्यांसाठीं पूर्वी वापरत असत. कागदीपुरा म्हणून गांवचा एक भागच आहे व तेथें कागदकाम करणारे लोक राहतात. सध्यां दोन सहकारी संस्था हातकागद तयार करण्याचें काम करतात. येथें ३ बिडी–कारखाने आहेत.

येथें "विकासनगर" हें ग्रामोद्योगाचें मोठें केंद्र सध्यां झालें असून त्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांतच हातकागदाचा कारखाना, अंबर चरखा केंद्र, तेलघाणी तयार करण्याचें केंद्र, आश्रमशाळा वगैरे कार्यें चालतात. विशेषतः हातकागद कारखाना पाहण्यासारखा आहे. एरंडोल तालुका विधायक कार्यसमिती व एरंडोल तालुका ग्रामोद्योग उत्पादक सहकारी सोसायटी या दोन संस्थांमार्फत येथें कार्य चालतें. अनेक विधायक कार्यकर्ते येथें काम करतात.

या शहरांतील सर्वांत उल्लेखनीय ठिकाण म्हणजे पांडवांचा वाडा. हा गांवच्या मध्यवस्तींत अगदीं पडीक स्थितींत आहे. एक मोठा चौकोन, सभोंवताली भिंत व त्यांत दगडी नक्षीकामाच्या विविध नमुन्यांच्य खिडक्यांची रांग हें याचें स्वरूप आहे. या देवालयाचे एका टोंकाला आज मुसलमानांचें प्रार्थनास्थान आहे. देवळाच्या मधल्या भागाच्या दोन्ही बाजूंस कमानी असून त्याभोंवती सुंदर वैविध्यपूर्ण कलाकुसर आहे. कमानीवर चंद्रकोर व तारका आहे. एका कमानीवर सुंदर पर्शियन शिलालेखाचे अवशेष दिसतात. गाभा-ऱ्याच्या मध्यभागीं डोक्यावर मोठमोठ्या दगडांच्या तुळया व प्रचंड दगडांचें छत असून त्यावर तांबडया पिवळया रंगकामाचे अवशेष दिसतात. चौकोनाची भिंत जाडयाभरडया दगडमातीची असून सर्व इमारत हें विविध पद्धतीचें विचित्र मिश्रण आहे. १६२० च्या सुमारास मूळच्या हिंदूंच्या इमारती मुसलमानांच्या झाल्या त्या वेळचें हें काम असावें.

एरंडोलचें दुसरें वैशिष्ठ्य म्हणजे दोन मुख्य रस्त्यांच्या चौकांतील वेशी.

एरंडोलमध्यें बरींच देवळें आहेत. त्यांपैकीं केशवाचें व दत्ताचें देऊळ जुनें आहे. बाबा खुर्रमचा दर्गाहि जुना आहे. बाबा खुर्रमचा उरुस डिसेंबरांत असतो. त्याच सुमारास पीर नथुमियाचाहि उरुस भरतो व त्यावेळीं कुस्त्या होतात. महाभारतकाळीं पांडवांच्या वनवासकाळांत त्यांचें वास्तव्य घडलेलें एकचक्रा-नगरी म्हणजेच एरंडोल असावें व एरंडोलपासून ५ मैलावर असलेलें पद्मालय हेंच बकासराचें वधस्थान असावें अशी आख्यायिका आहे.

धरणगांव–ईस्ट इंडिया कंपनीची वखार

धरणगांव हें भुसावळ-सुरत या पश्चिम रेल्वेच्या मार्गावरील स्टेशन आहे. तें जळगांवपासून २० मैलांवर आहे. धरणगांव हें महत्त्वाचें व्यापारी केंद्र गणलें जातें. कपाशीचे प्रारंभीचे प्रयोग येथेंच झाले व जिन-प्रेस मशीन्सचाहि प्रारंभी येथेंच उपयोग झाला. कापूस व तेलबियाचा येथें मोठा व्यापार आहे. हातमाग विणकरांचें केंद्र म्हणूनहि हें प्रसिद्ध आहे. येथें पूर्वी हात-कागदहि तयार होत असत.

१६०० सालांत मोंगलांनीं धरणगांव हस्तगत केलें. तेव्हां धरणगांव "जिरोफाफ" व "भिरण" या कापडाबद्दल फार प्रसिद्ध होतें. १७ व्या शतकांत द्रोणगांव, दोरोणगांव अशासारख्या नांवानें या गांवाचा उल्लेख फार महत्त्वाचें व्यापारी ठिकाण म्हणून केलेला आढळतो. गांवांत अगदीं मध्यभागीं एक पिरान दस्त-गीरचा दर्गा आहे तो औरंगजबानें बांधला असें म्हणतात. रेल्वेस्टेशनजवळ भिल्लांचा पुढारी खाजा नाईक याला पुरलेली जागा व समाधि आहे. ब्रिटिशांनीं त्याला फांसावर चढविलें होतें. ३०० वर्षापूर्वीचें पाताळे-श्वराचें देऊळहि येथें आहे.

पद्मालय–बकासुराचें वधस्थान

एरंडोलपासून सुमारें ५ मैलांवर असलेलें पद्मालय हें निसर्गरमणीय ठिकाण आहे. येथें सहली-साठीं नेहमीं लोक येतात. हें क्षेत्र समजलें जातें. येथील गणपतीच्या मोठ्या मंदिरांतील गणपति स्वयंभू आहे म्हणतात. शिवाय महादेव व मारुति यांचींहि देवालयें आहेत. देवालयासमोरच मोठा तलाव आहे व त्यांत कमळाचीं फुलें उमलतात. त्यावरूनच पद्मालय नांव पडलेलें असावें. येथील देवळाची घंटा फार मोठी आहे. दर चतुर्थीस येथें बाहेर-गांवचे लोक येतात. त्यांच्यासाठीं लोकलबोर्डानें धर्मशाळा बांधली आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील म्हसावद स्टेशनवर उतरूनहि येथें येतां येतें. येथूनच जवळच भीमकुंड हें स्थान आहे. तेथें बकासूराचा भीमानें वध केला अशी दंतकथा आहे. येथें कार्तिकी पौर्णिमेस यात्रा भरते.

जळगांव

जळगांव हें शहर जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून तें एक व्यापारी व औद्योगिक केंद्र आहे. गांवांत 'खानदेश स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल' ही कापड गिरणी, एक सॉलव्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लँट, तीन ऑईल मिल्स, ६ जीन, ३ प्रेस, विद्युत् निर्मिती केंद्र तसेंच लोखंडी सामानाचे, भांड्यांचे आदि कारखाने आहेत. तसेंच वाचनालयें, व्यायाम-शाळा, संगीत विद्यालयें यांचीहि भरपूर सोय आहे.

जळगांवांत दैनिक वृत्तपत्र नसलें तरी बातमीदार, राष्ट्रसेवक, जनसेवक, जन-शक्ति, वार्ताविहार, जागृति, खानदेश समाचार, लोकमत, प्रबोधचंद्रिका, हीं साप्ताहिकें आहेत.

शैक्षणिक विकासाची सोयहि शहरांत पुरेशी आहे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण देणाऱ्या शिक्षणाप्रमाणेंच तांत्रिक शिक्षण, सहकारी शिक्षण, ग्रामसेवकाचें शिक्षण आदि शिक्षण देणाऱ्या शिक्षण-संस्था तसेंच ट्रेनिंग कॉलेजिस् यांचीहि तरतूद आहे.

भवानी देवीचा नवरात्रोत्सव, कार्तिकी एकादशीचा रथोत्सव, आप्पा महाराजांचा उत्सव, लाल-खामियांचा उरुस, मीरबाबाचा उत्सव, खंडेरावाची यात्रा, लक्ष्मी देवीची यात्रा या इथल्या प्रमुख यात्रा व उत्सव आहेत.

नशिराबाद

जळगांव शहरापासून भुसावळ रस्त्यावर ६ मैलांवर नशिराबाद हें १४,७०९ वस्तीचें शहर आहे. हें भादली स्टेशनपासून दोन मैलांवर आहे. हें ठिकाण पूर्वी फार प्रसिद्ध होतें. हेंच पूर्वीं तालुक्याचें ठिकाण होतें. येथें पूर्वी एक जुना किल्ला होता. येथील तालुका कचेरी उठल्यापासून हा किल्ला मोडकळीस आला. येथें अनेक सुंदर मशिदी आहेत. या गांवाला पूर्वी सोळ-निंभोरे म्हणत कारण हें १६ गांवाचें मुख्य ठाणें होतें. सातमाळ्यांतील भिल्लांनीं हे अनेक

वळां लुटलें. १८०१ मध्यें झुवा या लुटारूनें व १८०३ च्या दुष्काळापूर्वी एका पेशव्यांच्या अधिकाऱ्यानें येथें लुटालूट केली. त्यानंतर एका पुरंदऱ्यानें हें शहर देणगीदाखल त्यांना मिळाल्यानंतर पुन्हां बांधलें.

कांचेच्या बांगडयांसाठीं हें ठिकाण पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. हें एक हातमागाचेंहि केंद्र आहे. तेल-घाणेहि येथें बरेच चालतात. येथें ग्रामपंचायत, पीक संरक्षण सोसायटी, हातमाग विणकऱ्यांच्या सोसायटचा वगैरे संस्थाहि आहेत. येथें हायस्कूल असून हायस्कूलचे आवारांत मोठें पटांगण आहे. येथें वीजेची सोय आहे व चित्रपटगृह, पेट्रोल पंप इ. सोयी आहेत. येथें एक जिनिंग फॅक्टरीहि आहे.

शेंदूर्णी–केळ्यासांठीं प्रसिद्ध ठिकाण

पाचोऱ्याचे पूर्वेस १२ मैलांवर हें गांव सोन नदीच्या कांठीं वसलेलें आहे. पाचोरे-जामनेर या छोटचा रेल्वे मार्गावरील हें स्टेशन असून पहूर-पाचोरा ही मोटारची सडकहि या गांवांतून जाते. शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव यांचे उपाध्ये पाटणकर दीक्षित यांचें हें जहागिरीचें गांव. सर जॉन मालकम यांना सांगून दुसऱ्या बाजीरावानें हें गांव दीक्षितांच्या घराण्यास देवविलें. गांवच्या बाहेर दक्षिणेस जुनें महादेवाचें हेमाडपंती देऊळ आहे. त्याचा हॉल ४२ × १३ फूटाचा असून तो लांब, भरीव दगडांनीं बांधलेला आहे. दगडी खांबावर वरचा भाग आधारलेला आहे. जवळच १२ × १५ फूटाची रुंद पायऱ्यांची विहीर आहे. या देवळाचे परिसरांतच छोटीं २४ देवळें असून त्यांत कांहीं ठिकाणीं विचित्र खोदकाम आहे. गांवच्या मध्यभागांत त्रिविक्रमाचें मंदिर असून तेथें दरवर्षी कार्तिकी पौर्णिमेस यात्रा भरते. येथें कादीर बाबा तेली या नांवाचे प्रख्यात संत होऊन गेले व त्यांना स्वप्नांत दृष्टांत होऊन त्रिविक्रमांनीं मातीच्या कारावासांतून आपली सुटका करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें बाजारांत खणल्यावर त्रिविक्रमाची मूर्ति सांपडली व तिची प्रतिष्ठापना करून हें मंदिर बांधलें अशी आख्यायिका सांगतात. शेंदूर्णी येथील केळीं फार प्रसिद्ध आहेत. येथून केळीं व विडचाचीं पानें निर्यात होतात. आजूबाजूला बरींच खेडीं व जवळच चार मैलांवर औरंगाबाद जिल्ह्याची हद्द यामुळें या गांवास महत्त्व आहे. येथें दर बुधवारीं बाजार भरतो. येथें माध्यमिक शिक्षणासाठीं एक हायस्कूलहि आहे. पोस्ट, तार, बाजार, स्टेशन, हायस्कूल, ग्रामपंचायत, व सहकारी संस्था इ. सोयी आहेत. येथील फ्रुट सेल सोसायटी जळगांव जिल्ह्यांतील एक आदर्श सोसायटी आहे.

गौरखेडे–भूमिगत महादेवाचें देऊळ

गौरखेडें हें जामनेरपासून सहा मैलांवर जामनेर-भुसावळ रस्त्यावर असून या गांवाची प्रसिद्धी येथील भूमिगत महादेवाच्या देवळासाठीं आहे.

पाचोरें–रेल्वेजंक्शम व तालुका केंद्र

पाचोरे हें शहर मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर मुंबईपासून २३१ मैलांवर आहे. जुना किल्ला व भिंतीचे पडिक अवशेष सोडले तर पाचोऱ्यांत जुनेपणाच्या खुणा नाहींत. हें शहर तालुक्याचें मुख्य ठिकाण असून त्याची लोकसंख्या १९६१ चे जनगणनेनुसार १८,३६१ आहे.

लोहारें–तापेश्वर महादेव

पाचोरे तालुक्यांतील लोहारें हें गांव एकेकाळीं फार प्रसिद्ध होतें. मध्य रेल्वेच्या मुंबई-दिल्ली या मुख्य मार्गावरील माहेजी रेल्वे स्टेशनपासून १० मैल आग्नेयेकडे तें आहे. पाचोरा-जामनेर या छोटचा रेल्वे मार्गावरील वरखेडी बु. स्टेशनपासून हें फक्त २ मैल आहे.

लोहाऱ्याच्या पूर्ववैभवाची साक्ष देणारें तापेश्वर महादेवाचें प्राचीन देऊळ गांवच्या दक्षिणेस दीड मैलावर आहे. तें हेमाडपंती पद्धतीचें असून त्यांत १६ फूट उंच व ८ फूटाचा चौरस असलेला सभामंडप व तेवढाच पण ८ फूट उंचीचा गाभारा आहे. वरचा छपराचा भाग अष्टकोनी खांबांवर आधारलेला होता पण तो आतां ढांसळलेला आहे. पूर्व बाजूला कोरीव दरवाजा आहे. देवळांत कांहीं शिलालेख वगैरे नाहीं. या देवळाला वार्षिक रु. १५ रोख व रु. ४।। आकाराची जमीन देणगीदाखल दिलेली आहे.

माहेजी–एक यात्रास्थान

पाचोरे तालुक्यांतील हें १२९२ लोकसंख्येचें गांव मध्य रेल्वेच्या मुंबई-दिल्ली मार्गावरील माहेजी स्टेशनपासून ३ मैल पश्चिमेस आहे. येथें दरसाल ७-८ हजार लोक यात्रेसाठीं जमतात. ही जळगांव जिल्ह्यांतील प्रसिद्ध यात्रा आहे. सुमारें २८० वर्षांपूर्वी माहेजी या नांवाची स्त्री होऊन गेली व तिच्या स्मरणार्थ ही यात्रा भरते असें म्हणतात. ही स्त्री जामनेरच्या आग्नेयेस १० मैलांवर असलेल्या हिरवी गांवची तिलोली कुणबी होती. ती सासू-सासऱ्याच्या जांचाला कंटाळून पळून जाऊन योगिनी बनली. तोरणमाळच्या एका साधूनें दीक्षा दिल्यावर ती देशभर भटकली व तिचा महिमा एवढा वाढला कीं हयातींतहि लोक तिच्या नांवानें नवस करूं लागले. शेवटीं ती चिंचखेड्यास स्थायिक झाली व १२ वर्षें तेथें राहून तिनें जिवंत समाधि घेतली. सध्यांचें देऊळ नंतर तेथें उभारण्यांत आलें. हें २८ फूट उंच, २५ फूट लांब व १८ फूट रुंद असें साधें ओबडधोबड देऊळ आहे. तेथें दर पौष महिन्यांत पौर्णिमेस यात्रा भरते. पोवार घराण्यांतील एका प्रमुखाच्या नवसाला ती पावली म्हणून त्यानें ही यात्रा सुरूं केली व तेथून ती वाढूं लागली असें म्हणतात. लोकांच्या गर्दीमुळें दुकानदारांचीहि संख्या वाढूं लागली. पण १८०३ मध्यें ही यात्रा बंद पडली व अशी सतत चार वर्षे गेल्यानंतर पुन्हां या यात्रेचें पुनरुज्जीवन झालें. १८३३ मध्यें ही यात्रा सरकारी व्यवस्थेखालीं गेली. त्यामुळें तिला शिस्त लागून पुन्हां यात्रेकरूंची संख्या वाढूं लागली. १८३७ मध्यें समुद्र किनाऱ्याचे व्यापारी येथें येत असत व अंतर्गत मालाची देवाण-घेवाण होई. एक महिनाभर असा व्यापार चाले असें वर्णन करण्यांत येतें.

पिंपळगांव–हरी हरेश्वराचें मंदिर

पिंपळगांवचें वैशिष्ठ्य म्हणजे येथील जुनें प्रेक्षणीय असें हरी हरेश्वर महादेवाचें देऊळ हें होय. येथें दरवर्षी जानेवारींत यात्रा भरते. जवखेडें गांवांतून या देवळाला उत्पन्न मिळतें.

वरखेडी बु. स्वातंत्र्य रक्षणार्थ प्राणपणानें लढणारें गांव

१८२१ मध्यें जीं पाचोऱ्यांतील १२ गांवें ब्रिटिशांनीं शिंद्यांकडून घेतलीं त्यापैकीं हें एक आहे. हीं गांवें पुन्हां शिंद्यांकडे आलीं व १८४३ मध्यें परत ब्रिटिशांनीं घेतलीं. शेवटच्या ब्रिटिशांच्या कब्जाचे वेळीं मात्र या गांवानें असामान्य प्रतिकार केला. एका रजपूत प्रमुखानें गांवचा मुख्य दरवाजा बंद केला. गांवाभोंवती २८ फूट उंच व ७५ फूटाचा चौरस असा विटा-मातीचा तट होता. त्यानें शरण येण्याचें नाकारून पुष्कळ काळपर्यंत निर्धारानें व यशस्वीपणानें टक्कर दिली. तथापि बऱ्याच काळानें गांवच्या तटाचा मुख्य दरवाजा उडवून दिल्यानें प्रतिकार संपला. प्रतिकारकांचा पुढारी मन्साराम गोळी लागून मेला व त्याचा मुलगा जबरदस्त जायबंदी झाला व आक्रमकांचेहि १६ सैनिक मृत व जखमी झाले. अशा तऱ्हेनें स्वतःच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं शेवटपर्यंत निकरानें झुंज देणारें हें वरखेडी बु. गांव आहे. येथील लोकसंख्या १३६० आहे.

पारोळें–प्रेक्षणीय भुइकोट किल्ला

पारोळें हें तालुक्याचें ठिकाण असलेलें १७,३११ लोकसंख्येचें शहर भुसावळ-सुरत या रेल्वे मार्गावरील अमळनेर स्टेशन–पासून ११ मैलांवर आहे.

हें शहर पाहतांच त्याचें प्राचीन स्वरूप चटकन लक्षांत येतें. येथें पूर्वी नोव्हेंबर त जून या हंगामांत कापूस, धान्य व गुरें यांचा व्यापार चाले. पण हल्लीं इथला व्यापार कमी झाला असून रेल्वे स्टेशनमुळें अमळनेर या जवळच्या शहराचा व्यापार वाढला आहे. खानदेशांतील एक नामांकित हातमाग विणकरांचें केंद्र म्हणून पारोळचाची ख्याति होती. येथील साड्या, लुगडीं इ.स्त्रियांच्या उपयोगाचें कापड एके काळीं महशूर होतें.

येथें डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटी असून गांवांत पक्कीं गटारें, कांहीं डांबरी रस्ते, कांहीं विटा दगडांचे रस्ते आहेत. नगरपालिकेचें भाजी मार्केट, मटन मार्केट व कत्तलखानाहि आहे. नगरपालिकेंने दवाखाना व वाचनालयहि चालविलें आहे. जिल्हा लोकल बोर्डाचा जनावरांचा दवाखाना आहे. प्राथमिक शाळा व नागरिक एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें हायस्कूलहि आहे.

परंतु पारोळचाचें खरें आकर्षण म्हणजे तेथील भुईकोट किल्ला. हा किल्ला सपाट मैदानावर १७२७ मध्यें जागिरदार हरी सदाशिव दामोदर यांनीं बांधला. जळगांव जिल्ह्यांतील अत्यंत सुंदर वास्तुशास्त्राच्या अवशेषापैकीं ही एक वास्तु आहे.

शहराबाहेर अनेक जुन्या मशिदी आहेत आणि किल्ल्याजवळच एक सुंदर मनोरा आहे. बऱ्हाण-पूरच्या रस्त्यावर असे मनोरे दिसतात. किल्ल्याचे पूर्व बाजूला इमाम बादशहांचा दर्गा आहे. त्यांत इमाम व बादशहा या दोन भावांच्या कबरी आहेत. सदाशिव दामोदर या हिंदु जागिरदारानें तो बांधला असें म्हणतात.

हिंदूंच्या देवालयांत रामाचें कोरीव दगडी देऊळ, महादेवाचें देऊळ व भवानीचें देऊळ आहे. स्वामींचें मंदिर ही एक २४×२४ चौ. फूट अशी सुंदर दगडी इमारत आहे. त्यावर विटांच्या बांधकामाचा व त्यावर सिमेंटच्या आकृती असलेला उंच कळस आहे. त्रिंबकराव सदाशिव जागिरदार यांनीं हें बांधलें असें म्हणतात. चार हाताचा गणपती व देवींच्या मूर्ति असलेलें दुसरें मंदिरहि त्यांनींच बांधलें म्हणतात. तेथें एक सुंदर नक्षीकाम केलेली छत्री आहे. हें मंदिर ५८ फूट लांब व ५६ फूट रुंद असून त्यालाहि विटांच्या बांधणीचा कळस आहे. येथें दरसाल वैशाखांत यात्रा भरते.

पारोळचापासून २ फर्लांग दूर धुळें रस्त्यावर ३३ फूट उंच व १३ फूटाचा चौरस तळ असलेली खाली दगड व वर विटांचे बांधकामाची एक प्रेक्षणीय छत्री आहे. तेथें गिरीधर शेठ बालाजीवाले यांच्या पादुका आहेत.

उंदीरखेडें–नागेश्वर महादेवाचें देऊळ

पारोळें तालुक्यांत पारोळचाचे दक्षिणेस तीन मैलांवर १९४२ लोकसंख्येचें एक उंदीरखेडे नांवाचें गांव आहे. या गांवांत बोरी नदीतील बेटांत एक नागेश्वर महादेवाचें देऊळ आहे. हें देऊळ त्रिंबकराव मामा पेठे यांनीं बांधलें असल्याचें सांगतात. त्रिंबकरावांना हें गांव पेशव्यांनीं २०५ वर्षांपूर्वी दिलें. हें देऊळ ७५ फूट लांबीच्या भिंतींनीं सर्व बाजूंनीं वेष्टिलेलें असून नदीच्या पात्रा-कडे नेणाऱ्या पायऱ्यांच्या रांगा आहेत. दीपमाळांनीं त्याची शोभा वाढविली आहे. देऊळ ४०×२५ फूटाचें आहे. देवळांत गाभारा, बाहेरची खोली, व आगाशी असून त्यांत नंदी आहे. खोली चुनाविटांची असून त्यावर छोटा कळस आहे आणि गाभारा कोरीव दगडाचा बाहेरून भरगच्च नक्षीकाम केलेला असून त्यावर अनेक कोनांचा कळस आहे. कळसासकट त्याची उंची ४० फूट आहे. हें देऊळ सध्यां सुस्थितींत नाहीं.

फरकांडचाच्या झुलत्या मनोऱ्याप्रमाणेंच म्हसवें या पारोळें तालुक्यांतील पारोळ्यापासून दोन मैल पूर्वेस असलेल्या गांवांतील दीपमाळांसंबंधीं बोलतात. येथें एका जुन्या इमारतीच्या जागेवर एक अलीकडील झिंजाणा देवीचें देऊळ आहे. देवीला चार हात असून मूर्ति पांढऱ्या दगडाची आहे. या देवळाच्या पूर्वेस चुना विटांनीं बांधलेल्या ३१ फूट उंचीच्या व १६ फूट परीघाच्या दोन दीपमाळा एकमेकालगत आहेत. या दीपमाळाहि हालतात असें सांगतात. येथें चैत्रांत छोटी यात्रा भरते.

म्हसवें–झुलत्या दीपमाला व तलाव

या देवळाच्या उत्तरेस चौबाजूंनीं दगडचुन्यांनीं बांधलेलें २५ फूट खोलीचें व सर्व बाजूंनीं पायऱ्या असलेलें एक कुंड आहे. देवळाच्या नैऋत्येस १५० फूटावर एका जुनाट इमारतीचे उच्च दर्जाचें शिल्पकाम केलेले अवशेष आढळतात. ही इमारत तुर्की देवीसाठीं बांधलेली होती असें म्हणतात.

म्हसवें येथेच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियंत्रणाखालील एक इन्स्पेक्शन बंगला असून त्यापासून जवळच एक तलाव आहे. या तलावाचा उपयोग शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठीं होतो. या तलावाचा बंधारा १४९४ फूट लांब व ४४ फूट उंच आहे. त्याला ३ मैल लांबीचे पाट काढण्यांत आले आहेत. तलावाचे पाण्यावर सध्यां सुमारें ५०० एकर क्षेत्र भिजतें.

रावेर–तालुक्याचें ठिकाण, केळी व विडयाचीं पानें

रावेर हें शहर तालुक्याचें मुख्य ठिकाण असून मध्य रेल्वेच्या मुख्यमार्गावरील हें स्टेशन आहे. स्टशनपासून गांव २ मैल आहे. १८०३ मध्यें यशवंतराव होळकरांकडून सुराजीराव निंबाळकरांनीं हें गांव घेतलें व त्यांचेकडून १८१८ मध्यें ब्रिटिशांकडे आलें. तेथील रहिवाशी मुख्यतः तें शेतकरी आहेत. येथील विडचाचीं पानें प्रसिद्ध आहेत. केळयांच्या बागा येथें जागोजाग दिसतात. चांगल्या तुपाबद्दलहि रावेरची ख्याती आहे.

येथें एक राम मंदिर व तेथील दोन कुंडें अहिल्याबाई होळकरांनीं बांधलेलीं असल्याचें सांगतात. त्यापैकीं केशव कुंड २२×१८ असून त्यांत सतत शुद्ध पाणी येतें. नागझरी कुंड पोहण्याचे उपयोगी आहे व तेंहि अहिल्याबाई होळकरांनीं बांधलेले आहे असें म्हणतात. शिवाय मोठें दत्त मंदिर आहे व तेथें दत्त-जयंतीस यात्रा भरते. त्यावेळीं दत्तमूर्तीची मिरवणूक रथांतून गांवभर काढली जाते. शिवाय मस्तान शावली म्हणून एक पीरहि आहे व तेथेंहि दर वर्षी उरुस भरतो.

दर शुक्रवारीं स्थानिक बाजार भरतो. गुरांचा बाजार जास्त प्रमाणांत भरतो.

सावदें–केळी निर्यातीचें प्रमुख केंद्र

सावदें हें शहर रावेर तालुक्यांत फार महत्त्वाचें गणलें जातें. तें मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर सावदें हें स्टेशन आहे व स्टेशनपासून गांवापर्यंत तीन मैलाचा पक्का रस्ता आहे. सावदे गांव बागायतीच्या जमिनीनें वेढलें आहे.

आठवडयाचा बाजार दर रविवारीं भरतो त्यांत जनावरांचा बाजार मोठा असतो. निमार व वऱ्हाडी जातीचीं भारी गुरेंहि येथें विक्रीस येतात. सावद्याची ख्याति उत्तम तुपाबद्दल आहे. दरसाल नव-रात्रांत मरीआई देवीची व चंपाषष्ठीस खंडेरावाची अशा दोन यात्रा व मे महिन्यांत पीर मंजनशाचा उरुस भरतो.

खिरोदे–विधायक कार्यकर्त्यांचे मोहोळ

सावदे स्टेशन पासून ७ मैलावर व सावदे गांवापासून ४ मैल पश्चिमेस मौजे खिरोदें प्र. यावल हें एक आदर्श गांव आहे. पूज्य कै. धनाजी नाना ऊर्फ दादासाहेब चौधरी यांचें हें गांव व दादासाहेबांचें दीर्घकाल वास्तव्य येथें झालें. त्यांनीं सुरूं केलेली जनता शिक्षण मंडळ ही बहुविध कार्य करणारी एक नमुनेदार संस्था असून अनेक विधायक पदवीधर कार्यकर्त्यांची एक मालिकाच या संस्थेंतून बाहेर पडली आहे व हे सर्व कार्यकर्ते आपल्या मातृसंस्थेशीं एकनिष्ठ राहून अनेक प्रकारची विधायक कामें स्वयंस्फूर्तीनें व सेवाभावानें करीत आहेत.

या गांवची लोकसंख्या १९५१ चे शिरणगतीप्रमाणें ३०७७ होती. अवघे ८००० उत्पन्न असलेल्या येथील ग्रामपंचायतीनें घरोघरीं नळानें पाणीपुरवठा, गॅसप्लॅटवर रस्तोरस्ती दिवे ,गटारें, रस्तें, संडास इ. कामें करून गांवची फार मोठी सुधारणा केली आहे. गांवहाळ जमीन स्वतः कसून त्या उत्पन्नांतून गांवांत नळाचे पाण्याचा पुरवठा मोफत करण्यांत येतो. गांवांत ग्रामपंचायती शिवाय ग्रामविकास मंडळ, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, कॅटल ब्रीडिग व ग्रोअिंग सहकारी सोसायटी, तेल उत्पादक सहकारी सोसायटी, महिला मंडळ, जीवन शिक्षण मंदिर, संस्कार केंद्र, इ. संस्था आहेत. सर्वोदय योजनेची मुख्य कचेरी येथेंच आहे. गांवांत संरक्षक धक्का, गटारें, मराठी शाळा, पाणीपुरवठा योजना, अग्निशामक योजना, गॅसप्लँट, महात्मा गांधी स्मारक, तळें खुदाई, गोपुरी व बेबी संडास, गांधी वाचनालय, जोडरस्ते इ. सुमारें एक लाखाचीं विकासकामें झालेलीं आहेत. येथील पाणीपुरवठा योजना पाहूनच जिल्ह्यांत व विशेषतः रावेर व यावल तालुक्यांत अनेक गांवी पाणीपुरवठा योजना गांवांनीं पूर्ण केल्या. येथील ग्रामलक्ष्मीगृह किंवा मैल्यावर चालणारी गॅसप्लँट ही नवीन योजना हल्लीं सर्वांच्या कौतुकाचा विषय झाली आहे.

सर्वोदय केंद्रातर्फें चालविलेली जीवन शिक्षण शाळा पाहण्यासारखी आहे. विशेषतः या शाळेची सोनखत व हिराखत योजना, विक्रेताविरहित दुकान, सूतकताई व विणाई, कोरडें वसतिगृह, बागकाम, क्रीडांगण इ. योजना वैशिष्ठचपूर्ण आहेत. त्याचप्रमाणें चर्मकारांच्या सहकारी संस्थेनें चालविलेलें प्लेइंग व ट्रॅनिंग केंद्र, बोन डॉयजेस्टर इ. कामें वाखाणण्यासारखीं आहेत. जनता शिक्षण मंडळ, धनाजी नाना विद्यालय हें हायस्कूल, प्राथमिक मूलोद्योग अध्यापक विद्यालय हें ट्रेनिंग कॉलेज, ग्रामपंचायत सेक्रेटरी व तलाठी यांचा शिक्षण वर्ग, व बालवाडी या शैक्षणिक संस्था तर चालवितेच शिवाय या संस्थेची शेती, बागकाम, नर्सरी, सरंजाम केंद्र, साबण कारखाना, अंबर चरखा परिश्रमालय, कलाविभाग, गायनवर्ग, मागासलेल्या वर्गाचें वसतिगृह इ. विविध प्रकारचीं कामें पाहण्यासारखीं आहेत. या संस्थेनें एक मोठे प्रेक्षागृह बांधावयाचें काम घेतलें आहे. गांवांत ब्रँच पोस्ट, लोकलबोर्डाचा दवाखाना व मुलींची शाळाहि आहे.

खिरोदे येथील ग्रामविकासाचीं कामें, सर्वोदय केंद्राचीं कामें, जनता शिक्षण मंडळाचीं कामें, श्री मनोहर चौधरी यांच्या कलाकृति ह्या तर प्रेक्षणीय आहेतच पण याशिवाय दादासाहेब चौधरींच्या शिकवणुकीत तयार झालेला, एकदिलानें बंधुभावानें काम करणारा, प्रसिद्धि पराङ्मुख असा कार्यकर्त्यांचा संच ही खिरोद्याची मोठी संपत्ति आहे.

भोकरी–जुनें देवालय व शिलालेख

रावेरच्या पूर्वेस दोन मैलांवर असलेल्या या छोटचा गांवांत ओंकारेश्वराचें सुरक्षित देवालय आहे. त्या देवालयांत शके ११९९ (इ. स. १२७७) मधील एक शिलालेख आहे. येथेंच भोकरी नदीकांठी एक जुनी धर्मशाळा असून ती नुकतीच दुरुस्त केली आहे. ती अहिल्याबाई होळकरांनीं बांधली असें म्हणतात.

पाल–जिल्ह्यांतलें एक निसर्गरम्य ठिकाण

रावेर तालुक्यांत रावेरच्या वायव्येस १४ मैलांवर पाल हें एक प्राचीन ठिकाण आहे. ७३ गांवांचें मुख्य ठाणें पूर्वी पाल येथें होतें असें म्हणतात. सातपुड्यांतील एका पठारावर हें वसलेलें आहे.

जुन्या किल्ल्याचे बुरुज व तट यांचे अवशेष आजहि दिसतात. किल्ल्याचे सुमारें २०० यार्ड पूर्वेस गांवच्या हमरस्त्याचे मध्यभागीं एक जुनी दगडी मशिद बंदिस्त जागेंत आहे. या मशिदींत जाण्याच्या प्रवेशद्वारावर राजेशाही कमान आहे. ही मशीद २७ × २७ चौ. फूट असून काळ्या दगडाची व बिनचुन्याची आहे. जरी तिचे पुढचे खांब हे वाऱ्या पावसानें झिजलेले व त्यांतील दगड ढांसळलेले असले तरी मूळ इमारत चांगली सुरक्षित आहे. या मशिदीमागें जरा वायव्येस हातीखाना या नांवाची २०० ×२०० चौ. फूटाची एक प्रवाशांची धर्मशाळा आहे. तीन भिंती व चौथ्या भिंतीच्या कांहीं भागाचे अवशेष व खोल्यांची रचना दाखविणारें जोतें या शिवाय सध्यां तेथें कांहीं नाहीं. मशिदीपासून किल्ल्याकडे जाणाऱ्या एके काळी फरशीच्या असलेल्या या मार्गानें गेल्यावर चांगल्या वाढलेल्या झाडांनीं आच्छादिलेलें शुद्ध पाण्याचें एक नागझरी नांवाचें जलकुंड आहे. या ३० फूट रुंद व ५० फूट लांब जलाशयाला पाण्याचा पुरवठा किल्ल्यांतल्या विहिरींतून होतो असें सांगतात व भूमिगत नळांनीं तें जोडलेलें आहे असें म्हणतात. पाणी-पुरवठा मोठा आहे व या कुंडाच्या १५ गायमुखांनीं हें पाणी वाहून नदींत जातें. दगडांच्या जागजागीं राशी हींच जुन्या घरांचीं स्मारकें आहेत.

गांवाजवळील टेकडीवर पालोबा ऋषीचें स्मारक आहे. त्यावरून या गांवास पाल हें नांव पडलें असावें अशी कल्पना आहे. सन १९५६ मध्यें खोदकाम करतांना पुरातन काळांत दगडी ड्रेनेजची व्यवस्था येथें केलेली आढळली. त्याचप्रमाणें महमद तघलकाचे वेळचीं कांहीं नाणींहि सांपडलीं. ती रावेर येथील मामलेदार कचेरींत दाखल करण्यांत आली. यावरून या गांवाचें प्राचीनत्व सिद्ध होतें.

कै. धनाजी नाना उर्फ दादासाहेब चौधरी यांनीं गांवची परिस्थिति पाहून या ठिकाणीं सर्वोदय योजनेचें उपकेंद्र सुरूं केलें. तत्पूर्वी गांवांत वंजारी व तडवी लोकांची वस्ती होती व ते लोक शिकार, लाकूड-तोड, डिंक काढणें, अंजनपाला व शेती यावर उपजीवीका करीत. गांवांत शाळा, पाणीपुरवठा, दवाखाना वगैरे कसल्याच सुखसोयी नव्हत्या. लोकांत जंगली संवयी, अडाणीपणा, शिकारीचा नाद, दुर्व्यसनें, जडीबुटी व जादूटोणा यांचें प्राबल्य, परंपरागत समजुती असें वातावरण होतें. तेव्हां दादासाहेब चौधरी यांचे प्रयत्नानें पहिल्यानें व्हॉलंटरी शाळा सुरूं झाली व त्याचेंच रूपांतर पुढें आजच्या आश्रम शाळेंत झालें. ही आश्रमशाळा सध्या गौरखेडा पंचक्रोशी रचनात्मक समिती चालविते. या आश्रम-शाळेसाठीं आतां सुंदर इमारत झाली असून त्यासमोर मन प्रसन्न करणारी बाग आहे. त्या बागेंत दादासाहेब व महात्माजी यांचे पुतळे आहेत. आश्रमशाळेचें ठिकाण व परिसर पाहून कोणाचेंहि मन प्रफुल्लित होईल. या आश्रमशाळेंत सध्यां सुमारें १७५ मुलें शिकत आहेत व त्यापैकीं सुमारें ७५ मुलें व मुली तेथेंच कायम राहणारीं आहेत. आश्रमशाळे-लगतच बालवाडीची झोपडी असून त्यांत ३ ते ५ वर्षे वयाचीं ३२ बालकें पूर्व प्राथमिक शिक्षण घेतात. बालवाडीच्या झोपडीबाहेर मुलांना खेळण्याचींहि साधनें ठेविलीं आहेत. शिक्षणाइतकाच आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे हें जाणून येथें सर्वोदय केंद्रामार्फत दवाखानाहि चालविण्यांत येत आहे. दवाखान्यांत जाऊन उपचार करून घेण्याची लोकांना संवय नव्हती पण आतां त्यांना दवाखान्याचें महत्त्व पटलें असून उपचारासाठीं रोगी दवाखान्यांत येतात. आदिवासी स्त्रिया प्रसूतीसाठीं दवाखान्याचे प्रसूती विभागांत येण्यास अजून धजत नाहींत पण लवकरच तीहि सुधारणा त्यांच्यांत होईल. गांवच्या पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठीं सर्वोदय योजनेनें पुढाकार घेऊन एक फार मोठें कार्य केलें आहे. या कामीं सरकारनें

मदत दिली व गांवकऱ्यांनींहि फार मोठें सहकार्य केलें. खोल दरींत लांब अंतरावर असलेल्या विहिरींतील पाणीं इंजिनानें उपसून गांवांतील दगडी टाकींत सांठविलें आहे व त्या टाकीस नळाच्या मोठ्या तोटया बसविल्या आहेत. हें काम फार मोठें आहे. या सर्व योजनेसाठीं एकूण सुमारें २८ हजार रु. खर्च आला असून त्यापैकीं सुमारें ८ हजार रु. गांवकऱ्यांनीं द्रव्य, श्रमदान, साहित्य इ. रूपानें दिले आहेत. शेती सुधारणेच्या बाबतींतहि अनेक प्रयत्न करण्यांत आले. पूर्वी जेथें ८५० एकर क्षेत्र वहितीखाली होतें तेथें आज १७३८ एकर क्षेत्र लागवडीखालीं असून विहिरींचा पाणीपुरवठा, सहकारी संस्थेमार्फत कर्ज वांटप, खतांचा उपयोग, लोखंडी नांगरांचा वापर, हिंस्र श्वापदांचा नाश, बंडिंग योजनेचा प्रचार व शिक्षण, सुधारलेलीं बियाणें, प्रात्यक्षिक केंद्रामार्फत लागवडीच्या नवीन पद्धतींचा प्रचार या सर्व प्रयत्नामुळें शेतकऱ्यांचें उत्पादनहि मोठ्या प्रमाणांत वाढविण्यांत आलें आहे. येथील कपाशीचा धागा लांब निघतो म्हणून तिला बाजारभावापेक्षां २ रु. मण चढ भाव मिळतो. कपाशीचें उत्पन्नहि गेल्या १० वर्षांत ९०० बं. मणापासून ४००० मणापर्यंत वाढविण्यांत आलें आहे. सारांश, या मागासलेल्या भागांतील जनतेची सर्वांगीण उन्नति करण्याचा सर्वोदयाचा प्रयत्न यशस्वी होत आहे. सर्वोदय संचालक व त्यांचे सहकारी, आश्रमशाळेचे शिक्षक, दवाखान्याचे डॉक्टर, ग्रामपंचायत व विविध कार्यकारी सहकारी संस्था या सर्वांच्या सहकार्यानें व प्रयत्नानें या गांवांत नवजीवन निर्माण होत आहे.

या गांवांतील मशीद व हत्तीखाना जुन्या इतिहासकालीन वैभवाची साक्ष देत उभे आहेत तर इथली आश्रमशाळा आणि पाण्याची टांकी सर्वोदय कार्यकर्त्यांच्या सेवाभावी प्रयत्नांच्या खुणा पटवीत आहेत. अज्ञात उगमांतून नागझरीचें गोड पाणी १५ गायमुखांतून वाहून तहानलेल्यांना गारवा देत आहे तर कै. दादासाहेब चौधरी यांच्या पुण्याईतूंन उगम पावलेली ही सर्वोदयाची गंगा अनेक कार्यकर्त्यांच्या मुखांतून नव्हे तर-हातांतून ओसंडून येथील जनतेच्या जीवनांत नवा ओलावा निर्माण करीत आहे.

यावल तालुका

हें १४,३७० लोकसंख्येचें शहर मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील भुसावळ शहरापासून ९ मैल व सावद्यापासून १२ मैल आहे. भुसावळ हेंच यावलला जवळचें स्टेशन आहे. पण पावसाळ्यांत भुसावळजवळील तापी ओलांडतां येत नाहीं. तेव्हां सावदा स्टेशनशीं यावलचें दळणवळण राहतें. तापीवर भुसावळनजीक मोठा पूल बांधण्याचें काम चालू आहे. शिरपूर-रावेर हा मोटररस्ता यावलवरूनच जातो. यावल हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे.

फैजपूर हें यावल तालुक्यांतील महत्वाचें केंद्र असून तें मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सावदे स्टेशनपासून पश्चिमेस दोन मैलांवर आहे. येथील लोकसंख्या १३,०६६ असून येथें जिल्हा नगरपालिका आहे.

फैजपूर : खेड्यांतील पहिले काँग्रेस अधिवेशन

या गांवाभोंवती पक्क्या विटा व मातीचा तट असून अनेक सुंदर प्रवेशद्वारें आहेत. भिंतींच्या आंत उंच उंच इमारती अरुंद रस्त्यांच्या दुतर्फा उभ्या आहेत. हें गांव गर्द निळया व लाल रंगांसाठीं प्रसिद्ध होतें. येथें आठवड्याला लोंकरबाजार भरतो. येथें विणकरांची संख्याहि फार मोठी आहे. हें एक हातमाग विणकरांचें केंद्र आहे. गांवांभोंवती सर्वत्र विहिरींच्या पाण्याची बागायत आहे. हें कापसाच्या व्यापाराचें मोठें केंद्र असून खानदेशच्या उत्तम प्रकारच्या कापसाला फैजपूरचेंच नांव देतात.

एका ऐतिहासिक घटनेमुळें फैजपूरचें नांव देशांत अजरामर झालें आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनें आपलें वार्षिक खुलें अधिवेशन ग्रामीण भागांत भरविण्याचा निर्णय घेतल्यानंतर काँग्रेसचें पहिलें ग्रामीण

अधिवेशन फैजपूर येथें डिसेंबर १९३६ मध्यें भरलें होतें. त्यावेळीं प्रचंड संख्येनें प्रतिनिधी, स्वागतसभासद व प्रेक्षक उपस्थित होते व त्यांच्या सर्व सुखसोयींची व्यवस्था करण्यांत आली होती. या अधिवेशनामुळें फैजपूरचें नांव देशभर गाजलें.

पाडळसें–आदर्श ग्रामपंचायत

यावल तालुक्यांतील पाडळसें हें ३,१९० लोकसंख्येचें गांव मध्य रेल्वेच्या भुसावळ नंतरच्या दूसखेडें स्टेशनपासून पश्चिमेस ३ मैलांवर आहे. हें सावद्याचे नैऋत्येस सुमारें ६ मैलांवर आहे. भुसावळ-सावदे मोटर रस्ताहि या गांवांतूनच जातो.

येथें १६ फूट उंच ६६ फूट रुंद व ८५ फूट लांब असें सुमारें १८० वर्षांपूर्वी कृष्णा या भक्तानें बांधलेलें भिलोबाचें देऊळ आहे. या देवळाच्या भिंती व पायऱ्यांची दुरुस्ती गांवकऱ्यांनीं अलिकडे केली. इतरहि कांहीं दुरुस्ती १९३९-४० मध्यें करण्यांत आली व त्यासाठीं सुमारें ३०-४० हजार रुपयांचा खर्च झाला. देवळाच्या दक्षिणेकडील भिंत भंगलेली असून तिचीहि दुरुस्ती होणें जरुर आहे.

या गांवच्या ग्रामपंचायतीनें औरंगाबाद विभागांतील १९५९-६० चे विभागीय ग्रामपंचायत स्पर्धेमध्यें रु. ५,००० चें बक्षिस मिळवून सर्वांकडून प्रशंसा मिळविली. गांवचे हल्लींचें सरपंच श्री. हरी शेनफडू पाटील यांना रु. ५,००० चें बक्षिस २९ जानेवारी १९६१ रोजीं मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचें हस्तें अर्पण करण्यांत आलें. तसेंच या गांवानें कुष्टरोगनिवारण कार्यांत चांगली मदत केल्याबद्दल एक ढालहि सरपंचांना त्याचवेळीं देण्यांत आली. या गांवच्या विकासकार्याचा थोडक्यांत आढावा पुढें घेतला आहे.

गांवांत विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, पीक संरक्षण सोसायटी, हौसिंग सोसायटी, ग्रामसंरक्षक दल, महिला मंडळ, कृषक समाज इ. संस्था आहेत.

वृक्षसंवर्धन कार्याबद्दल पंचायतीस जिल्ह्यांत पहिलें रु. २०० चें बक्षिस मिळालें आहे.

पंचायतीची दारूबंदी उपसमिती असून ती दारूबंदीचा प्रचार करते व अल्पबचत-योजनेंतहि पंचायत व गांवकरी आस्थेनें भाग घेतात. भंगी लोकांसाठीं तात्पुरतीं घरें पंचायतीनें बांधून दिलीं आहेत. आग विझविण्यासाठीं २५ बादल्या पंचायतीनें ठेवल्या आहेत. गांवांत सरकारी ग्रामीण रेडिओ आहे.

ग्रामपंचायतीनें आतांपर्यंत खालील बक्षिसें मिळविलीं आहेत.

१) ग्रामसुधारणेचें जिल्ह्याचें पहिल्या क्रमांकाचें बक्षिस (सन १९४८) रु. १५०.
२) अधिक धान्योत्पादन बक्षिस (१९५०) रु. १,०००
३) वनमहोत्सवाचें जिल्ह्याचें पहिलें बक्षिस (१९५०) रु. २००
४) ग्रामसुधारणेचें जिल्ह्याचें पहिलें बक्षिस (१९५१) रु. २००
५) ग्रामपंचायत स्पर्धेत जिल्ह्याचें पहिलें बक्षिस (१९५७-५८) रु. २००.
६) कुष्टनिवारण कार्याबद्दल पहिलें बक्षिस ढाल व कप.
७) श्रमदानाबद्दल श्री. त्र्यंबक शामजी चौधरी–कप.
८) औरंगाबाद विभागांतील, ग्रामपंचायत विभागीय स्पर्धेतील पहिलें बक्षिस (१९५९-६०) रु. ५,०००.

शासनं व्यवस्था



तपशील
तालुक्याचें ठिकाण
महालाचें ठिकाण
जिल्ह्याचें मुख्य ठाणें
जळगांव प्रांताधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र
असळनेर प्रांताधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र
चाळीसगांव प्रांताधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र
जळगांव प्रांताधिकाऱ्यांची कचेरी
असळनेर प्रांताधिकाऱ्यांची कचेरी
चाळीसगांव प्रांताधिकाऱ्यांची कचेरी
फौजदारी व दिवाणी न्यायालयें
पोलीस स्टेशन
पोलीस हेडक्वार्टर्स
पोलीस आऊट पोस्टस्
जिल्हा न्यायालय
समाज कल्याण अधिकारी यांचें कार्यालय
अविकसित ग्रामीण भाग
संस्कार केन्द्रें
बालवाड्या
समाज कल्याण खात्यानें मान्यता दिलेलीं वसतीगृहें
शबरी आश्रम
जिल्हा आश्रय केन्द्र
बालसुधार सदन
समाज कल्याण प्रकल्प
आदीवासी विभागांतील गावें
नियोजित महाविद्यालयें
उमर्टी
सतरसेणी
मरहटा
चोपडे
कुंड्यापाणी
अडावद
सारवड
पातोंडे
असळनेर
धरणगांव
पाळधी
परंडोल
कासोदे
पारोळे
तामसाडी
कोलगांव
भडगांव
पाचोरे
मेहुणबारे
उंबरखेडे
चाळीसगांव
गणेशपूर
नगरदेवळें
पिंपळगांव हरेश्वर
लोहारे
शेंदूर्णी
नेरी
पहूर
जामनेर
बेटावद
फतेपूर
बोदवड
एदलाबाद
कुर्हे
वरणगांव
भुसावळ
जळगांव
नशिराबाद
म्हसावद
यावल
साकळी
दहिगांव
नागझिरा
हरिपुरा
उनपदेव
जामन्या
गढ्या
फैजपूर
खिरोदे
सावदे
रावेर
लालमाती
सहस्त्रलिंग
गारबर्डी
मोहमंडळी
पिंपरकुंड
सिमडया
पाल
अंतुर्ली
निंभोरे बु.
देवझिरी
वैजापूर
देवारी

शासन व्यवस्था

जिल्ह्यांत शासनाचें काम शासनयंत्रणेमार्फत कसें चालतें यासंबंधींची सर्वसाधारण माहिती सामान्य नागरिकालाहि असणें आजच्या काळांत आवश्यक आहे. सरकारी कचेऱ्यांमार्फत जें कार्य होत आहे त्यासंबंधीची माहिती त्या त्या विषयानुरोधानें संबंधित प्रकरणांत दिलीच आहे व कांहीं ठिकाणीं शासन व्यवस्थेचाहि उल्लेख केला आहे. तथापि सर्व सरकारी खात्यांच्या कचेऱ्यांची स्थूल माहिती या प्रकरणांत दिली आहे.

दोन जिल्हे

जळगांव जिल्हा अस्तित्वांत येण्यापूर्वी हल्लीं या जिल्ह्यांत असलेला भाग खानदेश या नांवाच्या एकाच जिल्ह्यांत होता व त्या जिल्ह्याचें मुख्य ठाणें धुळें हें होतें. शासनाच्या सोयीसाठीं नंतर पूर्व व पश्चिम खानदेश हे दोन जिल्हे करण्यांत आले. १९०६ सालीं १४ नोव्हेंबर रोजीं ए. एच्. ए. सिमकॉक्स हे या जिल्ह्याचे पहिले कलेक्टर येथें आले व दि. १५ नोव्हेंबर १९०६ रोजीं मेहरुण तलावाजवळ उभारलेल्या तंबूमध्यें या जिल्ह्याचे कारभारास त्यांनीं प्रारंभ केला. तत्पूर्वीं संयुक्त खानदेशाचे कलेक्टर जी. एस्. कर्टिस हे होते. जिल्ह्याचे विभागणी बरोबरच जिल्ह्याचीं दोन लोकलबोर्डेहि त्याचवेळीं अस्तित्वांत आलीं. सध्यां 'जिल्हा बिल्डिंग' या नांवानें ओळखली जाणारी जिल्हाधिकाऱ्यांची कचेरी नंतर बांधून तयार झाल्यावर कलेक्टर–कचेरी तेथें गेली. त्यानंतर हळंहळू प्रत्येक खात्याच्या जिल्हा कचेऱ्या जळगांव येथें उघडल्या गेल्या. या जिल्ह्याचें स्वतंत्र जिल्हा न्यायालय १२ ऑक्टोबर १९२५ रोजीं जिल्हा न्यायाधीश श्री. लोकूर यांचें हस्तें प्रथम सुरू झालें. पूर्व खानदेश हें या जिल्ह्याचें नांव २१ ऑक्टोबर ६० रोजीं महाराष्ट्र सरकारनें बदलून तें "जळगांव" जिल्हा हें केलें.

जिल्ह्याचे सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणजे कलेक्टर होत. जिल्हाधिकारी हें नांव आतां त्यांच्यासाठीं रूढ होऊं लागलें आहे. जिल्ह्याच्या महसूल खात्याचे ते प्रमुख आहेतच पण शिवाय जिल्हा मॅजिस्ट्रेट या नात्यानें जिल्ह्याच्या शांतता व सुरक्षा व्यवस्थेचेहि तेच प्रमुख आहेत. महसूल गोळा करणें व शांतता आणि सुरक्षा राखणें एवढेंच परकीय राजवटींत सरकारचें मुख्य काम होतें पण स्वातंत्र्योत्तर काळांत कल्याणकारी राज्याची घडण घडवितांना जिल्ह्याच्या कल्याणाच्या अनेक योजना आंखून त्या कार्यवाहींत आणण्याचें काम हें महत्वाचें काम झालें आहे व जिल्ह्याच्या विकासाच्या व कल्याणकारी योजनांची आंखणी व अंमलबजावणी करण्याची जबाबदारीहि आतां कलेक्टर किंवा जिल्हाधिकारी यांचेवरच आहे. जिल्हा विकास मंडळ, जिल्हा ग्रामपंचायत मंडळ इ. अनेक मंडळें व कमिटयांचे अध्यक्ष या नात्यानें जिल्ह्याच्या सर्वांगीण

विकासाच्या विविध खात्यांतर्फे चालू असणाऱ्या कामावर त्यांचीच देखरेख असते. त्याचप्रमाणें कूळ-कायद्याखालील कांहीं महत्वाचीं अपीलेंहि जिल्हाधिकाऱ्यांचे न्यायालयापुढें चालतात.

महसूल खात्याचे जिल्हा प्रमुख जिल्हाधिकारी यांचे हाताखालीं जिल्ह्याचे प्रत्येक उपविभागासाठीं एक याप्रमाणें तीन उपविभागांसाठीं तीन प्रांताधिकारी आहेत. जळगांव, चाळीसगांव व अमळनेर हे तीन प्रांताधिकाऱ्यांचे उपविभाग आहेत. जिल्ह्याचे एकूण ११ तालुके व दोन महाल या तीन उपविभागांत पुढीलप्रमाणें विभागलेले आहेत.

(१) जळगांव प्रांत–जळगांव, भुसावळ, यावल, रावेर हे चार तालुके व पांचवा एदलाबाद महाल.
(२) चाळीसगांव प्रांत–चाळीसगांव, पाचोरे व जामनेर हे तीन तालुके व चौथा भडगांव महाल
(३) अमळनेर प्रांत–अमळनेर, पारोळे, एरंडोल व चोपडे हे चार तालुके.

कूळ कायद्याचीं अपीलेंहि प्रांताधिकाऱ्यांचे न्यायालयापुढें चालतात. महसूल खात्याचें काम, कूळ-कायद्याचें न्यायालयीन काम व कार्यक्षेत्रांतील प्रत्येक विकासगट समितीचे अध्यक्ष या नात्यानें करावयाचीं कामें प्रांताधिकारी करतात.

हा सर्व जिल्हा विकासगटाखालीं आला असून प्रत्येक तालुक्यास व महालास विकासगटाचे कामासाठीं एक स्वतंत्र गटविकास अधिकारी आहे. विकासगट अधिकाऱ्यांचें हाताखालीं शेती, पशुसंवर्धन, सहकार, ग्रामपंचायत, ग्रामीण उद्योग, ग्रामीण बांधकाम, समाजशिक्षण या विषयांसाठीं विस्तार अधिकारी असतात.

जिल्ह्याचा एकूण जमीन महसूल रु. ३९,८७,६०७-८८ न. पै. आहे.

जिल्हाधिकारी कचेरींत अनेक शाखा आहेत व प्रत्येक शाखेसाठीं एक शाखाप्रमुख आहे. विकास, ग्रामपंचायत व पुरवठा या तीन शाखांचे प्रमुख अनुक्रमें जिल्हा विकास अधिकारी, जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी, प्रांताधिकाऱ्यांचे दर्जाचे अधिकारी असतात.

तगाईकर्जें

महाराष्ट्र सरकारनें असिस्टंट कलेक्टर्स अगर प्रांत ऑफिसर्स, मामलेदार व महालकरी यांना तगाई कर्जें मंजूर करण्याचे अधिकार दिले आहेत.

१० फेब्रुवारी १९६१ पासून जळगांव येथें रेव्हेन्यु क्लबच्या इमारतींत मुलकी खात्याचे नवीन लागलेल्या उमेदवार कारकुनांसाठीं प्रशिक्षण वर्ग सुरू झाला आहे. येथें तीन महिने मुदतीचे वर्षांतून चार वर्ग भरविले जातात व उमेदवार कारकुनांना त्यांच्या कामाचें शिक्षण दिलें जातें व अभ्यासक्रम संपल्यावर त्यांची परीक्षाहि घेतली जाते. या प्रशिक्षण केंद्रावर मामलेदारांचे दर्जाचे एक सुपरिन्टेन्डेन्ट व एक इन्स्ट्रक्टर असे दोन शिक्षक नेमलेले आहेत. या केंद्रांत प्रत्येक वर्गांत ५० उमेदवार असतात.

कारकुनांसाठीं प्रशिक्षण वर्ग

जमिनीच्या बाबींशीं निगडीत अशी मुलकी खात्याची दुसरी कचेरी म्हणज "डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ लॅन्ड रेकॉर्डस्" यांची कचेरी होय. ही कचेरी जिल्हाधिकारी कचेरीच्या आवारांतच आहे.

लॅन्ड रेकॉर्डस्

महसूल खात्याच्या जमीनविषयक बाबींचें कार्यक्षम शासन व्हावें यासाठीं जरूर लागणारी आंकडेशात्राची तांत्रिक माहिती गोळा करणें हें "लॅन्ड रेकॉर्ड" विभागाचें कार्य आहे. जमिनीच्या हक्क नोंदीचें रेकॉर्ड व्यवस्थित तयार करणें व तें अद्यावत् राखणें हीं कामेंहि या कचेरीमार्फत केलीं जातात. जमिनीची वर्गवारी व पाहणीचें रेकॉर्ड सुव्यवस्थित राखण्याची जबाबदारीहि या कचेरीची आहे. सरकारी खातीं, रेल्वे, नगरपालिका, इतर सार्वजनिक संस्था वा व्यक्ती यांच्यासाठीं सिटी सर्व्हे व खेड्यांतील जागा या बाबतींतील सर्व्हेचें कामहि या कचेरीस करावें लागतें. यासाठीं डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ लॅन्ड रेकॉर्डस् यांचे हाताखालीं जळगांव, भुसावळ, रावेर, यावल, चोपडे, एरंडोल, अमळनेर, पारोळें व चाळीसगांव या नऊ तालुक्यांचे ठिकाणी सिटी-सर्व्हे कचेऱ्या असून चाळीसगांव खेरीज इतर सर्वत्र त्या मामलेदार कचेऱ्यांतच आहेत. याशिवाय रावेर तालुक्यांतील सावदे, यावल तालुक्यांतील फैजपूर, एरंडोल तालुक्यांतील धरणगांव व पाळधी या चार ठिकाणींहि सिटी-सर्व्हे कचेऱ्या असून तेथें प्रत्येकीं एक मेन्टेनन्स सर्व्हेअर असतो. पाचोरे येथें सिटी सर्व्हे ऑफीस उघण्याचें काम चालू आहे.

जमीन एकत्रीकरण

जमीन एकत्रीकरण कायद्याचे अंमलबजावणीसाठीं जळगांव येथें जमीन एकत्रीकरण अधिकाऱ्यांची एक कचेरी असून त्यांचे मार्फत एकत्रीकरणाचे कामासाठीं निवडलेल्या तालुक्यांतील प्रत्येक गांवाच्या एकत्रीकरणाच्या योजना तयार करणें व त्यांचें अंतिम प्रसिद्धीकरण झाल्यावर त्या पूर्ण करणें हें काम चालतें.

रजिस्ट्रेशन कचेऱ्या

महसूल खात्याशीं निगडीत असें दुसरें खातें म्हणजे रजिस्ट्रेशनचें. जिल्हाधिकारी हेच जिल्हा रजिस्ट्रार या नात्यानें या खात्याचे जिल्हा-प्रमुख आहेत. जिल्ह्याचे ठिकाणीं एक हेडक्वार्टर सब्‌रजिस्ट्रार यांची कचेरी असून ती जिल्हाधिकारी कचेरींतच आहे. प्रत्येक तालुका व महाल या ठिकाणीं सब्-रजिस्ट्रारच्या कचेऱ्या आहेत व शिवाय रावेर तालुक्यांतील सावदे व एरंडोलमधील धरणगांव येथेंहि सब रजिस्ट्रारच्या कचेऱ्या आहेत. दस्तऐवजाच्या नोंदी व मुंबई विवाह नोंदणी कायद्याखालील नोंदी या सर्व कचेऱ्यामध्यें होतात. रजिस्टर लग्नाची नोंद फक्त जळगांव येथील कचेरींतच होते. सहकारी कायद्यान्वयें नोंदणी झालेल्या बँका व सोसायटचा यांनीं लिहून घेतलेले कर्जरोखे या खात्यातर्फे विनामूल्य नोंदले जातात.

खजिना

जिल्हा खजिना कचेरीवरील प्रमुख अधिकारी म्हणजे डिस्ट्रिक्ट ट्रेझरी ऑफिसर हे होत. सरकारकडून आदा केला जाणारा वा सरकारमध्यें भरणा करावयाचा पैसा या संबंधांतील सर्वप्रकारची बिलें, पगार, पेन्शनें व चलनें इ. कामें या कचेरीतर्फे होतात. प्रत्यक्ष पैशाची देवाण-घेवाण स्टेट बँकेच्या स्थानिक शाखेंत होत असते.

जळगांव, भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, चोपडे, पाचोरे या ठिकाणीं स्टेट बँकेच्या शाखा आहेत तर यावल, रावेर, एदलाबाद, पारोळे, भडगांव, जामनेर व एरंडोल या ठिकाणीं स्टेट बँकेच्या शाखा अद्याप उघडण्यांत आलेल्या नाहींत.

पोलीस खात्याची यंत्रणा

पोलीस यंत्रणा हा गृहखात्याचा भाग आहे व शांततारक्षणाची व सुरक्षिततेची जबाबदारी या खात्यावर आहे. क्रिमिनल प्रोसिजर कोड, इंडियन पिनलकोड, मुंबई पोलीस कायदा इत्यादीं प्रमाणेंच जुगार प्रतिबंधक, दारूबंदी इ. कायद्यानुसार घडणारे गुन्हे शोधणें हेंहि यांचेच कार्य आहे. दारूबंदीसाठीं या जिल्ह्याला एक सब्-इन्स्पेक्टर व ३ हत्यारी आणि ११ बिनहत्यारी पोलिस यांचा स्वतन्त्र असा एक टास्क फोर्स आहे. जिल्हा पोलिस प्रमुखांच्या

हाताखालीं जळगांव येथें एक असिस्टंट सुपरिंटेंडंट व एक डेप्युटि सुपरिंटेंडंट असून जिल्ह्यांत सहा इन्स्पेक्टर्स व डेप्युटि इन्स्पेक्टर्स आहेत.

जेव्हां पोलीस दलाला अधिक बलाची जरुरी लागेल तेव्हां गृहरक्षक दल पोलिसांचीं कर्तव्यें पार पाडूं शकतें. जिल्हा होमगार्ड कचेरी विसनजी नगरांत जळगांव येथें आहे व प्रत्येक तालुक्यांत संघटनेचे ऑफिसर कमान्डिंग व त्यांचीं पथकें आहेत. जिल्ह्यांत एकूण ३४ ऑफिसर्स, ४८० गृहरक्षक व ६ स्टाफ ऑफिसर्स व एक डिस्ट्रिक्ट कमांडर आहेत.

होमगार्ड कचेरी

राज्याच्या कायदा खात्याचे नियंत्रणाखालीं न्यायालयांचा कारभार येतो. त्यांच्यापुढें येणाऱ्या खटल्यांचे उपलब्ध पुराव्यानुसार व कायद्यानुसार निवाडे देणें हें न्यायालयांचें काम असतें. जिल्ह्याचें डिस्ट्रिक्ट व सेशन्स कोर्ट जळगांव येथें जिल्हा पेठेंत आहे. जिल्हा न्यायाधीश हेच या न्यायालयाचे प्रमुख होत. याशिवाय जिल्ह्यांत सिव्हिल जज्ज व ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटस् यांचीं न्यायालयें आहेत.

न्यायालयें

न्यायालयानें अपराध्यांना शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांची कैदेंत रवानगी होते. बंदीवानासाठीं जळगांव येथें एक छोटा सब जेल जिल्हाधिकारी कचेरीचे आवारांतच आहे. त्यासाठीं नवीन इमारत बांधण्यांत येत आहे. नवीन इमारतींत ११० पुरुष व ६ स्त्री बंदी ठेवण्याची व्यवस्था होईल. या जेलचे प्रमुख जेलर कम् सुपरिन्टेन्डेन्ट हे आहेत. त्याचप्रमाणें भुसावळ येथेंहि एक सब् जेल आहे व तेथें ६७ पुरुष व ३ स्त्रिया असे ७० बंदी ठेवण्याची सोय आहे.

तुरुंग

आतां यानंतर शेती व जंगल खात्यांच्या कचेऱ्यांची माहिती पाहूं. जिल्हा शेती-अधिकारी यांची कचेरी जळगांव येथें विसनजी नगरामध्यें आहे.

खानदेश कापूस संरक्षित भागांत हा जिल्हा येत असून या विभागांत जळगांव, धुळें हे दोन जिल्हे, व नाशिकचे ५ तालुके येतात. या विभागासाठीं एक कॉटन सुपरिन्टेन्डेन्ट हे अधिकारी असून त्यांची कचेरी जळगांव येथें विसनजी नगरांतच आहे. इतर जातीच्या कपाशीची भेसळ या संरक्षित भागांत होऊं नये यासाठीं या प्रदेशांत बाहेरून येणाऱ्या सर्व मार्गावर कॉटन चेक नाकीं बसविलेलीं आहेत.

शेती व जंगल

शेती खात्याचीं कापूस, तेलबिया व ज्वारी, उडीद, मूग इ. धान्यें या तीन प्रकारचीं संशोधन केंद्रें जळगांव जवळ ममुराबाद येथें आहेत. कॉटन ब्रीडर हे कापूस संशोधन केंद्राचे, तेलबिया संशोधन अधिकारी हे तेलबिया संशोधन केंद्राचे व शेती अधिकारी, ममुराबाद शेती फार्म, हे ज्वारी, उडीद मूग इ. धान्यांच्या संशोधन केंद्राचे प्रमुख आहेत. स्थानिक परिस्थितींत चांगलें उत्पन्न देणारी व सरस अशी जात कोणती याचें संशोधन विविध संशोधन पद्धतीनें येथें चालतें. सावदे येथें केळीं संशोधन केंद्र नुकतेंच सुरू झालें असून तेथें एक शेती निरीक्षक नेमले आहेत. भूसंरक्षण कार्याच्या तीन उपविभागीय कचेऱ्या जळगांव, चाळीसगांव व अमळनेर येथें आहेत.

ग्रामसेवकांना त्यांच्या कार्याचें शिक्षण देण्यासाठीं ग्रामसेवक शिक्षण केंद्र जळगांव येथें उघडण्यांत आलें असून त्या केंद्राचे प्राचार्य हे शेतकी खात्याचे पहिल्या वर्गाचे अधिकारी असतात.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचीहि कचेरी जळगांव येथें असून ती जिल्हा पेठेंत एस्. टी. डेपो-जवळच आहे. जिल्ह्यांतील सर्व गुरांचे दवाखाने, पशुवैद्यक केंद्रें, पशुपालन केंद्रें यावर त्यांची देखरेख असते.

जंगलांचें संरक्षण करणें व तीं सुस्थितींत ठेवून त्यांचा विकास करणें हें काम जंगल खात्याचें असतें. जळगांव येथें जिल्हा बिल्डिंगमध्येंच डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसरांची कचेरी असून जिल्ह्यांत रेंज फॉरेस्ट ऑफिसरांच्या कचेऱ्या जळगांव, पारोळे, चाळीसगांव, एदलाबाद, जामनेर, चोपडे, यावल व रावेर या आठ ठिकाणी आहेत. प्रत्येक रेंज फॉरेस्ट ऑफिसरांचे कचेरीच्या ठिकाणीं एक रोप उत्पादन केंद्रहि असतें व तेथून वनमहोत्सवासाठीं रोपांचा पुरवठा होतो. जंगल खात्याचे ताब्यांतील जंगलें व गवती कुरणें यांतील उत्पादन व त्यांची विक्री, जंगलविषयक कायद्यांची अंमलबजावणी हीं कामेंहि याच खात्यामार्फत चालतात.

इमारती व दळणवळण

इमारती व दळणवळण या खात्याची जिल्ह्याची कचेरी जळगांव येथें जिल्हा बिल्डिंग समोरच असून एक्झिक्युटिव्ह इंजिनियर हे या कचेरीचे प्रमुख अधिकारी आहेत. रस्ते, पूल, सरकारी इमारती, डाकबंगले, इत्यादींचें बांधकाम, दुरुस्ती, निगा राखणें, सुधारणा इ. कामें या कचेरी-मार्फत होतात.

वीज व पाटबंधारे

वीज व पाटबंधारे या खात्याच्या जळगांव येथें ३ विभागीय कचेऱ्या आहेत. त्यापैकीं दोन कचेऱ्या गिरणा योजनेसंबंधाच्या आहेत. एक्झिक्युटिव्ह इंजिनियर गिरणा कॅनॉल डिव्हिजन नं. २ यांची कचेरी येथें असून त्यांचेकडे दहिगांव बंधारा व पाट यांचें काम आहे. त्यांचे हाताखालीं एकूण ५ उपविभाग असून त्यापैकीं एरंडोल येथें ३ व जळगांव व धरणगांव येथें प्रत्येकीं एक आहे. याशिवाय गिरणा डिस्ट्रिब्युशन डिव्हिजन हा एक विभाग नुकताच उघडला असून त्यांचेकडे पाट खोदून पाणी वांटपाची सोय करण्याचें काम आहे.

वीज व पाटबंधारे खात्याच्या नियंत्रणाखालील आणखी दोन कचेऱ्या जळगांव येथें आहेत. त्यांपैकीं एक म्हणजे इलेक्ट्रिकल सब-इन्स्पेक्टर यांची कचेरी होय.

शिक्षण

जिल्ह्यांतील माध्यमिक व प्राथमिक शाळांची तपासणी करणें, त्यांचेवर देखरेख ठेवणें, त्यांना मार्गदर्शन करणें व त्यांना नियमानुसार अनुदान देणें इ. कामें जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कचेरीद्वारें चालतात. त्यांची कचेरी जळगांव येथें जिल्हा लोकल बोर्डाचे इमारतींत आहे. त्यांचे हाताखालीं एक उपशिक्षणाधिकारी असून शिवाय ३१ सहाय्यक उपशिक्षणाधिकारी आहेत.

प्राथमिक शाळा, शिक्षक व शिक्षण यांची व्यवस्था जिल्हा शिक्षण मंडळातर्फे होत असते. या जिल्हा शिक्षण मंडळाचे शासनाधिकारी सरकारी अधिकारी असतात व त्यांना ६ सहाय्यक आहेत.

तांत्रिक शिक्षणासाठीं जळगांव शहरांत पॉलीटेक्निक, इंडस्ट्रिअल टेक्निकल इन्स्टिटयूट व टेक्निकल हायस्कूल या शिक्षणसंस्था असून भुसावळ येथेंहि एक टेक्निकल हायस्कूल आहे.

जिल्ह्यांत मागासलेले वर्ग, आदिवासी, आर्थिकदृष्टचा मागासलेले इत्यादींच्या कल्याणासाठीं आंखलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी समाज कल्याण खात्यामार्फत होते व हें काम जिल्ह्याचे समाज-

कल्याण अधिकारी यांचें आहे. त्यांची कचेरी जळगांव शहरांत मेहरुण रस्त्याला आहे. शिवाय समाज कल्याण खात्यातर्फें जळगांव शहरांत बालसुधारगृह, जिल्हा आश्रयकेंद्रें, मुंबई प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स अॅक्ट हीं तीन केंद्रें असून त्या प्रत्येक केंद्रासाठीं स्वतंत्र प्रोबेशन ऑफिसर, सुपरिन्टेन्डेन्ट व चीफ ऑफिसर असे अनुक्रमें तीन अधिकारी आहेत. शिवाय मध्यवर्ती समाज कल्याण मंडळातर्फे जिल्ह्यांत भुसावळ, अमळनेर, यावल व भडगांव या चार ठिकाणीं स्त्रिया व मुलांच्या कल्याणाच्या कार्यक्रमासाठीं समाज कल्याण प्रकल्प असून यावल येथें एक शबरी आश्रम आहे.

समाजकल्याण

सहकारी खात्याची पुनर्रचना

सहकारी खात्याच्या शासन व्यवस्थेची मार्च १९६१ मध्यें पुनर्रचना झाली असून त्यानुसार या जिल्ह्यासाठीं जिल्हा नायब निबंधक सहकारी मंडळचा, जळगांव किंवा डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् हें अधिकारपद निर्माण करण्यांत आलें असून जिल्हा पातळी वरील सहकारी खात्याच्या विविध शाखांमार्फत चाललेल्या कामकाजावर त्यांचीच देखरेख राहील. मुख्य सहकारी शाखा, औद्योगिक सहकारी शाखा, सावकार-नियंत्रण शाखा व नियंत्रित बाजारपेठांसंबंधीची शाखा या सहकारी खात्याच्या चार मुख्य शाखा असून त्या सर्व शाखांचे जिल्हा पातळीवरील मुख्य अधिकारी डेप्युटी रजिस्ट्रार हेच आहेत.

आरोग्य

आरोग्य खात्याचे वैद्यकीय विभाग व सार्वजनिक आरोग्यविभाग हे मुख्य दोन विभाग असून जिल्ह्याचे वैद्यकीय विभागाचे प्रमुख सिव्हिल सर्जन हे आहेत. जळगांव येथील सिव्हिल हॉस्पिटलचे तेच मुख्य सर्जन आहेत व याशिवाय जळगांव येथें मलेरिया निर्मूलन योजनेचे वैद्यकीय अधिकारी यांचेंहि कार्यालय विसनजी नगरांत असून त्यांचेमार्फत मलेरिया निर्मूलनाचें काम चालतें.

श्रम व उद्योग खात्याच्या कचेऱ्या

महाराष्ट्र सरकारच्या श्रम व उद्योग खात्याच्या एकूण चार प्रकारच्या कचेऱ्या येथें आहेत. जिल्हा उद्योगविनिमय कचेरी,सरकारी लेबर ऑफिसर यांची कचेरी, फॅक्टरी इन्स्पेक्टर यांची कचेरी व औद्योगिक इन्स्पेक्टर यांची कचेरी अशा या चार कचेऱ्या आहेत.

जिल्हा उद्योगविनिमय कचेरीचें काम म्हणजे सरकारी, निमसरकारी व कांहीं खाजगी क्षेत्रांतील व्यवसाय केंद्रांमध्यें काम करणाऱ्यांची वर्गवार माहिती गोळा करणें, सरकारी व निमसरकारी कचेऱ्यांना लागणाऱ्या नोकरवर्गासाठीं योग्य त्या उमेदवारांची शिफारस करणें, नोकरीसाठीं धडपडणाऱ्या उमेदवारांना योग्य त्या व्यवसायाचें मार्गदर्शन करणें इ. प्रकारचें असतें.

सरकारी लेबर ऑफिसर यांची कचेरी जळगांव येथें नव्या पेठेंत "विकास" इमारतींत असून त्यांच्या कार्यक्षेत्रांत जळगांव व धुळें हे दोन जिल्हे येतात. उद्योगधंद्याचे वाढीबरोबरच कामगार व मालक यांचे परस्पर संबंधांत वितुष्ट निर्माण करणारे अनेक प्रसंग येतात. मालकांचे व मजूरांचे हितसंबंधांत अनेक वेळां संघर्ष निर्माण होतात. अशा वेळीं हे संघर्ष विकोपाला न जाऊं देतां शक्यतों समझोत्यानें व सामोपचारानें मिटविण्याचे प्रयत्न या कचेरीतर्फे केले जातात. कामगारांचे हितसंबंध रक्षिणारे अनेक कायदे मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं केले आहेत. मध्यवर्ती सरकारचा औद्योगिक कलह कायदा १९४७, राज्य सरकारचा मुंबई औद्योगिक संबंध कायदा १९४६, किमान वेतन कायदा, कामगारांना नुकसान भरपाई देण्याचा कायदा, गुमास्ता कायदा तसेंच औद्योगिक क्षेत्रांतील नोकऱ्यांबाबतच्या नियमावली इ. कायद्यांच्या अंमलबजावणीचें काम या कचेरीस करावें लागतें. संप व टाळेबंदीचे प्रकार कमींत कमी होतील व कामगारांना न्याय्य वागणूक दिली जाईल याकडे ही कचेरी लक्ष देते. कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना फावल्या वेळांत

सात्विक मनोरंजन मिळावें व त्यांचेवर चांगले संस्कार घडावेत म्हणून कामगार कल्याण केंद्रें जळगांव, अमळनेर व चाळीसगांव येथें चालविण्यांत येत आहेत.

फॅक्टरी इन्स्पेक्टर यांची कचेरीहि जळगांव येथेंच लेबर ऑफिसरांचें कचेरीजवळच असून त्यांचें मुख्य काम फॅक्टरी ॲक्ट खालीं येणारे कारखाने व उद्योगधंदे यांना नियमित भेटी देऊन फॅक्टरी ॲक्टमधील नियमांचें व तरतुदींचें पालन योग्य प्रकारें होतें कीं नाहीं हें पाहणें हें होय. या कायद्याचा भंग झाल्यास रीतसर खटले भरून नियमांचें उल्लंघन करणारास योग्य शासन घडविलें जातें. त्याचप्रम.णें "पेमेन्ट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६" प्रम.णें क.मग.रांन. ठरलेल्या वेळीं अयोग्य कपात न करतां पगार दिला जातो कीं नाहीं यावरहि त्यांची देखरेख असते. तसेंच किमान वेतन कायद्याचे इन्स्पेक्टर म्हणूनहि त्यांना काम करावें लागतें. त्यांचे कार्यक्षेत्रांत फक्त जळगांव जिल्हा आहे.

औद्योगिक इन्स्पेक्टर यांचीहि जळगांव येथें एक कचेरी असून जिल्ह्यांत भुसावळ, अमळनेर व चाळीसगांव येथें आणखी कचेऱ्या आहेत. या चार कचेऱ्यांमध्यें सर्व जिल्ह्याचें कार्यक्षेत्र विभागण्यांत आलें आहे. वजन-मापांच्या कायद्यांची अंमलबजावणी हें या कचेरीचें मुख्य काम आहे. पण त्याचबरोबर औद्योगिक वसाहती व औद्योगिक विकासाच्या योजना या खात्यामार्फतच कार्यवाहींत येत असल्यामुळें त्यासंबंधांतील कामेंहि या कचेऱ्यांना करावीं लागतात.

अर्थखातें

अर्थखात्याशीं संबंधित अशा जिल्ह्यांत चार कचेऱ्या आहेत. एक कचेरी विक्रीकर अधिकाऱ्यांची, दुसरी कचेरी जिल्हा संख्याशास्त्र अधिकाऱ्यांची, तिसरी कचेरी इन्कमटॅक्स ऑफिसरची, चौथे सेंट्रल एक्साईजचें ऑफीस व पांचवी कचेरी अल्पबचत योजनेची आहे. त्यापैकीं पहिल्या दोन कचेऱ्या राज्य सरकारच्या व उरलेल्या तीन भारत सरकारच्या आहेत.

जिल्ह्याची विक्रीकर कचेरी जळगांव शहरांत बाजरपेठेंत असून तेथें दोन विक्रीकर अधिकारी
आहेत. ही कचेरी असिस्टन्ट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स सेंट्रल डिव्हिजन, रेंज १, मुंबई यांच्या अधिकार-
कक्षेखालीं येते. विक्रीकर अधिकारी तालुक्यातालुक्यांतून फिरती करून तेथें कांहीं दिवस मुक्काम करून
तेथील व्यापाऱ्यांच्या आकारणीचीं कामें करतात. त्यामुळें तालुक्यांतील व्यापाऱ्यांना जिल्हा कचेरीकडे
फारसें यावें लागत नाहीं. विक्रीकराखालीं नोंदणी करणें, निरनिराळे परवाने व अधिकारपत्रें देणें, विक्री-
कराची आकारणी व वसुली इ. कामें या कचेरीतर्फे केलीं जातात. मुंबई विक्रीकर कायद्याशिवाय, मोटर,
स्पिरिट, इन्टॉक्झिकंट टॅक्सेशन ॲक्ट, सेंट्रल सेल्स टॅक्स इ. कायद्यांच्या शासनाचें कामहि त्यांना करावें
लागतें. विक्रीकर अधिकाऱ्यांचे मदतनीस १० विक्रीकर इन्स्पेक्टर्स आहेत व हे सर्व जिल्ह्याचे विक्रीकर कचे-
रीतच काम करतात.

जिल्हा संख्याशास्त्र अधिकारी यांची कचेरी जळगांवांत नव्या पेठेंत अलीकडेच सुरूं झाली असून
त्यांचे कचेरीतर्फे राज्य सरकारच्या सर्व कचेऱ्यांकडून आंकडेवार माहिती गोळा करून ती पद्धतशीरपणें
संकलित केली जाते.

अल्पबचत योजनेची कचेरी

मध्यवर्ती सरकारच्या अर्थमंत्रालयाचे शासकीय नियंत्रणाखालील असिस्टन्ट नॅशनल सेव्हिंग्ज ऑफिसर यांची कचेरीहि जळगांव येथें अलिकडे उघडण्यांत आली असून त्यांच्या कार्यक्षेत्रांत जळगांव, धुळें, बुलढाणा, यवतमाळ व अकोला हे पांच जिल्हे येतात. अल्पबचत योजनेच्या या जिल्ह्याचे संघटकांची कचेरीहि त्यांचेच कचेरींत आहे. अल्पबचत योजनेचा प्रचार व प्रसार करून अधिकाधिक निधि या योजनेंत जमा करणें हें या कचेरीचें काम आहे.

या जिल्ह्यासाठीं डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ प्रोहिबिशन ॲन्ड एक्साईज हे जिल्ह्याच्या दारूबंदी कचेरीचे प्रमुख म्हणून काम करीत असून त्यांची कचेरी जिल्हा पेठेंत जिल्हा बिल्डिंगच्या रस्त्यावर आहे. संस्कारकेंद्रें, कलापथकें वगैरे द्वारा ग्रामीण भागांत दारूबंदीचें कार्य या कचेरीतर्फें केलें जातें. त्याचप्रमाणें नशायुक्त पदार्थ व द्रवावरहि त्यांचें नियंत्रण असतें. **जिल्हा दारुबंदी कचेरी**

जिल्हा प्रसिद्धी अधिकारी यांची कचेरी व जिल्ह्याच्या ग्रामीण रेडिओचें टेक्निकल इन्-चार्ज यांची कचेरीहि जळगांव येथें बळीराम पेठेंत आहे. चित्रपट, पुस्तिका, भित्तीपत्रकें, वृत्तपत्रीय वार्ता व लेख, पत्रकार दौरे व प्रदर्शनें इ. विविध मार्गांनीं सरकारी योजनांची व कामांची प्रसिद्धी या कचेरीतर्फें केली जाते व प्रकाशन विभागाच्या ग्रामीण रेडिओ योजनेनुसार खेडोपाडीं सेटस् बसविणें व त्यांची निगा राखणें इ. कामें टेक्निकल इन-चार्ज यांचे कचेरीकडून होतात. **जिल्हा प्रसिद्धी व ग्रामीण रेडिओ कचेऱ्या**

मध्यवर्ती सरकारच्या वाहतूक व दळणवळण खात्याच्या नियंत्रणाखालीं पोस्ट खातें येत असल्यानें त्याचाहि उल्लेख येथें केला पाहिजे. जिल्ह्यांत पोस्ट कचेऱ्या, तार कचेऱ्या, टेलिफोन कचेऱ्या कोठें आहेत यांची माहिती याच पुस्तकांत दळणवळणाच्या प्रकरणांत दिलीच आहे. **सुपरिन्टेन्डेन्ट ऑफ पोस्ट ऑफिसेसम**

भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील रेल्वे विभाग यांच्या स्थानिक कचेऱ्यांची माहितीहि याच ठिकाणी देणें उपयुक्त होईल.

जळगांव जिल्ह्यांत भुसावळ हे मध्य रेल्वेचें इगतपुरी ते भुसावळ या विभागाचें मुख्य केंद्र असल्यानें येथें मध्य रेल्वेच्या सर्व विभागीय कचेऱ्या आहेत. डिव्हिजनल सुपरिन्टेन्डेन्ट हे या विभागाचे सर्वप्रमुख अधिकारी आहेत. **रेल्वे**

या शिवाय जळगांव शहरांत आयुर्विमा कॉर्पोरेशनची शाखा-कचेरी, कृषक समाजाची कचेरी, भारत सेवक समाजाची कचेरी, मुंबई ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा संघटकांची कचेरी, खादी ग्रामोद्योग कमिशनची विभागीय कचेरी, महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटकांची कचेरी, जिल्हा लोकल बोर्डाची कचेरी इत्यादि निमसरकारी व स्वतंत्र संस्थांच्या अनेक कचेऱ्या आहेत. **इतर कचेऱ्या**

२०६